115

# माझा भाऊ, युरी

## वलेन्तिन गागारिन

अनुवाद | मालती देशपांडे



माझा भाऊ, युरी ही एका [illegible] मुलाची त्याच्या बालपणाची व शिक्षण-काळाची कथा आहे. हाच [illegible] [illegible] अंतराळवीर [illegible] [illegible] लिहून येते. [illegible] आवडे. त्या [illegible] जिथे या कथेतून [illegible] युरीच्या कुटुंबातील मंडळी. [illegible] शाळेतील त्याचे [illegible] सारातोवची [illegible] हवाई दलाचे विद्यालय [illegible] युरीला मार्गदर्शन लाभले, त्याची माहिती या पुस्तकात आली आहे. या पुस्तकातील सर्वांत रोमहर्षक भाग म्हणजे [illegible] दिवशी युरी गागारिन अंतराळ-उड्डाण करून आला त्या दिवसाचे वर्णन! त्या दिवसाची इतिहासात नोंद झाली आहे

ल्य रुपये १२-[illegible]



मेझ्दुनरोद्नाया क्नीगा. मॉस्को.
लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई.

# माझा भाऊ, युरी

वलेन्तिन गागारिन

मराठी अनुवाद / **मालती देशपांडे**

**मेझ्दूनरोद्नाया क्नीगा,** मॉस्को.
**लोकवाङ्मय गृह प्रा. लि.,** मुंबई.

मेझ्दूनरोद्नाया क्नीगा, मॉस्को
लोकवाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई.

# माझा भाऊ, युरी

प्रथमावृत्ती / डिसेंबर १९७७

© मेझ्दूनरोद्नाया क्नीगा, मॉस्को

मुखपृष्ठ / प्रकाश विश्वासराव

प्रकाशक
आर. जी. देसाई
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
१९०-बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४०० ००४.

मूल्य रुपये १२-५०

मुद्रक
आर. जी. देसाई
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

# माझा भाऊ, युरी

पहिल्या अंतराळवीराच्या जीवनातील आठवणी

## अनुक्रम

**भाग १ ला**

छायाचित्रे
प्रस्तावना १
नव्या वर्षाचा वृक्ष ६
बर्फावरील बांबूउडीचा उंचवटा १६
वसंतऋतूत २२
पतंग आणि ग्लायडर २८
कमिसार सुश्किनची गोष्ट ३६
पिठाच्या गिरणीतील एक रात्र ४२
लढाईला तोंड लागले ४९
दारावरून वाहाणारा निर्वासितांचा लोंढा ५५
गावची जनावरं हलवली ६१
त्याला वीराचं मरण आलं ६७
ते दोन वैमानिक ७४
आक्रमण ८१
अनामिक वीर ९३
युराचा 'सैताना'शी मुकाबला ९८
१९४२ साली १०६
ते पत्रक ११७
गिरणीला आग लागते १२०
जर्मनांच्या ताब्यात १२५
घरून पत्र येते १२९
स्काऊट १३३
लढाई क्लुशिनोतून मागे हटते १४०

**भाग २ रा**

घरी परत १५०
माझे मदतनीस १५५
युरा पाचवीत शिकतो १६८
बेस्पालोव १९३
गवतकापणी २०२
"चला, निघालो आपण." २१३
युरा, एक कामगार २२४
जमीन आणि आभाळ २३७
विमानोड्डाणापूर्वी २४३

**भाग ३ रा**

युरी : एअर फोर्स कॅडेट २५२
दूर, दूर उत्तरेत २६१
प्रवासाचं गूढ २६५
अविस्मरणीय दिवस २७२
ज्ञातूनकडून आपल्या मुलाचा गौरव २८४
सांगता २९४



सारातोवच्या औद्योगिक तंत्रवैज्ञानिक शाळेचा विद्यार्थी,
युरी गागारिन ( १९५३ )

युरी गागारिन आईवडिलांसमवेत :
ॲना तिमोफिएव्ह्ना
आणि अलेक्सो इवानोविच





१४ एप्रिल १९६१ : पहिल्या यशस्वी अंतराळ–उड्डाणानंतर नुकोवो विमानतळावर युरी गागारिन यांचे वीरोचित स्वागत करण्यात आले.

बाह्यावकाशात यशस्वी उड्डाण करून आल्यावर युरी गागारिन यांचे अकादमीशिअन सर्गेई कोरोलेव यांच्याकडून अभिनंदन.





'सोविएत संघराज्याचा पायलट कॉस्मोनॉट' (अंतराळवीर) युरी गागारिन



जगातील पहिल्या अंतराळवीराच्या स्वागतार्थ नव्या दिल्लीच्या नगरपालिकेने एक समारंभ आयोजित केला होता. समारंभात भारताचे त्यावेळचें पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यासमवेत युरी गागारिन व वलेन्तिना गागारिना

युरी गागारिन आपल्या दोन्ही मुलींसमवेत



## प्रस्तावना

घंटा वाजली. शिक्षकांची पाठ वळली. बाके सरकविल्याचा आणि बडविल्याचा केवढा तरी आवाज झाला.

मधली सुट्टी सुरू झाली होती. वर्षाचा अखेरचा दिवस, अखेरच्या तासाअगोदरची अखेरची सुट्टी. ' ६ वी अ ' च्या मुलांनी खिडकीत जागा मिळविण्यासाठी एकच गर्दी उडविली. त्याना सूर्यप्रकाशात उभे राहायचे होते. खालच्या रस्त्यावरची गंमत पहायची होती.

रस्त्याला लागून असलेल्या पुढच्या अंगणाअंगणातून ' लिलॅक'ची पांढरी जांभळी फुले भरघोस फुलली होती. त्या वर्षीच्या वसंतऋतूत ' लिलॅक ' वेडयासारखा बहरला होता. तो बहर कितीतरी दिवस टिकूनहि राहिला होता. भरपूर सूर्यप्रकाशात आणि उबदार हवेत ती फुले प्रसन्नपणे मजेत डोलत होती.

असा लख्ख सूर्यप्रकाश पसरला. उन्हाळयाची सुट्टी दरवाजा ठोठावू लागली. जंगलातून मनसोक्त भटकंती करण्याची, ' झात 'च्या किनाऱ्यावर राहुटया ठोकून छावणीत मुक्काम करण्याची स्वप्ने डोळयांसमोर नाचू लागली की, पुस्तकात डोके बुडवून अभ्यासाला बसणारा कोणी महाभाग सापडेल तरी का ? उत्तमोत्तम पुस्तके विटल्यासारखी रंगहीन दिसू लागतात. कंटाळवाणे तास आणखीच रेंगाळतात. संपता संपत नाहीत; कोणीतरी कबूल केलेले बक्षीस द्यावे तसे त्या सुट्टीचे स्वागत होते.

तेवढयात कोणीतरी एकाने वहीचा कागद टरकन फाडला. त्याचे विमान बनविले आणि खिडकीतून बाहेर उडवून दिले. उबदार वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर उडत उडत त्याने रस्त्याच्या दुसऱ्या कडेला असलेल्या एका " बर्ड–चेरी " वृक्षाच्या फांदीवर गमतीने मुक्काम केला.

झालं ! पहाता पहाता सारी मुलं त्याच उद्योगाला लागली. वह्यांची पानं टराटर फाटू लागली. थोडयाच वेळात कागदी विमानांचे स्कॉड्रन दुसऱ्या मजल्याच्या खिडक्यातून उड्डाणासाठी एकामागोमाग एक बाहेर पडली.

मुले खिडक्यांच्या चौकटीवर चढली. आपली आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांची

विमाने कशी काय प्रगती करताहेत ते बारकाईने पाहू लागली.

" पहा ! जरा माझं विमान पहा तर.'

" हूं ! माझं तर तुझ्याही पुढं गेलंय."

" मुळीच नाही. साफ खाली कोसळलंय."

" आता काय सांगणार बाबा तुला ? अरे, ते खाली सूर मारतंय सूर !"

" काय विचारावं. मोठे पंडितच तुम्ही ! सूर बीर सारं काही तुम्हाला माहीत !"

" चल नीघ इथून; का देऊ एका ठोसा चढवून ?"

" स्वतःला संभाळा. तुम्हालाच मिळायचा एखादा सणसणीत."

जरा दुसरीकडे.

" माझ्या विमानाचा गुरुत्वमध्य अगदी अचूक साधलाय. त्याच्या नाकात मी काड्यापेटीतली एक काडी घातलीय."

रस्त्यातून एक मध्यम वयाचा माणूस पुढे चालत येतो. हनुवटीवर छोटीशी नेटकी दाढी राखलेली, अंगात अंगात लिननचा करडा सूट आणि डोक्यावर गवताची टोपी, नाक ठसठशीत, त्यावर पोलादी फ्रेमचा एक चष्मा.

मुलांचा आरडा ओरडा ऐकून तो वर पहातो, हसतो, मुलांकडे पाहून हात हलवितो.

आणि नेमक्या त्याच क्षणी एक प्रचंड घोटाळा झाला. वहीचे कव्हर फाडून बनविलेले एक नारिंगी विमान झोकात सफाईदार वळण घेऊन आले. त्याने तीरा सारखा सूर मारला तो थेट त्या माणसाच्या नाकावर. चष्म्याला धडक बसून तो खाली पडला. काच फुटल्याचा खळकन आवाज झाला. तो खाली वाकला आणि चष्मा शोधण्यासाठी जमीनीवर चाचपडू लागला.

सारी मुले क्षणार्धात पांगली.

" तो तर वर येतोय," एक मुलगी दबल्या आवाजात म्हणाली. चांगलीच घाब ली होती.

पदार्थविज्ञानाचे शिक्षक लेवू मिरवायलोविच बेस्पालोव वर्गात आले. त्यांच्या मागोमाग लिननचा करडा सूट घातलेला तो माणूसही आत आला. सारा वर्ग उठून उभा राहिला, इतकासुद्धा आवाज न करता.

" खाली बसा," शिक्षक म्हणाले.



मुले चूपचाप खाली बसली. कुठे हू नाही की चू नाही.

" कोणाचं आहे हे विमान ?" बेस्पालोवनी विचारले. त्यानी ते नारिंगी विमान टेबलावर ठेवले. शेपटीकडल्या बाजूला पाढर्यांच्या छापील ओळी स्पष्ट दिसत होत्या. पंखांवर लाल पेन्सिलीने लाल तारे काढले होते. एकाही मुलाने नजर वर केली नाही. प्रत्येकाने आपल्या डेस्कचे बारकाईने निरीक्षण चालविले होते.

" या गृहस्थांचा कोणी अपमान केला ?" शिक्षकानी विचारले.

कोणाच्याही तोंडून चकार शब्द बाहेर पडला नाही.

तो परका माणूस टोपीशी उगीचच चाळा करीत होता. त्याने पुन्हा चष्मा घातला होता, त्याची एक काच तेवढी अदृश्य झाली होती. तो काहीसा गोंधळल्या-सारखा, हरवल्यासारखा वाटत होता.

बेस्पालोवनी दोनचार येरझारा घातल्या, ते नारिंगी विमान उचलून घेतले व काही वेळ त्याचे निरीक्षण केले, मग म्हणाले, " ठीक आहे, मी काही तुम्हाला आज शिक्षा करणार नाही. हा तास संपल्यावर तुमची उन्हाळ्याची सुट्टी सुरू होईल. आता उगीच तुमच्या आईवडिलाना बोलावून घेऊन चर्चा करण्यात अर्थ नाही. पण मला वाटतं, उन्हाळ्याच्या सुटीवर जाण्यापूर्वी एकमेकांचा निरोप घेताना आपली मन काही तितकीसी साफ राहिलेली नाहीत. "

साऱ्या वर्गाचा सुस्कारा स्पष्ट ऐकू आला.

रस्त्यावरून एक गाडी चालली होती, तिचा खडखडाट वर्गातही ऐकू आला.

मग मधल्या ओळीतला एक मुलगा उठून उभा राहिला. शेजारच्या मुलाने त्याची चड्डी ओढली. जणू त्याला सुचवायचे होते, " उगीच गाढवपणा करू नकोस, बस खाली." पण त्याने त्याला झटकून टाकले. नजर उचलून तो म्हणाला, " लेव् मिखायलोविच, चूक माझी होती." मग तो त्या परक्या माणसाकडे वळला, " माझी चूक झाली. कृपा करून माफ करा."

चष्म्याचे भिंग फुटले होते, तिकडचा डोळा किलकिला करीत पाहुणा त्या मुलाकडे एकटक पहात राहिला.

" चुकून झालं माझ्या हातून." मुलाने पुस्ती जोडली.

मुले अधीर होऊन कशाच्या तरी अपेक्षेने वाट पाहात राहिली. पाहुण्याने खांदे उडविले त्याच्या ओठावर प्रेमळ हसू उमटले. मुलांच्या चेहऱ्यावर लागलीच त्याचे प्रतिबिंब दिसू लागले.

"मुला, सच्चेपणानं दिलेला कबुलीजबाब अपराधाच्या जबाबदारीतून मुक्त करतो. मी तुझ्यावर राग धरणार नाही. खरा कबुलीजबाब मिळाल्यानंतर कोणीही तक्रार कायम ठेवणे योग्य नाही." तो बोलतच होता. जुन्या माणसांप्रमाणे त्याच्या बोलण्यात एक प्रकारची आदब होती. मुलांना आणि शिक्षकांना, दोघानाही उद्देशून तो बोलत होता. "मीही एकदा लहान होतो, खोड्या करीत होतो. वयच असतं ते तसं. त्याला कोणी काही करू शकत नाही. मला वाटतं ते मनावरच घेऊ नये."

लेव् मिरवायलोविचनी मान हलविली.

पुन्हा एकदा साऱ्या वर्गातून स्पष्ट निश्वास ऐकू आला, मात्र त्यावेळी तो सुटकेचा निःश्वास होता.

"या उन्हाळ्यात आपण वेगवेगळ्या नमुन्यांची विमानं बनवू, ग्लायडरसुद्धा बनवू" लेव् मिरवायलोविचनी मुलांना कबूल केले. देशाच्या संरक्षणासाठी झालेल्या युद्धात त्यांनी हवाई दलात पायलट म्हणून काम केले होते. मुलांना विमानाबद्दल वाटणारी तीव्र जिज्ञासा व ओढ ते समजू शकत होते.

"आता एवढा हा धडा पुरा करू या."

"बरं, येतो मी आता," पाहुणा जायला निघाला, वर्गाबाहेर पाऊल टाकताना तो थबकला व त्यानें मागे वळून पाहिले. तो मुलगा अजूनही उभाच होता.

"नाव काय तुझं ?"

"यूरा गागारिन"

ही सारी हकिकत आम्हाला त्याच दिवशी संध्याकाळी समजली. जेवणासाठी सारेजण टेबलाभोवती बसले होते. यूराची बहीण झोया म्हणाली,

"पैजेवर सांगते. त्यांचा चष्मा फुटला, तेव्हा तू नक्कीच घाबरला होतास."

"नक्कीच घाबरलो होतो," यूरा उत्तरला. हातातल्या टिनच्या कपातून त्याने दुधाचे काही घोट घेतले; काळ्या पावाचा भलामोठा तुकडा तोंडात कोंबला. त्याला हसू फुटले. "बरं तर बरं, तो माणूस इतका चांगला होता. खरं सांगायचं तर तोही माझ्यासारखाच घाबरला होता."

आणि आता इतक्या वर्षानंतर मी मागे वळून पाहातो; माझ्या भावाच्या लहानपणीच्या आणि तारुण्यातल्या, आठवतील तेवढ्या गोष्टी आठवण्याचा प्रयत्न करतो. काही गोष्टी कोरून ठेवल्यासारख्या स्पष्ट दिसतात तर काही स्मरणाआड



गेल्या आहेत. अर्थात त्या कायमच्याच हरवल्या असं मात्र नाही. मी कधीही 'झात्स्क' गावी गेलो–आता ते गागारिनच्या नावानं ओळखलं जातं–किंवा क्लुशिनोला म्हणजे आमच्या मूळ गावी परत गेलो, माझ्या किंवा माझ्या भावाच्या बालपणच्या सवंगड्याना सहज किंवा ठरवून भेटलो, माझ्या भावाला जवळून ओळखणाऱ्या माणसांशी गाठीभेटी झाल्या की दीर्घकाळ स्मृतीआड गेलेल्या घटना सजग होऊन उठतात, स्मरणमालिकेच्या अद्भुत् चक्राना विलक्षण गती देतात. अंतरीच्या खोल, गुप्त कप्प्यात निद्रिस्त पडलेली दृश्ये जागी होतात, जिवंत होऊन उभी राहातात

त्यातून या पुस्तकाने आकार घेतला.

यूराचे बालपण आणि आमच्या कुटुंबाचे युद्धाच्या अगोदरचे आणि नंतरचे जीवन यांचे चित्रण या पुस्तकात आले आहे. पण मला त्याची सुरुवात लिननचा करडा सूट घातलेला तो माणूस आणि ते कागदी नारिंगी विमान यापासून करायची आहे.

मी हा प्रसंग का निवडला हे मागाहून समजेलच.

□ □

# १ : नव्या वर्षाचा वृक्ष

चांगलीच संध्याकाळ झाली होती. खिडकी बाहेर अंधार मूक पहारेकऱ्या-सारखा निःशब्द होता. छताला लावलेल्या तारेच्या कड्यात केरोसिनचा दिवा टांगला होता. आमच्या घरकुलाच्या भिंतीवर विटांनी बांधलेल्या आणि चुन्याची सफेती दिलेल्या भक्कम मोठ्या चुल्यावर आणि झोया घरी दिलेला अभ्यास करीत होती. त्या टेबलावर त्याचा स्वच्छ उजेड पडला होता. "उद्या जंगलात जातो आणि नव्या वर्षाचा वृक्ष घेऊन येतो" मी आईला म्हटले.

ती नुकतीच शेतावरून आली होती. अंगातला कोट काढीत होती. तिनं एक सुस्कारा सोडला, म्हणाली, "ठीक आहे. तुमचे वडील वेळेवर परत येण्याचा काही रंग दिसत नाही."

"वाल्या, मी येतो तुझ्या बरोबर" माझा हात पकडून युरा म्हणाला, "मलाही यायचंय् नव्या वर्षाचा वृक्ष आणायला." घसरपट्ट्या बांधून ओल्या बर्फावरून सुळकन निघून जाताना जर हा सहा वर्षाचा मुलगा तुम्हाला चिकटून उभा असेल तर कशी काय अवस्था होईल त्याचे चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. सारा प्रवास मलाही कठीणच झाला असता, संध्याकाळी त्याला लवकर झोपताही आले नसते, उशीर झाला असता. कारण मी निघणार म्हणजे शाळा सपल्यावरच, शिवाय मला चांगला वृक्ष निवडून आणायचा होता.

"तू घरीच रहा," मी म्हटले.

"मी नाही राहाणार."

"तुला राह्यला हवं."

"मी नाही राहाणार."

"पुरे आता," आई म्हणाली, "सकाळी ठरवू काय करायचं ते. निजायची वेळ झाली; झोया, अभ्यास झाला का तुझा ?"

"एकच गणित राह्यलंय्."

तिनें पटकन गणित केलं आणि दिवा मालवला. घरात सगळीकडे अंधार



झाला; चूल, टेबल, भिंती, खिडक्याच्या चौकटी—काही म्हटल्या काही दिसेना. बाहेर वादळ घोंघावू लागलं, सुसाट वारे धुरांड्यात घुमू लागले.

अंधारात मी बिछान्यावर पडलो होतो, ऐकत होतो आणि विचार करीत होतो. माझ्या बिछान्याला लागूनच यूराचा बिछाना होता. त्याचा संथ हलका श्वासोच्छवास ऐकू येत होता. त्याच्याही पलीकडे आमच्यातला सगळ्यात धाकटा बरीस झोपला होता. झोपेत तो काहीतरी पुटपुटला. हे वादळ आणि वारे भलत्याच वेळी सुरु झाले होते. अशा वेळी घरी परतणं वडिलांना शक्यच झालं नसतं. अशा हवामानात पंधरा मैलांचा प्रवास करून, रस्ते झाकून टाकणारं बर्फ तुडवून, नव्या वर्षासाठी वेळेवर घरी यायचं म्हणजे दिव्यच होतं, अशक्यच होतं. आणि शिवाय त्यांचा एक पायही लंगडा होता.

त्याचं असं झालं. सामुदायिक शेतावरच्या सुतारांच्या एका पथकाबरोबर त्यांना प्रादेशिक केंद्रावर पाठविण्यात आलं होतं. त्यांना त्या ठिकाणी काही इमारतींची दुरुस्ती करायची होती. तीन चार दिवसात नक्की परत येतो म्हणून ते सांगून गेले होते, आणि आता तिकडेच अडकून पडले होते.

शिवाय मला नवीन वर्षाच्या वृक्षाची काळजी पडली होती. आठवतं होतं, वडील अगदी दरवर्षी नव्या वर्षाचा वृक्ष घेऊन यायचे. यावर्षी ते काम माझ्याकडे आलं होतं. समजा माझी काही चूक झाली. मी भलताच वृक्ष तोडला आणि तो चांगला निघाला नाही तर ? सारीजण माझी चेष्टा करतील, मला चिडवतील साऱ्यांच्या आनंदावर माझ्याकडून विरजण पडेल. आणि खरं सांगायचं तर बाबा नसले म्हणजे मग काही खरी मजाही येणार नाही. आई नेहमी म्हणायची, "नव्या वर्षाच्या दिवशी घरच्या साऱ्या माणसांनी घरी असावं."

मनात अशी काहीशी खंत धरूनच मी केव्हातरी झोपी गेलो. जागा झालो तो कोणाच्या तरी बोलण्याच्या आवाजाने. कोणीतरी हलक्या, गोड आवाजात बोलत होतं. हा तर आईचाच आवाज. मग दुसऱ्या कोणाचं तरी धीम्या आवाजातलं बोलणं ऐकू आलं पण त्यातला गडगडाट मी ओळखला. हा तर बाबांचा आवाज; नेमके वेळेला कसे काय येऊन पोहोचले ?

मी माझा हात यूराच्या बिछान्याच्या दिशेने लांबवला. बिछाना अजूनही उबदार होता पण रिकामा होता. यूरा नव्हता तिथे.

बिछान्यातून बाहेर पडायची मला इच्छा होईना. बाहेर गारठा होता, असं म्हणणंही चुकीचं ठरलं असतं. घरात सुद्धा गोठवून टाकणारी थंडी पडली होती. मी डोळे मिटून घेतले आणि बाबा शांतपणे आपली हकीकत सांगत होते ती ऐकू लागलो.

"आम्ही शहरातून सोडलं तेव्हा संध्याकाळ झाली होती. सुरुवातीचा प्रवास

ठीक झाला पण मग बर्फाचं वादळ सुरू झालं आणि आम्ही त्यात सापडलो. प्रत्येकाच्या मनात एकच इच्छा होती; या वादळात कुठे रस्ता चुकला नाही म्हणजे मिळवलं ! तेतेरीला पोहोचलो आणि ठरवलं, आता रात्र इथंच काढायची. सकाळच्या सुमाराला वादळ शांत झालं. आम्ही पुन्हा प्रवासाला सुरुवात केली. नव्या वर्षाच्या दिवशी वेळेवर घरी पोहोचायचंच असं सर्वांनी ठरवलं होतं."

"तुम्ही परत आलात आणि माझं मन हलकं झालं. मला खरंच काळजी वाटायला लागली होती." आई म्हणाली, "घरात चला, थोडसं खाऊन घ्या आणि मग झोपा जरा." "झोप घ्यायला वेळ कुठे आहे आता ?"

"वाल्या" युरा माझ्या कानात कुजबुजला, "मी बोलतोय ते ऐकू येतंय तुला ?"

मी डोळे उघडले. साफसुफी करून त्याने कपडे चढविले होते, केस व्यवस्थित विंचरलेले होते. तो माझ्यावर वाकला होता. त्याच्या डोळ्यात अधीरता होती. काही तरी गुप्त गोष्ट सांगत असल्याचा भाव होता. मला कळलं. मला माहीत नव्हतं ते त्याला काहीतरी समजलं होतं; त्याला दम निघत नव्हता, केव्हा एकदा मला सांगेन असं झालं होतं. त्याला जे काय समजलं होतं त्याने तो अगदी भारून गेला होता.

"उठ वाल्या, जरा जाऊन येऊ."

केरोसिनच्या दिव्याचा उजेड कमीजास्त होत होता. रात्री सारखा लख्ख वाटत नव्हता. पहाटेपूर्वीचा काळोख आणि मध्यरात्रीचा काळोख यात फरक असतोच. पहाटेचा काळोख तसा दाट नसतो. भिंतीवर घड्याळ टक् टिक् करित होते. पाचला दहा कमी होते. आईने कोबीच्या रश्श्याचे लोखंडी भांडे चुलीवर ठेवले. आपली शाल तिने खांद्यावरून नीट घट्ट ओढून घेतली. सामुदायिक शेतावर निघायच्या तयारीत होती ती. तिथे तिच्याकडे डुकराच्या पिलांची देखभाल कर-करण्याचे काम होते. बाबा टेबलापाशी बसून बटाटे सोलत होते. आदल्यादिवशीच्या रात्रीच्या जेवणातून ते तसेच उरले होते.

"बाबा, गुड् मॉर्निंग" मी जेमतेम म्हणालो आणि शर्ट चड्डी चढवून युराच्या मागे धावलो.

माझ्या उघड्या पायाना बर्फाचे कण चावा घेऊ लागले.

वाटेत बाकावर एक कंदील वात बारीक करून ठेवला होता. त्याच्या अंधुक उजेडात मला दिसले. भिंतीला टेकवून फरचा वृक्ष ठेवला होता. कसा उंच अन् डौलदार होता. त्याचा शेंडा आढ्याला टेकला होता. त्याच्या साऱ्या डहाळ्या आणि सुईसारखी पानं चमचमत होती. त्याच्यावर बर्फाचे कण गोठून घट्ट चिक-टले होते, कंदीलाचा पिवळसर प्रकाश त्यातून परावर्तित होत होता युराने वात



मोठी केली, एका डहाळीला हळूच हात लावून पाहिला, त्याबरोबर त्यावर जमलेले बर्फ खाली पडले. आतले घट्ट बर्फ आणखीनच चमकू लागले. त्यातला एक बर्फाचा तुकडा जमिनीवर पडला, त्याचा मोठा मजेदार आवाज झाला.

"कसा दिसतो बघ."

"या वृक्षाला काही सजावट लागणार नाही. आहे तसा उभारला तरी फार सुंदर दिसेल. फार देखणं आहे हे झाड," युरा म्हणाला.

"बर्फाचे हे स्फटिक वितळून जातील. उष्णतेनं ते वितळून जातील. मग काहीसुद्धा उरणार नाही त्यांचं," या विचारानं मी उदास झालो. मग एकाएकी जाणवलं; आम्ही उभे होतो तिथे उब देण्याची काही व्यवस्था नव्हती. कडाक्याची, चावरी थंडी पडली होती

खेड्याच्या अगदी एका कडेला आमचं घरकुल होतं. झात्स्ककडे जाणारा रस्ता त्यावरूनच जाई. झातस्क हे आमचे प्रादेशिक केंद्र. आमचे घरकुल बाबांनीच बांधले होते. घराचे वासे भक्कम होते, त्याना पाईनच्या डिंकाचा गंध येत होता. सूर्यप्रकाशात ते खणखणीत वाळले होते, त्याचाही गंध त्यात मिसळला होता. घरकुल चांगले ऐसपैस होते; दगडी जोते पुष्कळच उंच होते. माझ्या आई-वडिलानीच ते मोठेमोठे दगड ढकलत आणून घरासाठी वापरले होते. दूरच्या माळरानात असे पुष्कळ दगड पडलेले होते, त्यातून त्यानी निवडून आणले होते.

घराला लागून सफरचंदाची व चेरीची फळबाग होती. कडेकडेला झुडुपे होती. घराजवळ रस्ता एकदम वळण घेत होता. त्याच्या पलीकडे शेत होते. हिवाळ्यात ते बर्फाची जाड पांढरी दुलई पांघरून बसे. उन्हाळ्यात तिथे रंगीबेरंगी फुलांचा गालिचा पसरे. त्यावर मधमाशांचे गुंजन चाले. सामुदायिक शेताचा मोठा या शेतात होता. पलीकडे होती एक पवनचक्की. त्याच्याही पलीकडे अर्ध्या क्षितिजाला वेढून टाकणारा जंगलाचा निळसर पट्टा पसरला होता.

तुम्ही जर गावच्या मध्यावरून, समजा शाळेतून, आमच्या घराकडे यायला निघालात तर तुम्हाला टेकडीचा लांबलचक उतार पार करावा लागेल. हिवाळ्यात ते मोठं सोईचं होई. पहिला बर्फ पडायचाच अवकाश, टेकडीचा उतार अधिकच उतरता व्हायचा. मग आम्ही मुलं घसरपट्ट्या बनवत असू; फेल्टच्या बुटानी त्यांची ठासण करीत असू. शाळेतून घरी येताना आम्ही टेकडीच्या माथ्यावरून घसरायला सुरूवात करीत असू. एकदा का सुळकन खाली निघालो की मग मनात आलं तरी आम्हाला थांबता येत नसे. घराजवळ येऊन हरप्रयत्नाने एकदाचा कसातरी थांबलो की एकाएकी माझ्या लक्षात येई, माझी फरची टोपी रस्त्यातच कुठेतरी उडून गायब झालेली असते, दप्तर उघडे पडलेले असते, उतारावरील वाऱ्याने वह्यांची पाने फडफडून वेडीवाकडी दुमडलेली असतात.

माझ्या वस्तू गोळा करायला मी पुन्हा ती टेकडी चढून वर जाई. बूट लवकर लवकर फाटायला लागले की साहजिकच मग आईबाबांची बोलणी बसत.

डिसेंबरचा शेवटचा दिवस होता तो. शाळा लवकर सुटली होती. सर्वांच्या हातात प्रगतिपत्रके होती. त्या दिवशी दुपारी तीन वाजता शाळेत पार्टी होणार होती. तसं आम्हाला सांगितलं होतं.

बर्फाळ रस्ता तुडवीत मी आणि झोया घरी पोहोचलो. रात्रभर हिमवादळाने धुडगूस घातला होता. बर्फातून घसरण्यासाठी आम्ही बनवलेले मार्ग पार झाकून गेले होते, आता ते पुन्हा तयार करायला काही दिवस लागले असते. सकाळी टेकडीशी चढण चढून जाताना आमच्या पावलांचे उठलेले ठसे तेवढे त्या बर्फात एका ओळीत स्पष्ट दिसत होते.

बाहेरच्या पडवीत यूरा आमची वाट पहात उभा होता. त्यानं माझी जुनी फरची टोपी घातली होती. साऱ्या शेतकरी कुटुंबात तशी पद्धतच होती. मोठ्या भावंडाचे कपडे लहान भावंडे वापरीत असत. टोपीचे बंद त्याच्या हनुवटीखाली बांधलेले होते; त्याचे डोळे आणि नाकाचा लाल शेंडा हे सोडून सारे काही झाकून गेले होते. त्याने एक लांबलचक डगला घातला होता. आईने त्याच्यासाठी वेगवेगळ्या रंगाचे मिळून हातमोजे विणले होते, तेही त्याने चढविले होते.

तो धावतच आमच्याकडे आला आणि गडबडीने म्हणाला, "मी येणार आहे तुमच्या बरोबर ! शाळेत ! पार्टीला !"

"तुला न्यायला आमची हरकत नाही," मी म्हणालो, "पण तुला आमंत्रण नाही. त्यांनी तुला आत सोडलं नाही तर ?"

"काहीतरी वेडचासारखं बोलू नकोस," झोया म्हणाली, "ते का नाही त्याला आत सोडणार ?"

"कारण अजून लहान आहे तो; म्हणून."

"ते सोडतील मला आत. क्सेनिया गेरासिमोव यानी आमंत्रण दिलंय मला."

आमच्या बाईचं नाव घेताना यूराची लटपट उडाली. पण पुन्हा एकदा त्यानं ते ऐकवलं, "क्सेनिया गेरासिमोवनानीच मला आमंत्रण दिलंय." मी बर्फावरून घसरगुंडी खेळत होतो. त्या माझ्याजवळ आल्या अन् म्हणाल्या, "यूरा, तू ये आजच्या पार्टीला, तुला गंमत वाटेल."

"मग आता तुला आमच्याबरोबर नेणं आलंच," मी म्हणालो.

आम्ही तिघंही घरात घुसलो. चुल्याची ऊब सगळीकडे नीट खोलीभर पसरली होती. कोबीच्या रश्याचा सुगंध सगळीकडे दरवळला होता. खोलीच्या बरोबर मध्यावर आमचा तो देखणा फर वृक्ष उभा होता. बाबानी उभ्या आडव्या फळचा मारून त्याला टेकू दिला होता. वृक्ष 'रडत' होता, त्याच्यावरचा बर्फ



वितळून पाणी खाली पडत होते. बरीस टाळ्या वाजवीत त्याच्या भोवती गोलगोल उड्या मारीत होता.

शाळेतल्या पार्टीला जायला अजून अवकाश होता; आम्ही कोट टोप्या काढून टाकल्या आणि फर वृक्ष सजविण्याच्या उद्योगाला लागलो. ते काम झोयाचं होतं. हाताखाली मी आणि बाबा. यूरा आणि बरीस यानी फक्त बघायचं. बरीस अंगानं जरा स्थूलसा होता आणि अधूनमधून काहीतरी आव आणून वागायचा. त्याला चिडवायची एकही संधी यूरा सोडायचा नाही. बरीसचे हात पकडून त्यानं त्याला आपल्याकडे ओढून घेतलं आणि करड्या नजरेन त्याच्याकडे पहात म्हणाला, "माझ्याकडे पहा आणि मी करतो तसं कर. थोडा व्यायाम करू आपण, एक !"

दोन अन् दोन चार हात हवेत उभे फेकले गेले. त्यातले दोन, मालकाच्या इच्छेच्या विरूद्ध. वर जाताना त्या हातानी उगीच झटका दिला होता.

"दोन !" हात बाजूला पसरले.

"तीन !" हात खाली गेले.

"एक !" व्यायाम पुन्हा सुरू झाला.

दिवसाकाठी यूरा कितीदा तरी बरीसला असा धारेवर धरायचा; विशेषतः सकाळच्या वेळी. या व्यायामाचा शेवटही ठराविक असायचा. बरीसला ते फार वेळ काही जमायचं नाही, त्याला रडू फुटायचे, तो आईकडे धाव घ्यायचा. आताही नेमकं तेच झालं. बरीस रडायला लागला. आई यूरावर ओरडली.

"अगं, मी काही केलं नाही त्याला फारच लठ्ठं भारती व्हायला लागलाय तो, म्हणून ....." यूरा आईला समजावून सांगू लागला.

फरची सजावट पुरी झाली. काय सुंदर दिसत होता तो ! पण काहीतरी उणं होत ! पडवीत आढ्याला डोकं टेकवून भिंतीच्या आधाराने उभा राहिलेला, बर्फाचं वस्त्र पांघरून पहाटेच्या धूसर प्रकाशात, कंदिलाच्या पिवळसर उजडात चमचमणारा तो अद्‌भुत वृक्ष कुठंतरी हरवला होता !

कोबीच्या रश्याचा समाचार घेण्यासाठी आम्ही मान्यानी कोंडाळे केले. शेतकरी कुटुंबातील रूढीनुसार सारे एकाच मोठ्या वाडग्यातून तो खाऊ लागले. वाडगा रिकामा झाला की, आई पुन्हा भरून जायची, तो वाडगा तिनं कितीदातरी भरला असेल. आमच्या जवळ जवळ प्रत्येक जेवणात कोबीचा रस्सा हटकून असायचाच. जेवण संपलं आणि शाळेत पार्टीला जायचीही वेळ झाली.

आईने कपाट उघडलं आणि ती काहीतरी काढायला लागली, आम्ही श्वास रोखून वाट पाहू लागलो.

"युरा" आई म्हणाली, "तुला पार्टीला जायचं आहे म्हणून हा नवा शर्ट शिवलाय. जरा घालून बघ कसा बसतोय तो."

अगदी छान फिट्ट बसला होता; साऱ्यांचं एकमत झालं, आईनं आपले लाड केले, कोणी आपल्याला चिडवणार तर नाही ना, या आशंकेपोटी युरानं अविश्वासाच्या तिरक्या नजरेनं आम्हाला न्याहाळून घेतलं. मग आत्मविश्वासानं पुढे होऊन त्यानं आईच्या गालाचा मुका घेतला आणि म्हणाला, " थँकू यू "

आमच्यापैकी प्रत्येकाला एकेक भेट मिळाली. बरीसला आणि मला नवा शर्ट आणि झोयाला नवा ब्लाऊझ.

पटापट आम्ही कपडे बदलले; आम्हाला उशीर करायचा नव्हता. आई मान वळवून वळवून नव्या कपड्यात आम्ही कसे काय दिसतो त्याचे निरीक्षण करीत होती. आम्ही दार गाठले तेव्हा ती म्हणालो, " ठीक आहे निदान चार चौघात जाताना आता लाज वाटायचं कारण नाही."

शाळेचा हॉल गच्च भरला होता. हॉलमध्ये उभ्या आडव्या रंगीत पताका व निशाण लावली होती. पाईनच्या डहाळ्यांनी हॉलच्या भिंती नटवल्या होत्या.

छोटंसंच स्टेज उभारलं होतं. युराचा हात पकडून स्टेजवर जायला मी वाट काढू लागलो. आम्ही शाळेत येऊन पोहोचलो होतो तेव्हा शिक्षक युराला त्यांच्या खोलीत घेऊन गेले होते; त्याचा कोट आणि टोपी काढायला त्याला त्यांनी मदत केली होती आणि तेव्हाच क्सेनिया गेरासिमोव्ना अचानक त्याला म्हणाल्या होत्या, " युरा, तुला कार्यक्रमात भाग घ्यायचाय का ?"

" हो, " युरा अगदी गंभीर स्वरात म्हणाला " मी तेवढ्यासाठी मुद्दाम दोन कविता पाठ केल्या आहेत. या पार्टीत म्हणून दाखवायला."

" वा, वा. फारच छान. तुझं कवितागायन आपण सर्वात अगोदर ठेवू."

मी युराला स्टेजच्या दिशेनं ओढीत होतो; पण त्याला तशी काही घाई दिसत नव्हती. सारं काही नीट न्याहाळताना त्याचे डोळे आनंदानं चमकत होते. त्याला सारंच काही नवं नवलाईचं वाटत होतं; हे पाहू की ते पाहू झालं होतं. शाळेतल्या पार्टीला येण्याची त्याची ही पहिलीच वेळ होती.. वरच्या वर्गातली काही मुलं खास पार्टीसाठी शिवलेले मजेदार पोशाख घालून, इकडून तिकडे मिरवीत होती. " खारी " आणि " कोल्हे " आपापल्या झुपकेदार शेपट्या सांभाळीत आपल्या मित्रमैत्रिणींच्या घोळक्यातून सुळ्कन् निसटून जात होते. जाळी आणि कापूस घालून बनविलेल्या त्या शेपट्या गमतीदार दिसत होत्या. " हिमकुमार " आणि " हिमकुमारी " आपल्या शिरोभूषणातून येता जाता सोनेरी भुकटीची उधळण करीत होत्या.

" ते कोण आहे, वाल्या ?" युराने विचारले.

" ती ? ती तर निना बेलोचा, आपल्या शेजारची."

" मला विचारायचंय, तिनं कसला पोशाख केलाय ?"



निनाने सुंदरच पोशाख घातला होता. लांब काळा झगा, त्यावर चमकणारे तारे. तिची लांब वेणी कमरेपर्यंत पोहोचली होती डोक्याला लहानशी काळी टोपी, तिला पिवळसर कागदाची चंद्रकोर जडवलेली.

" रातराणी असावी."

" मलाही तसंच वाटतंय्. पण ही उबदार उन्हाळ्यातली रातराणी वाटते."

स्टेजजवळ एक फाकडू घोडेस्वार, लाल मिशीवर पीळ देत उभा होता- हातात एक लाकडी तलवार; डोक्यावर कातड्याची उंच टोपी; चांगलीच कलती.

" तो तर चपायेव !" युरा दबलेल्या आवाजात उद्गारला. चपायेवबद्दल त्याला वाटणारा आदर त्याच्या त्या उद्गारातून स्पष्ट जाणवला.

चपायेव झालेला मुलगा म्हणजे झेन्या, माझा दोस्त. यादवी युद्धात गाजलेल्या त्या अद्भुत् विक्रमवीराचा पोशाख त्यानं चढविला होता. " झेन्या," मी त्याला म्हटले, ' जरा मदतीला ये. कार्यक्रम सादर करणारा कलाकार प्रेक्षकाना नीट दिसला पाहिजे."

झेन्याने आमच्याकडे पाहून डोळे मिचकावले आणि तो अदृश्य झाला. काही मिनिटानन्तर तो पुन्हा प्रगटला, हातात एक खुर्ची घेऊन. त्यानं ती स्टेजवर ठेवली. युराला उचलून मी खुर्चीजवळ ठेवले. आपलं नाव जाहीर करण्याचीही युरानं वाट पाहिली नाही. त्याच्याऐवजी तो स्वतःच जोरजोरात ओरडून बोलू लागला, " प्रिय मुलानो ! मी आता तुम्हाला दोन कविता ऐकवणार आहे- कृपा करून प्रत्येकजण ऐका."

' ल ' उच्चार करताना यूराची लटपट उडत होती, त्याचीही लोकाना गंमत वाटली.

प्रेक्षकानी हसून, टाळ्या वाजवून त्याच स्वागत केले. टाळ्यांचा आवाज विरला तेव्हा युराने पुन्हा एकदा सुरुवात केली.

" कवितेच नाव आहे, माझी माऊ."

" टॅबी माऊ खिडकीतच झोपते.
झोपेतल्या झोपेत गुरगुर करते
मात्र–अगदी हळूच.
टॅबी माऊ, मला सांग, तुला स्वप्न का पडतात ?
स्वप्नात मांजरं काय काय पहातात ?"

मग त्यानं फर वृक्षावरची एक कविता म्हणून दाखवली. मग एखाद्या जाणत्या कलाकाराप्रमाणं त्यानं प्रेक्षकाना तीनदा वाकून अभिवादन केलं. सर्वांनी पुन्हा एकदा टाळ्या वाजवल्या. त्याला उतरवून घेण्यासाठी मी पुढे होत होतो तेवढ्यात त्यानं खुर्चीवरून खाली उडीही मारली.

त्याच वेळी " हिम आजोबा " आमच्या जवळ आले त्यांनी युराला खाऊचा पुडा बक्षिस दिला. ते म्हणाले, " गागारिन, मोठा धिट्टुकला आहेस तू, हुशारही आहेस. त्यासाठी तुला हे बक्षिस दिलंय "

युरानं मान वर उचलून त्या दाढीवाल्या व्यक्तीकडे टक लावून पाहिलं. तो म्हणाला, " थँक यू. तुम्ही खरंच " हिम आजोबा " आहात काय ?"

" शंकाच नाही अगदी खरोखरीचा " आजोबा " आहे मी ? मी जंगलातून निघालो तो थेट अगदी सरळ तुमच्या या पार्टीला आलो."

" पण तुमची दाढी अशी अंब्राडीची कां ?" युरानं आपला हात हिम-आजोबांच्या दाढीच्या दिशेनं पुढं केला. पण आजोबांनी त्याला सफाईनं चकवलं. " नाही " या अर्थी बोटानं खुणावत ते चटकन दुसरीकडे गेले. पुढचा कार्यक्रम त्यानीच जाहीर केला.

घरी बाबांनी आमचे ग्लास भरले. भिंतींवरच्या घड्याळात मिनिटकाटा १२ वर येऊन पोहचताच ते उठून उभे राहिले आणि सावकाश साऱ्या खोलीवर त्यानी नजर फिरवली. संध्याकाळी चुला नीट सगळा भरून पुन्हा पेटवला होता. त्यापासून निघणाऱ्या उबदार लाटानी खोली भरली होती. आमच्या सुंदर फर वृक्षावर छोट्या छोट्या मेणबत्त्या तेवत होत्या. चुल्याच्या मागच्या बाजूला कुठे-तरी एक रातकिडा किरकिरत होता पण त्याचा त्रास होत नव्हता. " मी आहे बरं का इथं" इतकं सुचविण्यापुरतं तो मधून केव्हातरी किरकिरायचा. बहुधा त्या किर-किरीच्या तालावरच युरा आणि बरीस अगदी पेंगुळले. पण खरं सांगायचं तर साऱ्या दिवसभराच्या धावपळीनं ते अगदी थकून गेले होते दोघंही पहाता पहाता गाढ झोपी गेले. टेबलाभोवती आम्ही चौघं होतो, बाबा, आई, माझी बहीण झोया आणि मी. त्या वेळी झोया चौदा वर्षांची तर मी सोळा वर्षांचा होतो.

" सरलं वर्ष चांगलं होतं " बाबा त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे सावकाश बोलू लागले " नवे वर्षही असेच चांगले, आनंदाचे ठरो ! नवीन वर्षाचे स्वागत असो !"

आम्ही सर्वांनी ग्लास उंचावून परस्परांच्या ग्लासाना भिडविले.

बाबानी ग्लास रिकामा केला व टेबलावर ठेवला. लंगडत लंगडत ते भिंती-जवळ गेले. झालस्कहून आणलेले नवे कॅलेंडर घड्याळाशेजारीच भिंतींवर लावलेले होते. त्याचा छपाईचा वासही अजून गेला नव्हता. बाबानी वरचं चकचकीत कव्हर फाडून बाजूला केलं, पहिल्या पानावर लिहिलं होतं. " १ जानेवारी १९४१, बुधवार "

त्या दिवशीच्या या साऱ्या घटना मला इतक्या स्पष्ट कशा आठवतात याचं मला कधी कधी नवल वाटतं. १९४० सालचा तो शेवटचा दिवस. त्याच्यात आणि



आजच्या दिवसात काळाचं केवढं मोठं अंतर आहे !

कदाचित १९४० साल पक्कं स्मरणात रहाण्याचं कारण दुसऱ्याच एका घटनेत असावं. त्या सालच्या शेवटच्या दिवशी, येत्या वर्षाबद्दल आम्ही जी इच्छा व्यक्त केली होती ती कधीच फलद्रूप झाली नाही. अपेक्षित आनंद आणि सुख आम्हाला मिळू शकलं नाही. युद्ध सुरू झालं होतं.

कदाचित दुसरंही कारण असू शकेल. आमच्या साऱ्या कुटुंबानं माझे आईवडील, बहीण, भाऊ या साऱ्यानी—एकत्र येऊन, आमच्या गांवात, आमच्या घरात, आमच्या टेबलापाशी एकत्र जमून, नव्या वर्षाचे स्वागत करण्याचा तो शेवटचाच प्रसंग होता. खरोखरीच, त्या वेळी आम्ही मोठ्या आनंदात, मजेत होतो.

आमचं बालपण, तारुण्य सरले आहे. जीवनाच्या ओघात आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी पांगलो. जीवनाची ती रीतच आहे. माझ्या आईवडिलांचं आता वय झालंय्. आम्हा बहीण–भावंडांच्याही आता पूर्वीसारख्या वारंवार भेटी–गाठी पडत नाहीत आणि ज्याला हे पुस्तक अर्पण केलंय् तो आमचा भाऊही आता आमच्यात नाही.

नवीन वर्षाचं स्वागत केल्यानन्तर मध्ये चांगला सहा महिन्यांचा काळ लोटला व नंतर तो घातकी दिवस उगवला. २२ जून १९४१. त्या दिवशी युद्ध सुरू झालं. पण दरम्यानच्या सहा महिन्यांच्या काळात, निदान आमच्या जीवनात तरी, येऊ घातलेल्या संकटाची इतकीसुद्धा चाहूल आम्हाला लागली नाही. एका-मागोमाग एकेक दिवस उलटत होता. आम्ही गागारिन मंडळी आमच्या वेगवेगळ्या कामात, निरनिराळ्या सुखदुःखात मग्न होतो. त्यांचं वर्णन करण्याचा माझा प्रयत्न आहे.

□ □

## २ : बर्फावरील बांबूउडीचा उंचवटा

युरा मोठा होऊ लागला तसा त्याचा दृढनिश्चयी स्वभाव स्पष्ट होऊ लागला. कधी कधी त्याचा हा स्वभाव अगदी अनपेक्षित रीत्या प्रगट होई.

मला आठवतंय, झेन्या बेलोव त्या दिवशी दुपारीच आमच्या घरी आला होता. या पायावरून त्या पायावर करीत तो दारातच उभा होता; तिथूनच त्यानं टाळी दिली, "हॅलो..."

आमचे बाबा अतिशय व्यवस्थित, नेटके. त्यानीं झेन्याला सांगितलं. "बुटावरचा बर्फ झाडून टाक अगोदर."

झेन्यानं जवळचाच आखूड झाडू घेतला. बाहेर पळत जाऊन त्यानं बुटावरचा बर्फ झाडून टाकला आणि पुन्हा दरवाजात येऊन उभा राहिला.

"आता तू हॅलो म्हणू शकतोस." बाबा म्हणाले, "आज काय विशेष ?"

झेन्या काही तसा लाजाळू नव्हता, "मी आज तुमच्या घरी नाही आलो. वाल्याला भेटायचय मला; त्याला न्यायला आलोय. आज आम्ही घसरपट्टचा बांधून बर्फाच्या घसरणीवरून बांबूउडी मारण्यासाठी उंचवटा करणार आहोत तसं ठरलंय आमचं. होय ना रे ? मग केव्हा निघायचं आपण ?"

"हे आत्ताच निघालो आपण." मी उत्तरलो. दरवाजाकडे जाता जाता मी कोट लपेटून घेतला. आम्ही एक फावडं घेतलं. अन् टेकडीकडे निघालो. झेन्याचा भाऊ वलोद्या आमची वाट पहात तिथं उभा होता. त्यानंही येताना एक फावडं आणलं होतं.

आम्ही लागलीच कामाला लागलो. प्रत्येकाला आपापलं काम माहीतच होतं. दर हिवाळ्यात आमचा तो उद्योग असायचाच. जिथे घसरपट्टचा बांधून उडी मारण्यासाठीं धावपट्टी आखायची होती, त्या रेषेवरून मी आणि झेन्या फावड्यानं बर्फ खणून बाजूला टाकत होतो. बर्फाचा वरचा भुसभुशीत थर आम्ही काढून टाकला. आतला बर्फ अगदी टणक कठीण होता. आम्ही त्याचे बरोबर चौरस



तुकडे कापून काढले. वलोद्यानं ते धावपट्टीच्या खालच्या बाजूस नेऊन एकावर एक व्यवस्थित रचून ठेवले.

झोया आणि निना बोलोवा या मुली जेव्हा आमच्या मदतीला आल्या तेव्हा कामाचा उरक सपासप पडू लागला. त्यानी बादल्या भरभरून पाणी आणलं आणि वलोद्यानं बर्फाचे तुकडे रचून ठेवले होते त्यावर ओतल. बादली रिकामी करायचाच अवकाश, क्षणार्धात पाणी थिजून जाई. थंडी इतकी कडाक्याची होती कीडोळचा-देखत त्या थिजलेल्या पाण्याचे घट्ट बर्फ बने. एकीकडे मुलींचे पाणी ओतण्याचे काम चालले होते तर एकीकडे बर्फाच्या विटांचे नवेनवे थर रचण्याचे आमचे काम चालले होते. जड बादल्या वाहून वाहून मुली थकून गेल्या. तशी बाबांनी आमच्या घराशेजारी खणलेली विहीर काही फार लांब नव्हती, शंभर एक पावलं असेल नसेल. आमचे हातमोजे भिजून चिंब झाले होते. हाताचे तळवे लालभडक आणि बधीर झाले होते. कडाक्याची थंडी हे तर त्याचं एक कारण होतंच, पण उत्साहाच्या भरात वाघ पाठीला लागल्यासारखे आम्ही जे खणत राहिलो त्याचाही तो परिणाम असावा

अंधार पडेपर्यंत आमचं काम चालूच होतं. घसरपट्टचा बांधून, धावत येऊन उंचावरून खाली उडी मारता यावी यासाठीच आम्ही बर्फाच्या विटांचा तो उंचवटा बनवला होता. अगदी छानच झाला होता तो. त्याच्यावरून उडी मारायची म्हणजे श्वास नक्कीच रोखला गेला असता. हिवाळ्याची सुट्टी अजून दहा दिवस होती, सुट्टीसाठी आता छान करमणूक झाली होती. आणि दहा दिवस तरी का ? सारा हिवाळाभर ती आम्हाला पुरली असती... पुन्हा वसंतऋतू सुरू होऊन हवा उबदार होईपर्यंत !

दुसऱ्या दिवशीची सकाळ नेहमीप्रमाणेच उगवली. मी जागा झालो तो कोणाच्या तरी जोरदार, वेड्यावाकड्या किंचाळीन. युरा आई-बाबांच्या बरोबर आमच्या अगोदरच उठला होता. इतक्या लवकर उठल्यावर काय करावं ते सुचेनासं होऊन त्यानं झोयाचं ब्लँकेट खस्कन ओढून काढलं आणि तिच्यावर थंड पाणी ओतलं. मी पटकन समजलो, आता दुसरा कप माझ्यावर उपडा होणार ! ताड्कन मी बिछान्यातून उडी मारली. माझा समज चुकीचा नव्हता. झोयाच्या ओरडण्या-कडे अजिबात लक्ष न देता युरा उंबरठ्यावर उभा राहून, बाकावर भरून ठेवलेल्या बादलीतून कप भरून घेण्यात गर्क होता.

"सूर्याची पिल्लं पहावी लागतील !" मी त्याला आगाऊच धोक्याचा इशारा दिला

"बरं, नाही ओततं तुझ्यावर."

टेबलावर न्याहारी तयार होती. आई केव्हाच शेतावर कामाला गेली होती.

बाबाही बाहेर पडायच्या तयारीत होते. हिवाळ्यात सामुदायिक शेतावर सुतारकीचं तसं फारसं काम निघायचं नाही. म्हणून त्या दिवशी त्याना वैरणचारा रचण्याच काम करायचं होतं त्यानी अंगात जाड पॅडिंग असलेली बंडी चढवली, कातड्याचे हातमोजे पट्ट्यात व्यवस्थित खोचले. आम्ही टेबलापाशी येण्याची वाट पाहात ते पुढे मागे येरझारा घालीत लंगडत होते.

"या दोन मुलांवर नीट लक्ष ठेवा, नाहीतर ती काहीतरी उद्योग करून ठेवतील," मला आणि झोयाला सांगून ते बाहेर पडले.

आम्ही नेहमीप्रमाणे आपापल्या जबाबदाऱ्या चटकन वाटून घेतल्या; झोयानं बरीसला सांभाळायचं आणि मी युराकडं लक्ष ठेवायचं.

"चला महाराज, तुमची घसरगाडी आणा. उडी मारायचा उंचवटा कसा काय जमलाय पाहू."

युरानं कपाळावर आठ्या चढविल्या, तो म्हणाला, "तू तुझ्या घसरपट्ट्या घेणार असशील ?"

"घेणार आहे."

"मला पण माझ्या घसरपट्ट्या घेऊन यायचंय्."

"मान मोडून घेशील उगीचच."

"काही होत नाही. पाहिजे असलं तर मुलींना मारू दे उड्या घसरगाडीत बसून."

मी न्याहारी संपवीत होतो, तेवढ्यात युरा टेबलावरून उठला देखील. कशीबशी कोटटोपी घालून त्याने बाहेर धूम ठोकली. झोया त्याच्या मागोमाग गेली. पण थोड्याच वेळात ती परत फिरली आणि म्हणाली,

"युरा टेकडीवर गेलाय. वलोद्याही आहे तिथं."

वलोद्या ओर्लोव्स्की म्हणजे युराचा अगदी जिगरदोस्त. त्याच्याहून काही महिन्यानी मोठा. ते दोस्त होते तसेच प्रतिस्पर्धीही होते कोणतीही गोष्ट असो, प्रथम कोण यावरून त्यांची अगदी अटीतटीची स्पर्धा चाले जंगलातून सर्वात जास्त आळंबी नाहीतर बेरी घरी कोण आणतो, घसरपट्ट्या घालून सर्वात कोण जलद धावतो, अशासारख्या गोष्टीत त्यांची अटीतटी चाले. काकडून गेल्यामुळे बूट काढता येत नाहीत आणि बोटं ताठरल्यामुळं टोपीचे बंद सोडता येत नाहीत असं सोंग सजवून युरा घरी परत आला, चेहरा खुशीत दिसला, आल्या आल्या बरीसच्या खोड्या काढायला लागला किंवा झोयाला सतावायला लागला, खूप चित्र असलेलं एखादं चांगलं पुस्तक दे म्हणून माझ्याशी हट्ट करू लागला की हटकून समजावं, आजच्या दिवसांच मैदान युरानं मारलंय. आणि वलोद्या ओर्लोव्स्कीच्या पाठीला माती लागलीय. उलट युरा जर एखाद्या दिवशी चेहरा



पाडून बसला, त्याने तोंडात मूग धरून ठेवले आणि संध्याकाळी जेवताना अन्न नुसतं चिवडलं की पक्कं समजावं, आजची बाजी वलोद्यानं मारली म्हणून.

"तू कशाला इतकं मनाला लावून घेतोस ?" आई त्याला म्हणायची, "येऊ दे त्याला पहिला. येवढ्याशा कारणासाठी इतकं कशाला बिथरायला हवं?"

"मला नकोय तो पहिला यायला काही असो, मी नक्की त्याच्यावर मात करीन."

"आता कसं बोललास," बाबांनी युराला प्रोत्साहन दिलं आणि आईकडे वळून ते तिला म्हणाले, "तुम्ही काय शिकवत होतात त्याला ? म्हणे येऊ दे त्याला पहिला. काय, म्हणायचंय् काय तुम्हाला ?"

झालं. बाबांच्या शब्दांनी आगीत आणखीनच तेल ओतलं. पण एक होतं, त्या दोन्ही मुलांची लढत खुली खुली असे. त्यात लांडी लबाडी कधी आली नाही.

म्हणूनच आता झोया जेव्हा म्हणाली, "युरा टेकडीवर गेला आहे. ते बोघं नक्कीच घसरपट्ट्या बांधून उड्या मारण्याचा प्रयत्न करणार, " तेव्हा मी समजलो काहीतरी गडबडघोटाळा होणार

कशी तरी मी अंगात गरम बंडी चढवली. माझ्या घसरपट्ट्या घेतल्या आणि टेकडीकडं धावलो. तरीपण उशीर झालाच. वेळ निघून गेली होती.

उंचवट्यावरून पहिल्यांदा उडी मारली वलोद्यानं. मला मागाहून सारी हकिकत समजली पहिल्यांदा कोणी उडी मारायची यावर कडाक्याचा वाद होऊन शेवटी उडी मारण्याच्या बांबूवर हातावर हात ठेवून ओलीसुकी करण्याचं ठरलं. वलोद्याचा हात युराच्या हातावर पडला. ठरलं, उडी मारण्याचा पहिला मान वलोद्याचा.

वलोद्यानं टेकडीच्या माथ्यावरून "स्टार्ट" घेतला. पळता पळता त्यानं बांबू बर्फात खोचले. सुटं झालेल मोकळं बर्फ बाजूला उडालं. बांबू उभ होऊ लागले. त्याच्या छोट्याशा शरीराचं मुटकुळं वर उचललं गेलं. तो उडी मारायच्या जागेवर येऊन पोहोचला होता. एकदम तो हवेत उंच उडाला. पहाता पहाता मला वाटलं, याचं हे उड्डाण कधीच संपणार नाही की काय ? तसं काही झालं नाही; वलोद्या नेटका आपल्या पावलांवर व्यवस्थित बर्फावर टेकला. त्याच्या घसरपट्ट्यांनी बर्फाचा भुगा हवेत उडविला.

वलोद्यानं उडी सुरेख साधली होती !

"आता तुझी पाळी," वलोद्या टेकडीच्या पायथ्यापाशी उभा होता, तिथून मोठ्यानं ओरडला. त्यानं आपला बांबू हलवून दाखवला.

उत्तरादाखल युरानंही आपला बांबू हलवला. त्यानं लांबलचक 'स्टार्ट' घेऊन धावायला सुरुवात केली; पळता पळता बर्फात बांबू खोचले. पहाता पहाता

त्याच्या इवल्याशा शरीराचं मुटकुळं हवेत उचललं गेलं. तो एकदम हवेत उंच उडाला. तेवढ्यात त्याच्या डाव्या पायाला बांधलेली घसरपट्टी पायापासून सुटून दूर जाऊन पडली. युरा बर्फात पडला. आपल्या उजव्या पायाच्या घसरपट्टीकडे रोखून पहात तो तसाच, भानावर नसल्यासारखा, बर्फात बसून राहिला. उजव्या घसरपट्टीचं टोक तुटलं होतं.

" कुठं लागलंय का तुला ?"

" लागलंबिगलं काही नाही. पण माझी.. माझी घसरपट्टी ..."

" ऊठ युरा, आपण घरी जाऊ आता." मी त्याचा हात धरला व त्याला घरी नेलं. वलोद्या आमच्या घरापर्यंत आम्हाला पोहोचवायला आला. दोन्ही मित्र शेजारी शेजारी उभे राहून बरोबरीनं पावलं टाकत होते. दोघांचेही चेहेरे पार उतरून गेले होते; जिंकला कोण आणि हरला कोण हे पाहून सांगणं अशक्य होतं.

युराची गायब झालेली दुसरी घसरपट्टी आम्हाला घराजवळच गवसली. टेकडीचा सारा उतार तिनं पार केला होता. आम्ही घरात पाऊल टाकण्याचाच अवकाश, युराचं इतका वेळ मोठ्या कष्टानं आवरून धरलेलं रडं एकदम कोसळलं.

" रडू नकोस," मी आणि झोया त्याची समजावणी करीत होतो, " आपण दुरुस्त करू तुझ्या घसरपट्ट्या, पुन्हा अगदी नव्यासारख्या."

" मला नकोत त्या. त्या घालून उडी थोडीच मारता येणार आहे ? पुन्हा मोडून मात्र जातील;" तो उत्तरला आणि हुंदके देऊ लागला.

तेवढ्यात बाबा दुपारच्या जेवणासाठी घरी आले. आम्ही त्याना अपघाताची सारी माहिती सांगितली. मुलांचे उगीच लाड करणं, त्याना चढवून ठेवणं आमच्या आई–बाबांच्या स्वभावात नव्हतं. पण आता आपल्या मुलाचं दु:ख पाहून बाबांचं मन हललं. शिवाय या प्रकरणात 'घराच्या अब्रू'चाही प्रश्न गुंतला होता. नाही म्हटलं तरी युरा सामना हरला होता; पाठ जमिनीला लागली होती !

" रडं आवर अगोदर," बाबा म्हणाले, "पुढच्या आठवड्यात मी झात्स्कला जातोय्, मग तुझ्यासाठी नव्या, कोऱ्या करकरीत घसरपट्ट्या घेऊन येईन."

" पुढच्या आठवड्यात... आठवडाभर मी नुसता बसून राहू आणि वलोद्या मात्र घसरपट्ट्या बांधून खेळत राहील. नुसतं बसून मी खेळही विसरून जाईन. मग वलोद्या मला नेहमीच हरवील;" युराला पुन्हा एकदा रडू फुटलं.

युराच्या मनातलं खरं दु:खच त्याचे शब्द सांगत होते, बाबा मुकाट्यानं ऐकत होते. त्यानी मला डोळा घातला आणि म्हणाले, " वाल्या, मला वाटतं आपण सुतार आहोत. चल, पडवीत जाऊ या जरा."

आम्ही एक उत्तम मजबूत फळी शोधून काढली. हत्यारं बाहेर काढली; कापण्याचं, रंधा मारण्याचं काम सुरू झालं. संध्याकाळपर्यंत घसरपट्ट्यांचा कोरा



जोड तयार झाला. सुरेख जोडी साधली होती; वजनाला हलकी आणि लवचिक. पट्ट्याना मी जेव्हा " वॅक्स–पॉलिश " लावत होतो तेव्हा दुपारची वेळ होती. उडी मारण्याच्या उंचवट्यापासून केवढा तरी गलका ऐकू येत होता. गावातली सारी मुलं तिथं जमली होती. त्यानी अगदी धमाल उडवून दिली होती. मला माहीत होतं, युरा उद्या तिथं जाणार आणि आज हरवलेला आपला मान पुन्हा मिळवून आणण्याचा प्रयत्न करणार त्या विचारानं मला बरं वाटलं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी युरा घरी परतला तो आनंदानं तळपत. त्याच्या अंगात उत्साह संचारला होता. खोलीत पाऊल टाकता टाकताच आपल्या पोटात कावळे ओरडत असल्याचं त्यानं सांगून टाकलं. संध्याकाळी जेवणाचा त्यानं सपासप फन्ना उडविला. बरीसच्या खोड्या काढून झाल्या, झोयाला सतावून, चिडवून झालं, ती वाचायला बसली होती.

कोणी काही प्रश्न केले नाहीत, सारं काही सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट होतं.

पण खरं सांगायचं तर लहानपणी युरा अगदी क्वचितच रडला असेल.

□ □

## ३ : वसंतऋतूत

आज आईचा 'धोबीघाटाचा' दिवस. तिनं रूंद बाक चुल्याच्या जवळ सरकवला होता, त्याच्यावर टिनचा टब मांडला होता. जमिनीवर भांड्यात लिंबू-पाणी भरून ठेवलं होतं. त्याच्याच शेजारी मळक्या कपड्यांचा भला मोठा ढीग होता. सहा माणसांच्या कुटुंबाचे कपडे अगदी स्वच्छ ठेवायचे म्हणजे काही साधंसुधं काम नव्हतं.

"वाल्या, जरा ताजं पाणी काढून आण," ती मला म्हणाली.

मी दोन बादल्या घेतल्या अन् विहिरीकडे निघालो. युराही माझ्या मागोमाग आला.

कडकडीत ऊन पडलं होतं, डोळे एकदम दिपले. काहीतरी चमत्कारिक, बसकासा आवाज येत होता. छपरावर जमलेल्या बर्फाचे तुकडे मार्चच्या उन्हानं वितळायला लागले होते, खाली पडताना त्यांचा आवाज होत होता....टप् टप टप. सगळीकडे अगदी शान्त होतं.

विहिरीला लावलेल्या गोल वाशांवर जमलेले बर्फाचे थर काळवंडले होते. बारीक झाले होते. बादलीचं बूड त्याना लागायचाच अवकाश, बारीक बारीक कपच्या सुटून चारीकडे उडायच्या.

"तिकडे बघ, आपला बांबूउडीचा उंचवटा किती लहान झाला आहे बघ," युरा म्हणाला.

आम्ही इतका सुरेख रचलेला तो उंचवटा! त्यानं आम्हाला केवढा आनंद मिळवून दिला होता, दुःखही दिलं होतं. तोही आता काळवंडला होता. वितळत वितळत लहान होऊन चालला होता. चांगलाच आक्रसला होता तो. आता त्याच्याकडे पाहिल्यावर, काही दिवसापूर्वी याच उंचवटयावरून उडी मारताना खेड्यातली अगदी धीट धीट म्हणविणारी मोठी मुलंही जरा जपून होती आणि छोटया मुलांपैकी युरा आणि वलोद्या ओर्लोव्स्की यांच्यासारख्या धीट सैतानांनी



मूर्खासारख्या उड्या मारून घसरपट्ट्या तोडून घेतल्या होत्या, यावर आता विश्वास बसणं कठीण होतं.

उंचवटयाच्या माथ्यावर जिथं सूर्यकिरणं अगदी सरळ जाऊन पोहोचत होती तिथं, बर्फाखालच्या जमिनीनं डोकं वर काढलं होतं.

"वसंतऋतू कोपऱ्यावर आलाय युरा. लवकरच साऱ्या झाडाना पालवी फुटेल."

"वाल्या, माझ्या मनात काय आहे माहीत आहे? अनवाणी पायानी गवतावर भटकायचंय मला."

"फार थांबावं लागायचं नाही आता. मग आपण चेंडू खेळू."

"रानात चुक्याची भाजी आणायला जायचं?"

"नक्कीच!"

झात्स्कच्या रस्त्यावरून एक हलकीशी घसरगाडी पुढे येत होती. गाडीला करड्या पांढऱ्या रंगाचा घोडा जोडलेला होता. तो दिमाखात पावले टाकीत पुढे येत होता. गाडी आमच्यापुढे येऊन थांबली तेव्हा ड्रायव्हरने लगाम खेचला. आमचे पावेलकाकाच होते ते. लगामाला ओढ बसताच घोड्याची चाल मंद झाली. डोके पुढेमागे करून तो फुरफुरला आणि त्याने डोळे वटारून आम्हाला नीट एकदा न्याहाळून घेतले.

"काय रे पोरानो, वडील घरी आहेत का तुमचे?"

"आहेत. पडवीत हत्यारं अवजारं नीट पाहून लावून ठेवताहेत."

पावेलकाकानी खिशातून खाऊची पुडी काढून युराच्या हातावर ठेवली. लगाम माझ्या हाती देत मला म्हणाले, "वाल्या, या नाठाळाला नीट बांधून ठेव. आणि जरा जपून, मोठं तेज जनावर आहे ते" पावेलकाका आमच्या घराच्या पडवीच्या दिशेने चालू लागले.

पावेल इवानोविच गागारिन म्हणजे आमच्या बाबांचे भाऊ, गावचे पशुवैद्य. क्लुशिनोमध्ये आमची घरं एकाच रस्त्यावर होती. पावेलकाका फार दयाळू मनाचे आणि सढळ हाताचे, त्यांचं मन उदार होतं. खगोल शास्त्र, भूगोल, काव्य या विषयांचं त्याना फार आकर्षण असायचं. पशुवैद्यकाबद्दलही त्याना तेवढंच आकर्षण होतं किंवा काय मला सांगता येणार नाही, पण आमच्या साऱ्या भागात आणि आसपासच्या परिसरात एक नाणावलेले निष्णात पशुवैद्य म्हणून त्यांची ख्याती होती. आमच्याशी आणि साऱ्या मुलाबाळांशी ते मोठ्या प्रेमाने वागत. गोष्टी सांगण्यात पावेलकाकांचा अगदी हातखंडा. भीतीनं अंगावर सर्रकन काटा उभा राहावा अशा गोष्टी तर ते विलक्षण रंगवून सांगत. कदाचित त्यामुळेच मुलं त्यांच्याकडे ओढली जात असावीत.

स्वाभाविकच त्यांची पाठ वळली तेव्हा युराही त्यांच्या मागोमाग जाऊ लागला. मला घोडा बांधायचा होता म्हणून मी थांबलो. केव्हा एकदा घोडा बांधतो आणि घरात जातो असं मलाही झालं होतं. काका प्रादेशिक केंद्रावरून आले म्हणजे त्यांच्या पोतडीत गरमागरम बातम्या भरलेल्या असणार आणि आता ते बाबाना सर्व सांगत असणार. घरात जाण्यासाठी माझा जीव खालीवर होत होता. पण ते नाठाळ घोडं मला काही बधेना आणि खुंटाला बांधून घेईना. ते एकसारखं माझ्याकडे पाहून दात विचकायला लागलं, चावा काढायला पाहू लागलं. शेवटी एकदाचं कसंबसं त्याला बांधलं तेव्हा मी अगदी पार घामाघूम होऊन गेलो होतो. मग आईला पाण्याच्या तीन खेपा नेऊन दिल्या; साबणाचं पाणी घालून दिलं, तेव्हा कुठे मी मोकळा झालो. लागलीच मी पडवीकडे धाव घेतली, काय उपयोग ? पावेलकाका उठून निघालेही होते.

"बरंय वाल्या, निघालो आता. आता इथून जाणार प्रेचिस्तोयेला. एकदोन केसेस पहायच्या आहेत. हा रोग कसा काय उद्‌भवला कळत नाही, पण मला त्या घोड्याना पाहून यायलाच हवं तुला यायचंय का माझ्याबरोबर ?"

हा काय प्रश्न झाला ? पण त्या दिवशी नशीब जागेवर नव्हते. माझा गृहपाठ झालेला नव्हता. अजून आईला घरकामात मदतही करायची होती. क्लुशिनोहून प्रेचिस्तोयेला जाऊन यायचं म्हणजे बराच वेळ लागला असता.

"काही हरकत नाहीं. पुढच्या वेळी तयारीत रहा." पावेलकाकानी माझे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला.

ओठ घट्ट मिटून मी बाहेरच्या पडवीच्या पायऱ्यांवर साचलेले बर्फ आवेशाने फोडायला लागलो. तेवढ्यात युरा आला अन म्हणाला, "एजंट म्हणजे काय वाल्या ?"

"विमा कचेरीतला माणूस. तो पैसे घेतो आणि पावती देऊन जातो."

"पावेलकाका सांगत होते, पोलिसानी स्मोलेन्स्कमध्ये एका एजंटाला पकडलं, जर्मन एजंटाला. तो लपूनछपून का राहात होता ?"

माझा हात थांबला. हे काहीतरी वेगळंच, नेहमीला सोडून होतं. "आणखी काय म्हणाले ते ?"

"ते म्हणाले, आता लवकरच लढाई सुरू होईल. म्हणाले, सगळीकडे लोक हेच बोलतात."

"चल चल ! साऱ्या शुद्ध थापा, निव्वळ गप्पा !"

"बाबा असंच म्हणाले."

त्या काळात, म्हणजे १९४० ते १९४१ च्या काळात, आमचं खेडेगाव स्मोलेन्स्क प्रदेशातल्या घनदाट जंगलात, कुठंतरी लपून गुडूप बसल्यासारखं होतं.



बाहेरच्या जगाशी त्याचा फारसा संबंधही येत नसे. गावात विजेचे दिवे नव्हते, रेडियोही नव्हते. गावच्या सोविएतात (ग्रामपंचायतीत) एक छोटासा वायरलेस सेट तेवढा होता. पण जगात काय घडतंय ते आमच्या कानी बरोबर येई. स्पॅनिश प्रजासत्ताकासाठी लढणाऱ्या वीरांचे असामान्य शौर्य यासारख्या विषयावर आम्ही शाळेत निबंध लिहीत असू. त्यांचा पराभव झाला तेव्हा आम्ही दु:खीकष्टी झालो होतो. क्रान्त आकाराला येतायेताच ती चिरडून टाकण्यासाठी, रक्ताला चटावलेल्या फ्रँकोला कोणी मदत केली ते आम्हाला माहीत होतं. वार्तापटात घरादाराला मुकलेली, अनाथ झालेली पोरकी स्पॅनिश मुलं पाहिली की आमचा जीव त्यांच्यासाठी तुटू लागे. प्रजासत्ताकाच्या सैन्याचा फ्रँकोच्या सैन्यापुढे पाड लागला नाही; त्यांच्याबद्दल आम्हाला सहानुभूती वाटे. 'फॅसिझम' या शब्दाचा साधा उच्चारसुद्धा आम्हाला तिरस्करणीय वाटायचा. हिटलरच्या फॅसिस्टानी पोलंड आणि चेकोस्लोवाकिया व्यापला होता. ऑस्ट्रियाचा प्रदेश आपल्या प्रदेशाला जोडून घेतला होता, आणि आता ते इंग्लंडच्या शहरांवर बॉम्ब टाकीत होते. पण हे सारं क्लुशिनोपासून कितीतरी दूर अंतरावर घडत होतं. शिवाय आमची लालसेना होतीच आमच्यापाशी !

पहाटेच्या सुमारास कोणीतरी जोरानं खिडकीवर टकटक केले. मी बिछान्यातून उडी मारली.

"कोण आहे ते ?"

"तुझ्या आईला बोलाव. तिला ताबडतोब शेतावर जायला सांग."

मी तो आवाज ओळखला. डुकरांच्या पिलांची देखभाल करणाऱ्या विभागातच तीही कामाला होती. आईचं सारं काम अगदी चटपटीत असायचं. एव्हाना ती कपडे करून तयारही झाली होती.

"बेलुगाचे दिवस भरलेत." आता जाता ती म्हणाली. आमच्या साऱ्या प्रदेशात बेलुगाचे नाव झाले होते. दर वेताला तिनं कितीतरी पिलांना जन्म दिला होता. मला आकडा सांगता येणार नाही पण तिची पिलावळ नेहमीच खूप मोठी असायची. मॉस्कोत भरणाऱ्या एका शेतकी प्रदर्शनासाठी तिला पाठवायचं घाटत होतं.

स्वाभाविकच बेलुगाची अगदी खास बडदास्त राखली जाई; तिला मोठे घर मिळे; खास आहार दिला जाई. दररोज सकाळी आमच्या सामुदायिक शेताचे अध्यक्ष जातीनिशी तिच्या खाण्यापिण्यावर देखरेख करीत. अगदी प्रादेशिक समितीचे चिटणीससुद्धा मधून मधून फोन लावून बेलुगाच्या प्रकृतीची विचारपूस करीत.

थोडक्यात म्हणजे बेलुगाचं सारं काही शाही काम होतं. तिचं सारं काही

मोठे छान होतं; फार गुणी होती ती. बेलुगाच्या वेतापासून सामुदायिक शेताला चांगला फायदा मिळे. तिची फक्त एक वाईट खोड होती. बाळंत होताना ती नेहमी अडे. बेलुगा बाळंत व्हायची म्हणजे तिची देखभाल करणाऱ्या साऱ्याजणाना जिवावर धोंडा ठेवल्यासारखे होई. काळजी लागून राही. तिचं बाळंतपण करायला आईला बोलावणं येणार हे अगदी ठरलेलं असे. सामुदायिक शेताची स्थापना झाली त्या दिवसापासून आई शेताच्या जनावरांची कामं करीत आली होती. पहिल्यांदा तिच्याकडे दूध काढण्याचे काम होते, मग वासरांची देखरेख करण्याचे काम आले. त्यानंतर 'डेअरी फार्म'ची प्रमुख म्हणून ती काम करू लागली. शेतावरच्या जनावरांबाबत तिला दांडगा अनुभव होता.

"ॲना, तू नुसती समोर येऊन उभी राहिलीस तरी आम्हाला धीर येतो," एखाद जनावर अवघडलं की शेतावरच्या नव्या स्त्रिया आईला बोलावून न्यायच्या आणि म्हणायच्या.

शाळेतून परत येऊन आम्ही घरचा अभ्यास करायला टेबलापाशी बसलो होतो तेव्हा, म्हणजे संध्याकाळी आई परत आली.

"बरं झालं, सारं ठाकठीक पार पडलं." आई म्हणाली, "पण भारी दमायला झालंय."

"मला दाखवशील बेलुगाची पिल्लं?" युरानं विचारलं, "छान आहेत?"

"फार छान आहेत. पांढरा रंग आणि छोटी छोटी मजेदार नाकं."

दुसऱ्या दिवशी सकाळी युरा आईबरोबर शेतावर गेला. मग तो दररोजच तिच्याबरोबर जायला लागला. त्याचा सारा वेळ त्या डुकरांच्या पिलांबरोबर जाई. पुढेपुढे तर तो दुपारच्या जेवणासाठीही घरी येईनासा झाला. मग एकदा संध्याकाळी बाबानी आईला विचारलं, "सारा वेळ काय करतो तिथे? नुसताच तुझ्या आवती भोवती घुटमळतो?"

"मुळीच नाही. मी त्याला कोणतंही काम अगदी विश्वासानं सांगू शकते."

खरं सांगायचं तर त्याला एक काम देण्यातही आलं होतं. ती पिल्लं जेव्हा फारच लहान होती तेव्हा त्याना एका टोपलीत ठेवलं होतं. टोपली चांगली ऐसपैस होती. आईच्या परवानगीनं त्यानं एक काम मिळविलं होतं; अर्थात आईचं त्यावर बारीक लक्ष असायचंच. टोपलीतून एका वेळी एक पिलू बाहेर काढायचं, बेलुगाजवळ न्यायचं आणि त्याचं तोंड नीट तिच्या स्तनाशी भिडवायचं. अशा रीतीनं साऱ्या पिलाना पाळीपाळीनं दूध पाजून आणायचं.

सारीच पिलं काही अगदी सारखी वाढत नव्हती. काही अंगानं छान भरली होती तर काही लहानखोर राहिली होती. काही दिवसानी त्याना भरीला म्हणून



गाईचं दूध देण्यात येऊ लागलं. ही सारी कथा एकदा संध्याकाळी आईनंच आम्हाला सांगितली. मग ती पुढे म्हणाली,

"आज पिलाना दूध द्यायची वेळ झाली त्याच वेळी नेमकं मला कचेरीत बोलावणं आलं. मी युरावर ते काम सोपवल, सर्वजण नीट दूध पितात की नाही ते पहाण्याबद्दल त्याला बजावून मी कचेरीत गेले. कचेरीतून परत आल्यावर काय दिसलं असेल मला? काही पिलं दूध पीत होती. बाकीच्याना आत ठेवून दार बंद केलेलं होतं ते चुकून उघडू नये म्हणून अडसरही व्यवस्थित लावला होता. मी आत डोकावून पाहिलं; सारी गुबगुबीत, धष्टपुष्ट पिलं आत होती. त्यांचा जोरजोरानं आरडाओरडा चालला होता. तारेच्या कुंपणाला खेटून सारीजणं उभी होती, भुकेनं वेडावली होती; अगदी कळंजून गेली होती. "युरा तू काय केलंस त्यांना? डुकराच्या लहान लहान पिलांशी असं का वागायचं असतं? बरोबर नाही असं वागणं!" मी त्याला म्हणाले. युरा उत्तरला, "खादाड आणि अधाशी आहेत ती. लहान लहान पिलाना सारखी बाजूला ढकलून देऊन आपणच सारं दूध पिऊन टाकण्याचा विचार होता त्यांचा." "पण प्रत्येकाच्या पोटाला लागतंच ना, बारीक असू देत नाहीतर लठ्ठ असू देत, नाहीतर वाढणार कसं ते?" युराची समजूत काढायला फार त्रास झाला मला. "ठीक आहे" शेवटी तो कबूल झाला. "अगोदर लहानांची पाळी आणि मग या खादाडांची पाळी. तेच जास्त बरोबर होईल."

पुढे युरा मोठा झाला, पण जनावरांबद्दलचं त्याचं लहानपणचं प्रेम कायमच राहिलं. आजही माझ्या आईवडिलांजवळ टोबिक नावाचा एक "दिव्य" कुत्रा आहे, अंतराळाची सफर करणाऱ्या "बेल्का" आणि "स्ट्रेल्का" सारखाच दिसतो तो कांहीसा. कुठेतरी युराला एक शेंबडं, पाप्याचं पितर शोभावं असं, बिनवारशी कुत्र्याचं पिलू मिळालं. झात्स्कला जेव्हा तो एकदा परत घरी आला होता तेव्हा त्यानं ते आईबाबांना बक्षीस म्हणून दिलं होतं. त्यावेळी झात्स्क हे झात्स्कंच होतं.

□ □

# ४ : पतंग आणि ग्लायडर

मार्च महिन्यातले चावरे वारे सुरू झाले, पाऊस कोसळायला लागला आणि बर्फाचे चुकून-माकून उरलेले अवशेषही नष्ट झाले. बर्फ वितळून त्याचे पाणी झाले, पाण्याने झरे झाले. झरे धावू लागले आणि कुठे तरी कडेकपारीत उडी घेऊन दिसेनासे झाले. ओल्या रानात निळी फुले फुलू लागली होती गेल्यावर्षीच्या गवतामुळे रानावर अजूनही पिवळसर झाक होती. टेकडीच्या उतारावर पूर्वी जागोजाग बर्फावरून, घसरपट्टया बांधून, घसरगुंडी खेळणाऱ्या वीरांच्या निशाण्या होत्या त्या आता पार पुसून गेल्या. साऱ्या उतारावर मऊमऊ हिरवेगार गवत दाट पसरले.

दिवस मोठा झाला होता. सूर्यप्रकाश अगदी स्वच्छ, लखलखीत असायचा. विशेषत. रविवार तर छान मोठं वाटायचे. शाळेला सुट्टया होत्या ! आम्ही आमच्या कामात मग्न होतो. घरात पुष्कळच कामं होती, बहुतेक मला आणि झोयालाच ती पार पाडावी लागत. आई शेतावर कामाला जायची आणि बाबा सुतारकीच्या कामात गुंतलेले असायचे. सारी कामं आवरली की काय करावं हे न सुचून आम्ही उगीचच इकडे तिकडे भटकत असू.

असंच एकदा रविवारी झोयानं बरीसला आपल्याबरोबर फिरायला न्यायचं ठरवलं. "आम्ही जंगलात चाललोय, कोण येतं आमच्याबरोबर ?" झोयानं विचारलं.

"अजून फार दमट आहे जंगलात." मी हरकत घेतली.

"तुझी इच्छा नसेल तर तू नको येऊस. मागून उगीच वाईट वाटेल . . ."

मी आणि युरा घरीच थांबलो.

युरा "यंग पायोनियर" संघटनेचे काही जुने अंक चाळीत होता, चित्र आणि फोटो पाहून त्यांच्या खालची शीर्षकं मोठ्यानं वाचीत होता. तो वाचायला केव्हा शिकला हे आमच्या लक्षातही आलं नाही. मी आणि झोया गृहपाठ करू लागलो की तो लक्षपूर्वक आम्ही काय बोलतो ते ऐकायचा. मग एक दिवस



आमच्या लक्षात आलं की युराला अक्षरं ओळखता येऊ लागली आहेत.

"हे बघ वाल्या, याचा पतंग केवढा मोठा आहे बघ."

त्यानं मासिकाचा एक अंक माझ्या हातात दिला. मागच्या कव्हरवर एका मुलाचे छायाचित्र होते, त्यानं उन्हाची पांढरी टोपी घातली होती. उंच ढगात एक भलामोठा पतंग उडत होता, त्याची दोरी घट्ट खेचून धरल्यामुळे त्याच्या हाताला ताण बसला होता. पतंग कागदाचा आणि लाकडाच्या पातळ पट्टीचा बनविलेला होता. त्याच्याकडे पाहिलं की इतर साऱ्या गोष्टी, तारेचा खांब, मागची दुमजली घरे आणि मित्रांच्या घोळक्यात उभा असलेला मुलगा ही सारी अगदी लहान लहान वाटू लागत. छायाचित्राखाली एक आकृती काढली होती व तिच्याच जवळ तो सुंदर पतंग कसा बनवावा याच्या सूचनाही दिल्या होत्या.

"आपण बनवू या असा एक पतंग," युरा उत्साहाने म्हणाला.

आमच्याजवळ डिंक होता, मागच्या पडवीत हव्या तेवढ्या लाकडाच्या पातळ पट्टयाही होत्या. करून पहायला काय हरकत होती ? अडचण होती कागदाचीच. सूचनांमध्ये सांगितलं होतं तसा जाड, पांढरा कागद आमच्यापाशी नव्हता. पण त्यातूनही आम्ही मार्ग शोधून काढला.

"युरा, काही जुनी वर्तमानपत्रं घेऊन ये."

आम्ही अनेक वर्तमानपत्रांचे कागद एकावर एक ठेवून पक्के चिकटविले. हव्या त्या जाडीचा कागद तयार झाला होता. लागलीच आम्ही त्याला मासिकात दाखविल्याप्रमाणं आकार दिला. सांगाड्यासाठी आम्ही सहा लाकडी पट्टया वापरल्या. त्यापैकी दोन पट्टया, फुली पडेल अशा रीतीने, टोकाटोकापर्यंत बसविल्या आईची एक शिवणाची पेटी होती. बरीसला किंवा युराला तिला हात लावायची परवानगी नव्हती. मी आणि झोया जेव्हा त्यांच्याचसारखे लहान होतो तेव्हा आम्हालाही ती परवानगी नव्हती. पेटीत बहुमोल खजिना भरलेला असे. रंगीत दोऱ्यांची रिळं, झाकण हरवलेलं एक लॉकेट, सुटे मणी, जुन्या सोनेरी कड्या . . . काय काय तिथं असायचं ! आम्हाला हवा होता तो दोरा त्यात मिळाला.

"चल, आपण टेकडीवरून उडवू हा पतंग."

मोठ्या गंभीरपणानं आणि अभिमानानं आम्ही आमची कलाकृती घेऊन बाहेर गेलो. वलोद्या ओर्लोव्स्की आणि वान्या झेर्नोव-हाही युराचा मित्र होता-हेही आमच्याबरोबर आले. पहाता पहाता पंतग कसा काय उडतो पाहायला मुलांचा एक घोळकाच टेकडीवर जमला.

नशीब जोरावर होतं. त्या दिवशी जोरदार वारं सुटलं होतं. मी दोरा बोटाभोवती गुंडाळला आणि म्हणालो, "युरा, तू पतंग पकड, आणि मी सांगेन तेव्हा तावडतोब उंच उडव आणि सोडून दे."

टेकडीच्या उतारावरून पळता येईल तेवढ्या जोरात मी पळत सुटलो. वारा माझ्या कानात शीळ घालत होता. " दे सोडून !" मी जोरात ओरडलो. माझ्या हाताला हिसका जाणवला पण त्याचबरोबर माझ्या टाचेतून एक तीव्र कळ उठली. मी सुस्कारलो आणि खाली पडलो. पतंगाची दोरी हातातून केव्हाच सुटून गेली होती. एक फुटक्या बाटलीची हिरवी काच माझ्या टाचेत घुसलेली दिसत होती. मोठ्या प्रयासानं मी ती बाहेर काढली आणि लंगडत लंगडत टेकडी चढून वर गेलो.

" पहा, पहा, कसा छान उडतोय् !" मुलं आरडाओरडा करीत इकडून तिकडे पळत होती.

" हुर्रे ! हुर्रे !"

" आभाळाच्याही वर गेलाय तो !"

" ती कबूतरं पाहिलीत ?"

डोक्यावर उंचावरून उडणाऱ्या पांढऱ्या पक्ष्यांचा थवा मीही पाहिला होता. वाऱ्याबरोबर आमचा पतंग सरळ त्यांच्याच रोखानं निघाला होता. खालून किती लहान दिसत होता तो. त्या पक्ष्यांना मात्र हा कोण राक्षस आपल्यावर चालून येतोय असं वाटलं असावं, कारण हवेत ते मधल्या मधेच थांबले. त्यांच्या काही वेडचावाकड्या मजेदार हालचाली झाल्या. त्यानी आपला मोहरा बदलला आणि वाट फुटेल तिकडे उडून गेले

वाऱ्याचा एक जोरदार झोत आला. पतंग अगदी ठिपक्यासारखा दिसायला लागला. थोड्यावेळानं तो ठिपकाही दिसेनासा झाला

" तू दोरी का सोडून दिलीस ?" युरानं जोरात विचारलं.

" ते जाऊ देत. आपण दुसरा पतंग बनवू."

तोपर्यंत झोया आणि बरीस जंगलातला फेरफटका संपवून घरी परतले होते, खिडकीच्या कट्टयावर एका काचेच्या भांड्यात निळ्या फुलांचा भरघोस गुच्छ ठेवलेला होता. त्या फुलांमुळं सारी खोली उजळून निघाली होती. निदान तसं वाटत होतं.

" अजूनही झाडाखाली कुठं कुठं बर्फ आहेच." बरीस सांगू लागला.

" पण जंगलात केवढी गंमत होती, तुम्ही आला नाहीत हे चांगलं नाही झालं." झोया म्हणाली.

" आपल्याला त्याचं मुळीच दुःख नाही; हो की नाही वाल्या ?" युरा म्हणाला आणि काहीतरी रहस्य असावं असा हसला.

बाकीच्या मुलाना पतंगाचा खेळ पुन्हा केव्हा सुरू होतो असं झाल होतं. ती अगदी अधीर झाली होती. यावेळी आमचं काम भराभर उरकत गेलं. एकतर



अनुभव मिळाला होता आणि मदतीला ताज्या दमाची कुमकही आली होती.

मुलानी दुसरा पतंग स्वतःच उडविला. मला वाटतं वाऱ्याबरोबर तो चांगलाच उंच गेला असावा.

ही केवळ सुरुवात होती ! दररोज शाळा संपली की युरा, वलोद्या, वाऱ्या झर्नोव माझी वाट पहात उभे असायचे. त्याना नवा पतंग बनवून हवा असायचा. एखाद्या दिवशी मी त्याना दोन दोन, क्वचित तीन तीनही पतंग बनवून देत असे. काही दिवस गेले आणि मग ते स्वतःच पतंग बनवू लागले. पतंगासाठी चाललेल्या नादिष्टपणामुळे बाबा काहीसे त्रासल्यासारखे झाले. वर्तमानपत्रावरून त्यांची जेमतेम नजर फिरते न फिरते तोच आम्ही ते पतंगासाठी हस्तगत करीत असू.

त्या दिवशी शाळा संपल्यावर " यंग पायोनियर " आणि " कोम्सोमोल"चे सदस्य शाळेच्या सभागृहात जमले. त्या वर्षी मे दिन कसा साजरा करावा यावर तिथे चर्चा होणार होती. अगोदर एक संयुक्त कार्यक्रम आणि मग विविध व्यायाम प्रकार सादर करण्याचे ठरले. कोणी कोणी भाग घ्यायचा यावर चर्चा चालू होती.

बाकीच्यांचा वादविवाद चालू असताना माझी नजर दूरच्या कोपऱ्यावर खिळली होती. तिथे पुस्तकांच्या कपाटावर ग्लायडरचे एक मॉडेल ठेवलेले होते. त्याला जागोजाग भोकं पडली होती, अंगावर धुळीचे थर जमले होते. त्याचा एक पंख अर्धा तुटला होता.

आमची सभा संपली तेव्हा मी पायोनियरनेत्याकडे गेलो आणि त्याला विचारले, " मी ते ग्लायडर घेऊ का ?"

" ग्लायडर ? अगदी खुशाल ! मी तर ते फेकून द्यायचाच विचार केला होता. नुसतं धूळ खात पडलंय."

ग्लायडर तसं काही अगदीच लहान नव्हतं. पंख पसरल्यावर त्याची लांबी एक मीटरपेक्षा जास्त भरत होती. पण ते पार मोडून गेलं होतं. मला माहीत होतं, मला काही ते दुरुस्त करणं जमलं नसतं. केवळ कुतूहल म्हणून मी त्याची मागणी केली होती.

ग्लायडर पहाताच युराने श्वास रोखला, " व्वा ! हे तर अगदी खऱ्या खऱ्या विमानासारखं दिसतंय."

" विमान नाही, ग्लायडर आहे ते. वाऱ्यावर पतंगासारखं उडतं ते."

" त्याला पंख आहेत तेव्हा त्याला विमानंच म्हणायला हवं."

बाबाना आमच्या खेळात किंवा इतर उद्योगात फारसे स्वारस्य नसे पण ग्लायडरबद्दल त्यानाही आकर्षण वाटले. मी ते जमिनीवर ठेवलं होतं. त्याचा विकल पंख केविलवाणा लोंबत होता, त्याला पडलेल्या भोकात कोळ्यानी जाळी बांधली होती; शेपटीला पडलेल्या भेगेतून एक धीट कोळी बाहेर पडत होता.

एकूण ते ग्लायडर अगदीच काहीतरी दिसत होते. बाबानी त्याच्याभोवती एक चक्कर मारली आणि त्याच्या दुसऱ्या पंखाला हळूच हात लावून पाहिला आणि म्हणाले, "इतक्या सुंदर पंखाची कोणीबरं ही अशी दुर्दशा केली असावी ?" ते काहीतरी विचारात अगदी गढून गेले; मग अगदी, अगदी अनपेक्षितपणे म्हणाले, "मला वाटतं, मी पंख दुरुस्त करू शकेन. आपण प्रयत्न करून पाहू या. आपण एक नवाच पंख बनवू आणि सारे ग्लायडर टिश्श्यू पेपरने मढवू." म्हणता म्हणता त्यानी त्यावर टिचकी मारून पाहिली. "हे सारं चांगलं घट्ट ओढून घ्यायला हवं. म्हणजे मग ते मजबूत होईल." त्यानी डोक्यावर टोपी ठेवली आणि म्हणाले. "वाल्या, पंखासाठी लाकडाच्या पट्ट्या रंधायला सुरुवात कर. पण हे पहा, पाईनच चांगलं रापलेलं लाकूड घे. वजनाला अगदी हलकं हवं. आणि उगीच घाईघाईनं काम करू नकोस. घाईगर्दीत केलेली कामं पुष्कळदा बिनसतात. मी जरा दुकानात जातो आणि टिश्श्यू पेपर घेऊन येतो."

बाबांचं हे असं होतं. ते सुतारकी करायचे, खोगिरं बनवायचे आणि विटाही पाडायचे. लहानपणापासून ते ही सारी कामं करीत आले होते. ज्या कामाला ते हात घालीत ते अगदी उत्तम रीतीनं पार पाडीत. या जगात कित्येक डझन घरांची भर त्यांनी टाकली होती. मानवी हातानी केलेल्या कोणत्याही गोष्टीकडे ते आदराने पाहात आणि तोच आदर त्यांनी आमच्यातही बाणवला होता.

घरापासून दुकान लांब होतं. बाबांना परत यायला कमीत कमी एक तास तरी लागला असावा. मी नीट काळजीपूर्वक पट्ट्या रंधायला लागलो. भोवती युरा सारखा घोटाळत होता. त्याची कांहीतरी लुडबुड चालली होती; कुठे मला पटाशीच आणून दे—मला तिची गरज नसली तरी—असे त्याचे उद्योग चालले होते.

"जरा जोरात चालू दे ना तुझा हात ?" युरा अजिजी करू लागला.

"अशानं तर काम कधीच संपायचं नाही."

"बाबांनी सांगितलेलं ऐकलं नाहीस का तू ? घाईगर्दीनं काम करू नये म्हणून ?"

बाबांचं नाव घेतल्यावर तो जरा शांत झाला. पण थोडयाच वेळात तो मूळपदावर आला; मधेमधे लुडबूड करू लागला. यावेळी तो म्हणाला, "तुला जर ते करायला जमत नसेल तर तू तसं सांगायला हवं होतंस ?"

मी त्याला तिथून पिटाळून लावणार होतो. तेवढ्यात बाबा परत आले, आम्ही दोघांनी मिळून पंख दुरुस्त केला. आणि जागच्या जागी नीट पक्का बसवला मग आम्ही संपूर्ण ग्लायडर नव्या टिश्श्यू पेपरने मढवून काढले.

"आपण त्याच्या पंखावर तारे काढू या." युरानं सुचवलं. मी बरोबर



जाळ्यात फसलो, "आणि त्याच्यावर आपण आपलं नाव काढू या; मोठ्या अक्षरात, गागारिन..."

बाबांच्या करड्या आवाजानं मला थांबवलं. ते थंडपणानं म्हणाले, "तसं काही करायचं नाही. आणि ते उडालचं नाहीतर ? प्रत्येकाकडून हसं का करून घ्यायचंय तुला ? आणि तुला काय वाटतं ? तू असा कोण लागून गेला आहेस ? म्हणे गा–गा–रि–न !" एकेक अक्षर ठासून उच्चारत ते उपहासाने म्हणाले "अजून तू म्हणजे काही महान पीटर झाला नाहीस !"

रशियात जेवढे मोठमोठे लोक होऊन गेले त्या सर्वांत बाबाना १ ल्या पीटर बद्दल अतिशय आदर होता. आमच्या गावच्या वाचनालयात पीटरवर जेवढी पुस्तके होती ती सर्व त्यानी वाचली होती. त्याना वाचायला वेळ लागायचा. प्रत्येक शब्दामागचा खरा अर्थ जाणून घेण्याचा ते प्रयत्न करीत. एखादा अवघड किंवा मजेदार भाग आला की ते तो पुन्हापुन्हा वाचून काढीत. संध्याकाळच्या या वाचनातून कितीतरी हिवाळे सरले होते.

महान पीटरबद्दल त्याना जेवढा आदर होता तेवढाच दुसऱ्या कॅथेराईनबद्दल तिरस्कार होता ते तिचा "जर्मन केट" म्हणून तुच्छतापूर्वक उल्लेख करीत.

"तू म्हणजे काही महान पीटर झाला नाहीस !"

मी चपापलो, शरमलो आणि चूप बसलो.

"चला आता. त्याच्यावर काहीही काढायची गरज नाही· पहा, बाहेर अंधार पडायला लागला आहे," युराच्या स्वरात निकड होती.

खरं तर अंधाराचा कुठे मागमूसही नव्हता. पण मला त्याची अधीरता कळली.

आम्ही खेड्यापलिकडच्या मोकळ्या कुरणात गेलो. बाबा अंगणातून पाहात होते. ग्लायडरला लहान मुलांचं खेळणं जरी म्हणता आलं नसतं तरी एका अर्थी तो मुलांचाच खेळ होता. आमच्याबरोबर येणं आपल्याला शोभणार नाही असं त्याना वाटलं असावं.

पुन्हा एकदा पतंग उडवताना जमा झाला होता तसा—मुलांचा घोळका जमा झाला.

पहिला प्रयत्न पार फसला. जमिनीवरून दहा, बारा मीटर उंच उडाल्यावर ग्लायडर वाकडं झालं आणि जमिनीवर कोसळलं.

"झालं ! आता पुन्हा ते दुरूस्त करावं लागेल," मी स्वतःशीच पुटपुटलो. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याला कुठेच काही इतकासा सुद्धा धक्का लागला नव्हता.

दुसरा, तिसरा, चौथा—सारे प्रयत्न ओळीनं अपयशी ठरले. जमलेली मुलं आमची खिल्ली उडवायला लागली.

" ग्लायडर नाही, ट्रॅक्टर आहे तो !"

" ट्रॅक्टरही नाही. त्याचा आवाज होतो आणि तो नांगरट करतो."

" शेकोटीत टाकलं तर हातसुद्धा शेकायचे नाहीत."

मी अस्वस्थ झालो; युराकडं एक नजर टाकली. त्याचे गाल लाल झाले होते. डोळ्यात चमक भरली होती. त्याचा चेहरा नेहमीसारखा वाटत नव्हता. त्याने ओठ घट्ट दाबून धरले होते. माझ्यापेक्षा तोच जास्त अस्वस्थ झाल्यासारखा दिसत होता.

" चला मुलानो," मी म्हणालो, " याला आपण शेकोटीत टाकू या. त्याच्या आखणीतच काहीतरी चूक राहिली असावी. चला, घरी जाऊ या."

युरानं माझी वाट अडविली. " आणखी एकदाच, वाल्या ! एकदाच."

एकदा तर एकदा ! त्यानं आणखी काय बिघडणार होतं ? मी ग्लायडर उचलून उडविलं...यावेळी ते हवेवर बरोबर तरंगत राहिलं. ते सरळ उंच उडालं, क्षितिजसमांतर झालं आणि उडायला लागलं. करड्या टिश्यु पेपरचे त्याचे पंख खालीवर होऊ लागले. उडत उडत ते सरळ सामुदायिक शेताच्या इमारतींकडे निघालं. क्लुशिनोच्या डुक्कर-वाडीची अनभिषिक्त राणी, प्रख्यात बेलुगा तिथं रहात होती.

मुलंही त्याच्या मागोमाग पळत सुटली. मी घराकडे वळलो. बाबा अजूनही अंगणात उभे होते; काठीवर रेलून उभे होते. त्यानी माझ्याकडे अविश्वासानं पाहिलं.

" ग्लायडर चांगलं उडालं." मी सांगून टाकलं, मला माझा आनंद लपवता आला नाही.

ग्लायडरपुढे कोणाला पतंगाची आठवणही राहिली नाही. त्या ग्लायडरचा पुरा निकाल लागेपर्यंत कोणालाच दुसरं काही सुचलं नाही.

त्यानंतर कित्येक वर्षे उलटली. युराने अंतराळात उड्डाण केले होते. त्यानंतर तो ज्याझान शहरात एकदा मला भेटायला आला होता. टेबलापाशी बसून आमच्या अशाच गप्पागोष्टी चालल्या होत्या. मला त्याच्या अंतराळ उड्डाणाबद्दल विलक्षण औत्सुक्य होते. पण तो वारंवार आमचं संभाषण क्लुशिनोतील आमच्या बालपणच्या काळाकडे वळवीत होता.

" तुला ते आपलं ग्लायडर आठवतं का ?" त्यांनं हसून विचारलं.

" चांगलंच आठवतं. युद्ध सुरू झालं त्या अगोदर थोड्याच दिवसांची ती गोष्ट."

" माझ्या मनात पुष्कळवेळा त्या ग्लायडरचा विचार येतो. ती कविता



अजूनही आठवते मला." युरानं कुठेतरी लांब नजर लावली आणि तो कविता म्हणू लागला. त्यात त्याला उघड उघड आनंद वाटत होता.

मी वढोध्यानोव होईन
आणि माझ्या देशाची विमानं उडवीन.
आभाळातल्या निळ्या मार्गानी,
उंच उंच जाईन
आणि खालती आपली पृथ्वी पाहीन.

मग आम्ही निराळ्याच विषयावर बोलायला लागलो. ग्लायडरचा विषय पुन्हा कोणी काढलाच नाही पण मनात राहून राहून विचार येतो, बालपणी जेव्हा तो पतंगासाठी आणि ग्लायडरसाठी इतका वेडापिसा झाला होता तेव्हाच्या त्या इतक्या दूरच्या जुन्या काळातच उड्डाणाची आवड त्याच्या मनात रुजली असावी !

□ □

# ५ : कमिसार सुश्किनची गोष्ट

खेड्यातले सारे रस्ते ज्या चौकात मिळत होते तिथे एक उंचवटा होता. त्याच्याभोवती ओतीव लोखंडाचा कठडा होता. उंचवटयावर कॉम्रेड सुश्किनचे साधेसुधे स्मारक होते तो एक क्रान्तीवीर होता. यादवी युद्धाच्या काळात जनप्रतिनिधी होता.

आमच्या सामुदायिक शेताच्या कचेरीला त्याचेच नाव दिले होते. ती कचेरी गावचे सोविएत, सामुदायिक केंद्र, जनरल स्टोअर्स आणि आमच्या शाळेची एकमजली लाकडी इमारत ही सारी जवळजवळच होती.

मे–दिनाच्या थोडे दिवस अगोदर माझ्या वडिलानी गावच्या सुतारांच्या मदतीने त्या स्मारकाशेजारीच एक लाकडी व्यासपीठ उभारून दिले.

कचेरीत निरोप नेण्याआणण्याचे काम करणारी एक मुलगी होती. तिच्या कातडीवर डाग डाग दिसत होते. धावत धावतच ती शेतावर गेली आणि माझ्या आईला म्हणाली, "अध्यक्ष म्हणतात तुम्ही सभेला यायला हवं."

"बरं. मी या डुकरांचं खाणं पहाते, घरी जाऊन कपडे बदलते आणि येतेच."

"पण अध्यक्षांनी सांगितलंय्, असाल तशा या."

"ठीक आहे, अशीच येते."

सभेला जायचं म्हणजे आईला घरावरूनच जावं लागणार होतं. मनात आणलं असतं तर ती सहज कपडे बदलून जाऊ शकली असती. पण अध्यक्षानी ताबडतोब बोलावलं होतं म्हणून ती तशीच, घरात न येता सरळ सभेला गेली.

ती लगबगीने चौकात पोहोचली तेव्हा सभा सुरुही झाली होती अध्यक्ष कुलेशोव आणि प्रादेशिक केंद्राचा प्रतिनिधी दोघेही व्यासपीठावर उभे होते. व्यासपीठ पताकानी सजविले होते. केंद्राचा प्रतिनिधी ठेंगणासा होता, त्याचे केस काळे होते, तिशी–पस्तिशीचा असावा; अंगात चामड्याचे जाकीट होते. घोड्यावरून रपेट करताना घालतात तसे निळे ब्रीचेस त्याने चढविले होते. त्याचंच भाषण चाललं होतं.



सारं गाव सभेला लोटलं होतं. आम्ही शाळकरी मुलं आमच्या झेंड्याच्या बाजूला ओळीत उभे होतो. आमच्या गावकऱ्यांच्या टोप्या, लाल रुमाल, गवती टोप्या यांच्यावरून आम्ही त्या प्रतिनिधीकडे अगदी एकटक रोखून पहात होतो. युरा आणि वलोद्या ओर्लोन्स्की नेहमीप्रमाणेच पुढे कुठेतरी होते.

"भाई हो," तो जनप्रतिनिधी बोलू लागला, बोलताना हातवारे करू लागला. "सगळीकडे उत्साहाचे वारे पसरले आहे अशा वेळी आपण हा मे-दिन साजरा करीत आहोत..... पण असेही काही लोक आहेत की जे युद्धाची भीती घालू इच्छितात..... परन्तु भाई हो.... "

वक्ता चांगला बोलला. प्रत्येकाने त्याचे बोलणे अगदी लक्षपूर्वक ऐकले. मध्येच एकदा कोणीतरी खोकलं पण बाकीच्यानी त्याला लागलीच दटावलं.

मग त्याने भुवईवरचा घाम निपटून टाकला आणि तो समाधानानं हसला. शेवटी जेव्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट थांबला–आमचे गाववाले उदार मनाचे होते, ते खूप वेळ मोठमोठ्याने टाळ्या वाजवीत राहात–तेव्हा त्याने बाजूला होऊन सामुदायिक शेताच्या अध्यक्षाना जागा करून दिली.

"प्रादेशिक केंद्राच्या कॉम्रेडने साऱ्या गोष्टी नीट स्पष्ट करून सांगितल्याच आहेत, मी त्यांची पुनरुक्ती करीत नाही तुम्ही दररोजच माझं बोलणं ऐकता. आता मला एक गोष्ट जाहीर करायची आहे बोर्डानं आपल्या सर्वोत्कृष्ट कामगाराना बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. आता बक्षिसं देण्यात येतील."

सभेनं निर्णयाचं जोरदार स्वागत केलं. मागच्या ओळीत कोणीतरी टाळ्या वाजवायला सुरुवात केली, थोड्याच वेळात सर्वजण त्यात सामील झाले.

"आता हे पहा" जमावाच्या आरडाओरड्याला न जुमानता सर्वांना ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात अध्यक्ष बोलू लागले, "आपण वर्णानुक्रमानं जाऊ. ॲना बेलोवा !"

ॲनी मावशी म्हणजे आमच्या मित्रांची, बेलोव भावांची आई ती मागच्या मागेच थबकली

"पुढे हो ना !" बेलोव म्हणाले आणि त्यानी तिला पुढे ढकलले.

ॲनी मावशी लहानखोर, सडपातळ होती ती लाजून लाजून लाल झाली; इतक्या लोकांचे डोळे आपल्यावर खिळले आहेत या जाणिवेने बावरून गेली. आणि अडखळत व्यासपीठाकडे निघाली. "सवय नाही ना असल्या काही गोष्टींची." ती पुटपुटली.

दोन स्टुलावर वर्तमानपत्रात गुंडाळलेली अनेक बक्षिसं ठेवलेली होती.

"तू आमच्या सर्वोत्कृष्ट गवळणीपैकी एक आहेस. यात फ्रॉकसाठी एक कपडा आहे." कुलेशोवनी बंडल उघडलं आणि गावकऱ्यांना दिसावं म्हणून कपडा

उलगडून सर्वांसमोर धरला. पुन्हा एकदा सर्वांनी टाळ्या वाजविल्या. ॲनी मावशी एकदा या पायावर तर एकदा त्या पायावर रेलून उभी राहात होती. तिनं आपले हात पाठीमागे घट्ट बांधून ठेवले होते.

"कॉम्रेड, घे तो कपडा," जनप्रतिनिधी तिला धीर देत म्हणाला.

"आभारी आहे," इतकं कसंबसं बोलून ती चटकन लोकात जाऊन मिसळली.

"ॲना गागारिना !"

आता आईला पश्चाताप झाला. येता येता चांगलं वाटेवर घर होतं, कपडे बदलून आलो असतो तर ! पण झाल्या गोष्टीला इलाज नव्हता. ती तशीच कामावेळचा निळा पोशाख घालून पुढे गेली.

"याच्यातही फ्रॉकसाठी एक कपडा आहे." बक्षीस देतांना अध्यक्षांनी सांगितलं आणि तिच्याशी हस्तांदोलन केलं. जनप्रतिनिधी पुढे वाकून त्यांच्या कानात हलकेच काही सांगू लागला.

अध्यक्षांनी आईला थांबविलं, "जनप्रतिनिधी म्हणतात, तू दोन शब्द बोलशील का ? तुला काही भीती वाटणार नाही बोलायची, होय ना ? दररोज ठरवून दिलेल्या कामापेक्षा तू जास्त काम कसं काय पार पाडतेस, आपल्या चारी मुलांना कसं वाढवतेस हेच सांग लोकांना. तुझ्या कामाबद्दलही सांग."

आई प्रथम जरा संकोचली आणि मग हसून म्हणाली, "मला नाही भीती वाटत. पण जे काय सांगायचं ते बहुतेक सांगून झालंच आहे." मग ती गंभीर होऊन बोलू लागली. "आपले सारे लोक करतात तसंच मीही सामुदायिक शेतावर काम करते. त्या कामात मला मनापासून आनंद होतो. आयुष्यभर हेच काम करायला माझी तयारी आहे." मग स्मारकाकडे वळून ती म्हणाली. "कॉम्रेड सुश्किन आणि त्यांच्यासारखे इतर वीर यानी आमच्यासाठी जे काही केलं त्याबद्दल मी त्या सर्वांची कृतज्ञ आहे."

पुन्हा एकदा सभेतून संमतीदर्शक आवाजांची लाट उठली. आई व्यासपीठापासून परत येत होती. तिच्या वृत्ती उत्तेजित झाल्या होत्या.

सभा संपण्याअगोदर शाळेतील हौशी कलाकारांचा एक कार्यक्रम झाला. आम्ही अगदी खुल्या आवाजात गाऊन घेतलं. थोड्याच वेळात चौक रिकामा झाला. झोयाची आणि माझी वाट पहात आई एका बाजूला उभी होती. तिने युराचा हात धरला होता.

"तुला आवडला का आमचा कार्यक्रम ?" झोयानं आईला मोठ्या उत्सुकतेनं विचारलं.

"फार आवडला." आई म्हणाली. तिनं झोयाचा लाल टाय नीट बसवला



आणि मग हळूच पुढे म्हणाली, "आज मी पण सभेत बोलले. मला कधी वाटलंही नव्हतं मी सभेत बोलीन म्हणून."

"आई, आपण जरा सुश्किनला पाहून येऊ." युरानं आईचा हात पकडला. "मी त्याला नीट जवळून असं पाहिलंच नाही."

"ठीक आहे."

उंचवट्यावर एक उंच स्तंभ उभारला होता. त्यात जडवलेल्या एका काचेच्या आड एका माणसाचे छायाचित्र होते. त्याच्या मिशा बारीक व पातळ होत्या; डोळे पावेलकाकांसारखे प्रेमळ, स्वप्नाळू, विचारशील दिसत होते. हुशार माणसासारख्या त्याच्या भिवया चढलेल्या होत्या. सारा चेहरा एखाद्या अगदी दयाळू माणसाच्या चेहऱ्यासारखा दिसत होता.

"आई, सुश्किन मेला तेव्हा तो तरूण होता ?" युरानं विचारलं.

"मुला, त्याचा खून झाला."

"कोणी केला त्याचा खून ?"

"कुलकांनी; सोविएत सत्तेच्या शत्रूंनी. त्यानी त्याचा खून केला आणि मग त्याचं सारं शरीर वेडंवाकडं तोडून टाकलं !"

"कुलक झारच्या बाजूला होते का ?"

"होय."

"सांग ती सारी हकिकत."

"खरंच आई, सांग ना," मी आणि झोया म्हणालो.

"त्याचं असं झालं... ."

त्याचं असं झालं. १९२२ साली झातस्क प्रदेशात 'कुलक' बंड करून उठले. श्रीमंत जमीनदार आणि त्यानी फूस लावलेले काही थोडे मध्यमवर्गीय आणि गरीब शेतकरी यानी सशस्त्र टोळ्या संघटित करून उठाव केला. सोविएत अधिकाऱ्यांपासून लपून छपून राहिलेले काही 'श्वेत-रक्षक' झारच्या सैन्यातील अधिकारी या टोळ्यांचे म्होरके होते.

त्या काळात 'कुलकां'चे बंड केवळ झातस्क प्रदेशातच झाले असे नाही. मध्य आशियाच्या इतर भागातही कुलक डोके वर काढू लागले होते. वोल्गा प्रदेशात आणि दूर सैबेरियाच्या प्रदेशात यादवी युद्ध अजून संपले नव्हते. तिथेही त्यानी प्रति–क्रांतिकारक शक्ती संघटित करण्याचे प्रयत्न चालविले होते. नवजात सोविएत प्रजासत्ताक आतून उध्वस्त करण्याचा त्यांनी चंग बांधला होता. सर्वसाधारणपणे कुलकांच्या बंडाची सुरवात एका ठरावीक पद्धतीने होत असे. जे

सोविएत सत्तेशी एकनिष्ठ असत त्याना ते सरळ कापून काढीत. ज्ञातस्कमधील व आजूबाजूच्या काही खेडयातील अनेक कम्युनिस्ट व कोम्सोमोल सदस्य यांचे त्या काळात खून पडले होते.

ज्ञातस्कच्या कम्युनिस्टांना व लाल सैन्याच्या मोठया पथकाला मदत म्हणून पेत्रोग्रादहून ‘रेड लेटिश’ बंदुकधारी तुकडीची एक सशस्त्र आगगाडी आली होती.

अखेरीस कुलकांच्या बंडाचा बीमोड करण्यात आला. पण क्लुशिनोचे जमीनदार तरीही तग धरून होते. ‘रेड लेटिश’ बंदूकधारी तुकडीचा पहिला हल्ला त्यानी परतवून लावला. मग लाल सैन्याने त्यांच्या खंदकावर मारा सुरू केला.

आणि त्या क्षणी कुलकांच्या एका गटाने कमिसार सुश्किन यांना पकडले आणि गोळी घालण्यासाठी चालविले.

वाटेवरच सुश्किनचं घर होतं. त्याचा छोटा मुलगा त्याच्याकडे धावत येऊ लागला सुश्किन म्हणाला, “मुला परत जा. तुला दुखापत होऊ नये अशी माझी इच्छा आहे. परत जा तू. ऐकलंस ना? परत जा. खंदकावर मारा होतोय, ऐकलस ना? आपलेच लोक आहेत ते आपल्याला मदत आलीय. ‘कुलक’ फार काळ टिकाव धरू शकणार नाहीत. जा घरी पळ, आईकडे जा.”

सशस्त्र गाडीतून फेकलेला एक गोळा जवळच फुटला; फुटल्या जागची माती उंच, उडाली आणि कुलकांच्या गटावर आणि सुश्किनवर पडली. घाबरलेले कुलक इकडे तिकडे पळू लागले. तेवढयात पळता पळता एकाने आपल्या कैद्याला, सुश्किनला गोळी घालण्याची संधी साधली; गोळी पाठीत घुसली.

सुश्किन मातीत कोसळला, त्याचे तोंड धुळीने माखले. त्याचा मुलगा धावला आणि त्याने त्याचे बांधलेले हात मोकळे केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ‘रेड लेटिश’ बंदुकधारी तुकडीने गावाचा ताबा घेतला. सेर्योझामामा—आईचे मोठे भाऊ—पेत्रोग्रादला कामगार होते. वयाच्या सोळाव्या वर्षीच ते कम्युनिस्ट झाले होते. लाल सैन्यात ते एक कमिसार होते. गोळीला बळी पडलेले सुश्किन त्यांचे जिव्हाळयाचे मित्र होते. ‘कुलक’ बंड मोडून काढण्यासाठी पेत्रोग्रादहून सशस्त्र पथक त्यानीच आणले होते. जेव्हा सुश्किनच्या हत्येची बातमी त्याना कळली तेव्हा ते दुःखाने अगदी सैरभैर झाले.

“सेर्योझामामाला मी कसं पाहिलं नाही कधीच?” युरानं विचारलं.

“त्याच वर्षी ते टायफॉईडने गेले.”



“जर का हे ‘कुलक’ कधी माझ्या हाती पडले तर एकेकाला असा दाखवीन!”

आईनं युराकडं पाहिलं. भावाच्या आठवणीनं ती खिन्न झाली होती. पण युराच्या डोळयातला संताप आणि आवेश पाहून तिला हसू आवरले नाही.

टेकडी उतरून आम्ही घरी परत येत होतो, तेव्हा युरा सारखा मागे वळून त्या स्मारकाकडे पहात होता. मीही मागे वळून तो लाकडी स्तंभ डोळे भरून पाहून घेतला.

त्या दिवसापासून युरानं आणि वलोद्या ओर्लोव्स्कीनं एक नवाच खेळ सुरू केला. त्यानी काही लाकडी तलवारी बनविल्या. त्यांचा सारा वेळ कुरणात “कमिसार सुश्किन आणि सेर्योझामामा” खेळण्यात जाऊ लागला. कधी कधी बरीसलाही खेळायला घेत. मात्र त्याला नेहमी ‘कुलक’ नाहीतर सशस्त्र आगगाडी बनावं लागे.

□ □

## ६ : पिठाच्या गिरणीतली एक रात्र

एका जाड लिननच्या चादरीवर दोन जुनी कांबळी पांघरून आम्ही तिघं पडलो होतो. पावेलकाका मध्ये, त्यांच्या उजवीकडे युरा आणि डावीकडे मी. आम्ही जराशीदेखील हालचाल केली तरी, खाली घातलेलं गेल्या वर्षीचं गवत सळसळल्याचा आवाज येई. वरचं छप्पर गवतानं शाकारलं होतं. नुकत्याच झालेल्या वादळानं त्याला एक भोक पाडलं होतं; त्याच्याभोवतालचं गवत उसकटलं होतं. त्या तेवढ्या मोकळ्या जागेतून एकुलता एक निळा तारा शांतपणानं लुकलुकताना दिसत होता. त्याचा अंधुकसा प्रकाश पडला होता. गवताच्या उग्र वासात देखील, लिननखालच्या, मेंढीच्या कातड्याचा आंबुस, घरगुती वास लपत नव्हता. आम्ही अगदी आरामात पहुडलो होतो.

"रशियन माणूस भटकत भटकत किती का दूर जाईना, त्याला आपल्या घराचा कधीच विसर पडणार नाही. ऐकलं ना मुलानो?" पावेलकाका म्हणत होते.

पावेलकाकांची मुलगी मोठी झाली होती; गेली कित्येक वर्षे ती मॉस्कोतच स्थायिक झाली होती. काकी गेल्यापासून पावेलकाका एकटे पडले होते; कधी कधी हा एकलेपणा त्यांना खायला उठे. मधूनच केव्हातरी ते संध्याकाळी आमच्या दारावर टकटक करीत आणि आईला म्हणत, "ॲना, मुलांना पाठव माझ्याबरोबर गवताच्या गंजीवर झोपायला."

आई नेहमीच 'होय' म्हणायची. मग मी आणि युरा एक गोणपाट, एक मेंढीचं कातडं आणि एक कांबळं काखोटीला मारून निघत असू. झोपण्याअगोदर पावेलकाका आणि बाबा पडवीत सिगरेट ओढीत. तोपर्यंत मी आणि युरा बिछाना लावीत असू. काकांना आणि बाबांना एकत्र पाहिलं की कोणालाही ते जुळे असल्याचा भास झाला असता. पावेलकाका थोडे अधिक उंच होते इतकाच काय तो फरक.



त्या दिवशी संध्याकाळीही असेच झाले. पावेलकाकांनी शेवटची सिगरेट संपवली आणि ते गंजीवर आले. मग आमचा ठराविक कार्यक्रम सुरू झाला. जमिनीवर आणि समुद्रावर आमचा प्रवास सुरू झाला. या पृथ्वीच्या पाठीवर बहुधा अशी एकही जागा उरली नसावी– जिथे आम्हाला आमचे सर्वज्ञ पावेलकाका घेऊन गेले नाहीत! अमेरिकन प्रेअरीत आम्ही रानटी, हिंस्त्र घोड्यांची शिकार केली; उंच उंच पर्वतशिखरं पादाक्रांत केली; कोलंबस आणि मॅगेलन यांची मदत न घेता नव्या भूमीचा शोध लावला; १६ व्या शतकातील रशियन व्यापारी अफनासी निकितीन याच्याबरोबर भारताच्या प्रवासाला गेलो; चकालोवबरोबर उत्तरध्रुवावर घिरट्या घातल्या आणि पापानिनच्या संगतीने आर्टिक मधल्या हिमखंडावर सारा हिवाळा काढला. पावेलकाका म्हणजे एक प्रेमळ पंडित होते. फेनिमोर कूपर, व्हिक्टर ह्यूगो आणि ज्यूल व्हर्न यांचे ते एकत्र रसायन होते. शिवाय महत्त्वाच्या ताज्या राष्ट्रीय घडामोडींचे ते भाष्यकारही होते. आर्टिक, सैबेरिया आणि दूर पूर्व या प्रदेशात सोविएत संशोधकांनी काय काय प्रगती केली, यासारख्या विषयांचे ते आम्हाला निरूपण करीत. नवलाईनं भरलेल्या या सृष्टीची तर त्यांनी आम्हाला ओळख करून दिलीच पण शिवाय दुसरीही एक गोष्ट आम्ही शिकलो. पावेलकाकांनी आम्हाला स्वप्नं पाहायला शिकविले.

काका बोलू लागले की आम्हाला साऱ्या दुनियेचा विसर पडे. सामुदायिक केंद्रावरून येणारे ॲकॉर्डियनचे सूर विरून जात, मुलींचे गाणे बंद होई, सारे खेडेगाव हळूच झोपेच्या कुशीत शिरे. पण काका बोलत राहात आणि आम्ही ऐकतच असू, अगदी तल्लीन व एकाग्र होऊन ऐकत असू. झोपेची कुणालाच आठवण नसे. आम्ही तिघं आणि आम्हा तिघांची ती स्वप्निल दुनिया याखेरीज आमच्या लेखी कशालाच अस्तित्व उरत नसे.

"म्हणून सांगत होतो बरं का रे मुलांनो, रशियन माणूस भटकत भटकत किती का दूर जाईना; त्याला आपल्या घराचा कधीच विसर पडणार नाही. आपल्या गवताचा तीव्र वास, आपल्या मातीचा वास, तो कधीही विसरणार नाही," पावेलकाका म्हणाले.

आम्ही नमनावरून कीर्तनाचा अंदाज बांधला. आज काहीतरी चित्तथरारक गोष्ट ऐकावयास मिळणार म्हणून आम्ही कान टवकारले. पण घडले ते अगदी अपेक्षेविरुद्ध, काका कितीतरी वेळ अगदी मुकाट बसले.

"एकदा मी गंजीपाशी बसलो होतो, तेवढ्यात कुठूनतरी एक पाल माझ्या शर्टात शिरली," युराला कुठली तरी, केव्हाची तरी आठवण आली.

"मग घाबरलास का तू?"

"पहिल्यांदा घाबरलो जरा. मग मी तिची शेपटी पकडली आणि तिला

बाहेर काढून टाकली. पण तिचं शेपूटच गळून पडलं. फार दुखलं असेल का तिला ? ''

" तिला नवी शेपटी फुटली असणार, " मी म्हणालो, " काका, झोपले का तुम्ही ? "

" नाही. "

" मग तुम्ही काही बोलत का नाही ? "

" मी त्या ताऱ्याकडे पहात होतो आणि विचार करीत होतो. "

मीही कधीकधी ताऱ्याकडे पहात होतो आणि विचार करीत होतो. माझ्या प्रश्नांची उत्तरं मला कुठल्याही पुस्तकात मिळाली नव्हती; मित्रांशी गप्पागोष्टी करतानाही त्यांचा उलगडा झाला नव्हता. " कुठल्या तरी एखाद्या ताऱ्यावर जीवंत सृष्टी असेल का ? एखाद्यावर तरी ?" मी विचारले.

" कसं बोललास वाल्या, " काका म्हणाले. काका उठून बसताना कांबळं दूर फेकलं गेलं आणि माझ्या उघडया पायाना थंडी चावा घेऊ लागली. " तू अगदी माझ्या मनातलाच प्रश्न केलास. मीही नेमका तोच विचार करीत होतो. "

" ताऱ्यावर काही लोक राहातात का ? " युरानं विचारलं.

" अगोदर ग्रह आणि तारे यातला फरक समजावून घ्यायला हवा. प्रत्येक तारा सूर्यासारखा असतो. तिथं इतकं उष्णतामान असतं की, कोणताही जीव तिथं रहाणं शक्य नाही. अगदी पोलाद किंवा हिरा यासारख्या वस्तु जरी घेतल्या तरी तिथं क्षणार्धात त्याची वाफ होऊन जाईल आणि वाफही राहणार नाही, तिचं वायूत रुपान्तर होईल इतकी उष्णता आहे तिथं. आता ग्रहाबद्दल म्हणाल तर मला वाटतं ते आपल्या पृथ्वीसारखेच असणार, निदान काही ग्रह तरी. तिथं कोणती तरी जीवंत सृष्टी असावी. "

" कोणते ग्रह पृथ्वीसारखे आहेत ? मंगळ, ज्युपिटर, शुक्र की प्लूटो ? शास्त्रज्ञांना तर त्यांची सारी माहिती आहे. "

" मुला, शास्त्राबद्दल तुला फारशी माहिती दिसत नाही, " काकानी दटावले, " ते आपल्या सूर्य-मालेतील ग्रह आहेत. पण शास्त्रज्ञाना त्यापैकी निम्म्या ग्रहांची सुद्धा नीट माहिती नाही. त्या बाबतीत त्यांचं एकमत नाही. या साऱ्या विश्वात असंख्य सूर्य आहेत. त्या प्रत्येकाभोवती दुसरे ग्रह फिरत आहेत. ग्रह आपल्या डोळयाना दिसत नाहीत. "

एकाएकी काकांनी गंजीवरून लोळण घेतली. त्यानी पायात बूट चढविल्याचा आवाज आला.

" मी म्हणतो मुलानो, आपल्याला कोणालाच झोप येतेय् असं दिसत नाही. खाली उतरा, जरा चक्कर मारून येऊ. "

आम्हाला लाडीगोडी लावण्याची जरूरच नव्हती.



आमचं गाव रात्री अगदीच वेगळं दिसे. त्याचा चेहेरामोहराच बदलून जाई. ओळखदेख नसल्यासारखं एकदम परकं वाटायला लागे. दिवसा उजेडी, सूर्य प्रकाशात असला म्हणजे घरं घरासारखी दिसायची ' लिलॅक' च्या फुलानी लहडलेल्या पुढच्या अंगणातल्या बागा दिसायच्या. रात्री अंगण वगैरे नाहीसे होई. गवताच्या अस्ताव्यस्त भल्यामोठ्या गंजी कुणीतरी थेट रस्त्यापर्यंत रचून ठेवल्या असाव्यात असं वाटायचं.

युरानं आणि मी हातात हात अडकविले आणि आम्ही पावेलकाकांच्या मागून निघालो. एकापाठोपाठ एकेक तारा आभाळात डोकावू लागला. आमचा निळा तारा त्या घोळक्यात कुठल्या कुठे गेला, ओळखू येईनासा झाला. मागोमाग बारीक चंद्रकोर उगवली आणि आमच्या खेड्यावर अर्धरात्री ओठंगून राहिली.

आम्ही रस्ता ओलांडला आणि कुरणाच्या दिशेनं निघालो. दवाच्या भारानं जड झालेलं गवत आमच्या पावलांखाली दबत होतं, पाण्याचे थेंब आमच्या पावलांवर पडत होते; चांगलेच थंडगार होते ते. " फार दव पडलं की समजावं, पाऊस डोळे वटारणार, " पावेलकाका म्हणाले.

आमच्या डाव्या बाजूला गाईंचा गोठा होता. त्या रवंथ करीत होत्या, त्याचा मोठा आवाज बाहेरही ऐकू आला. राखणदाराच्या खोलीच्या अर्ध्या उघडया खिडकीतून कंदिलाचा मंद प्रकाश बाहेर पडला होता. राखणदाराचं नांव होतं आन्द्रे कालुगिन. आन्द्रे म्हातारा होता. त्याच्या तोंडात सिगरेट नाही असं कधी होत नसे. केव्हाही जा, त्याच्यापाशी एखादी गोष्ट, एखादा विनोदी चुटकुला तयार असायचाच. तो अजूनही जागाच होता. आमच्याशिवाय गावात आणखीही कोणीतरी जागं आहे या विचारानं मनावरचा भार उतरला.

लवकरच आम्ही गोठा ओलांडून पुढे गेलो. पण आम्ही कुठे जात होतो ते केवळ पावेलकाकांनाच सांगता आलं असतं.

" हे जंगल आलं आता, " मी म्हणालो.

" आपल्याला जंगलात नाही जायचं. "

" कुठं जायचंय आपल्याला ? "

पावेलकाका काहीच बोलले नाहीत. मला त्यांची पाठ तेवढी दिसत होती. मधूनमधून त्यांच्या पायाखाली फांदी मोडल्याचा आवाज येई. रात्रीच्या त्या अद्‌भुत साहसाला एक गहिरा, तरल रंग चढला होता.

एकदम आमच्यासमोर पवनचक्कीचं काळसर ओबडधोबड धूड दिसू लागलं. ती झोपी गेली होती; म्हातारी माणसं झोपेत कुरकुरतात, सुस्कारतात, घोरतात तशीच गत होती या पवनचक्कीची.

" येऊन तर पोहोचलो आपण, " काका म्हणाले. त्यानी जड दार ढकललं तसा त्याचा कुरकुरल्याचा आवाज झाला. दार उघडताच आतून पिठाचा, दिवस-

भर तापलेल्या व आता निवत असलेल्या जात्याचा आणि पाईनच्या रसाचा वास आला.

" इथं कशाला आलो आपण ? " प्रश्न माझ्या अगदी ओठावर आला होता, पण मी तोंड उघडण्याअगोदरच काकांच्या हसण्याचा गडगडाट कानी पडला.

" बापरे ! " युरा घाबरून ओरडला आणि मला चिकटला.

" काही नाही, वाघूळ आहे ते, " पावेलकाका धीमेपणाने म्हणाले, "आपल्याला घाबरावयाला पहातंय. पण आपण थोडेच येवढयाशा तेवढयाशाला घाबरणार आहोत ! "

आत चांगलाच अंधार होता. उंचावर एक अगदी लहानशी खिडकी होती. त्यातून प्रकाशाचा कवडसा आत आला होता; मधूनच तो हलायचा. एखाद्या पार आटून गेलेल्या खोल, शुष्क विहिरीच्या तळाशी उभं राहावं तसं वाटत होतं मला.

" चला जाऊ या, " पावेलकाका म्हणाले.

आमच्या पावलांखाली पायऱ्या करकरत होत्या.

" चल युरा. "

आम्ही एकमेकाना चिकटून एकेक पाऊल सावधगिरीने टाकत पुढे निघालो. आम्ही वरती चढत होतो; पायऱ्या चिरचिरत होत्या; भूत, पिशाच्च, चेटूक सान्यानी भोवती फेर धरला होता, निदान तसं वाटत होतं. आमच्या जंगल प्रदेशातील लोकांचा भुताखेतांवरचा विश्वास फार सावकाशीने नष्ट झाला. दिवसा ढवळया, लखलखीत सूर्य प्रकाशात लहान मुलांच्या भुताखेतांच्या गोष्टींची मी टर उडवीत असे. पण आता त्या मोडक्या जुन्यापुराण्या गिरणीत ऐन मध्यरात्रीच्या काळोखात उभं राहिल्यानंतर मी ऐकलेली भुताखेतांची प्रत्येक गोष्ट माझ्यापुढे जिवंत होऊ लागली. वटवाघळानं पुन्हा एकदा चीत्कार केला. मात्र या वेळी त्याचा आवाज दुसऱ्याच दिशेनं आला. जर माझ्यासमोर पावेलकाका नसते आणि युरानं माझा हात धरलेला नसता तर मी तियून केव्हाच धूम ठोकली असती.

वळचणीपाशी असलेल्या एका लहानशा गवाक्षापुढे काका थांबले. "कुठं आहात रे ? " त्यानी विचारलं आणि हात देऊन आम्हाला वर घेतलं.

खिडकीतून थंडगार बोचरं वारं आत येत होतं.

" मान वर करा आणि आभाळाकडे पहा, " पावेलकाका म्हणाले.

आम्ही त्यांच्या जवळ सरकलो आणि त्यानी सांगितलं तसं केलं, मला वाटतं, काकानी आम्हाला इथे का आणलं हे युराच्या पटकन ध्यानात आलं.

" तारे कसे मोठे दिसतात पहा. चांगले मुठीएवढे दिसतात. "

" होय, युरा. आणि ही आकाशगंगा पाहिलीस ? तुला नीट दिसतंय ना



वाल्या ? "

" दिसते ना ! पुढे...... ? "

काकांच्या आवाजाला लहान वयात असणारी झार आली होती, मला आश्चर्य वाटले.

" मुलानो, किती वेगवेगळी जगं आहेत तिथें. कितीतरी सूर्य आणि कितीतरी ग्रह. प्रत्येक आपापल्या ठरलेल्या वाटेनं जातो. त्यांच्यात काही आपल्या पृथ्वी-सारखेही ग्रह आहेत."

" काय सांगावं ; अगदी या क्षणी त्या एखाद्या ग्रहावरून कोणीतरी आपल्याकडे पहातही असेल, " युरा म्हणाला.

" नक्कीच, " काकाना आता अगदी उत्साह आला होता. " त्याना नक्की वाटत असणार, खाली त्या पृथ्वीवर कसं काय आहे, तिथं काही लोक राहातात की नाही ! नक्की असं वाटत असणार. "

मी अगदी पार हाडांपर्यंत काकडलो होतो कारण अंगात एक पायजमा आणि सुती शर्ट याशिवाय काहीच नव्हतं. युराची स्थिती तर माझ्याहीपेक्षा वाईट होती, तो तर अर्ध्या चड्डीतच आला होता.

" पावेलकाका, " मी नाखुशीनें म्हणालो,

" आकाशगंगा तर गवताच्या गंजीवरूनही दिसली असती. तेवढयासाठी इतक्या लांब तंगडतोड करीत कशाला आलो आपण ? "

" तू म्हणजे मजेदार मुलगा आहेस," काका थोडावेळ जाऊ देऊन म्हणाले. त्यांच्या आवाजातील ती झार निघून गेली होती. " तिथून काय, आपण आकाश-गंगा पाहिली असती, थोडावेळ तिच्यावर बोललो असतो आणि मग सगळं विसरूनही गेलो होतो. पण आता तुम्ही कधी विसरणार नाही. "

युरानं माझ्या हाताला हिसका दिला.

" का ? काय झालं ? " मी विचारलं. तो काहीच बोलला नाही. पण मी समजलो. पावेलकाकाना मी नाराज केलं म्हणून तो दुखावला होता. असं उद्धटा-सारखं बोलून गेल्याबद्दल मीही शरमलो. पण झाली चूक दुरुस्त करण्याचा मार्ग काही सुचेना.

सुदैवाची गोष्ट म्हणजे काका काही मनात धरून ठेवणारे नव्हते. दोन्ही हात लांब करून त्यानी आम्हाला दोघांना अगदी जवळ घेतलं. मग आमच्या खांद्यावर हात ठेवले. आम्ही तिघंही निळ्या आभाळाचं आणि ताऱ्यांचं निरीक्षण करायला लागलो.

एक म्हण आहे; जूनमधल्या रात्री चिमणीच्या चोचीपेक्षा लांब नसतात. लवकरच आकाश-गंगेचा रंग फिका होऊ लागला. वसंत ऋतूत खळाळणाऱ्या

ओढचानं, अगोदरच पातळ झालेले बर्फाचे थर पार वितळवून टाकावेत तसे आकाशगंगेत विखुरलेले तारे भराभर नजरेसमोरून वितळू लागले. हाताच्या बोटावर मोजता येतील येवढेच तारे शिल्लक राहिले. उगवतीची कडा तांबूस झाक दाखवू लागली.

खेड्याच्या दूरच्या टोकाला धनगराने शिंग फुंकलें, वाऱ्याबरोबर त्याचा आवाज लहरत लहरत आमच्या डोक्यावरून निघून जात, निळसर काळसर जंगलात विरून गेला.

"घरी जायची वेळ झाली," काकानी सुस्कारा टाकला.

जिन्याच्या डुगडुगत्या, चिरचिरणाऱ्या उभ्याच्या उभ्या पायऱ्या आम्ही उतरून आलो. आता आम्हाला भीतो वाटली नाही. चढताना उगीचच वेड्यासारखे भ्यायलो असं वाटायला लागलं.

आई गाईला बाहेर काढत होती. आमचे अवतार पाहून ती चमकली. "या निशाचरानी कुठे मोहीम काढली होती ? आता थांबा जरा तुम्ही. बाबाना ऐक देत एकदा तुमचा पराक्रम," ती विनोदानं दटावू लागली.

"श् श् ! एक शब्द बोलायचा नाही याबद्दल," पावेलकाकानीच तिला दटावलं. काही तरी कट करावा तसे काका पुढे आणि आम्ही दोघे मागे असे अगदी चोरपावलानी गवताच्या गंजीकडे निघालो. पाच मिनिटात आम्ही अगदी गाढ झोपी गेलो.

आठवडा सरता सरता केव्हातरी मी एकटाच गिरणीत जाऊन तारे पाहून आलो. पावेलकाका आणि माझा भाऊ बरोबर नव्हते म्हणून म्हणा किंवा मी कुठे जातोय् कशासाठी जातोय् हे अगोदरच माहीत असल्यामुळं म्हणा, त्या रात्रीची सर पुन्हा केव्हाही आली नाही. ; काहीतरी नवं शोधतोय ही उत्कंठा तशी पुन्हा अनुभवाला आली नाही ; या अफाट विश्वातल्या अनंत गूढांशी माझे काही नाते आहे ही जाणीव त्या पहिल्या रात्रीसारखी पुन्हा माझ्या अंतरात्म्याला कधीही स्पर्शून गेली नाही.

मी गिरणीतून बाहेर पडलो तेव्हा माझा काहीसा अपेक्षाभंगच झाला होता. तारे लहान वाटत होते, तेज मंदावले होते. मी शान्त, निर्विकार होतो; मनात कुठंही काहीही हललं नाही.

मला माहीत आहे, युराही तिथं अनेकदा गेला; कधी कधी एकटाच– (तिथं जायचा रस्ता किती भीतीदायक आहे हे मला चांगलंच माहीत होतं) तर कधीकधी इतर मुलाना बरोबर घेऊन. त्याचं माझ्या उलट झालं. त्या पवन-चक्कीची, पिठाच्या गिरणीची आणि युराची चांगलीच दोस्ती जमली.

□ □



## ७ : लढाईला तोंड लागले...

शनिवारची दुपार होती. क्लुशिनोमध्ये अचानक कुठून तरी जिप्सी लोकांचा एक तांडा प्रगट झाला. त्यांचं बिऱ्हाड, बाजबाजलं लांब लाकडी वॅगनमध्ये भरलं होतं. वॅगनचे घोडे गावच्या रस्त्यावरून खडखड आवाज करीत धावत गेले व बाहेरच्या कुरणात थांबले त्यानी तळ दिला ते ठिकाण आमच्या घरापासून फारसं दूर नव्हतं.

गवत कापून मी नुकताच परत आलो होतो. उन्हाळ्याच्या सुट्टीत सारी शाळकरी मुलं सामुदायिक शेतावर काम करीत. युरा मासे पकडायला गेला होता. आम्ही दोघं आई–बाबांची वाट पहात बाहेरच्या पडवीत बसलो होतो. झोया स्वयंपाक घरात माशांचा रस्सा बनवीत होती. युरानं त्या दिवशी चांगले मासे पकडून आणले होते.

त्या दिवशी फारच उकाडा झाला होता. सूर्य चांगला भाजून काढीत होता. पडवीत आम्ही सावलीला बसलो होतो.

थोड्याच वेळात त्या जिप्सींनी घोड्यांवरली खोगिरं उतरवली. पहाता पहाता कुरणात भूछत्रांसारखे तीन तंबू उगवले. फाटक्या सुती कापडाचे बनवले होते ते.

ती सारी मिळून १५, २० जणं होती. रंगाने काळसर; पुरुषांचे केस कुरळे आणि बायकांची नाकं लांब; हातात तान्ही मुलं. सारेजण तळ वरून बाहेर पडले.

"इकडेच येताहेत ते," युरा म्हणाला.

आणि खरंच, थोड्याच वेळात ते आमच्या फाटकापाशी येऊन उभे राहिले. करड्या दाढीचा आणि सुरकुतलेल्या चेहऱ्याचा एक माणूस पुढे झाला व पडवी-पर्यंत आला. मोठ्या आदबशीरपणे त्याने आपली गवताची टोपी काढून हातात हातात घेतली आणि घोगऱ्या आवाजात म्हणाला, "कसं काय, ठीक ? जरा विहीरीवरून पाणी घेऊ का ?"

"विहिरीवर सांखळी, बादली आहे; आत भरपूर पाणी आहे."

युरा ताबडतोब उठला, पळतपळत आत जाऊन टिनचा एक मोठा कप घेऊन आला. "पोटभर पाणी प्या," तो म्हणाला.

"फार, फार आभारी आहे."

ते जिप्सी पाणी पीत होते आणि आम्ही मोठ्या कुतूहलानं त्यांच्याकडे पहात होतो; प्रथम तो म्हातारा माणूस पाणी प्याला, सावकाश आणि आदबशीरपणे. मग मोठी पुरुषमाणसं, मग लहान पुरुषमाणसं; सगळ्या पुरुषांचं पाणी पिऊन झाल्यावर मग त्यानी तो कप बायकांच्या स्वाधीन केला.

त्या साऱ्यानी विहिरीतल्या निर्मळ थंडगार पाण्याची स्तुती केली. मग त्यानी टिनचा कप विहिरीच्या कट्ट्यावर ठेवला आणि ते गावात गेले.

त्यांची पाठ वळते तोच बाबा आले. रणरणत्या उन्हातून चालत आल्यामुळं ते घामाघूम झाले होते, जीव कासावीस झाला होता. विहिरीपाशी त्यांची पावलं थबकली. बादलीतून त्यानी कप भरून पाणी घेतलं आणि ओठाजवळ नेलं.

"आता त्या कपानं जिप्सी पाणी पिऊन गेले," युरा म्हणाला.

"आपण सारी माणसंच आहोत," बाबा अगदी सहज बोलले आणि पाणी प्याले. उलटच्या हातानं त्यानी तोंड पुसलं आणि म्हणाले, "युरा, झोयाला घाई कर जरा. लवकर पानं मांडायला सांग. आज अजून पुष्कळ काम पडलं आहे. आई घरी आली का?"

दंव सुकायच्या आत गवत कापावं, अशी एक जुनी म्हण होती.

गवत कापून कापून माझ्या हातात गोळे आले होते. दोन्ही हात– जास्त म्हणजे उजवा ठसठसत होते. आम्ही पहाटेच कुरणात आलो होतो, आता सूर्य अगदी माथ्यावर आला होता. सावली पायाखाली आली होती. दव केव्हाच सुकून गेलं होतं पण आम्ही भराभरा कोयते चालवीत होतो. तो सारा लांबलचक पट्टा आम्हाला संपवायचा होता. सामुदायिक शेतावरची अनुभवी माणसं आमच्या पुढ्यात काम करीत होती. शीण, थकावट या शब्दांचे अर्थ त्याना बहुधा माहीत नसले पाहिजेत.

भुवयांवरचा घाम खाली गळू लागला; सूर्यप्रकाशाने रापलेले माझे खांदे दुखू लागले. आई सकाळी चांगली बदकाची चरबी चोळून देत होती तर मी तिला चोळू दिलं नाही. चोळू दिलं असतं तर बरं झालं असतं.

एक उंच सडसडीत म्हातारा माणूस आमच्या गटाचा मुख्य होता. तो काही थकल्यासारखा दिसत नव्हता. शेवटी एकदाचं त्यानं ओरडून जाहीर केलं, "सुट्टी"



मोठी माणसं आणि लहान मुलं तिथंच गवतावर आडवी झाली. चिलीम हातातहातातून फिरू लागली माझ्याही मनात तीव्र इच्छा उसळून आली, आपणही एकादी चिलीम पेटवावी आणि कडक, कडवट गावरान तंबाखूचे एकदोन चांगले खोल झुरके ओढावेत. तो मोह फार जबरदस्त होता. पण बाबाना कळल्यावर माझी धडगत राहिली नसती. तसाच गवताला पाठ लावून काण्या डोळ्यानं सूर्याकडे पाहू लागलो. बहुधा तो वर्षातला सर्वांत मोठा, सर्वात जास्त उकाड्याचा दिवस असावा. उन्हाळा अर्ध्यावर आला होता. गावात गवतकापणी सुरू झाली की सारीजण काळवेळ विसरून जायचे. त्याच दिवसाचं पहा. तो रविवार होता पण झाडून प्रत्येकजण कामाला लागला होता.

"अजून पाच दिवस जर हवा अशीच राहिली तर हे गवताचं सारं काम आवरेल," आमच्या गटाचा प्रमुख म्हणत होता, ' जनावरांची हिवाळ्याची निचिंती होईल. गवत केवढं उंच वाढलंय पहा."

आणखी पाच दिवसानी काय होणार होतं? आम्ही इतके दिवस गवत कापीतच होतो. सुरवाती–सुरवातीला मला ते श्रम फार जड गेले पण शेवटी मला ते काम नीट जमायला लागलं.

"ज्यांची घरं जवळ असतील त्यानी घरी जाऊन जेवून यायला हरकत नाही," गटप्रमुखानं सांगितलं.

आमचं घर तर एका हाकेच्या अंतरावर होतं. शिवाय जेवणाची सुट्टी चांगली मोठी होती. मी विळा गवतावर टाकला आणि घरी पळालो. खरं म्हणजे मला काही फारशी भूक लागली नव्हती; पेलाभर थंडगार दुधानं माझं काम भागलं असतं.

आदल्या दिवशी जिप्सी लोकांनी जिथं तळ ठोकला होता त्या मैदानातूनच माझी वाट होती. रात्रीच्या रात्री ते मुक्काम संपवून केव्हा निघून गेले कोणाला पत्ताही लागला नाही. ज्या ठिकाणी त्यानी शेकोटी पेटविली होती ती जागा जळून काळसर झाली होती. काही चिंध्या, कागद आणि घोड्यानी तुडविलेले गवत एवढ्याच त्यांच्या निशाण्या मागे उरल्या होत्या.

रात्र सरेल अन् पहाट फुटेल
प्रियतमे, मीही दूर जाण्यास निघेन.
जिप्सींच्या तांड्याबरोबर
भटकंतीसाठी, मीही दूर जाण्यास निघेन.

मला जमेल तेवढं चांगलं गाण्याचा मी प्रयत्न केला. उन्हानं आणि तहानेनं ओठ सुकून गेले होते. मला वाटलं, जिप्सींच्या तांड्यात सामील होऊन जगभर भटकंती करण्यात केवढी अपूर्वाई असेल. त्याना किती गावं, किती शहरं पहायला

मिळत असतील; किती नानाप्रकारच्या व्यक्ती आणि वल्ली भेटत असतील; त्या साऱ्या जणांचे जीवनमार्ग किती वेगवेगळे असतील. उन्हाळ्यात जिप्सींबरोबर पदयात्रेला निघावं आणि हिवाळ्यात घरी परत यावं. मग त्या अद्भुत, सुरस व चमत्कारिक गोष्टी पावेलकाका मला सांगण्याऐवजी मीच त्यांना सांगेन.

बाबा सोडून बाकी सर्व मंडळी घरी आली होती.

युरा आणि बरीस जमिनीवर बसले होते. युरानं पुस्तक उघडून धरलं होतं.

" माझ्या मागोमाग म्हण, " तो बरीसला सांगत होता.

" क्लिम बोरोशिलोवला
पाठवलं मी एक पत्र... ..... "

अभ्यासाकडे बरीसचे लक्ष जेमतेमच होते; सारखा मान वळवून इकडे तिकडे बघायचा; खिडकीतून चोरून बाहेर पहायचा. खिडकीच्या तावदानावर नारिंगी रंगाचं एक फुलपाखरु सावधगिरीनं फिरत होतं.

' चल, चल, म्हण माझ्या मागोमाग, " युरा नाराज झाला होता, " नाही म्हणालास तर व्यायाम करावा लागेल. "

आई आणि झोया टेप आणि कात्री घेऊन काम करण्यात गर्क झाल्या होत्या. आईच्या जुन्या फ्रॉक मधून धाकट्या दोघांना दोन चड्ड्या शिवण्याचे काम चालले होते.

" छे! अगदी दमलो बुवा आपण, " म्हणत मी बाहेरच्या बाकावर बसकण घेतली.

झोया तशी तिखट जिभेची. तिनं लागलीच फटका दिला, " बरं, बरं, फार शेखी नको मिरवूस. जेवल्यानंतर आम्ही सुद्धा कुरणात येणार आहोत, कापलेलं गवत लावून ठेवायला. "

" पण गवत कापणं आणि गवत लावून ठेवणं यात फरक आहे. "

बाहेर पावलं वाजली- बाबा आले होते. ते इतक्या घाईगर्दीत का दिसत होते? दरवाजा ताडकन् उघडला गेला. बाबा उंबरठ्यावर उभे होते. श्वास घ्यायलासुध्दा ते थांबले नाहीत. घोगऱ्या आवाजात त्यानी सांगून टाकले :

" लढाईला तोंड लागलंय्. "

कोणी एक शब्दही बोललं नाही. घरात एकदम अचानक शांतता पसरली. मुलाबाळांच्या घरात अशी शांतता आढळणं कठीणच. मग माझ्या लक्षात आलं; आई रडत होती एका स्टुलावर बसून ती मुकाट्यानं रडत होती, डोळ्याच्या कडा हमालाच्या टोकानं टिपीत होती.

पुढचं मला अगदी स्पष्ट आठवतंय्. युरा आणि बरीस हळूच उठले. पावलांचा आवाज न करता तिच्या जवळ जाऊन दोन्ही बाजूला दोघे घट्ट चिकटून



उभे राहिले. तिनं त्याना जवळ ओढून घेतलं आणि घट्ट धरून ठेवलं.

" त्या नाझींना सपाटून मार खावा लागेल! लाल सेना त्याना चांगलं पाणी पाजेल! " मी उगीचच उत्तेजित होऊन जरा जादाच दाखवायला गेलो. आई रडत होती म्हणून मला बरं वाटलं नाही. पण माझ्या बोलण्यात दम नव्हता पोकळ वाटलं. त्या शब्दानी कोणालाच दिलासा मिळाला नाही.

" लढाई चांगलीच जुंपली आहे, " बाबा म्हणाले, " जर्मनानी आपल्या, कितीतरी शहरांवर व गावांवर बॉम्ब टाकलेत. त्यानी आपली सरहद्द ओलांडली आहे. आताच रेडियोवर मोलोटोव यांचं भाषण झालं. " ते थोडा वेळ थांबले. मग टेबलापाशी जाऊन एका स्टुलावर बसले आणि त्यानी हातानी डोकं दाबून धरले; म्हणाले, " मला बरं वाटत नाही. डोकंही दुखतंय्. हुडहुडी भरलीय्."

झोया थर्मामीटर आणायला धावली. " जरा ताप पहा बरं " ती म्हणाली.

बाबानी तिचा हात बाजूस सारला. " असू दे. उतरेल तो आता. जरा टेकतो थोडा वेळ. उन लागलंय. "

" म्हटलं ना, जरा ताप पहा म्हणून " झोयानं आपलं सांगणं सोडलं नाही. तिच्या अंगी चिकाटी होती.

" पहा, कितीतरी ताप आलाय. "

पण बाबाना तिचं बोलणं ऐकूही आलं नसावं. त्याना झोपेनं घेरलं होत. बहुधा ते बेहोश झाले असावेत.

आई उठली आणि तिनं युराला आणि बरीसला बाहेर जायला सांगितलं; ' मुलानो, जा बाहेर जाऊन खेळा. मी हाक देईन तेव्हाच आत या. आणि हे पहा, तुमच्या वडिलांच्या जवळ जाऊ नका. "

मुलं बाहेर पडली अन् घराचं दार बंद झालं आईचे डोळे आता कोरड झाले होते. तिच्या नेहमीच्या मृदू वागणुकीत आणि आदबशीर हालचालीत बदल होऊन त्यांची जागा एक प्रकारच्या खंबीर निर्णायक वृत्तीनं घेतली होती. ही वृत्ती आमच्या ओळखीची नव्हती. " टायफस झालाय् त्याना," ती म्हणाली, " १९२२ मध्ये आपलं सारं घर त्याच्या साथीत सापडलं होतं. वाल्या, अध्यक्षांकडे जा आणि घोडा-गाडी मागून आण. बाबाना झात्स्कला न्यायला हवं, "

झात्स्कचा प्रवास दूरचा आणि कंटाळवाणा होता. बाबांच्या बरोबर मी आणि आई होतो. युद्ध सुरू झाल्याची बातमी आणि बाबांचं आजारपण! एका-पाठोपाठ एक आलेल्या या संकटानी आम्ही मोडून गेलो नाही परंतु दडपलो गेलो. कोणतंही काम करून आला नसता इतका थकवा त्यामुळे आला, त्याने आम्हाला अगदी निस्त्राण करून सोडले.

" काय वाढून ठेवलंय् पुढचात काय सांगणार ? " आई मधूनमधून सारखी म्हणायची. " काही असू देत, आपले सैनिक त्याना भारी आहेत. लवकरच आपण नाझींना हरवू, " तिला धीर देण्यासाठी मी म्हणत असे.

" मुला, तोपर्यंत काय होईल आणि काय नाही. लढाई म्हणजे काय तुला अजून माहीत नाही. पण मला पहिलं महायुद्ध आणि यादवी युद्ध चांगलं पक्कं आठवतंय्. मी जरी त्यावेळी लहान होते तरी मलाही माझ्या दुःखाचा आणि शोकाचा वाटा उचलावाच लागला."

बाबा कण्हत होते, पाणी, पाणी करीत होते. क्षणात त्याना ताप चढे, क्षणात ते थंडगार होत; मधूनमधून सारखे बेहोश होत. शेवटी एकदाचे आम्ही दवाखान्यात जाऊन पोहचलो.

बाबाना सांसर्गिक रोगांच्या विभागात ठेवले. तो वॉर्ड पहिल्याच मजल्यावर होता. मी खिडकीपाशी जाऊन त्याना कुठं ठेवलंय् ते पाहू लागलो; गाल तावदा-नाला चिकटवून आतलं निरीक्षण करू लागलो. खिडकीच्या अगदी जवळच्याच कॉटवर तो म्हातारा जिप्सी होता. आदल्याच दिवशी गवताची टोपी घालून तो आमच्याकडे आला होता, आमच्याशी बोलला होता. त्याचा चेहरा खिडकीच्या बाजूलाच वळला होता. त्याची अस्पष्ट नजर माझ्यावर रोखलेली होती. पण त्यानं मला ओळखलं नाही. बहुधा त्यानं मला पाहिलंही नसावं.

क्षणार्धात माझ्या नजरेसमोर विहिरीच्या कट्ट्यावर ठेवलेला तो टिनचा कप आला; बाबा बादलीतून कप भरून काढीत होते आणि गटागटा पीत होते. !

☐ ☐



# ८ : दारावरून वाहणारा निर्वासितांचा लोंढा

युध्द नुकतंच कुठे सुरू झालं होतं. तरीही रात्रंदिवस आमच्या घरावरून जाणाऱ्या रस्त्यावरून, पश्चिम सरहद्दीवरील प्रदेशातून येणाऱ्या निर्वासितांची नुसती रीघ लागली होती.

याच्या अगोदर आम्ही इतके लोक कधीही पाहिले नव्हते. म्हातारे कोतारे तरूण बायका आणि तान्ही मुलं, मुलं-मुली सारी त्यात होती. अर्थातच मुलांचा व स्त्रियांचा भरणा जास्त होता. श्रमांनी शिणलेले चेहेरे धुळीनं माखून गेले होते. बहुतेक मोठ्या माणसांच्या आणि मुलांच्या सुद्धा पाठीवर कशीबशी बांधलेली छोटी छोटी गाठोडी होती. घरावर बॉंबवर्षाव सुरू झाल्यावर हाती लागेल ते गाठोड्यात कोंबून ते निघाले होते. त्यात काही आवश्यक तर काही अनावश्यक गोष्टीही होत्या. खेड्यातल्या उंबरापाशी थांबून ते निर्वासित आपल्या जवळची एखादी वस्तु देऊ करीत व अन्न मिळेल का म्हणून विचारीत. परंतु सामुदायिक शेतावरच्या बायका त्याना ब्रेड, दूध आणि अंडी देत, त्याबद्दल काहीही घेत नसत. कधी कधी त्या मानवी प्रवाहात एखादी गाडी दृष्टीस पडे. एखादं मरतुकडं घोडं जिवाच्या आकांतानं गाडी ओढीत असे. लगाम हाती धरून एखादा सुदैवी ड्रायव्हर बसलेला असे ; त्याचे पायी प्रवासाचे श्रम वाचलेले असत. गाडीत भुकेल्या मुलांचा घोळका दाटीवाटीनं भरलेला असे.

पांढरा रूमाल बांधलेली व फिका लिंबोळी पोशाख घातलेली एक तरूण मुलगी पुरुषांच्या सायकलवर बसली होती. रॅकवर, धोब्याचे कपडे ठेवतात तो मोठा बांबूचा पेटारा लावलेला होता. प्रत्येकजण अगदी सावकाश चालत होता. त्यामुळे त्यांच्याबरोबर चालताना तोल सांभाळणं तिला जड जात होतं. तिनं खाली उडी मारली आणि ती सायकल हातात धरून सर्वांच्या बरोबर चालू लागली. सायकल मोठी आणि जड होती. ओझ्याखाली दबल्यामुळं मागचं चाक सारखं वेडंवाकडं फिरत होतं.

लांब करडया केसांचा एक म्हातारा माणूस हातगाडी ढकलीत होता. तिला लोखंडी चाकं होती. गाडीत एक बोचकं होतं आणि त्यावर सेलर सूट घातलेला एक लहान मुलगा बसला होता. त्याच्या जाकिटावर 'नांगर' होते. आणि टोपीच्या पट्टीवर "कासिन" ही चंदेरी अक्षरं होती. झोप नसल्यानं म्हाताऱ्याचे डोळे लालभडक झाले होते. त्याने ओठ दाबून धरले होते. मुलगा साशंक नजरेने आवती भोवती पहात होता. ती आजोबा-नातवाची जोडी होती हे उघडच होत.

काळे पोशाख घातलेल्या दोन म्हाताऱ्या जोगिणी चालल्या होत्या. त्यांनी अगदी डोळ्यापर्यंत रूमाल ओढून घेतले होते.

मागोमाग आल्या अनाथ, पोरक्या मुलांच्या रांगा. सारी १०-१२ वर्षांच्या आसपास होती. त्यांचे केस अगदी बारीक ठेवलेले होते. ते चालत होते म्हणण्यापेक्षा कसेबसे स्वतःला ढकलीत होते म्हणणंच अधिक बरोबर झालं असतं. रांगेच्या सुरवातीला एक मध्यम वयाची शिक्षिका आणि एक मिशावाला माणूस ही चालत होती. त्यानं सैनिक घालतात तसा शर्ट घातला होता, बाही मोकळी होती. तो मधूनमधून सारखा मागे वळून पाही आणि घोगऱ्या, बसलेल्या आवाजात ओरडून सांगे, "रांगा नीट धरा." मुलं लागलीच आज्ञाधारकपणानं रांगा सांभाळून पाय जरा झपाझपा उचलू लागत; कसेबसे पुढच्या मंडळींना गाठत आणि पुन्हा मागे पडू लागत.

आम्हाला विहिरीजवळ जाऊन पोहचणं मोठ मुश्किल झालं होतं. काही निर्वासित सफरचंदांच्या झाडाखाली विसाव्याला टेकत; बसल्या बसल्या अगर रेलून ते शिळ्या पावाचा तुकडा चघळीत. इतर काहीजण केवळ तहान भागविण्यासाठी विहीरीवर येत. संध्याकाळी विहिरीतल्या पाण्यानं तळ गाठलेला असे. बादली उपसली की तिच्या तळाशी बोटभर उंचीचा रेंदा निघे.

आई घरी असली की धावत धावत बाहेर येई. हातात दुधाची चरवी असे. ती म्हणे, "बाबानो, जरा मुलांच्या तोंडी काही लागू द्या. कोण गावचे तुम्ही?"

"ग्रोद्नोहून आलोत," कोणी सांगे.

"आम्ही मिन्स्कहून आलोत, आई," दुसरं कोणी बोले.

"आम्ही ब्रेस्टचे. ब्रेस्टचं नाव तुम्ही नक्कीच ऐकलं असणार. पोलिश सरहद्दीवर आहे ते."

तो मानवी लोंढा वाहातच होता. लोक थकले होते, भुकेनं कळंजून गेले होते. निर्वासितांच्या डोळ्यात पाणी नव्हतं. त्यांच्यापैकी कोणीच रडत नव्हतं. अगदी लहान मुलं तेवढी उन्हाळयानं कासावीस होऊन, तहानभूक अनावर होऊन रडत होती. फॅसिस्टांनी आपल्या गावावर केलेल्या बॉम्बहल्ल्याची, घरावर बॉम्ब पडून ते बेचिराख झाल्याची, मोटारसायकलींवर असलेल्या जर्मन सैनिकांनी त्यांचा पाठलाग



केल्याची, आणि सरळ सरळ गोळ्या झाडून जीव घेतल्याची हकिकत त्यातली मोठी माणसं सांगू लागली की त्यांच्या दुःखीकष्टी चेहेऱ्यांवर संताप दिसू लागे.

"ते फॅसिस्ट माणसात जमा नाहीत," बायका म्हणत, "नाही! माणसं नाहीत ती!"

रस्त्याला उसंत नव्हती, रात्रंदिवस वाहातच होता. ही बेघर, हालअपेष्टांच्या फेऱ्यात सापडलेली माणसं आपली वेदना, शोक आणि शत्रूबद्दलचा त्वेष रशियाच्या अगदी खोल गाभ्यापर्यंत नेऊन पोहोचवीत होती.

त्याना प्रथम पाहिलं ते आईनं, खिडकीतून. "युरा, ती बाई मुलाना घेऊन चाललीय पाहिलस का—? जा, त्याना घरात बोलावून आण."

एक सडपातळ बाई विहिरीपाशी थांबली होती. युराच्या आणि बरीसच्या वयाचीच दोन लहान मुलं तिला खेटून उभी होती. दोन-तीन वर्षांची एक मुलगी गाढ झोपी गेली होती. बाईच्या पाठीवर झोळी होती, तिची गाठ मानेपाशी बांधली होती. झोळीत मुलगी झोपली होती. तिला धड वाकताही येईना. शिवाय दोन्ही बाजूला दोन मुलं. बादलीतून पाणी काढून पिण्याचा तिचा प्रयत्न चालला होता आणि ते काही जमत नव्हतं.

काहीशा संकोचानं ती सारी आत आली. युरा त्यांच्या पुढे होता. त्यानं मोठ्या मुलाचा हात धरला होता.

"कसं काय?" ती बाई हळूच म्हणाली, "तुझ्या मुलानं आम्हाला आत बोलावून आणलं"

"या, बसा. तू शाल काढून ठेव आणि मुलीला बिछान्यावर झोपव. मुलाना सांग टेबलापाशी बसायला."

आईचं काम चटाचट चाललं होतं. तिनं झोयाला दूध आणि खारवलेलं मांस आणायला सांगितलं. चुल्यावरून तिनं कोबीच्या रस्श्याचं भांड उतरवलं आणि ती ब्रेडच्या जाड जाड फाका कापू लागली.

दोन्ही मुलं अशक्त होती, बुजली होती. घरात पाऊल टाकल्यापासून त्यांच्या तोंडून एक शब्दही फुटला नव्हता. क्षणभरही ते एकमेकांपासून दूर झाले नव्हते. टेबलापाशीही ते जवळजवळ बसले आणि काहीशा अस्वस्थतेनंच त्यानी चमचे उचलले.

"चला बाळानो, दोन घास खाऊन घ्या," आई त्याना समजावीत म्हणाली, "खाऊन खाऊन तुमच्या पोटाला तड लागलीय असा काही प्रकार दिसत नाही."

"थकून गेलीत अगदी," त्यांची आई म्हणाली, "आम्ही लिथुआनियातून अगदी पायी इथपर्यंत आलो आहोत. रस्त्यावरसुद्धा नाझींच्या मशीनगन धडधडतच होत्या."

" मुलानो, खरच खाऊन घ्या थोडसं, " आई पुन्हा समजावणीच्या स्वरात म्हणाली. मग त्यांच्या आईकडे वळून म्हणाली, " तूही काही संकोच करू नकोस. थोडीशी ब्रेड खाऊन घे. "

चुल्यापाशी उभा राहून युरा त्या दोन्ही मुलांकडं टक लावून पहात होता. अचानक उठून तो टेबलापाशी गेला आणि एक चमचा उचलून म्हणाला, " मी जरा मदत करतो." त्यानं चमचा भरून रस्सा घेतला, ब्रेडचा एक मोठा तुकडा तोंडात कोंबला आणि म्हणाला, " असं खात असतात."

त्या दोन मुलानी त्याचं निरीक्षण केलं आणि खायला सुरुवात केली.

आई दाराशी बाकावर बसली होती. हातावर गाल टेकून ती त्या बाईकडे आणि दोन मुलांकडे उदास नजरेने पाहात होती. मग ती म्हणाली, " आजची रात्र इथे राहा अन् आराम करा. मग सकाळी तुम्हाला निघता येईल."

एव्हाना मुलांचं खाणं झालं होतं. दोघेही टेबलावरून एकदमच उठले आणि एकाच सुरात म्हणाले, " थँक यू. " युरा आणि बरीस त्याना फळबागेत घेऊन गेले. आम्ही घरातच बसलो आणि ती बाई आपल्या प्रवासाची हकिकत सांगत होती ती ऐकू लागलो.

" आमच्या छोट्याशा गावावर बॉम्ब पडायला सुरुवात झाली तेव्हा पहाटेचे चार वाजले असावेत. मी मुलाना पकडलं आणि तीरासारखी घराबाहेर पडले. तेव्हापासून आम्ही चालतोच आहोत. आपले लोक फार दयाळू. दुसऱ्याचं दुःख त्याना दुखावतं. नाहीतर मी काय केलं असतं ? मुलांच्या तोंडी दोन घास कुठून घातले असते ? "

आईनं मान हलवली. ती बोलू लागली तेव्हा तिच्या आवाजात खिन्नता होती ; " तुझ्याजवळ सामान सुमान काहीच दिसत नाही आणि मुलांचे वडील कुठे आहेत ? "

" सैन्यात आहेत ते. युद्धाला तोंड लागण्यापूर्वीच त्याना आघाडीवर कुठे तरी जाण्याचा हुकूम आला. "

" तुला हे सारं फार जड जाईल. अजून लहान आहेस तू आणि या तीन मुलाना सांभाळायचंय् तुला. "

" ही मुलगी माझी नाही. शेजारणीची आहे. ती आणि तिचा नवरा दोघेही मारले गेले, ही एकटीच उरलीय्. "

" फार भयंकर आहे हे सारं ! खरंच, तुमच्यामध्ये फक्त तिचेच केस काळे आहेत. युध्द सुरू होऊन केवढं तरी रक्त सांडून गेलं आणि तोवर आम्हाला इथं त्याचा पत्ताही लागला नव्हता. मी म्हणते, तुम्ही आता इथंच आमच्या गावात रहा. आमच्या घरात तुम्ही सहज राहू शकाल; होईल तेवढी जागा. "



ती बाई जराशी थांबली आणि मग मान हळवून म्हणाली, " खरंच तुमचं मन फार कनवाळू आहे. पण मला वाटतं ते इथंही येतील. "

" खरंच का तुला असं वाटतं ? "

" हो ! ती कल्पना सुध्दा भयानक आहे. माझे आईवडील ताम्बोवला राहातात, त्यांच्याकडे निघालोय आम्ही. "

त्याचवेळी युरा पळतपळत घरात आला. तो अगदी नाराज झाला होता; आपले नवे मित्र लढाई लढाई खेळायला तयार नाहीत म्हणून आईला सांगायला आला होता.

" बाळ, लढाई लढाई नका खेळू. दुसरं खेळा काही तरी," ती बाई म्हणाली, तिच्या स्वरातून खिन्नता ओसंडत होती.

आई रागाला आली, " तुझे ते लढाईचे खेळ बंद कर आता. मोठा आलाय् शूर शिपाई."

युरा जागच्याजागी खिळला. आईचा रागाचा शब्द त्याच्या ओळखीचा नव्हता. त्यानं घराबाहेर धाव घेतली आणि ओरडून म्हणाला, " ठीक आहे. आम्ही लपाछपी खेळतो."

रात्री आमचे अवचित अतिथी जेव्हा गाढ झोपी गेले होते तेव्हा आईनं आणि झोयानं बसून त्या मुलीसाठी फ्रॉक शिवला. तिच्या अंगावर, मुलं घालतात तसा फक्त शर्टच काय तो होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या बाईनं आमचा जेव्हा निरोप घेतला तेव्हा आई सामुदायिक शेतावर कामाला गेली होती. बाईचा निरोप घेताना ती म्हणाली, " कोणी सांगावं ? योग असला तर पुन्हा गाठीभेटी होतीलच."

झोया, युरा, बरीस आणि मी चौघेही त्याना वाटे लावायला गेलो होतो. ती सारीजणं नजरेआड होईपर्यंत आम्ही त्यांच्याकडे टक लावून पाहात होतो. बाई वारंवार मागे वळून पाहात होती, मुलंही तेच करीत होती. दर वेळी आम्ही हात उंच करून हलवत असू. उत्तरादाखल तीही हात उंचावून हलवत असत.

तेवढ्यात युराने घरात धाव घेतली आणि एक ब्रेड आणि खारवलेल्या मांसाचा एक मोठा तुकडा घेऊन तो बाहेर आला. " प्रवासात आपण त्याना काहीच बरोबर दिलं नाही. आता गाठतो त्याना," असं म्हणत त्यानं जोरात धूम ठोकली; त्याच्या पावलानी मागे धुरळा उसळला.

लढाई सुरू होण्याअगोदर अलीकडे अलीकडेच झालेल्या एका संभाषणाची आठवण करीत युरा म्हणाला, " वाल्या, लढाई अशी असते का ? तू तर सांगितलंस, शिपाई एकमेकांवर बंदुका आणि तोफा उडवितात म्हणून. "

" मला वाटतं लढाई अशी सुद्धा असते, युरा ! "

तो माझ्यापेक्षा नऊ वर्षांनी लहान होता. मी त्याला त्यापेक्षा आणखी काय सांगू शकणार होतो ? त्याच्या आणि आमच्या खेडेगावच्या दृष्टीनं मी आता जाणता झालो होतो. पण युद्ध म्हणजे खरोखरीच काय असतं याची मला काहीही कल्पना नव्हती.

ती बाई येऊन गेल्यापासून आमची मनं अस्वस्थ झाली. पूर्वी मला वाटत होतं – मला एकट्यालाच नाही तर इतर अनेकानाही – की जर्मन आत येताच त्याना आडवलं जाईल आणि सरहद्दीबाहेर घालविण्यात येईल. पण आता पुसटशी शंका डोकावू लागली, आणि शंकेमागोमाग भीतीही. जर्मन खरोखरीच जर आमच्या गावापर्यंत येऊन भिडले तर ? आम्हालाही जर काखोटीला गाठोडी बांधून प्रवास सुरू करावा लागला तर ? मुक्कामाला कुठं जायचंय् हे माहीत नसताना. ?

युरात पहाता पहाता विलक्षण फरक पडला. पूर्वीचा खोडकर, खेळाडू युरा जवळ जवळ अदृश्यच झाला. आता त्याच्या चेहऱ्यावर कधीतरी चुकूनच हसू उमटे. तो गंभीर आणि अबोल झाला. सारा वेळ तो पडवीत नाहीतर विहिरीच्या भोवताली असे. निर्वासिताना ब्रेड, उकडलेले बटाटे, साखर, दूध आणि काकड्या नेऊन देण्याचे काम करीत असे.

रस्त्याने जाणाऱ्या घोळक्यात थकली भागली, भुकेली मुलं दिसली की युरा त्याना पुष्कळदा आत बोलावी.

" युरा समजदार व्हायला लागला आहे." आई म्हणाली, त्याची दयाळू वृत्ती आणि दुसऱ्याबद्दल त्याला वाटणारी कणव पाहून आईचं मनं निवालं होतं.

त्या दिवसात आमच्या उंबरठ्यावर किती निर्वासितांची पायधूळ झडली असेल ते मला काही सांगता येणार नाही.

लढाई चालू असताना आणि लढाई संपल्यावर देखील पुन्हा आम्हाला त्या बाईची आणि त्या मुलांची चुकून एकदासुद्धा काही बातमी मिळाली नाही. नशिबानं त्याना हात दिला की दाखविला ? त्याना ताम्बोव गाठता आलं का ?

का तो प्रवास म्हणजे........ विचारानेच मी शहारलो– त्यांचा अखेरचाच प्रवास ठरला ?

अनेकदा माझ्या मनात त्यांचा विचार येतो... ..

□ □



## ९ : गावची जनावरं हलवली. . .

ऑगस्ट १९४१ ! मला आठवतंय, तो धामधुमीचा गोंधळाचा काळ होता.

खेडेगावच्या इतर मुलांबरोबर मीही खंदक खणण्याचे काम केले. दोन आठवडे चालले होते ते काम. सैन्यात जायला आम्ही अजून लहान होतो. आम्हाला खोरी आणि फावडी दिली होती. श्रमानं माझी पाठ अगदी दुखायला लागली होती, हाताला टणक घट्टे पडले होते. रणगाड्याना अडविणारे खड्डे चांगलेच रुंद व खोल झाले होते. नाझी तुकड्यांची आगेकूच चालूच होती. मिन्स्क पडले, जर्मन स्मोलेन्स्कच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहेत अशा बातम्या उठल्या होत्या खंदक खणण्याचं काम संपलं आणि आम्हाला घरी परत पाठवण्यात आलं.

गावात भरपूर काम पडलं होतं. लढाई सुरू झाल्यानतर थोड्याच दिवसात आमचे अध्यक्ष कुलेशोव, शेतावरचे ट्रॅक्टर ड्रायव्हर, यंत्रचालक आणि इतर ड्रायव्हर याना ट्रक आणि ट्रॅक्टर घेऊन हजर होण्याचा हुकूम आला होता. लढाईची तयारी करण्यासाठी त्या सर्वांची गरज होती. आता शेतावरची काम करायला म्हातारी माणसं, बायका आणि अपंग एवढेच गावात उरले होते. पंधरा–सोळा वर्षांची मुलं–मुली कामगार म्हणून शेतावर कामाला लागली होती.

योग असा की त्या वर्षी अगदी अमाप, सोळा आणे पीक आलं होतं. लोंब्याच्या भारानं लवलेले दांडे जमिनीला टेकू पहात होते. गहू छान पिकला होता. त्याची कापणी करायला मुलंबाळं आणि म्हातारी–कोतारी सारीजणं जमा झाली होती. आम्ही हातानंच कापणी आणि झोडपणी करीत होतो. आमच्या आजोबांच्या काळात अशी हातानंच कामं करीत असत.

आमच्या दारावरच्या रस्त्याला उसंत नव्हती. निर्वासितांचे तांडे चालतच होते. पण पूर्वी हे निर्वासित फार दूरच्या प्रदेशातून आलेले असत; आता ते जवळपासच्या भागातून येऊ लागले होते.

आणि लवकरच, माघार घेणाऱ्या लाल सैन्यातले शिपाई रस्त्यावर दिसू लागले.

एक दिवस संध्याकाळी पावेलकाका घरी आले. "तुमचा काय बत आहे मग ?" त्यानी आईला विचारलं.

"तुम्हाला काय म्हणायचंय् कळलं नाही मला;" आई म्हणाली, तिच्या आवाजात उघडउघड चिंता होती.

"साऱ्या सामुदायिक शेतांवरचे जनावरांचे कळप एकत्र करून त्याना इथून दूर, देशाच्या अगदी आतल्या भागात हलवायचं आहे. बहुतेक मोर्दोवियात न्यावं लागेल. माझ्यावर सोपवलंय ते काम."

"म्हणजे तुम्हाला गाव सोडून जावं लागणार ?"

"हुकूमच आहे तसा. म्हणून तर आलोय मी इथं भेटायला. आपल्याला विचार करायला हवा जरा शान्तपणानं. जनावरं हलवायला सांगितली म्हणजे जर्मन इथं येण्याची शक्यता आहे हे उघडच आहे. खरं काय ते वरच्या लोकाना माहीत. कारण इतकी जनावरं हलवायची म्हणजे केवढा मोठा खर्च होणार. तेव्हा तसंच काही सबळ कारण असल्याशिवाय ते असा निर्णय घेणार नाहीत. लढाईला असंच तोंड द्यावं लागतं. मी म्हणतो, तुम्ही लोकानी काय ठरवलंय ?"

आम्ही तेथे उंदरासारखे चूपचाप बसून प्रत्येक शब्द ऐकत होतो. अलिकडे पावेलकाकांचा चेहेरा ओढल्यासारखा दिसू लागला होता; फिकाही पडला होता. त्यांच्या आवाजात पोकळपणा जाणवत होता. मध्यरात्रीच्या गडद अंधारात ज्यानी आम्हाला बिछान्यातून उठवून पिठाच्या गिरणीत नेलं होतं, ताऱ्यांचं निरीक्षण करायला लावलं होतं आणि दूर दूरच्या दुनियेची स्वप्न पहायला शिकवलं होतं त्या पावेलकाकांचा कुठे मागमूसही उरला नव्हता. लढाई अजून पुऱ्या अर्थानं आमच्या गावापर्यंत पोहोचली नव्हती; दुरून तिचा धडधडाट कानी येत होता. तरीही आमच्या डोळ्यांदेखत पहाता पहाता माणसं पार बदलून जात होती. त्यांच्या वृत्तीतले स्वास्थ्य उडाले होते; निश्चिंती, निवान्तपणा हरवला होता. प्रत्येकाच्या वृत्ती धनुष्याच्या दोरीसारख्या ताणल्या गेल्या होत्या.

"वाल्या, जनावरं हलवायची म्हणजे काय ?" युरानं अगदी हलक्या आवाजात विचारलं.

"त्याना इथून दुसरीकडं न्यायचं; म्हणजे ती जर्मनांच्या हाती लागणार नाहीत. साऱ्या जनावराना इथून दूर, खूप दूर नेणार आहेत."

"केव्हा ?"

"कोणी सांगावं ? कदाचित उद्याही त्याना हलवायला सुरवात होईल."

"ओह ! मग मला जरा जाऊन यायला हवं.'

"कशाला ?"



"बेलुगाचा आणि तिच्या पिलांचा निरोप घेऊन येतो ना !" तो हलकेच बाहेर निसटला.

"मग ॲना, काय ठरवलंय तुम्ही ? तुम्ही येणार का बरोबर ? मी तुला काहीतरी काम देऊ शकेन. तशी काही अडचण येणार नाही." पावेलकाका म्हणत होते.

"पण मुलांचे वडील इस्पितळात आहेत. त्यांना सोडून मी कशी येऊ ? कालच मी त्यांना भेटून आले. फार खालावली आहे त्यांची प्रकृती. केव्हा बरे होतील काही सांगता येत नाही. त्याना एकट्याना सोडून मी कशी येऊ ? मनात कुठंतरी आशा धरून आहे, जर्मन काही इथंपर्यंत येऊन पोहोचणार नाहीत म्हणून."

"तुझं ठरवणं तुझ्या हाती," पावेलकाका उठून उभे राहिले. त्यांनी खाकरून घसा साफ केला. "बरं तू जर इथंच रहाणार आहेस तर जरा माझ्या घरावर लक्ष ठेवशील ?" पावेलकाका गोंधळल्यासारखे झाले.

"काही झालं तरी आपण नात्याची माणसं, त्यातून शेजारी, उद्या सकाळी निरोप घ्यायला येतो," त्यानी दार उघडले. सध्याकाळचा थंडगार वारा आत घुसला. "मग येतो मी आता," ते मागे वळून पहात म्हणाले. एकदम त्यांच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला, "युरा, काय झालं ?"

युरा दारात उभा होता. त्याचा चेहरा फिका पडला होता, आक्रसला होता. रडून रडून डोळे लालभडक झाले होते. ओठ कापत होते. हाताच्या मुठी वळलेल्या होत्या.

"काय झालं युरा ? कोणी काही केलं का तुला ?" आई युराकडं धावली.

"त्या...त्या तिकडे ते मार...मारताहेत बेलु....बेलुगाला आणि पि..... पिलाना," युराचे शब्द त्याच्या घशात अडकत होते.

"काहीतरी वेड्यासारखं बोलू नकोस," पावेलकाका पटकन बाहेर पडले.

"कोण मारतंय त्याना ?" आई ओरडली आणि घरातल्या कपड्यातच रस्त्यावर धावली. मागोमाग मी आणि युरानंही धाव घेतली.

डुक्करवाड्याच्या दाराशीच गावचा रखवालदार आन्द्रे कालुगिन बसला होता. त्याच्या शेजारी मध्यम वयाचा एक लाल सैनिक उभा होता. कुठंतरी मर्दुमकी गाजविल्याबद्दल त्याच्या छातीवर एक बिल्ला लटकत होता. कालुगिन त्याच्या हातावर घरी बनविलेली गावरान तंबाखू ठेवीत होता.

आतून एक डुक्कर जिवाच्या आकांताने ओरडले.

"आई, या साऱ्याना हाकलून दे !" युरा किंचाळला; धावत पळत त्यानं आईला गाठलं आणि तिचा हात पकडला

"हे काय मांडलंय इथे ?" आईनं कालुगिनला विचारलं. तिला धाप लागली होती.

"युरानं घाबरवलं वाटतं तुला ? तुम्ही सारीजणं इथं आलात. तस काही नाही. लाल सैनिक आपली डुक्करं मारताहेत."

आईचा चेहेरा लाल झाला." कोणी सांगितलं त्याना ? त्याना काय अधिकार आमची डुकरं मारण्याचा ?"

कालुगिननं तंबाखू पेटवून सावकाश दोनचार झुरके मारले. त्याच्या धुराचा तीव्र वास पसरला. ' हे पहा अँना, आता साऱ्या नुकसानीची भरपाई लढाईतूनच होईल."

त्या सैनिकाने कपाळाला आठ्या चढविल्या आणि कालुगिनला मध्येच हटकलं, "काही काळजी करू नका," तो आईला म्हणाला, "माझ्या सहकाऱ्यांनी तुमची काही डुकरं मारली हे खरं पण तुमच्या सामुदायिक शेताची आमच्यापाशी परवानगी आहे." त्यानं खिशात हात खुपसून कागदाचा एक चिटोरा बाहेर काढला. त्याच्यावर जांभळा शिक्का आणि सही होती त्यानं तो चिटोरा आईच्या हाती दिला. ती वाचू लागली, "... लाल सेनेच्या या तुकडीला ... परवानगी आहे .." तिनं तो चिटोरा त्याला परत दिला.

"पण मी म्हणते सारे सोडून बेलुगाच का ?" आईच्या तोंडून कसेबसे शब्द बाहेर पडले.

कालुगिन पुन्हा बोलू लागला, ' अँना, तू साऱ्या गोष्टीकडे 'स्त्री'च्या नजरेनं बघतेस. जरा विचार करून बघ. ती शत्रूच्या हातून कधीच सुटली नसती. एक तर तिचे पाय फार अधू आहेत आणि दुसरं म्हणजे तिच्या अंगावर भरपूर मांस आहे. बरं डुकरानी ओढायच्या गाड्यांचा अजून कोणी शोध लावलेला नाही. तेव्हा तिच्यापुरता तरी सर्वात उत्तम मार्ग म्हणजे शिपायांचं जेवण बनवणं. युद्ध-प्रयत्नाना हाच तिचा हातभार," मग तो लाल शिपायाकडे वळून आईचा निर्देश करीत म्हणाला, "आमची अँना डुकरांची देखभाल फार चोख करते म्हणून हे सारं तिला फार लागलय."

"असे होय," म्हणत लाल शिपाई युराजवळ गेला आणि खाली वाकून त्यानं त्याला उचलून घेतलं. युरा ओरडला, त्याने हातपाय झाडले आणि तो खाली उतरायचा प्रयत्न करू लागला.

" जा नीघ ! सोड मला ! मला जाऊ दे ! तू फार वाईट आहेस !" युरा ओरडला.

"तू फार छान मुलगा आहेस," शिपाई मृदु स्वरात म्हणाला. युराभोवती त्याची पोलादी पकड होती, "तू छान मुलगा आहेस आणि तुझं मनही मोठं दयाळू आहे. या अशा काळात असं काही दुर्मिळच. तुला हे दिवस जड जातील."



युरा जरासा शांत झाला. त्यानं शिपायाच्या छातीवरील बिल्ल्याला हात लावून पाहिला.

"फार फार दिवसापूर्वी मिळालाय तो मला. आता या युद्धात मी अजून काही मिळवलं नाही." त्यानं युराला खाली ठेवलं आणि आईकडे वळून तो म्हणाला, "मला वाटतं, आता आपल्या कोणाच्याही मनात काही नाही."

"ते दिसतंय ते आमचं घर," आई म्हणाली, "घरी चला, मी मांस शिज-विते. शिवाय घरात दूध आहेच. जरा अंग धुवून आराम करा. हवं असल्यास तुम्ही सारीजणं घरी राहू शकता."

"फार फार उपकार आहेत तुमचे. त्यानी आमच्या साऱ्या रेजिमेंटचा धुव्वा उडविला," थकलेल्या आवाजात तो शिपाई सांगू लागला. "आता पुन्हा जुळवा-जुळव करायला आम्ही जात आहोत. आमच्याजवळ शिधासामुग्री काहीच नाही. सामुदायिक शेतावर आम्हाला देतील तेवढं खाऊन रहातो आम्ही."

"प्रत्येकाला भारी कठीण झालंय हल्ली," आई म्हणाली अन् तिने एक सुस्कारा टाकला.

त्या शिपायानं हवेतल्या हवेत उगीचच सपासप हात हालवला. मग त्याने युराला हाक मारली, खिशातून लाल सैन्याचा एक तारा काढला आणि त्याला दिला.

माघार घेणाऱ्या सैन्यातल्या शिपायांशी आमची पहिली भेट ही अशी झाली. तोपर्यंत आमच्या गावातून जाणाऱ्या लाल सेनेच्या तुकड्या पश्चिमेकडे जात होत्या.

कळपातल्या मेंढ्या ओरडत होत्या. त्याना रस्ता पसंत नव्हता. कुरणात हिरवागार चारा होता तिकडे त्या सारखी धाव घेत होत्या. त्याना हाकून हाकून रस्त्याला लावताना मेंढपाळांची तिरपीट उडाली होती मरतुकड्या घोड्यावर बसून ते मेंढ्यांचा पाठलाग करीत. त्यांचे लांबलचक चाबूक कडाडले की बंदुकीची गोळी सटकन सुटून सणसणत गेल्यासारखा आवाज यायचा.

"हो ! हो !" ते ओरडत आणि चिडून म्हणत, "जा कुठं मरायला जायचं तिथं !"

कळपाला निरोप द्यायला सारा गाव लोटला होता. बायका फाटकात उभ्या राहून डोळ्याला हाताचा आडोसा लावीत, रस्त्याकडे टक लावून पहात होत्या. रस्ताभर धुरळा उसळला होता. शेकडो खुरानी उडविलेल्या धुळीचा काळा लोट दूर क्षितिजावरही दिसेनासा झाला तोपर्यंत त्या पहातच होत्या.

"पोरकं झाल्यासारखं वाटतंय मला." आई उदासवाणी झाली. "आता मी काय करणार कोणास ठाऊक."

कामासाठी लागणारे घोडे, अध्यक्षांचा बसावयाचा घोडा, काही मग्तुकडच्या गायी, डुकरं आणि मेंढ्या येवढीच काय ती शेतावर राहिली होती. मोर्दोवियाचा लांबचा प्रवास काही त्याना झेपला नसता; त्यानी वाटेतच राम म्हटलं असतं.

दोन घोड्यांच्या गाडीत बसून पावेलकाका घरी आले. गाडीला टप होते. ऊन चांगलेच होते तरीही काकानी करड्या रंगाचा रेनकोट अंगात घातला होता. अगदी गळ्यापर्यंत बटनं लावलेली होती. डोक्यावर एक खाकी टोपी आणि पायात चामड्याचे बूट. चालायला लागलं की ते बूट करकरत. ते गाडीतून उतरले आणि आम्ही विहीरीपाशी होतो तिथे आले.

"बरं, निघतो मी आता. तुमचा निरोप घ्यायलाच आलोय." काकानी आईचा व झोयाचा मुका घेतला. युराला वर उचलून घेत ते म्हणाले, "मुला, पुन्हा आपली गाठभेट कधी होते की नाही कोणी सांगावं? आनंदात राहा."

"पावेल, असं काही म्हणू नकोस. तुमचा प्रवास जलद होऊ दे." आई म्हणाली.

जड पावलानी काका गाडीकडे वळले. एक पाय त्यानी गाडीच्या पायरीवर ठेवला आणि ते मागे वळले. आईला म्हणाले, "ॲना, विसरू नकोस बरं. माझ्या घरावर लक्ष ठेव. वाल्या तिथं झोपायला गेला तर बरं."

गाडीची चाकं फिरू लागली. गाडी दूर निघून गेली.

"सारं काही उलटंपालटं, होत्याचं नव्हतं झालंय." आईच्या चेहेऱ्यावर आश्चर्य होते, गोंधळ होता, "मी तर तुमच्या काकाना ओळखलंच नाही. डोकं फिरलंय की काय त्याचं? साऱ्या रशियाला आग लागलीय तर याला इथे आपल्या घराचंच पडलंय."

कितीतरी दिवस लोटले. मग आई बाबाना दवाखान्यातून घरी घेऊन आली. बाबांकडे बघवत नव्हते. डोक्यावरचे केस काढून टाकले होते; गाल खोल गेले होते. डोळेही आत ओढल्यासारखे दिसत होते. काठीचा आधार घेत, मोठ्या प्रयासाने, अगदी सावकाश लंगडत ते घरात वावरत होते.

"हे दुखण्यातून उठतील असं काही वाटलं नव्हतं तेव्हा," आई झोयाला आणि मला म्हणाली, "टायफस म्हणजे काही साधासुधा आजार नसतो."

घरात सारीजणं पुन्हा एकत्र जमली होती. पावेलकाकांची विनन्ती आठवून मी त्यांच्या घरी गेलो.

□□



## १० : "त्याला वीराचं मरण आलं...."

प्रादेशिक केंद्राचा काळ्या केसांचा प्रतिनिधी यावेळी मागच्यापेक्षा साधा-सुधा वाटला. त्याच्याशी बोलायला अवघड वाटलं नाही. गावच्या सोविएतच्या कचेरीत तो आला. त्याच्या अंगात सैनिकासारखा शर्ट होता. मात्र त्यावर कोणतीही लष्करी चिन्हं नव्हती. कमांडरचा चामडी पट्टा त्यानं बांधला होता, त्यातच उजव्या बाजूला पिस्तुल खोचलेलं होतं. आम्हा सर्वांना सोविएतच्या कचेरीत बोलावलं होतं.

"हॅलो, कोम्सोमोल कॉम्रेड्स!"

"हॅलो!" आमचा आवाज अगदीच खरखरीत वाटला.

"एकंदर परिस्थिती ही अशी आहे, मुलानो.." त्यानं एक खुर्ची पुढं ओढून घेतली आणि दोन्ही बाजूला दोन पाय टाकून तो तिच्यावर बसला. खुर्चीच्या पाठीभोवती त्याच्या हाताची पकड बसली. आमच्यापैकी प्रत्येकाकडं तो आळीपाळीनं अगदी निरखून पाहू लागला. आम्ही एकंदर दहाबारा जणं होतो. सारे एकाच वयाचे शाळकरी सवंगडी. तो काय सांगतो ते ऐकण्यासाठी आम्ही अगदी अधीर झालो होतो.

"एकंदर परिस्थिती ही अशी आहे, मुलानो....मी पक्षाच्या प्रादेशिक समितीच्या वतीनं बोलतो आहे. या आपल्या प्रदेशात नाझी हेरांचे व घातपात्यांचे उद्योग चालले आहेत. त्याचा पुरावाच आहे हे एक. दुसरं असं की सैन्यातून पळ काढून काही पळपुट्यानी जंगलाचा आश्रय घेतला आहे. तसे काही लोक आम्ही हेरलेही आहेत. ऐन आणिबाणीच्या वेळी त्यानी देशाशी बेईमानी केली आहे. थोडक्यात सांगायचं तर या गदारोळात सारा केरकचरा ढवळून वर आला आहे; आणि तोच आपल्या गाड्याला खीळ घालू पहातो आहे. आपण कोणत्या काळातून जात आहोत हे मी तुम्हाला वेगळं सांगायला हवं असं नाही."

एव्हाना आम्हाला अंदाज आला होता. काहीतरी महत्त्वाचं ऐकायला मिळणार म्हणून.

" आणि म्हणून पक्षाच्या प्रादेशिक समितीनं प्रत्येक वस्तीवर आणि प्रत्येक गावात निवडक कोम्सोमोल सदस्यांचं एक पथक उभारायचं ठरवलं आहे. हेराना आणि घातपात्याना निःशस्त्र करणं आणि पळपुट्याना शोधून काढणं ही त्यांची कामं राहातील. तुमच्या सामुदायिक शेतावरच्या वस्तीवरही असेच पथक उभारायचे आहे. शक्य ती शस्त्र मिळवून तुम्ही सुसज्ज व्हावं. गावात शॉटगन तर आहेतच. इथं उपस्थित असलेला प्रत्येकजण या पथकाचा सदस्य झाला आहे असे मी धरून चालतो. आता प्रश्न आहे, पथकाचा कमांडर नेमण्याचा." हातातल्या यादीतील नावावर त्यानं नजर फिरवली. " तुमच्यापैकी गागारिन कोण आहे ?"

मी उठून उभा राहिलो.

" तुझी आई डुकराच्या पिलाना वाढवते ?"

" वाढवत होती. आता डुकरच उरली नाहीत."

" ती आठवते मला. तुझं नाव काय ? वलेन्तिन ? ठीक, वलेन्तिन गागारिन, तू या पथकाचा कमांडर. कोणाची काही हरकत ?"

" काही हरकत नाही," इतर मुलांनी सांगितले.

" छान, छान ! आता कामासंबंधी काही सूचना द्यायच्या तर......जाऊ देत ! तुम्ही आपापल्या जागा ठरवून घ्यायच्या आणि आज रात्रीपासून गावात गस्त घालायला सुरुवात करायची. तुमच्या दिमतीला शेतावरचे घोडे देण्यात येतील. चटपटीतपणा आणि कामाचा उरक याला आता महत्त्व आहे. बस् इतकंच सांगायचं आहे."

आम्ही सर्व शिस्तीनं कचेरीबाहेर पडलो.

पाण्याच्या भारानं ओथंबलेले ढग अगदी खालून हळूहळू सरकत होते. ये ऊ घातलेल्या शरद ऋतूची आणि जोरदार पावसाची ती चाहूल होती.

प्रदेश केंद्राच्या प्रतिनिधीनं खिशातून सिगारेटचं पाकीट काढलं, त्यानं सिगरेट पेटवली आणि मग पाकीट आमच्या पुढं केलं. ते आमच्यापैकी प्रत्येकाच्या हातातून फिरलं. एकाएकी आम्हाला जाणवलं, आपण आता लहान नाही, मोठे झालो आहोत; आपल्यावर जबाबदारीची कामं आहेत.

" कॉम्रेड, मी तुम्हाला एक प्रश्न विचारू का ?" वलोद्या बेलोव जरा अडखळला.

" विचार."

" खरं तर असा प्रश्न विचारणं मला आवडत नाही, पण तुम्ही सैन्यात का दाखल झाला नाहीत ? माझे वडील तुमच्यापेक्षा मोठे आहेत आणि ते तर सुरुवातीपासूनच लढाईवर गेले आहेत."

सिगरेट ओढता ओढता त्या प्रतिनिधीला एकदम ठसका लागला. तो



घुसमटल्यासारखा झाला. डोळ्यात जमा होऊ पहाणारं पाणी त्यानं निपटून काढलं आणि खिन्नपणानं तो म्हणाला, " मला जर त्यानी दाखल करून घेतलं तर मलाही ते हवंच आहे. मी पक्ष-समितीला आणि भरती-मंडळाला तीन अर्ज पाठवले, पण काही उपयोग झाला नाही. त्यांचं म्हणणं एकच....तुमची गरज लागली की तुम्हाला बोलावून घेऊ." त्यानं दुसरी सिगरेट पेटवली. " तर असं आहे ते मुलांनो.. "

आम्ही सारेच अवघडल्यासारखे झालो. ते पाहून वलोद्या अडखळत बोलू लागला. " तुम्ही मनावर घेऊ नका काही, आज ना उद्या ते तुम्हाला बोलावणारच "

त्यानं मान हलवली. माझ्याशी हस्तांदोलन केलं आणि आम्हापैकी प्रत्येकाला सुयश चिंतिलं. मग तो रस्त्यावर जाऊन उभा राहिला. प्रदेशकेंद्रावर जाण्यासाठी एखाद्या वाहनात जागा मिळवावी म्हणून. आम्ही त्याच्याकडे पहात राहिलो. त्यानं चालायला सुरुवात केली आणि थोडयाच वेळात, निर्वासितांच्या तांड्यात तो दिसेनासा झाला.

" वलोद्या, इतका कसा तू नासमझ ?" मी म्हणालो, " त्या भल्या माणसाला उगीचच कशाला कष्टी केलंस ?"

आता मी पथकाचा कमांडर होतो. म्हणून मी सामुदायिक शेताच्या अध्यक्षांच्या घोड्यावर मांड ठोकली. पुरे दोन महिने त्याच्यावर खोगीर चढलं नव्हतं.

आम्ही गावाबाहेर पडलो. पोरांचा एक घोळका आमच्या मागोमाग धावला. गावची अखंड त्रिमूर्ती. युरा, वलोद्या ओर्लोव्स्की आणि वान्या झेर्नोव–त्यांच्यात होतीच. मला कमांडर नेमलं याचा युराला वाटणारा अभिमान उघडउघड दिसत होता. गावच्या बायकांनी खिडक्यातून आणि पडव्यातून आम्हाला नीट न्याहाळून घेतलं. त्यांच्या नजरेत आश्चर्य, हसू आणि कणव होती. म्हाताऱ्या घोड्यांवर स्वार झालेली काही शाळकरी मुलं, काहींच्या खाली खोगीर आहे तर काहींच्या खाली नाही, निरुपद्रवी शॉटगन खांद्यावर टाकलेल्या ! सारंच दृश्य त्याना अगदी हास्यास्पद वाटलं असावं.

पण आम्हाला मात्र आमचं पथक म्हणजे एक सामर्थ्यशाली, अजिंक्य सशस्त्र सेना–दल वाटत होतं, कुणालाही त्याची धडकी भरावी असं.

आम्ही गावाबाहेर थांबलो आणि जरासा खल केला. सगळेच जर एकत्र राहिलो तर रात्रीच्या वेळी साऱ्या जंगलावर नजर ठेवणं जमलंच नसतं यावर साऱ्यांचं एकमत झालं. मग आम्ही दोघा-दोघा तिघातिघांच्या टोळ्या केल्या आणि आपापले मोहल्ले वाटून घेतले.

एका टोळीत मी आणि वलोद्या बेलोव होतो.

"युरा, घरी पळ आता," ती पोरं अजूनही आमच्या आवती-भोवती घुटमळत होती. उद्या सकाळी मी एक पळपुटा शिपाई तुझ्या पुढ्यात आणून हजर करतो.

"मला काय त्याचा उपयोग ?" तो स्थितप्रज्ञासारखा म्हणाला.

सूर्य नुकताच मावळला होता पण जंगलात अंधेरलं होतं. गारवाही आला होता.

"वलोद्या, नीट लक्ष ठेव," मी त्याला म्हणालो "कुठतरी त्यानी शेकोटी पेटवली असेल."

"शेकोटी पेटवून ते आपलं 'कॅमॉफ्लेज' नाहीसं करतील असं वाटतं का तुला ?"

वेगवेगळे लष्करी पारिभाषिक शब्द आम्ही पटापट टिपत होतो आणि शक्य झाल्यावर कुठेही धाडधाड ठोकून देत होतो.

अंधाराबरोबरच एका अनामिक भीतीनंही आम्हाला घेरलं. झाडीतून आमचे घोडे पुढे जायला लागले. त्यांच्या टापांखाली फांद्या मोडल्याचा काडकाड आवाज होऊ लागला. आम्हाला वाटलं हा आवाज नक्की मैल मैल दूर ऐकू जाणार आणि शत्रूच्या हेरानी, घातपात्यानी आणि सैन्यातील पळपुट्यानी जर–आम्ही त्याना हेरण्याअगोदर आम्हालाच हेरले तर ?...तर काय होईल ? आमच्यापेक्षा त्यांच्या-जवळ नक्कीच चांगली शस्त्र असणार बरं ..ते एकेकटेही हिंडत नसणार, गटागटानी फिरत असणार. आता या क्षणी जर ते कुठे मागे दबा धरून बसले असले, लपत-छपत आमच्यावर चाल करून येत असले तर ? अगोदरच जर त्यांच्या नजरा आमच्यावर रोखलेल्या असल्या तर ?

एकदम आम्ही जंगलातून बाहेर पडलो आणि दौडत दौडत एका गव्हाच्या शेतात आलो. धुळीने भरलेल्या रस्त्यावर आभाळात तारे लुकलुकत होते. सगळीकडे अगदी शान्त होते. झात्स्कच्या पलिकडून कुठून तरी दुरून, बहुधा व्याझ्मातून टाकलेले प्रकाशझोत आभाळात दिसत होते. दुरून धडधडाट, गडगडाट ऐकू येत होता. कुठंतरी तुंबळ लढाई चालू होती, सटासट बंदूका झडत होत्या.

गव्हाचं शेत संपलं अन् बटाट्याचं शेत लागलं. मग आमच्या लक्षात आलं, आपल्याला आता कडकडून भुका लागल्या आहेत म्हणून. घातपाती लोक कुठं शेकोट्या पेटवताना दिसले नाहीत म्हणून आम्हीच शेकोट्या पेटवायचं ठरवलं. मग ते धावत आमच्या शेकोटीपाशी येतील आणि मग आम्ही त्यांना पकडू.

आम्ही घोड्यावरून उतरलो. बटाटे खणून काढले; एका जुन्या गंजीतून चारा ओढून घेतला; लवकरच शेकोटी चांगली धडधडली, चांगला जाळ फुलला.



आम्ही भाजलेले बटाटे फारच चवदार लागले. त्या दिवशी आम्ही सारे झोडपणीच्या कामावर होतो. सक्त मेहनत झाली होती. सारेजण अगदी थकून गेलो होतो. भुकेच्या पोटी दोन घास पोटात गेल्यावर एकमेकांच्या खांद्यावर रेलून आम्ही पहाता पहाता झोपी गेलो.

एकाएकी आम्ही जागे झालो, धसकलो, आमची वाचा बसली. आमच्या पुढ्यात चार माणसे उभी होती. तिघांच्या अंगावर साधे कपडे होते. दोघांनी बंड्या घातल्या होत्या तर एकानं कोट घातला होता. चवथ्याच्या अंगावर लष्करी कोट होता. हातात रायफल होती. त्याच्या पट्ट्यात एक हॅन्डग्रेनेड अडकवला होता सगळ्यांच्या दाढ्या वाढलेल्या होत्या. ते अगदी बारीक नजरेनं आम्हाला न्याहाळत होते

"तेच आहेत हे," माझ्या मनात विचार चमकला, "आता नक्की ते आपल्याला मारणार."

मला उठायचं होतं पण पाय शिसं ओतल्यासारखे जड झाले होते. माझ्या शेजारी वलोद्या थरथरत होता ते मला जाणवलं. आमच्या बंदुका कुठं गेल्या ? त्या कुठंच दिसत नव्हत्या.

"काय मुलानो ? काय करताहात इथं ?" त्यापैकी एकाने, लष्करी कोट घातलेल्या माणसाने आम्हाला विचारले.

"अं...आम्ही. आम्ही इथं .." मी बोलताना चाचरलो.

"झात्स्क कुणीकडं आलं ? आम्ही रस्ता चुकलो आहोत."

मी आणि वलोद्यानं झात्स्कच्या दिशेनं हात भिरकावले.

"मला वाटलंच होतं."

आमच्या शेकोटीत जमलेली राख त्यानं आपल्या फाटक्या बुटाच्या टोकानं उडविली. एक काळा बटाटा बाजूला गडगडत गेला. त्यानं खाली वाकून तो उचलला, हातानं फोडला, आणि नाईलाजानं त्याचे जळके तुकडे फेकून दिले.

"तुम्ही इथं काय करताहात ?"

"...शिकार करतो आहोत." वलोद्यानं तोंडाला आलं ते सांगून टाकलं.

"आमची शिकार करायचं कारण नाही. आम्ही तुमच्याच बाजूचे आहोत. आम्ही आहोत होम–गार्ड. पण आमच्या हातात बागनेट तर त्यांच्या पावलाखाली रणगाडा. आमच्या स्वयंसेवक–गटाचा मागमूसही उरला नाही. आम्हीच तेवढे उरलो, बाकी कोणी नाही."

"पुरे, पुरे" रायफल हातात घेतलेल्या माणसानं संभाषण तोडलं. माझ्या लक्षात आलं, त्यानं चष्मा घातलेला होता.

आम्ही उठून उभे राहिलो. आमच्या शॉटगन आमच्या मागेच जमिनीवर

पडलेल्या होत्या. मला वाटलं होतं, त्या गेल्याच, पुन्हा काही नजरेला पडायच्या नाहीत म्हणून.

"बरंय् मुलानो, निघतो आम्ही आता" रायच्या शेतातून ते झातस्कच्या रस्त्याने निघाले; अजून रायची कापणी झालेली नव्हती.

"कदाचित माझे वडीलसुद्धा आता असेच भटकत असतील; कुणी सांगावं?" वलोद्याची नजर बोलता बोलता त्या पाठमोऱ्या सैनिकांचा मागोवा घेत होती. तो उदासवाणा झाला होता.

घोड्यावर बसून आम्ही घराकडे निघालो. साऱ्या वाटेत कोणी तोंडावाटे चकार शब्दही काढला नाही.

गावाबाहेरच युरा आम्हाला भेटला. तो अगदी अस्वस्थ दिसत होता. कसल्यातरी काळजीत होता. "बहुतेक त्याला आमची काळजी वाटली असावी," मी अंदाज केला.

"वाल्या, मला तुला काही सांगायचंय," तो ओरडला आणि पळत पळत माझ्याकडे आला.

"काही लष्करी गुपित ?" मी विचारलं आणि हसलो, "काही असलं तरी इथं मोठ्यानं सांगायला हरकत नाही."

पण तो हसला नाही. मी लगाम खेचला. वलोद्या तसाच पुढे गावात निघाला.

"हात दे, तुला वर ओढून घेतो;" युरानं हात वर केला. मी त्याला ओढून माझ्या घोड्यावर बसवलं. "वान्याकाका लढाईत मेले," तो माझ्या कानात कुजबुजला.

"कोण वान्याकाका ?"

"बेलोव. वलोद्याचे बाबा;" त्यानं वलोद्याकडं बोट दाखवलं.

"छट ! नाही !"

वलोद्याला आमचं बोलणं ऐकू गेलं असेल असं मला वाटत नाही, पण त्याला नक्कीच काहीतरी जाणवलं असावं ; त्यानं एकदम घोड्याला टाच दिली आणि तो दौडत निघून गेला.

युरा आणि मी मागच्या बागेतून दौडत आलो तेव्हा आम्हाला बेलोवच्या घरापुढं बरेच लोक गोळा झालेले दिसले. मी खाली उडी टाकली अन पुढे घुसलो. काकी बेशुद्ध झाली होती, आईनं तिला सावरली होती. तिची मुलगी निना तिच्या तोंडावर पाण्याचे हबके देत होती. वान्याकाकांचा सगळ्यात धाकटा मुलगा वित्या जोरजोरानं हुंदके देत होता. वलोद्या माझ्याजवळ आला. त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता त्यानं माझ्या हातात कांद्याच्या सालीसारखा कागद दिला टाईप



केलेले शब्द माझ्या डोळ्यासमोर उड्या घेऊ लागले. "इवान दानिलोविच बेलोव....वीराचं मरण आलं...आपल्या समाजसत्तावादी पितृभूमीचं संरक्षण करीत असता...." कसेबसे मी शब्द नीट लावून वाचले.

आमचा प्रेमळ, आनंदी शेजारी आम्हाला सोडून गेला होता.

कोणीतरी मरण पावल्याचं जाहीर करणारी आमच्या गावात आलेली ती पहिली सरकारी नोटीस.

तो सारा दिवस आणि त्यानंतरही कितीतरी दिवस युरा बाबांच्या आसपास कुठेतरी असायचा. त्याना नजरेआड होऊ द्यायचा नाही. जेवण संपेपर्यंत तो त्यांच्याजवळ बसून असायचा. बाबांचा अशक्तपणा अजून गेला नव्हता काठीचा आधार घेऊन ते मळणीसाठी किंवा सामुदायिक शेताच्या कचेरीत काही कामासाठी निघाले की युरा हटकून त्यांच्या संगतीला असे. त्याना नजरेआड होऊ द्यायला तो घाबरत असावा.

दुःखं कधी एकेकटी येत नाहीत.

इवान बेलोवचा चुलत भाऊ ग्रिगोरी हाही लढाईत पडला.

अप्लेतोव कुटुंबाला मरणाच्या दोन नोटिसांवर एकदम सही करावी लागली. त्यांची दोन्ही मुले इल्या आणि अॅलेक्झांडर लढता लढता मरण पावली.

आमच्या सामुदायिक शेताचा अध्यक्ष कुलेशोव–मोठा उत्साही आणि उमदा माणूस. त्यालाही वीरगती प्राप्त झाली. गावातील अनेक चांगली चांगली माणसे लढाईत कामाला आली.

संध्याकाळी आम्ही नियमाने फेरी टाकत होतो, गस्त घालत होतो. पुढे जसजशी आमची मनमोकळी बोलणी झाली त्यावरून आम्हाला कळून आलं; गस्त घालण्याच्या पहिल्या रात्री केवळ माझी आणि वलोद्याचीच गाळण उडाली होती असं नाही. पण आता भय, भीती, गडबडघोटाळा या गोष्टी इतिहासजमा झाल्या होत्या. शत्रूविषयी वाढत जाणाऱ्या त्वेशानं, तिरस्कारानं त्यांच्यावर मात केली. वडील रणांगणावर पडू लागले तशी मुलं एकदम मोठी झाली; जाणती झाली; पौरुषार्थ गाजविण्यास सिद्ध झाली.

एखाद्या हेराला किंवा घातपात्याला पकडायचं म्हणजे सोपं काम नव्हतं. प्रादेशिक सैनिकांनी एखाद दुसरा हेर पकडल्याच्या बातम्या अधून मधून कानावर यायच्या. पण आमची तीव्र इच्छा असूनही आम्ही मात्र अजून एकही पकडू शकलो नव्हतो.

□□

# ११ : ते दोन वैमानिक

पांढऱ्या शर्टाला काळजीपूर्वक इस्त्री मारून तो खुर्चीला टांगून ठेवला होता चकचकीत पॉलिश केलेल्या बुटात वरच्या छताचं प्रतिबिंब उमटलं होतं. 'लढाईच्या अगोदर' ज्ञातस्कच्या बाजारातून आणले होते ते. अजूनपर्यंत एकदाही वापरले नव्हते. एका छोटचाशा बॅगेत बाराखडीचं पुस्तक, काही वह्या, पेन्सिली आदल्या दिवशी सध्याकाळीच व्यवस्थित भरून ठेवल्या होत्या. ती बॅगही खुर्चीवरच ठेवली होती.

आज युरा शाळेत जायला लागणार होता.

अर्थात सर्वात त्याचीच खूप गडबड चालली होती. युरा नेहमीच अगदी पहाटे उठायचा. आईवडील उठले की हाही त्यांच्याचबरोबर उठायचा. पण त्या दिवशी त्याला क्षणभरही झोप लागली नव्हती याबद्दल माझी खात्री होती. उठून तो इकडे तिकडे हिंडत होता. काहीतरी पुटपुटत होता. त्यानं एक अर्धी चड्डी चढविली होती. अलीकडे तो फार गंभीर झाला होता. झोयाच्या तोंडावर पाण्याचा कप उपडा करण्याचं, मला आणि बरीसला सतवायचं त्यानं सोडून दिलं होतं.

मी डोळे किलकिले करून त्याच्याकडे पहात होतो.

युरा खिडकीपाशी उभा होता. खिडकीच्या तावदानावर तो उच्छ्वास टाकी, मग त्याच्यावर बोटानं काहीतरी वेलांटचा मारी. दोन खिडक्यांच्या मध्ये आरसा टांगलेला होता, त्याच्यासमोर तो जाऊन उभा राहिला. तावदानावर त्यानं स्वतःचं आद्याक्षर 'याय' वेडंवाकडं काढलं होतं ते मला स्पष्ट दिसलं. 'याय' उलटा लिहिला होता.

काही वेळ तो आरशासमोर उभा राहिला. मला त्याचं प्रतिबिंब दिसत होतं. युराचं कपाळ उंच होतं, कान पुढे आले होते; केस अगदी बारीक कापले होते. उन्हाळ्यात दाट वाढलेले केस बाबांनी आदल्याच दिवशी कापून बारीक केले होते.



मी त्याच्याकडे पहातोय हे त्याच्या लक्षात आलं असावं. कारण आरशा-तल्या प्रतिबिंबानं लागलीच लांब वेडावाकडा चेहरा केला आणि गुलाबी जीभ बाहेर काढली.

"ऊठ आता ! नाहीतर आपल्याला उशीर होईल शाळेला."

आपण दोघं एकाच शाळेचे विद्यार्थी या भूमिकेवरून तो आतापासूनच माझ्याशी बोलायला लागला.

"युरा, उठलोच हा आता."

खरं सांगायचं तर मला काही तशी घाई नव्हती. आमच्या मोठचा मुलांची शाळा संपल्यातच जमा होती, लढाई चालू होती, इतर महत्वाची कामं पुरी करायची होती. पण मी काहीच बोललो नाही मला त्याच्या आनंदावर विरजण घालायची इच्छा नव्हती; आपली शाळा संपली याचं मलाही दुःख होतंच. पण युराच्या आनंदानं मलाही आनंद झाला.

मला माहीत होतं, युराला शाळा मुळीच जड जाणार नाही, सारं काही सोपं वाटेल त्याला. त्याला अगोदरच चांगलं वाचता येत होतं, थोडसं लिहायला, येत होतं, गणितात तर त्याची चांगलीच गती होती.

पण त्याला घडपणी शाळा चालू ठेवण्याची संधी मिळेल काय ?

त्या दिवशी सकाळी कोणी लढाईचं नावही काढलं नाही. दूर कुठंतरी धडधडाट चालू होता त्याचाही कोणी उल्लेख केला नाही. लढाई जवळपासच्या परिसरात येऊन ठेपली होती. निश्चिंती केव्हाच उडाली होती. परन्तु युराचा आनंदाचा दिवस कोणालाही बिघडवण्याची इच्छा नव्हती. परन्तु मनातले उदास-वाणे विचार मी दूर करू शकलो नाही. अजून किती महिने हे युद्ध रेंगाळणार ? आमच्या लाल सैन्याची पीछेहाट अजून किती दिवस चालू राहाणार ? कोणत्या रशियन मैदानावर आमची लाल सेना शत्रूला थोपवून धरणार ?

न्याहारी झाली, युरानं नवा शर्ट व पँट घातली, नवे बूट घातले.

"घट्ट तर होत नाहीत ना ?"

"नाही. अगदी ठीक बसलेत."

"वळ जरा, एकदा नीट पाहू दे," बाबा म्हणाले; त्यानी आपल्या मुलाचं बारकाईनं निरीक्षण केलं. मग हलकेच त्याला दाराकडे ढकललं, "चला, आता करा अभ्यासाला सुरुवात," ते म्हणाले.

"इकडे ये," आई म्हणाली, "एक पापा घेऊ दे."

युरानं कपाळावर आठी चढविली पण तिच्यापुढं गाल केला. आई काहीतरी आशीर्वाद पुटपुटली असावी. "हे घेऊन जा बरोबर," तिनं त्याच्या हातावर दोन भलीमोठी सफरचंद ठेवली.

"चल चल, आवर झटपट," युरा झोयाला घाई करायला लागला. "अशानं उशीर होईल. आपल्या जुन्या दप्तरात सावकाश पुस्तकं भरीत होती; "अशानं उशीर होईल आपल्याला."

बरीसनं पळत पळत जाऊन युराचा हात पकडला. "मी घेतो तुझं दप्तर," तो म्हणाला.

"वारकुंडा तर आहेस," युरानं बोटानं बरीसला चाचपलं, "मी सहज लोळवीन तुला."

"युरा मला चिडवतो," बरीस नेहमीप्रमाणे गुरगुरला.

युरा अगदी प्रसन्नपणानं हसला. या दिवसाची तो केव्हापासून वाट पाहात होता. आपल्याला झालेला आनंद त्याला लपवता येत नव्हता. "ठीक आहे बाबा, आपली तुपली गट्टी चल, तू घेऊन चल मला शाळेत."

त्यांच्याकडे पाहात आम्ही कितीतरी वेळ खिडकीत उभे होतो. झोया पुढे, युरा आणि बरीस मागे प्रत्येकाच्या हातात दप्तर तिघंही चकरचंद खात चालले होते.

लवकरच, नव्यानच शाळेत जायला निघालेली इतरही मुलं रस्त्यावर दिसू लागली.

"एकाचेही वडील बरोबर नाहीत, शाळेत पोहचवायला," आईच्या आवाजात खिन्नता होती. 'शाळेतला पहिला दिवस म्हणजे केवढा सोहळा असायचा. आठवत?"

त्या दिवशी सकाळी कोणीही युद्धाचा विषय काढला नाही. परंतु दिवस सरता सरता, नव्यानं शाळेत गेलेली मुलं घरी परतायच्या वेळी, लढाईनं आम्हाला आपली आठवण करून दिली.

पंखावर लाल तारे असलेलं एक लढाऊ विमान आमच्या गावावरून अगदी खालून उडत गेलं. ते चांगलंच वेगात होतं. उडता उडता त्यानं आमच्या घराचं धुराडं उडवलं असतं, थोडक्यात चुकलं. साऱ्या खिडक्या थरथरल्या. मी बाहेर धाव घेतली. कोंबडीची पिलं क्लक क्लक करीत आसऱ्यासाठी सैरभैर धावत होती.

एखादा दगड जोरानं फेकावा अन तो खाली पडावा तसं ते विमान गावाबाहेरच्या दलदलीत कोसळून जोरानं घुसलं. आमचं घर तिथून मैल, दीड मैल अंतरावर असेल. कोणत्याही क्षणी विमानाचा स्फोट झाला असता.

मी डोळे मिटून घेतले पण अपेक्षित धडधडाट ऐकू आला नाही, कसला तरी जोरानं थप्प असा आवाज झाला; भिंतीवर ओला चिखल सपकन मारावा असा.

"इथं नुसता उभा राहू नकोस. पळ आणि पायलट जिवंत आहे का पहा. कदाचित तुझी त्याला काही मदत होऊ शकेल," बाबा म्हणत होते. ते माझ्या



पाठोपाठच बाहेर पडले असावेत. शक्य असतं तर ते स्वतःच त्या ठिकाणी पळत गेले असते, पण दुखण्यानंतर ते फार अशक्त झाले होते.

मी तिथं जाऊन पोहोचेपर्यंत पायलट त्या दलदलीतून बाहेर पडून कोरड्या जमिनीवर आला होता. त्याच्या अंगात चामड्याचं जाकीट होतं, डोक्यावर उड्डाण करताना घालतात तशी धातूची टोपी होती. अजूनही त्याचे पाय लटलटत होते. शाळेतून काही मुलं अपघाताच्या जागी धावली होती. पायलट मुलांपाशी आला. कसाबसा हसला आणि म्हणाला, "आश्चर्य आहे. इथं मुलं अजूनही शाळेत जातात म्हणायची."

"कुठं लागलं का तुम्हाला?"

"छट! नुसता एक ओरखडा निघालाय. जरा पाय दुखावला इतकंच. पण तो ठीक होऊन जाईल, हे बघ बाळ, काय नाव तुझं?"

"युरा. हा माझा मित्र वलोद्या."

"बरं! युरा, जरा मदत करणार का? माझं नाव लारत्सेव."

तेवढ्यात पंखावर लाल तारे असलेले दुसरं एक लढाऊ विमान उडत उडत गावावर आलं. त्यानं आम्हाला हेरलं आणि खाली येऊन ते घिरट्या घालू लागलं. पायलटनं युराला उचललं. त्याची टोपी काढून घेतली आणि कुठं उतरावं याबद्दल तो त्या टोपीनं सूचना करू लागला. वरच्या पायलटला त्याच्या खुणा समजल्या असाव्यात. कारण त्याने एक वळण घेतलं आणि खाली उतरण्यासाठी सूर मारला. त्याचं विमान कोरड्या जमिनीवर उतरलं. जमीन नीट सपाट होती. आम्ही उभे होतो तेथून जवळजवळ दीड किलोमीटर अंतरावर हे दुसरं विमान उतरलं.

"जरा दोन चार चांगल्या फळ्या मिळतील का?" पायलट माझ्याकडे वळून म्हणाला.

ही काही अवघड गोष्ट नव्हती. जवळच एक पडीक गोठा होता भराभर मी त्याच्या फळ्या उपसून घेतल्या. त्या दलदलीत मांडून आम्ही विमानासाठी पूल बनवला. इतक्या वेळेनंतर आता कुठे विमानाची भयानक दुर्दशा माझ्या लक्षात आली. विमानाचे पंख, शेपटी बाजू, साऱ्यांची अगदी चाळण झाली होती भोकं पडून. एकही भाग शाबूत नव्हता. पायलटचा दुखावलेला पाय सोडल्यास तो शीरसलामत राहिला हे मोठेच आश्चर्य होतं.

दुसऱ्या विमानाचा पायलट थोड्याच वेळात आमच्या जवळ येऊन पोहोचला. त्यानं आपल्या सहकाऱ्याला कडकडून मिठी मारली; "आम्हाला वाटलं तुझा खेळ आटोपला, सारं खलास पण तू तर गद्ध्या इथं साक्षात जिवंत!"

दोघेही उत्तेजित झाले होते; उचंबळून आले होते; तावातावानं हातवारे करीत होते; नुकत्याच झालेल्या हवाई युध्दाच्या तपशीलाची चर्चा करीत होते.

ते जे काय बोलत होते ते सारंच काही आम्हाला समजत नव्हतं, पण मुद्याचा भाग तेवढा नीट समजला. शरीराची चाळण झालेल्या या लढाऊ विमानानं जर्मनांच्या तीन विमानांचा बळी घेतला होता.

"आता कामाला लागायला हवं," लार्त्सेव म्हणाला.

विमान दलदलीत खाली खचत होतं. त्याची चाकं नजरेआड दिसेनाशी झाली होती आणि ते पंखावर विसावलं होतं.

पायलटच्या विनंतीवरून मुलं रिकाम्या बादल्या आणायला गावात धावली. युरा जेव्हा बादली घेऊन परतला तेव्हा बादलीत दुधाचा लोटा, ब्रेड आणि शिजवलेल्या मांसाचा तुकडा होता.

"फार छान मुलगा आहेस तू," लार्त्सेव म्हणाला. खिशातून त्यान चॉकोलेट बार काढला आणि युराच्या हातावर ठेवला; "हे तुला आणि तुझ्या मित्राना. दूध आणि ब्रेडबद्दल थँक्स. पण हे मांस तू घरी घेऊन जा. कामाला येईल."

काय करावं विचार करीत युरा चॉकोलेट हातातल्या हातात फिरवीत होता. मग त्यानं निर्धारानं त्याचा चकचकीत कागद टरकावला. चॉकोलेटचे सारखे चौकोनी तुकडे केले. भुकेल्या चिमण्यांच्या थव्याप्रमाणे मुलं चॉकोलेटवर तुटून पडली. यूराला काहीही शिल्लक राहिलं नाही.

"काय युरा, काय झालं ?" पायलटनं विचारलं आणि मग जीभ गालातल्या गालात फिरवीत तो मजेदार हसला, युराच्या चेहेऱ्यावर निराशा दाटून आली होती. पायलटनं पुन्हा एकदा खिशात हात खुपसला आणि चॉकोलेट काढलं. "अर्धं घेऊया. वेळप्रसंगी लागलं तर थोडसं राहू देत माझ्याजवळ. पटकन खाऊन टाक म्हणजे मग आपण कामाला सुरुवात करू."

आम्ही झडझडून कामाला लागलो. लार्त्सेवनं इंजिनमधून सारं तेल काढून घेतलं व बादल्यात भरलं. त्या बादल्या आम्ही दुसऱ्या विमानाच्या टाकीत नेऊन ओतल्या. जो काय दारुगोळा उरला होता तोही आम्ही दुसऱ्या विमानावर हलवला. तसा फारसा उरला नव्हताच.

कातडी जाकिटांनी उकडायला लागलं म्हणून दोघानीही ती काढून ठेवली. त्यांच्या छातीवर लटकवलेल्या बिल्ल्यांकडे मुलं आ वासून पहात राहिली. खरं सांगायचं म्हणजे मीही असे बिल्ले प्रथमच जवळून पहात होतो. आतापर्यंत पाहिले होते ते चित्रातले.

"हा कसला बिल्ला ? आणि ते पदक ?" मुलं अधीरपणानं प्रश्न विचारीत होती. "ऑर्डर ऑफ रेडबॅनर"..."ऑर्डर ऑफ रेड स्टार..."



नुकत्याच झालेल्या हवाई युद्धामुळे ते दोघेही वैमानिक अजूनही उत्तेजित झालेले होते. त्यांचे चेहेरे लाल झाले होते. त्या क्षणी आम्हाला वाटत होते, साऱ्या जगात यांच्याइतके शूर, यांच्याइतके देखणे दुसरे पुरुष नसतील !

युरा सारखा लार्त्सेवच्या आजुबाजूला घोटाळत होता, तो काही त्याला सोडत नव्हता. चालताना सरळ, बारक्या काठीचा आधार घ्यावा तसा लार्त्सेव युराचा आधार घेत होता. युरानं त्याची नकाशाची पेटी हातात वागवण्याची परवानगी मिळविली. लार्त्सेवच्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द युरा वरच्या वर झेलीत होता.

"मी काय म्हणतो युरा, तुला विमान आत चढून पहायचं आहे का ? उतरतोस का विमानात ?"

युरा एकदम गडबडला, त्याचा चेहेरा एकदम फुलून आला. कसेबसे त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले. "अ ऽ ऽ हं ऽ ऽ ऽ ! हो, चढू या की !"

लार्त्सेवने युराला उचलून एक झोका दिला; युरा अलगद पायलटच्या बैठकीवर जाऊन बसला. तो तिथल्या वेगवेगळ्या तबकड्यांकडे बोटं दाखवून विचारू लागला, "हे काय..."

लार्त्सेव तावडतोब उत्साहाने सांगू लागला, "याच्यावरून तुम्ही किती वेगानं चालला आहात ते कळतं ... याच्या वरून विमान किती उंचावरून जातं ते कळतं. हे हातात धरून विमानाला दिशा द्यायची ... तेल किती शिल्लक आहे ते इथे पाहिलं की कळतं. पहा, आता तेलाचा टिपूसही शिल्लक नाही, अरे ! अरे ! तू हात नाही लावायचा कशाला, चुकून कुठे भलतीकडे बोटं दाबली गेली की तू एकदम उडायला लागायचास; मग मला तुला पकडायला निघावं लागेल."

"मी आपलं नुसतं पहात होतो," युरा कुजबुजला,

त्या दोघाना सोडून आम्ही निघालो तेव्हा जवळ जवळ मध्यरात्र झाली होती. आमच्यापैकी प्रत्येकाने त्या दोघाना अगदी आवर्जून विनन्ती केली होती, त्यानी गावात चलावं व रात्र आमच्याबरोबर काढावी म्हणून. परंतु त्यानी ते मान्य केले नाही. विमानाजवळच झोपण्याचे त्यानी पसंत केले.

दुसऱ्या दिवशी पहाटेच आम्ही गावाबाहेर, विमानाकडे धाव घेतली. दलदलीत रुतलेले विमान जळत होते, त्यातून काळ्या धुराचा लोट उसळला होता. दुसरे विमान अदृश्य झाले होते.

" त्यानी या विमानाला आग लावली आणि दुसऱ्या विमानातून ते निघून गेले " बाबा म्हणाले.

" नाझीना ठोकून काढायला परत गेलेत ते " युरा म्हणाला.

युराने अंतराळ उड्डाण केल्यानंतर थोड्याच दिवसानी त्याला एक पत्र आलं. पत्रावर गोर्कीचा छाप होता. पूर्वीचा हवाई दलाचा वैमानिक लार्त्सेव याचे ते पत्र होते. १९४१ च्या सप्टेंबर महिन्यात क्लुशिनो खेड्याजवळ त्याला आपले विमान सक्तीने उतरवावे लागले होते. तिथे त्याला गावातली मुलं भेटली होती, युरा भेटला होता. त्यापैकी तो काहीही विसरला नव्हता.

लार्त्सेवनं पत्रात पुढे लिहिले होते, त्याच्याबरोबरचा वैमानिक (पत्रात त्याचं नाव होतं पण मी आता विसरलो ) लढाईत मारला गेला होता. " मला भेटलेला युरा नावाचा एक मुलगा एक दिवस वैमानिक होईल यावर माझा विश्वास बसला असता, परंतु १९४० ते १९५० या काळातल्या आम्हा वैमानिकांच्या दृष्टीने अंतराळ उड्डाण हे केवळ एक स्वप्नच होते."

माझी अशी पक्की खात्री आहे की ज्या अनेक व्यक्तीनी या ना त्या प्रकारे युराच्या मनात अंतराळात झेप घेण्याची कल्पना रुजविली, ज्यानी त्याच्या स्वप्नाला सुरेखित आकार दिला, त्या व्यक्तींमध्ये १९४१ साली आमच्या खेड्याजवळ ज्याना सक्तीनं उतरावं लागलं होतं त्या दोघा वैमानिकांचा निश्चितच समावेश होता.

...लढाऊ विमानात युरा वैमानिकाच्या जागेवर बसला आहे, शाळेतल्या पहिल्या दिवसानंतर त्याचे हात व तोंड शाईने माखलेले आहे, डोळे उत्साहाने नाचत आहेत ..तो युरा मी कधीही विसरणार नाही.

□ □



## १२ : आक्रमण

ऑक्टोबर आला, येताना धो धो पाऊस आणि जिवाला कुरतडणारी अनिश्चितता घेऊन आला. झात्स्कला जोडणारी टेलिफोनची तार तोडली गेली. आमचा रेडिओही गप्प झाला. टपाल येईनासे झाले. बाह्य जगाबरोबरचे सारे दळणवळण तुटले. किती दिवस हे असे चालणार होते, कोणालाच सांगता आलं नसतं.

एक दिवस मी सामुदायिक शेताच्या कचेरीत गेलो; सारा शुकशुकाट होता; साऱ्याला एक उजाड अवकळा आली होती. कुठंतरी जळक्या कागदांचा वास सुटला होता. एका लहानशा टेबलावर वायरलेस सेट धूळ खात पडला होता, कुणाला त्याची आठवणही नव्हती. सहजगत्या मी तो सुरू केला. कोणत्या तरी परकीय भाषेतले शब्द कानावर पडू लागले. मधून मधून कवायतीचा धडाकेबंद आवाज, कर्कश स्वर कानावर येत होते. आपली फत्ते झाली म्हणून जर्मनांची 'काव् काव्' चालली होती.

त्यानी जल्लोश करावा याला कारणही होतं. ब्रेस्ट, मिन्स्क, ग्रोद्नो, ल्वोव, ओशी, स्मोलेन्स्क आणि इतर कितीतरी शहरं आणि खेडेगावं त्यांच्या हाती पडली होती. सोविएत माहितीखात्याच्या जुन्या वार्तापत्रांवरून आम्हाला त्या साऱ्या बातम्या कळत. काही ठिकाणी तर जर्मन शिपायानी इतकी खोल धडक मारली होती की आता झात्स्क आणि क्लुशिनो त्यांच्या पिछाडीला पडत होती.

जर्मन लोक आनंदाने आपले नारे बडवीत होते खरे. पण त्यांचा हा आनंद फार काळ टिकणार होता काय ?

अशीच एक रात्र. मिट्ट काळोख पडला होता. जंगलातली गस्त आवरून मी घरी परत फिरलो होतो. अगदी गच्च भिजून गेलो होतो. थंडीनं हाडं पार काकडून गेली होती. आम्ही जे दररोज हेरांचा आणि पळपुट्यांचा शोध घेऊ पहात होतो त्याला काही खरंच अर्थ होता का ? शत्रूला सामील झालेला एखादा

घातपाती समजा सुदैवानं जरी माझ्या हाती लागला असता तरी मी काय करणार होतो ? मी काही त्याला झात्स्कला नेऊ शकलो नसतो, रस्ता धोक्याचा होता. आणि अशा बाबतीत काही निर्णय घ्यायचा क्लुशिनोमध्ये कुणाला तसा अधिकारही नव्हता. दिवसेंदिवस गावच्या मुलांना गस्त घालण्याचा कंटाळा येऊ लागला; त्यात त्यांना काहीच अर्थ दिसत नव्हता; नाईलाजानं, मनाविरूद्ध ते गस्त घालीत होते इतकंच. शिवाय पहिल्यापेक्षा आता आमची संख्याही रोडावली होती. आमच्या लष्करी तुकड्यांनी माघार घेतल्यानंतर आमच्यातल्या काही जणांना पूर्व प्रदेशात पाठवण्यात आलं होतं; जे अजून लहान होते, लष्करात दाखल होण्याचं ज्यांचं वय नव्हतं, त्यांना संरक्षणविषयक उत्पादन करणाऱ्या कारखान्यात बोलावून घेण्यात आलं होतं.

घोड्याची टाप पडली की रस्त्यावरच्या चिखलाचा रपक् रपक् आवाज येत होता. घोड्याला दिशा अचूक समजत. त्याच्या शहाणपणावर अवलंबून मी अगदी बिनघोर असे. तो नेटका घरापाशी जाऊन उभा राही. आताही मी लगाम ढिले सोडले, घोडा चालत राहिला.

"रुक जाव !"

हुकूम इतक्या जोरानं, इतका ध्यानीमनी नसताना आला की घोडा खिंकाळला आणि मागे सरला. लगामाला कोणाचा तरी हात पडला. माझ्या चेहऱ्यावर फ्लॅशलाईटचा इतका तीव्र झोत रोखला गेला की मी पार आंधळाच झालो.

"जरा उजेड दूर करा," मी म्हणालो.

"लाईट खाली करा," बोलणाऱ्याचा आवाज ओळखीचा वाटला, " मला वाटतं हा आपल्यातलाच एक आहे. पोरा, खाली उतर; मला तुझ्याशी काही बोलायचंय."

मी मुकाट्यानं खाली उतरलो.

तो ओळखीचा आवाज अंधारात बोलत राहिला. "ओळखलं नाहीस मला? मी विक्तर काचेव्स्की. इतक्या लवकर विसरलास काय मला ? तू वाल्या गागारिन अलेक्सी गागारिनचा मुलगा तू, होय ना ?"

"होय," आता मी जरा शान्त झालो होतो. माझ्या गाववाल्याचा आवाज मी ओळखला. लढाईला तोंड लागलं तेव्हाच काचेव्स्कीला बोलावणं आलं होतं. अगोदर तो सामुदायिक शेतावर ड्रायव्हर म्हणून कामाला होता. बेलोव आणि काचेव्स्की हे शेजारी शेजारी.

श्वासोच्छ्वासाचा जोरदार संमिश्र आवाज व खोकल्याचे आवाज यावरून मी ताडलं, काचेव्स्की एकटाच नव्हता, त्याच्याबरोबर दुसरेही लोक होते.



"काळजीचं कारण नाही," तो म्हणाला, "सारी आपलीच विश्वासातली माणसं आहेत. आम्ही तुला थांबवलं ते काही विचारायला. गावात काही जर्मन आले आहेत का ?"

"अजून तरी नाही. आपल्या लष्कराच्या तुकड्या तेवढ्या गेल्या गावातून आज. त्या माघार घेत होत्या. तुम्ही इथं कसे ?"

"तसेच; माघार घेत घेत आम्ही इथं आलो. आजकाल सगळीकडे माघार घेण्याशिवाय बात नाही दुसरी."

त्याचा आवाज संतापानं आणि कडवटपणानं माखला होता. मग त्यानं पटापट सारी हकीगत सांगून टाकली. शत्रूनं कोंडी केल्यावर वेगवेगळे लहान लहान गट करून ते कोंडी फोडून बाहेर पडू पहात होते. त्याच्या गटात सातजण होते, ते सारे सैबेरियातून व उरालमधून आले होते. आघाडी फोडून मॉस्को गाठायचा त्यांचा प्रयत्न होता. पण दर वेळी जर्मन शिपायांनी त्यांना घेरले होते. दर वेळी लढत लढत ते माघार घेत होते. करता करता शेवटी ते क्लुशिनोच्या परिसरात येऊन पोहोचले होते.

"झात्स्कमध्ये सुद्धा जर्मन शिरले आहेत. कधी गनिमी सैनिकांबद्दल बोलणं निघालं होतं का इथं ?" त्या शिपायांनी विचारलं.

"तुम्हीच तर सांगितलत ना सगळीकडे लढाई चाललीय म्हणून ? ते इथं कशाला येतील ?" मी आश्चर्यानं विचारलं; "इथं कोणीही नाही आणि कोणाबद्दल बोलणंही निघालं नाही."

"ठीक ठीक; अजून आले नसले तरी आता येतील." त्यांच्यापैकी एक जण गंभीर आवाजात म्हणाला, "काचेव्स्की, तुझ्या गावचा रस्ता दाखव. पोटात कावळे कोकलताहेत. जरा आपलं बाडबिस्तरही सुकवायला हवं."

गावापाशी आल्यावर आम्ही वेगवेगळे रस्ते धरले. मी पाहिलं; त्या प्रत्येकापाशी रायफल होती.

घरात प्रचंड उलथापालथ चालली होती. मी उंबरठा ओलांडताच बाबा गरजले, "कुठं अडमडला होतास नेमक्या याच वेळी ! इथं घर सोडायचं म्हणून सारी बांधाबांध चालली आहे आणि तू हवा खायला बाहेर."

"घर सोडून कुठं जायचं ?"

मग माझं लक्ष तिकडं गेलं. लाकडाचा पेटारा दोरीनं बांधून ठेवला होता. अनेक गाठोडी बांधून तयार होती. सारेजण प्रवासाला निघण्यासाठी कपडे घालून तयार झाले होते.

मी बाकड्यावर बसकण घेतली आणि अनावर होऊन खो खो हसत सुटलो. साचून राहिलेल्या ताणाचा तो उद्रेक असावा. वळकटी बांधून ठेवली होती तीवर

युरा, बरीस आणि झोया एकमेकाना खेटून बसले होते. ते घाबरून एकटक माझ्याकडे पाहू लागले.

"फार उशीर झालाय्," माझ्या दाटलेल्या घशातून कसेतरी शब्द बाहेर पडले; मूर्खासारखा हसत सुटलो होतो त्यानं शरीर अजूनही हादरत होतं. "बाबा, वेळ निघून गेलीय आता."

"तोंड बंद कर! आता घोडा जोडू की दोन तासात झात्स्क. तिथून जायचं मोझेइस्कला, तिथं गेलो की मॉस्कोच्या दारातच पोहोचलो आपण. तिथून जायचं मोर्दोवियाला, पावेलकाकांकडे. त्यांचा पता आहे माझ्या जवळ."

"झात्स्कमध्ये जर्मन शिरले आहेत. सगळीकडे पसरले आहेत ते;" मी सर्वाना काचेव्स्कीशी झालेली भेट व बोलणी सांगितली. त्याच्याबरोबरचे सैनिक कसे बलदंड होते, प्रत्येकाजवळ कशी रायफल होती वगैरे सारं काही सांगितलं. त्यांच्या जवळ तर सामानसुमान काहीच नव्हतं. तरीही त्याना मॉस्कोला जाता आलं नव्हतं. उलट, आमच्याबरोबर लहान लहान मुलं होती, उरलं सुरलं सारं सामान होतं.

तेवढ्यात एकापाठोपाठ एक सहा फैरी झडल्याचे आवाज आले. मोठमोठ्या बंदुका क्लुशिनोवर आग ओकीत होत्या. खिडक्या दारं हादरली. कदाचित शत्रूचा ताफखाना आपल्या पल्ल्याची चाचणी करीत असावा किंवा आमच्याच सैन्याची काहीतरी गफलत झाली असावी. सध्या तर कोणाला कांहीच सांगता आलं नसतं.

काय चाललंय ते बाहेर जाऊन पाहून यायला मी कचरलो, काही गोळ्या थेट बागत घुसल्या होत्या. पण घरात बसून राहणंही तितकंच धोक्याचं होतं. जर घरावरच एखादा गोळा येऊन पडला असता तर साऱ्याचाच शेवट झाला असता. घर म्हणजे कुटुंबाच कबरस्तान ठरलं असतं.

बाबानां अंगातलं जाकीट कांढलं आणि खाली बसून ते बुटाचे बंद सोडू लागले. मग ते आईला म्हण ले, "मातोश्री, सोडा ती गाठोडी आता, चला रे बिछाने घ्या घालून. रात्री चांगली झोप झाली पाहिजे. म्हणजे सकाळी सारीजण छान ताजीतवानी होतील."

सकाळ उजाडला. झोया आणि युरा नेहमीप्रमाणे शाळेत गेली. तासादीड-तासात बातमी आली. गावच्या सोविएतात जर्मन आले आहेत. त्यांच्या जवळ मोटर-सायकली आहेत. त्याच दिवशी शत्रूच्या एका मोठ्या तुकडीनं आमच्या गावचा कबजा घेतला.

मी अजून पावेलकाकांच्या घरीच राहात होतो. एक नाझी जनरल व त्याचा मोठा ताफा यानी त्याच घरात तळ ठोकळा होता. मला घर सोडून जायला मनाई होती. बाहेर आऊटहौसमध्ये जायला सुद्धा परवानगी मागावी लागे.



जनरलच्या घराचा कारभार एक लठ्ठंभारती सार्जंट मेजर पहात असे. त्याच्याकडून परवानगी घ्यावी लागे.

मी मोठ्या अपमानकारक परिस्थितीत सापडलो होतो. त्यात भर म्हणजे मला माझ्या आई-वडिलांची भावाची, बहिणीची काहीच बातमी नव्हती. कसे होते ते? अजून जिवंत होते ना? जनरलच्या घराकडे फिरकण्याची एकाही गाव-वाल्याची हिंमत झाली नाही. ते स्वाभाविकच होतं. त्यामुळं घरी कोणाच्या हाती निरोप पाठवायचा म्हटलं असतं तरी ते शक्य झालं नसतं.

एके दिवशी पहाटेच मी पडवीतल्या खिडकीपाशी जाऊन उभा राहिलो बाहेर काय चाललंय् ते पाहू लागलो. रस्त्यावर शुकशुकाट होता. एक बाई पाणी भरायला चालली होती; एक मुलगा शेजारच्या घरात जात होता. बस्. बाकी कोणी नाही. घरोघरच्या धुराड्यातून निळसर धूर वळणं घेत घेत वर चढत होता, बाकी बघायला असं काही नव्हतं.

अचानक युरा माझ्या दृष्टीस पडला. ते इतकं अनपेक्षित होतं की, पहिल्यान मला वाटलं, आपले डोळे फसवताहेत आपल्याला.

तसं काही नव्हतं. युराच होता तो.

अगदी जवळ होता तो. फाटकापासून जेमतेम वीस पावलांवर. फाटकापाशी एक उंच संत्री पहारा देत होता; सबमशीन गन घेऊन. एका लहानशा खड्ड्यापाशी हिरवळीचा तुकडा होता. त्यावर युरा बसला होता. खड्ड्यात पाय सोडून हलवीत होता; वारंवार चोरून पावेलकाकांच्या घरावर नजर टाकीत होता.

"माझं कसं काय आहे ते पहायला आला असणार," मला खात्रीच होती तशी. "अगोदर कितीदा याच्या इथं फेऱ्या झाल्या असतील कोणास ठाऊक!"

त्याला इथून कशी खूण करता येईल? रस्त्यावर जाणं तर अशक्यच होत मला. जनरलचा मुक्काम बाहेरच्या खोलीत असल्यानं त्या बाजूच्या रस्त्यावरच्या खिडक्या 'प्रवेश नाही' क्षेत्रात मोडत होत्या.

मी प्रयत्न करायचं ठरवलं. बागेत जावं आणि फाटक उघडावं. तो संत्री नक्कीच अंगावर धावून येईल. पण तो मला गोळीही घालणार नाही. युरा निदान मला पाहून घेईल आणि घरी जाऊन सांगेल की, वाल्या ठीक आहे म्हणून. कदाचित तो ओरडून माझ्याशी दोन चार शब्द बोलेलही.

मी दरवाजाकडे निघालो, तेवढ्यात लठ्ठंभारतीनं स्वयंपाकघरातून ठणाणा केला. "इवान? इकडे ये! इवान!"

त्याच्या दृष्टीनं मी-आणि कोणताही रशियन म्हणजे 'इवान'च होतो. कोणतंही व्यक्तिमत्व, कोणताच तोंडवळा नसलेला इवान!

आपल्या पट्ट्यात बोटं खोचून सार्जंट मेजर स्वयंपाकघरात मधोमध उभा

होता. पांढरी टोपी घातलेला स्वयंपाकी विटांच्या चुल्याजवळ उभा होता.

सार्जंट मेजरनं मानेनेच अंगणाकडे खूण केली आणि मोडक्या तोडक्या भाषेत म्हणाला, "एक कोंबडी घेऊन ये. चांगली गुबगुबीत कोंबडी. पळ लवकर"

पावेलकाकांच्या खुराड्यात अजून चाळीस पन्नास कोंबड्या शिल्लक होत्या. जनरलच्या घरात रोज चार पाच कोंबड्या गट्ट होत होत्या.

युराचं लक्ष माझ्याकडे कसं बरं ओढून घेता येईल ? त्याला हाक मारणं धोक्याचं ठरलं असतं. मी खुराड्यातून एक कोंबडी काढून घेतली; डाव्या बगलेत तिला दाबून धरली. तिथं भिंतीत काचेचं एक लहानसं तावदान मातीनं बसवलं होतं. उजव्या हातानं मी ते तावदान हलकेच उखडून काढण्याच्या प्रयत्नाला लागलो. युराला माझी खूण समजायला हवी. तावदान हलकेच जमिनीवर पडलं. मोकळ्या झालेल्या जागेतून मी कोंबडी बाहेर ढकलून दिली. क्लक् क्लक् आवाज करीत ती फडफडत फाटकापाशी गेली. तिथून संत्र्याच्या पायापाशी जाऊन थांबली. त्यानं अगदी निर्विकारपणं तिच्याकडं पाहिलं आणि तो पचकन थुंकला. मग खांद्या-वर बंदूक टाकून तो कुंपणाच्या बाजून पुढेमागे येरझारा करू लागला.

अर्धवट झोपेत असलेली कोंबडी वरून टाकल्यामुळं सुन्न झाली होती. कल कल करीत ती धुळीनं भरलेल्या रस्त्यानं खाली धावू लागली. युराचं चटकनं लक्ष गेलं. कोंबडी आपोआप, काही कारण नसता फाटकाबाहेर धावत येण्याचं कारण नव्हतं. त्यानं उडी मारली आणि कुंपणाच्या बाजूबाजूने, त्या संत्र्याच्या रोखाने तो चालू लागला. त्यानं घर मागं टाकलं आणि थोड्याच वेळात तो खुराड्याच्या पुढ्यात येऊन उभा राहिला.

"युरा," मी हलकेच हाक मारिली, "युरा, मी वाल्या बोलतोय्. ऐकू येत का तुला ?"

युराची पावलं जमिनीला खिळली. माझ्या आवाजाच्या रोखानं त्यानं वळून पाहिलं. तो प्रथम आश्चर्यचकित झाला पण मग त्याचा चेहेरा एकदम उजळला. "कुठं आहेस तू ?"

"खुराड्यात. तू तिथं जागच्या जागी उभा राहू नकोस. खाली वर चकरा मार आणि येता जाता मला घरातली सारी माहिती सांग." सावधगिरी म्हणून मी दुसरी एक कोंबडी उचलून बगलेत दाबून धरली. मग भिंतीत मोकळ्या केलेल्या जागेशी तोंड लावून उभा राहिलो.

"इवान."

मी चमकलो आणि मागे वळलो. तो छळवादी सार्जंट मेजर माझ्या मागेच आपल्या आवडत्या पवित्र्यात, पट्ट्यात बोट खोचून उभा होता; ओठावर कपटहास्य खेळत होतं. हा फॅसिस्ट कुत्रा माझा मार्ग काढीत माझ्या मागोमाग आला होता.



आणि मी बेसावध पकडला गेलो होतो. योग्य ती खबरदारी घेतली नाही तर फळ भोगल्यावाचून सुटका नाही.

त्यानं माझ्या बगलेतली कोंबडी काढून घेतली, ती फिरवून भिरकावून दिली आणि एक शब्दही न बोलता खाड्कन माझ्या मुस्कटात ठेवून दिली. तो मला तडाखे देतच राहिला.

"वाल्या, कुठं आहेस तू ? वाल्या, चल आपण घरी जाऊ या," युरा कळवळून हाका घालीत होता.

त्या फॅसिस्टानं पुन्हा मला एक काड्कन ठेवून दिली.

"काहीही केलं नाही मी," मी ओरडलो.

"चूप," तो खेकसला. मला तो हिसके देत होता आणि तडाखे देत होता "जा, कोंबड्या घेऊन ये" शेवटी त्यानं हुकूम केला आणि चार बोटं दाखवली.

एव्हाना साऱ्या कोंबड्या खुराड्यातून अंगणात पळाल्या होत्या. चार कोंबड्या आणायला मी पण बाहेर धावलो. आता टंगळमंगळ केली असती तर त्या कोंबडीचोरानं माझी गय केली नसती.

शेवटी एकदाचा तो घरात गेला आणि मी भिंतीत मोकळ्या केलेल्या जागे-कडे धाव घेतली. पण युरा निघून गेला होता.

त्यानंतर दोन दिवसांची गोष्ट. सार्जंट मेजर सकाळीच उठून पुरवठा-केंद्रा कडे निघून गेला होता. जनरल त्या रात्री झोपला नव्हता. सकाळच्या किंवा रात्रीच्या जेवणालाही आला नव्हता. जर्मन नोकराचाकराना रान मोकळं सापडलं होत. त्यांनी नाचाचा कार्यक्रम ठरवला.

"इवान," एकानं जोरानं हाक मारली. मग काही रशियन काही जर्मन अशा धेडगुजरी भाषत तो मला काही तरी समजावून सांगण्याचा प्रयत्न करू लागला. त्याच्या मोडक्या-तोडक्या भाषेतून आणि हातवाऱ्यातून मी उमजलो; त्याना घरी बनवलेली गावरान व्होडका हवी होती; तिची किंमत ते जर्मन नाण्यात चुकवायला तयार होते.

"ठीक आहे," मी म्हणालो. कोणी सांगावं, या आलेल्या संधीतून काही साधताही येईल. ते मला फाटकाबाहेर जाऊ देतील-मग माझा मी.

पण मला वाटलं त्यापेक्षा ते जास्त चलाख निघाले. ज्यानं मला माझी कामगिरी समजावून सांगितली होती त्यानं आपली बंदूक उचलली आणि दाराच्या दिशेनं फर्मावलं. आता मला दुसरा पर्यायच नव्हता; मुकाट्यानं त्याच्या मागोमाग जाणं भागच होतं. त्याला गावातून नेताना मी आमच्या घरावरून जाणारा रस्ता निवडला. माझ्या मागे दोन पावलांचं अंतर राखून तो चालत होता. साऱ्या

जगाच्या दृष्टीनं तो पहारेदार व मी त्याचा कैदी होतो. त्याच्या रायफलीची नळी माझ्या मानेवर टेकली नव्हती इतकंच काय ते.

आमचं घर दिसू लागलं. पहिल्यादा दिसले ते बाबा. आपला लंगडा पाय ओढीत ओढीत ते पडवीत आले, त्यांच्या हातात एक फावडं होतं. मागोमाग आई आणि झोया आल्या. प्रत्येकीच्या हातात फावडं होतं.

माझी पावलं रेंगाळायला लागली. बाबांचा ओढलेला उतरलेला चेहेरा पाहून मला काळजी वाटू लागली. आईच्या व झोयाच्या चेहेऱ्यावरही ताणाच्या खुणा स्पष्ट उमटल्या होत्या. त्यानी घराचा कोपरा ओलांडला. माझ्याकडे कुणाचंच लक्ष गेलं नाही. मग युरा आला. त्याच्या दोन्ही हातात एकेक वीट होती. त्याचा सारा आव एखाद्या महत्त्वाच्या मोठ्या माणसासारखा वाटत होता.

मी आणखीनच रेंगाळलो, जवळजवळ थांबलोच.

"पावलं उचल पटपट," सैनिकानं फर्मावलं, "इवान, पाऊल उचल झटझट.'

"ते माझं घर आहे, समजलास ?" मी तिरीमिरीनं म्हणालो, "माझे वडील, आई तिथं आहेत, कळलं ?"

"पाऊल उचल," तो गरजला.

तो आरडा ओरडा करायला लागला; मनात मला मोठं समाधान वाटायला लागलं. हेच तर मला हवं होतं. युरा पुन्हा एकदा कोपरा ओलांडून आला. त्याने आमच्याकडे पाहिलं.

"वाल्या !" त्याचे हात बाजूला खाली कोसळले, हातातल्या विटा गळून पडल्या. "आई ! बाबा ! एक शिपाई वाल्याला पकडून घेऊन चाललाय !"

क्षणार्धात आई, बाबा, झोया पडवीपुढे आले. माझ्याकडे पहाताच काळजीन त्यांचे चेहरे काळवंडून गेले, आक्रसले.

"काळजीचं कारण नाही. गावरान व्होडका शोधायला बाहेर पडलो आहोत." मी ओरडून सांगितलं, "काय खणायला निघालात तुम्ही ?"

"आसरा. या कुत्र्यानी आम्हाला घराबाहेर हुसकावून लावलं. काही दिवस गंजीच्या खोलीत राह्यलो. पण मग तिथूनही हुसकलं."

"पाऊल उचल," सैनिकानं फर्मावलं आणि दस्त्यानं मला ढकललं.

मी बळे बळे चालायला लागलो. कानावर शेवटचे शब्द पडले ते बाबांचे. ते म्हणाले, "वाल्या जपून रहा. उगीच कुठं तरी, नको तिथं डोकं खुपसू नकोस.'

युरा माझ्याकडे यायला निघाला होता. सैनिकानं खेकसून त्याला पिटाळून लावलं.

दुसऱ्या एका रस्त्यानं आम्ही परत फिरलो. फाटकाशीच सार्जंट मेजर खडा



होता. आमच्या व्होडकाच्या बाटल्या त्यानं खस्कन ओढून घेतल्या आणि कुंपणावर आदळून त्यांचा चक्काचूर केला पहाऱ्यावरचा संत्री आ वासून पहातच राहिला. माझ्याबरोबरचा शिपाई चळचळा कापत उभा होता. सार्जंट मेजरनं मूठ आवळून खाड्कन त्याला एक ठेवून दिली.

"चांगली अद्दल घडली, असंच पाहिजे होतं तुला" मला आनंद झाला होता. साऱ्या रस्त्याभर त्यानं मला कसं ढोशीत आणलं होतं त्याची मला आठवण होती. काही असो, या सक्तीच्या कामगिरीमुळे मला माझ्या घरची माणसं डोळयानी पहाता आली होती मला लागलेली काळजी निश्चितच कमी झाली.

पावेलकाकांच्या घरात मी दोन आठवडे कैदी होतो. कोंबड्या आणणं, लाकडं फोडणं, पाणी भरणं अशा कामातून मला जेव्हा मोकळीक मिळे तेव्हा मला चुल्याजवळच्या गरम ओटयावर रहाण्याचा हुकूम होता. रात्रं-दिवस माझा मुक्काम तिथंच असे.

माझे हात, पाय, शरीर त्या उष्णतेनं करपून गेलं होतं. तिथं जीव घुसमटायचा. अन्नावरची माझी वासनाच अजिबात उडाली. जाडयाभरडया घोंगडीवर मी या कुशीवरून त्या कुशीवर करीत राही. ओटयाची उष्णता घोंगडीला दाद न देता मला भाजत राही. पडल्या पडल्या माझे अनंत बेत चालत. त्या लठ्ठंभारती सार्जंट मेजरला पकडायचं आणि त्याच्या डोक्यावर हंडाभर उकळतं पाणी ओतायचं म्हणजे त्याचा जीव जाईल. पण मग ते मलाही गोळी घालतील. छें ! छें ! असं करून चालणार नव्हतं. समजा, मी अगदी हलकेच सरपटत सरपटत अंगणात गेलो आणि त्याच्या टाळक्यात एखादं लाकूड मारून ते फोडून टाकलं तर ? पण मग त्याचं प्रेत कुठं लपवता येईल मला ? ते नक्कीच त्याला शोधून काढतील...... "वाल्या, जपून रहा. उगीच कुठतरी नको तिथं डोकं खुपसू नकोस," बाबांचे शब्द मला आठवले.

परन्तु सूडाची ही स्वप्न पहाणं एवढा एकच काय तो विरंगुळा होता मनाला.

बाहेरच्या पडवीत कोणीतरी नाकात गात होतं. दार उघडं होतं. दारूनं जड झालेले आवाज कानावर पडत होते. बाटल्यांची बुचं फटाफट उडत होती. जनरल आणि त्याचा ताफा, जर्मनांना नुकताच मिळालेला विजय साजरा करीत होते. सार्जंट मेजर, स्वयंपाकी आणि दोघे शिपाई खाण्याच्या पदार्थांच्या थाळया आणि चकचकीत लेबलं असलेल्या बाटल्या घेऊन आतबाहेर धावत होते.

एका अधिकाऱ्यानं स्वयंपाक घरात डोकावून पाहिलं. "अरे इवान......" तो जोरात खेकसला. चांगलाच जाडजूड, दांडगा होता तो. त्याच्या डाव्या डोळयाच्या वर कशाचा तरी पट्टा होता.

मी धुराड्यामागे चोरून उभा राहिलो.

एक स्टूल घेऊन तो त्याच्यावर उभा राहिला. त्याच्या हातानं मला बरोबर टिपलं. माझ्या शर्टाची कॉलर खेचत तो ओरडला, " चल." मी ओटचावरून ओढला गेलो. " चल, जाऊ, " त्यानं मला दाराबाहेर ढकलत नेलं. मग त्यानं बाहेरच्या पडवीत डोकावून सर्वांना काहीतरी ओरडून सांगितलं. सर्वांना चांगलीच चढली होती. सारेजण पडवीतून बाहेर पडले. एक दुभाष्या आणि एक तरुण लेफ्टनंट यानी जनरलला हात दिला होता.

" बागेत जाऊन उभा रहा. " दुभाष्यानं मला सांगितलं.

मला काही ते चिन्ह बरं दिसलं नाही. पण नन्तर जे काय घडलं त्याची कल्पनाही मला कधी आली नसती. मला कुंपणापाशी जाऊन दोन्ही हात लांब करून उभं राहायला सांगितलं. दारुच्या दोन रिकाम्या बाटल्या माझ्या दोन हातात खुपसल्या गेल्या. मग त्या अधिकाऱ्यानं माझ्यापासून दहा पावलांचं अंतर मोजून तिथं एक रेघ मारली. रेघेमागे सारे अधिकारी गोळा झाले.

अंधार पडायला लागला होता. माझ्या साऱ्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला होता. माझा विचार चालेनासा झाला. एका चमत्कारिक औदासिन्यानं मला पुरतं घेरून टाकलं.

निशाण मारण्याची पहिली संधी त्या एकाक्ष अधिकाऱ्याला देण्यात आली. त्याचा नेम अचूक होता. दोन्ही बाटल्या त्यानं नेमक्या टिपल्या. काचेचे तुकडे उडाले आणि चेहेऱ्यात इकडे तिकडे घुसले. रक्ताचे ओघळ सुरु झाले.

तो तरुण लेफ्टनंट धावत माझ्याकडे आला आणि त्यानं पुन्हा दोन रिकाम्या बाटल्या माझ्या हातात खुपसल्या. कोणी तरी जनरलच्या हातात पिस्तुल आणून दिलं. झोकांड्या खात खात जनरलनं हात वर उचलला.

मी डोळे मिटून जगाचा निरोप घेऊ लागलो.

गोळी सुटली. निदान मला तरी एकच ऐकू आली. पिस्तुलात दोन गोळ्या होत्या. एक माझ्या खांद्याच्या वरून सणसणत जाऊन कुंपणाच्या फळकुटांत घुसली, दुसरीनं एका बाटलीचा चुराडा केला.

सगळीकडून ' वा ', ' वा ', ' वाहव्वा ' चे आवाज उठले. मी डोळे उघडले. जनरलचे अभिनंदन करण्याच्या भाऊगर्दीत अधिकारी पायात पाय अडकवून एकमेकांवर कोसळत होते. जनरल चेहऱ्यावर आदबशीर माफक हसू खेळवीत सर्वांच्या अभिनंदनांचा स्वीकार करीत होता. दुभाष्या दूर अंतरावर एका सफरचंदाच्या झाडाखाली उभा होता; उघड्या होल्स्टरच्या पट्ट्याशी खेळत होता.

कोणीतरी जनरलला दुसरं एक पिस्तुल भरून आणून दिलं. पण तो नशेत



भेलकांडत होता. तसंच वळून, लटपटत्या पायानं तो घराच्या दिशनं निघाला. अधिकारीही त्याच्या मागोमाग गेले.

माझ्या पत्रिकेनं माझ्या आयुष्याची दोरी बळकट विणली होती खरी.

कसाबसा मी चुल्याजवळच्या ओटचावर चढलो. अंग बर्फासारख थंडगार पडलं होतं; मी अजूनही कापत होतो.

बाहेरच्या पडवीत मौजमजा आणि धिंगाणा चालू होता.

" अरे ए पोरा ! " कोणीतरी रशियनमध्ये हाक मारली.

तो दुभाष्या माझ्याकडे पहात होता. त्याच्या एका हातात व्होडकाचा ग्लास होता; दुसऱ्या हातात भरपूर लोणी लावलेला ब्रेडचा तुकडा होता. " पिऊन घे. मग तुझं हे कापणं थांबेल."

मी ग्लास तोंडाला लावला अन् त्याच्या कडेवर माझे दात करकर वाजायला लागले. घशात आलेला आवंढा गिळला आणि सारा ग्लास रिकामा केला त्या होडकाची चव देखील मला समजली नाही.

" खाली ये. तुझ्यासाठी बाहेर कोणी थांबलंय," तो म्हणाला. माझा हात धरून त्यानं मला बाहेरच्या पडवीत नेलं. त्यानं मला फाटकाशी नेलं, दरवाजा उघडला आणि जर्मन भाषेत त्या संत्र्याला काहीतरी सांगितलं. कंटाळवाणा चेहेरा करून तो सशस्त्र संत्री दुभाष्याचं बोलणं ऐकत होता. मग रस्त्याकडे पहात त्यानं मान हलवली.

"तुझा भाऊ तुझी वाट पहात बाहेर थांबलाय्. तू त्याच्याशी बोलू शकतोस," दुभाष्या म्हणाला.

युरा रस्त्यावर उभा होता.

" ते इथं गोळीबार कशासाठी करीत होते वाल्या ?" मी युराजवळ गेलो तेव्हा त्यानं विचारलं.

मी उत्तर दिलं नाही. सरळ गावचा रस्ता धरला. मी त्या भयंकर घरापासून दूरदूर जात होतो, युरा माझ्या मागोमाग लगबगीनं येत होता. आमच्या घरानं जिथं आसरा खणला होता, तिथं जाऊन पोहोचेपर्यंत मी एकदाही थांबलो नाही.

" किती पांढराफटक पडला आहेस ! " आई थरकली. तिला मन आवरेना. कितीतरी वेळ गेला पण ती काही सावरेना. माझा आवर सुटला, मी रडायला लागलो. हुंदके देत देत कशीबशी मी माझी हकिगत त्याना सांगितली.

" तिथं परत जायचं नाही आता. काय वाटेल ते होवो." बाबा खंबीरपणानं म्हणाले, " जा, बिछान्यात जाऊन झोप, सकाळी मन हलकं होईल."

युरानं माझ्या गळयात हात घातले अन् म्हणाला, " तू माझ्या बिछान्यात झोप, माझ्या शेजारी "

मातीचे ओटे घालून, त्यावर गवताच्या पातळ गाद्या घालून बिछाने बनविले होते. मी बिछान्यावर पडलो, युराही माझ्या शेजारी झोपला. तो सारखा मधून मधून आपला हात माझ्या भोवती टाकीत होता. लवकरच तो गाढ झोपी गेला. त्याचा उष्ण श्वासोच्छास मला जाणवत होता, ऐकू येत होता. अंमळशाने मी शान्त झालो. पहाता पहाता अनावर झोपेने मला घेरले.

डोळे मिटण्यापूर्वी मी पाहिलेली शेवटची गोष्ट–बाबा आपली कुऱ्हाड दरवाजापाशी ठेवीत होते. मग त्यानी फुंकर घालून पणती विझवली.

दुसऱ्या दिवशी मी जागा झालो तो युराच्या ओरडण्यानं. त्यानं दरवाजा उघडा टाकला होता आणि तो मोठमोठ्यानं ओरडत होता। " हुर्रो ! हुर्रो ! जर्मन निघून गेलेत ! औषधाला एक सुद्धा शिल्लक नाही ! "

ते सारं पथकच्या पथकच मॉस्कोच्या दिशेनं चालू लागलं होतं.

आमच्या कुटुंबाला धार्मिक काही म्हणता आलं नसतं. पण सारा दिवसभर मी अगदी मनापासून प्रार्थना करीत होतो; तो जनरल, तो लठ्ठंभारती सार्जंट मेजर आणि तो एकाक्ष अधिकारी, सारे वाटेतच आटपू देत !

त्याच दिवशी संध्याकाळी मला समजलं, जनरलच्या तुरुंगातून माझी सुटका करण्याचं श्रेय युराकड होतं. मी कुठंतरी नजरेला पडेन या आशेनं पावेल-काकांच्या घराच्या अंगणाला लागून असलेल्या हिरव्या गवताळ मैदानावर युरा दररोज भटकत रहायचा. त्या दिवशी फळबागेत झालेला गोळीबार जेव्हा त्यान ऐकला तेव्हा तो धावतच पहाऱ्यावरच्या संत्र्याकडे गेला आणि त्याला म्हणाला, " माझ्या आईवडिलानी मला माझ्या मोठ्या भावाला भेटायला पाठवलंय्. त्याला भेटल्याशिवाय मी इथून मुळीच हलणार नाही." मग संत्र्यानं त्या दुभाष्याला बोलावून आणलं होतं.

तो दुभाष्या कोण होता मला माहीत नाही. काही का असेना माझी सुटका झाली खरी.

□ □



## १३ : अनामिक वीर

युद्धकाळाचं मी इतक्या बारकाईनं वर्णन का करतोय असा कुणाला प्रश्न पडेल. अनेक कारण आहेत त्याला; मुख्य सांगायची ती अशी.

देशातल्या इतर अनेक कुटुंबाबरोबर आमच्या कुटुंबावर जो खडतर प्रसंग ओढवला होता त्याचा अगदी खोल कधीही न पुसला जाणारा ठसा लहानापासून मोठ्यापर्यंत प्रत्येकावर उमटला होता. आमच्या आयुष्यातील पुढील कित्येक वर्षांवर त्या भयानक घटनेचे सावट कायम होते. त्या वर्षांचा चेहरामोहरा त्या घटनेनं निर्णित केला होता. मला आठवतंय्, आम्हाला एकमेकांशी बांधून घालणारे धागे त्या कठीण काळात अतिशय घट्ट झाले. प्रत्येकाच्या मनात बाकीच्यांचा विचार सारखा घोळत असायचा. त्या काळात, आमच्या वयातील अंतराला न जुमानता मी आणि युरा एकमेकांच्या फार फार जवळ आलो.

चिकाटी, धैर्य व दुसऱ्याच्या मदतीला धावून जाण्याची सदैव तयारी ही जी युरी गागारिन या वैमानिकाची व अंतराळवीराची उल्लेखनीय, ठळक अशी स्वभाव वैशिष्ट्ये होती ती या लढाईच्या काळात घडली गेली असा माझा विश्वास आहे. त्या काळात सोविएत लोकानी दाखवलेल्या असामान्य धैर्याला आम्ही साक्षी होतो. युराच्या मनावर त्याचा कायमचा ठसा उमटणं अगदी स्वाभाविक होतं. त्या धैर्यात त्याला एक आदर्श गवसला असल्यास नवल नव्हतं.

घटनांचा संगतवार कालानुक्रम सोडून मी काही अविस्मरणीय प्रसंगांच वर्णन करणार आहे. दुर्दैवानं मी ज्यांच्याबद्दल सांगणार आहे त्या वीरांची नाव मला किंवा युरालाही माहीत नाहीत.

आघाडी सरकत सरकत क्लुशिनोला येऊन भिडली. जर्मन सैन्याची आघाडीची पथकं आणि आम्ही एकमेकात वावरू लागलो. मिआसोयेदोवो या शेजारच्याच खेड्यात एका मोठ्या नाझी तुकडीचा तळ पडला होता. सोविएत नाहीतर जर्मन शिपायानी टाकलेले गोळे मधून मधून गावच्या रस्त्यावर फुटत होते.

सुरवातीला जर्मन आले, त्याना स्वतःची इतकी खात्री होती की त्याना गावकुसाला पहारा घालण्यासाठी संत्रीसुद्धा उभे केले नाहीत. मुलानी त्याचा बरोबर फायदा उठवला. ते खुशाल जंगलात नाहीतर कुरणात हिंडून येत.

एके दिवशी पहाटेच आम्हाला जाग आली. बंदुका धडधडत होत्या. आम्ही खिडक्यांपाशी धाव घेतली. सुरवातीला आम्हाला दिसले ते फक्त पाय आणि बूट. बुटाच्या वरच्या बाजूला काहीतरी झालरी सारखं होतं. ते जर्मन शिपाई होते; सारे जंगलाच्या दिशेनं पळत होते.

जंगलातून रशियन आरोळ्या उठल्या! एक गोळा सुईऽऽऽऽ करत जवळून गेला. पिछाडीला असलेल्या जर्मन तोफखान्याचा भडिमार सुरू झाला.

आमचे सैन्य आगेकूच करीत होते! घरात बसून राहाणं केवळ अशक्य झालं. मन अगदी उसळून आलं; वाटलं असच रस्त्यावर धावत जावं आणि आमच्या सैनिकांना भेटावं.

जर्मन रणगाडे खडखड करीत जंगलाच्या रोखानं निघाले. हातबॉम्ब फुटल्याचे आवाज येऊ लागले. बंदुका धडधडत होत्या पण हलके हलके सारं कांही थांबल.

युरा केव्हा, कसा बाहेर निसटला कोणाच्या लक्षातही आलं नाही. आमच्या अचानक लक्षात आलं, युरा तर कुठं दिसत नाही. मी त्याला शोधून आणायला निघत होतो तो युराच तेवढ्यात परत आला. त्यानं मला खुणावलं. आम्ही दोघेही बाहेर गेलो.

"काही विशेष?"

"जंगलात लाल सैन्याचा एक कमांडर आहे. फार घायाळ झाला आहे."

आम्ही रुमालात थोडेसे खायचे जिन्नस बांधून घेतले; एक जुना शर्ट घेतला बँडेज बांधायला उपयोगी पडेल म्हणून, आणि जंगलाकडे निघालो.

सरावाचे जंगल–पण आज अनोळखी भासत होतं. दारुगोळ्यानी झाडांचे शेंडे सफाईने उडवून दिले होते. झाडाच्या फांद्यांना, डाहाळ्याना लाल सैनिकांच्या आणि जर्मन सैनिकांच्या गणवेशांच्या चिंध्या लोंबत होत्या.

युरानं मला एका 'स्नोबॉल'च्या मोठ्या झाडाकडे नेले. सारे झाड लालबुंद बेरींनी लहडले होते.

कमांडर जमिनीला पाठ लावून उताणा पडला होता. त्याच्या शर्टावर जागोजाग काळसर रक्ताच्या ओघळाचे डाग पडले होते. त्यानं डोळे मिटले होते. त्याच्या बाजूला उघडी बंदूक, नकाशाची पेटी, रणगाड्यावर टाकायचा बॉम्ब इतक्या गोष्टी पडल्या होत्या.

"आम्ही थोडसं खायला आणलंय् तुम्हाला," युरा म्हणाला.



त्या घायाळ कमांडरनं डोळे उघडून युराकडं आणि माझ्याकडं अगदी बारकाईनं पाहिलं. त्यानं विचारलं, "हा तुझा भाऊ का?"

युरानं मान हलवली आणि रुमाल सोडला. पण कमांडरची खाण्यावर बिलकूल इच्छा नव्हती. घाईगर्दीमुळे युराचे व माझे एकमेकाना सारखे धक्के लागत होते. आम्ही शर्टाच्या पट्ट्या फाडल्या. आम्हाला जमेल तशा आम्ही त्याच्या जखमा बांधून टाकल्या.

त्यानं आम्हाला सांगितलं, जर्मनांच्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी त्याची तुकडी धडपडत होती. अन् आम्ही मारे समजत होतो, मॉस्कोच्या रोखानं निघालेल्या जर्मन सैनिकाना आमचे सैन्य माघारी पिटाळीत आहे म्हणून!

"तुमचं नाव काय?" मी विचारलं.

त्यानं नुसती मान हलवली. आम्ही समजलो, आम्ही नसते प्रश्न विचारणं योग्य नव्हतं. मग तो बोलेल म्हणून आम्ही वाट पहात राहिलो. आम्ही त्याला कशी मदत करावी ते तो सांगेल म्हणून. पण त्यानं पुन्हा डोळे मिटून घेतले. त्याला धाप लागली होती; श्वासोच्छ्वास जलद चालत होता.

"तुम्हाला माझं बोलणं ऐकू येतं का?" त्याच्या खांद्याला स्पर्श करीत युरानं विचारलं. "आमच्या गावात जर्मन शिरले आहेत. दिवसा उजेडी तर तुम्हाला तिथं नेता येणार नाही. आम्ही बाबाना सांगतो आणि ते काहीतरी मार्ग शोधून काढतील. अंधार पडला की लागलीच आम्ही तुम्हाला नीट कुठंतरी लपवून ठेवू. सारी मदत करू आम्ही तुम्हाला. माझं बोलणं तुम्हाला ऐकू येतं ना?"

"फार छान! मुलानो, फार छान विचार आहे तुमचा!" त्यानं हसण्याचा प्रयत्न केला. पण त्याचं तोंड नुसतंच वेडंवाकडं झालं.

"तुम्ही इथंच थांबा आमच्यासाठी!"

आम्ही धावत धावतच गाव गाठलं. आई–वडील नक्की काहीतरी मार्ग शोधून काढतील याची आम्हाला खात्री होती.

"आपण त्याना पिठाच्या गिरणीत लपवू. जर्मन चुकूनही तिकडे फिरकत नाहीत," मी म्हणालो.

"नाहीतर आपण जंगलातच त्यांची लपण्याची काहीतरी व्यवस्था करू; जेवण वगैरे तिथंच नेऊन द्यायची व्यवस्था करू,' युरानं सुचवलं.

जंगलाच्या कडेलाच जर्मन सैनिक हिंडताना पाहिल्याबरोबर आम्ही झुडुपा-आड दडलो. त्यांच्या हातात सब-मशीनगन होत्या. आमच्यापासून अगदी थोड्या अंतरावरून ते चालत गेले. थोडा वेळ गेला अन् मग जंगलात ज्या ठिकाणी लाल सेनेचा कमांडर घायाळ होऊन पडला होता त्या ठिकाणी प्रचंड स्फोट झाला. तो

स्फोट इतका जबरदस्त होता की आमच्यावरून हवेचा एक लोट सरकत गेल्याचं आम्हाला स्पष्ट जाणवलं.

"काय झालं वाल्या ?"

"माहीत नाही त्यानं बॉम्बनं जर्मनांना उडवून दिलं असावं."

माझा होरा अचूक ठरला मागाहून गावात जिकडे तिकडे बोलायला एकच विषय होता—लाल सेनेच्या एका कमांडरनं रणगाडाविरोधी बॉम्बनं नाझींच्या एकातुकडीला व स्वतःला कसं उडवून दिलं याशिवाय दुसरा विषय नव्हता.

× × ×

त्या दिवशी या घटनेच्या जरा अगोदर मी दोघा बेलोवना भेटलो होतो. त्या दिवशी येलोनी आणि विक्तर दोघांनीही जंगलात त्या कमांडरला पाहिलं होतं, त्यांच्याही मनात त्याला मदत करायची तीव्र इच्छा होती. पण वेळ निघून गेली होती.

लढाइचं ते दुसरं वर्ष होतं. सहा सोविएत आय्. एल्. फायटर विमानं आमच्या गावावरून उडत गेली. मागोमागं थोडयाच वेळानं, जवळून कुठून तरी ढग गडगडावेत तसा आवाज आला. "आपली विमानं बॉंबफेक करताहेत" आम्हाला सगळ्यानाच वाटलं.

युरा, बलोद्या आर्लोव्स्की आणि मी आमच्या आसऱ्याच्या बाहेर उभे होतो. तेवढयात ती आय्. एल्. विमानं परत आली. ती परततात तोच जर्मन अॅक्-अॅक् बंदुकानी भडिमार सुरु केला. या बंदुका कोणत्या जागी होत्या हे गावात कोणालाच माहीत नव्हतं. लाल तारे असलेली विमानं जेव्हा गावावरून अगोदर उडत गेली होती तेव्हा तर बंदुका ऐकू आल्या नव्हत्या, आता मात्र त्या आग ओकत होत्या.

त्यांच्या भडिमारातून पाच लढाऊ विमानं तर निसटून गेली. सहाव्यातून मात्र एकदम धूर यायला लागला. ते खाली येऊ लागलं.

"चांडाळांनी विमान टिपलेलं दिसतंय् !"

क्लुशिनोच्या रस्त्यांवर अठरापगड वाहनांची एकच गर्दी झाली होती. रणगाडे, सशस्त्र चिलखती गाडया, ट्रक, साऱ्यांचा एक अखंड प्रवाह मॉस्कोच्या दिशेने कितीतरी दिवसांपासून वाहात होता.

जेव्हा आभाळात प्रथम विमानं दिसली तेव्हा सारी रहदारी एकदम थांबली. जेव्हा एका विमानातून धूर येतोयसं दिसलं तेव्हा जर्मन शिपायांनी आरोळया मारायला सुरवात केली, ते शीळ घालू लागले, पोंगे वाजवू लागले.

विमान खाली खाली येत होतं. एकदम त्यातल्या मशीनगननी जर्मन पथकावर मारा सुरू केला. एखाद्या जळत्या मशालीप्रमाणं दिसणारं ते विमान



सरळ जर्मनांच्या पथकात घुसलं. एक पळभरात सारं घडून आलं. मागोमाग एक प्रचंड, भयानक स्फोट झाला.

"गॅस्टेलोनं केलं तेच यानी केलं," युरा मृदू आवाजात म्हणाला.

जर्मन क्लुशिनोला येण्याच्या अगोदर आम्ही गॅस्टेलोच्या शौर्याची कथा ऐकली होती.

दुसऱ्या दिवशी ती पाच फायटर विमानं पुन्हा आभाळात उगवली. गावावरून ती अगदी खालून उडत गेली. जर्मन तोफखान्याला तोफा डागायची संधीच मिळाली नाही. थोडयाच वेळात तोफखान्याच्या जागी केवळ एक धुमसणारा ढिगारा तेवढा दिसू लागला.

त्यानंतर काही दिवस खास माणसे लावून त्या ढिगाऱ्यातून मृत सैनिकांची शरीरे उकरून काढण्याचं काम चाललं होतं. गावच्या चौकात एके काळी जिथे कमिसार सुश्किनचे स्मारक होते—जर्मनांनी ते उडवून दिले—त्या चौकात ते सारे देह नेण्यात आले. लवकरच चर्च, शाळा, गावचे सोविएत आणि जनरल स्टोअर यामधील सारी जागा बर्चं लाकडाच्या पांढऱ्या क्रॉसच्या रांगांनी भरून गेली. क्रॉसवर लोखंडी टोप्या होत्या.

नाझी सैनिकांना पुरण्याचं काम चाललं होतं ते पहायला युरा आणि इतर काही मुलं गेली होती. "आपल्या विमानांनी इतके नाझी पाडले !" युरा जेवताना आश्चर्याने म्हणाला.

बाबांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. ते लपविण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले, "जस घडायला हवं तस घडतंय्, बरं का युरा. १८१२ साली जेव्हा फ्रेंचांनी माघार घेतली तेव्हा त्यानी कितीतरी फ्रेंच सैनिक क्लुशिनोमध्ये पुरले. त्या जागी आम्ही तुमची शाळा बांधली. आता हे जर्मन इथं झोपलेत. एक दिवस आपण त्या जागीही काहीतरी बांधू."

बाबांची वाणी खरी ठरली.

क्लुशिनोच्या मुख्य चौकात बर्चच्या पांढऱ्या क्रॉसचा मागमूसही राहिला नाही. त्या जागी नवे प्रशस्त सामुदायिक केंद्र उभे राहिले आहे.

शूर बोल्शेविक, यादवी युद्धातला वीर कमिसार सुश्किन याचे नवे स्मारक उभारण्यांत आले आहे. त्याच्या जवळच वीस एक पावलांच्या अंतरावर युराचा 'बस्ट' आहे. साऱ्या वाऱ्यावादळाना तोंड देत, गावचे सारे रस्ते ज्या चौकात मिळतात त्या चौकात दोघे मिळून उभे आहेत.

☐ ☐

# १४ : युराचा 'सैताना' शी मुकाबला

एक जर्मन तुकडी जाऊन तिच्या जागी दुसरी येई. पण त्यामुळे दैनंदिन जीवनात काही सुधारणा झाली असं नाही. पावेलकाकांच्या घरात आता जनरल ऐवजी कोणीतरी एक भंपक कर्नल राहायला आला होता. पण मी एकदा चांगलाच धडा शिकलो होतो त्यामुळे घरीच सर्वांच्या बरोबर रहात होतो.

यावेळी आमच्या घराचं रूपांतर एका रिपेअरच्या दुकानात झालं होतं. दळणवळणाची यंत्रसामग्री तिथे दुरुस्त करीत. बॅटरी चार्ज करण्याचे कामही तिथे चालत असे. आल्बर्ट नावाच्या एका शिपायाकडे त्या दुकानाचं काम होतं. आम्ही त्याचं नाव ठेवलं होतं सैतान. त्याचं मन सैतानासारखंच दुष्ट व हलकट होतं. विशेषतः मुलांबद्दल तर त्याच्या मनात फार दुस्वास होता.

असाच एक शरद् ऋतूतला दिवस होता. सुरेख ऊन पडले होते. पावसाचे पाणी खळग्यातून साचले होते, त्यावर मात्र अजून बर्फाचे पातळ पापुद्रे धरलेले होते. आईनं चिंध्यांचा एक चेंडू बनवला होता. वान्या झर्नोव, वलोद्या ओर्लोव्स्की युरा आणि बरीस तो घेऊन खेळत होते. चिंध्यांच्या चेंडूला रबरी चेंडूची सर कशी येणार ? आपटला की उशी घेऊन पुन्हा उसळून येणं त्याला शक्य नव्हतं पण मुलं खूष होती. नाहीतर त्याना आता खरा रबरी चेंडू कुठून मिळणार होता ?

चेंडूच्या खेळात बरीस म्हणजे कच्चं लिंबू ! एकतर तो सगळ्यात लहान होता आणि त्याच्या अंगात तितकीशी चपळाईपण नव्हती. चेंडूच्या मागे एखाद्या लडदूसारखा धावत जायचा. त्यानं वलोद्यावर नेम धरून मारला तो चुकला. मग वान्यावर नेम धरला तोही हुकला. मग त्यानं आपला मोहरा युराकडे वळवला. इथं मात्र नेम अचूक लागला !

"युरा, हा खरा खेळ नाही. तू मुद्दाम त्याला मारू दिलंस," वलोद्या रागाला आला.

"असू दे; तो लहान आहे अजून." युरानं प्रत्युत्तर दिलं.



नेमक्या त्याच वेळी "सैतान" पडवीत आला. त्याचा कोट खांद्यावर टाकलेला होता, डोक्यावरची टोपी खूपच मागे सरकवलेली होती. तळपत्या सूर्याकडे पहाताना त्याचे डोळे दिपत होते. त्याला अगदी कंटाळवाणं होऊन काही सुचेनासं झालं होतं हे उघड होतं. शेवटी तो पडवीतून बाहेर आला व अगदी शेवटच्या पायरीवर उभा राहिला. त्यानं त्या पायरीवर काहीतरी ठेवलं.

"इकडे या !" त्यानं मुलाना ओरडून सांगितलं.

मुलानी खेळ थांबवला आणि ते त्याच्याजवळ गेले.

"घ्या !" तो जर्मन शिपाई म्हणाला.

पायरीवर लिमलेटच्या मोठ्या गोळ्या होत्या. कित्येक दिवसात मुलांच्या नजरेला गोड खाऊ पडला नव्हता. गोळ्या दिसताच त्यांच्या तोंडाला पाणी सुटलं. परंतु कोणीही जागचा हलला नाही. त्या साऱ्या मुलांत बरीस अगदी भोळसट. कुणावरही विश्वास ठेवायचा. तो खाली वाकला आणि गोळी उचलायला त्यानं हात पुढं केला.

"बरीस, नको नको, !" युरा हलक्या आवाजात म्हणाला.

पण तो जर्मन खिदळत होता. बरीसला प्रोत्साहन देत होता "घे ! उचल उचल !"

बरीसची बोटं त्या गोळीला टेकली न टेकली तोच त्या सैतानाचा जाडजूड बूट त्याच्या हातावर दाबला गेला, चिरडल्यासारखा आवाज झाला; बरीस आकांतानं किंचाळला.

"सोड त्याचा हात ! दुष्टा, सोड त्याचा हात !" युरा ओरडला.

पण सैतानानं आपला पाय उचलला नाही. तो दुष्टपणानं हसतच राहिला. बरीस किंचाळत होता. युरा सरसरत काही पावलं मागं गेला आणि जोरात धावत येऊन त्यानं 'सैताना'च्या पोटात, त्याच्या त्या चमकणाऱ्या बकलच्या खाली एक सणसणीत गुद्दा ठेवून दिला. 'सैताना'चा श्वास उडाला आणि तो लोळागोळा होऊन खाली पडला. सुन्न झाल्यासारखा तिथेच बसून तो आ वासून पहात राहिला, लिमलेटची गोळी चुरडून अगदी घाणेरडी झाली होती, पायरीवर पसरली होती.

वान्या आणि वलोद्या यानी कोपऱ्याकडे पळ काढला. पण युरानं बरीसला हातानं धरून घराकडे चालवले. जाताना तो मागे वळून म्हणाला, "सैताना थांब जरा ! तुझा हिशेब चुकता करतो."

एव्हाना 'सैतान' ताळ्यावर आला होता. तो त्या दोघांवर धावून जाणार होता. पण तेवढ्यात बाहेरून एक ट्रक आला आणि त्यानं हॉर्न वाजवला. रणगाडा पथकांतील शिपाई ट्रकच्या मागच्या भागातून चमत्कारिक दिसणाऱ्या प्रचंड बॅटऱ्या

खाली उतरवू लागले. एकूण आठ बॅटऱ्या होत्या. शिपायानी त्या उचलून यंत्रशाळेत नेऊन ठेवल्या.

नंतर कितीतरी दिवस ' सैतान ' त्या बॅटऱ्या चार्ज करण्यात गुंतला होता. मग एक दिवस तो दुपारी उठला आणि सायकलीवरून बाहेर जाऊन आला. येताना ट्रकमध्ये आला. रणगाडा पथकातल्या शिपायानी त्या बॅटऱ्या ट्रकमध्ये चढवल्या. त्यांच्या अधिकाऱ्यानं ' सैताना'शी हस्तांदोलन केले तेव्हा त्याचा चेहरा नुसता फुलला होता.

ट्रक गेली. एका हातात दारूची बाटली व दुसऱ्या हातात ग्लास घेऊन ' सैतान ' पडवीत आला आणि आता जरा मजा चाखायची या इराधानं खाली बसला. ' कत्युशा ' या लोकप्रिय रशियन गाण्याची एक जुनी, अनेक चरे पडल्यानं खरंखरं वाजणारी जुनी रेकॉर्ड त्यानं लावली होती. ग्लासमागून ग्लास घशात रिकामे होत होते. प्रत्येक ग्लास घेतल्यावर त्याचा चेहरा सुखानं वेडावाकडा होई.

पण त्याचा हा स्वर्ग फार वेळ टिकला नाही. बाहेर एक भोंगा कर्कशपणानं वाजू लागला. कोणीतरी चिडून, संतापून भोंगा वाजवीत होतं. सैतानानं रेकॉर्ड बंद केली, ग्लास ठेवला अन् तो बाहेर रस्त्यावर धावला.

रणगाडा–पथकातले तेच शिपाई त्याच आठ बॅटऱ्या घेऊन परत आले होते. ते संतापले होते. रागाने लाल झालेल्या अधिकाऱ्यासमोर ' सैतान ' ताठ हुश्श्यारच्या पवित्र्यात उभा होता. काहीतरी गुळमुळू कारण सांगत होता.

काय झालं ते आम्हाला काहीच कळलं नाही पण मग युरानं अभिमानानं सांगितलं, " आज जेव्हा तो सायकलवर बसून बाहेर गेला तेव्हा मी त्याचा हिशेब चुकता केला. "

युरानं हात चड्डीच्या खिशात खुपसला आणि त्यातून चिमूटभर कॉस्टिक सोडा बाहेर काढला. " मी साऱ्या बॅटऱ्यात थोडा थोडा सोडा भरून दिला."

आईचा जड निश्वास सर्वांना ऐकू आला. बोलताना तिचा आवाज पडला होता. " फार वांड मुलगा आहेस तू. चड्डी काढून दे अगोदर. ऐकू आलं का ?"

युराला खात्री होती, आता आपलं कौतुक होणार म्हणून; पण झालं उलटंच. आई का रागावली ते त्याला कळेना. तिलाही सैतानाची चीडच नव्हती का ?

" आणखी कुठं आहे का सोडा तुझ्यापाशी ?" आईनं पुन्हा दटावून विचारलं. एव्हाना तिनं टबात पाणी भरलं होतं.

खोटं बोलणं युराला माहीत नव्हतं. " जाकिटाच्या खिशात आहे थोडा, " त्यानं सांगून टाकलं.

" दे काढून अगोदर. तेही धुवावं लागेल मला. "



संध्याकाळी आईनं बाबाना ही सारी हकीकत सांगितली. पण ते रागावले नाहीत. आम्हाला तसं वाटलं होतं पण त्यांनी युराला बोलावून घेतलं अन् विचारलं. " कुणी शिकवलं तुला हे ?"

" कोणी नाही."

" अशा गोष्टी फार काळजीपूर्वक कराव्या लागतात." बाबांच्या बोलण्यात थोडी जरब होती. " हे जर कळतं तर त्यानं आपल्या सर्वांना गोळ्या घातल्या असत्या, माहीत आहे ? इतका वेळ माहीत नव्हतं तुला पण आता तर माहीत झालंय्, होय ना ?"

सुदैवानं, बॅटऱ्याना काय झालं होतं व ते कोणी केलं होतं हे ' सैताना 'च्या कधीच लक्षात आलं नाही जर त्याला कळलं असतं तर आमची धडगत नव्हती.

१९४२ चा जानेवारी महिना ! जर्मनांच्या हातून मुक्त होण्याच्या आशा पालवू लागल्या होत्या. मॉस्कोच्या वेशीवर, दूर अंतरावरच जर्मन तुकड्यांचा धुव्वा उडाला होता. त्यांच्यातले उरलेसुरले शिपाई पश्चिमेच्या दिशेनं माघार घेत होते.

युरा आणि बरीस सारा दिवस कुंपणापाशी बसून रहात. माघार घेणाऱ्या तुकड्या, रणगाडे, ट्रक, बंदुका पहात राहात. त्याना तसा दुसरा उद्योगही नव्हता. जर्मनानी गाव व्यापल्यानतर शाळा बंदच झाली होती.

त्या वर्षीचा हिवाळा अतिशय कडक होता. माघार घेणारे नाझी सैनिक दिसेल त्या झोपडीत घुसून दिसेल ते लुटून नेत; मेंढीच्या कातड्याचे कोट, ब्लॅंकेट बूट, उरलेसुरले कपडे आणि उशा, जमिनीवर अंथरलेली जाजमं, चिंध्या यांचंही त्याना वावडं नव्हतं.

एक दिवस संध्याकाळचं जेवण चाललं होतं. आम्ही उकडलेले बटाटे खात होतो. बियाण्यासाठी म्हणून आम्ही काही बटाटे जर्मनांना नकळत खड्ड्यात लपवून ठेवले होते. तो खड्डा आम्ही वेळेअगोदरच उघडला होता व त्यातलेच बटाटे संपवीत होतो. युरा म्हणाला, " आज मी पुष्कळच फ्रेंच लोक पाहिले. "

" कोणते फ्रेंच लोक ?"

" कुठून आले आहेत ते ?"

" मला काय माहीत ?"

" कसे काय आहेत ?"

" त्यानी डोक्याला बायकांसारखे रुमाल बांधले आहेत. त्यांचे कोटही, बायका घालतात तसेच आहेत. सारेजण घोड्यावर स्वार झालेले होते."

त्या दिवशी गावातून एक घोडेस्वारांचं पथक गेलं. आम्ही सर्वजण हसायला लागलो.

" ते जर्मन होते युरा," बाबा म्हणाले.

" नाही, नाही.फ्रेंचच होते ते. झोयाच्या पुस्तकात त्यांचं एक चित्रसुद्धा आहे."

" जर्मनच आहेत ते. म्हणून तर आपल्या कडक हिवाळ्याला ते इतके घाबरतात. मी तर प्रार्थना करते, यावर्षीचा हिवाळा चांगला लांबू दे," आई म्हणाली.

लढाईतल्या पराभवाने आलेली निराशा नाझी शिपाई आमच्यावर काढू लागले. सैतानाचा स्वभाव एरवीही दुष्ट आणि हलकट होता. आता तर त्याचं डोकंच फिरलं. तो पडवीत आला रे आला की त्याच्या तावडीत सापडू नये म्हणून मुलं पार दूर धूम ठोकीत. तो नेहमी अॅसिड जवळ ठेवायचा. मुलांच्या तोंडावर ते फेकण्याची संधीच पहात होता.

माझे भाऊ नेहमीच त्याच्यापासून चार पावलं दूर राहात. एकदा मात्र त्याना ते जमलं नाही. एके दिवशी युरा आणि बरीस कुंपणापाशी उभे होते. एक फळी आड येत होती म्हणून बरीसला नीट दिसत नव्हते, म्हणून ती हलविण्याचा त्याचा खटाटोप चालला होता. पण त्याच्या अंगात तेवढी शक्ती कुठून यायला ? नेहमीप्रमाणे युरा त्याच्या मदतीला धावला होता.

आणि त्याचवेळी सैतानाचा हात त्यांच्यावर पडला. बरीसच्या कोटाची कॉलर खेचून त्यानं त्याला उचललं, रूमालाचा फास करून त्याच्या गळ्याभोवती अडकवला, पाठीमागं गाठ बांधली आणि तो फास जवळच्या एका फांदीवर अडकवला. ' सैतान ' विकटपणानं हसला आणि घराकडे निघाला.

बरीस किंचाळला. घट्ट फासामुळे त्याला घुसमटायला झालं होतं. त्यानं हातपाय झाडायला सुरुवात केली. शेवटी लोळागोळा झाल्यासारखा लोंबत राहिला.

युरा उड्या मारमारून त्याला सोडवू पहात होता. पण फांदी फार उंच होती, त्याचा हात पोहोचेना. तेवढ्यात हातात कॅमेरा घेऊन ' सैतान ' घरातून बाहेर आला आणि त्यानं युराला बाजूला ढकललं.

" आई, ' सैताना'नं बरीसला फास दिलाय् !" युरा जोरात किंचाळला व हुंदके देऊ लागला.

आईनं तीरासारखी धाव घेतली. ' सैतान ' कॅमेराची कळ दाबणार होता. आई बरीसकडे धावू लागली तसं त्यानं तिला अडवलं.

" अरे, तू ... !" आई किंचाळली त्या जर्मनाला ढकलून देण्याचं बळ तिच्या अंगात कुठून संचारलं कोणास ठाऊक. तिनं फास सोडवला आणि बरीस खाली बर्फात कोसळला.

घरात आणलं तेव्हा बरीसचा श्वासोच्छ्वास जेमतेम चालू होता. त्यानंतर एक महिनाभर त्याला चालता आलं नाही. कितीतरी दिवस तो झोपेतून किंचाळत उठायचा.



हे सारं घडून गेलं. एक दिवस ' सैताना'चं लहान इंजिन चालेनासं झालं. कारण शोधून काढायला त्याला फारसा वेळ लागला नाही. एक्-झॉस्टमध्ये चिंध्या आणि कागदाचे बोळे खच्चून भरले होते.

सैतान वावटळीसारखा आमच्या घरात घुसला. त्या चिंध्या आणि बोळे त्याने टेबलावर भिरकावले. मग त्यानं घरातली एकूणएक वस्तु उलट सुलट करून पाहिली. तशाच चिंध्या आणि कागद कुठे दिसतात काय हे त्याला बघायचं होतं. सुदैवानं त्याला कुठं काही सापडलं नाही. जाताना त्यानं इतक्या दाणदिशी दार लावलं की छतातून माती आणि वाळू खाली आली.

" बरं झालं एकदाची गेली पीडा, " आईनं सुटकेचा श्वास टाकला.

' सैताना ' ची झडती चालू होती तोपर्यंत युरा अगदी निर्व्याज चेहेरा करून आपण त्या गावचेच नाहीत असं दाखवीत कोपऱ्यात बसून राहिला होता. मागाहून मात्र त्याने आपणच एक्झॉस्ट पाईपमध्ये चिंध्या, बोळे भरून ठेवल्याचे कबूल केले. मात्र यावेळी आई–बाबा कोणी त्याला रागावले नाहीत.

लवकरच मुक्त होण्याची आमची आशा लवकर फलद्रूप व्हायची नव्हती. मॉस्कोलगत नाझी तुकड्यांचा पराभव झाला. पुनर्रचना करण्यासाठी त्या पिछाडीला गेल्या, त्या जाताना क्लुशिनोमधून गेल्या. तिथून नव्या दमाची कुमक सतत आघाडीला पाठविण्यात येत होती.

आता आघाडी आमच्या गावापासून सात किलोमीटरच्या आत होती. यानंतरच्या काळात मात्र आमचं जिणं अगदी असह्य झालं.

क्लुशिनोत खूप लोक जमा झाले होते. अनेक प्रकाराचं सामान ठासून भरलं होतं. दुसऱ्या बाजूच्या सशस्त्र सोविएत दलाना याची बातमी नक्कीच लागली होती. थोड्याच दिवसात मोठमोठ्या तोफा गावावर नित्य नियमाने गोळीबार करू लागल्या सोविएत बंदुकांच्या भडिमाराखाली जर्मनांची दाणादाण उडालेली पहाताना स्वभाविकच आम्हाला आनंद होई. पण त्याचबरोबर भीतीनं थरकापही होई. कारण त्यातला एखादा गोळा आमच्यावरही पडणं सहज शक्य होतं. म्हणजे आमचा शेवटच झाला असता. काही झालं तरी, दारुगोळ्याला थोडेच डोळे असतात शत्रू का मित्र ते बघायला ?

रात्री अगदी भयानक वाटे. पीओ–२ बॉम्बफेक्या विमानानी गावावर बॉम्बफेक करायला सुरुवात केली होती. गावात बातमी पसरली होती की या विमानावर पायलटची कामे मुली करीत होत्या. त्यामुळे या पीओ–२ बॉंबफेक्या विमानाना मारिआ इवानोव्ना असं टोपण नाव मिळालं होतं.

एक दिवस संध्याकाळी आम्ही असेच फुरसदीच्या वेळी आमच्या निवाऱ्यात नेहमीप्रमाणे बसलो होतो. झोपायला अजून बराच अवकाश होता. नुसतं बसून बसून आम्ही कंटाळलो होतो, उदासवाणे झालो होतो. बोलताना इकडून तिकडून फिरून हरदासाचं घोडं पुन्हा मूळपदावर येई. सोविएत सेना आमचं गाव केव्हा मुक्त करणार ? टिनच्या बशीत तेल घालून, वात घालून दिवा बनवला होता. त्याच्या मंद प्रकाशाची अस्पष्टशी वर्तुळ मातीच्या ओबडधोबड भिंतीवर उठली होती. त्या उदासवाण्या अंधारात घरची माणसं परकी, बिनओळखीचो वाटायला लागली; त्यांचे चेहेरे अधिकच ओढल्यासारखे दिसायला लागले. आईच्या हातात काहीतरी शिवणकाम होतं. बाबा बरीसच्या बुटाला ठिगळ लावीत होते.

एकाएकी मृत्यूचीच आठवण करून देणारा पांढरा फटक प्रकाश खिडकीतून आत घुसला. त्या प्रकाशाच्या झोतात तेलाच्या दिव्याचा मिण-मिणता प्रकाश मिसळून नाहीसा झाला. हवाई हल्ल्याचा भोंगा खालच्या पट्टीत वाजू लागला. संकटाचा इशारा देऊ लागला. सर्वांना सुरक्षित स्थळी आसरा घेण्यास सुचवू लागला. आम्हाला आसरा घ्यायला जागाच कुठे होती ? आमच्या छताला मातीचा पातळसा थर होता. तेवढंच काय ते आम्हाला संरक्षण होतं.

'पीओ–२' गावावर आग ओकू लागली. मग बाँबचा मारा सुरू झाला. एक जबरदस्त स्फोट झाला. आमचं सारंच्या सारं झोपडं अन् त्याच्याबरोबर आम्हीही जमिनीतून जसे काही उखडून निघालो. डोक्यावर वाळूचा आणि मातीचा वर्षाव झाला. कापसाचे दट्टे घालून कान बंद करावेत तसं मला झालं. तेलाची पणती केव्हाच विझली होती पण सर्वत्र प्रकाश होता.

हळूहळू माझ्या कानातले दडे उठून मला ऐकायला यायला लागलं. दूर कुठनतरी युराचं बोलणं कानावर पडू लागलं. "हुर्रो ! हुर्रो ! आई, मारिया इवानोव्नानं 'सैताना'चा निकाल लावला !"

आईचे ओठ हलताना दिसले पण ती काय म्हणत होती ते मला समजेना.

"मोठ्यानं बोल !" मी ओरडलो. मग पुन्हा मला काहीही ऐकू येईनासं झालं. मी बहिरा तर होणार नव्हतो ? नाही ...पुन्हा हळूहळू आवाज ऐकू येऊ लागले.

युरा मातीच्या ओटयावर शीळ घालीत बसला होता.

"काय करतोस तू ?"

"सैतानाच्या थडग्यावर लावायला क्रॉस करतो आहे."

आभाळातील आग व ती मागोमाग तिचा प्रकाश हलके हलके नाहीसा होत गेला. पुन्हा एकदा उदासवाण्या अंधारानं आम्हाला घेरलं. पणती पेटवली पण तिचा मिणमिणता प्रकाश आमचे औदासिन्य हटवू शकला नाही.



'युरा, तुला कशाचा इतका आनंद झालाय ?" आईनं विचारलं "अरे वेड्या, आता आपल्याला घरच उरलं नाही. सारं घर पुन्हा बांधायचं स्वतः म्हणजे केवढा खटाटोप आला आता, ते तुला समजत नाही. आता लढाई संपली म्हणजे कुठं राहाणार आपण ?"

"पहा, पहा, हिला कशाची काळजी लागून राहिली आहे पहा, " बाबांच्या स्वरात नाराजी होती, रागही होता, "युद्ध लवकर संपू दे इतकीच आपण प्रार्थना करू शकतो. मग आपण नवं घर बांधू; अगदी निःशंक रहा तू."

"बांधणारच आपण नवं घर " युरा उत्साहाने म्हणाला. " लढाई नंतर सारं कसं अगदी छान होणार वरं का आई. मग मी पुन्हा शाळेत जाईन."

"जाशील बरं, नक्की जाशील."

दोन काड्या घेऊन युरान त्या मधोमध दोरीन बांधून त्यांचा क्रॉस बनवला. "कसा काय झालाय हा क्रॉस ?"

"दोऱ्यानं बांधण्यापेक्षा जर मध्ये खिळे ठोकलेस तर नीट टिकेल तो," बाबांनी सल्ला दिला

पण आमचा आनंद फार काळ टिकला नाही क्रॉसची गरजच उरली नाही. घराच्या पुढच्या भागात एक बॉम्ब पडला त्याचा स्फोट झाला त्याच्या एका तुकड्यानं खिडकीचं तावदान खळ्कन खाली आल खिडकीची चौकट तोडून तो आत घुसला आणि नेटका, 'सैतान' झोपला होता त्या उशीवर जाऊन आदळला. त्या दिवशी संध्याकाळी त्यानं खूप दारू झोकली होती. हवाई हल्ल्याचा इशारा त्यानं ऐकला नसावा किंवा बिछान्यातून उठून आसरा घेणंही त्याला जड झालं असावं. त्याच्या डोक्यापासून काही इंचांवरच मृत्यूचं पाऊल पडून परत फिरलं होतं.

"नशीब जोरावर आहे मेल्याचं, " आई निराशेनं म्हणाली, " जर आपल्या उमद्या सैनिकांचं नशीब असा जोर धरील तर किती चांगलं होईल !"

कसं का असेना. सैतानांची आमच्या घरातली ती शेवटची रात्र होती. दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यानं आपल्या मुक्काम बागेत रस्त्यापासून आणि गावापासून जास्तीत जास्त दूर आसरा खणून तिथं हलवला.

दुरुस्त्या वगैरे करायचं सामान अजून घरातच होतं, पण आता सैतानानं मुलांना छळण्याचं सोडून दिलं वेगवेगळ्या यंत्रांचे मोडलेले भाग त्याच्याकडे दुरुस्तीसाठी येऊ लागले. त्यांची आवक थांबेना. त्यांच्या दुरुस्तीत सारा वेळ जाऊ लागल्यानं मुलांच्या मागे लागण्यास त्याला बहुधा उसंत मिळाली नसावी.

□ □

# १५ : १९४२ साली....

**गरज** आणि लढाई हे दोन मोठे उत्कृष्ट शिक्षक आहेत.

वसंत ऋतू आला. आम्ही आमचे रबरी बूट चढविले, हातात टोपल्या घेतल्या. शेतात गुडघा–गुडघा चिखल झाला होता, तो तुडवीत निघालो. शरद्ऋतूत, ज्यांच्यापर्यंत आमचे हात पोहोचले नव्हते असे, आता गोठून गेलेले बटाटे आम्ही हुडकीत होतो. ते बटाटे विस्तवावर धरून सुकवायचे आणि ते चुरून त्याचा लगदा करायचा. त्यात पीठ घालून त्याची धिरडी करायची. ओंगळवाण्या, निळसर रंगाची ती धिरडी डिंकासारखी चिकट, वातड असायची; पण तव्यावरून निघताच आम्ही ती ताबडतोब गट्ट करीत असू. पण तरीही रात्रंदिवस भूक पोटात कुरतडत असल्याची भावना काही नाहीशी व्हायची नाही.

युरा आणि बरीस यांच्याकडे एक काम सोपवलं होतं. सकाळी ते हातमोजे चढवीत आणि खाचखळगे धुंडाळीत. त्यातून लहान लहान खाजकुयल्या पकडून आणीत. आई मग आमच्यासाठी त्यांचे सार बनवी. जरा चव यावी म्हणून त्यात थोडंसं दूध घाली. खरं सांगायचं तर साराचा कधी एक थेंबसुद्धा उरायचा नाही. वादलीभर सार असतं तरी आम्ही संपवलं असतं. जे काय हाती येईल त्याचा फडशा पडत होता चुक्याची कोवळी पानं, 'हॉर्सटेल'चे कोवळे अंकूर, 'मिसल'च्या गोड मुळचा सारं काही मुलं पचवीत असत.

सूर्यप्रकाश अधिक ऊबदार होऊ लागला होता; घराच्या छपरांवरून साळुंक्या तीव्र आवाजात ओरडू लागल्या, बहरात येऊ पहाणाऱ्या सफरचंदांच्या झाडांचा घमघमाट नाकात शिरून आम्हाला अस्वस्थ करू लागला.

"आज लावणी करणार आहोत आपण." आई एके दिवशी सकाळीच म्हणाली.

न्याहारी आवरली आणि आम्ही बटाट्याच्या बेण्याचा ढीग घालून त्याच्या भोवती बसलो. का कुणास ठाऊक ढीग कसा केविलवाणा दिसत होता. डोळे



पाहून आम्ही त्यांचे तुकडे कापायला लागलो; लहान बटाटा असला की दोन तुकडे, मोठा असला की तीन नाहीतर चार तुकडे, प्रत्येक तुकड्यात दोनचार डोळे राहतील अशी आम्ही काळजी घेत होतो; नाहीतर बटाटे उगवत नाहीत.

युरा आणि बरीससकट आम्ही सारेजण मुकाट्यानं काम करीत होतो. सारे हात सपासप चालत होते. धारदार सुऱ्या चालवताना त्या दोघांना गंमत वाटत होती. कोण भराभर काम करतो याची त्या दोघांत चुरस लागली होती. बटाट्यातल्या तवकीलानं आमचे हात काळे पडले होते. ताज्या हवेनं सर्वांचे गाल लाल झाले होते. सारा लांबलचक हिवाळा आम्ही निवाऱ्यात बसून काढला होता. त्याच्याकडे बघायची इच्छा होत नव्हती. तिथं ताज्या हवेचा स्पर्शसुद्धा होत नव्हता.

इतरांच्या मनात काय विचार चालले होते ते मी सांगू शकत नाही, मला मात्र लढाईच्या अगोदरच्या वसंतऋतूची आठवण येत होती. किती सुखात, आनंदात होतो आम्ही ! मनाला काळजी अशी नव्हती ! बटाट्याचं शेत नांगरायला मी भल्या पहाटेच सामुदायिक शेतावरचा घोडा आणीत असे. आई शेजारणींना हाक देई. दुपारपर्यंत हसतखेळत बटाटे लावून होत.

बाबा आले आणि आमच्यापाशी उभे राहिले. "शेताचा हिवाळी गहू कसा काय आलाय ते पाहून आलो," ते म्हणाले.

"मग कसं आहे पीक ?" आईनं विचारलं.

"छान आलं आहे."

"एकदा आपल्या लोकांच्या हाती पडलं म्हणजे मिळविली."

"तेच म्हणतोय मी," बाबांचा आवाज कोरडा झाला. माझ्या लक्षात आलं होतं, हल्ली बाबा मुळीच हसत नसत.

अगोदरच्या शरद्ऋतूत जर्मनांनी गावातले चर्च आणि पिठाची गिरणी व पवनचक्की उडवून दिली होती. सोविएत विमानांना व तोफखान्याला त्यांचा खुणा म्हणून चांगला उपयोग होईल हे त्यांनी अचूक हेरले. होते. स्मशानाजवळच्या एका जुन्या गोठ्यात गिरणीतले जाते व लहान इंजिन ठेवले होते. थोड्याच दिवसानी मिशा स्युतेव आमच्या निवाऱ्यापाशी येऊन दाखल झाला होता. जर्मनांनी त्याला गावचा पाटील नेमलं होतं. मिशा म्हणाला होता, "आता तुम्हाला चक्कीवाल्याचं काम करावं लागेल; आजुबाजूला कोणी जाणकार नाही. तुम्ही हरहुन्नरी आहात हे जर्मनांना माहीत आहे." तो बाबांना उद्देशून बोलत होता.

"काय ? मी जर्मनांसाठी काम करू ? जमायचं नाही ते !" मग ते दोन पावलं पुढं झाले आणि मिशाला जवळजवळ खेटून उभे राहिले. त्यांच्या चेहऱ्याचा रंग उडाला. ते मिशावर गरजले, "कमांडंटला माझं नाव कोणी सांगितलं ? तू ?"

" जरा शांत व्हा. फार चाणाक्ष आहात तुम्ही. पण तुम्ही उगीचच तापत आहात. जर्मनांसाठी तसंच आपल्या लोकांसाठीही धान्य दळावंच लागेल. गावात शिपायांची जेवढी बायकामुलं आहेत त्या सर्वांचा विचार करा. तुम्ही नाही म्हणालात तरी ते तुमच्यावर पहारा बसवून तुम्हाला काम करायला लावणारच."

" चल चालता हो ! नीघ इथून !" बाबा म्हणाले आणि हलके हलके ते बाकावर बसले. 'टायफस' मध्ये ढासळलेली त्यांची प्रकृती अजून पुरेशी ताळ्यावर आली नव्हती. हा प्रसंग त्याना जडच गेला.

स्युतेव बाहेर पडला, जाताना त्यानं हलकेच दार लावून घेतलं. दुसऱ्याच दिवशी हातात सबमशीनगन घेऊन दोन सशस्त्र जर्मन सैनिक बाबांकडे आले. ते त्याना गोठ्यात घेऊन गेले. तिथे त्याना इंजिन चालवायला एक मदतनीस देण्यात आला. हा मदतनीस म्हणजे लाल सेनेतला शिपाई विक्तर काचेव्स्की हाच होता. आपल्या सहकाऱ्याबरोबर आघाडी पार करून जायचा त्याने प्रयत्न केला होता. तोच हा काचेव्स्की. त्यालाही सशस्त्र सैनिकांच्या पहाऱ्यात गोठ्यात नेण्यात आले होते.

बाबा आणि काचेव्स्की काम करीत; जर्मन त्यांच्यावर सक्त नजर ठेवीत.

" सारा दिवस लेकाचे पाठीमागे उभे असतात " बाबाना राग आला होता. " हे करू नका, तिकडे जाऊ नका ! हुकूम सोडत असतात ! सारे नरकात जाऊन सडू देत."

कधीकधी जमलं म्हणजे ते खिशात पीठ भरून आणीत. त्या दिवशी मग घरी ' मेजवानी ' असे. आई त्या मिठाची 'पक्वान्न' बनवायची. पण चक्कीवाल्याचं हे नवं काम बाबाना बिलकूल आवडत नव्हतं. कधीकधी ते अगदी उदास व्हायचे. ज्या दिवशी त्याना 'टायफस' झाला होता त्या दिवसाचा ते उद्धार करायचे त्यामुळेच तर आम्हाला गाव सोडणं अशक्य झालं होतं. त्यांच्या लंगड्या पायामुळे त्याना यादवी युद्धात आणि १९४१ च्या वसंतऋतूत सुरू झालेल्या लढाईत भाग घेता आला नव्हता. त्यामुळे ते त्या पायाचा रागराग करायचे.

" जमिनीची नांगरट कशी काय करणार आपण ?" आईनं शंका बोलून दाखवली.

" गाय जोडावी लागेल नांगराला." बाबा म्हणाले आणि ते अगदी अस्वस्थ झाले

आमच्या गायीचं नाव झोर्का. हिवाळ्याला दाद न देता ती तग धरून राहिली होती. आम्हाला मोठाच आधार होता तिचा. तिच्यासाठी म्हणून राखून ठेवलेला वैरणचारा गेल्या हिवाळ्यात आमच्या घोड्यांसाठी जर्मनांनी जबरदस्तीने



उचलून नेला होता. आताशी कुठे झोर्का जरा सावरू लागली होती...आणि आता तिला नांगरायला जुंपण्यात येणार होते !

आणि मग आमची लाडकी झोर्का नांगराला जुंपली गेली.

तिची सारी हाडं वर आली होती. पाऊल उचललं की तिची एक बाजू शहारून उठे; थोडावेळ कापत राही. ती वारंवार मान बाजूला वळवून आईकडे पहायची. आपल्याला नांगराला जोडल्याबद्दल तिचा जणू निषेध करायची; अगदी केविलवाणं हंबरायची.

आईनं कासरा हातात धरला होता, मी नांगरावर वजन टाकून चालत होतो.

" चल बाई ! माझी गुणाची बाई ती ! चल पुढे !"

झोर्का एक पाऊल उचलायची, मग दुसरे. नांगर काही इंच पुढे सरकला त्याच्या फाळाने एक उथळ पट्टा खणला.

" चल झोर्का ! शहाणी माझी बाई ! चल पुढे !" आई झोर्काला गोंजारत होती. कासऱ्याला झटका देताना तिच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. झोर्का पुढे तिनं पावाचा एक तुकडा धरला

कोणीतरी टनभर विटांचे ओझे हाताला अडकवावे तसा युरा माझ्या हातावर लटकला.

युरा इथं कसा काय आला ? हे असं होणार हे अगोदरच ओळखून आईनं बटाटे कापण्याचं काम संपल्याबरोबर युराला आणि बरीसला रानातनं चुक्याची भाजी गोळा करून आणायला पिटाळलं होतं.

युराच्या पाठीमागेच बरीस उभा होता. त्याच्या हातात पाण्याचं भांड होतं. आमच्यासाठी पाणी घेऊन आले होते ते.

" युरा, आता पळतोस की नाही इथून ? का देऊ एक ठेवून ?" मी ओरडलो

पण युरा जागचा हलला नाही. त्याने आपले हात झोर्काच्या गळ्यात टाकले. तिच्या ओलसर ओठाना आपला गाल टेकवून तो बोलू लागला, " हिला नांगराला का बरं जुंपलय तुम्ही ? का तिचा असा छळ चालवला आहे ? अशानं ती तुम्हाला दूध द्यायची नाही."

" कितीसं दूध मिळंतय तुम्हाला ?" आई तटकन तोडून बोलली. " सारं दूध जर्मन घेऊन जातात. तुम्हाला माहीत आहे ते."

" मला झोर्काचं वाईट वाटतं ग; फार दया येते तिची."

" अन् मला काही वाईट वाटत नाही का ?" आईनं एकदम जमिनीवर बसकण घेतली. तिच्या डोळ्यांना धारा लागल्या, आम्ही समोर आहोत याला न जुमानता. " युरा " घुसमटल्या स्वरात ती म्हणाली, " आपल्याला काही खायला लागेल हे समजत नाही का तुला ? आता जर बटाटे लावले नाहीत तर पुढच्या

हिवाळ्यात उपासमारीनं मरायची पाळी येईल. पण तुला सांगून काय उपयोग ? तुला काही ते पटायचं नाही, पण तुमच्या सर्वांच्या पोटाची व्यवस्था करणं माझं काम आहे. मग माझं काहीही होवो !"

युरा अस्वस्थ झाला, त्याचा चेहरा लाल झाला. त्याचे ओठ कापत होते.

तो आणि बरीस निघून गेले. पण कामात काही सुधारणा होईना. आम्ही झोर्काची कितीही आळवणी केली, कितीही विनवलं तरी तिचं पाऊल काही उचलेना, नांगर पुढे सरकेना. शेवटी हताश होऊन आम्ही झोर्काला मोकळं केलं. आईनं, झोयानं आणि मी स्वतःला नांगराला जुंपून घेतलं. त्याच वेळी काही जर्मन सैनिक त्या बाजूनं चालले होते. आम्हाला पहायला ते थांबले, ते आमच्याकडे बोटं दाखवून जोरजोरात हसू लागले. त्यांच्यापैकी एकानं कॅमेरा काढला आणि तो फोटो काढण्याच्या खटपटीला लागला.

"तू काय वाटेल ते म्हणालीस तरी मी आता हे करणार नाही," मी आईला व झोयाला उद्देशून म्हणालो, "तो हरामखोर आपल्याला हसतोय आणि आपण..."

शेवटी आम्ही कुदळी हातात घेतल्या. हलके हलके आम्ही ती सारी जमीन उकरून मोकळी केली आणि बटाटे लावले. एका तुकड्यात रायची देखील लागवड केली.

ह्या रायच्या पायी केवढं संकट ओढवणार होतं याची त्यावेळी आम्हाला जर कल्पना आली असती...!

अंगणात बाबा काहीतरी बारकाईने शोधीत होते. अखेरीस ते निवाऱ्याच्या आत आले तेव्हा त्यांच्या हातात लाकडाची एक रिकामी पेटी होती. त्या पेटीत बाबा नेहमी खिळे ठेवीत.

"ही पेटी पाहिली ? सारे खिळे कुठे गेले ? "

त्याना खिळ्यांची फार गरज होती. ज्या बाँबपासून "सैताना" चा जीव थोडक्यात वाचला होता त्यानं आमच्या छपरावरची माती काढून नेली होती आता ते आमच्या डोक्यावर कोसळायला पहात होते. आम्ही त्याला नवे टेकू देणार होतो, छपराला फळ्या बसवणार होतो.

खिळे कुठे गेले ते कुणालाच माहीत नव्हतं, त्यामुळे कोणीच उत्तर दिलं नाही. मग आई म्हणाली, "सैतानानं तर नेले नसतील ? "

"त्याला काय काम पडायचंय् आपल्या खिळ्याशी ? युरा, तू तर काही उद्योग केला नाहीस ना ? " बाबांचा आवाज करडा झाला होता.



झोपायच्या ओट्यावर बसून युरा बरीसला गोष्ट सांगत होता, "होय, मी घेतलेत थोडेसे खिळे."

"पण इथं तर एकही खिळा नाही."

युरानं खांदे उडविले; त्यात आपली काही कसूर नाही असंच त्याला सुचवायचं असावं.

तेवढ्यात वलोद्या ओर्लोव्स्की आत घुसला; घाईघाईनं ओरडून सांगू लागला, "चल, झटपट निघायला हवं युरा. रस्त्यान ट्रकची लांबलचक रांगची रांग लागली आहे. आवर !"

युरानं त्याला सावध करण्यासाठी त्याच्यावर नजर टाकली. वलोद्या उंबरठ्यावरच थबकला. एका पायावरून दुसऱ्या पायावर करीत तिथंच उभा राहिला त्याचे खिसे गच्च भरलेले होते. जाकिटात देखील काहीतरी कोंबलेले होते.

"पोरा, इकडे ये." बाबा म्हणाले, "तुझे खिसे दाखव मला ."

वलोद्या पळ काढायच्या विचारात होता. पण बाबांनी चपळाई करून त्याला पकडलं. "दाखव काय आहे ते. लाजू नकोस."

"जा, त्याना दाखव, " युरा पुटपुटला. तो बाबांच्या नजरेला नजर देण्याचं टाळीत होता. बसल्याजागी तो गवताच्या गादीचे टोक गुंडाळण्याचा चाळा करीत होता.

वलोद्यानं जोरानं श्वास घेतला. एका मळकट चिंधीत काहीतरी बांधून ठेवलेलं त्यानं खिशातून बाहेर काढलं. बाबांनी चिंधी झटकली. तीन खिळे वाकवून तयार केलेली एक 'साळू' त्यांच्या हातात पडली.

"वा, खिळे तर इथे आहेत आणि मी बुद्धा वेड्यासारखा अंगणात शोधत होतो. या गाढवानी काय केलंय त्याचं, पहा एकदा वाल्या. त्यानी खिळ्याचो डोकी काढून टाकून टोकं अगदी अणकुचीदार बनवली आहेत. चांगलं डोकं लढवलंय. अशा किती 'साळूबाई' आहेत तुमच्या जवळ ?"

बाबांच्या कौतुकानं वलोद्याला चेव आला, "बारा आहेत."

"आता इथं जाकिटात आहेत ?"

"होय."

"होय म्हणे ! पहा या मुलानी किती खिळ्यांचा सत्यानाश केलाय तो. युरा, तुझ्याकडे किती आहेत ?"

"काही नाहीत. साऱ्या वलोद्याजवळच आहेत."

बाबा लंगडत लंगडत, युरा बसला होता त्याच्यापाशी गेले. त्यानी त्याला बाजूला केलं आणि गवताची गादी बाजूला केली. "मूर्खा कुठे वेडावाकडा खिळा

घुसला तर बसताच येणार नाही तुला." बोलता बोलता त्यानी गादीखालून आणखी १५ 'साळू' बाहेर काढल्या.

"सुरुंग आहेत ते, तो दारूगोळा आहे आमचा," युरा पुटपुटत होता, "ते एक लष्करी गुपित आहे."

"सारं समजतंय मला आणि या सुरुंगानी किती ट्रकचा निकाल लावला तुम्ही ?"

"आतापर्यंत एक," वलोद्या सांगू लागला, "त्या गाडीत एक जनरल बसला होता. गाडीच मागचं चाक 'साळू' वरून गेलं. फटकन गोळी सुटल्या सारखा आवाज झाल.. चाकातली सारी हवा निघून गेली. मग जनरलनं ड्राय-व्हरची चांगली खरडपट्टी काढली."

"म्हणजे एक जनरल मिळाला तुम्हाला." बाबा विचार करता करता बोलू लागले. "किती दिवस चाललाय तुमचा हा उद्योग ?"

"मागे वसंतऋतूतच सुरूवात केली आम्ही. सगळीकडे नुसता चिखल होता तेव्हा."

"जरा पट्टा दे बरं माझा," बाबा आईला म्हणाले. त्यांचा आवाज मृदू होता. "या दोन्ही हरामखोरांना जरा दाखवतो; म्हणजे कोणा एकालाच वाईट वाटायला नको. मी मागे सांगितलं होतं ना की अशा गोष्टी फार काळजीपूर्वक, फार जपून कराव्या लागतात म्हणून ?"

"आम्ही खूप काळजी घेतो ना," युरा म्हणाला, "रस्त्यावरून जायचं, कोणी आपल्याकडे पहात नाही ना याची खात्री करून घ्यायची. मग त्या खालच्या मातीत टाकून द्यायच्या. मग आपण दूर जाऊन उभं राहायचं. मोटारी, ट्रक यांच्यावर लक्ष ठेवायचं"

"खिसे टम्मं फुगवून हिंडत राहायचं याला कोणी काळजी घेण म्हणत नाहीत. आणि किती खिळे नासले याचा काही विचार ? आता या दिवसात खिळे कुठून आणवेत मी, सांगशील का जरा ?" बाबा रागावले होते.

त्या 'दुर्दैवी गनिमी घातपात्या'बद्दल मला वाईट वाटले. "अजूनही ते खिळे नीट करता येतील, फारसा वेळ लागणार नाही त्याला," मी म्हटले.

पण बाबा काही ऐकायला तयार नव्हते. त्यांचा आवाज आता चांगलाच चढला होता: "वाल्या, जा बाहेर जा, हे सार कुठतरी नीट फेकून ये. आत्ताच्या आत्ता; कळल ? आणि या भामटयाला रस्त्यावर पाय ठेवू देऊ नकोस;" यूरा-कडे बोट दाखवीत ते म्हणाले, "झोयाला त्याचा थोडा अभ्यास घ्यायला सांग. माझी पक्की खात्री आहे, मुळाक्षर सुद्धा विसरलाय तो !"



अशा वेळी बाबांशी वाद घालण्यात अर्थ नसतो. मी त्या 'गनिमी घातपात्यां'चा सारा 'दारूगोळा' उचलला आणि बाहेर जाऊन त्याची विल्हेवाट लावली.

बाबा गिरणीत गेले, तसा युरा धावतच माझ्याकडे आला, "आमचा दारूगोळा कुठंय् ?"

"त्याचा निकाल लावलाय् युरा."

युराचा चेहेरा कष्टी झाला; त्यानं एक खोल निश्वास सोडला.

संध्याकाळी काचेव्स्की घरी आला. "वाल्या, एक मिनिट बाहेर ये. मला जरा बोलायचंय तुझ्याशी"

"अलेक्सी इवानोविच कुठं आहे?" आईनं त्याला विचारलं.

"आता येतीलच. मी पुढं आलो."

आम्ही बाहेर फळबागेत गेलो.

"हे बघ, तू 'पार्टिझनां'चं नाव कधी ऐकलं आहेस का ?" काहीतरी गूढ विषयासंबधी बोलावं, तसा तो हलकेच कुजबुजला.

"कधीतरी पुसटसं ऐकलंय् खरं. ते श्वेतरशियात आहेत असं समजलंय् मला."

"लोक म्हणतात, त्यांची एक तुकडी इथं पण आली आहे आता नीट ऐक. आज रात्री मी त्याना शोधायला बाहेर पडणार आहे. तुला यायचंय् का माझ्या-बरोबर ?"

"हा काय प्रश्न झाला ?"

आम्ही हात हलविले आणि एका तासानंतर भेटण्याचे ठरविले.

आम्ही गावाबाहेर पडलो तेव्हा सूर्य मावळलाही नव्हता. जर्मनाना काही संशय येऊ नये म्हणून आम्ही तशी सावधगिरी बाळगली होती. कदाचित मी सकाळपर्यंत परत येणार नाही असं मी आईच्या कानावर घालून ठेवलं होतं.

सारी रात्र आम्ही जंगलात भटकत होतो. अचानक कुठूनतरी 'पार्टिझन' आमच्या समोर प्रकट होतील या आशेने.

पण कोणीच 'प्रकट' झालं नाही. जड मनानं आणि खिन्न चेहऱ्यानं आम्ही गावात परतलो.

दुपारी गावात कुजबूज सुरू झाली. फोमिश्चिनो खेड्याजवळ 'पार्टिझनां'नी

एक पूल उडवून दिल्याची बातमी आली. सारे जर्मन पहारेकरी मारले गेले व पूल जाळण्यांत आला. मी ती बातमी गिरणीत पोहोचवली.

काचेव्स्कीनं स्वतःला दोन शिव्या घातल्या. तो म्हणाला, "आपलाच–म्हणजे माझाच–सारा गाढवपणा झाला. भलत्याच ठिकाणी शोधत बसलो आपण. कुठं शोधायचं हे नीट समजायला हवं होतं आपल्याला."

फोमिश्चिनो होतं झात्स्कच्या वाटेवर, आम्ही शोधत होतो, नेमक्या उलटया दिशेने, आघाडीच्या बाजूला.

मी घरी परतलो. युराला कसलातरी फार आनंद झाला होता. अगदी उतू जात होता. मला पहाताच त्याला धीर धरवेना. त्यानं गर्वभरानं सांगून टाकलं :

"आमच्या सुरुंगानं आणखी एका गाडीचा निकाल लावला, कालची गोष्ट आहे ही."

"कोणता सुरुंग ?"

"रस्त्यावर फुटक्या काचा टाकल्या आम्ही."

मला युराची काळजी वाटायला लागली मग मी अस्वस्थ, बेचैन झालो. ही दोन नखाएवढी मुलं ! पण त्यांनीही काहीतरी कामगिरी करून दाखवली. आणि मी ? इतका मोठा वाढलोय आणि घराच्या सावलीला दिवस घालवतोय !

"काय करायचं समजलं का युरा ? बाहेर अंगणात जा आणि तुझ्या 'साळूबाई' घेऊन ये बाबा हत्यारं ठेवतात त्याच्याजवळच, शेल्फवरच आहेत साऱ्या."

"ओहं ! वाल्या ! मला माहीतच होतं, तू त्यांचा निकाल लावणार नाही म्हणून !" त्यानं दोन्ही हात माझ्या गळ्याभोवती घातले आणि तो मला बिलगला.

"बाबांशी याच्याबद्दल एक शब्दसुद्धा काढायचा नाही, ऐकलंस ?"

एके दिवशी आमच्याकडे एक वॅगन येऊन थांबली. तिच्यात एक लहान-खोर, टक्कल पडलेला, धारदार नाकाचा निरुपद्रवी वाटणारा जर्मन बसला होता. तो झात्स्कहून येत होता वॅगनला टप होता बसायची जागा बरीच उंच होती. त्यानं गबाळ्यासारखी खाली उडी मारली. आणि तो खोगिरापाशी काहीतरी करू लागला. त्याच्या हालचाली चमत्कारिक वाटत होत्या. अखेरीस त्यानं घोड्याला मोकळं केलं आणि दोन्ही दांड्यामधून बाहेर काढलं. आपल्या लहानशा हातानं त्यानं त्याला थोपटलं. मग तो गवतावर आडवा झाला.

वीसएक पावलांवर एक खड्डा होता. त्याच्या कडेकडेनं गवत माजलं होतं. आई ते कापत होती. येत्या हिवाळ्यात झोर्काला वैरणचारा मिळावा म्हणून ही तरतूद चालली होती.



युरा बटाट्यातलं तण काढण्यात गर्क झाला होता. त्यानं काढून टाकलेल्या तणाची खऱ्या चाऱ्याशी तुलना करणं योग्य झालं नसतं. पण कडक उन्हात वाळवल्यानंतर चारा म्हणून ते खपून गेलं असतं.

घोडा चांगलाच धिप्पाड होता. खड्ड्याच्या कडेकडेनं हिंडत होता. आपल्या रुंद खुरांवर जड जड टापा टाकीत, बटाट्याच्या वाफ्यातून तो रायच्या हिरव्या-गार, चमकत्या तुकड्याकडे निघाला.

युरानं त्याची वाट अडवली. आरडाओरडा करून तो घोड्याला हाकलायला पहात होता. घोड्यानं कानसुद्धा हलवला नाही, तो सरळ चालतच राहिला. उडी मारून युरा त्याच्या वाटेतून बाजूला झाला व ओरडू लागला, "आई, राय तुडवणार आता तो !"

आईनं वर पाहिलं. मग घोड्याला तिथून हाकलायला ती धावत सुटली. गवत कापायला घेतलेला विळा तिच्या हातात तसाच होता. घोडा बाजूला झाला आणि वळून वॅगनच्या दिशेनं चालू लागला. तो दोन दांड्यांच्या मध्ये जाऊन उभा राहिला आणि खिंकाळला.

तो जर्मन माणूस जागा झाला होता. बहुधा त्यानं घडलेला सारा प्रकार पाहिला असावा. तो उठला आणि आईजवळ आला. आईपेक्षा तो एखादी वीत तरी कमी उंच असावा. त्याच्या अंगावर फारसं मांस असं नव्हतंच. कातडीला सुरकुत्या पडल्या होत्या. त्यानं मान वर करून आईकडे पाहिलं आणि तो हसला.

आई जरा बावरली पण मग तीही प्रत्युत्तरादाखल जराशी हसली.

त्यानं हाताच्या बुक्कीनं छातीवर ठोसे मारून घेतले आणि तो काहीतरी म्हणाला. त्याच्या हाताची बोटं विळ्यावर स्थिरावली. विळा आपल्याला हवा असल्याचं त्यानं खुणेनं सांगितलं.

"घे बाबा घे. दिवसभराच्या कामाची खोटी होणार आता," म्हणत आईनं त्याला विळा दिला. हात फिरवून त्यानं त्याच्यावर घट्ट पकड बसविली. त्याच्या हाताला तो जरासा मोठा होत होता. अचानक त्यानं साऱ्या सामर्थ्यानिशी तो जोरात फिरवला.

"रशियन डुक्कर !" तो ओरडला.

आई जमिनीवर कोसळली. तिच्या दोन्ही पायाना विळ्यानं काप काढले होते. क्षणार्धात तिच्या पायाजवळचं गवत लालभडक झालं.

युरा त्या नाझीच्या अंगावर धावून गेला; कपड्याला धरून जोरानं खेचू लागला. त्या झटापटीत काही बटनं आणि कापडाचा एक तुकडा त्याच्या हातात आला. "फॅसिस्ट ! हरामखोर !" युरा त्याच्यावर ओरडू लागला.

त्या जर्मनानं युराच्या पोटात एक लाथ ठेवून दिली. युरा खाली कोसळला, कोलमडत गेला. विळ्याचं धारदार पातं पुन्हा एकदा हवेत लखलखलं.

"पळ ! युरा, पळ ! तो तुला मारून टाकील !" आई जिवाच्या आकांतानं ओरडू लागली.

"रुक् जाव !" कोणीतरी हुकूम गरजला. तो शिपाई मागे वळला आणि चटकन त्यानं हातातला विळा खाली टाकून दिला. रस्त्यावरून एक मोटारसायकल व एक साईड-कार बाजूला येऊन थांबली होती. साईड-कारमध्ये चष्मा घातलेला एक ऑफिसर बसला होता. शिपाई पवित्र्यात उभा राहिला आणि त्यानं खाडकन सलाम ठोकला. एकदा युराकडे आणि एकदा आईकडे बोट दाखवीत तो काहीतरी बडबड करू लागला. एव्हाना आई उठून बसली होती व आतल्या झग्याच्या पट्टया फाडून जखमा बांधू लागली होती. अजूनही त्यातून भळभळा रक्त वाहातच होते.

अधिकाऱ्यानं शिपायाचं स्पष्टीकरण रागातच ऐकून घेतलं. मग तो युराकडं वळला आणि मोडकं तोडकं बोलू लागला. त्याच्या बोलण्याचा मतितार्थ कळला तो असा की, इटालियन शिपाई फॅसिस्ट असतात, पण जर्मन शिपाई मुळीच फॅसिस्ट नसतात; ते 'राष्ट्रीय समाजसत्तावादी' असतात.

"कळलं ?" त्यानं युराला निर्विकारपणे विचारलं. आई उठायचा प्रयत्न करीत होती; पण फार रक्त गेल्यानं तिच्यानं उठवत नव्हतं. तिच्याकडे बोट दाखवीत तो युराला पुढे म्हणाला, "तू तुझ्या आईला मदत करायला हवीस. लोकांना बोलावून आणायला हवं ! कळलं ?"

मग तो त्या मख्ख शिपायाशी थोडंसं काहीतरी बोलला. शिपाई ताबडतोब उठला आणि त्या दांडग्या जनावरावर खोगीर आणि इतर सरंजाम चढवू लागला.

धान्य कापणीचा हंगाम आला तेव्हा गावचा पाटील, कमांडरच्या ऑफिसमधील एका जर्मन शिपायाला घेऊन घरोघरी जाऊन सांगावा देऊन आला.

"उद्या आपण गहू कापायला सुरुवात करणार आहोत." प्रत्येक ठिकाणी तो सांगे.

आईला कामातून मोकळीक होती, तिच्या जखमांमुळे ती अजूनही पडूनच होती. पण झोयाला व मला मात्र कामावर जावं लागलं.

सामुदायिक शेताचा सारा गहू जर्मन घेऊन गेले, शेतातली अखेरची लोंबी घेऊन गेले. या गव्हावर गाववाल्यांच्या केवढ्या आशा होत्या ! सारा चारासुद्धा त्यांनी आपापल्या जनावरांना वाटून घेतला.

आमच्या जमिनीसुद्धा त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. रायचा एक दाणासुद्धा आमच्या हाती लागला नाही. रायच्या त्या शेतानं आम्हाला काय दिलं तर फक्त दुःख आणि रक्त !

☐ ☐



# १६ : ते पत्रक

नाझींनी आमचं गाव व्यापलं त्या काळात आम्हाला अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. पण आमच्या मनावरच्या ज्या ओझ्यानं आमची सर्वांत जास्त कसोटी पाहिली ते ओझं म्हणजे अनिश्चितता. आम्ही आमच्या साऱ्या देशापासून तुटून अलग पडलो होतो, ऐकायला रेडिओ नव्हता की वाचायला वर्तमानपत्र नव्हतं. त्यामुळे सोविएत प्रदेशात काय घडतंय ते आम्हाला कळायला काहीच मार्ग नव्हता. दुसऱ्या आघाड्या कुठे होत्या, दोस्त राष्ट्रे सोविएत संघराज्याला मदत करीत होती की नव्हती, आम्हाला काही काही माहीत नव्हतं.

वर्ष उलटलं होतं, स्मोलेन्स्क प्रदेश नाझी आक्रमकांच्या पायाखाली तुडवला जात होता. मग १९४३ सालचा फेब्रुवारी महिना उगवला. ते वर्ष म्हणजे उपासमार, हालअपेष्टा, दुर्दैव, यांचं वर्ष !

एके दिवशी एक विमान आमच्या खेड्यावरून उडत गेलं. त्याच्या इंजिनाच्या आवाजावरूनच आम्ही ओळखलं. ते सोविएत विमान होतं. संध्याकाळ होत होती, अंधार पडायला लागला होता; पण विमानातून काहीतरी पांढरं खाली पडलं, फडफडत उलगडत गेलं एवढं दिसायला पुरेसा उजेड होता. पत्रकं होती ती !

सर्वांच्याच मनात एक तीव्र इच्छा उसळून आली; धावत रस्त्यावर जावं आणि एखादी पत्रिका मिळवावी. पण ते अगदीच अशक्य होतं. एव्हाना जर्मन शिपाई त्यांच्यामागे धावपळ करू लागले होते.

युराचं नशीब जोरावर. गावाबाहेर तो घसरगुंडी खेळत होता. वाऱ्याच्या झोताबरोबर एक पत्रिका उडाली ती बर्फानं आच्छादलेल्या कुरणात जाऊन पडली. युरानं ती उचलून तिची काळजीपूर्वक घडी घातली. ती घडी व्यवस्थित हातमोज्याच्या आत बसवली आणि घराकडं धूम ठोकली.

"बाबा मला काय सापडलंय पहा," तो बाबांना म्हणाला. धावत पळत आल्यानं त्याला धाप लागली होती.

मी छोटयाशा खिडकीवर एक ब्लँकेट लावले व मग तेलाची पणती पेटवली, दाराला कडी घातली.

"वाच बरं काय आहे ते," बाबा झोयाला म्हणाले.

आम्ही टेबलाभोवती गोळा झालो. पत्रिका हातात घ्यायला प्रत्येकाची बोट अगदी शिवशिवत होती; त्यातले बहुमोल शब्द स्वतः वाचायला प्रत्येकजण आसुसला होता.

वरच्याच बाजूला अगदी ठसठशीत अक्षरात एक घोषणा लिहिली होती. "फॅसिस्ट आक्रमकांचा नाश होवो!" स्तालिनग्रादजवळ जर्मन सैन्याला दारूण पराभव पत्करावा लागल्याची बातमी त्या पत्रिकेत होती.

झोयानं ती पत्रिका हलकेच कुजबुजल्या आवाजात वाचली. आम्ही अगदी श्वास रोखून शब्द अन शब्द बारकाईनं ऐकत होतो.

"पुन्हा वाच पाहू झोया," बाबा म्हणाले, "आणि यावेळी जरा सावकाश वाच. मघाशी मशीनगनसारखी धाडधाड वाचत गेलीस. महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्या."

आम्ही पत्रिका वाचली, दुसऱ्यांदा! आणि तिसऱ्यांदा सुद्धा.

"ठीक ठीक. आता ते नाझींना आपल्या देशातून हाकलून लावतील. वोल्गा वर हरल्यावर आता नाझींना फार वेळ तग धरता येणार नाही." बाबांनी निष्कर्ष सांगितला.

स्तालिनग्रादच्या लढाईचं पूर्ण महत्व आणि ऐतिहासिक स्वरूप यांचं आम्हाला त्या काळात नीट आकलन होऊ शकले नाही हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही पण आम्हा सर्वांना तेव्हा असं वाटलं खरं. वोल्गा प्रदेशात आमच्या सेनेनं विजय मिळवला; त्या विजयानं नाझी टोळयांचा अंतिम पराभव अलिकडे खेचून आणायला मदत होणारच.

त्या हिवाळयात खूप बर्फ पडला. हिमवादळं शेतावरून घोंगावत पुढं निघून जायची. रस्ते अगदी पुरेपूर झाकून जायचे. बर्फाच्या वजनानं टेलिफोनच्या तारासुद्धा तुटून जायच्या.

प्रत्येक दिवशी बर्फ बाजूला करून रस्ते मोकळे करायला लागत. घराघरातून पोराथोराना हाकलून त्या कामाला जुंपण्यात येई. सारे गाववाले रस्त्यावर येत. आमच्याबरोबर सशस्त्र पहारेकरी असत. एक सार्जंट मेजर त्यांचा मुख्य होता. गावात अफवा होती की त्याला रशियन बोलता येत होतं आणि त्याला अधिकार-पदावरून काढून खालच्या हुद्यावर नेमलं होतं.



"तू बातमी ऐकलीस?" वलोद्या बेलोवनं विचारलं. आम्ही रांगेच्या अगदी शेवटी शेवटी आलो होतो. खांद्यावर फावडी टाकलेली होती. आम्ही रस्ता मोकळा करायला निघालो होतो. त्याचा चेहरा तळपत होता.

"नीट ऐकली आहे."

त्यानं माझा हात हलवला आणि म्हणाला, "मी त्या नाझीची कशी उडवतो बघ."

त्याला अडवण्याची संधीच मला मिळाली नाही. रांगेतून बाहेर पडून तो जो धावत सुटला तो थेट त्या सार्जंट मेजरसमोर जाऊन उभा राहिला.

"हेर सार्जंट मेजर, मी तुम्हाला एक प्रश्न विचारू का?"

तो नाझी वलोद्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहू लागला. त्याची चालण्याची गती मंदावली.

"मला जरा लायटर मिळेल का, हेर सार्जंट मेजर?"

अचानक त्या जर्मनानं खिशात हात घातला, लायटर काढला आणि त्याची ज्योत वलोद्यासमोर धरली.

वलोद्यानं सिगारेट पेटविली अन म्हणाला, "आभारी आहे, आता हेर सार्जंट मेजर, मला सांगा स्तालिनग्रादजवळ तुमची फार दुर्दशा उडाली खर ना?"

आपण काय ऐकतोय् याच्यावर सार्जंट मेजरचा बिश्वास बसेना. वलोद्याला त्याच्या उर्मटपणाबद्दल चांगली अद्दल घडवायचा त्याचा विचार होता पण मग त्याने थकल्यासारखे खांदे उडविले आणि तो वलोद्याला म्हणाला, "आपल्या जागेवर परत जा. माझी एक सूचना आहे तुला. तोंड बंद ठेव."

आणि अशा रीतीनं आम्हाला कळून आलं. सार्जंट मेजरला रशियन घडाघडा बोलायला येत होतं!

☐ ☐

# १७ : गिरणीला आग लागते

" आग ! आग ! शाळेला आग लागलीय् !"

युराच्या आरोळ्या ऐकून मी निवाऱ्यातून बाहेर पडलो आणि धावत सुटलो. काळ्या धुराचा एक लोट उसळून टेकडीच्याही वर गेला होता. बागिच्या-तून धावत जाऊन आम्ही शाळा गाठली. पण शाळेला आग लागली नव्हती ज्या गोठ्यात दळण्याचं यंत्र बसवलं होतं त्याला आग लागली होती.

" बाबा आहेत ना तिथं !" युरा किंचाळला

बाबा कुठेच दिसत नव्हते. टपरीच्या बाहेर काचेव्स्की आमच्याकडे पाठ करून, निर्विकारपणे जळत्या गोठ्याकडे पहात होता. लवलवत्या ज्वाला साऱ्या बाजूनं गोठ्याला चाटून जात होत्या, छताच्या दिशेने वरवर चढत होत्या..

मग आगीच्या बंबाचा भोंगा वाजलेला सर्वांना ऐकू आला. तो आवाज कानावर येताच काचेव्स्की टपरीत गेला व एक फावडे घेऊन बाहेर आला. फावड्यानं बर्फ उचलून ते तो आगीवर टाकू लागला. बाबा घाईघाईनं टपरीतून बाहेर आले आणि बादली घेऊन लंगडत लंगडत विहिरीवर गेले.

जर्मन आगवाल्यानी आपले होजपाईप सरसावले आणि आगीवर पाण्याचा मारा करायला सुरुवात केली. वीस मिनिटं ते आगीशी मुकाबला करीत होते शेवटी त्यानी आगीवर मात करण्यात जय मिळवला.

बहुतेक गोठा जळून कोळ झाला होता. छत खाली वाकले होते. काचेव्स्की कडे लहान इंजिनाची जबाबदारी होती. त्याचाही निभाव लागला नव्हता. धातूचे पत्रे जळून वेडेवाकडे आक्रसले होते; पट्टयांचं तर फारच नुकसान झालं होतं.

मग ठाण्याचा मुख्य कमांडर त्या जागी आला. त्याने पट्टा घट्ट आवळून बांधला होता. चांगला मजबूत, भक्कम बांध्याचा दिसत होता तो. एक तरुण बुटकासा शिपाई त्याचा दुभाष्या होता. त्याने चष्मा घातला होता त्यांच्या मागोमाग ब्रुनो नावाचा एक ' फिन ' पण आला.



ब्रुनोबद्दल जरा दोन शब्द. सात फुटाचा ब्रूनो राक्षसासारखा वाटायचा. तो नेहमी निराश, उद्विग्न दिसायचा. चेहेऱ्यावर चुकूनही हसू उमटायचं नाही. कमांडरच्या मागे मागे तो सावलीसारखा फिरायचा कोणी कधीही त्याना वेगवेगळं पाहिलं नाही. तो कमांडरचा शरीररक्षक तर होताच पण त्याच्याकडे दुसरंही एक काम होतं. शिक्षा अंमलात आणण्याचं काम अधिकृतपणे त्याच्यावर सोपविण्यात आलेलं होतं. ब्रूनो कधीही समोर दिसला की गावातले लोक त्याला टाळण्यासाठी, दुसरा रस्ता धरीत.

" बाबांच्या आणि काचेव्स्कीच्या पुढं काहीतरी संकट वाढून ठेवलंय्, " माझ्या मनात विचार आला.

गावातले पुरुष आणि बायका एक लहानसा घोळका करून रस्त्याच्या जरा बाजूला उभी होती. आम्ही त्यांच्यात जाऊन मिसळलो. आता काय होणार या भीतीने आम्ही गोठून गेलो होतो. युरानं माझा हात पकडून ठेवला होता. तो भीतीनं कापत होता.

कमांडरनं रेडिएटरवर आपला कोपर टेकवला आणि कशाची तरी अपेक्षा करीत तो उभा राहिला. अग्निशामक पथकांचा नायक होता त्यानं बाबांना व काचेव्स्कीला ढकलत ढकलत त्याच्या पुढ्यात आणून उभं केलं. दोघांचीही नजर जमिनीला खिळली होती. त्यानी तोंडातून अवाक्षरही काढले नाही. ब्रूनो हलक्या पावलानं पुढं झाला आणि नेटका त्या दोघांच्या मागे जाऊन उभा राहिला.

कमांडरनं जोरानं मूठ आपटली आणि तो जर्मनमध्ये काहीतरी किंचाळून बोलला.

" हेर कमांडंट म्हणतात, या आगीच्या मागं राजकारण आहे ; ही आग म्हणजे जाणूनबूजून केलेलं घातपाताचं काम आहे," दुभाष्या घोगऱ्या आवाजात बोलू लागला; त्यानं आपलं बोट बाबांवर रोखलं, " हेर कमांडर यांची खात्री आहे की तू आणि तू," त्याचं बोट काचे.स्कीवर रोखलं गेलं, " याला जबाबदार आहात, तुम्ही पार्टिझनाना सामील आहात. तुम्हाला दोघानाही गोळ्या घालायला हव्यात."

मी हलकेच युरावर नजर टाकली. तो अगदी पांढराफटक पडला होता.

" तू लाल सैन्यात होतास काय ?" दुभाष्यानं काचेव्स्कीला विचारले.

" मी आजारी माणूस आहे. मला पोटाचा विकार आहे. मला परत पाठव-ण्यात आलं होतं," काचेव्स्की पुटपुटला.

" याची खात्री करून घेऊ आम्ही."

बाबानी मान वर केली आणि ते कमांडरकडे रोखून पाहू लागले; मग कोरड्या आवाजात म्हणाले, " आम्ही काही पार्टिझन नाही. माझंच पहा, मला चार मुलं आहेत. त्याना निराधार करण्याजोगं मी काही करणार नाही."

दुभाष्यानं त्यांचं म्हणणं कमांडरला जर्मन मधून सांगितलं. स्वतःचंही काही म्हणणं सांगितलं असावं. तो बराच वेळ बोलत होता. खात्री पटवून देण्यासारखं बोलत होता. कमांडंटचा राग निवळू लागल्याचं स्पष्टच दिसलं.

"मग आग कशी काय लागली ?"

काचेव्स्की एक पाऊल पुढे झाला. "हेर महाशय, तुम्ही स्वतःच चला आणि पहा. एक्झॉस्ट पाईपच्या अगदी जवळच गवताची गंजी होती. गंजीवर ठिणगी उडाली आणि तिनं पेट घेतला."

"कोणा मूर्खानं गंजी लावली त्या ठिकाणी ?"

काचेव्स्की चूप होता.

"मी तुला विचारतोय ! कोणी लावली?"

"माफ करा. हेर कमांडर; तुमच्या शिपायांनीच लावली ती शरदऋतूत. तेव्हाच मीं त्याना सांगितलं होतं, गिरणीत गवत ठेवणं बरोबर नाही म्हणून; आग लागायची एखादे वेळा तेव्हा तुम्हीच पहा..."

ब्रूनोने मोटरचं दार अदबीनं उघडलं कमांडरनं एक पाय तिच्या बोर्डावर ठेवला आणि तो हुकूम सोडू लागला.

"एक आठवड्याच्या आत गिरणी बांधून तयार करावी," कमांडरचा दुभाष्या त्याच्या मागोमाग बोलू लागला, "गागारिन, इथली जबाबदारी तुझ्यावर आहे. तुला त्याच्याबद्दल जबाबदार धरण्यात येईल. जरा इतकासांदेखील काही गुन्हा घडला तर तुला त्यासाठी प्राणाचं मोल द्यावं लागेल. नीट सारं समजलं ना तुला ?"

"होय," बाबा पुटपुटले.

"विसरू नकोस; यावेळी केवळ तुझं नशीब जोरावर होतं म्हणून तू सुटलास !" गाडीत बसता बसता तो दुभाष्या म्हणाला.

गाडीत बसून ते निघून गेले. अग्निरक्षकानी आपले होज–पाईप गुंडाळले आणि तेही निघून गेलें. ते निघून जातांच काचेव्स्कीनं सरळ खालच्या घाणेरड्या बर्फात बैठक मारली आणि तो पोरकटासारखा हसला, काहीसा असहायपणे हसला.

"विक्तर, काय झालं तुला ?" बाबानी त्याच्याजवळ वाकून विचारलं.

"घशाला कोरड पडलीय्," त्यानं हाताच्या ओंजळीत बर्फ उचलून घेतला आणि हलके हलके खायला सुरुवात केली.

बाबांनी सिगरेट पेटवली. युरा त्यांच्याकडे धावत गेला. त्यानं त्यांची बाही घट्ट पकडून ठेवली. "बाबा आपण घरी जाऊ या, चला लवकर; मला भीती वाटते."



"आता घाबरण्याचं काही कारण नाही," काचेव्स्की म्हणाला, आणि मग चमत्कारिक हसला; "आता पुन्हा गुन्हा घडेपर्यंत तरी ते आपल्याला गोळ्या घालणार नाहीत. म्हणजे त्याचा अर्थ असा की आता आपल्याला दुरुस्तीच्या कामाला लागलं पाहिजे; खरं की नाही अलेक्सी इवानोविच ?"

"इतकी घाई कशाला हवीय् ?" बाबानीच उलट प्रश्न केला.

"खरंच का ठिणगी उडून तिथं आग लागली ?" मी काचेव्स्कीला विचारलं.

"चांगलाच भडका उडाला होता, नाही का ?" माझ्या प्रश्नाची उपेक्षा करीत त्यानं विचारलं, अन् पुढे म्हणाला, "अलेक्सी इवानोविच, जरा चिमूटभर तंबाखू येऊ द्या इकडे."

एक आठवडा उलटला आणि दुसरा सुरू झाला. पण गिरणीचं इंजिन बंदच होतं. शक्य त्या साऱ्या सबबींखाली बाबा आणि काचेव्स्की काम पुढेपुढे ढकलत होते. कमांडरनं दुभाष्याला गिरणीवर पाठवलं.

"गागारिन, हे घातपाती काम आहे त्याबद्दल तुला गोळी घालावी लागेल. तुला आणि तुझ्या सहकाऱ्याला. जाता जाता सांगतो तुला; तुझ्या त्या सहकाऱ्यानं, आपण लाल सैन्यात काम केल्याचं सांगितलं नाही. काय करताय त्याची नीट जाणीव ठेवा म्हणजे झालं !"

आता टंगळमंगळ करून चालणार नव्हतं, काम उरकायला हवं होतं. तीन दिवसानंतर इंजिन नीट सुरू झालं.

एक दिवस साऱ्या गिरणीत आली साऱ्या आमच्या गावचीच. ती तरुण होती, चंट होती. क्लुशिनोत पहिल्या पहिल्या जर्मन सैनिकानी जेव्हा पाऊल ठेवलं तेव्हा त्याना भेट म्हणून कोंबडीचं पिलू देणारी साऱ्या ती हीच. "अलेक्सी इवानोविच," ती बाबाना म्हणाली, "दाराशी मी माझी लहानशी थैली ठेवली आहे. मला जरा घाई आहे, लक्षात असू द्या."

बाबानी रागानं तिच्याकडं पाहिलं. "मला काही तुझं काम करता येणार नाही. फक्त जर्मन सैन्यासाठी धान्य दळून द्यायचं, इतर कोणासाठी नाही, असा हुकूम आहे मला."

"तुम्ही तरी गमतीदारच आहात, अलेक्सी इवानोविच. कमांडर स्वतःच माझ्या घरी राहातो, माहीत आहे ना तुम्हाला ?"

"काही झालं तरी तू आहेस एक बाईमाणूस आणि..." इथं बाबानी एक अर्वाच्य शब्द टाकला, "..... आणि तू काही जर्मन सैनिक नाहीस. तुझ्या माहितीसाठी सांगतो; मी जर्मन कमांडरच्या हुकुमानुसार वागतोय्."

"ठीक आहे! मला माहीत आहे तुम्ही कोणाच्या बाजूला आहात ते. बोल्शेविक यायचीच तुम्ही वाट पहाता आहात, मला कळलय् सारं." ती बाहेर पडली; जाता जाता तिनं धाडकन दरवाजा लावून घेतला.

चिन्ह काही ठीक नव्हतं. एका शिपायाला घेऊन ब्रूनो गिरणीत आला आणि बाबाना कमांडरच्या कचेरीत घेऊन गेला. मग कमांडरच्या वैयक्तिक हुकुमावरून ब्रूनोने बाबाना वीस फटके दिले. युरा आणि मी धावतच तिथे गेलो आणि बाहेर थंडीतच त्यांची वाट पहात राहिलो.

बाबा आतून बाहेर आले आणि पचकन थुंकले. त्यानी भरपूर शिव्याशाप देऊन घेतले. ते खूपच लंगडत होते, तसेच लंगडत घराकडे निघाले. त्यानी आम्हाला पाहिलं नाही. युरा त्यांच्या मागोमाग पळत गेला, "फार दुखलं का बाबा?"

बाबानी युराच्या खांद्यावर हात ठेवला आणि ते पोकळ आवाजात म्हणाले "ठीक आहे. पोरा, ठीक आहे सारं. त्याना या साऱ्यांचा जाब द्यावा लागेलच साऱ्याची किंमत मोजावी लागेल."

मी त्यांच्या मागून चालत होतो. त्यांचे हात कापत होते. चालायला जड जात होतं त्याना. आपलं दु:ख आणि अपमान दडविण्यासाठीच, चालता चालता त्यानी आपली चाल एकदम मंद केली आणि माझ्याकडे वळून म्हणाले, "ब्रूनोचं ते सारं बोलणं......गाढवाला धड काठी देखील फिरविता येत नाही!" आणि ते पुन्हा एकदा थुंकले.

त्या दिवशी रात्री बाबा आईशी बोलत होते ते मी ऐकलं. "पुढच्या वेळेला मी अगदी वेगळ्याच पद्धतीनं ते सारं जाळून टाकीन. नेमका क्षण तेवढा टिपायला हवा."

□ □



## १८ : जर्मनांच्या ताब्यात

डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजराच्या पाठीत बडगा बसावा तशीच आमची अवस्था झाली. मोठ्या सफाईनं आम्ही बनवले गेलो आणि कमांडरच्या कचेरीच्या मागे मोठे कंपाऊंड होते त्यात कैद होऊन पडलो. कंपाउंड चांगलेच उंच होते वरच्या बाजूला काटेरी तारा लावलेल्या होत्या. दार नसलेल्या पिंजऱ्यासारखं वाटत होतं तिथे. सशस्त्र जर्मन सैनिक आमच्यावर पहारा देत होते.

आदल्या दिवशी संध्याकाळी गावचा पोलीस पाटील आमच्या निवाऱ्यात घुसला आणि म्हणाला होता, "उद्या सकाळी बरोबर ९ वाजता कमांडरच्या कचेरीत हजर राहायच तुला."

"कशासाठी?"

"झात्स्कला जायचंय. बर्फ साचलय ते खणून मोकळं करायला तुझ्या वयाच्या मुलांना एकत्र करताहेत ते. तीन चार दिवसांच काम आहे तिथं."

त्याच्या आदल्या दिवशी हिमवादळ झालं होतं ही गोष्ट खरीच होती. काही काही ठिकाणी झोपड्यांच्या वळचणीपर्यंत बर्फाचे ढीग साचले होते. पोलीस पाटलाच्या सांगण्यावर सहज विश्वास बसावा यात आश्चर्य नव्हते. कदाचित त्यालाही खरी गोष्ट पुरेशी माहीत नसावी. मी त्याचं बोलणं खरं धरून चाललो.

ते जेव्हा मला मागच्या कंपाऊंडमध्ये घेऊन गेले तेव्हा माझ्या मनात दाट संशय आला. माझ्या ओळखीची चाळीस एक मुलं तिथं अस्वस्थपणे उभी होती.

थोड्या वेळानं कमांडर आणि त्याचा दुभाष्या बाहेर आले. यावेळी त्यानी आम्हाला जर्मनीत दुधाच्या व मधाच्या नद्या असल्याचं आमिष दाखवलं नाही. जेव्हा नाझींनी आमचा प्रदेश प्रथमच व्यापला होता तेव्हा ते अशी लालूच दाखवीत असत. गावात लागलेली मोठमोठी पोस्टर, वर्तमानपत्रात जर्मनानी दिलेली मोठमोठी ठळक शीर्षकं, त्यांचे हस्तक या साऱ्यांचा एक सूर असे. जो स्वेच्छेने त्यांच्या बाजूला जाईल व 'जर्मन रीश'साठी काम करील त्याचं कल्याण होईल असं आश्वासन त्यात असे.

परंतु आता कमांडरनं मोजक्या, करड्या शब्दात खरं सांगून टाकलं. आम्हा सर्वांना गोळा करून त्यांचं एक पथक बनविण्यात येणार होतं. या खास पथकातील सान्या सभासदांची क्रमवार लांबलचक यादी त्यानं वाचून दाखविली. जर्मनीला कसलंतरी सामान जायचं होतं, ते नेण्यासाठी आमची रवानगी होणार होती. जर आमच्यापैकी कोणी वाटेतून पळून जायचा प्रयत्न केला तर क्लुशिनोत त्याच्या सान्या कुटुंबाला गोळ्या घालून ठार केलं जाणार होतं.

रात्रंदिवस कंपाउंडला कुलूप ठोकलेलं असे. झात्स्कला जायच्या दिवशी सकाळी आमच्या घरच्या माणसांना आम्हाला येऊन भेटायला परवानगी दिली होती. भेटीच्या वेळी एक खास पहारेकरी कंपाउंडमध्ये पहारा देत होता.

झोया सोडून सारेजण मला निरोप द्यायला आले होते. ती मुद्दामच घरी राहिली होती. कारण सर्वांना भीती वाटत होती की, हा काहीतरी बनाव असावा आणि तिला पकडून नेण्याचा त्यांचा विचार असावा. बाबांचा चेहरा अगदी ओढला होता. ते अगदी गप्प होते, त्यांना बोलताच येईना. बरीसनं आपले हात माझ्या पुढं केले. हे सारं काय चाललय् ते त्याला नीटसं कळत नव्हतं, पण कुठतरी काही-तरी घोटाळा आहे एवढं त्याला नक्की समजलं. त्याला रडूच फुटलं. आईनं एक पुडकं मला दिलं आणि, म्हणाली "बनपाव आणि अंडी आहेत त्याच्यात. जवळ असू दे." पण मला काही पुडकं धरता आलं नाही. मी युराला उचलून घेतलं होतं. ते पुडकं माझ्या हातातून निसटलं आणि खाली पडलं. कोणाचा तरी त्याच्यावर चुकून पाय पडला; अंडी फुटल्याचा कचकन आवाज आला.

युरा मला घट्ट बिलगला होता, फुटून फुटून रडत होता आणि रडता रडता मोठमोठ्यानं ओरडून सांगत होता, "वाल्या, ते तुला मारून टाकतील ! त्यांच्या-पासून दूर कुठंतरी पळून जा ! संधी मिळाली की लागलीच पळ !"

नशीब, त्याचं हे ओरडणे माझ्याशिवाय आजुबाजूला इतर कोणालाच ऐकू गेलं नाही. प्रत्येकाला आपापलं दु:ख जड झालं होतं. रडण्याचा ओरडण्यांचा हल्लकल्लोळ माजला होता.

युराचे खारट अश्रू माझ्या ओठावर पडले, त्याचा खारटपणा मला जाणवला. माझ्या छातीला भिडलेली त्याची छाती धाडधाड उडत होती. मी स्वत:ही तेव्हा रडत असलो पाहिजे. कारण सारं काही धूसर, अस्पष्ट असं दिसत होतं. एखाद्या लहान मुलाला उचलून जवळ घ्यावं तसं मी त्याला घेतलं होतं; पण त्याला आता लहान म्हणता आलं नसतं. लढाईच्या त्या दोन वर्षांत युरा चांगलाच वाढला होता. त्याच्या जुन्या कोटाच्या बाह्यातून त्याचे लांबलचक हात कितीतरी बाहेर आले होते. त्याची वाढ झाली होती हे तर खरंच पण त्याला समजही फार, फार आली होती.



त्याचं बरीससारखं नव्हतं. काय चाललंय् ते चांगलं कळत होतं त्याला, तीन दिवसानंतर त्याला नऊ वर्षे पूर्ण होणार होती.

नऊ वर्षापूर्वी एका धूसर, करड्याशा दिवशी, १९३४ च्या मार्च महिन्यात मी बाबांच्या बरोबर झात्स्कच्या इस्पितळात गेलो होतो. आई प्रसूतीगृहाच्या पोर्चमध्ये येऊन उभी होती. तिनं मेंढीच्या कातड्याचा कोट घातला होता. तिच्या हातात एक निळं-पांढरं बंडल होतं.

"हा तुझा नवा भाऊ," बाबा म्हणाले होते.

"पाहू देत मला."

आई चांगली सडसडीत झाली होती. तिचा चेहेरा आनंदानं तळपत होता. ती हसली आणि म्हणाली, "कसा उतावळा रे तू ! इथं कसं त्याला मोकळं करणार ? वारं कसं सुटलंय् पाहिलंस ना ? थंडी होईल त्याला. घरी गेलो की मग किती पहायचंय तेवढं पहा."

"किती गोड आहे, होय ना ?" घरी गेल्यावर तिनं त्याला मोकळा केला तेव्हा ती म्हणाली.

मी काहीच बोललो नाही. खरं सांगायचं तर लाल तोंडाचं, मोठमोठ्यानं रडणारं ते तान्हं मूल मला काही फारसं गोडबिड दिसलं नाही. शिवाय मी तेव्हा नऊ वर्षाचा झालो होतो. घरात नवं मूल आलंय्, आई-बाबा कामासाठी म्हणून सारखे घराबाहेर राहाणार. एक लहान मुल म्हटलं की त्याच्या मागोमाग केवढं काम येतं ! सारा दिवस पुरतं ! आणि ते सारं मला करावं लागणार होतं !

युराची देखभाल मी कशी काय केली मला सांगता येणार नाही. लहान-पणी मी त्याला संभाळत असे. सांभाळताना जी त्याची अनेक कामे उद्भवत ती सारी पार पाडीत असे. त्यामुळे आमच्या वयातील अंतराला न जुमानता त्याच्या माझ्यात जिव्हाळ्याचे भक्कम धागे गुंफले गेले होते.

"वाल्या, त्यांच्यापासून दूर कुठंतरी पळून जा."

"नक्की जाईन, युरा, नक्की जाईन !" मी ओरडलो त्या सान्या गदा-रोळात, मी काय म्हणालो ते त्यानं एकट्यानंच नीट ऐकलं.

आमचा तांडा खूप मोठा होता. आम्ही पुढे आणि आमच्या मागे गुरंढोरं. क्लुशिनोत ज्या काही गायी, मेंढ्या आणि डुकरं शिल्लक होतीं ती सारी जर्मनांनी जबरदस्तीनं काढून नेली. त्या कळपात कुठतरी आमची झोकी पण होती. आईनं तिला हिवाळ्यात लागेल म्हणून चारा बाजूला काढून ठेवला होता. आम्ही उपास काढले होते... ते सारं वाया गेलं होतं. त्यापेक्षा आम्ही तिला मारलं असतं तर आमचं बरचसं निभलं असतं.

आम्हाला झातस्ककडे नेण्यात येत होतं. खरं सांगायचं तर आमच्यात आणि आमच्या मागोमाग येणाऱ्या मुक्या जनावरात काहीच फरक नव्हता. दोघांनाही हाकलावं लागत होतं.

सशस्त्र पहारेकऱ्यांच्या ओळीतून कोणाची तरी आई पुढं घुसली. पहारेकऱ्यानी तिच्यावर पोलिसचा कुत्रा सोडला. पथकातल्या एका तरुणाला काहीतरी देण्यासाठी एक मुलगा धावला, त्याला त्यानी बंदुकीच्या दस्त्यानं ठोकला.

जाताना आम्ही आमच्या घरावरून गेलो. घरापाशी येऊन पोहोचलो पण मी तिकडं पाहिलं नाही. मला माहीत होतं; घरातले सारेजण फाटकापाशी उभे असणार; आई पळतपळत बाहेर येणार आणि आमच्या मागे मागे चालत राहाणार. बाबा फाटकातच उभे राहून कोरड्या नजरेनं पहात राहाणार, एकामागून एक सिगरेट पेटविणार ! मी त्या बाजूला पाह्यलं नाही.

"वाल्या, त्यांच्यापासून दूर कुठंतरी पळून जा." युरा ओरडत होता ते मी ऐकलं.

मी पळून जायचा विचार पक्का केला !

आम्ही झात्स्कला पोहोचलो. तिथे काही वॅगन उभ्या होत्या, त्यात आम्हाला कोंबण्यात आले. वॅगनला जोडलेले घोडे अगदी रोडावलेले होते लढाईच्या काळात कामाचे घोडेसुद्धा रोडके दिसू लागले होते. प्रत्येक वॅगनबरोबर एक सशस्त्र जर्मन पहारेकरी होता. आमच्या वॅगनबरोबर जोहान नावाचा पहारेदार होता. म्हातारा अतिशय लठ्ठ व खादाड होता. रेशनमध्ये माझ्या वाट्याला जी काही थोडीशी ब्रेड येई ती खाऊन टाकताना त्याला काही वाटत नसे.

आमचा जर्मनीचा प्रवास हा असा सुरू झाला.

झात्स्कमध्ये असतानाच माझ्या कानावर आलं होतं; आम्ही गाव सोडलं त्याच्या दुसऱ्या दिवशीच मुलींचंही असंच एक पथक बनविण्यात आलं होतं. माझी बहीण झोयाही त्यात होती.

तीन आठवड्यानंतर एका रात्री, आम्ही बायलोरशियातील एका खेड्यात थांबलो. मी जोहानचे पिस्तुल चोरले आणि जंगलात पळ काढला माझ्या अंदाजानुसार तो पावेतो क्लुशिनोची मुक्तता व्हायला हवी होती; माझ्या घरची माणसं संकटातून बाहेर पडायला हवी होती; देशाच्या ज्या भागात मी आलो होतो तो भाग मला अनोळखी होता. कडाक्याच्या थंडीत, उपाशी पोटी मी कितीतरी दिवस तिकडे भटकत होतो. मग एके दिवशी एका सोविएत रणगाडा—पथकाशी माझी गाठ पडली.

□ □



## १९ : घरून पत्र येते

एका टी–३४ रणगाड्यावर मी गनर म्हणून काम करू लागलो होतो.

सूर्य अगदी बरोबर डोक्यावर आला होता. त्याचा पांढरा लखलखीत गोळा खाली आग ओकत होता. वसंतऋतूत इतका असा हा उकाडा म्हणजे आश्चर्यच होतं. रणगाड्याची सावली त्याच्या अगदी खाली आली होती. त्या सावलीचा आसरा म्हणून काहीच उपयोग नव्हता माझे सगळे सहकारी बर्च वृक्षाच्या सावलीला गेले होते. मीही खरं म्हणजे त्यांच्याचबरोबर जायला हवं होतं. पण मी अगदी थकून गेलो होतो. हातपाय उचलायला नको वाटत होतं. शिसासारखे जड झाले होते ते. अडीअडचणींना तोंड देत आम्ही बराच मोठा पल्ला गाठला होता. एका मोठ्या ध्वेतरशियन खेड्यातून आम्ही शत्रूला उखडून फेकून दिलं होतं पण त्याच्यावर तुटून पडण्यासाठी आम्हाला दोन दिवस व दोन रात्री झोपेवाचून काढाव्या लागल्या होत्या. आम्ही रणगाडे ठाण्यावर नेले आणि हुकुमाची वाट पहात होतो. शत्रूला रणगाडे दिसू नयेत म्हणून, त्याला चकवायला रणगाड्यावर आच्छादन घालतात. ते घालण्याचा हुकूम मिळाला नव्हता, म्हणजे लवकरच आम्ही पुढे चालू लागणार होतो हे उघडच होतं.

मला एकच गोष्ट फार हवी होती......झोप हवी होती.

मी माझी टोपी डोळ्यावर ओढून घेतली आणि गवतावर ताणून दिली. कुठून तरी गवतातूनच पुदिन्याचा वास येत होता. केव्हातरी माझा डोळा लागला. स्वप्नं पडायला लागली. पण त्या स्वप्नांचा एकात एक असा गोंधळ झाला होता. त्यानी मला अगदी घाबरवून सोडलं. पहिल्याप्रथम दिसला तो जोहान ! खादाड जोहान ! तो माझा पाठलाग करीत होता. हातातला हॅंडग्रेनेड आवेशानं फिरवीत होता, पिस्तुल परत दे म्हणून मला दरडावीत होता. त्यानं मला माझा जीव घेण्याची धमकी दिली. पण प्राण वाचवायला सुद्धा मला जागचं हलता येईना.

"गागारिन ! गागारिन !" कोणीतरी मला हलवत होतं, "उठून बैस," आनंदाची बातमी आहे. गागारिन, तुझं पत्र आलंय्.

तिकिट नसलेलं ते पाकीट मी सरळ फोडल. मला घरून आलेलं हे पहिलंच पत्र. नाझींच्या पहाऱ्यात मला नेण्यात आलं त्या प्रसंगानंतर घरची बातमी ही आता प्रथमच मिळत होती. वेडचावाकडचा ओळी आणि अशुद्ध शब्द म्हणजे माझ्या बाबांचंच पत्र. त्यांचं शिक्षण शाळेच्या चार भिंतीत झालेलं नव्हतं. कठोर श्रमातून त्यानी शिक्षण घेतलं होतं.

"गुड् मॉनिंग किंवा गुड् इव्हिनिंग. आमचा लाडका मुलगा आणि लाल सेनेचा शिपाई, वलेन्तिन यास," पत्राची सुरुवार अशी होती. बाबांच्या सर्व पत्रांची सुरुवात हीच कायम राहिली. पत्रात गावातल्या साऱ्या बातम्या होत्या. बहुतेक वाईटच होत्या. अमुक एका घरातल्या लोकाना 'तुमचा मुलगा युद्धात कामास आला अहे . अशी सरकारी नोटीस गेली; क्लुशिनो मुक्त झाल्यावर दुसऱ्याच दिवशी अमुक एक स्त्री मरण पावली, निदान आमच्या सैनिकानी क्लुशिनो मुक्त केलं एवढं तरी डोळे भरून पाहून घेतलं; अमुक एक जण घरी परतला, परत येताना पाय गमावून आला होता...पावेलकाका मोर्दोवियाहून परत आले होते. सामुदायिक शेतानं गव्हाची वासंतिक पेरणी कशीवशी केली होती. आईच्या लिहिण्यानुसार 'गहू छानच उगवला होता.'

अखेरीस ज्या बातमीची मी अगदी आतुरतेनं वाट पहात होतो ती बातमी होती "…. तुझ्या वहिणीचं, झोयाच नशीबही तुझ्याच सारखं जोरावर निघालं. जर्मन चांडाळांच्या हातून तिनं बरोबर पळ काढला. तुझी बहीण आता लाल सैन्यात शिपाई म्हणून काम करते. एका पायदळाच्या तुकडीत जनावरांची देखभाल करण्याचं काम आहे तिच्याकडे."

आनंदानं माझं मन उचंबळून आलं. शाबास झोया ! जर्मनांच्या हातावर छान तुरी दिलीस ! लाल सेनेत काम मिळवलंस, शाब्बास !

"मीही लाल सेनेत काम करतो आहे," बाबांच्या लिहिण्यात अभिमान दिसत होता, "पण माझा पाय हा असा अधू आणि वयही झालेलं. म्हणून त्यानी मला झात्स्कमध्येच काम दिलय्. तिथल्या इस्पितळात काम करतो मी. आज रविवार आहे, तुझी आई आणि तुझे भाऊ मला भेटायला आलेत. येताना त्यानी तुझं पत्र आणलंय. तुझ्या पत्राची केव्हापासून वाट पहात होतो आम्ही. सारखे डोळे लावून बसलो होतो तुझी प्रकृती ठीक असल्याच व तुम्ही त्या नतद्रष्ट जर्मनांना पिटाळून लावत असल्याचं तुझ्या पत्रावरून समजलं. आता आम्ही इथ सारेजण एकत्र बसूनच तुला हे उत्तर लिहीत आहोत……"

यानंतर सारे नातेवाईक व मित्र यांच्या सर्वांच्या शुभेच्छांची यादी होती. त्यानंतर अनेक सूचनांची एक लांबलचक जंत्री होती. गोळीच्या टप्पात कसं येऊ नये, सर्दीपासून बचाव कसा करावा, सहकाऱ्यांशी मित्रांशी वरिष्ठांशी कसे वागावे



वगैरे वगैरे. पत्रातला हा भाग आईनं लिहायला सांगितला असावा हे अगदी उघड होतं. अखेरीस मी धडधाकट, तन्दुरुस्त लवकरच परत यावे यासंबंधीच्या सदिच्छा होत्या. पत्राचा शेवट पुढीलप्रमाणे होता.

"तुझे आवडते आई बाबा आणि तुझे भाऊ युरी आणि बरीस."

मी तारखेकडं पाहिलं. पत्र टाकल्यापासून मला मिळायला पंधरा दिवस लागले होते पत्राच्या तिसऱ्या कागदाच्या पाठीमागं काहीतरी लिहिलं होतं. युराचं अक्षर अन् मी ओळखणार नाही ? प्रत्येक अक्षर मन मानेल त्या दिशेला झुकलं होतं. त्यानं लिहिलेली ओळ जुन्या, वेडचावाकडचा झालेल्या कुंपणासारखी वाटत होती ! त्यानं लिहिलं होतं:

"प्रिय वाल्या भाऊ,

कृपा करून तू मला पत्र पाठव आणि लढाई केव्हा संपणार ते कळव. मी आता शाळेत जायला लागलो आहे. आमच्या बाईंचं नाव आहे क्सेनिया गेरासि. मोवना. आम्ही रणगाडचासाठो आणि विमानांसाठी जुनं लोखंड गोळा करतो. हल्ली इकडे तिकडे खूप लोखंड पडलेलं असतं. फॅसिस्टांची चांगली पुरेपूर खोड मोडून ये. तू नाहीस त्यामुळे मला अगदी करमत नाही तुझी फार आठवण येते मला पत्र पाठवायला आणि लढाई केव्हा संपणार ते कळवायला विसरू नकोस.

तुझा धाकटा भाऊ, युरा."

मी ते पत्र वाचलं, पुन्हा पुन्हा वाचून पारायणं केली.

"गागरिन, काही आनंदाची बातमी ?' मेकॅनिकनं मला विचारलं.

"फारच छान बातमी आहे लढाई केव्हा संपणार ते मला माझ्या छोटचा भावाला कळवायचंय्."

"त्याला लिही, आता फारसं थांबावं लागायचं नाही. आणि हे बघ; लढाईची खास भेट म्हणून तू जिवंत हिटलरलाच पकडून त्याच्याकडे नेणार आहेस हे लिहायला विसरू नकोस."

अर्थात हा सारा विनोदाचा भाग होता. पण लढाई केव्हा संपणार हे युरानं मला विचाराव जरा आगळंच होतं. मला तरी कसं माहीत असावं. लढाई केव्हा संपणार ते ? पण तो दिवस फार दूर नसावा हे नक्की. रात्रंदिवस आम्ही नाझींच्या पाठलागावर होतो. पाठलागाचा झपाटा असा होता की विश्रांती घ्यायला सुद्धा उसंत नव्हती. हा पहा, हा आलाच आमचा बटालियन कमांडर. आमच्याकडे पळत पळत येतोय्. त्याच्या कमरेला बांधलेली नकाशाची पेटी उसळचा घेतेय् अन् पुन्हा त्याच्यावर आपटतेय्. आता काही मिनिटातच आम्ही इथून निघणार.

माझे सारे सहकारी ठाण्यातरून धावतच बाहेर पडलेत. धावता धावताच शर्टाच्या गुंडचा लावताहेत.

" सारेजण आपापल्या जागी !" हुकूम सुटला.

लढाईनं माझी आणि माझ्या घरच्या लोकांची चार वर्षं ताटातूट केली. पुढच्या दोन प्रकरणात ज्या घटनांचं वर्णन आलं आहे त्याना मी साक्षी नव्हतो. मागाहून ती सारी हकिकत मला माझ्या आई-बाबांकडून समजली. कारण लढाईच्या त्यांच्या आठवणी अजूनही अगदी ताज्या आहेत. मी सैन्यात असताना त्यानी मला लिहिलेली पत्रं आणि युराच्या आठवणी यावरूनहीं मला त्या गोष्टी कळल्या. कोणत्याही प्रसंगाचं आणि व्यक्तीचं अचूक वर्णन करण्यात युराचा हातखंडा आहे. हा गुण त्यानं आईपासुन उचलला होता हे नक्कीच. त्याचं वर्णन ऐकता ऐकता मला वाटू लागे, त्यावेळी आपणही त्याच्याबरोबर तिथं होतो.

□ □



## २० : स्काउट् !

"टक्टक्, टक्टक्..." कोणीतरी खिडकीवर टक्टक् करीत होते. बावाना जाग आली आणि ते कानोसा घेऊ लागले. पुन्हा टक् टक् झाले.

"ऐकलंस का तू ? कोण असेल बरं ?"

"तेच असणार, दुसरं कोण ? आपल्या मुलाना घेऊन गेले, आता आपल्याला नेणार."

"टक्टक्, टक्टक्..."

"त्यांचं वाटत नाही हें वाजवणं. या वाजवण्यात मग्रुरी वाटत नाही," बाबा म्हणाले. त्यानी पणती पेटवली नाही. उघडचापायानी मातीच्या जमिनीवरून ते हलकेच चालत पुढे गेले. फटीतून डोकावण्यासाठी दार किलकिलं करण्याअगोदर त्यानी कुऱ्हाड हातात उचलून घेतली. मग त्यानी फटीतून न्याहाळत विचारलं,

"कोण आहे बाहेर ?"

"आम्ही दोस्त आहोत, कॉम्रेड, आम्ही सोविएत लोक आहोत."

बाबानी दीर्घ श्वास सोडला. त्यांच्या हातातली कुऱ्हाड गळून खाली पडली.

बाहेरून दोन अनोळखी माणसे आत आली. हिवाळ्यात कोणी पटकन आपल्याला हेरू नये म्हणून, पहाणाराला चकवण्यासाठी त्यानी पांढरे पोशाख वरून चढवले होते. बॅटरीच्या उजेडाचा तीव्र झोत भिंतीवरून पुढेमागे होत होत युराच्या, लाकडी फळ्यांच्या बिछान्यावर स्थिरावला. उजेड डोळ्यावर पडताच युराची झोप मोडली, डोळे चोळत तो बिछान्यावर उठून बसला. अजूनही तो अर्धवट झोपेतच होता. पणतीतली चिंधीची वात पेटवली होती. तिची ज्योत हलत होती.

"आम्हाला माहीत आहे, अगोदरच तमची फार ओढाताण चालली आहे. पण इलाज नाही. तुमच्याकडे पाहुणे आले आहेत. आम्ही सैन्यातले स्काऊट आहोत." त्या दोघातला मोठा मध्यम वयाचा होता, लाल सेनेतला होता, खोल आवाजात तो बोलत होता.

त्यानी आपल्या डोक्यावरचं आच्छादन काढून टाकलं. त्यांच्या फरच्या टोप्यांवर ' लाल तारे ' चमकत होते. तेवढ्यात आई गडबडीनं बाहेर आली आणि म्हणायला लागली, " छान ! छान ! किती दिवस आम्ही तुमच्या वाटेकडे डोळे लावून बसलो होतो ! आत्ता बटाटे उकडून गरम गरम घेऊन येते. फार वेळ नाही लागायचा."

" नेटकं ओळखलंत्. पोटात जरा गरमगरम गेलं की बरं वाटेल. गरम उकडलेले बटाटे ! व्वा !" तो मोठा माणूस समाधानानं म्हणाला, " आणि खाता खाता एकीकडे आपल्याला बोलताही येईल."

दुसरा शिपाई पोरगेलासा होता. जरासा बुटका होता. त्याची गालाची हाडं चांगली उंच होती. त्याच्या सबमशीनवर बर्फ जमलं होत. ती त्यानं हलकेच युराच्या लाकडी बिछान्यावर ठेवली फरचे हातमोजेही काढून ठेवले. त्या मोजाना दोन दोन बोटं शिवली होती; हातमोजे घालून काम करायला सोपं जावं म्हणून. त्यानं युराकडे पाहून डोळे मिचकावले आणि म्हणाला, " दोस्त, ऊठ जरा ! असा जरा जवळ ये, लाजू नकोस. आमच्यासारखे लोक तू खूप दिवसात पाहिले नसशील. खरं की नाही ?"

"नाही पाहिले खरं," युरा संकोचून म्हणाला.

" काही हरकत नाही. लवकरच तुला आमची सवय होईल. घाबरू नकोस. आम्ही काही तुला खाऊन टाकणार नाही. असा जवळ ये जरा."

लहान स्टोवर बटाटे उकडत होते उन्हाळ्यात आम्ही सुवासिक गवत गोळा करून सुकवून ठेवलं होतं. त्याचा चहा हिरव्या चहादाणीत तयार होत होता. बाबा आणि ते दोघे स्काउट् टेबलापाशी बसून काहीतरी गंभीर विषयावर बोलत होते. बाबांच्या हातात पेन्सिल होती कागदाच्या एका तुकड्यावर ते काही चौकोन काही वर्तुळं काढीत होते.

" रणगाडे या इथं आहेत " ते सांगू लागले. त्यानी एक चौकोन काढला आणि त्यात ' र ' हे अक्षर काढलं. " या इथं कमांडंटची कचेरी " म्हणत त्यानी त्या जागी ' क ' हे अक्षर काढलं. किती तिरस्करणीय जागा होती ती " आणि या इथं त्यानी आपल्या लांब पल्ल्याच्या तोफा लपवून ठेवल्या आहेत. " प्रत्येक तोफेसाठी त्यानी एक वर्तुळ काढलं व त्यात ' तो ' हे अक्षर लिहिलं.

" छान !" तो मोठा शिपाई म्हणाला. त्यानं त्या कागदाच्या तुकड्याची व्यवस्थित घडी घातली आणि काळजीपूर्वक ती एका चोरकप्प्यात ठेवून दिली. " मग ? तुम्ही होता का आमचे मार्गदर्शक वाटाडे ?" त्यानं हसत हसत बाबांना विचारलं.

आईनं बटाटे टेबलावर आणून ठेवले, म्हणाली, " माफ करा हं घरात मीठच नाही. जवळ जवळ वर्षभरात आम्ही मीठ पाहिलं नाही."



" नसलं तर नसलं, त्यानं काही बिघडत नाही. कुणीतरी म्हणून ठेवलंय भाकरीचा आकार किती मोठा हें महत्वाचं नाही. किती आपुलकीनं वाढलीय ते महत्वाचं."

बाबाना त्याचं बोलणं आवडलं, तें त्याच्याकडे आदराने पाहू लागले.

युरानं शेवटी कसाबसा धीर केला आणि तो लाकडी बिछान्यावरून खाली आला, हलकेच तो त्या मोठ्या शिपायाच्या जवळ गेला आणि म्हणाला, " मी ओळखतो तुम्हाला."

शिपायाला आश्चर्य वाटल्याचं दिसलं नाही. " कदाचित तसं असेल पण मित्रा, मला नाही वाटत आपली पूर्वी गाठ पडली असेल असं."

" आपली गाठ पडली आहे. आमच्या सामुदायिक शेतावर तुम्ही एक डुक्कर मारलं होतं. आणि मग मला एक ' लाल तारा ' ठेवायला दिला होता."

शिपाई विचारात पडला. " ही सारी केव्हाची गोष्ट ?"

" जर्मनांपासून पळून जाताना तुम्ही आमच्या गावातून गेला होतात."

" ती १९४१ सालातली गोष्ट. तू काय म्हणतोस ? मी डुक्कर मारलं होतं ? आणि तुला एक ' लाल तारा ' दिला होता. ? अं ..... ..अंहं मुला, काही ध्यानात येत नाही माझ्या !"

" पण मला चांगलं आठवतंय, तुम्हीच होता ते !" युरानं आपलं म्हणणं सोडलं नाही, " तुमच्या छातीवर एक पदक होतं."

" मुला माझ्याजवळ ढीगभर पदकं आहेत. आता सध्या मी लावीत नाही ती."

" कारण आम्ही शत्रूची बारीक टेहेळणी करायला निघालो आहोत. मोठं जबाबदारीचं आणि नाजूक काम असतं ते. शिवाय आम्ही चाललोय एका गुप्त कामगिरीवर. म्हणून आमची कागदपत्रं, पोशाख, पदकं, सारं काही काढून ठेवून आलो आहोत." तरुण शिपायानं खुलासा केला. तो वळला आणि शरमेनं लाल झाला. त्या मोठ्या शिपायाची करडी, निर्विकार नजर त्याच्यावर रोखलेली होती.

" तू त्या गोष्टी सोडून दे, मुला, नाव काय तुझं ? युरा ? युरा, इकडे ये असा."

युरा त्या मोठ्या शिपायाच्या मांडीवर चढून बसला. त्यानं त्याच्या गालावर आपला गाल घासला. शिपाई आतून हलला, उघडउघड गलबलला. त्याने आपली तंबाखूची पिशवी काढली एक सिगरेट वळली आणि बाबाना दिली. " घ्या, घरच्या घरी बनवलेला तंबाखू आहे. युरा, आपली भेट मला आठवत नाही म्हणून रागावू नकोस. त्यावेळी आम्ही माघार घेत होतो, आमच्या जिवाला

अंगार लागला होता. लोकांच्या नजरेला नजर द्यायची आम्हाला लाज वाटत होती पण आता मात्र अगदी चांगल्या मुहुर्तावर आपली भेट झालीय्; खरं ना ?"

ते दोघं फार वेळ थांबले नाहीत. एकूण लष्करी परिस्थितीवर त्यानी चर्चा केली आणि दुसरी आघाडी उघडण्यात दोस्त राष्ट्रानी फारसे स्वारस्य दाखविले नाही म्हणून खेद व्यक्त केला. आई रडत होती; आपली दोन्ही मोठी मुलं जर्मनानी पकडून काम करायला जर्मनीत नेली म्हणून त्याना सांगत होती. मग युराही त्यांच्या बोलण्यात सामील झाला. गावात कोणत्या प्रकारचे रणगाडे आहेत, मोठे कुठे आहेत, लहान कुठे आहेत, त्यांच्यावर कोणती चिन्हे आहेत ते त्यानं सारं तपशीलवार सांगितलं. पुष्कळ झोपड्यांच्या वळचणींखाली जर्मनानी मशीन-गन लावून ठेवल्या होत्या आणि त्या झोपड्यावर खुणा केल्या होत्या हेही त्यानं त्या शिपायाना सांगितलं.

"मोठा छान मुलगा आहेस तू !" तरूण शिपाई आश्चर्यानं म्हणाला, "आतां पुन्हा आम्ही या खेड्यात आलो की स्काउट म्हणून तुझ नाव नोंदवून घेऊ. मग नियमानुसार तुला स्काउटचं रेशन मिळत जाईल." त्याच्या तोंडून हे शब्द जेमतेम बाहेर पडले असतील, त्याची त्यालाच लाज वाटली. स्काउटचं रेशन अजून त्याच्या स्वतःच्याही नीट अंगवळणी पडलं नव्हतं हे उघड होतं.

ते शिपाई उठले, त्यानी सर्वांबरोबर हात हलवले आणि म्हणाले, "लवकरच आम्ही तुम्हाला परत भेटू."

"किती वेळानं याल परत ?"

"पॅनकेक भाजायला टाका, त्या फुगून वर यायच्या आत येतो आम्ही." तो मोठा शिपाई विनोदानं म्हणाला. त्यानं युराच्या केसातून हात फिरवला आणि काहीसा विमनस्क खिन्न होत म्हणाला, "तुझ्याचसारखा एक हरामखोर माझ्याही घरी आहे तीन वर्षात नजरेला पडला नाही. मुला, फार चागलं मन आहे तुझं. तुझं सर्वांशी फार छान जमेल. तू आहेसच तसा."

ते दरवाजाबाहेर पडले.

दुसऱ्या दिवशी युरा उशीरा उठला. पूर्वी असं कधी झालं नव्हतं. त्यानं डोळे उघडले आणि तो अविश्वासानं भोवताली पाहू लागला. घरातलं काहीही बदललेलं नव्हतं. मातीच्या भिंती, मातीची जमीन, फुटक्या विटांच्या तुकड्यांची घातलेली लहानशी चूल, ओबडधोबड टेबल.... सारं काही जसंच्या तसं होत. "बाबा, ते खरंच इथं आले होते कां ? का मला स्वप्न पडलं. ?" त्यानं विचारलं.

बाबा गालातल्या गालात हसले; म्हणाले, "कोणी सांगावं ? तुला



त्यांच्याबद्दल स्वप्नही पडलं असेल. कदाचित् ते खरोखरीच इथे येऊनही गेले असतील."

"मला माहीत आहे, ते आले होते इथे. आले होते ते !" युरा गाऊ लागला, त्यानं बिछान्यावरून खाली उडी मारली आणि बरीसशी कुस्ती खेळायला सुरुवात केली.

तो सारा दिवस काळजीत आणि वाट पहाण्यात गेला.

दुसरी रात्र उजाडली.

दार तसं तकलादूच होतं. लोखंडी टोकाचा दस्ता आदळताच त्याची कडी निघाली. बाबाना बिछान्यावरून उठायला सुद्धा वेळ सापडला नाही. जर्मन गनर आमच्या खोपटात घुसले. त्यांच्या हातात सबमशीनगन होत्या. "तू पार्टिझन आहेस !" ते ओरडले.

आईनं गनच्या दिशेनं धाव घेतल . बाबा, युरा आणि बरीस याना वाचवायला तिनं दोन्ही बाजूना आपले हात करता येतील तितके लांब केले. "ते पार्टिझन नाहीत. आजारी आहेत. क्रँक." क्रँक, त्याना समजावता समजावता आई मोडक्या तोडक्या जर्मनमध्ये बोलू लागली.

ते जर्मन रागाने त्वेषाने ओरडून बोलू लागले. नशीब त्यांच्यापैकी एकजण गिरणीतल्या पहाऱ्याला होता. त्यानं बाबाना ओळखलं. ही ओळख पटल्यानेच बाबांचे प्राण वाचले. ते जर्मन शिपाई निघून गेले.

"त्यानी माघार घ्यायला सुरवात केली की काय ?" आईनं शंका बोलून दाखवली.

बाबानी हाताला येतील ते कपडे अंगावर चढविले आणि ते घाईघाईने बाहेर पडले.

झात्स्कवर आभाळाला लाल रंग चढला होता. दारूगोळे फुटत होते. त्यांच्या स्फोटाचा आवाज हवेत घुमत होता. जळत्या मशाली घेऊन लोक क्लुशिनोच्या रस्त्यावरून खाली वर धावत होते. गावच्या मधल्या चौकात कितीतरी झोपड्या पेटवून दिल्या होत्या. पेंढयानी शाकारलेल्या त्यांच्या छपरातून ठिणग्यांचा वर्षाव होऊ लागला. टर्रकन् कपडा फाडावा तसा मशीनगनचा आवाज ऐकू येऊ लागला.

बाबा आमच्या खोपटाच्या एका कोपऱ्यात अंग चोरून, भिंतीला अगदी खेटून खेटून उभे होते. तेवढ्यात जळती मशाल घेऊन एक शिपाई आत घुसला आणि त्यांच्या रोखानं धावला. धावता धावता त्यानं बंदुकीला हात घातला पण तेवढ्यात जवळ कुठेतरी प्रचंड स्फोट झाला. आणि तो शिपाई जेवढ्या वेगानं आत घुसला होता तेवढ्याच वेगानं बाहेर पळाला.

झात्स्कच्या बाजूनं एक भली मोठी ट्रक आली. सरकपट्ट्यावरून ती हलके हलके पुढे सरकत होती. काही क्षण ती आमच्या घरापाशी थांबली. त्यातून काही शिपाई बाहेर पडले. ट्रक चालतच राहिली. शिपाई ट्रकला बांधल्यासारखे तिच्या मागोमाग चालत राहिले. काही फुटाचं अंतर चालून गेले की बर्फात काहीतरी पुरून ठेवायला ते खाली वाकत की पुन्हा चालू लागत.

"पाजी ! हरामखोर ! रस्त्यावर सुरुंग पेरून ठेवताहेत," बाबा म्हणाले.

तोफांचे गोळे जवळ येऊन फुटायला लागले. बाबा शिपायांकडे पहात उभे होते. जेव्हा त्यानी आपली 'जीवघेणी' कामगिरी पार पाडली आणि ते निघून गेले तेव्हा बाबा खोपटात परत आले. त्यानी युराला जागं केलं, "पोरा, ऊठ' जागा हो नीट, बरंच काम करायचं आहे." त्यानी डांबरानी भरलेलं एक भांडं, एक ब्रश आणि प्लायवुडचे दोन मोठे तक्ते आणले. "आता लिही याच्या वर...'

पहाट फुटता फुटता सोविएत सैनिक गावात शिरले. शिरताशिरताच बर्फात खोचलेला एक उंच खांब त्याना दिसला. त्याच्यावर प्लायवुडचा तक्ता ठोकला होता. त्याच्यावर लिहिले होते. "जपून; सुरूंग पेरले आहेत." सोविएत सैनिक रस्ता सोडून शेतातून चालू लागले. अर्ध्या किलोमीटर अंतरावर जिथे जर्मन आपल्या ट्रकमध्ये बसून परत गेले होते तिथे दुसरा तक्ता लावला होता.

युरा आमच्या घरापाशी उभा होता. आमचं घर म्हणजे गावातलं शेवटचं घर. त्यानं अंगात कोट घातला होता. तो त्याला इतका लहान होत होता की त्याचे हात कितीतरी बाहेर आले होते. तो मोठ्या उत्साहानं, आवेशानं सोविएत सैनिकाना हात हलवीत होता. पांढऱ्या कातडयाचा कोट अगदी घट्ट लपेटून घेतलेला एक तरूण लेफ्टनंट त्याच्यापाशी धावत गेला. त्यानं युराला विचारलं. "या सूचना कोणी लिहिल्या माहीत आहे का तुला ?"

"माझ्या बाबानी," युरानं गर्वभरानं उत्तर दिलं.

आपल्या मुक्तीदात्याना भेटायला सारा क्लुशिनो गाव लोटला होता. ज्या चौकात मागे मे–दिनाचा आणि नोव्हेंबरचा उत्सव साजरा होत असे त्या चौकात प्रत्येक जण येऊन दाखल झाला. एक उंच रुबाबदार कर्नल पुढे झाला. त्यानं फरची उंच टोपी घातली होती. त्याच भाषण झालं; लोकानी कान देऊन ऐकलं. वारंवार उत्साहानं, आनंदानं टाळया वाजवल्या. भाषणाच्या शेवटी कर्नल, म्हणाला, "अलेक्सी इवानोविच गागारिन यानी कृपया पुढे यावं."

बाबा बावरल्यासारखे झाले चौकातल्या साऱ्या जमावासमोर कर्नलनं बाबाना मिठी घातली; तो म्हणाला, "प्रिय कॉम्रेड, शिपाई तुमचे आभारी आहेत. रस्त्यावर पेरलेल्या सुरूंगाबद्दल तुम्ही आम्हाला सावध केलंत त्यामुळे निष्कारण होणारी प्राणहानी टळली. आमच्यापैकी अनेकाना तुमच्यामुळे जीवदान मिळालं आहे."



माझी आई, बाबा आणि दोघं भाऊ सभहून घरी येत होते. वाटत आई म्हणाली, "वाटतंय्, आज वेगळाच सूर्य उगवला आहे. दिवस सणासुदीसारखाच वाटतोय," मग अचानक ती चमकली आणि म्हणाली, "वाटतोय नाही, आहेच, तुझा वाढदिवस आहे आज युरा ! आज तू नऊ वर्षांचा झालास."

"आज वाल्या आणि झोया दोघं हवी होती इथं." बाबा बेचैन होऊन म्हणाले.

आई जोरजोरानं फरशी घासत होती. पुरुषमंडळी म्हणजे बाबा, युरा आणि बरीस, खोपटात जे काय थोडंफार सामान उरलं होतं ते घरात परत आणून लावण्यात गर्क होती. तेवढयात दारावर थाप पडली. गालाची हाडं उंच असलेला तो तरुण शिपाई उंबरठयावर उभा होता. त्याची सबमशीनगन त्याच्या खांद्यावर अडकवलेली होती. त्याच्या अंगात जाडे जाकीट होते डोक्यावर फरची टोपी होती. टोपीचे दोन पाखे कानावर पडले होते.

'कसं काय ? ठीक आहे ना ?" तो आईला म्हणाला.

"आत ये, बैस."

"आता सारं काही ठीक होईल. थोडा वेळ बसायला मला आवडलं असतं पण आता वेळ नाही," तो उत्तरला. बोलता बोलता त्यानं खिशातनं, गाठ बांधलेली, घट्ट भरलेली पिशवी काढली, "तुमच्यासाठी आणलंय, मीठ आहे तिच्यात."

"तुमचा तो मित्र ? कुठं आहे तो ?" आईनं साशंक होत विचारलं.

त्या तरुण शिपायाची नजर खाली वळली. जमिनीकडे पहात तो म्हणाला, "तो मारला गेला आज पहाटे." बोलता बोलता तो दाराकडे वळला. त्याच वेळी युरा नेमका आत आला.

"तुम्ही आलात ?" युरा आनंदानं ओरडला. त्यानं त्या तरुण शिपायाच्या गळयात हात अडकवले. त्याच्या हातानी भिरकवलेलं भांडं पोर्चच्या पायऱ्यावरून खाली गडगडत गेलं. "हॅलो !"

"हॅलो !" त्या तरुण शिपायानं युराला उलट अभिवादन केलं; युराच्या केसावरून हात फिरविला आणि तो पुढे चालू लागला. त्यानं एकदाही मागं वळून पाहिलं नाही की युराच्या प्रश्नाना उत्तरं दिली नाहीत.

"आई, त्यांचे मित्र कुठे गेले ?"

"फार कामात असल्यानं यायला जमलं नाही त्याला युरा. पुन्हा केव्हातरी येऊन भेटून जाईल तो," आई उत्तरली. बोलता बोलता तिची बोटं, तंबाखूचे डाग पडलेल्या मिठाच्या पिशवीवरून असहायपणे फिरत राहिली.

☐ ☐

# २१ : लढाई क्लुशिनोतून मागे हटते

शाळेच्या एका खोलीत पहिल्या चार इयत्तातली सारी मुलं जमा झाली होती. मुलामुलींनी मुकाटयानं आपापल्या जागा घेतल्या.

"आता काही दिवस असंच बसायचं सर्वांनी आणि अभ्यास करायचा," क्सेनिया गेरासिमोव्ना सांगत होती, "आपण सारे एकत्रच बसणार आहोत कारण सध्यातरी मी एकटीच आहे. दुसरे कोणी शिक्षक नाहीत. शिवाय अजून लढाई पण संपली नाही. शाळा उबदार राखायची म्हणजे ते फारच होईल."

मुलांनी आपल्या बाईंकडे पाहिलं. लढाईच्या दोन वर्षात क्सेनिया एकदम वयस्कर, उतरल्यासारखी झाली होती. तिच्या तोंडाभोवती खोल रेषा उमटल्या होत्या. केसावर करडी झाक स्पष्ट दिसत होती.

"ज्यांच्याकडे एखादी कोरी वही किंवा शाळेची काही पुस्तकं असतील त्यांनी हात वर करावेत."

काही हात वर गेले.

"दोन, चार...सहा म्हणजे काही फार नाही," ती म्हणाली. तिनं एक सुस्कारा टाकला.

वलोद्या ओर्लोव्स्की बिचकतच उठला आणि म्हणाला, "एका शिपायानं मला एक पुस्तक दिलंय. मला त्याच्यावरून अभ्यास करता येईल का ?"

"पुस्तक दाखव मला. 'इन्फंट्री फील्ड मॅन्युअल' पण वलोद्या, हे काही शाळेचे पुस्तक नाही."

"माझ्या जवळही आहे ते पुस्तक," युरा म्हणाला.

"माझ्याजवळही."

"माझ्याकडे आहे तेच पुस्तक."

"असं माझ्यापाशी पण आहे."

निम्म्या मुलांजवळ ते पुस्तक होतं.

क्सेनिया गेरासिमोव्ना हसली; म्हणाली, "असं जर असेल तर त्या



पुस्तकाचाच आपण उपयोग करून घ्यायला हवा. या पुस्तकातूनच मी तुम्हाला धडे देत जाईन."

पण इतक्या मुलांजवळ ही पुस्तकं कशी आणि कुठून आली ? क्सेनियानं मागाहून एकदा मुलांना विचारलं त्याबद्दल. कोडयाचं उत्तर अगदी सोपं होतं. एका सोविएत तुकडीनं एका झोपडीत आपली कचेरी थाटली होती ती तुकडी पश्चिमेला निघून गेली. कोणीतरी अधिकारी ती पुस्तकं बांधून न्यायला विसरला असावा. ती मुलांच्या हाती लागली. वलोद्या ओर्लोव्स्कीला मात्र त्याची प्रत एका शिपायानं भेट म्हणूनच दिली होती. तो त्याच्याच घरात राहात होता.

त्या दिवशी संध्याकाळी युरा टेबलापाशी बसून काहीतरी करण्यात अगदी गढून गेला होता. आईनं त्याच्या खांद्यावरून पुढे वाकून पाहिलं अन ती अगदी घाबरून गेली. हातात सांडशी घेऊन युरा कवचामधून बुलेट बाहेर काढत होता. टेबलावर मोकळया कवचांचा ढीग एका बाजूला पडला होता. त्याचं काम भराभर, अगदी पद्धतशीर चाललं होतं. बाहेर काढलेल्या बुलेट त्यानं कापडाच्या एका तुकडयावर ठेवल्या होत्या.

"मरशील युरा! थांबव ते एकदम !"

"नाही आई, या साध्या गोळया आहेत, स्फोटक नाहीत. स्फोटक गोळयांना हात लावता येत नाही."

"तू ऐकशील का आता ?"

युरानं भिवया निपटल्या आणि तो धीमेपणानं समजावून देऊ लागला. "गणितं शिकायला आम्ही गोटयांऐवजी याचाच उपयोग करणार आहोत प्रत्येकाजवळ त्या आहेत. माझ्याजवळ फक्त ९० च होत्या आणि पाहिजे तर होत्या शंभर वलोद्यानं दिल्या मला दहा."

मग त्यानं तेलाच्या दिव्यापाशी बसून अभ्यास केला. एका वर्तमानपत्रावरच तो मोठमोठया अक्षरात काहीतरी लिहीत होता. मोठया प्रयासानं, काळजीपूर्वक लिहिताना त्याच्या जिभेचं टोक सारखं आतबाहेर होत होतं. "साऱ्या जगात लाल सेना सर्वात शूर आहे. आम्ही युद्ध जिंकणारच !!!" त्यानं लिहिलं होतं त्याची शाई काजळीपासून बनवली होती. "आई, तुला आवडलं का मी काय लिहिलंय् ते ?"

आईनं वाकून त्या वेडयावाकडया अक्षराकडे पाहिलं, एक निःश्वास सोडला, युराच्या केसातून हात फिरवला आणि म्हणाली, "छान आहे बरं बाळ !"

"अजून सारं कुठे लिहून झालंय ?" तो उद्गारला. त्यानं पुन्हा पेन उचललं

दुसऱ्या दिवशी बाईंनी विचारलं, "युरा गागारिन, वाक्याच्या शेवटी तू तीन उद्गार चिन्ह कशाला दिली आहेस ?"

युरानं उठून उत्तर दिलं, "नाझी लवकर हरावेत म्हणून."

त्याचं उत्तर ऐकून क्सेनिया हसली. "ठीक आहे. आता इकडे ये आणि नकाशा लावायला मदत कर. आता लाल सेना नाझींना कोणत्या जागी हरवते आहे ते दाखवते मी सगळयाना."

आणि हे असं लढाई संपेपर्यंत चालू राहिलं. दररोज अभ्यासाला लागण्या-अगोदर क्सेनिया गेरासिमोव्ना, आघाडीवरच्या ताज्या घडामोडी मुलाना समजावून सांगायची.

एप्रिल उजाडला; अखेरअखेरचा बर्फही वितळला. चिकचिकणारे रस्ते कोरडे झाले. वासंतिक ओढयानी वाहून आणलेली लाल माती टेकडयांच्या कडाकडानी दिसू लागली. युद्धानं उध्वस्त झालेली जमीनही दिसू लागली लढाईन तिच्यावर किती अत्याचार केले होते ! बाँबनी आणि तोफगोळयानी जमिनीला पडलेल्या खड्डयात पाणी साचून राहिलं होतं. मोडक्या तोडक्या रणगाडयांचे अवशेष इकडे तिकडे विखुरलेले होते. एके काळी याच रणगाडयाना पाहून कसा थरकाप व्हायचा ! घनघोर लढाईनं जंगलांचा निकाल लागला होता. जागोजाग जळकी झाडं उभी होती. लढाई दूर पश्चिमेला चालू होती पण स्मोलेन्स्क प्रदेशातल्या भूमीवरचं तिचं अस्तित्व पदोपदी जाणवत होतं.

झातस्कला बाबाना भेटायला युरा आणि आई जवळजवळ दर रविवारी जात. क्लुशिनोची मुक्तता झाली तेव्हा बाबाना सैन्यात बोलावून घेण्यात आलं पण त्याना लागलीच इस्पितळात ठेवण्यात आलं. कारण त्यांच्या पायाचं दुखणं जास्त बळावलं आणि जुनाट अल्सरनी पुन्हा उचल घेतली होती. त्यांची तब्येत सुधारल्यावर सरकारनं त्यांची नेमणूक त्या इस्पितळावरच केली. एक कर्मचारी म्हणून ते तिथं काम करू लागले.

तो शनिवार होता. शाळा नेहमीपेक्षा लवकर सुटली होती. युराला बाबां-जवळ राहून रविवारी परत येता आलं असतं. त्या दिवशी तो एकटाच चालत गेला. त्याच्या खांद्यावर एक काठी होती आणि त्या काठीला पाठीमागच्या बाजूस एक गाठोडे अडकवलं होतं गाठोडयात त्याच्या बाबांसाठी बन आणि उकडलेले बटाटे होते गावापासून झातस्क चौदा मैलावर होतं. पण जेव्हा तुमचं मन मैल मोजण्यात गुंतलेलं नसतं तर दुसऱ्या काही चांगल्या, मजेदार गोष्टींच्या विचारात असतं, तेव्हा प्रवास लांबलचक वाटत नाही.

विचार करायला कितीतरी गोष्टी होत्या.

रस्त्यावर एक लष्करी ट्रक उलटी झालेली होती. तिच्या सरकपट्टयाखालून एक साळुंकी वर उडाली. ती त्या ट्रकच्या वरच घिरटया घालीत राहिली. युरा



विचारात पडला ही अशी रात्रंदिवस घिरटयाच घालणार काय ? तिला विश्रांती नाही का लागणार ? ती खाली जमिनीवर नाही का उतरणार ?

एका खळग्याच्या काठावर 'स्नोड्रॉप'चं निळं फूल उमललं होतं ते घेण्या-साठी युरा खाली वाकला. एका हँडग्रेनेडच्या गोल कडीमधून ते वर आलं होतं. युरानं कडी काढून दूर भिरकवून दिली. फूल तोडून घेण्याचा विचार त्यानं बदलला.

त्या वसंतऋतूत किती चमत्कारिक गोष्टी घडून आल्या. काही भीतीदायक होत्या, काही कळायला अवघड होत्या.

एके दिवशी शाळेतली सारी मुलं सामुदायिक शेताच्या कोठारात बी-बियाणं निवडायला गेली होती. शेतावरच्या स्त्रियाही पलिकडे बसून तेच काम करीत होत्या. पोचिन्कीजवळ जर्मनांचा एका हवाई तळ होता. त्या तळावर पहारा कर-णारे नाझी मारले गेले. त्यांची शरीरं नुकतीच सापडली होती. त्याच विषयावर त्या बोलत होत्या. तेवढयात एकीला आठवलं, हिवाळयात एकदा भयानक हिम-वादळ झालं होतं त्याच्या आदल्याच रात्री पार्टिझनानी त्या तळावर हल्ला चढवला होता. हल्ल्यात नाझी मारले गेले. त्यांची शरीरं बर्फात गाडली गेली. वसंतऋतू आल्यावर मग ती नजरेला पडली.

दुसऱ्या एकीला आठवलं, दाल्निवोजवळच्या जंगलात मुलाना सुरुंग फेक-णारं यंत्र आढळलं. जवळच खोक्यात सुरुंग ठेवलेले होते. मुलानी एक सुरुंग काढून बॅरलमध्ये भरला पण सुरुंग उलटयाच बाजूनं उडाला आणि गावच्या रस्त्यावर पडून फुटला. त्यानंतर केवढा गोंधळ झाला होता ! नशीब, कोणाला इजाबिजा झाली नाही.

जागोजाग नाना प्रकारचे सुरुंग, गोळे पडलेले होते. शेतात तर इतके होते की सारखं खाली न्याहाळून पुढे पाऊल टाकावं लागे. क्लुशिनोमध्ये एकदा गावाच्या बाहेर लाल सैन्याच्या एका ड्रायव्हरचा घोडा अशाच एका सुरुंगानं उडवून दिला. त्या ड्रायव्हरला दवाखान्यात न्यावं लागलं होतं.

लढाई दूर पश्चिमेकडे सरकली होती पण स्मोलेन्स्क प्रदेशातल्या भूमीवर तिच्या अस्तित्वाच्या खुणा अजूनही जाणवत होत्या.

एका ट्रकचा भोंगा वाजला. युरा वळला आणि त्यानं हात वर केला.

"काय छोटं महाराज, कुठं दूर जायचंय् का ?" डोकं बाहेर काढीत ड्रायव्हरनं विचारलं.

"बाबाना भेटायला झातस्कला जायचंय ते लष्करात शिपाई आहेत."

"मार उडी वर."

आत कसं उबदार, आरामशीर होतं. या ड्रायव्हरची गाठ अगोदर का नाही पडली ? फारच वाईट ! ते झातस्काच्या शिवेवर येऊनही पोहोचले होते.

“ गाठोडयात काय आहे ? ‘राखीव’?”

एव्हाना ‘राखीव’ म्हणजे काय ते युराला कळायला लागलं होतं. लष्कराच्या बोली परिभाषेत ‘राखीव’ म्हणजे ‘राखीव शिधा.’

“ बन आणि बटाटे आहेत. पाहिजेत ?”

“ नको, आभारी आहे. पण शिपायाला नेहमीच काही तरी ‘राखीव’ आवडतं. जेव्हा चढाई चालू असते तेव्हा इतकं खायला देतात की पोटात जागा उरत नाही. पण जर तुम्ही एकाच ठिकाणी खिळून राहिलात तर मग पट्टा घट्ट करायची पाळी येते.”

युरा ड्रायव्हरचं बोलणं ऐकत होता, ते पटतय् दाखवायला मान हालवीत होता. त्याच्या डोळ्यासमोर चित्र उभं होत होतं. तो आणि बाबा टेबलापाशी बसलेत; सॅकरिनच्या गोळ्या घातलेल्या कढत पाण्याचे घुटके घेत आहेत, घरी बनवलेला बन-पाव खाताहेत. सामुदायिक शेताच्या आणि आघाडीच्या गप्पा चालल्या आहेत. बाबा नक्कीच विचारणार, “ आई का बरं आली नाही ? आजारी तर नाही ना ?” आपण म्हणू, “ ती कशी येणार ? कालपासून पेरणी सुरू झालीयं ना ?” मग ते म्हणतील, “ खरंय् गावात पुरुषमंडळी नसल्यानं बायकांना फार कष्ट पडताहेत...” मग आपणही म्हणू, “ तर काय. शिवाय ट्रॅक्टरही नाहीत आणि घोडेही नाहीत. त्यानी स्वत:लाच नांगराला जुंपून घेतलय्. नांगर असा थोडीच चालवतात ?”

बाबा नि:श्वास सोडतील. इथं आपल्याला दररोज चांगलं रेशन मिळतय्. अंगभर कपडा-लत्ता आहे, व्यवस्थित निवारा आहे. आपली प्रकृतीही चांगली आहे. त्यांचा मुलगा अजाणपणानं बोलतोय्, पण बाबाना कोणीतरी आपल्याला बोल लावतंय् असं वाटतय् लढाईच्या काळात बायकांच्या वाटयाला खडतर दिवस आले आहेत खरे : पुरुषांच्या जेवणाखाण्याची, कपडयालत्त्याची सारी जबाबदारी त्यांच्यावरच पडली आहे; असे विचार त्यांच्या मनात सतावीत राहतील.

“ महाराज उठा आता ! काय गाढ झोपलाय. ऊठ, जागा हो. उतरायच ठिकाण आलंय. फारच झोपाळू मुलगा दिसतोस तू, ” युराला हलवीत ड्रायव्हर बोलत होता. युराला खरोखरच गाढ झोप लागून गेली होती.

आपल्या मुक्तीदात्यांचं स्वागत करण्याच्या उत्साहाचा भर ओसरला आणि क्लुशिनो गावच्या बायकांपुढे अनंत अडचणी उभ्या राहिल्या, आगीचा प्रचंड लोळ चाटून जावा तशी लढाईनं गावाची अवस्था केली होती. कणग्यात, कोठारात, भुयारात जिथं जिथं काही भरून ठेवलं होतं ते सारं सारं नाझी लुटारूंनी साफ केलं होतं.



साऱ्या बायका एकत्र जमल्या आणि कसं काय करायचं, मुलाबाळाना कुठून खाऊ घालायचं याचा विचार करू लागल्या. प्रादेशिक केंद्राकडून सामुदायिक शेताला पेरणीसाठी धान्य पाठविण्यात येणार असल्याची बातमी आली. तिचा त्यांना केवढा आनंद झाला. त्यांच्या अंगात नवा उत्साह संचारला आघाडीवर पुरुषमाणसं आपली शिकस्त करीत आहेत, आपणही आपला भाग उचलला पाहिजे, कितीही कठीण परिस्थिती असली तरी तिच्याशी मुकाबला केला पाहिजे असा त्यानी पक्का निश्चय केला. मोर्दोवियाहून गुरांचे कळप सामुदायिक शेतावर परत येईपर्यंत आपणच नांगराला जुंपून घ्यायचं आणि शेतं पेरायची असं त्यानी ठरवलं.

आणि तेच त्यांनी केलं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या नांगर ओढीत असत. त्यांचे पूर्वज करीत त्याप्रमाणे त्यानी हातानीच पेरणी केली.

१९४३ सालची शेतीची कामे क्लुशिनोच्या बायका कधीच विसरणार नाहीत.

नांगरलेल्या जमिनीच्या सरीतून त्या कष्टानं, सावकाश चालत राहात. वाऱ्याचा आणि धुळीचा त्रास होऊ नये म्हणून कपाळावर अगदी खालपर्यंत त्या रुमाल बांधून ठेवीत. प्रत्येकीजवळ धान्यानं भरलेली एकेक चाळणी होती, सरी अरुंद होत्या, फारशा खोल नव्हत्या बायका चालत राहात, चाळणीतून एखादी मूठ धान्य खाली पडत राही.

वसंतऋतूतले दिवस चांगलेच मोठे होते. सामुदायिक शेत फार प्रचंड होते. एकेका वेळेला चार-चार स्त्रिया नांगराला जुंपलेल्या असत. नांगर ओढून ओढून त्यांची मनगटं ठणकू लागत; नांगराचे पट्टे खांद्यावर अडकवलेले असत, त्यांनी खांदे सोलून निघत, सोललेल्या जागी आग आग होत राही. शेताच्या बाजूला एक नांगर पडला होता. त्याचा फाळ उन्हात चमकत होता. त्याला आराम होता.

पण आराम करायला बायकाना मात्र उसंत नव्हती.

“ आईऽऽ मला नाही पाऊल पुढं टाकवत.” म्हणत ॲना बेलोवा जमिनीवर कोसळली. तिनं आपले हात छातीवर दाबून धरले होते. तोंड उघडं टाकून ती श्वास घ्यायला धडपडत होती.

बायकाना असल्या गोष्टीची सवय झाली होती. उपासमार आणि अतिश्रम यांचा तो परिणाम होता. ते नित्याचंच झालं होतं. आता एकजण खाली कोसळायची, जरा वेळानं दुसरी.

गटाची प्रमुख बाई कडक स्वभावाची होती. ती नाराजीच्या स्वरात म्हणाली, “ ॲना, मी तुला सांगितलं होतं ना, चाळणीत धान्याचं इतकं ओझं भरू नकोस म्हणून. आपण जर मरून गेलो तर पीक काढणार कोण अन् घेणार कोण ?”

बाकीच्या बायका जरा पुढे गेल्या, तशी ती पुन्हा अँनाकडे वळली, अन् तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, "अॅनी, त्यातले थोडे दाणे खाऊन घे, जरा बरं वाटेल तुला. फार थकली आहेस तू आणि तुला लागलीय भूक. मूठभर दाणे टाक तोंडात, माझी परवानगी आहे तुला."

अॅनानं घाबरून मान हलवली. तुम्ही जर का एक मूठ तोंडात टाकलीत की घरच्या मुलांसाठी म्हणून दुसरी मूठ खिशात गेलीच समजा. इथे तर दाण्या-दाण्याला महत्त्व आलं होतं.

"असू देत, उठतेच मी आता थोड्या वेळात जरा बरं वाटतंय आता."

"वाटू दे, वाटू देत," गटाची प्रमुख तिला धीर देण्यासाठी म्हणाली, मग तिनं अगदी मोकळ्या मनानं साऱ्या शेलक्या शिव्यांची हिटलरला लाखोली वाहिली. एखाद्या पुरुषालाच तशा शिव्या हासडता आल्या असत्या. गटांतल्या प्रत्येकीसाठी तिचा जीव खालीवर होई. साऱ्या गावचं भवितव्य त्यांच्या हातात होतं; शरदऋतूत धान्य तरी पिकलं असतं किंवा सारंच्या सारं क्लुशिनो गाव उपासमारीनं मृत्युमुखी पडलं असतं.

अॅना उठली; थोड्या वेळानं तिनं बाकीच्यांना गाठलं.

"बरं वाटतं का आता काही?" आईनं विचारलं.

"खरं म्हणजे मला काही नीट समजत नाही; चमत्कारिक वाटतंय, फार हुरहुरतोय् जीव. वलोद्याला काही झालं तर नाही ना?"

"अॅना, नसत्या शंका कुशंका काढू नकोस. दुसऱ्या कशाचा तरी विचार कर."

"एखादी गोष्ट मोठ्यानं बोलली काय की न बोलली काय, त्यानं काय फरक होणार? सारा वेळ मनावर तिचं सावट तर असतंच."

"माझ्या मनाला तरी क्षणभर शांती मिळते असं वाटतं का तुला? वाल्या आणि झोया कुठे असतील? ती दुसरी दोघं? सारा दिवस त्याना घरी एकटं सोडून याव लागत त्यांच्यावर काही संकट आलं तर?"

"ते म्हणतात ते खरंच आहे; बायकांचा जन्म म्हणजे दुःख, हालअपेष्टा भोगण्यासाठीच असायचा."

चमकत्या सूर्यप्रकाशात निळं शेत डोलत होतं. अंबाडी फुलावर आली होती.

अॅना बेलोवा आणि मी तिच्या पुढच्या पडवीत बसलो होतो. मागच्या दूरवरच्या आठवणी निघत होत्या. ती बोलत होती, मी ऐकत होतो.

"त्या काळात, लढाई संपल्यावर आम्ही कशी कामं केली हे तुम्हा आज-कालच्या मुलाना सांगायला जा, ते तुमच्यावर विश्वास ठेवणार नाहीत. आता सारीच कामं यंत्राकडून होतात. शेतावर आता इतकी यंत्रं आहेत की मोजण कठीण."



आईच्या या मैत्रिणीचं वय झालं होतं. पण ती नेहमी उत्साही, चपळ दिसायची काम सोडून पेन्शन घेऊन बसणं तिला कधीच जमलं नसतं.

"पीक तयार झालं की ते काढायला मी पण जाणार आहे. तुला आठवतंय वाल्या, त्या दिवशी शेतात पेरणी करता करता मी खाली कोसळले होते? पुढं काय होणार त्याची सूचना होती ती. त्यानंतर थोड्याच दिवसानी मला पत्र आलं वलोद्याच्या सांगण्यावरून त्याच्या मित्रानं इस्पितळातून पत्र लिहिलं होतं. माझा मुलगा घायाळ झाला होता. त्याच्या जखमा इतक्या गंभीर होत्या की त्याला स्वतःला पत्रसुद्धा लिहिता आलं नाही."

वलोद्या बेलोव, माझा बालपणीचा मित्र, सवंगडी! तो लढाईवरून परत आला तेव्हा त्याचा एक हात गमावला होता. त्याच्या जखमा गंभीर होत्या.थोड्याच दिवसात त्यानं डोळे मिटले होते.

"आणि तुमचा लाडका युरासुद्धा..."

वलोद्या बेलोव आणि आमचा युरा, दोघांनाही सूर्यप्रकाशाची मनापासून आवड; अंबाडीची फुलावर आलेली शेतं दोघांनाही अतिशय प्रिय! नेमकी हीच आठवण अॅना बेलोवालाही झाली. आमच्या दोघांच्याही मनात सारख्याच आठवणी उसळून आल्या होत्या. अॅनाला एक जुनी म्हण आठवली, "जो अंबाडीच्या शेतात वाढतो, तिच्या धाग्याचे कपडे घालतो आणि रोज सकाळी तिच्यापासून बनविलेल्या टॉवेलानं अंग पुसतो तो कधीच आजारी पडणार नाही."

वलोद्या आणि युरा यांना आजारपण कसं ते माहीत नव्हतं. कुठं दुखतंय खुपतंय् अशी वलोद्यानं कधीही तक्रार केल्याचं मला आठवत नाही. युराला आयुष्यात कधी पडसं की खोकला झाला नाही हे मला ठाऊक आहे.

वलोद्याच्या आईला पुन्हा येऊन भेटण्याचं कबूल करून मी तिचा निरोप घेतला. तिथून मी सरळ शेताकडे निघालो. तिथे माझे आणि युराचे जुने मित्र मला भेटणार होते. निना बेलोवा, झोया झग्र्याद्स्काया आणि वान्या झेनोव. युरा बरोबर पतंग उडविणारा, शाळेत त्याच्याबरोबर एका बाकावर बसणारा वान्या आता ट्रॅक्टरड्रायव्हर झाला होता. त्यानं चांगलं नाव कमावलं होतं. ते सारेजण सरकारी शेतावर कामाला होते. क्लुशिनो आता सामुदायिक शेत राहिलेलं नाही. गागारिन्स्की सरकारी शेताचा तो आता मध्यवर्ती विभाग आहे. चुवाशियाचा प्रदेशातला ब्लादिमीर वेर्खिलेयेव शेताचा प्रमुख संचालक आहे. त्याच्या घरात बसल्या बसल्या मी त्यांचा आल्बम चाळत होतो. त्यात मारिनस्को–पोसाद्स्की जंगल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा एक फोटो मला आढळला. फोटोतल्या दोघा सडपातळ तरुणांना मी ओळखले. एक होता वेर्खिलेयेव आणि दुसरा होता अन्द्रियन

निकोलायेव. तो पुढे अंतराळवीर म्हणून प्रसिद्धीस आला. तो फोटो १९४६ सालात म्हणजे लढाईनंतरच्या पहिल्या वर्षात काढलेला होता. मानवानं अंतराळात पहिले उड्डाण करायला अजून पंधरा वर्षं उलटायची होती. अर्थातच त्यावेळी जंगल विद्यालयातल्या त्या दोघा विद्यार्थ्यांना, आपल्यापैकी एकजण अंतराळयानाचं सारथ्य करील आणि दुसरा जगातील पहिल्या अंतराळवीराच्या गावी सरकारी शेताचं संचालन करील हे माहीत असायला काहीच मार्ग नव्हता.

□ □



# माझा भाऊ, युरी

## भाग दुसरा

## १ : घरी परत

लढाईच्या अगोदर झातस्क कसं गाव होतं त्याचं स्पष्ट चित्र आजही माझ्या नजरेसमोर आहे. नेटकी, सुबक लाकडी घरं, घरांपुढे रसरशीत बागा. वसंतऋतूत बागेबागेतून लिलॅक, बर्ड-चेरी, पांढरा अॅकेशिया बहरून येत. उन्हाळा जरा स्थिरावला की खिडक्यांच्या चौकटीखाली डेलिया, हॉलीहॉक यांचे ताटवे फुलत. संध्याकाळ झाली की साऱ्या रस्त्याना रंग भरे. दिवसभराचं काम संपल्यावर फेरफटका करायला बाहेर पडलेले लोक रस्ते गजबजून टाकीत. मोहरलेल्या लिंडन आणि पॉप्लर वृक्षांचा मादक गंध मस्तकात अगदी खोलवर जाऊन भिनत असे. सारे वातावरण धुंद गहिरे होऊन जाई.

माझ्या आठवणीत ठसलेले ते रस्ते आणि आता मी ज्यावरून चालत होतो ते रस्ते यात सुतराम साम्य नव्हतं. हे रस्ते पार उध्वस्त झाले होते. वेड्या वाकड्या खोल चाकोऱ्यातून पाणी साचलं होतं. किती कुरूप दिसत होत्या त्या चाकोऱ्या ! मागच्या अंगणांत निवारा खोदून उभारलेली वेडीवाकडी खोपटी दिसत होती. त्यांची छपरं उतरती होती. काही काही छपरातून धुराचे मंदमे लोट गिरक्या घेत वर चढत होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूना विटांच्या चुलींचे जळके अवशेष नजरेस पडत होते. एप्रिल महिना बराच पुढे सरकला होता. सूर्य चांगला तळपत होता. वासंतिक उन्हानं वृक्षवेलींना व झुडुपाना हिरवी डूब दिली होती. पण तरीही साऱ्या गावावर अजूनही नैराश्य, औदासिन्य यांचं दाट सावट होतं सगळं विस्कळित वाटत होतं गाव कसं ओसाड, कळाहीन वाटत होत.

गाडीनं शिट्टी दिली आणि ती निघाली. रूळावरून धावणाऱ्या चाकांचा खडखडाट सुरू झाला माझी ही गाडी रशियाच्या अगदी अन्तर्भागात निघाली होती सैन्यातून मोकळ्या केलेल्या सैनिकांना घरी सोडायला निघाली होती.

मी माझी पिशवी नीट ओढून घेतली आणि भराभर चालायला सुरुवात केली. इथं जीवन थांबलेलं नव्हतं; त्याची स्पंदनं चालू होती. ते सर्वत्र भरून राहिलं होतं, आपलं अस्तित्व जाणवून देत होतं मध्येच कुठूनतरी कुऱ्हाडीचा



आवाज कानावर पडत होता. खांद्यावर लाकडाचे मोठमोठे ओंडके टाकून निघालेले लोक भेटत होते. त्यांच्या अंगावर लष्करातले विटके, रंग उडालेले कपडे होते. तीन किंवा चार जणं मिळून एकेक ओंडका वाहात होते. वजन जाणवू नये म्हणून मधूनच त्याला झोका देत होते. जड ओझं सहन होईनासं झालं की वेडावाकडा आवाज करीत होते. एक नवं घर डोकं वर काढीत होतं ते नजरेत भरलं. मग दुसरं, मग तिसरं, मग......! स्मोलेन्स्कमधल्या माझ्या प्रिय जंगलांनो, पुन्हा एकदा– शंभराव्या वेळी असेल–तुम्ही, इतक्या उलथापालथीनंतर व खडतर कसोटयानंतर मानवाच्या डोक्यावर सावली धरलीत, त्याला घर दिलेत, ऊब दिलीत !

आमचं कुटुंब लेनिनग्राद्स्की रस्त्यावर कुठेतरी राहात होतं 'विजय–दिन' साजरा होऊन गेल्याला दोन वर्ष उलटली होती. मला घरून वारंवार पत्र येत असल्यानं, काय काय बदल झाले होते ते मला सारे माहीत होते. बाबाना सैन्यातून मोकळं केल्यानंतर झातस्कमध्येच राहायला सांगण्यात आलं होतं. ते एक निष्णात, अनुभवी सुतार होते. नाझींनी धुळीला मिळवलेलं गाव पुन्हा बांधून उभारायला त्यांची मदत होणार होती. बाबानी आमचं क्लुशिनोचं घर उतरवून झातस्कमध्ये उभारलं होतं. 'बाळ्या, लवकर घरी ये,' त्यानी मला लिहिलं होतं, 'माझे मदतनीस– तुझे लहान भाऊ– अजून या कामाला योग्य झाले नाहीत. त्यांचं बळ ते कितीसं ? आपल्याला घर पुन्हा उभारायचं आहे. या कामात बायकामाणसांचा फारसा उपयोग नसतो, तुला तर माहीतच आहे.'

झोया सैन्यातून परत आली होती. युरा आता चवथीत गेला होता, त्याच्या प्रत्येक पत्रात त्याची शाळा, त्याचे मित्र, परीक्षेत मिळालेले मार्क यांची साद्यंत माहिती असायची. आपल्या शिक्षिकेबद्दल तो फार उत्साहानं लिहायचा, तिचं नाव होतं निना वसिल्येवना लेबेदेवा. ती वयानं लहान होती, साऱ्या मुलांची खरीखुरी मैत्रीण होती. ती त्यांना अभ्यासात रमायला शिकवी. त्या वर्षीच्या पहिल्या धड्याचं युरानं पत्रात वर्णन केलं होतं. पहिल्या दिवशी तिनं वर्गात एक पुस्तक आणलं. त्या पुस्तकात वलोद्या उल्यानोवच्या गुणपत्रिकेचा फोटो होता. ती मुलाना म्हणाली, "लेनिननी शाळेत अगदी उत्कृष्ट मार्क मिळविले. उत्कृष्टच अन् दुसरं काही नाही. ही पत्रिका पाहिलीत ? तुमच्यापैकी प्रत्येकानं झटून प्रयत्न करावा आणि सर्व बाजूनी लेनिन यांच्यासारखं व्हावं असं मला वाटतं."

मुलानी झटून अभ्यास केला. एकही मुलगा कोणत्याही विषयात कच्चा राहिला नाही.

आता बरीसही शाळेत जाऊ लागला होता. पण युराच्या मानानं त्याला अभ्यास फार कठीण जाई.

मी माझ्या घरच्या माणसाना भेटून केवढा तरी काळ लोटला होता. १९४३ च्या मार्च महिन्यात आम्ही भेटलो होतो. हा १९४७ सालचा एप्रिल महिना उगवला होता. चार लांबलचक वर्षे. ४९ प्रदीर्घ महिने.

माझ्या उजवीकडे अन् डावीकडे कुऱ्हाडींचे सपासप घाव पडत होते. जुनं झात्स्क महान पीटरच्या काळात वसवलं गेलं होतं, आता त्याची पुन्हा नव्यान उभारणी होत होती.

मी त्याच्याकडे पहात होतो, तोही डोळे मोठे करून माझ्याकडे रोखून पहात होता. त्या मुलाच्या भुवया रूंद होत्या, कान उभे होते. त्यानं आखूड चड्डी घातली होती. पायातले बूट फाटले होते. तपकिरी रंगाचे लांब सुती मोजे गुढग्यापाशी दुमडले होते.

एक मिनिटभर आम्ही दोघानी एकमेकाना नीट पाहून घेतलं, कदाचित त्यापेक्षाही जास्त वेळ असेल. मग त्यानं कसाबसा धीर केला, माझ्या पट्ट्याच्या बकलमध्ये बोट खुपसलं आणि विचारलं, "तुमची रायफल कुठे आहे?"

"बरीस," मी म्हणालो, "मला विसरून गेलास का तू?"

आश्चर्यानं त्याचे डोळे आणखीन मोठे झाले. तो एक पाऊल मागे सरकला मग त्याने दुसरे पाऊल मागे घेतले. मग एकदम वळून त्यानं घरात धूम ठोकली.

मी आमच्या घराबाहेर उभा होतो. घर पुन्हा उभारलं होतं. फक्त छत पडायचं होतं. घरातला प्रत्येक वासा अन् प्रत्येक ओंडका अन् प्रत्येक ओंडक्यावरची प्रत्येक गाठ माझ्या परिचयाची होती. मी तिथंच उभा राहिलो. माझी छाती धाडधाड उडत होती, तिचा आवाज ऐकत उभा राहिलो आणि एकदम...

"वाल्या!" युरानं धावत येऊन मला मिठी घातली.

"निदान तू तरी मला ओळखलंस." त्याला जवळ ओढत मी म्हणालो.

युरा चांगलाच मोठा दिसायला लागला होता. त्याच्या हातातली शक्तीही जाणवत होती. पण उंचीला जरासा कमी वाटत होता. "तू उंच का बरं झाला नाहीस, युरा?"

त्यानं मनाला लावून घेतलं नाही. "खाजकुयलीचं सार पिऊन उंच व्हायचं?" त्यानंच विचारलं.

"घरातले बाकीचे कुठे आहेत?"

तोपर्यंत बरीस सर्वांना घेऊन आला. आई लगबगीनं घराच्या कोपऱ्यावरून वळत होती. तिनं दोन्ही हात माझ्या दिशेनं पुढे केले होते. तिच्या मागोमाग झोयाही आलीच.



"वाल्या! माझा वाल्या!"

"तू येतो आहेत म्हणून कळवलं का नाहीस?"

बाबानी माझ्या पाठीवर थाप दिली आणि माझ्या गालाचा मुका घेतला. त्यांच्या मागोमाग दुसरा एक तरुण पुरुष पुढे झाला. त्याच्या अंगावर नेहमीचे साधे कपडे होते पण त्याच्या चालण्यावरून मी ओळखले, हा नुकताच लष्करातून मोकळा झाला असावा.

"दिमित्री?" मी विचारलं.

"होय."

त्यानं हस्तांदोलन केले, त्याच्या हाताची पकड खंबीर आणि भक्कम होती. गडी चांगला सशक्त होता, हा आमच्या कुटुंबातला नवा सदस्य–झोयाचा नवरा."

बरीस मागेच उभा होता; या पायावरून त्या पायावर करीत होता. अजूनही तो माझ्याजवळ यायला घाबरत होता. "इकडे ये," मी म्हणालो, "मी तुझ्यासाठी बक्षीस आणलंय"

"काय शिपाईबोवा, कुऱ्हाड चालवायला विसरलात तर नाही ना?" माझ्याकडे चोरटया नजरेनं पहात बाबानी विचारलं.

"पाहू या ना आता आपण, घोडामैदान जवळच आहे" मी शर्ट काढून टाकला आणि विचारले, "सारी हत्यारं कुठं आहेत?" वापरून वापरून गुळगुळीत झालेली कुऱ्हाडीची मूठ माझ्या हातात अगदी बरोबर बसली. आता मी मनसोक्त लाकडे फोडणार होतो.

"पुष्कळच काम पडलंय." बाबानी सांगितलं "सर्वात अगोदर तर छप्पर टाकायला हवं. मग पडवीकडे बघायला हवं. त्याला जरा वेळ लागेल."

"तुम्ही ढीग लावून ठेवा, मग मी पाहातो कसं काय आहे ते!"

"नाही नाही! आजचा दिवस तू आराम कर. तेच रास्त होईल. उद्यापासून कामाचं पहाता येईल."

मागाहून आम्ही तिघं, बाबा, दिमित्री आणि मी बोलत बसलो होतो; प्रत्येकाच्या हातात सिगारेट होती. आम्ही नुकत्याच संपलेल्या लढाईच्या गोष्टी बोलत होतो. पुढचे बेत ठरवीत होतो. आमचं कुटुंब मोठं होत, साऱ्यांचं भागवणं सोपं नव्हतं. मी पुढे काय करावं यावरही बोलणं चाललं होतं. आमचं बोलणं चाललं होतं तेव्हा युरा आणि बरीस, खड्डयात उतरत होते, चढत होते, सरपटत होते, धावत होते; घरांच्या मागून पुढून लपत छपत धावत होते दुसरा नजरेला पडला की "बदुकीचे बार" काढीत होते.

"बँग! बँग! ठो! ठो! ठो!"

"धाड! धडाड्, धाड धाड!"

" मी मारलंय तुला पहिल्यांदा."

"माझ्या बाँबनं मी केव्हाच निकाल लावला होता तुझा."

सूर्य मावळायला आला होता. सारं जग शांत झालं होतं. कुऱ्हाडीचे घाव पडत होते, त्यानीच काय तो शांततेचा भंग होत होता. पण त्या दोघांत मात्र तुंबळ लढाई चालू होती. अगदी ऐन भराला आली होती.

"आता काय म्हणावं तरी !" आई जशी रागाला आली, "वाल्या किती लांबच्या प्रवासाहून आलाय, दमलाय, काही समजतं की नाही ? त्याला भूक लागली असणार, जरा टेबलपाशी चला, थोडसं खाऊन घ्या सारेजण."

घराच्या मागच्या अंगणात टेबल मांडलं होतं.पण काहीतरी सारखा घोटाळा होत होता. आईला प्रथम काटे चमचे सापडेनात; मग तिच्या हातून बशाच पडायला लागल्या.

"तू बैस जरा शांतपणानं." झोया तिला म्हणाली, "मी करते सारी तयारी."

झोयाची चाल मंद झाली होती, पावले जड पडत होती. आम्ही तिघे भाऊ लवकरच मामा होणार होतो. घराला आजोबा, आजीबाई यांचा लाभ होणार होता.

मी माझी पिशवी सोडली आणि मुलाना जवळ बोलावल; म्हणालो, " कोणाला काय हवं ते तुमचं तुम्हीच ठरवायचं. "

त्यांचे डोळे चमकू लागले. एकीकडे सैन्यानली एक नवी कोरी टोपी तिच्यावर लाल चकचकीत तारा तर दुसरीकडे एक जुनीशी दिसणारी, चामड्याची नकाशाची पेटी. बरीसनं युराकडं पाहिलं, त्याला जणू सुचवायचं होतं, तू मोठा भाऊ, पहिला मान तुझा, पण युरानं डोळे मिचकावले आणि "आपल्याला काही कर्तव्य नाही" असा भाव आणून त्यानं मान फिरविली. बरीसला हे म्हणजे फारच झालं. त्यानं टोपीला हात घातला.

"हुर्यो, हुर्यो" युरा ओरडला, "मला माहीत होतं तू टोपी घेणार, मला माझ्या पुस्तकांसाठी पेटीची फार जरूरी होतीच "

आपली निवड चुकली हे बरीसच्या ध्यानात आलं. त्यानं तोंडाचा चंबू केला. युरानं आपला हात त्याच्या खांद्यावर ठेवला आणि तो त्याच्या कानात कुजबुजला- " मी देईन माझी पेटी तुला वापरायला तू मला तुझी टोपी घालू देशील. ठीक ?"

"ठीक, ठीक."

दोन्हीही मुलं खुशीत आली होती.

□ □



## २ : माझे मदतनीस

मे महिन्यात, आनंद देणाऱ्या बऱ्याच घटना घडल्या. घराचं छप्पर घालून झालं, आम्ही आमच्या घरात रहायला गेलो. घरात तशी जरा दाटीच होत होती. शिवाय लवकरच 'छोटा पाहुणा' ही येणार होता. पण कोणी त्याची काळजी अशी लावून घेतली नाही. "आणखी एक जण, आणखी आनंद" असा विचार करून कोणीही कुरकूर केली नाही. शालेय वर्ष संपले, बरीस वरच्या वर्गात गेला, युरा प्रथमच परीक्षेला बसला होता. "आता मी पाचवीत जाणार," असं तो ज्याला त्याला ऐटीनं सांगायचा. प्रादेशिक टेलिफोन कचेरीत मी 'लाईनमन' म्हणून नोकरी धरली होती. बाबाच्या शब्दात सांगायचं म्हणजे दर महिन्याला वेळच्या वेळी 'ठराविक रक्कम' घरी येत होती. त्या कठीण दिवसात 'ठराविक रक्कमे'ला फार मोठा अर्थ होता. आई सोडून घरातल्या साऱ्या मोठ्या माणसानी नोकऱ्या धरल्या होत्या. आई घरातलं काम पाही.

आता मला भावांशी बोलायचालायला फारसा वेळ सापडत नसे. संध्याकाळी मी कामावरून घरी परत आलो की दोघंही घरी नसत. आता घरी अभ्यास नव्हता. सारा मोकळा वेळ ते नदीवर घालवीत. संध्याकाळी उशीरा घरी येत कडकडून भूक लागलेली असे त्यामुळे जेवणावर अक्षरशः तुटून पडत आणि जेवण आटोपल्या-वर क्षणभरात झोपी जात. रविवारी काय त्या सर्वांच्या शान्तपणे एकत्र गाठीभेटी होत.

पण लवकरच माझ्या भावाना नदीवर जाऊन जाऊन तिचाही कंटाळा आला. ते जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हा मी त्याना विचारलं, "लाईन तपासायला येता का माझ्या बरोबर ?" त्या दोघांना इतका काही आनंद झाला की बस ! लोखंडी पकडी चढवून टेलिफोनच्या खांबावर चढायला मिळणार या नुसत्या विचारानेच ते भारून गेले.

आम्ही कामावर निघालो. इलेक्ट्रिशिअनचा रुंद चामडी पट्टा युरानं घेतला होता. बरीसनं लोखंडी पकडी घेतल्या होत्या. आम्हाला बरंच लांब जायचं होतं. ज्ञात्स्कपासून कुठेतरी ६ किलोमीटर अंतरावर लाईन तुटली होती. खरं तर आम्हाला एखादं वाहन मिळायला हवं होतं, परंतु जिल्ह्यात वहानांचा अजून तुटवडा होता आणि सर्व लाईनमनना आपल्या कामाच्या ठिकाणी चालत जावं लागत होतं

त्या दिवशी सकाळीच पावसाची एक सर येऊन गेली होती. शेतं अजून ओलसर होती. नवी रोपं अगदी हिरवीगार दिसत होती. आम्ही घरातून निघालो तेव्हापासन पक्ष्यांचा अखंड किलबिलाट कानावर पडत होता.

थोड्याच वेळात बरीस मागे मागे रेंगाळू लागला.

"त्या लोखंडी पकडी दे माझ्याजवळ." मी म्हणून पाहिले.

त्यानं युराकडे पाहून घेतलं आणि मान हलविली.

"मीच नेणार आहे त्या. अजून फार लांब जायचंय का आपल्याला ?"

"फार नाही."

मुकाट्यानं, शांतपणानं रस्त्यानं चालणं युराच्या स्वभावात बसत नव्हतं. मध्येच तो जोरानं कुठंतरी धावत सुटे, एखाद्या रंगीबेरंगी फुलपाखराचा पाठलाग करीत राही; पहाता पहाता एखाद्या खड्डयात उडी घेई आणि रानटी फुलांचा झुबका घेऊन वर येई. चालता चालता तो एकदम, अचानक थांबला; खाली वाकून त्यानं काहीतरी उचलून घेतलं आणि पाठीमागं लपवलं. जेव्हा बरीस त्याच्या पुढ्यात आला तेव्हा युरा त्याला म्हणाला, "डोळे मीट, तुला एक गंमत दाखवतो."

बरीस साशंक होऊन त्याच्याकडे पाहू लागला पण युराचा चेहरा गंभीर होता. बरीसनं आज्ञाधारकपणानं डोळे मिटले.

"एक-दोन-तीन !" युरा म्हणाला, "आता म्हण, आऽऽहाऽहाऽ."

"आऽऽहाऽऽहाऽऽ

"व्हूऽऽऽ!" डँडेलियनच्या पांढऱ्या केसरांचा एक गुच्छच्या गुच्छ बरीसच्या उघड्या तोंडात गेला. युराचं हे वागणं इतकं लबाडीचं होतं की बरीसनं युराच्या दिशेनं लोखंडी पकडी भिरकवल्या; पण युरानं केव्हाच धूम ठोकली होती. तो पुढे पुढेच जात राहिला.

एक खिळखिळी झालेली ट्रक आमच्या दिशेनं येत होती. चढण लागली तसा इंजिनचा मोठा आवाज होऊ लागला. ड्रायव्हरच्या जवळ एक सशस्त्र शिपाई बसला होता. त्याच्या शस्त्राचं टोक खालच्या बाजूला होतं. ट्रकवर एक विमान



होतं. त्याची शेपटी वेडीवाकडी झाली होती; तिच्या टोकाचा रोख आभाळाकडे होता. विमानाचे पंख कापलेले होते.

"पाहिलंत ? नाझीच विमान वितळवायला घेऊन चाललेत ते."

"मेसेरश्मिद विमान आहे ते," युरा म्हणाला.

मला गंमत वाटली, "तू तर विमानांचा तज्ज्ञच झाला आहेस. दुसरी कोणती विमानं मांहीत आहेत तुला ?"

"मला आपली सगळी विमानं माहीत आहेत अन् जर्मनांचीही माहिती आहेत," तो चटकन उत्तरला, "जर्मनापाशी फॉक-वुल्फ, हाइन्केल आणि जंकर होते. आपल्यापाशी याक, लॅग, मिग, इल आणि टीबी होते ती सारी बॉम्बफेकी विमानं होती. शिवाय इल ही लढाऊ विमानं पण होती. त्यांचे आरेखकसुद्धा मला माहीत आहेत. लावोचकिन, मिकोयान, इल्युशिन आणि तुपोलेव."

"शिवाय हरिकेन विमानंसुद्धा होती; तू सांगायला विसरलास," मी त्याला डिवचले.

एक क्षणभर तो विचारात पडला; "मग ते अमेरिकन नाहीतर ब्रिटिश विमान असेल. हरिकेन आपल्याकडेही नव्हतं अन जर्मनांकडेही नव्हतं. मी शोधून काढीन कुणाचं होतं ते."

"हवाई दल तर त्याचा उपयोग करीत होते अन तू नाही म्हणतोस ?"

ट्रक जात होती तिच्याकडे युरा कितीतरी टक लावून पहात होता, मग खिन्न होऊन म्हणाला.

"तुला वाटतंय मी अजून लहान मूलच आहे, तसाच वागवतोस तू मला. पण तुला माहीत हवं आहे, मी आता लहान नाही."

"छे ! छे ! तुला कोण लहान म्हणेल ? बाबांच्या त्रिजारीसुद्धा तुला आता लहान होत असतील; मी नक्की सांगतो."

युरा पुन्हा गप्प झाला; कितीतरी वेळ तो गप्पच राहिला. शेवटी जेव्हा तो पुन्हा बोलू लागला, तेव्हा मी चटकन उमजलो, तो मनातून दुखावला होता.

"तुला हसायचं असलं तर हसू शकतोस तू, पण जर ही लढाई नसती तर मी पाचवीच्या ऐवजी सातवीत गेलो असतो."

मला शरमल्यासारखे झाले, "चल चल युरा, तू काही एकटाच मागे पडला नाहीस. मला माहीत आहे, कितीतरी लोक आघाडीवर लढले, त्याना कित्येक लष्करी बहुमान मिळाले आणि आता ते पुन्हा शाळेत जायला लागले आहेत आणि मला वाटतं, तुझ्या वर्गातली सारी मुलं तुझ्याच वयाची आहेत; ती सुद्धा सारी सातवीत असती पण तीही तुझ्यासारखे पाचवीतच आहेत. आता त्या हरिकेनचं प्रकरण. ते मिटवू या. तुझं बरोबर आहे. ते ब्रिटिश लढाऊ विमान आहे."

मी युराला खुलवायचा, उल्लसित करण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. त्यानंतर तो पुढे धूम ठोकून पळाला नाही, फुलांसाठी खड्ड्यात उतरला नाही की त्यानं बरीसच्या खोड्याही काढल्या नाहीत. तो अबोलपणे माझ्या बाजूनं, माझ्या पावलाबरोबर पावलं टाकीत चालत राहिला. त्याचा स्वाभिमान दुखावल्याबद्दल मी स्वतःला बोल लावला. कदाचित जे त्यानं आपल्या अंतःकरणात खोल कुठे दडवून ठेवलं असतं ते सांगायला लावायचा घाट मी जुळवून आणला होता. माझंच चुकलं होतं युरा आता लहान नाही हे नीट लक्षात ठेवायला हवं मला.

मी खांबावर चढलो आणि वायर ताणली. उंचावरून क्षितिज विस्तारत गेले. आसपासच्या खेड्यांचं मोठं मनोहर दृश्य नजरेस पडलं. एका बाजूला जंगलाचा निळसर पट्टा तर दुसऱ्या बाजूला झात नदीचा चमकता प्रवाह. मला उगीचच ऐसपैस वाटू लागले, अगदी अगदी स्वतंत्र स्वच्छंद वाटायला लागलं; चांगला पुरा दम भरून मी श्वास आत ओढून घेतला.

मी खाली वाकून पाहिलं. दोघांनीही शर्ट काढले होते; आपापल्या स्टाईलनं दोघांचं सूर्यस्नान चाललं होतं बरीस गवतावर पसरला होता. सूर्याकडे त्याची पाठ होती. त्याचे हात काड्यांसारखे दिसत होते; खांद्याची हाडं वर आली होती, १९४७ साली मिळालेल्या अन्नावर कोणताही मुलगा गुटगुटीत होणं शक्य नव्हतं."

गुपचूप हात जोडून बसणं युराच्या स्वभावातच नव्हतं. वारा प्यालेल्या वासरासारखा तो इकडून तिकडे हुंदडत होता. त्याला सारखं काहीतरी मजेदार गुंतवून टाकणारं मिळत होतं. सारखं काहीतरी करायला सापडत होतं. "चला आपण चुक्याची भाजी गोळा करू या," तो बरीसला म्हणाला, "मी पाहून आलोय; एका ठिकाणी खूप उगवलीय."

"चल हट ! मी कामात आहे दिसत नाही का ? सूर्यस्नान करतो आहे मी."

"मूर्खच आहेस ! हिंडत फिरत राहिलं की चांगलं सूर्यस्नान घडतं; माहीत नाही वाटतं तुला ? मी जातो आणि चुक्याची भाजी गोळा करतो; मग आई घरी त्याचं 'सूप' बनवील. पण लक्षात ठेव, तुला चमचाभरसुद्धा मिळायचं नाही, मागाहून पस्तावा करायची पाळी येईल."

"वाल्या," बरीस वर माझ्याकडे पाहून ओरडला. "टेलिफोनच्या खांबाच्या टोकावर बसून आभाळातले तारे दिसतात, खरं का ?"

"रात्रीच्या वेळी ?"

"नाही, दिवसा उजेडी, यावेळीसुद्धा."



मी मान वर करून आभाळाकडे पाहू लागलो. कापसासारखे, पांढरे भुरके ढग जवळून जात होते. वर केवळ आभाळाची अथांग निळाई होती. एकही तारा दिसत नव्हता. "इथून तारे वगैरे दिसत नाहीत मला." मी बरीसला ओरडून सांगितले.

युरा बरीसच्या जवळ बसला अन् त्याला समजावून देऊ लागला; "दिवसा उजेडी टेलिफोनच्या खांबावरून तारे दिसणार नाहीत, पण जर तुम्ही खोल विहिरीत डोकावून पाहिलंत तर दिसतील, मी वाचलंय कुठंतरी. आपण क्लुशिनोला परत गेलो की मग आपल्या विहिरीत डोकावून पाहू."

युराच्या बोलण्यात आमच्या मूळ गावाचा नेहमी काहीतरी उल्लेख यायचाच.

गवतावर बसून आम्ही न्याहरीस सुरुवात केली. उकडलेले सबंध बटाटे व ब्रेडचा पातळसा स्लाइस. त्यावर मीठ एवढीच होती न्याहारी. मोकळ्या वाऱ्यावर आम्ही तास अन तास हिंडलो होतो त्यामुळे भुका कडकडून लागल्या होत्या. न्याहरीचा चट्टामट्टा झाला; पण भूक कायमच ! मग युरानं आपल्या शर्टातून चुक्याची भाजी काढली. त्यानं बाह्यांची आणि कॉलरची गाठ बांधून पिशवी बनवली होती, "चला, ही खाऊ या आता. घरी न्यायला मी पुन्हा गोळा करीन."

"मला वाटलंच होतं तू भाजी काढशील आता म्हणून," बरीसला आनंद झाला होता. तो ओठ दुमडून बोलत होता.

या पहिल्या मोहिमेनंतर पुढे कित्येक मोहिमा निघाल्या. मी माझ्या दोघा भावाना बरोबर नेत असे.

त्या वसंतऋतूत सुरुवातीलाच युरानं तीन 'पक्षी–घरं' बनवली होती. तोन लांब दांडे निवडून त्यानं ती व्यवस्थित त्यांच्यावर ठोकून बसविली मग ते दांडे फळबागेत नेऊन रोवले. सफरचंदाची नवी रोपं वर्षाची झाली होती पण त्याना म्हणावी तशी पालवी फुटली नव्हती. त्यामुळे बाबांना जरा काळजी वाटत होती, युराची नवी 'पक्षी–घरं' मोठी आकर्षक दिसत होती; पक्षी मुक्कामाला येण्याची वाट पहात होती. लवकर दक्षिणेकडून साळुंक्या आल्या, त्याना युराची कामगिरी पसंत पडली असावी. तिन्ही घरात साळुंक्या वस्तीला आल्या. काही थोडे दिवस गेले आणि तिन्ही घरातून छोटी छोटी पिले बाहेर डोकावून पाहू लागली, चिवचिवाट करू लागली.

दररोज सकाळ झाली की युरा बाहेरच्या पडवीत येऊन त्यांचा चिवचिवाट ऐकत उभा रहायचा; दोन दोन तास उभा राहायचा. आंघोळ नाही, कपडे नीट चढवलेले नाहीत. सकाळी न्याहारी सुद्धा घेतलेली नाही अन् युरा आपला तास अन् तास त्या साळुंक्यांचं गाणं ऐकतोय ! त्या एवढ्याश्या साळुंक्यात जीवनाचा केवढा उल्लास भरून राहिला होता !

एके दिवशी पहाटेच मी जागा झालो तो माझ्या भावाच्या ओरडण्याने. मग जोरजोरानं काहीतरी बडवल्याचा, ठोकल्याचा आवाज येऊ लागला. बिछान्यातून ताडदिशी उडी मारून मी बाहेर धाव घेतली. युराला ओरडायला सबळ कारण होतं. आमचं लबाड मांजर एका दांड्यावर चढलं होतं; पक्षी–घरापर्यंत जाऊन पोहचलं होतं आणि आता त्याचा पंजा आत शिरू पहात होता. युरा मांजरावर ओरडत होता, हातवारे करीत होता, टाळ्या वाजवीत होता. मग त्यानं एक रिकामी बादली उचलली आणि ती काठीनं बडवायला लागला. "टोबिक" जोरजोरानं गुरगुरत होता. युरानंच आणलं होतं ते कुत्रं. मांजरानं युराच्या आरड्याओरड्याकडे लक्ष न देता निर्विकारपणानं पंजा आत घालून एक पिलू बाहेर काढलं आणि जमिनीवर टाकलं.

युरानं धाव घेतली. त्या गडबडीत तो बादलीला अडखळला आणि पडला. तेवढ्या वेळात त्या दांडगट मांजरानं चोरपावलांनी दांड्यावरून खाली उतरून त्या पिलाला उचलून केव्हाच सूबाल्या केला होता. युराला रड फुटायला आलं.

"मांजरानं पिलू खाल्लं तर काय झालं ? त्यालाही काहीतरी खायला हवंच ना शेवटी ?" न्याहारीच्या वेळी बरीस तत्वज्ञान सांगू लागला.

"का ? काही प्रसाद हवा आहे वाटतं ? अगदी मऊ करून टाकीन तिंबून तिंबून ! माहीत आहे ना ?" युरानं दरडावलं. बरीसनं पुन्हा तोंडातून अक्षर काढलं नाही. खाली वाकून वाडग्यातून काहीतरी खाण्यात गर्क झाला तो.

आपल्या धाकट्या भावाला शिकवताना युरानं खरोखरीच या पद्धतीचा कधी स्वीकार केला असेल काय ? मी विचारात पडलो.

सारा दिवस युरा अस्वस्थ होता; त्याचं चांगलंच बिनसलं होतं. त्यानं माझ्याबरोबर यायलाही नकार दिला.

"मी पक्ष्यांवर पहारा करणार आहे." तो म्हणाला. मी जायला निघालो तसा तो धावत आला आणि घरी येताना तारेचं बंडल घेऊन यायला सांगितलं. मी कबूल केलं; वाटलं आता तरी हा ताळ्यावर येईल.

संध्याकाळी मी तारेचं बंडल घेऊन घरी आलो. युरानं हातोडा आणि पक्कड उचलली आणि तो बाहेर गेला. मीही त्याच्या मागोमाग गेलो. त्यानं एक नामी शक्कल शोधून काढली होती. तारेत त्यानं एक पितळी कडी सरकविली मग ती तार चांगली ताणून दोन्ही खांबाना बांधली. मग त्यानं एक दोरी त्या तारेला बांधली आणि तिचं दुसरं टोक 'टोबिक'च्या पट्ट्यात अडकवलं.

"आता कुठलंही मांजर इथं आपलं डोकं खुपसणार नाही," युरा म्हणाला.

आणि खरंच तसं झालं. 'टोबिक'च्या धाकानं आमच्या मांजराची किंवा जवळपासच्या दुसऱ्या कुठल्याच मांजराची 'पक्षी-घरा'कडे वाकड्या नजरेनं



पहाण्याची हिंमत होईना. एके दिवशी आम्ही संध्याकाळी जेवत होतो, तेवढ्यात टोबिक 'जोराजोरानं भुंकू लागला. युरा बाहेर धावला अन दहा एक मिनिटानी परत आला. त्याच्या चेहेऱ्यावर हसू खेळत होतं, स्वारी अगदी एकदम खुशीत होती. 'पक्षी-घरा'तून एक पिलू थेट 'टोबिक'च्या नाकासमोर, त्याच्या अगदी पुढ्यात पडलं होतं. तेव्हा 'टोबिक'नं भुंकून भुंकून युराला बोलावलं होतं.

"मग ते पिल्लू कुठंय् आता ?" बरीसनं विचारलं.

"पक्षी–घरात; दुसरीकडे कुठं असणार ते ?" युरा टेबलापाशी आपल्या जागेवर बसत म्हणाला.

दुर्बलांच्या मदतीला धावून जाण्याचा युराचा हा स्वभाव अगदी लहान वयापासूनच दिसून येत होता.

वसंतऋतूत बागेची काळजी घेण्याचं काम दोन्ही मुलांवर सोपवलं होतं. जमीन मोकळी करून, तिला खत देऊन, वाफे पाडण्याचं आणि बिया लावण्याचं काम आम्ही मोठ्या माणसांनी उरकलं होतं. आता उरलेली सारी कामं त्या दोघांची होती. रोपांची देखभाल करणं, तण काढणं, पाणी देणं सारी कामं ते दोघं करीत.

कधी कधी ते बाहेर खेळत असले की मी झारी उचलून पाणी घालू लागे. मी त्यांच्या नजरेस पडलो की ते लागलीच ओरडत, "तू कशाला करतोस ते ? आम्हाला समजते आमची जबाबदारी. आम्ही काही तुला पाणी घाल म्हणून सांगितलं नाही."

पुढेपुढे युरा झारीच लपवून ठेवू लागला. बाबाना अंगणातला इंच अन् इंच माहीत पण त्यानासुद्धा झारी सापडायची नाही. अर्थात त्याच्या साऱ्या चोरजागा आईला माहीत असायच्या. युराचं आईपासून गुप्त असं काही नसे. पण आई मुलांची गुपितं कधीही फोडायची नाही.

युराचे आणि बरीसचे स्वतंत्र वाफे होते. त्यात त्यानी वाटाणा, 'बीन' 'रेड् पॉपी' वगैरे लावलं होतं. त्यांच्या वाफ्याला हात लावण्याची आमची हिंमत नव्हती. त्यातले वाटाणे खाण्यासाठी होते तर 'पोल बीन' आणि 'रेड–पॉपी' शोभेसाठी होते. युरानं वाफ्यात ओळीनं सरळ कामट्या लावल्या होत्या आणि 'बीन' चे वेल त्यावर चढवले होते. तिथून युरानं ते सफरचंदाच्या लहान लहान झाडांवर चढविले होते. उन्हाळा आला की त्यावर लालभडक ज्वाळेसारखी फुले फुलत. दुरून कोणाला ओळखताही आलं नसतं की 'पोल–बीन' चे वेल फुलले आहेत म्हणून.

" चल, बघ एकदा किती सुरेख दिसताहेत ते," युरा म्हणे आणि मला ओढत बागेकडे नेऊ लागे; " नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सजविलेल्या वृक्षावर लहान लहान दिवे असतात ना, तशी दिसतात ही फुलं."

" तण काढा आता," असं त्या दोघांना सांगायची पाळी आईवर कधीच आली नाही. उलट, पुष्कळदा असं होई की सारा दिवस ते सरीमधून तण काढण्यासाठी " सरपटताना " तिला दिसत. ती हाक देई. " पुरे झालं काम आज, मुलानो ! जरा हिंडायला जा नाहीतर नदीवर पोहायला जा."

" जरा थांब आई," युरा उत्तर देई, " हे इथलं तण काढून झालं की आम्ही थांबलोच. नदीचं पाणी काय, संध्याकाळी सुद्धा उबदार असतंच."

बागकाम म्हणजे त्यांना नुसतं काम वाटत नव्हतं, त्यांनी एक मजेदार खेळ शोधून काढला होता.प्रत्येक तण म्हणजे एक शत्रू, " नाझी" नाहीतर " श्वेतसंरक्षक" त्या सर्वांना कंठस्थान घालायला हवे. मग दोन जनरल (युरा नेहमीच "चपायेव" व्हायचा आणि बरीस " बुदेनी ") आपापलं सैन्य घेऊन त्यांच्यावर चालून जात. कधीकधी दोघेजण वैमानिक बनत. एक " च्कालोव " तर दुसरा " कोझेदुब " वाफ्यावरच्या आभाळात ते दोघेजण नाझी विमानावर हल्ला चढवून ती खाली पाडीत. युराच्या सुपीक कल्पनासाम्राज्यात " च्कालोव "–प्रत्यक्षात तो युद्धाअगोदर एकदा विमानाची चाचणी घेताना झालेल्या अपघातात मरण पावला होता–याने लढाईत भाग घेतला होता आणि प्रत्येक हवाई-युद्धात तो विजयी झाला होता.

कदाचित या मजेदार खेळानीच त्यांना १९४७ सालचा खडतर, उपासमारीचा उन्हाळा निभावून नेण्यास बळ दिलं असावं.

एका शनिवारी मुलं म्हणाली, " उद्या रविवार आहे. आपण अळंबी गोळा करायला जाऊ या. "

" गेल्या वेळी आपल्याला काही सुद्धा मिळाली नाहीत. आतासुद्धा काही मिळायची नाहीत- सारेजण आपल्याला हसतील मात्र." मी म्हणालो

खरं तर जंगलात अळंबी गोळा करायला जायची कल्पना तशी काही वाईट नव्हती. प्रत्येकानं एकेक टोपलं जरी घरी भरून आणलं असतं तर हवंच होतं. नुसतं सारा दिवस फर आणि बर्च वृक्षांच्या रायांतून हिंडण्यातही मजा आली असती. पण त्या रविवारी मी माझ्या मित्राना भेटण्याचं कबूल केलं होतं. शेजारच्या खेड्यात त्यांच्या ओळखीच्या काही मुली होत्या. तिथे आम्ही जाणार होतो. तिथे पार्टी होणार होती. ॲकॉर्डियनच्या साथीवर नृत्याचा कार्यक्रमही होता.



अळंबी गोळा करण्याच्या कल्पनेनंच माझ्या भावांच्या अंगात केवढा उत्साह संचारला होता. नुकताच पाऊस पडून गेला होता. रानात नक्कीच खूप अळंबी उगवली असणार.

आईनं माझी बाजू घेतली. " कशाला रे त्याच्या मागे पडता ? जंगलात अजून सुरुंग आहेत. चुकून पाय पडला म्हणजे ?"

" आज पहिल्यांदा थोडेच जंगलात चाललो आहोत आम्ही ?" युरानं हरकत घेतली.

" आम्हाला सुरुंगाची भीती नाही वाटत. शिवाय एक लष्करी शिपाई येतोय आमच्या बरोबर," बरीसनं आगीत भर घातली.

या उघडउघड स्तुतीनं मी हतबल झालो. होना, होना करता करता शेवटी मी कबूल करून बसलो, " ठीक आहे, टोपल्या काढून ठेवा बाहेर. जाऊन येऊ आपण."

" पार्टीला जायला सहज वेळ सापडेल." मी विचार करीत होतो. " अगदी वेळेवर येऊ आपण."असे विचार मनात घोळवीत मी कामावर गेलो. पण दुसऱ्या दिवशी भावांच्या बरोबर रानात अळंबी गोळा करायला जायचा किंवा संध्याकाळी पार्टीला जायचा योग माझ्या कुंडलीत नव्हता.

केवळ माझी कल्पनाच होती की मी पार टोकाला गेल्यावर तो टेलिफोनचा खांब खरोखरच हलला, मला नक्की सांगता येणार नाही. प्रथम मला वाटलं जोराच्या वाऱ्यानं तसं झालं असावं. कदाचित फार उंचावर चढल्यानं मला काही भास झाला असावा.

पण जर का... ? " तू म्हातारा व्हायला लागला आहेस, पेन्शन घे आता !" खांबाच्या टोकाला एकदोन चापट्या देत मी त्याला–मित्राला म्हणावं तसं– म्हणालो वर जास्त वेळ थांबण्यात धोका होता तो मी ताडला. येवढ्या तारा कापायच्या की लागलीच खाली उतरायचं.

मी तार कापायची कात्री काढली, सर्व तारा कापल्या आणि लवकर लवकर खांबावरून खाली उतरू लागलो. नेमक्या त्याच क्षणी खांब धाडकन खाली आला. मला काहीतरी अस्पष्टसा आवाज ऐकू आला. मी बाजूला उडी मारायचा प्रयत्न केला, पण फार उशीर झाला होता.

उन्हानं जमीन अगदी कडक वाळली होती. मी एका कुशीवर वेडावाकडा आपटलो. खांब माझ्या पायांवर आपटला. मग सगळीकडे अंधार झाला.

इस्पितळात पडल्या पडल्या माझ्या लक्षात आलं. मी त्या खांबावर चढायलाच नको होतं त्याचा खालचा भाग केव्हाच कुजून गेला होता. खेचून ताणलेल्या तारानीच त्याला आधार दिला होता. मी त्या तारा कापून टाकल्या अन् त्याचा आधार गेला.

आता सारं कसं स्पष्ट झालं होतं. " पुढं पहाण्यापेक्षा मागे वळून पहाणं बरं असतं. " असं म्हणतात ते मला पुरेपुर पटलं. खांबावर चढण्याअगोदर मी सहज त्याची परीक्षा करू शकलो असतो.

सूर्याचा प्रकाश अगदी प्रखर होता त्या दिवशी. मला मागाहून सांगण्यात आलं की त्या प्रखर सूर्यप्रकाशात मी बराच वेळ तसाच बेहोश होऊन पडलो होतो आणि प्रथमोचार मिळायला फार उशीर झाला होता. त्या साऱ्याचा परिणाम म्हणजे पायाला गँगरिन झालं होतं.

" तुझा पाय कापून काढावा लागेल," सर्जन-बाई अशा आवाजात म्हणाली की हरकत घेण्याचा प्रश्नच ठेवला नव्हता तिनं.

किती कठोर, कटू लागले ते शब्द कानाला ! युद्धाच्या ऐन धुमाळीत मी रणगाड्यावर बसून वावरलो होतो; बंदुकांच्या आणि तोफांच्या गोळ्या माझ्या वाटेला गेल्या नव्हत्या. एकदा तर आमचा रणगाडा सरळ सुरूंगावरच गेला होता. भीतीनं माझी बोबडी वळली नव्हती म्हणणं मूर्खपणाचं होईल पण तिथून आम्ही शीरसलामत सुटलो होतो.

आणि आता हे !

इस्पितळात विचार करायला केवढा तरी वेळ सापडतो. माझं सारं शरीर पायातल्या तीव्र वेदनेला सरावलं होतं. त्या वेदनेला उसंत नव्हती. मी वेगवेगळ्या गोष्टींचा विचार करीत होतो. माझा बिछाना उघड्या खिडकीजवळ होता. वाऱ्याची एक झुळूक आली. उन्हाचे कवडसे पांढऱ्या भिंतीवर, माझ्या-अंगावर ओढलेल्या चादरीवर, डोळ्यावर नाचत गेले. माझे डोळे दिपले. आई मला भेटायला आली होती; माझ्यासाठी उकडलेली अंडी आणि पांढरा ब्रेड घेऊन आली होती. त्या दिवसात हे जिन्नस म्हणजे मेजवानीच. जवळच्या टेबलावर अन्न तसच वर्तमानपत्राखाली झाकून पडलं होतं.

"लवकर बरा हो बाळा, शक्यतो लवकर इथून बाहेर पडायचा प्रयत्न कर." ती म्हणाली.

तसं करता येतं तर केवढा आनंद झाला असता मला.

" जरा अंडी तरी खाऊन पहा. आजारात अन्नाचा फार मोठा आधार असतो."

खायला माझी हरकत नव्हती. पण मला माहीत होतं ते घशातच अडकलं असतं.

काय आश्चर्याची गोष्ट आहे ! माणूस जोवर धडधाकट, हिंडताफिरता असतो तोवर त्याला आजाराचा नुसता विचार करायला फुरसद नसते. इस्पितळाच्या



भिंतीजवळून फेरफटका करताना आत केवढी वेदना, दुःख, दुखणी दडलेली आहेत याचा त्याला विचारसुद्धा करावासा वाटत नाही.

माझा वाटा माझ्या हातात पडला होता.

कोणीतरी हलकेच खोकलं आणि माझी विचारांची तंद्री मोडली. मी खिडकीकडे वळलो. अगदी बारीक बारीक केस कापलेलं एक डोकं दिसलं.

" शुक् शुक् ! वाल्या !"

नातेवाईकांना दररोज भेटायला यायची परवानगी नव्हती. पण त्यामुळं युराचं काही अडणार नव्हतं. वॉर्डमध्ये माझ्याशिवाय दुसरं कोणी नाही याची खात्री करून घेऊन तो उडी घेऊन खिडकीत चढला आणि पुन्हा उडी मारून आत आला. तो अनवाणीच होता हलकेच तो माझ्या बिछान्यापाशी आला आणि अगदी तोलून मापून त्याच्या कडेवर बसला. मला त्रास होईल म्हणून नीट श्वासोच्छवास करायलाही तो घाबरत असावा.

" कसं काय आहे ?" दोन मोठ्या माणसांनी एकमेकांशी बोलावं तसं त्यानं मला विचारलं.

वेडावाकडा चेहरा करीत मी हसलो, " जेवढं वाईट होणं शक्य आहे तेवढं होणार आहे ते माझा पाय कापून काढणार आहेत "

गोरंमोरं होत त्यानं निश्वास टाकला ; " तुला माहीत आहे वाल्या, किती-तरी लोकांना एकच पाय असतो. मग तुला टेलिफोनच्या खांबावर चढता येणार नाही खरं; पण दुसरं काही शिकता येईल."

मी काहीच बोललो नाही. स्वतःवरचा ताबा सुटायची मला भीती वाटत होती. शिवाय बोलण्याजोगं होतं तरी काय ? दररोज डॉक्टर तोल्स्तिकोवाकडून मी हेच शब्द ऐकत होतो. तीच माझा एक पाय कापून काढणार होती. ते सारं गोड गोड बोलणं किती पोकळ, खोटं होतं हे लक्षात येऊन मला माझीच भयंकर दया यायची; स्वतःलाच स्वतःचीं कीव वाटायला लागायची. अरे बाबांनो, तुम्ही सारीजणं मला हे काय सांगता आहात ? माझं वय आहे एकवीस, माहीत आहे ना तुम्हाला ?

" बरं का, मी नुकतंच एका वैमानिकाचं एक पुस्तक वाचलंय्. फार छान आहे. त्याचे दोन्ही पाय जातात. पण तो लढतच राहातो; लढाऊ विमान उडवत राहातो. पुढे त्याला 'हिरो ऑफ द सोविएत युनियन' हा किताब मिळतो. त्याच्यावर आहे ते पुस्तक. त्याचं नाव मेरेस्येव."

" हे सारं एक तर सरळ बंडल आहे, नाही तर तू वाचताना काहीतरी घोटाळा केला असशील. पाय नसलेला कोणताही वैमानिक लढाऊ विमान उडवू

शकणार नाही. मी लढाईवर गेलो होतो आणि लढाई म्हणजे काय ते मी सारं नीट पाहिलं आहे, स्वतःच्या डोळ्यानी."

"बंडल नाही, अगदी खरं तेच लिहिलंय त्यानं. माझ्याजवळ आहे ते पुस्तक," असं म्हणत त्यानं शर्टाच्या आतून एक जुनंपुराणं झालेलं पुस्तक काढलं. पुस्तकाच्या पानाच्या टोकांना "कुत्र्याच्या काना"चं रूप आलं होतं. बरीस पोलेवोयनं लिहिलेलं 'अ स्टोरी अबाऊट अ रिअल मॅन' पुस्तक होतं ते. "तूच स्वतः वाचून पहा आणि मग सांग काय ते."

"तू जर बाबांकडून थोडी तंबाखू आणली असतीस तर बरं झालं असतं, युरा, पुन्हा येशील तर आणायला विसरू नकोस. सिगरेटवाचून माझा जीव चाललाय्."

"ठीक आहे."

तो आला तसाच खिडकीतून परत गेला. ते पुस्तक माझ्याजवळ टेबलावरच पडलं होतं. खरं सांगायचं तर ते उघडून पहायची सुद्धा इच्छा होत नव्हती.

"मग काय वलेन्तिन ?"

"नाही ! मी तुम्हांला माझा पाय कापू देणार नाही."

"त्यातून पुढं आणखी काही तरी गंभीर दुखणं ओढवेल."

डॉक्टर माझी समजूत पटवायची प्रयत्न करीत होती. तिच्या बोलण्यात चमत्कारिक लांबलचक शब्द येत होते. मी तर कधी ऐकलेही नव्हते. तिचा आवाज मृदू, ऐकणाराला गोंजारणारा होता. मला भास झाला, मी त्या जाळ्यात गुरफटला जातोय्. खरं तर ती जे काय बोलत होती त्यातलं एक शतांशसुद्धा मला समजत नव्हतं. मला जाणवलं, हे असंच चालू राहिलं तर माझ्या तोंडून फटकन 'हो' केव्हा निघून जाईल कळायचं देखील नाही. ते टाळायला मी सारखा, पुन्हा पुन्हा सांगत होतो: "काही उपयोग नाही. मी कधीही हो म्हणणार नाही."

तिनं खिन्नपणानं मान हलवली. माझ्या बाबतीत काही आशा नाही हे मी समजून चुकलो. पण मी पुटपुटत राहिलो, "मी तुम्हाला परवानगी देणार नाही. मी मेलो तरी चालेल."

"ठीक आहे, बघू या काय करता येईल ते," असं म्हणून सर्जनबाई निघून गेली. थोड्या वेळानं मला चाकाच्या गाडीतून ऑपरेशनच्या खोलीत नेण्यात आलं.

त्यानी मला गुंगीचं औषध दिलं. मी जेव्हा शुद्धीवर आलो तेव्हा ऑपरेशन टेबलावर होतो. वरच्या पांढऱ्या छताकडे मी रोखून पाहात होतो. मला हलता येत नव्हतं. पायाला वजन बांधलं होतं. पण मी मनातल्या मनात आभार मानले. पाय अजून जागेवर होता, त्यानी कापून काढला नव्हता.



पायाला वजन बांधलेल्या त्या अवस्थेत पाच महिने मी बिछान्यात पडून होतो. मग आणखी एक महिना, वजन सोडून. एकंदर सहा महिने.

माझ्या नव्या कुबड्या घेऊन हिवाळ्यात जेव्हा मी घरी जायला निघालो तेव्हा रस्त्यावर बर्फ जमला होता. मला अजून कुबड्यांची सवय झाली नव्हती. निसरड्या रस्त्यावरून जाताना खात्री वाटत नव्हती. सारखी भीती वाटे, कुठेतरी घसरून पडू म्हणून. "थोडे दिवस कळ काढायची; मग टाकूनच द्यायच्या आहेत या कुबड्या," मी स्वतःलाच सांगितले.

घरी पुनर्भेटीचा सोहळा साजरा झाला. दोघे भाऊ कडकडून भेटले. मेजवानीला अळंब्याचं सार होतं.

"तुला काय वाटतं ? कोणतं काम जमेल तुला ?" बाबानी विचारलं.

"ट्रकड्रायव्हर व्हावं असा विचार करतोय. मला मोटारींची चांगली माहिती आहे. लष्करात असताना मोटर चालवायला शिकलोय मी. या कुबड्या टाकून द्यायच्या आणि ड्रायव्हरचं लायसन्स घेऊन यायचं. काही अडचण येईलसं वाटत नाही."

"पण सुरुवातीला त्रास होईल" युरा म्हणाला.

"त्या मेरेस्येवचं काय झालं ?" मी विचारलं अन् हसलो, "हे बघ पुस्तक, लायब्ररीत परत करून ये. फार दिवस राहिलंय."

"म्हणून काय झालं ? मी कोणासाठी नेतोय ते सांगितलं होतं त्याना."

□ □

## ३ : युरा पाचवीत शिकतो

**युरा** पाचवीत गेला तेव्हा त्याची शाळा बदलली. एकदा दुपार सरता सरता तो मला म्हणाला, "चल वाल्या; माझी शाळा दाखवायची आहे तुला."

"फार दूर आहे. मला जमायचं नाही."

"चल ना. मी करतो तुला मदत. तुझा भार माझ्यावर टाकून चल."

शेवटी त्यानं माझं मन वळवलंच. लंगडत, अडखळत चालत मी शेवटी कशी बशी शाळा गाठली. शाळेत तसं फारसं पहाण्याजोगं काहीं नव्हतंच. एक साधी दुमजली लाकडी इमारत होती. व्हरांड्यात जरा अंधार होता. एका दारावर पट्टी ठोकली होती "५ वी अ."

"हा माझा वर्ग."

युरानं दार उघडलं. मी आत गेलो. वर्ग लहानसा, उदासवाणा होता. मला कुठेतरी खटकल्यासारखं झालं. हा वर्ग नेहमीच्या वर्गांसारखा दिसत नव्हता. क्लुशिनोत मी सात वर्षं शिकलो होतो. शाळेत माझा डेस्क साधाच होता. बिजागरीनं त्याची वरची फळी जोडलेली होती. फळीच्या आतल्या बाजूला मी माझं नाव कोरलं होतं. इथे मात्र मोठ्या ओबडधोबड टेबलांच्या दोन रांगा होत्या. टेबलं कशीबशी ठोकली होती इतकंच.

"बैस ना, वाल्या." युरा म्हणाला. त्यानं माझ्यासाठी शिक्षकांची खुर्ची सरकविली. मी सावरून आरामशीर बसलो. माझा अधू पाय माझ्या पुढ्यात होता. युरानं सांगितलं, एकेका टेबलापाशी पाचसहा विद्यार्थी बसत असत. शिक्षकांनी जर मधल्याच एखाद्या विद्यार्थ्याला बोलावलं तर तो सरळ टेबलाखालून निघून फळ्याजवळ जाई.

"कसं काय वाटलं ?" त्यानं विचारलं; त्याला हसू फुटलं.

"ठीक आहे. पण मला वाटतं डेस्कपाशी बसणं जास्त आरामशीर अन् सोईचं आहे."



"याच्यात जरा जास्त मजा येते, शिवाय उबदार वाटतं."

युराचं हे बोलणं निखालस सत्य होतं. वर्गात अतिशय थंडी होती. कुबड्या धरून इतक्या दूर चालून येताना मला बरेच श्रम झाले होते त्यामुळे आल्याआल्या मला वर्गातली थंडी जाणवली नाही. तिथं थोडावेळ बसल्यावर मग कोपऱ्यात जमलेले, गोठून धूसर दिसणारे दवबिंदू माझ्या नजरेला पडले. पायाना ओढ बसतेसे वाटायला लागले. माझी बोटं हळुहळू बधीर होऊ लागली होती.

अशा थंडीत ही मुलं दररोज पाचसहा तास इथं कशी काय बसत असतील हा विचार मला सतवायला लागला.

"फार थंडी पडली की आम्ही कोट काढत नाही, टोपीहि तशीच ठेवतो." युरा म्हणाला. माझ्या मनातले विचार त्यानं बरोबर ताडले होते.

त्याकाळी पाचवीचा वर्ग म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनातला एक महत्वाचा टप्पा असे. पाचवीच्याअगोदर प्रत्येक वर्गाला एकच शिक्षक असत आणि सारे विषय तेच शिकवीत. पाचवीपासून माध्यमिक शाळेत प्रत्येक विषयाला वेगवेगळे शिक्षक असत. विषय नवे असत, अवघडही असत. माझ्या मते पाचवीचा वर्ग म्हणजे बाल्य आणि कौमार्य यामधील सीमारेषा होती. पाचवीतल्या मुलांना जीवनाची व आजुबाजूच्या जगाची अधिक चांगली समज येई. त्यांचा बालिशपणा नाहीसा होई. ती अधिक गंभीर रीतीने विचार करायला शिकत. त्या वयातली मुलं आईवडिलांना व शिक्षकाना खूप सतावत, सारखी काळजी लावून ठेवीत.

झात्स्कच्या शाळेत, पाचवीसहावीत असताना युरा खूपच शिकला हे मला माहीत आहे. १९४७ ते १९४९ हा काळ होता तो युरानं घरी राहण्याची ती शेवटची दोन वर्षं !

त्या दोन वर्षांचं, शक्य तितके तपशीलवार चित्र रेखाटण्याचा मला प्रयत्न करायचा आहे.

पाचवीच्या वर्गात गेल्यावर मुलाना 'यंग पायोनियर' संघात जाता येई. त्या दिवशी युरा शाळेतून आला तेव्हा त्याला उत्साहानं सुचेनासं झालं होतं. "उद्या आमची सभा आहे; उद्या आम्हाला लाल टाय बांधणार आहेत;" त्यानं सांगितलं, "वाल्या चल; मला टाय आणायचाय्, आपण दुकानात जाऊ."

"ठीक आहे, जाऊ या."

गावातलं प्रत्येक दुकान आम्ही धुंडाळलं. एकाही दुकानात टाय मिळाला नाही. आई शिवून देईल तर एखाद्या दुकानात लाल सुती कपडा देखील मिळू शकला नाही. ही परिस्थिती समजायला कठीण नव्हती. युद्धानंतरचे ते दिवस तसेच खडतर होते.

"झालं, युरा. आता शोधायला जागाच उरली नाही;" शेवटच्या दुकानातून बाहेर पडता पडता मी युराला म्हणालो: आमच्या मागे दुकानाचा दरवाजा उदासवाणा कुरकुरला.

डोक्यावर फर टोपी होती; कोटाला बटनं लावायची होती. कानावरचा टोपीचा पडदा एक खाली होता तर एक वर होता. अशा पोशाखात युरा माझ्यासमोर उभा राहिला. धूसर, करड्या आभाळातून चिकटसर, असहाय हिमकण खाली तरंगत येत होते युरा गोंधळला होता, काय करावे सुचत नव्हतं; चेहऱ्यावर निराशा दाटली होती.

"आता कुठं जायला जागाच उरली नाही युरा," मी पुन्हा एकदा म्हणालो.

"काय करू बर मी आता ?" तो पुटपुटत होता. फेल्ट बुटाच्या टोकानं जमिनीवर सांचलेलं बर्फ उकरून उडवीत होता.

"नाहीतर ते तुम्हाला शाळेतच देतील लाल टाय, नाहीतर कोणाला तरी पैसे देऊन स्मोलेन्स्कला पाठवायचं आणि साऱ्या वर्गासाठी लाल टाय आणायचे तिथून. तिथं नक्कीच मिळतील"

"त्यानी प्रत्येकाला घरून टाय आणायला सांगितला आहे. मी सोडून प्रत्येकाच्या घरी टाय आहे."

"तू जरा अगोदर विचार करायला हवा होतास या साऱ्याचा."

आई युरासारखीच अस्वस्थ झाली. "चांगलाच घोटाळा झाला; आता काय करायचं आपण ?" ती म्हणाली.

बाबांनाही काही सुचेना. पण ते आमच्यापेक्षा जास्त आशावादी होते. "काही काळजी करू नकोस युरा. पुढच्या आठवड्यात मी स्मोलेन्स्कला जातोच आहे. मुख्य गोष्ट अशी आहे युरा, तुला अगदी मनातून वाटलं पाहिजे की आपण "यंग पायोनिअर" आहोत म्हणून."

"पण उद्या ते सर्वांना टाय बांधणार आहेत !" युरा निराशेनं ओरडला, "अन् माझ्या एकट्याच्याच जवळ टाय नसणार !"

"तुझं मला पटत नाही अलेक्सी," आई बाबाना म्हणाली; मग युराकडे वळून म्हणाली, "युरा, तू जा झोपायला, अगदी शांतपणानं. सकाळी डोकं तल्लख असलं पाहिजे. काही तरी शोधून काढू आम्ही."

तिच्या शब्दात मलाही एक आशेचा किरण दिसला. कारण आम्हाला माहीत होतं, आई कधी खोटी आश्वासनं देत नसे.



शेवटी मुलं झोपी गेली तशी आईनं शिवणकामाचं साहित्य बाहेर काढलं. शिवणाचं मशीन टेबलावर ठेवलं. "आता उशीर झाला नाही का ? किती रात्र झाली आहे," बाबा म्हणाले.

"असू देत, काही उशीर झाला नाही," ती उत्तरली. मग निःश्वास सोडून तिनं आपली पेटी उघडली. त्या पेटीनं एक क्रान्ती आणि दोन लढाया पाहिल्या होत्या. ती हात खुपसून काहीतरी शोधू लागली. तिच्या हाताला, पिवळ्या वर्तमानपत्रात गुंडाळलेले काहीतरी लागले. ते पेटीच्या अगदी तळाशी होतं. तिनं जेव्हा कागद उलगडला तेव्हा एक लालकिरमिजी, उंच कॉलरचा शर्ट आमच्या दृष्टीस पडला.

"तुला वेड तर लागलं नाही ? " बाबा दचकले होते, "काय, झालय काय तुला ?"

"चांगल्या कारणी लागतोय तो, अलेक्सी, कात्री कुठं बर गेली माझी ?"

फार फार वर्षापूर्वी, युद्धाच्या अगोदर मी जेव्हा युराच्या वयाचा होतो, कदाचित त्याहीपेक्षा लहान असेन, तेव्हा मी हा शर्ट एकदा पाहिला होता. माझ्या साऱ्या आयुष्यात मी तो एकदाच पाहिला होता. मला माहीत होतं, तो शर्ट म्हणजे आईच्या वडिलांची, आमच्या आजोबांची एकुलती एक आठवण होती. आमचे आजोबा तिमोफेई मत्वेयेव सेंट पीटर्सबर्गमधल्या पुतिलोव कारखान्यात कामगार होते.

आजोबा गेल्यावर माझा जन्म झाला होता. अर्थात मी त्याना कधीच पाहिलं नव्हतं. पण मला त्यांची सारी हकिकत माहित होती. त्यांच्या आयुष्याची कथा मला एकट्यालाच माहीत होती असं नाही. हिवाळ्याच्या दीर्घ संध्याकाळी आई अनेकदा आम्हाला तिच्या वडिलांच्या गोष्टी सांगायची.

वयाच्या १० व्या वर्षी तिमोफेई मत्वेयेव स्मोलेन्स्क प्रदेशातलं आपलं मूळ गाव सोडून कामधंदा शोधायला सेंट पीटर्सबर्गला गेले होते. लहानपणीच ते मोठे धीट, चुणचुणीत होते तिथे गेल्यावर काही वर्षं त्यानी निरोप ने-आणणारा मुलगा, माल पोहोचवणारा मुलगा म्हणून काम केलं. मग एका खेळाच्या दुकानात काम केलं. तिथे त्यानी बराच अनुभव मिळवला, बरीच समज मिळविली. मग त्याना १८९२ साली पुतिलोव कारखान्यात काम लागलं. थोड्याच काळात एक निष्णात, कसबी धातु कामगार म्हणून त्यानी नाव कमावलं.

तिमोफेई आजोबांचं कुटुंब मोठं होतं. ते जरी निष्णात कामगार होते तरी त्यांचा पैसा कुटुंबाला पुरत नसे. ते अगदी काटकसरीनं राहात, जमाखर्चाची दोन्ही तोंडं कशीबशी मिळवण्याचा प्रयत्न करीत. शहरात राहून ते लिहायवाचायला शिकले. समाजात केवढा अन्याय होता हे त्याना तेव्हा स्पष्ट कळून आलं. पुढे

त्यांची क्रांतिकारकांशी गाठ पडली. १९०५ च्या क्रांतिकारी घटनात त्यानी भाग घेतला होता. ९ जानेवारी १९०५ या 'रक्तरंजित रविवारी' झारच्या राजवाड्यावर जाणाऱ्या अर्जदारांत तेही होते.

" त्या दिवशी त्या भयंकर निदर्शनानंतर ते घरी पळत आले; आल्यावर ते किती रडले आणि फादर गॅपॉनला त्यानी किती शिव्याशाप दिले ते माहीत नाही तुम्हाला." आई सांगत होती. " त्या रविवारी कामगारांचं किती रक्त वाहिलं कल्पना येणार नाही तुम्हाला."

" आपल्या घराच्या मागे सांडपाण्याचा एक खड्डा होता; त्या दिवशी त्याचं पाणी लालभडक झालं होतं."

तिमोफेई रडले ते प्राणाला मुकलेल्या आपल्या सहकाऱ्यांसाठी! खून झालेल्या कामगारांसाठी! फादर गॅपॉनसारख्या विश्वासघातक्यावर विश्वास ठेवण्याइतके आपण गाढव होतो या विचाराच्या तीव्र खंतीनं, कडवटपणानं ते रडले होते. आईनं ही हकीगत मारियाकडून म्हणजे आपल्या मोठ्या बहिणीकडून ऐकली होती.

त्यांच्या कारखान्यातला एक फोरमन मालकांच्या बाजूचा होता. पोलिसांच्या हेरांनी त्याच्यामागे भुंगा लावला होता. त्यानं बरोबर बनाव घडवून आणला. आजोबा जात होते जाता जाता त्यांच्या पायावर जड लाखंडी कांब येऊन आदळली. तिनं त्याना कायमचं पंगु बनवलं.

आईचा मोठा भाऊ सर्गेई वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून निघाला. तोहीं सेंट पीटर्सबर्गमध्ये कारखान्यात कामावर होता. संपावर गेल्याबद्दल वयाच्या १७ व्या वर्षीच त्याचं नाव काळ्या यादींत दाखल झालं होतं बंदी घातलेलं क्रान्तिकारक वाङ्मय शोधण्यासाठी झारचे पोलीस मत्वेयेवच्या घरावर मधून मधून छापा घालीत. क्रांतीनंतर सर्गेई लाल सैन्याच्या एका तुकडीत कमीसार म्हणून काम करू लागला. अनेक आघाड्यांवर त्यानं प्रत्यक्ष लढाईत भाग घेतला होता. झात्स्कला 'कुलका'नी बंड केलं तेव्हा ते मोडून काढण्यात त्यानं भाग घेतला होता. १९२२ साली ऐन तारुण्यात 'टायफस'नं त्याचा बळी घेतला

आजोबांचा लाल शर्ट आईनं जेव्हा बाहेर काढला तेव्हा हा सारा इतिहास माझ्या डोळ्यासमोरून सरकत गेला. आई आम्हाला सांगायची ते मला आठवलं. आजोबा फक्त खास प्रसंगीच तो शर्ट घालीत असतं .मे-दिन साजरा करण्यासाठी जेव्हा कामगार गुप्तपणे एका ठिकाणी जमले होते तेव्हा त्यांनी तो शर्ट घातला होता.

" तुझं चुकतंय् " बाबा आईला म्हणाले.

" काही चुकत नाही," कात्री उचलत आई उत्तरली.

पहाता पहाता तीन टोकांचा लाल टाय तयार झाला. खुर्चीवर युराचा पांढरा शर्ट व्यवस्थित घडी घालून ठेवला होता. त्याच्याजवळ टायची रवानगी झाली.



" ओहं ! हुर्यो ऽ ऽ ! आई, काय म्हणू तुला ?" दुसऱ्या दिवशी सकाळी टाय पहाताच यूरा ओरडला. तो आईला घट्ट बिलगला आणि त्यानं तिचा मुका घेतला.

" मुला, दीर्घायुष्य मिळू देत तुला."

तो टाय किती मौल्यवान होता याचा युराला अंदाजच आला नसता. तो शिवण्यासाठी आपल्या आईनं तिच्या वडिलांच्या एकुलत्या एका आठवणीवर पाणी सोडलं हे त्याच्या स्वप्नातही आलं नसतं. आमच्यापैकीही कुणी त्याबद्दल शब्द काढला नाही.

पण युरा यंग पायोनियर झाल्यानंतर एका आठवड्यानंतर त्याला हा इतिहास सांगणं मला भागच पडलं. त्या दिवशी तो शाळेतून धावत आला, पुस्तकं भिरकावून दिली आणि जोरात ओरडला " आम्हाला नवे टाय दिलेत बाल्या ! खरेखरे टाय !"

सुदैवानं घरात मी एकटाच होतो.

" बघ !" तो म्हणाला. त्यानं कोटाची बटनं काढली, " खरं रेशीम आहे."

" काय केलंस तू हे !"

माझ्या एकदर आविर्भावानं आणि ओरडण्याने तो घाबरला असावा. लामलीच शांत होत तो म्हणाला, " काही केलं नाही."

" आईनं तुला कुठून टाय शिवून दिला माहीत आहे का ? तिमोफेई आजोबांच्या लाल शर्टातून !" मी त्याला त्या शर्टाबद्दल सांगणार होतो, पण तशी संधीच मिळाली नाही. युरा घरातून बाहेर पडून रस्त्याला लागला होता, शाळेकडे धावत होता. थोड्याच वेळात तो परतला, सॅटिनचा पहिला लाल टाय घालून.

ओल्गा स्तेपानोव्ना रायेव्स्काया युराला व्याकरण आणि साहित्य शिकवी. युराला ती घरी येऊनही शिकवीत असे. १९४७-१९४८ या वर्षी "५वी अ "च्या विद्यार्थ्यांनी लिहिलेले निबंध तिने काळजीपूर्वक जपून ठेवले होते. पुढे तिनं तो संग्रह झात्स्कच्या स्थानिक वस्तुसंग्रहालयाला भेट म्हणून दिला. त्या संग्रहाच्या कव्हरवर काळजीपूर्वक त्याचे नाव रंगविले होते: " माझे आवडते पुस्तक."

युराच्या वर्गातल्या मुलामुलींनीं ज्या पुस्तकांबद्दल आवड व्यक्त केली होती, त्यांची नावं पहाणं मनोरंजक ठरेल.

संग्रहातला पहिला निबंध तमारा शिरोकिख हिचा आहे. तिचं सर्वांत आवडतं पुस्तक म्हणजे ए. फदेयेवचं 'द यंग-गार्ड.' 'तरुण पहारेकरी.'

साशा तेप्लोवानं, सर्गेई शेशीवीनवर लिहिलेल्या एका पुस्तकाबद्दल मोठ्या उत्साहानं लिहिलं होतं. तो 'हीरो ऑफ द सोविएत युनियन' या किताबाचा मानकरी होता. त्याच्या शौर्याच्या गोष्टीबद्दल साशानं बरंच लिहिलं होतं. येव्गेनी

रायच्या 'एक मुलगी आपल्या वडिलांचा कसा शोध घेते' या पुस्तकानं तोन्या दुरासोवाला भुरळ घातली होती. विक्तर मुखिनला लागिनचं "लढाऊ जहाज अन्युता" सर्वोत्कृष्ट वाटलं होतं. त्या जहाजावरच्या खलाशांच्या धाडशी कृत्यांचा त्याच्यावर फार मोठा प्रभाव पडला होता. वाल्या पेत्रोव हा युराचा शाळेतला सर्वात जवळचा मित्र. त्यानं लिक्स्तानोवच्या "जहाजावरील मलांची धाडसी कृत्ये" याची निवड केली होती. अन्या कोनोप्ल्योवा हिला येलेना इलिनाचं "चवथं शिखर" पसंत पडलं होतं.

ज्या किशोर-किशोरींनी युद्धाची आणि नाझींनी सोविएत प्रदेश व्यापल्याची खडतर वर्षं काढली होती, त्या सर्वांनी 'आपली आवड' म्हणून निवडलेली सर्व पुस्तकं लढाईशी संबंधीत होती. लढाईच्या काळात गाजलेल्या वीरांनी आपल्या मातृभूमीविषयी अतुलनीय निःस्वार्थी निष्ठा दाखवून दिली होती. कदाचित् त्याचा मुलांच्या मनावर फार परिणाम झाला असावा. ते शूरवीर मुलांचे दैवत बनले. आपण त्यांच्या सारखं व्हावं ही ईर्षा त्यांच्या मनात निर्माण झाली.

युराचा निबंध त्या संग्रहातून काढून वस्तुसंग्रहालयात एका काचेच्या पेटीत ठेवण्यात आला आपल्या निबंधात युरानं आय व्सेवोलोझ्स्कीच्या "सागरावर" या पुस्तकातील नायकांसंबंधी लिहिलं होतं. काळ्या समुद्रावरील आरमारातील खलाशानी एका नाझी पाणबुडीला समाधी दिली, आपल्याला कैद करणाऱ्या फॅसिस्टांपासून सुटका करून घेतली आणि लढाईत असामान्य शौर्य गाजवलं. "नाईट डॉल्फिन" वरून सेवास्तोपोल शहरात पुन्हा परत पाऊल ठेवणारे ते पहिले लोक होते.

युराचा निबंध चांगला आहे, अकृत्रिम आहे. आजकाल पाचवीच्या मुलांकडून बऱ्याच गोष्टी अपेक्षित असतात. परंतु युरा गागारिन नावाच्या पाचवीतल्या मुलाला सर्वात महत्वाचं काय वाटलं होतं तर त्या पुस्तकातले नायक "कधीही निराश, हतबल झाले नाहीत, ते लढतच राहिले," परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असतानासुद्धा !

आमच्या घरात पुस्तकाना फार मान होता. बाबाना ऐतिहासिक ग्रंथांची व महान पीटरच्या जीवनाची फार आवड; आई हाताला येई ते वाचून काढी, कादंबरी, लघुकथा, कविता सारं काही. जरा कामातून उसंत मिळाली की ती पुस्तकं घेऊन बसे. दुर्दैवानं तिला आयुष्यात उसंत किंवा मोकळीक अशी फारशी लाभलीच नाही. सामुदायिक शेतावरच्या कामात आणि आता घरकामांत तिचा बहुतेक सारा वेळ जाई. "किती लहान असतात. दिवस." ती सुस्कारा टाकून म्हणे.



युरापुढं आईवडिलांचं उदाहरण होतं. शिवाय झोया होतीच वाचनालयातून
सारखी नवी नवी पुस्तकं आणायला. अगदी लहान वयापासून युराचं वाचन दांडगं
होतं. आमच्या साऱ्या कुटुंबात सर्वात जास्त पुस्तकांचं वेड त्यालाच होतं.
प्राथमिक शाळेत असतानाच युरा हाताला येई त्याचा 'फडशा' पाडी.
लहान मुलांची छोटी पुस्तकं, मोठ्या माणसांची जड पुस्तकं, जुन्या रशियन लोक-
कथांची पुस्तकं सारं काही तो सपासप वाचून संपवी. लहान असताना त्याला
लोककथा फार आवडत आमची आई फार सुरेख गोष्टी सांगायची.

रशियन भाषेवर प्रेम करायला आणि पुस्तकांचा मान ठेवायला युराला
त्याच्या शिक्षिकेनं शिकवलं. तिचं नाव ओल्गा स्तेपानोव्ना रायेव्स्काया. एकदा तिनं
त्याच्या वर्गाला महान रशियन कवी अलेक्झांदर पुष्किन याना द्वंद्वांत कसा मृत्यू
आला ती हकीगत सांगितली. ती ऐकून माझा भाऊ किती अस्वस्थ झाला होता ते
मला स्पष्ट आठवतंय.

१९४७ सालच्या शरदऋतूत आणि हिवाळ्यात पुष्किन आमच्या घरो आला
आणि तिथेच राहिला. त्याच्या पद्यकथानी सुरुवात केली "कोळी आणि सोनेरी
मासा" झार सुलतानच्या कथा" यासारख्या कथा होत्या त्या. हिवाळ्यातल्या
त्या प्रदीर्घ रात्री मला चांगल्या आठवतात. बाहेर हिमवादळाचं थैमान चालू असा-
यचं, पण आमच्या घरकूलाच्या आत उबदार आरामशीर असायचं; विटांचा चुला
धगधगलेला असायचा. सारं कुटुंब जमा झालं की युरा पुष्किनच्या कविता मोठ्यानं
वाचून दाखवायला सुरुवात करी.

ते दिवस होते खडतर "तणातणीचे"
साऱ्याची चणचण;
तुंबळ लढायातून उसळलेला धूर
त्यांच्यावर बुरखा घाली.
त्यातूनच नवजात रशियाला
आणि पीटरच्या बुद्धीला
लाभली, फार मोठी प्रगल्भता.

युरा मोठ्या आवाजात वाचन करी. त्याचा आवाज भावभरा असे. एकच
त्रुटी असायची, तो उगाचच घाईघाईनं वाचायचा. नीट ऐकू यावं म्हणून बाबा
कानाला हाताचा आडोसा लावीत. टायफस झाल्यापासून त्याना जरा कमी
ऐकायला येई, कवितेच्या लईनुसार ते मान हलवीत. युरा श्वास घ्यायला थांबला
की ते म्हणत "हे असं धाडधाड वाचून टाकू नकोस ! महान पीटरबद्दलची
कविता आहे ती माहीत आहे ना ?" परंतु कविता म्हणत असताना त्यानी युराला
कधीही अडवलं नाही.

आईच्या हातात भरतकाम असे. वाटावं, ती शिवते आहे. पण बारकाईनं पाहिलं की आमच्या लक्षात येई. भरतकामाचा कपडा मांडीवर पडलेला असे. लक्ष देऊन कविता ऐकता ऐकता ती भरतकाम पार विसरून गेलेली असे. युराला पुष्किनची कविता फार आवडायची.

पुष्किनच्या कवितेबद्दल युराला फार अपुलकी वाटायची, त्याच्या जीवनात त्याला फार मोठं स्वारस्य वाटायचं. मला वाटतं हा काही नुसता योगायोगाचा भाग नसावा. युरा ही एक जीवनाच्या चैतन्यानं सळसळणारी व्यक्ती होती. जीवनाचा उल्लास तिच्यात भिनला होता. पुष्किनच्या काव्याची नेमकी हीच वैशिष्टयं होती. त्यामुळेच त्या दोघात ही बांधीलकी निर्माण झाली असावी. पुष्किनचं काव्य त्याच्या अन्तःकरणाला स्पर्श करीत होतं.

आम्ही क्रिलोवच्या सुरस, चमत्कारिक कथा आणि मॅक्झिम गोर्कीच्या लघुकथाही त्या हिवाळ्यात अशाच मोठ्यानं वाचून काढल्या.

त्या शरदऋतूपासूनच या वाचनाला सुरूवात झाली होती. "युराची नकाशाची-पेटी" सदैव पुस्तकानी भरलेली असायची. लेर्मोन्तोव, टॉल्स्टॉय, नेक्रासोव आणि गैदर यासारख्या लेखकांची पुस्तकं असत तिथे. साहित्याची आवड युराच्या मनात त्याच वर्षी आकाराला येऊ लागली. ओल्गा स्तेपानोव्ना 'वाचकांच्या सभा' घेत असे. युरा त्याना नियमानं हजर असे, त्यात उत्साहानं भागही घेत असे. तिच्या सांगण्यावरून त्यानं एक डायरी ठेवायला सुरूवात केली वाचलेल्या पुस्तकाबद्दल आपलं काय मत झालं ते तो तिच्यात लिहून ठेवी. कितीतरी कविता त्याच्या अगदी तोंडपाठ असत.

एक दिवस युरा शाळेच्या बॅन्डमधली तुतारी घेऊन आला. तुतारी जुनी पुराणी होती. जागोजाग चेपली होती. जवळजवळ सारा मुलामा उडालेला होता.

माझा भाऊ शाळेतले कपडे, नीट इस्त्री मारलेली काळी लांब इजार आणि पांढरा शर्ट- बदलून घरातले कपडे घालीत होता. घरात तो जुनी पॅन्ट घालायचा. ती त्याला आता फारच लहान व्हायला लागली होती. वरती एक पट्टयापट्टयांचा शर्ट. तो कपडे बदलत होता तेवढ्यात मी तुतारीची पहाणी करून घेतली. तिच्या पितळी बाजूवर कोणीतरी कोरून लिहिलं होतं: "लेनीचं सिमावर प्रेम आहे: १९३७."

युरा कपडे बदलून आला आणि म्हणाला, "वाल्या, मी तुतारी वाजवायला शिकणार आहे."

मी अस्वस्थ होऊन पाळण्याकडे नजर टाकली तमारा गाढ झोपी गेली होती. तमारा म्हणजे झोयाची मुलगी.



"काळजी करू नकोस. मुळीच मोठा आवाज करणार नाही मी." त्यानं तुतारी उचलली, खोलवरून श्वास भरून घेतला आणि.........तुतारी फुंकल्यावर जो काय आवाज बाहेर पडला त्याचं वर्णन करणं अवघड आहे !

मी कानावर हात ठेवले. तमारा दचकून उठली आणि रडायला लागली. बागेतून बाबा लंगडत लंगडत आत आले, उंबरठ्यावरच थबकले आणि रोखून पाहू लागले. युराचे गाल फुगलेले होते; फुंकण्याच्या श्रमानं चेहेरा लालबुंद झाला होता; जेवढ्या जोरानं फुंकता येईल तेवढ्या जोरानं फुंकत होता; जणू काही त्याला काही ऐकूच येत नव्हतं; !

"वा ! खराखुरा कलावंतच वाजवतोय !" बाबा उदास चेहेऱ्याने म्हणाले.

युरानं फुंकणं थांबवलं, श्वास घेतला आणि अगदी निर्व्याज, भाबड्या नजरेनं बाबांकडे पाहिलं, "ठीक वाजवलं ना ? कसं काय वाटलं ?"

"यापेक्षा चांगलं वाजवताच येणार नाही तमारा रडतेय, ऐकलंस ना ? याचा अर्थ असा की तिला तुझं वाजवणं फार आवडलंय् तू वाजवायचा थांबलास म्हणून तिला रडू फुटलंय्."

बाबानी माझ्याकडे पाहून डोळे मिचकावले, "मला ऐकू येत नाही नीटसं तेच बरं आहे; बागेत गेलं की तिथून कानाला जास्त बरं लागेल," ते बाहेर पडले.

"रडायचं कशाला ? पुन्हा वाजवतो मी," म्हणत युरानं पुन्हा तुतारीला हात घातला; उचलून तोंडाला लावली.

हो तुतारी म्हणजे घरातल्या शांततेचा शेवट हे माझ्या ध्यानात आलं, म्हणून मी त्याला म्हणालो, "जे तुला कधी जमणारं नाही त्याच्यासाठी उगीच कशाला धडपडतोस ? सूर म्हणजे काय ते आजपर्यंत तुला कधी समजलंय् का ?" त्यानं तुतारीचा नाद सोडून द्यावा म्हणून मी आणखी भर घातली, "शिवाय सारेजण तुला हसतील."

"मला कधीच जमायचं नाही म्हणतोस ? तुला वाटतं, हे माझं काम नाही. पण शाळेच्या बॅंडमध्ये जर तुतारी वाजवायला कोणीच नाही तर मग काय करायचं ? कोणी तरी तुतारी वाजवायला हवंच ना ?"

"पण तुला कशाला वाजवायला हवी ?"

त्यानं तुतारी बाकावर ठेवली आणि तो पाळण्याला झोके देऊ लागला. थोड्या वेळानं तमारा शांत झाली. "ठीक आहे वाल्या, तू जरा थांब आणि पहाच, मला वाजवता येतं की नाही ते दाखवतोच तुला."

युराला गाण्याचा कान आहे हे मला माहीत होतं पण मी उगीचच आशा करीत होतो की तो तुतारीचा नाद सोडून देईल म्हणून. पण त्यानं तुतारी उचलली

अन तो मागल्या पडवीत गेला. जरा वेळानं त्या दिशेनं तुतारीचे जोरदार आवाज कानावर येऊ लागले.

त्यानंतर काही महिने असेच गेले. आम्ही सर्वांनी दमून भागून घरी यावं आणि जरा शांत, आरामशीर बसण्याची आशा धरावी, तोच युरानं आमच्या आशेची निराशा करावी, तुतारी फुंकून फुंकून सर्वांना हैराण करावं; अगदी डोकं फिरून जायची पाळी यायची. साऱ्या संध्याकाळची विल्हेवाट लागायची.

"आलें बरं का आपले कलावंत; मला वाटतं मी बाहेर पडावं हे बरं" बाबा म्हणाले. त्यांची अस्वस्थ चुळबुळ सुरू झाली. पण आता त्यांच्या आवाजात टिंगल नव्हती. सहृदयता होती. मुलाची चिकाटी पाहून ते खूष झाले होते हे उघडंच होतं.

आणि मग एके दिवशी त्या तुतारीतून एक लांबलचक, स्वच्छ, उदास करून सोडणारी सुरावट कानावर आली.

"अरे चोरा ! बरंच जमवलस की तू ! का, कसा काय वाजतोय तो ?" बाबांनी विचारलं. त्यांच्या बोलण्यात इतका आनंद, इतका अभिमान होता की कोणाला वाटावं, यांचा मुलगा नाही, हेच स्वतः तुतारी वाजवायला शिकले असावेत.

शाळेला नोव्हेंबरची सुट्टी लागण्याअगोदरची गोष्ट. युरानं टेबलावर बरीचशी पांढरी तिकिटं ठेवली अन् म्हणाला, "पहा, प्रत्येकाचं तिकीट आणलंय. नक्की यायला हवं सर्वांनी."

मी एक तिकीट उचललं. शाळेतल्या जांभळ्या शाईत मोठमोठ्या बालिश अक्षरात लिहिलं होतं, "प्रिय कॉम्रेड, शाळेतल्या हौशी कलावंतांचा गट तुम्हाला खास निमंत्रण देत आहे". मग तारीख वेळ वगैरे तपशील होता. खाली सही होती. "यंग पायोनियर मंडळ."

"तू पण भाग घेणार आहेस का ?" बाबांनी विचारले.

"होय तर.'

"ठीक आहे. मातोश्री, तुमचा ठेवणीतला पोशाख काढा. आपल्या छपराखाली कोणता कलावंत मोठा होतोय, कसा तयार होतोय ते पहायला जायचं आहे आपल्याला, कोणी सांगावं मोठेपणी तो चांगलं नांवसुद्धा कमावील."

शाळेच्या कार्यक्रमाला जायला बाबांची तयारी चालली होती ती पहाण्यासारखी होती. त्यांनी अगदी काळजीपूर्वक घोटून घोटून दाढी केली; रविवारी वापरायचे, सर्वात चांगले कपडे घातले; केस विंचरून विंचरून नीट मागे वळविले.



त्याना वाटत होतं आपल्याकडे कोणी पहात नाही. सारा वेळ ते आईच्या मागे लागले होते, तिला घाई करीत होते, उगीच चेंगटपणा करतेय् म्हणून कुरकुरत होते. आपण उशीरा गेलो तर प्रेक्षकात कुठे बसलो आहोत, युराला दिसायचं नाही; मग तो अस्वस्थ होईल, बेचैन होईल. त्याला जर कार्यक्रमात भाग घ्यायचा तर त्याचं मन शांत रहायला हवं, असं त्याना म्हणायचं होतं.

सभागृहात प्रेक्षक जमले होते. पोळ्यातल्या मधमाश्या गुणगुणाव्यात तसा आवाज येत होता. पांढरे ब्लाऊझ नाहीतर पांढरे शर्ट, आणि लाल टाय घातलेली मुलेमुली आपले आईवडील दिसले की आनंदानं ओरडत होती; त्याना त्यांच्या जागेवर नेऊन बसवीत होती. आरामशीर बसलेत की नाही, स्टेजवर काय चाललंय त्याना नीट दिसेल की नाही, याची खात्री करून घेत होती. आमच्या जागा पुढच्याच ओळीत होत्या.

शेवटी सभागृहातली गडबड थांबली. कार्यक्रमाचे नेतृत्व करणारा मुलगा स्टेजवर आला. त्यानं सांगितलं; कार्यक्रमाची सुरुवात होत आहे. "५ वी अ" मधला युरा गागारिन काही कविता म्हणून दाखविणार आहे.

"ऐकलत ना ?" बाबांनी आईला कोपरानं डिवचत म्हटलं. मी हळूच बाबांच्याकडे नजर टाकली. त्याचे गाल लाल झाले होते. ते टाळ्यांदेखील वाजवीत होते. त्याना आपल्या मुलाचा केवढा अभिमान वाटत होता !

युरानं कविता चांगली म्हटली. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या तेव्हा तो अभिवादन करायला पुन्हा स्टेजवर आला. इतक्या लोकांचं लक्ष आपल्यावर खिळलंय् या विचारानं तो सुखावल्याचं स्पष्ट दिसत होतं.

कार्यक्रम खूप मोठा होता. सारी मुलं आपलं कौशल्य पणाला लावून कार्यक्रम सादर करीत होती. कार्यक्रमाचा नेताही प्रयत्नात कसूर करीत नव्हता. कार्यक्रम सादर करणारा मुलांचा गट किती का मोठा असेना, तो प्रत्येक कलावंताचं नाव जाहीर करायचा. प्रत्येकाला उत्तेजन द्यावं हाच त्याचा हेतु होता.

आणि मग तिथूनच सारी सुरुवात झाली.

नेत्यानं एक लोकनृत्य होईल म्हणून जाहीर केलं. साऱ्या मुलांची नावं त्यानं वाचली. मग आम्ही त्याला सांगताना ऐकलं, "...युरा गगारिन, ५ वी अ."

थोड्या वेळानं त्यानं जाहीर केलं : "आता शाळेचा वाद्यवृन्द." मग त्यानं वादकांची यादी वाचली: "......आणि तुतारी, युरा गागारिन, ५ वी अ." आमच्या युराचं पुन्हा नाव आलं होतं.

बाबा बसल्या जागी चुळबूळ करू लागले. ते अस्वस्थ झाले होते. त्यांच्या गालावरची लाली ओसरून गेली होती. त्याऐवजी चेहेऱ्यावर तांबडे ठिपके दिसू लागले होते. आपल्या मुलाबद्दल वाटलेला अभिमान केव्हाच गळून गेला होता.

"शाळेचा गायकवृन्द......" कार्यक्रमाच्या नेत्यानं जाहीर केलं. यावेळी यादी फारशी मोठी नव्हती. युराचं नाव यायला वेळ लागला नाही.

त्यानंतर नेत्यानं गंभीरपणानं पुन्हा जाहीर केलं : आता '५ वी अ' मधला युरा गागारिन "तरुण पहारेकरी" यामधील एक उतारा म्हणून दाखवील; उताऱ्याचं नाव आहे "माझ्या आईचे हात." बाबा उठले, खाली वाकून लंगडत चालायला लागले. त्यावेळी त्यांचं लंगडणं अधिकच स्पष्ट उठून दिसत होतं.

त्याच क्षणी युरा स्टेजवर आला.

"बाबा, तुम्ही उठून जायला नको होतं," मी मनातल्या मनात म्हणालो, "आता उतारा म्हणताना त्याचा घोटाळा होईल."

बाबा निघून जाताना युरा हताशपणानं पहात राहिला. मग स्टेजवर तो एक पाऊल पुढे आला आणि त्यानं उतारा म्हणायला सुरुवात केली. त्याचा आवाज भावनावेगानं कापत होता. पण मग थोड्या वेळानं त्याचा आवाज काबूत आला. प्रेक्षकात कितीतरी मुलांच्या आया आलेल्या होत्या. उतारा म्हणून संपताच टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. बाबा जर थांबले असते तर त्यांनी आपल्या मुलाला कदाचित क्षमा केली असती.

मध्यंतर झाले. आई आणि मी बाहेर व्हरांड्यात आलो. बाबा एका खिडकीच्या चौकटीला रेलून उभे होते. खिन्नपणानं हातातल्या सिगारेटशी चाळा करीत होते. त्याना सिगरेट ओढायची जबरदस्त इच्छा झाली होती. पण शाळेत सिगारेट ओढणं त्याना बरं वाटलं नाही.

युरा पळत पळत बाहेर आला. त्याच्या टायची टोकं वाऱ्यावर फडफडत होती. "काय? आवडला का तुम्हाला कार्यक्रम?"

एक क्षणभर आमच्यापैकी कोणीच काही बोललं नाही.

"फार छान झाला बरं का तुझा कार्यक्रम. साऱ्याना किती किती आवडला ते तू पहायला हवं होतंस," आई म्हणाली.

बाबानी चुरगाळलेली सिगारेट कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिली; हॅटवर एक टप्पल ठेवून दिली अन् म्हणाले. "सारं मोठं लाजिरवाणं होतं; खरं म्हणजे आपण घरीच राहायला हवं होतं. हे सारं असं पहाण्यापेक्षा!"

युराला आश्चर्य वाटलं. "का? इतकं काय वाईट झालं? लोकानी किती टाळ्या वाजवल्या ऐकलं नाही का तुम्ही? त्यानी तर मला 'वन्स मोअर' दिला होता!"

"तेच सांगतोय मी! त्यानी तुला परत बोलावलं स्टेजवर! हा सारा काय प्रकार आहे? तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणाला काही अक्कलच नाही की काय? सारा वेळ आपलं 'गागारिन' 'गागारिन'! तुला प्रत्येक ठिकाणी लुडबुडायला



हवं, प्रत्येक ठिकाणी नाक खुपसायला हवं, खरं की नाही मी काय म्हणतोय ते? सारा वेळ लोकांवर तुझी एकट्याची अशी जबरदस्ती का म्हणून? दुसरा एखादा असता तर लाजेनं मेल्यासारखा झाला असता!"

युरा गोंधळल्यासारखा झाला. हळू हळू चालत तो तिथून निघून गेला.

"तुम्ही त्याला इतकं छेडायला नको होतं. सारा, सारा विरस केलात त्याचा," आई बाबाना रागावली.

"मी कशाला, त्याचं त्यानंच सोंग करून घेतलंय् अन् सारं बिघडवून टाकलय्. स्वस्त प्रसिद्धीच्या मागं लागलाय् तो, काडीचा अर्थ नाही तिच्यात," मध्यंतरानंतरचा कार्यक्रम पहायला बाबा थांबले नाहीत.

खरं सांगायचं तर बाबा म्हणाले त्यात तथ्य होतं. सुदैवानं युरानं त्या प्रसंगापासून धडा घेतला. हौशी कलावंतांच्या गटातून तो बाहेर पडला नाही खरा पण त्यानंतर स्टेजवर झालेल्या कार्यक्रमात युरा जास्त विचारपूर्वक, विनम्रपणानं भाग घेऊ लागला.

युराचा अभ्यास संपला, त्यानं सारी पुस्तकं नकाशाच्या पेटीत व्यवस्थित भरली, आईनं विणलेला जुना स्वेटर चढवला आणि चुल्याच्या मागे कोरडे व्हायला ठेवलेले बूट घेण्यासाठी हात घातला. बूट नाहीसे झाले होते. "कुठे गेले असतील?" युराच्या आवाजात काळजी होती, "मी तर इथंच ठेवले होते सुकायला."

आईनं आणि मी बिछान्याखाली पाहिलं, टेबलाखाली शोधलं, आई बाहेर जाऊन पडवीतही पाहून आली. बुटांचा पत्ता नव्हता; कुठेतरी अदृश्य झाले होते.

"आज सहावीच्या वर्गाशी हॉकी खेळायचीय् आम्हाला!!"

"एखाद्या दिवशी खेळ चुकला म्हणून लागलीच आभाळ काही कोसळत नाही." आई सांगायला लागली.

"असं तुला वाटतंय. सारी टीम तिथं येईल अन् कॅप्टनचाच पत्ता नसणार. त्याना नक्कीच वाटणार, मी दांडी मारली म्हणून"

नेमक्या त्या आणीबाणीच्या क्षणी बरीस कुठूनसा धावत धावत आला. युरा त्याच्या दिशेनं धावला पण बरीसच्या पायात त्याचे स्वतःचेच जोडे होते.

"तुझे बूट कुठे आहेत, माहीत आहे मला; पण मी सांगणार नाही." बरीस म्हणाला आणि काहीतरी रहस्य असावं असा गूढ हसला.

"याद राख! पस्तावशील मागून!"

"ठीक आहे. बाबांनी लपवून ठेवले आहेत तुझे बूट. कुठं ते मला माहीत नाही. ते म्हणतात, साऱ्या बुटांचा तू सत्यानाश करतोस विशेषतः तुझ्या स्केटिंगनं

तर त्यांची अगदी केविलवाणी दशा होते. बाबा म्हणतात युराचे बूट लोखंडाचेच बनवायला हवेत."

सार्‍या घरभर युरा बूट धुंडाळत, अस्वस्थ होऊन फिरत होता. "५ वी अ" चा हॉकीचा कॅप्टन लवकरच कायमचा बदनाम होऊन जाणार होता.

"वाल्या !" युराची रडवी हाक ऐकू आली, तिचा अर्थ ताबडतोब माझ्या ध्यानात आला.

मी खेदानं माझ्या नव्या बुटाकडं पाहिलं. दोनच दिवसापूर्वी भरपूर किंमत मोजून मी ते विकत आणले होते. बुटाच्या पांढऱ्या शुभ्र फेल्टवर दोन दोऱ्या उभ्या आडव्या करकचून बांधल्याचं दृश्य माझ्या डोळ्यासमोर नाचू लागलं. मी त्याला गोडीगोडीत पण खंबीरपणानं नकार दिला, " माझे बूट तुला मोठे होतील युरा पायातून गळून पडतील."

" वाल्या, तू मला मदत करायला हवीस. बदल्यात मी तुला माझा नवा चाकू देतो, मग तर झालं ?"

चाकू देणं म्हणजे फार मोठा त्याग होता, युराच्या दृष्टीनं. त्या नव्या चाकूला चार पाच पाती होती. साऱ्या वर्गाला त्यासाठी युराचा हेवा वाटत होता. चाकू घेणं मला कधीच शक्य झालं नसतं; युरानं दिला तरी मला कसा स्वीकारता येणार होता ? शेवटी मी आढेवेढे घेत अनिच्छेनंच म्हणालो, " फक्त या वेळी एकदाच देईन मी तुला माझे बूट."

" पाहिलंस ? फार काही मोठे होत नाहीत मला, अगदी छानच बसलेत."

दोन तासांनी युरा परतला, पावसाळ्यातल्या ढगासारखा काळवंडून. तो मुकाट्यानं जेवायला बसला. त्याच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडला नाही.

" खेळात हरलास ?"

" माझीच चूक झाली. आणि हे सारं यांच्यामुळे झालं " माझ्या बुटाकडे बोटं दाखवीत तो म्हणाला. बूट चुल्याच्या मागे लावले होते. बुटांचा वरचा भाग वेडावाकडा चुरगाळला होता. करकचून बांधलेल्या दोरीमुळे बुटाची जीभ फाटली होती.

" त्यांच्यामुळे झालं खरं, पण त्याबद्दल त्यांना शिक्षाही मिळाली खरं की नाही ?"

" सरळ पायातून गळून पडले. तेवढ्यात चेंडूला 'स्टिक'चा जो फटका बसला की बस, फटकन् गोलच !" त्यानं मान थाळीवर वाकवली. आता बोलण्यासारखं काही उरलं नव्हतं हे उघडच होतं !

बाबा कामावरून घरी परतले तेव्हा युरा टेबलापाशी बसून पुस्तक वाचत होता. त्यानं मान वर उचलली आणि उसन्या निष्काळजीपणानं म्हणाला, " मी विचार करतोय, उद्या शाळेत काय घालून जाऊ ? कदाचित अनवाणी गेलो तर"



पण बाबा असे सहजासहजी जाळ्यात सापडणारे नव्हते. " खुशाल जा अनवाणी. मला काही त्याची पर्वा. दर हिवाळ्यात तुला बुटाचे दोन जोड आणून द्यायला तुझा बाप काही कोणी लक्षाधीश लागून गेला नाही." चुल्याच्या मागून त्यांनी युराचे फाटकेतुटके बूट बाहेर काढले. ( तिथं शोधायला आम्हाला कोणाला कसं सुचलं नाही ? ) " हे घालू शकतोस तू. तुझे सोन्यासारखे बूट. आज त्यांना ठिगळ मारायचा माझा विचार होता. पण वेळ मिळाला नाही मला. आणि तुझे ते स्केट मी बाहेर फेकून देणार आहे. मी काय बोलतोय ते लक्षात ठेव नीट."

डोळ्यावर पडलेल्या उजेडानं मी अस्वस्थ झालो आणि बिछान्यातल्या बिछान्यात वळलो मी भिंतीवरच्या घड्याळांत पाहिलं, एक वाजून गेला होता. सारेजण झोपले होते. कोणीतरी स्वयंपाकघरातला दिवा बंद करायचं विसरून गेलं होतं मी उठलो अन् स्वयंपाकघरात गेलो.

युराच्या अंगावर अर्धी चड्डी अन बनियन होता. एका उंच स्टुलावर तो वाकला होता. कामाच्या वेळी बाबा घालीत त्या 'एप्रनवर' त्यानं आपला बूट ठेवला होता. बूट त्याच्या मांडीवर होता. एका हातात सुई अन् एका हातात मेणवलेला वाखाचा दोरा घेऊन तो बूट शिवत होता. दुसऱ्या एका जुन्या चामड्याच्या बुटातून कापून काढलेले तुकडे शेजारी दुसऱ्या एका स्टुलावर पडले होते.

" तू झोपत का नाहीस ?"

" मला माझे बूट शिवायलाच हवेत. उद्या आमची पुन्हा मॅच आहे सहावीशी. त्यांची परतफेड झाली पाहिजे ना ? कसं काय जमलय माझं काम ?"

एका बुटाला ठिगळ लावून त्यानं तो दुरुस्त करून ठेवला होता. मी तो उचलून घेतला अन् त्याची पहाणी केली.

" काही वाईट नाही. अगदी चांभारानं दुरुस्त केल्यासारखा दिसतो."

" तुझ्या बुटाला देऊ का ठिगळ मारून ?"

दुसऱ्या दिवशी बाबांनी युराच्या कारागिरीला 'अगदी ए वन् !' म्हणून सर्टिफिकेट दिले, ते खूष झाले होते. येणारं हसू दाबीत म्हणाले, " ठीक आहे. जर हे असं असेल तर हरकत नाही. तू स्केटिंगला जाऊ शकतोस."

युराची कल्पनाशक्ती अत्यंत तल्लख होती, केवळ खेळातच नव्हे तर कामातही. त्याच्या अंगात उत्साह उतू जात असे; सारा वेळ तो कशा ना कशात तरी गढलेला असे. थकला भागला, निरुत्साही युरा मी कधी पाहिला नाही. त्याला

कोणतंही काम करायला सांगा, वेळ नाही असं तो कधीच म्हणायचा नाही. त्याच्या या उत्साहाची त्याच्या मित्रानाही लागण व्हायची.

एक दिवस शेजारच्या एका सामुदायिक शेताच्या अध्यक्षांनी युराच्या वर्गातल्या मुलाना बोलावून घेतलं जवळजवळ पंधरा मुलंमुली त्याप्रमाणे त्या शेतावर गेली.

अध्यक्ष मुलाना म्हणाले: " अवर्षण आणि गेल्या दोन वर्षाचं जेमतेम पीक यानी आमचे सारे श्रम, सारे प्रयत्न पाण्यात घालवले आहेत. माझी खात्री आहे तुम्हालाही त्याचा चिमटा बसला असणार. सध्या आमच्यापुढे असलेलं महत्वाचं काम म्हणजे शेतावर खत पसरायचं. तेवढ्यासाठीच आम्ही तुम्हाला मदतीला बोलावलंय्. राख आणि कोंबड्यांच्या खुराड्यात पडलेला कचरा गोळा करायला तुम्ही आम्हाला मदत करायची."

" जरूर ! जरूर !" मुलानी उत्साहानं मान्य केलं.

" छान ! माझी फार भिस्त आहे तुमच्यावर. तुमच्या श्रमाची परतफेड म्हणून सामुदायिक शेताकडून तुमच्या शाळेच्या बँडसाठी 'अॅकॉर्डियन' देण्यात येईल," अध्यक्ष उठून उभे राहिले. त्यानी प्रत्येकाबरोबर हस्तांदोलन केलं. मुलं जायला निघाली तेव्हा ते खिडकीतून त्याना पहायला उभे राहिले.

" यातून काही खरंच काम होईल असं वाटतं का तुम्हाला ? थोडे दिवस जातील अन् त्यांचा उत्साह ओसरेल," हिशेबनीस म्हणाला. तो चांगला प्रौढ होता. त्यानं अंगात लष्करी शर्ट घातला होता; त्याचा रंग उडून तो विटल्यासारखा दिसत होता. शर्टाच्या बाहीवर दोन पट्ट्या होत्या. खालीन पुढे मागे येरझारा घालताना त्याच्या कृत्रिम पायाचा चिरचिरल्यासारखा आवाज येत होता.

" मला वाटतं ते चांगलं काम करून दाखवतील म्हणून ! चांगली उत्साही मुलं आहेत ती."

दरम्यान ती 'चांगली उत्साही मुलं' सामुदायिक शेताला दिलेल्या भेटीवर उत्साहानं चर्चा करीत होती.

" अध्यक्ष काय म्हणाले होते आठवतंय ना ? ते म्हणाले होते, जवळजवळ लष्करी महत्त्वाचंच काम आहे हे." झेन्या वासिल्येव म्हणाला. बोलता बोलता त्याच्या डोळ्यात चमक भरली.

" त्या हिशेबनिसाच्या बाहीवरच्या पट्ट्या पाहिल्या का ?"

युरा एकदम थांबला अन् म्हणाला, " सर्वजण थांबा जरा ! आपण आपल्या या कामगिरीला काय नाव देणार आहोत ?"

" मूर्खांचं सोनं."

" बोलला तो मूर्ख ! मी सांगतो, 'क कामगिरीवर'!"



" झात्स्कमध्ये टारझन !"

" टारझनचा काय संबंध याच्याशी ?"

" कानाला बरं लागतं. शिवाय कोणाला काही कळायचं नाही, आपण कोणत्या कामगिरीवर निघालोत ते."

" मी सांगतो" वाल्या पेत्रोवनं हातानंच हवेत पट्टा फिरविला. " आपण नाव ठेवायचं 'अॅकॉर्डियन'च्या कामगिरीवर ! " कसं वाटतं तुला युरा ?"

" छान आहे ! ज्याचा या कामाशी संबंध नाही त्याला त्यापासून काही कळायचं नाही, या नावावर मत घेऊ या आपण."

" माझं मत या नावाच्या बाजूला."

" माझं पण."

" माझं अनुमोदन नाव पास."

कामाची सुरुवात म्हणून त्यानं एक ढकलगाडी करायची ठरवलं, झेन्या वसिल्येवनं एक भलंमोठं चाक ढकलत आणलं, त्याचे आरे चांगले जड अन् भक्कम होते. वाल्या पेत्रोवनं दोन दांडे ओढत आणले. तेही इतके जड होते की, वाल्या कितीतरी वेळ धापा टाकीत होता

" जरा मदतीला चला माझ्या," युरा म्हणाला त्या तिघांनी मिळून आमच्या शेडमधून एक भला मोठा लांबलचक पेटारा आणि पुष्कळशा फळ्या बाहेर आणल्या.

" ठीक आहे ?"

" अगदी उत्तम !"

ठाक्‌ठाक् हातोड्याचे घाव बसायला लागले. फळ्या कापताना करवतीचा करकर आवाज होऊ लागला. दुपारपर्यंत सक्त परिश्रम केल्यावर एका चाकाची ढकलगाडी तयार झाली. बाबा बराच वेळ त्यांचं काम पहात होते. शेवटी अंगातलं जाकीट काढून टाकून तेही त्यांच्यात सामील झाले होते.

" मी येतो तुमच्या मदतीला " ते म्हणाले, " एका चाकाचा आधार पुरायचा नाही. त्याला दोन पाय द्यायला हवेत, म्हणजे गाडी नीट उभी करता येईल."

संध्याकाळपर्यंत सारे काम पूर्ण झाले. मुलं मोठ्या ऐटीनं त्या ढकलगाडीच्या भोवती भोवती फिरून पहात होती. गाडी झाली होती जरा जड अन् ओबडधोबड, पण त्यांना तिचा कोण अभिमान वाटत होता. काही झालं तरी त्यानी स्वतः बनवलेली गाडी होती ती.

" झारच्या गाडीसारखी दिसते, बगीसारखी."

" बग्गीसारखी नाही दिसत. चिलखती गाडीसारखी दिसते."

" मला वाटतय, काहीतरी राहून गेलंय" काहीतरी गुप्त गोष्ट बोलावी तसं

युरा म्हणाला. तो मागच्या पडवीत गेला. येताना फिक्या निळसर रंगाचा डबा घेऊन आला " एका बाजूवर आपण गाडीचं नाव लिहू या."

दुसऱ्या दिवशीची सकाळ! लेनिनग्रादस्की रस्त्यावरून तीन मुलं एक छानदार ढकलगाडी ढकलत निघाली होती. त्यांच्या कोटाची बटणं मोकळी होती. टोप्या डोक्यावरून मागे पाठीवर सरकलेल्या होत्या. गाडीच्या दोन्ही बाजूवर ठसठशीत अक्षरात रंगवलं होतं तिचं नाव–' ॲकॉर्डियन. '

जाणारा येणारा थबकून गाडीकडे पाहू लागे.

" ॲकॉर्डियनच का? व्हायोलिन का नाही?" एकानं विचारलं.

" ते लष्करी गुपित आहे. "

रस्त्यावरच्या पहिल्या घराशी मुलं थांबली, " इथून सुरूवात करू या "

त्यानी दारावर टक्टक् केलं. एका बाईनं दार उघडलं मुलांनी सांगितलं, ' सामुदायिक शेतासाठी खत गोळा करायला निघालो आहोत. तुमच्यापाशी जर जास्तीतली राख आणि कोंबड्यांच्या खुराड्यातला कचरा असेल तर आम्ही घेऊन जातो."

" या इकडे गोठ्याच्या बाजूनं, इकडून या मुलानो," ती बाई आपुलकीनं बोलत होती. वाल्या शीळ घालू लागला, त्यानं हातमोजे काढले. ते सारेजण गोठ्यात उभे होते. तिथंच एका बाजूला कोंबड्या ठेवलेल्या होत्या." व्हयू ऽ ऽ! इथं एका आठवड्याला पुरसे काम आहे."

" मग तर छानच झालं. जेवढं अधिक तेवढं चांगलं."

" मला दुसरं तिसरं काही म्हणायचं नव्हतं, युरा. "

त्याच वेळी रस्त्यावरून इतरही काही चमत्कारीक गाड्या खडखड करीत हिंडू लागल्या होत्या. ' ५ वी अ ' ची मुलं प्रत्येक दार ठोठावीत होती.

होता होता गावातल्या बायका नित्यनियमानं, संध्याकाळच्या वेळी फाटकात नाहीतर पडवीत, राखेनं भरलेल्या बादल्या आणून ठेवू लागल्या; मुलानी त्या वेळेवर रिकाम्या केल्या नाहीत तर नाराज होऊ लागल्या.

" ॲकॉर्डियनची कामगिरी " हिवाळाभर, पेरणीची वेळ येईपर्यंत चालली होती

नंतर शरदऋतू आला. " ५ वी अ ' ची मुलं पास होऊन सहावीत गेली होती. मग एके दिवशी सामुदायिक शेताचं एक प्रतिनिधीमंडळ शाळेला भेट द्यायला आलं. ठरलेल्या मुलानी ब्युगूल वाजवून सभा बोलावली. प्रत्येकजण आपापल्या जागेवर बसला तेव्हा सामुदायिक शेताचे अध्यक्ष बोलायला उठले.



" प्रिय मुलानो आणि मुलींनो," ते बोलू लागले; " या वर्षी पीक फार छान आलंय्. अगदी सोळा आणे. आपल्या शेतात पिकलेल्या प्रत्येक कणसात तुमचेही श्रम साकारले आहेत. तुम्हाला सर्वांना आठवतय, तुमच्या कामाबद्दल आम्ही तुम्हाला एक ॲकॉर्डियन द्यायचं कबूल केलं होतं पण......पण त्याच असं झाल की .." अध्यक्ष श्वास घ्यायला थांबले. मुलं शंकेनं बसल्या जागी गोठून गेली.

काही वेडंवाकडं तर उपटलं नाही मध्येच? शेवटी ते आपल्याला ॲकॉर्डियन देणार की नाही? आपलं वचन त्यानी असं पाळलं होतं का?

" ..पण त्याचं असं झालं की, अंदाजाचे पहिले आकडे हाती आले. ते पाहिल्यावर बोर्डानं निर्णय घेतला, तुमचा बोनस वाढवून द्यायचा म्हणून. तुम्ही साऱ्यानी मोठं छान काम केलं. आम्ही तुम्हाला कबूल केलेलं ॲकॉर्डियन, एक गिटार आणि एक बलालैका आणलंय. ही सारी वाद्य वाजवताना तुम्हाला मोठा आनंद मिळेल अशी आम्हाला आशा आहे. "

सारेजण उत्साहानं, आनंदानं टवटवले होते. शाळेच्या बँडनं पाहुण्यासाठी एक ट्यू फार सुरेख वाजवलं. हिशेबनिसानं. ' यंग पायोनियर ' नेत्याच्या हातात एक वही दिली अन् म्हणाला, " कृपा करून इथे एक सही कर तुमचं काम फार फार छान झालं "

युरानं माझं सारं आयुष्यच कसं बदलून टाकलं याचा विचार करायला लागलं की मला हसूच येतं. मी ब्रह्मचारी होतो आणि एकदम संसारी गृहस्थ बनलो.

तो सारा इतिहास असा घडला.

मला कोणाकडेतरी भेटायला जायचं होतं. मी अगदी काळजीपूर्वक दाढी केली आणि आरशासमोर उभे राहून केस विंचरले. मग मी टायची गाठ शंभरदा बांधली आणि हजारदा सोडली.

युरा टेबलापाशी पुस्तक वाचत बसला होता. तो चोरट्या नजरेनं माझं निरीक्षण करतोय् ते माझ्या लक्षात आलं. शेवटी त्यानं विचारलंच, " इतका नट्टापट्टा करून कुठं निघाला आहेस वाल्या?"

" मी मागणी घालायला चाललोय."

त्यानं पुस्तक खाली ठेवलं आणि तो उठून उभा राहिला. त्याचे डोळे दशी-एवढे विस्फारले गेले होते. जोरानं श्वास घेत तो म्हणाला, " खोटं बोलतोस् तू."

" कशासाठी खोटं बोलू?"

" मग मला बरोबर घेऊन जा. तुला पस्तावा होणार नाही."

"उगीच मजा करीत होतो तुझी. मी सहज एका मुलीला भेटायला चाललोय."

मला स्पष्ट दिसलं, युरा गोंधळला होता; माझ्यावर विश्वास ठेवावा की ठेवू नये? त्याची घोर निराशा झाली होती. "हट्......मला वाटलं होतं, मीही येईन तुझ्याबरोबर तिचा अनुनय करायला."

"ठीक आहे, चला तर."

खरं सांगायचं तर युरा बरोबर आल्यानं मला आनंद झाला होता. शेजारच्याच तर खेडेगावात जायचं होतं, फार काही दूर नव्हतं. पण या कुबड्या घेऊन जायचं म्हणजे...... शिवाय ज्या मुलीला मी भेटायला जाणार होतो, तिला मी जेमतेम ओळखत होतो. ती मला घरात घेईलच याचीही मला खात्री नव्हती. तेव्हा कोणी बरोबर असलेलं बरं!

युरा आपले सगळ्यात चांगले कपडे घालायला धावला. सगळ्यात चांगले कपडे म्हणजे काळी पॅन्ट, पांढरा शर्ट अन् लाल टाय–यंग पायोनियरचा लाल टाय.

"छान मुलगी आहे का ती वाल्या?"

"फार छान."

"चल जाऊ या."

मे महिन्यातला पहिला रविवार होता तो. शांत सूर्यप्रकाशानं उजळलेला असा दिवस.

गोर्लोवो खेड्यात जाऊन पोहोचेपर्यंत युरानं माझ्यावर प्रश्नांचा अखंड भडिमार चालवला होता. सारखं त्या मुलीबद्दल विचारीत होता. "कशी काय दिसते ती वाल्या? नाव काय तिचं?"

"वीस वर्षांची आहे. फार गंभीर आहे. तिचं नाव, माशा इवानोवा. कसं काय!"

"व्वा! असं नाव कोणी कधी विसरत नसतं."

खरं तर मी माशाला धड ओळखतही नव्हतो. तिला मागणी घालण्याचा विचार तर निश्चितच नव्हता माझ्या मनात. मी चेष्टा करत होतो, तिला भेटायला निघालो होतो तो एकाच उद्देशानं; आमची मैत्री नुकतीच आकाराला येत होती, ती आणखी दृढ करावी याच उद्देशानं! माझ्या मित्रांच्या बरोबर मी एका पार्टीला गेलो होतो तिथं मी तिला बघितलं होतं. अगदी गोड मुलगी होती, पण भारी लाजरी. माझ्या मित्रांनी मला मागाहून सांगितलं, तिला आईवडील नव्हते. म्हणून बहिणीच्या घरी राहात होती ती.

त्या संध्याकाळच्या पार्टीनंतर माशा माझ्या मनातून दूर होईना. त्यानंतर मी तिला दोन तीनदा भेटलो असेन मी तिला. तिनं मला तिच्या घरी बोलवावं असं सरळसरळ सुचवलं होतं.



"हे आलो आपण, युरा."

माशा घरात एकटीच होती. तिनं दार उघडलं अन् ती कमालीची बावरली, गोंधळली. तरीही तिनं आम्हाला घरात बोलावलं.

"बसा." आम्ही आत गेल्यावर ती म्हणाली.

मी बाकावर बसलो, थोडा वेळ युरा संकोचून उभाच राहिला. मग तोही माझ्या शेजारी येऊन बसला. ब्लाऊझच्या बटनांशी चाळा करीत माशा खिडकीपाशी उभी होती. युरानं मला कोपरानं डिवचलं. त्याला सुचवायचं होतं, "बोल काही तरी" पण माझ्या तोंडाला कोरड पडली होती. एखाद्या मुलीशी संभाषण करताना कशी काय सुरुवात करावी त्याची मला काहीच कल्पना नव्हती. पुरी दोन मिनिटं गेली, कुणी काहीच बोललं नाही. त्या दोन मिनिटातच मी तिथल्या लाकडी तक्तपोशीचा बारकाईनं अभ्यास केला. शिवाय मागणी घाल- णारा कुबड्या घेऊन येतो हे दृश्य एकंदरीत वाईटच असंही मत देऊन टाकलं. इथं याचचा माझा धीरच कसा झाला? ज्ञातुस्कमध्ये गोर्लोवोमध्ये इतर कितीतरी चांगले, धडधाकड तरुण होते. माशासारख्या मुलीभोवती जमायला त्याना वेळ लागला नव्हता.

युरानं मला पुन्हा कोपरखळी दिली. आता गप्प बसणं शक्य नव्हतं, शिष्टाचाराला सोडून झालं असतं ते "हा माझा भाऊ, युरा."

"ओह! मी ओळखते त्याला. आमच्या गावात आला होता तो एकदा- तुम्हा भावाभावात खूप साम्य आहे." सारा वेळ ती खिडकीतून बाहेर पहात होती, तिनं एकदाही आमच्याकडे पाहिलं नाही.

संभाषण चालू ठेवणं मला जमणार नाही हे युराच्या ध्यानात आलं. मग त्यानं सारी सूत्रं आपल्या हातात घेतली. ती दोघं काहीतरी बोलू लागली हे मला अस्पष्टसं समजत होतं. तेवढ्यात मी दचकून सावरून बसलो, कारण युरा म्हणत होता, "समज माशा, वाल्यानं तुला जर मागणी घातली, तर तू त्याला पिटाळून तर लावणार नाहीस?"

मी अवाक् झालो "घरी जाईपर्यन्त थांब. मग दाखवतो तुला, युरा!" मी मनातल्या मनात म्हणालो.

परंतु माझ्या सुदैवानं माशा प्रामाणिक मुलगी होती. ती खिडकीपासून दूर झाली व गंभीर नजरेनं माझ्याकडे पाहू लागली आणि म्हणाली,

"चेष्टा तर करीत नाहीस ना...नाही, मी त्याला पिटाळून लावणार नाही."

सारा ताण कुठल्याकुठे गेला. आम्ही सारेच खुशीत आलो. मी 'सातव्या स्वर्गात' चढून बसलो. मग चहापाणी झालं; मनमोकळ्या मजेदार गप्पा झाल्या. माशा आणि युरा दोघंही एकमेकाना आवडले होते यानं मी सुखावलो होतो.

मध्येच ते दोघे मिळून माझ्यावर हल्ला चढवीत, चिडवीत. पण तेही मी मनावर घेतलं नाही. शेवटी आम्ही जेव्हा परत घरी गेलो तेव्हा चांगलाच उशीर झाला होता.

"आई–बाबाना माहीत आहे का वाल्या ?"

त्याला काय म्हणायचं होतं ते मी ओळखलं; पण तरीही मुद्दामच विचारलं. "काय माहीत असायचं ?"

"हेच तुझ्याबद्दल. तुला लग्न करायचं आहे म्हणून."

"अजून तरी नाही. पण तो माझा वैयक्तिक प्रश्न आहे," मी उत्तरलो. आपण आता स्वतन्त्र आहोत असं भासवायचं होतं मला.

"तेही खरच आहे म्हणा......." त्याचं वाक्य तसंच अर्धवट घरंगळत गेलं. तो गप्प होता पण त्याला मनातून कशाची काळजी वाटत होती ते मला समजत होतं. माझ्या या स्वातन्त्र्याबद्दल बाबांची काय प्रतिक्रिया झाली असती ! खरं सांगायचं तर मलाहि तोच विचार सतावीत होता. त्याना दुखवणं मला आवडलं नसतं.

पण झाल्या गोष्टीला इलाज नव्हता. आता पाऊल मागे घेतां येणं शक्य नव्हतं. रात्रीच्या जेवणानंतर योग्य वेळ साधून–माझ्या दृष्टीनं–मी आई-वडिलांच्या कानावर घातलं, स्वतःचं घर थाटायचा माझा विचार आहे म्हणून.

"कोणाचा घरजावई होण्याचा विचार चाललाय् का तुझा ? स्वतःचं घर सोडून जायचं ? आणि तू सर्वात वडील मुलगा. लोक काय म्हणतील ?" बाबांचा आवाज चढला होता.

पण आईनं त्यांची समजूत काढली. घरात अगोदरच दाटी झाली आहे. आणि वाल्या आता मोठा झाला आहे. त्याचं स्वातंत्र्य त्याला हवं आहे, तिनं बाबाना सांगितलं.

मग लवकरच आई आणि द्मित्री–झोयाचा नवरा–माशाला भेटायला म्हणून गोर्लोवोला जाऊन आले. लग्नसमारंभ 'विजयदिना'च्या दिवशी उरकण्यात आला, ९ मे !

"वाल्या, कुठे भेटली तुला ही मुलगी ? छान आहे अगदी" लग्नाच्या वेळी बाबा म्हणाले.

माशाला हसू आले, "या साऱ्या गोष्टींची जबाबदारी, 'यंग पायोनियर'चा लाल टाय बांधणाऱ्या या मध्यस्थाला आहे" युराकडे बोट दाखवीत ती म्हणाली, "युरा नसता तर वाल्या अजून कितीतरी वर्षं ब्रह्मचारीच राहीला असता."

लग्नानंतर मी गोर्लोवोला रहायला गेलो.



सप्टेंबरच्या अखेरी अखेरीस बाबा आम्हाला भेटायला आले. त्या दिवशी मी चेहेरा पाडून बसलो होतो. बाबांच्या ते चटकन ध्यानात आलं, "मी आलो तर तुझा चेहरा असा वाकडा का ?"

मी सुस्कारा सोडला अन् म्हणालो, "बटाटे खणायला आले आहेत. पण खणायलाच कोणी नाही. मला तर या कुबड्यानी जखडून ठेवलय्. माशाला दिवस गेलेत. पैसे देऊन रोजंदारीनं लावावं कुणाला तर गावात तसं कोणी मोकळं नाही. वरती आभाळाकडे पाहिलंत ? आता कोणत्याही दिवशी पावसाला सुरवात होईल, जर अगोदर बर्फ पडला नाही तर."

बाबा हसायला लागले, "गाढवच आहेस तू, वाल्या. इतक्या प्रश्नांचा निष्कारण काथ्याकूट करीत बसला आहेस. आता माझं ऐक. खरं तर तू घर सोडायला नको होतं. एकट्याला सारं निभणं कठीण असतं. जरा नीट वेळ मिळू दे. आपण तुझं घर ज्ञात्स्कला हलवू. मी एक छान जागा पाहून ठेवली आहे. आणि बटाट्याची काळजी करून डोकं पिकवू नकोस. पोती बाहेर काढून ठेव. सकाळी तुझ्या भावाना पाठवतो इकडे."

दुसऱ्या दिवशी पहाटे माझे दोघे भाऊ दारात हजर !

"तू अगोदरच का सांगितलं नाहीस आम्हाला ?" युरा नाराज झाला होता.

"पण एक गोष्ट ! आमच्या भोवती काय करावं, काय करू नये हे सांगत हिंडायचं नाहीस तू," इति बरीस.

संध्याकाळपर्यंत त्यानी आपलं काम पूर्ण केलं.

शरदऋतू सरता सरता आम्हा आमचं बिऱ्हाड ज्ञात्स्कला हलवलं. बाबांच्या घराशेजारीच आमचं नवं घरकुल उभारलं गेलं. पुन्हा एकदा आम्ही सर्वजण एकत्र आलो. दिवस जरा सुखासमाधानानं जाऊ लागले.

त्या उन्हाळ्यात युरानं आम्हाला आश्चर्यचकित केलं. आजुबाजूच्या परिसरात त्याला विलक्षण रस वाटू लागला. पहिल्यापासूनच त्याची चौकसवृत्ती अतिशय तीव्र होती. पण आता त्याचं सारं लक्ष आजूबाजूच्या सृष्टीवर केंद्रित झालं होतं. त्यानं डायरी लिहायला सुरुवात केली होती. सूर्योदयाची व सूर्यास्ताची वेळ, ढगांचे प्रकार, वाऱ्याचा वेग अशा नोंदी डायरीत होऊ लागल्या. बहरलेल्या झाडांची रेखाचित्रे, सफरचंद आणि चेरी याना फळं धरल्याची तारीख, साळुंक्यांनी अंडी घातली तो दिवस, शेतात गव्हाचे पहिले अंकूर दिसू लागले तो दिवस या साऱ्यांची नोंद झाली होती.

तो मोकळ्या रानात जाई आणि येताना खिसे भरून दगड घेऊन येई. दगड ठेवायला त्यानं मुद्दाम एक उथळ लांबच लांब लाकडी पेटी बनवली होती.

प्रत्येक दगडाला त्याचा खण होता. सारे दगड व्यवस्थित वर्गीकरण करून लावले होते.

त्याचा एक वनस्पतीसंग्रह पण होता. झात नदीच्या किनाऱ्यावर उगवणारे गवत व रानफुले नीट सुकवून त्यात लावली होती. एक दिवस त्यानं त्याचा खजिना आम्हाला दाखवला. दर दिवशी पायाखाली गवताच्या दोनशे जाती तुडवीत होतो हे कळून आल्यावर आम्ही अगदी आश्चर्यचकित होऊन गेलो.

घरांच्या मागच्या बाजूला असलेल्या बागांपलिकडे युरा क्वचितच गेला असेल. बरीस आणि त्याचे मित्र तिथे 'लढाई लढाई' खेळत. परवापरवापर्यंत युराला हा खेळ किती आवडायचा. आता त्याला त्याचा कंटाळा आला होता.

युराच्या आणि बरीसच्या वयातलं दोन वर्षांचं अंतर आता ठळक उठून दिसू लागलं होतं.

□ □



## ४ : बेस्पालोव

ऐन रात्रीच्या काळोखात घराजवळ कानठळ्या बसविणारा स्फोट झाला. मी उडी मारून उठलो अन् दिवा लावला.

"काय झालं?" माशानं काळजीच्या सुरात विचारलं.

पाठोपाठ धाडकन दुसरा स्फोट झाला.

माशाचा चेहरा पांढराफटक पडला. "वाल्या, बाहेर नको जाऊस."

मी मुकाट्यानं कपडे चढविले; बुटात पाय सरकवले आणि बाहेर धाव घेतली. घरातले सारेजण बाहेर येऊन उभे राहिले होते. त्यांची गाळण उडाली होती. बाबांच्या हातात दिवा होता. आईनं खांद्यावर कोट ओढून घेतला होता. बरीस तिच्याजवळ उभा होता. सारे हडबडल्यासारखे झाले होते; सगळे एकदम बोलत होते. युराचा पत्ता नव्हता.

"काय झालं?" मी त्यांच्याकडे धावलो अन् विचारलं.

"त्याची ऐसी की वैसी!" बाबा चिडून म्हणाले, "कोणीतरी लेकाच्यानं हातबॉबशी पोरखेळ चालवलेला दिसतोय. पहा, साऱ्या तावदानांचा निकाल लागलाय."

पुढच्या बाजूच्या खिडक्यांखाली बर्फात दोन विवर पडलेली दिसली. त्यांच्या तोंडाभोवती फुटक्या काचांचा खच पडला होता. बाबांनी त्यातला एक तुकडा उचलला आणि दिव्यासमोर धरला. ती काही तावदानाची काच नव्हती.

"हरामखोर! पोरा, यावेळी तुझी धडगत नाही, याद राख!" बाबांनी शिवी घातली.

त्यांच्या मनात कोणाचं नाव होतं हे विचारायची गरजच नव्हती. ते युराला उद्देशून बोलत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी मी तिकडे जाऊन चौकशी केली. सगळे न्याहारीला बसले होते. युरा टेबलापाशी उंदरासारखा चूपचाप बसून होता- त्याची

मान थाळीवर वाकली होती. त्याचा चमचा थाळीच्या कडेशी काहीतरी खरवडत होता.

मी समजलो, युराला शिक्षा मिळाली होती. बाबा लंगडत लंगडत खोलीत येरझारा घालू लागले.

"काय झालं ?" मी चौकशी केली.

"तुला माहीत नाही बावा, आपल्या घरात एक शास्त्रज्ञ आहे; अगदी पक्का प्रोफेसर !" बाबा रागानं धुमसत होते, "त्याचे प्रयोग चालले होते !"

युरानं मान जराशी वर केली आणि हलक्या आवाजात म्हणाला, "माझी नक्की काहीतरी चूक झाली असणार. आमच्या शास्त्राच्या शिक्षकानी सांगितलं होतं, घरी करायला हरकत नाही."

"आणखी काय सांगितलं होतं ? तीन तीन लिटरच्या दोन बरण्या फोड म्हणून? आणि तुमचे शिक्षक तुम्हाला खिडक्यांच्या काचा फोडा म्हणून सांगतात काय ? का ते तुम्हास विध्वंस करायला सांगतात आणि त्याच्यासाठी चांगले मार्क देतात ? घरादाराचं वाटोळं करणारी ही कुठली शाळा ?" बाबा काही एक ऐकायला तयार नव्हते त्यांचे शब्द थांबत नव्हते.

युरानं कशीबशी न्याहारी संपवली, त्याचा सारा विरोध गळून पडला होता.

शेवटी एकदाचं, बाबाना काय म्हणायचं होतं ते मला समजलं. मला आठवत होतं तेव्हापासून आमच्या घरात तीन–तीन लिटरच्या,काचेच्या दोन बरण्या होत्या. त्यांचा रंग काळसर हिरवा होता. गळा अगदी रुंद होता. कामटयांच्या दोन टोपल्या होत्या, त्यात त्या नेहमी उभ्या करून ठेवलेल्या असायच्या. आत रॉकेल भरलेलं असायचं. लढाईच्या काळातच तेवढ्या त्या मोकळ्या असायच्या युरानं काहीतरी प्रयोगासाठी त्या बाटल्या वापरल्या होत्या आणि काही तरी अपघातानं, काहीतरी चूक होऊन त्यांचा स्फोट झाला होता

"सोडून द्या, बाबा," मी समजावणीच्या उद्देशानं म्हणालो, "नाहीतरी आता काचेच्या बरण्यांऐवजी सारेजण धातूचा कॅनच वापरतात तेल ठेवायला."

परंतु बाबांचा राग सहजासहजी ओसरणारा नव्हता. मी परत घराकडे वळलो. दहा मिनिटानंतर शाळेत जाताना युरा आत डोकावला.

"काय होतं ते सारं गौडबंगाल ?" मी विचारलं.

तो खोडकरपणानं हसला. मग काहीसा अस्पष्टपणे म्हणाला, "ऑक्सिजनचा छोटासा प्रयोग होता. मी काहीतरी विसरलो असेन. पण ... " त्यानं तव्यावरची सोया-बिनची गरमगरम आंबोळी ओढून घेतली आणि या हातातून त्या हातात उडवीत बाहेर पळाला. क्षणभरानं तो परतला अन् म्हणाला, "आमचे पदार्थ-विज्ञानशास्त्राचे शिक्षक कोण आहेत माहीत आहे तुला ? लेव मिरवाइलोविच



बेस्पालोव. लढाऊ विमानावर पायलट होते ते. तेव्हा हे असं आहे सारे." त्यानं जाताना धाडकन दरवाजा लावून घेतला.

लेव मिखाइलोविच वर्गात येताना आपला जुना शर्ट घालून येत. खांद्या-वरच्या पट्टयांच्या खुणा त्याच्यावर स्पष्ट दिसायच्या. जिथं ते पदकं लावीत असत तिथं लहान लहान भोकं होती. ते नेहमी अगदी नीटनेटके स्वच्छ राहात. काळजी-पूर्वक दाढी करून येत. ते वयानं अजून तरुण होते पण त्यानी बरंच अनुभवलं होतं; खूप काही पाहिलं होतं.

ते दार उघडून आत आले की मुले उठून जवळ जवळ 'हुश्श्यार'च्या पवि-त्र्यात उभी राहात. कारण प्रत्येकाला अन् प्रत्येकीला दाखवून द्यायचं असे; लष्करी शिस्त, रूबाब काय असतं हे आम्हालाही माहीत आहे

"गुड् मॉर्निग, मुलानो !"

"गुड् मॉर्निग, लेव मिखाइलोविच !" अगदी व्यवस्थित ठेक्यात उत्तर येई.

बेस्पालोव वही उघडून हजेरी घेऊ लागत.

"वासिल्येव."

"आहे."

"गागारिन"

"आहे."

"दुरासोवा."

"आहे."

स्वत:ला धीट, निधड्या छातीची समजणारी मुलंसुद्धा त्यांच्या तासाला शहाणपणा दाखवायच्या फंदात पडत नसत सारी कामं शिस्तीनं, गांभीर्यानं, अगदी लष्करी पद्धतीनं चालत तरीही सारं वातावरण मनमोकळं, खेळीमेळीचं असे. बेस्पालोवना पाहताक्षणीच मुलं त्यांच्या प्रेमात पडली. मागाहून त्यांचा कधीही अपेक्षाभंग झाला नाही, बेस्पालोवकडून. ते त्याना घाबरत नसत. कारण बेस्पालोव काही करडे शिक्षक म्हणून सांगता आले नसते. उलट ते अतिशय आनंदी, अतिशय उत्साही होते कधी कधी 'त्याची पर्वा सैतानाला' अशा वृत्तीनं ते वागत. ते उत्कृष्ट शिक्षक होते.

"युरा गागारिन, जरा इथं पुढं ये. बघू या... काल तुला गृहपाठाबद्दल 'अ' शेरा मिळाला. आजचं काम तू केलं आहेस ?"

"होय."

"छान. पण आज आपण एक नवा विषय अगोदर घेऊ या. सफरचंद झाडावरून जमिनीवर का पडतं ते जरा वर्गाला समजावून सांग."

"ते तर सोपं आहे. सफरचंद पिकलं की खाली पडतं."

"बरोबर पण ते खालीच का पडतं? वर का पडत नाही? तू जर एखादा दगड वर फेकलास तर तोही खाली का पडतो? याचा कधी विचार केला आहे का?"

"कारण चंद्रापेक्षा पृथ्वी जवळ आहे म्हणून."

"तू सांगतोस त्यात तथ्यांश आहे खरा. आता हा खडू घे, पृथ्वी काढ, तिच्यावर एक सफरचंदाचं झाड काढ, झाडाजवळ एक सफरचंद काढ. नीट काढ. तुला याच्यापेक्षा चांगलं काढता येतं. मुलानो, पदार्थविज्ञानशास्त्रात एक नियम आहे त्याला गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त म्हणतात. ऐझॅक न्यूटननं तो सिध्दान्त शोधून काढला. बघू या आता हा सिद्धान्त काय सांगतो ते."

लेव मिखायलोविच आपल्या विद्यार्थ्यांना अगदी अचूक ओळखीत; त्यांच्या नजरेतनं काही सुटत नसे. मुलं कधी कधी आश्चर्यानं थक्क होऊन जात. एक दिवस त्यांनी वाल्या पेत्रोवला समोर बोलावलं आणि त्याचं बारकाईनं निरीक्षण केलं. वाल्याची नजर खाली झाली आणि जाकिटाच्या बाह्या त्यानं घट्ट धरून ठेवल्या.

"पेत्रोव, सारी संध्याकाळ तू मांजराला सतावण्यात, त्याला त्रास देण्यात घालवलीस; समजलंय् मला. तू त्या गरीब बिचाऱ्या मांजराला का छळलंस सांगशील का जरा?"

"माझ्या आईनं येऊन सांगितलं तुम्हाला?"

"नाही. तुझ्या आईवडिलाना भेटायचा योग आला नाही अजून. माझ्या प्रश्नाचं उत्तर दे तू त्या मांजराला का छळलंस?"

वाल्या शरमेनं लाल झाला; त्यानं कसंबसं सांगून टाकलं "मी वीज तयार करीत होतो. त्याचे केस विसकटायला त्याला जरा थापटलं इतकंच."

"केस विस्कटायला म्हणतोस? हे जरा मजेदारच आहे. म्हणजे तू त्याचे केस उलटे फिरवलेस असं तुला म्हणायचं आहे, खरं ना? मग, वीज झाली का तयार?"

"होय. त्याच्या केसातून सरसर असा आवाज आला."

"आता या प्रश्नाचं उत्तर द्यायचा प्रयत्न करा; तुम्ही जर मांजराला आंघोळ घातली असतीत तर पेत्रोवच्या पद्धतीप्रमाणे तुम्हाला वीज मिळाली असती का?"

"नाही."

"कोण, वासिल्येव? तू नाही म्हणालास का? जरा तुझ्या उत्तराचं स्पष्टीकरण करशील? नाही सांगता येत? विचार कर. तुम्हाला सर्वांनाच पाच मिनिटं देतो मी. उत्तर शोधून काढा."



घंटा वाजली. लेव मिखायलोविच वर्गातून बाहेर पडले. मुलांच्या घोळक्यात वाल्या पेत्रोव लज्जित होऊन उभा होता. "त्याना मांजराचं कसं काय कळलं?"

"त्याना तुझ्यातून जसं काचेसारखं आरपार दिसलं."

"त्यांच्या नजरेत 'एक्स-रे' आहे."

"लढाई चालली होती तेव्हा त्यानी जळत्या विमानातून उडी घेतली होती. पण त्यांना कुठं लागलं नाही!"

झेन्या वासिल्येवनं वाल्याचं कोपर पकडलं, "युरा, याच्या हाताकडे पहा."

वाल्याच्या हातावर अन् मनगटांवर खोल खोल ओरखडे पडले होते. युरानं आपल्या मित्राच्या हाताकडे पाहिले आणि मग स्वतःचे हात पुढे केले "इथंही तीच दशा झालीय्", तो म्हणाला. वीज तयार करण्यासाठी मांजराच्या पाठीवर, केसांच्या उलट दिशेने हात घासण्याचा त्यानंही प्रयोग केला होता.

लेव मियायलोविच एकदा '६ वी-अ'ला शिकवीत होते. अचानक त्यानी विचारलं, "विचार करीत होतो मुलानो, आपल्याला विमानाबद्दल, विमान चालविण्याबद्दल कितीशी माहिती आहे?"

सारेजण नीट झटकून, कान टवकारून बसले. हे काहीतरी नवीनच चाललंय्.

"मग? कितीशी माहिती आहे?"

"खूप"

"चूप! चूप बैस."

"मागे आम्हाला बरंच समजायचं. पण आता सारं काही विसरून गेलो आहोत."

"कशाला हवी ती माहिती?"

सर्वांचं बोलणं संपेपर्यंत लेव मिखायलोविच शांतपणे वाट पहात राहिले सर्वांचं बोलून सपलं तेव्हा ते म्हणाले, "आपल्याला फार थोडी माहिती आहे. म्हणून मी सुचवतो, आपण एक 'विमानोड्डाण मंडळ' स्थापन करू या. आपण खऱ्याखुऱ्या विमानावरून छोटी विमाने बनवू. ती खऱ्या विमानाप्रमाणंच उडतील. त्यातून आपल्याला पदार्थ विज्ञानशास्त्राचे अनेक नियम समजतील. ज्याना मंडळात दाखल व्हायचंय् त्यांनी सुट्टीमध्ये मॉनिटरकडे नावं द्यावीत."

त्यानंतर तीन आठवड्यानी मंडळाचे सदस्य झात नदीच्या किनाऱ्यावर गेले. त्याना त्यांच्या पहिल्या विमानाची चाचणी घ्यायची होती. ते कामट्यांपासून बनविलं होतं. लढाऊ विमानाची ती हुबेहूब लहानशी प्रतिकृती होती. त्याला पेट्रोलवर चालणारं छोटंसं इंजिन बसवलं होतं. अगदी खुऱ्याखुऱ्या विमानासारखं दिसत होतं ते.

"जा!" बेस्पालोव ओरडले.

'झूऽऽऽम्' आवाज करीत लढाऊ विमान आकाशात उडाले. गोठलेल्या नदीवरून झेप घेऊन त्यानं दुसऱ्या तीरावरच्या बर्फाच्छादित उताराकडे आपला मोर्चा वळवला आनंदानं मुलांच्या डोळ्यात पाणी चमकू लागलं. हे काही कागदाचं लुटुपुटीचं विमान नव्हतं. अगदी खऱ्या विमानासारखं, उडणारं विमान होतं!

विमान दिसेनासं झाल्यावरोबर युरानं बर्फावर प्रथम धाव घेतली. पलीकडच्या तीरावर मुलानी खालीवर चढन उतरून त्याचा शोध घ्यायची शिकस्त केली. खालच्या नरम, भुसभुशीत बर्फात हजारो पावलांचे ठसे उमटले होते. पण त्याना विमानाचा पत्ता लागला नाही.

"इतकं खिन्न व्हायचं कारण नाही," मुलांचे उतरलेले चेहेरे पाहून लेव मिखायलोविच म्हणाले, "आपण सुरुवात तर केली आहे; अन् तेच महत्वाचं आहे. वाईट येवढंच की आता आपल्याला फारसा वेळ सापडायचा नाही. शिवाय सध्या हिवाळा साऱ्या गोष्टी जरा प्रतिकूल आहेत."

ते म्हणाले ते खरंच होतं. विमानोड्डाण मंडळाचं काम समाधानकारक चालावं अशी तेव्हा परिस्थिती नव्हती. एक तर शाळा संपल्यावर मुलाना तिथं थांबता येत नव्हतं कारण दिव्यासाठी मिळणारं रॉकेल फार जपून वापरावं लागत होतं. शिवाय वर्गाच्या खोलीत इतका गारठा असायचा; फरशी अगदी बर्फासारखीच गार असायची. तिथं कोणालाही काम करवलं नसतं.

"पाहिजे तर आपण आपल्या मंडळाचं काम उन्हाळ्यातही चालू ठेवू, तुमची इच्छा असेल तर," लेव मिखायलोविच म्हणाले, "आपण विमानांचे यापेक्षाही चांगले चांगले नमुने बनवू पण हे सारं तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे. काय म्हणणं आहे तुमचं?"

"चालू ठेवायचं"

"आता मागे पाय घ्यायचा नाही."

"छान! एक दिवस तुम्ही मुलं चांगले पायलट व्हाल असं दिसतंय मला."

थोडयाच दिवसात युरा स्वतंत्रपणे विमानांचे उडणारे नमुने करू लागला. घरात जिथं जागा मिळेल तिथं युरानं आपली विमानं, त्यांचं साहित्य ठेवलं होतं. बरीसच्या आनंदाला पारावार नव्हता. बरीस तेव्हा तिसरीत होता; तो युराच्या अगोदर घरी यायचा नजरेला पडेल ते विमान उचलून तो बाहेर घेऊन जायचा. त्यानं आणि त्याच्या मित्रानी किती विमानं उडवून उडवून मोडली असतील ते त्यानाच माहीत!

युरा सहसा रागावत नसे. शान्तपणानं तो ती मोडकी विमानं दुरुस्त करायचा; नाहीतर नवी बनवायचा. सुतारकीच्या हत्यारांना आमच्या घरात नेहमीच मोठा मान होता; आता पाईनच्या फळ्यांचा आणि सरसाचा वास जास्तच तीव्र झाला.



एक दिवस बेस्पालोव बाबाना वाटेत भेटले. "युरा ज्या निष्ठेनं काम करतो त्याचं कौतुक वाटतं मला," ते सांगत होते, "एक दिवस हा मुलगा हवाई दलात नाव काढील"

शिक्षकानी केलेल्या स्तुतीनं बाबा सुखावले पण लागलीच त्यानी बेस्पालोवना अडवलं, "असं म्हणता? पण आजपर्यंत आमच्या घरात कोणीही जमिनीवरचे पाय उचलले नाहीत. तो सातवी पास झाला की माझ्याबरोबर सुतारकी करू लागेल. त्याच्या हाताच्या मापाची कुऱ्हाडसुद्धा करून ठेवली आहे मी."

"मला वाटतं, अशा गोष्टीत तुम्ही घाई करू नये. त्या मुलाला कुशाग्र बुद्धी आहे."

"सुतारकीला सुद्धा बुद्धी लागतेच ना; जर तुम्हाला वेडंवाकडं काम करायचं नसलं तर; शिवाय तो जर मिळवायला लागला नाही तर घरावर सुद्धा ताण पडेल."

दोघेही आपापल्या रस्त्याला लागले. पण बेस्पालोव मोठे चतुर होते. त्यांच्या चातुर्याचा पुरावा लवकरच मिळाला.

हिवाळ्यातला एक दिवस. लेव मिखायलोविचनी युरा, झेन्या वासिलयेव आणि वाल्या पेत्रोव याना आपल्याबरोबर मासे पकडायला चलण्याचं आमंत्रण दिलं. त्या दिवशी त्यांचं नशीब जोरावर होतं. युरानं आणि वाल्यानं प्रत्येकी तीन पाईक मासे घरात आणून दिले. बाबाना शंका आली, "मी नक्की सांगतो, तुमच्या शिक्षकानी तुम्हाला दिलेत हे मासे. तुम्ही स्वतः थोडेच पकडणार आहात!"

"आम्हीच पकडले आहेत," युरानं त्याना अडवलं, "आणि आम्ही पुन्हा जाणार आहोत पकडायला."

दुसऱ्या खेपेला बरीस त्याच्याबरोबर गेला; पण तासाभरानं एकटा परत आला.

"काय कोळीदादा? काय बिनसलं?" आम्ही विचारलं.

"वारा उलटा वहातोय, मासे गळ पकडत नाहीत."

"मग युरा का नाही आला घरी? काय करतोय तिकडे?"

"त्याचे शिक्षक आहेत त्याचेबरोबर. त्यानी एक शेकोटी पेटवलीय; तिच्या जवळ बसून ऊब घेत घेत विमानांच्या गप्पा चालल्या आहेत त्यांच्या."

त्यानंतर युरा आणि त्याचे मित्र आपल्या शिक्षकांबरोबर मासे पकडायला वारंवार जाऊ लागले. कित्येकदा ते रिकाम्या हातानं परत येत, पण तरीही युराकडे पहाण्यात फार मोठा आनंद मिळायचा. तो फार आनंदी दिसायचा;

चेहरा अगदी खुललेला असायचा. त्याच्या उत्साहाला उधाणभरती आलेली असायची घरी आला की आमच्यावर त्याच्या प्रश्नांची सरबत्ती झडू लागे.

"वाल्या, तुला जेट फायटर उडवायचंय का ?"

"बाबा, तुम्ही अगदी पहिलं विमान केव्हा पाहिलंत ?"

"चकालोवनं पुलाखालून विमान कसं उडवलं माहीत आहे तुला, बरीस ? नाही ? आश्चर्य आहे !"

"लेव मिखायलोविच युराच्या डोक्यात काय काय चमत्कारिक कल्पना कोंबतोय." बाबा कुरकुरले

"बेस्पालोव त्याला काहीही वाईट शिकवणार नाहीत," आईनं बाबांना अडवलं. "युराचं नशीब, त्याला असे चांगले शिक्षक मिळालेत."

बाबा कुरकुरले खरे पण आईचं म्हणणं त्यानाही पटलं. लेव मिखायलोविचनी मुलाना वेळेचं महत्व शिकवलं होतं. युरानं त्यांचा सल्ला मानून एक वेळापत्रक तयार केलं होतं. तो सकाळी सात वाजता उठायचा; थंड पाण्यानं अंग पुसायचा; न्याहारी करून दिवसभराची ठरवलेली कामं एकदा नजरेखाली घालायचा आणि मग शाळेत जायला बाहेर पडायचा. त्यानं आपल्या वेळापत्रकात कधीही बदल केला नाही.

"चल आपण कुस्ती खेळू या," एक दिवस तो मला म्हणाला अन् त्यानं माझ्या अंगावर झेप घेतली.

"खेळू या." मला त्याच्या बोलण्याची मजा वाटली. मला खात्री होती, एका मिनिटात मी त्याला लोळवलं असतं. पण त्याचे पोलादी स्नायू जाणवताच मी आश्चर्यचकित झालो. कुस्तीला बराच रंग भरला.

लेव मिखायलोविच बेस्पालोव आता नाल्चिकमध्ये राहातात. त्यांच्या जुन्या जखमा पुन्हा त्रास देऊ लागल्या आणि त्यांची प्रकृती म्हणावी तशी नीट राहीना म्हणून त्यांना उबदार हवामानाच्या गावाकडे वळणे भाग पडले होते. न्याझानमध्ये ते अनेकदा मला भेटायला घरी आले होते. आमच्या बोलण्याचा विषय एकच असायचा—युरा.

"तुला माहीतच आहे. त्या मुलाबद्दल मला खात्री होती." ते एकदा बोलता बोलता म्हणाले, "त्याच्या ठिकाणी तीव्र जिज्ञासा, अन् कुशाग्र बुद्धी होती. तो नेहमी तत्पर, सावधचित्त असायचा. फार शिस्तीचा होता. अशी मुलं उत्तम वैमानिक बनतात." विमानविद्येतलं त्याचं कुतुहल आपण बुध्याच जागवलं होतं हेहि त्यानी सांगितलं. "मी स्वतः विमान सोडून कधीच जमिनीवरचा व्यवसाय पत्करला नसता. पण प्रकृतीपुढे माझा नाईलाज झाला, ते म्हणत होते. "तू समजू शकतोस. जिथं आपण सोडलं तिथून पुढं दुसरा कोणीतरी चालवील अशी आशा माणसाला नेहमीच वाटत असते."

चांगले मित्र आणि चांगले शिक्षक लाभण्याच्या दृष्टीने युरा नेहमीच नशीबवान ठरला. पदार्थविज्ञानशास्त्राचे त्याचे शिक्षक लेव मिखायलोविच त्याचे सच्चे मित्र व चतुर शिक्षक होते.

□ □

## ५ : गवत कापणी

**युरा** आणि बरीस 'टोबिक'शी खेळत होते; त्याला कसरती शिकवीत होते. तेवढ्यात फाटक करकरले अन् वाल्या पेत्रोव आत आला.

"ओ होऽऽ!"

वाल्या भलताच स्मार्ट दिसत होता. डोक्याला कागदी टोपी, पाठीवर एक ठासून भरलेली पिशवी, अन् हातात बरेचसे गळ

युरा आपल्या मित्राकडे धावला, "कुठं गेला होतास तू? शंभर चकरा मारल्या तुझ्या घरी; दरवेळी दाराला भलंमोठं कुलूप!"

वाल्यानं उपहासानं डोळे मिचकावले, "जसं काही तू त्या गावचाच नाहीस. सारा आठवडाभर सारा वर्ग गवतकापणीला गेला होता आणि मी इथं पहातोय, वर्गाचा मॉनिटर घरी बसून आराम करतोय."

"कामावर गेला होतात?"

"निश्चितच गेलो होतो. गवत गोळा करायचं अन् सुकवायचं. ज्याना विळा चालवता येत होता त्याना गवत कापायचंही काम दिलं होतं. मला येतो विळा चालवायला. तेव्हा मी गवत कापण्याचंही काम केलं. आज मला सुट्टी आहे. लेव मिरवायलोविचनी मला सामान आणायला घरी पाठवलंय्. ते म्हणाले, 'युरालाही पाहून ये. कदाचित आजारी असेल.' पण तू इथे 'टोबिक' बरोबर उनाडक्या करतो आहेस. फार छान. तू कामचुकार आहेस युरा."

"पण मला यातलं काहीच माहीत नाही."

"बोल खोटं! आम्ही बरीसजवळ निरोप ठेवला होता तुझ्यासाठी की आम्ही सामुदायिक शेतावर चाललो म्हणून; काय बरीस, सांगितलं होतं ना तुला?"

बरीस काय पुटपुटत होता कोणास ठाऊक. 'टोबिक'वर वाकून तो त्याचा



कान खाजवत होता. युरानं त्याच्याकडं वळून दरडावून विचारलं, "काय? काही बोलशील की नाही?" त्याचा आवाज चांगलाच चढला होता.

आपल्यापुढे येऊन ठाकलेल्या संकटाची बरीसला कल्पना आली, अंगणातून बाहेर पडून त्यानं सरळ रस्ता धरला. आता आपण सुरक्षित जागी आलो असं पाहिल्यावर त्यानं ओरडून सांगितलं, "मी विसरलो. पार विसरलो तुला सांगायला." आपल्या भावाला खरं सांगायला तो घाबरला. शिक्षकांचा निरोप त्यानं मुद्दामच दिला नव्हता युराला. 'आपल्याला घरी एकटं राहयची इच्छा नव्हती; युरा गेल्यावर आपल्याशी खेळायला कोण होतं?' हे तो युराला कसं सांगणार?

"मग थांबू का तुझ्यासाठी?" वाल्यानं विचारलं.

"हो तर!" युरानं माझी लष्करातली पिशवी ओढून घेतली आणि म्हणाला "आई जरा बांधून दे बरोबर न्यायला."

"वाल्या फार दिवस रहावं लागेल का?" आईनं विचारलं.

"जवळ जवळ तीन आठवडे. काम संपेपर्यंत. पण त्याला काही खायला वगैरे बांधून द्यायची भानगड नाही. तिथं जेवणाखाण्याची चांगली व्यवस्था आहे. दूध, अंडी आणि मटन देतात आम्हाला. काल अध्यक्ष आमच्यासाठी पांढरा ब्रेड आणि मध घेऊन आले होते, आम्ही चांगलं काम करून दाखवलं म्हणून आमच्या-साठी मुद्दाम आणलं होतं. आम्ही त्याना जॅमची मेजवानी दिली. मुली 'बेरी' गोळा करीत होत्या. इरैदा दिमित्रीयेव्नानी त्यांचा जॅम बनविला."

इरैदा दिमित्रीयेव्ना त्रोइत्स्काया असिस्टंट प्रिन्सिपॉल होत्या.

युरा वाल्याचं बोलणं ऐकत होता, ऐकता ऐकता त्याचे गाल लाल झाले.

"युरा, बरोबर द्यायचं काही कारण दिसत नाही, तुम्हाला सारं मिळतंय तिथं," आई पिशवी हलवीत काहीशी अस्वस्थ होऊन म्हणाली.

"नवे बटाटेसुद्धा मिळाले आम्हाला!" वाल्या उत्साहानं सांगतच होता.

नवे बटाटे! हे म्हणजे फारच झालं "आई, तरीपण थोडंसं बांधून दे, बरोबर. मी काही कमावलं नाही अजून ते जे काय खाताहेत ते."

वाल्या समजला, आपला डोस जरा जादाच झाला; लागलीच सावरून म्हणाला, "काहीतरी मूर्खासारखा बडबडू नकोस. काय करणार आहेस? एका बाजूला एकटाच बसून खाणार आहेस? थोडी पुस्तकं घे वाचायला अन एक ब्लँकेट."

"ठीक आहे, आणतो पुस्तकं". थोड्याच वेळात युराची तयारी झाली. त्यानं खांद्यावरून पिशवी मागे लटकावली. शीळ घालीत तो आईजवळ तिचा निरोप घ्यायला गेला "शिपाई गडी आघाडीवर चालला" या गाण्याचे सूर होते ते.

" युरा नीट चांगला वाग, संभाळून रहा. "

" तू अगदी काही काळजी करू नकोस आई. सारं काही ठीक होईल. आणि तू बघशील, असा सपासप हात चालवीन, की त्यांच्या एवढ्या कामाचा फडशा पाडीन; साऱ्या बाकी कामाची भरपाई करून टाकीन."

" बढाईखोर कुठला," आईनं त्याचा मुका घेतला.

आभाळ ऊंचचऊंच वाटत होतं. गव्हाच्या लोंबीत दाणे खच्चून भरलेले असावेत तसं आकाश ताऱ्यांनी खच्चून भरलं होतं. मुलं आंघोळी करून स्वच्छ झाली होती. रात्रीची जेवणं उरकून सारेजण शेकोटी पेटवून तिच्याभोवती बसले होते. तो त्यांचा रोजचा कार्यक्रम होता. साऱ्यांच्या नजरा अपेक्षेने बेस्पालोवकडे लागल्या होत्या.

" आज मी तुम्हाला एक प्राचीन दंतकथा सागणार आहे. इकॅरस नावाच्या एका तरुणाची कथा आहे ती. ही गोष्ट मूळ प्राचीन ग्रीसमधली. आज शतकानुशतकं लोक ही गोष्ट ऐकत आले आहेत."

बेस्पालोव हलक्या, मृदू आवाजात बोलत; शांतपणानं बोलत. ती सुंदर गोष्ट ऐकताना मुलं भान विसरली; एकही शब्द निसटू नये म्हणून सरसावून बसली. लवलवत्या ज्वाला वरवर चढत होत्या, नाचत होत्या, सुक्या फांद्या स्वाहा करीत होत्या. गोष्टीनं भारून गेलेल्या श्रोत्यांना त्या ज्वालात 'डीडॅलस' नं मोठ्या चातुर्यानं अन कौशल्यानं तयार केकेले पंख दिसू लागले.

"तो जळून मरून गेला ?" तोन्या दुरासोवानं मध्येच घाबरट आवाजात विचारलं.

सर्वांनी तिला गप्प केलं.

"सूर्याच्या उष्णतेनं डिंक पाझरला; पंख सुटून खाली आले. इकॅरस समुद्रात पडला, दुभंगलेल्या लाटा पुन्हा मिटल्या, त्याला पोटात घेऊन," लेव मिखायलोविच सांगत होते. " गोष्टीचा शेवट दुःखदायक आहे, पण गोष्ट मात्र तेजस्वी आहे; तिच्यात महत्त्वाकांक्षा आहे."

कितीतरी वेळ सारेजण शेकोटीभोवती मुकाट्यानं बसले होते; कोणी एक शब्दही बोललं नाही. शेवटी लेव मिखायलोविचनी सर्वांना सांगितलं झोपायची वेळ झाली म्हणून, सारेजण आज्ञाधारकपणे उठले. ताज्या गवताला सुगंध येत होता; मुलानी त्याचेच बिछाने बनवले; अंगावर ब्लॅंकेट ओढून सारेजण आडवे झाले.

कोणालाच झोपावसं वाटत नव्हतं. गवतावर पडून सारेजण वर ताऱ्यांनी जडवलेल्या आभाळाकडे पाहात होते. बोलायला सुरुवात केली झेन्या वासिल्येवनं,



" माझा विचार आहे. खलाशी व्हावं आपण; मग मी आफ्रिकेला जाईन, भारताला जाईन..."

" मला वाटलं, तुला लेव मिखायलोविच सारखं वैमानिक व्हायचंय; तुझा बेत फार लवकर लवकर बदलतो !"

" खलाशी होण्यातही तेवढीच गंमत आहे. खरं ना युरा? खरं सांगशील ?"

" होय पण ....."

" पण काय ?"

" ओह ! चूप बैस तू !"

" त्याच्या वाटेला जाऊ नकोस झेन्या तुला दिसत नाही का आज त्याचं बिनसलंय म्हणून ?"

युरा उठून बसला, त्यानं गुढघ्यांना हाताची मिठी घातली; तिथं डोकं टेकवून तो बोलू लागला. " दोस्तहो, मी अडचणीत आलो आहे. पुढच्या वर्षी शाळा संपली की मी बाबांच्या बरोबर सुतारकाम करावं असा त्यांचा बेत आहे."

झेन्या शीळ घालू लागला. " मी जर तुझ्या जागी असतो तर घरातून पळून गेलो असतो."

" त्यात नवीन काही नाही. मग पोलीस तुम्हाला शोधून काढतात अन पुन्हा घरी आणून सोडतात," वाल्या म्हणाला.

" उगीच रडगाणं लावू नकोस वाल्या. आता जुने दिवस राहिले नाहीत, जमाना बदलला आहे. आता पोलीस तुम्हाला शोधू शकणार नाहीत."

" झोपू या आता," युरा गवतावर आडवा झाला आणि मग एका कुशीवर वळला.

" ढकलू नकोस," झेन्या म्हणाला.

" मला झोप येत नाही, मी विचार करतोय......"

" कशाचा ?"

" साऱ्या गोष्टींचा माझ्याशी बोलू नकोस, समजलं ?"

मुलांच्या मदतीनं सामुदायिक शेतकऱ्यांनी अखेरची गंज रचली मग अध्यक्ष त्यांच्याकडे गेले. " फार आभारी आहे तुम्हा सर्वांचा. फार छान काम उरकलंत. आता पुन्हा पुढच्या उन्हाळ्यात आम्ही तुमची वाट पाहू. जरूर य.यत्र सर्वांनी " ते म्हणाले.

" जरूर येऊ."

" आम्ही तुम्हाला एक कार्यक्रमसुद्धा करून दाखवू."

" पण दुसऱ्या शाळेतल्या कुठल्याही मुलाना बोलवायचं नाही."

" सारं सारं कबूल," अध्यक्षानी हसून सांगितलं. मग त्यांनी बेस्पालोवबरोबर हस्तांदोलन केलं.

मुलं आपापल्या पिशव्या भरीत होती. उत्साहानं बोलत होती. साऱ्यांच्या चित्तवृत्ती उत्तेजित झाल्या होत्या. अध्यक्षानी मुलाना गाडीतून सोडतो म्हणून सुचविलं; पण साऱ्यानी एकमुखानं विरोध केला. त्याना पायी पायी जायचं होतं. नाही म्हटलं तरी त्यानी शेतावर एक महिना काढला होता. विस्तीर्ण, मोकळ्या रानातून असं एकदम घरी जाऊन पडणं त्याना पसंत नव्हतं.

" चला निघू या," बेस्पालोव म्हणाले, " गागारिन, चलतोस ना ?"

" लेव मिखायलोविच, एक मिनिट, " म्हणत युरा अध्यक्षांकडे धावत गेला.

" अरेच्या, आपली ओळख खूप जुनी आहे," अध्यक्ष आनंदाने म्हणाले. " अॅकॉर्डियनच्या कामगिरीवर–तुझीच कल्पना होती ना ती ?"

" तुम्ही माझ्यावर नाराज होऊ नका," युरा त्यांच्या नजरेला सरळ नजर भिडवीत म्हणाला, " पुढच्या उन्हाळ्यात पुन्हा येऊ म्हणून मुलानी तुम्हाला कबूल केलंय, पण मला येता येईलसं वाटत नाही."

" का ? तुला आवडलं नाही का इथं ?"

" नाही, नाही, मला फार आवडलं इथं ! पण मला पुन्हा येता येणार नाही," येवढं बोलून पळत पळत त्यानं बाकीच्या मुलाना गाठलं.

त्यानंतर बरेच दिवस उलटले. आई बाबाना म्हणाली, "युरा किती बदलला आहे मागे कसा सारखा आत बाहेर, आत बाहेर धावतपळत असायचा. आता पहाव तर सारखा लोळत असतो. कशाची तरी काळजी करतोय."

" त्याच्या वयाचा दोष आहे तो," बाबा म्हणाले पण स्वत:च उत्तर त्याना स्वत:लाच पटलं नाही. मग तेच पुढे म्हणाले, " काही झालं तरी तू एक विसरू नकोस, आता तो पंधरा वर्षाचा झालाय; मी नक्की सांगतो, मुलींच्याकडे पहायला सुरुवात केली असणार त्यानं."

" नाही. तसा नाही माझ्या म्हणण्याचा अर्थ. त्याच्या मनावर कशाचं तरी दडपण आलंय. कशाचं ते मला माहीत नाही. पण त्याच्याकडून कसं काढून घ्यावं तेही कळत नाही. फार कशाला ? बोलायला गेलं तर धड नीट बोलतही नाही. बरीसचंच पहाना. तो युराच्या वाऱ्यालाही उभा राहात नाही आताशा."

आणि जेवताना ते सारं निघालंच. आईचा अंदाज बरोबर होता. आई बाबा आणि युरा संध्याकाळी टेबलापाशी बसले होते. लोणचं, ताक अन नवे बटाटे



होते समोर. पण खरं तर फक्त आई अन् बाबाच जेवत होते. युरा थाळीच्या कडेवर बोट फिरवीत होता.

" युरा, जेवण झाल का तुझं ?"

स्वत: होऊन विषयाला तोंड फोडणं युराला जमत नव्हतं, आता आईचा प्रश्न आल्यावर त्यानं धीर केला. त्यानं एक खोल श्वास घेतला, नजर सरळ लावली आणि फुटलेल्या रडवेल्या आवाजात तो म्हणाला, " मी एका व्यावसायिक शाळेत जाणार आहे."

" काय ?"

" मी मॉस्कोच्या व्यावसायिक शाळेत जाणार आहे. सगळा नीट विचार केला आहे मी."

आईचे डोळे पाण्याने भरून आले. " झोया अन वाल्या आताच कुठे घरी परत आलेत आणि आता तू घर सोडून जायला निघालास. इथं रहायला तुला आवडत नाही का ? आम्ही इतके का वाईट झालो ? का आम्ही तुम्हाला घराबाहेर काढायला बसलो आहोत ?"

" इथं सारं छान आहे. पण मला व्यवसाय शिकायचा आहे. कारखान्यात काम करून मला कॉलेजमध्ये जायचंय. आयुष्यात मला फक्त सातवी पास होऊन बसायचं नाही."

बाबा एक शब्द बोलले नव्हते. त्यानी हातातली सुरी खाली फेकली, ते उठून उभे राहिले आणि खोलीबाहेर निघून गेले. त्यानी ठरवलेला बेत असा नव्हता.

" युरा, बाळा, जरा विचार कर आमचा. इथं घरीच राहा ना तू आमच्या-पाशी. इथं तुला दहा वर्षाची शाळा पुरी करता येईल. बाबा नाही म्हणायचे नाहीत. शाळा संपली की तू सैन्यात जाऊ शकतोस. मग तिथून परत आलास की तुझं पुढचं ठरवायला तू स्वतंत्र आहेस. कोणी सांगावं, मग कॉलेजमध्ये सुद्धा जाता येईल तुला."

आईच्या डोळ्यात पाणी पाहून युरा बावरला, आपलं मन विरघळेल म्हणून. ओठ दाबून त्यानं आपलंच म्हणणं नेटानं चालू ठेवलं, " आई, मी आता मोठा झालो स्वत:चा खर्च भागविण्याइतकं मी कमावू शकेन. मी व्यवसायशाळेत गेलो की माझी राहाण्याची, जेवणाची, कपड्याची मोफत व्यवस्था होईल. आम्हा सर्वांचा भार एकट्या बाबाना किती जड होतोय ते मला समजत. मी आजोबां-सारखा कामगार होईन आई, माझा निश्चय झाला आहे आता बाबांची समजूत पटवायला तूच मला मदत कर."

दरम्यान बाबा बाहेरच्या अंगणात बरीसला फैलावर घेत होते. " जरा थांबच तू. एकदा माझ्या हाती सापडलास म्हणजे कळेल इंगा ! बरीस, कितीदा सांगितलंय तुला, लाकडात कुऱ्हाड अशी खुपसून ठेवत जाऊ नकोस म्हणून ?"

एका कोपऱ्यात बरीसची काहीतरी गडबड चालली होती. हातात भलीमोठी कात्री होती. टिनचा डबा कापून त्याच्या पत्र्याची ढाल बनवायची होती त्याला. जवळच भिंतीला टेकवून एक लाकडी भाला उभा केलेला होता. भाल्याचं टोक चांगलं अणकुचीदार बनवलेलं होतं.

"मी नाही ठेवली; युरानं ठेवली. काल खुपसून ठेवलीय त्यानं."

"ठीक आहे. ठीक आहे. पण निदान ती लाकडातून काढून बाजूला तर ठेवता आली असती ना तुला ?" बाबा खाली वाकले अन कुऱ्हाड उपसायला गेले. पण पातं बाहेर निघालं नाही. अगदी पुरं पातं लाकडात घुसलं होतं. बाबा रागानं थुंकले; बाजूला झाले आणि एका क्षणात कुऱ्हाडीचं विसरून गेले. "आता धाकटा पळून जायच्या तयारीला लागलाय," ते अगदी अस्वस्थ झाले होते युराचा निर्णय रास्त आहे हे ते मनोमनी उमजले होते. पण त्यानी आखलेल्या बेताप्रमाणे काहीच घडत नव्हतं.

युरा वयात येऊ लागला होता. चांगला सशक्त होता तो. त्याचे स्नायु बळकट होते. अंगात चिवटपणा होता. याचीच प्रतीक्षा करीत बाबा आजपर्यंत धीर धरून थांबले होते. या मुलावर त्यांच्या मोठ्या आशा होत्या. सुतारांचं एक संघटित पथक तयार करायचं त्यांचं फार दिवसांचं स्वप्न होतं प्रत्येक सुतार मोठा निष्णात असेल, साऱ्यांच्यामध्ये एक मोठी जवळीक असेल अन् प्रत्येकाचे नांव असेल गागारिन ! मग साऱ्या प्रदेशात गागारिन सुतारांची नावं गाजत राहातील !

कधीकधी संध्याकाळी घराबाहेरच्या बाकावर ते मित्राबरोबर सिगरेट ओढत बसले की त्यांच्या गप्पा चालत. "आता वाल्या माझ्याइतकीच सफाईनं कुऱ्हाड चालवतो. युरा चांगला चलाख होत चालला आहे. त्याच्या बारीक नजरेतनं काही म्हणता काही सुटत नाही. मला वाटतं बाकीची हत्यारं चालवायला त्याला काही तसा वेळ लागायचा नाही. अजून मला चांगलं कामं होतंय. मग साऱ्या प्रदेशात आम्ही घरं बांधू. कारण आता त्यांची फार गरज आहे. जर्मनांनी सारं काही उध्वस्त करुन टाकलंय. सारं काही पुन्हा पहिल्यासारखं उभं करायला कितीतरी वेळ लागेल. अन समजा, तोपर्यन्त माझे हातपाय थकले, चालेनासे झाले तर बरीस येतोच आहे हाताशी. या जंगलप्रदेशात सर्वात चांगला धंदा सुताराचा."

त्या वृद्ध, निष्णात सुताराला एकच आस लागून राहिली होती; एकाच गोष्टीचा ध्यास घेतला होता त्याच्या मनान. आपल्या मुलाना आपलं सारं कौशल्य, सारं ज्ञान द्यायचं. त्यानी सुतारकीचं शिक्षण आपल्या वडलांपासून घेतलं होतं. ते झारच्या सैन्यात शिपाई होते. पण बाबांनी मनात योजल्याप्रमाणे काहीच घडत



नव्हतं. मी त्यांचा मोठा मुलगा. मी ट्रक ड्रायव्हर झालो अन चाकाला चिकटून बसलो. हे खरं की मला सुट्टी असली, दिवस मोकळा असला की मी मी पुष्कळदा कुऱ्हाड घेऊन काहीबाही करीत असे. पण तो काही माझा व्यवसाय नव्हता. फावल्या वेळी मन रमवायचा छंद इतकंच त्याच्याबद्दल म्हणता आलं असतं.

आणि आता युरानं डोक्यात घेतलं होतं, घर सोडून मॉस्कोला जायच. काय म्हणाला होता तो ? "सगळा नीट विचार केला आहे मी." अजून किती लहान आहे तो ! त्याला काय कळतंय ! पण तोही आपल्या मोठ्या भावाच्या वळणावर गेला, त्यालाही स्वतंत्र व्हायचं आहे. बाबा लंगडत येरझारा घालीत होते; वाटेत वाळलेल्या काटक्या येत होत्या, त्या आपल्या धड पायाने दूर उडवीत होते. ते काहीतरी पुटपुटत होते, मधूनच शिव्याही देत होते.

कुठं काय बिनसलं होतं, बरीसला काही कळेना. तो धावतच घरात गेला, कुठं काय बिनसलं होतं ते समजावून घेतलं अन मग त्याचाही नूर अगदी उतरून गेला. "बाबा, युरा इतका बथ्थड डोक्याचा आहे. तो कधीही आपलं म्हणणं सोडणार नाही !" बाबा खचल्यासारखे झालेले पाहून, आईच्या डोळ्यातलं पाणी पाहून बरीसचा चेहरा कसनुसा झाला, तो पार हडबडून गेला.

"आता मग बघू या काय ते," बाबा म्हणाले आणि घराकडे जायला निघाले. त्याना काहीतरी मार्ग सापडला असावा.

घरात अगदी सामसूम, चिडीचीप होते. आई बरीच शान्त झाली होती. पण बाबांपाशी युराची वकिली करायला तिची हिंमत झाली नसती. ती जेवणाचं टेबल आवरीत होती; हातातून काही ना काही सारखं पडत होतं. 'गुन्हेगार' बाकावर बसला होता, खिडकीतून बाहेर कुठेतरी एकटक नजर लावून बसला होता.

"मी साव्वाला पत्र लिहितो," बाबा म्हणाले, "तो म्हणेल तो अखेरचा शब्द. त्याचं उभं आयुष्य मॉस्कोत गेलं आहे. त्यानं जर तुला हा सारा वेडगळपणा विसरून जायला सांगितलं तर तुला तेच करावं लागेल; मग तुला तुझं शिक्षण इथल्या शाळेतूनच पूर्ण करावं लागेल."

बाबांचे मोठे भाऊ सव्वेली उभारणी मंत्रालयात काम करीत. आई बाबांकडे आश्चर्याने पाहू लागली. साव्वा आणि त्याची बायको पाशा या दोघांचाही युरावर किती जीव होता त्यांना माहीत नव्हतं का ? आपला पुतण्या मॉस्कोत येऊन शिकावा यासाठी त्यानी इकडचा डोंगर तिकडे केला असता.

परंतु बाबांनी तिला मिस्किलपणानं डोळा घातला. जणू त्यांना म्हणायचं

होतं. काळजी करू नकोस, मी काही काल जन्माला आलेलं कुक्कुबाळ नाही. त्यांनी दौतटाक काढला अन ते लिहायला बसले.

मला वाटत एखादं घर बांधण्यापेक्षा त्याना ते पत्र लिहिणं जड गेलं असावं. त्यांनी काय लिहिलं मला माहीत नाही. पण युराचं मन वळवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करण्याबद्दल त्यानी काकांना लिहिलं असावं हे उघडच होतं.

युरानंच ते पत्र पोस्टात नेऊन टाकलं. मग त्या मागोमाग आली दीर्घ कंटाळवाणी प्रतीक्षा. नदी, जंगल सारं सारं विसरून गेला युरा. तो सारा वेळ घरीच राहू लागला. दुपारच्या जेवणानंतर पोस्टमन आमच्या रस्त्यावर येई. तो यायच्या अगोदरच कितीतरी वेळ फाटकात उभा राहून त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसे.

"आमचं पत्र आहे काही ?"

"तुमचं पत्र अजून लिहून तयार होतंय." पोस्टमनचं उत्तर ठरलेलं असे. पोस्टमन म्हातारा होता, तो नेहमी करडा सूट व किनाऱ्यावरचे पहारेकरी घालतात तशी हिरवी टोपी घालायचा. एक दिवस त्यानं दूरवरूनच युराला एक निळं पाकीट उत्साहानं हलवून दाखवलं.

युरानं त्याच्या हातातून पत्र हिसकावून घेतलं आणि धाडकन घरात आला; "हे पहा ! हे आलं साव्वा काकाचं पत्र."

"वाचून दाखव," बाबा म्हणाले. पत्र धरताना युराची बोटं कापत होती.

पत्राच्या सुरुवातीला नेहेमीप्रमाणे घरातील सर्व मंडळींना नमस्कार–आशीर्वाद होते. युरा वाचतावाचता पुढील मजकुरावर आला आणि त्याचा आवाज पडला. "युरा, व्यवसाय शाळेला अर्ज करायला तुला उशीर झाला आहे. या वर्षाचा प्रवेश बंद झाला आहे. शिवाय तुझी शाळा सहाच वर्ष झालीय; तिथं सातवी पास असावं लागतं ..."

"ऐक, शहाणी सुरती माणसं काय सांगतात ते ऐक," "बाबा जिंकल्याच्या आविर्भावात म्हणाले. "शाळेतली सात वर्षं इथं पुरी कर अन मग जा तुला कुठं जायचंय ते. तोपर्यंत घरी राहा अन् अभ्यास कर," बाबांच्या मनात विचार चालले होते, वर्षभर म्हणजे पुष्कळच अवधी मिळतो; तोपर्यंत आपण युराच्या डोक्यातलं हे वेड सहज काढून टाकू. साव्वा फार छान माणूस आहे ! अगदी सोळा आणे काम केलन् !

"थांबा ! इथं काय लिहिलंय् ऐका बाबा," युराचा श्वासोच्छवास जोर-जोरानं होऊ लागला. "अजून सारं काही बिघडलं नाही. तू जर ताबडतोब तिथून निघालास तर मग बघू या, काहीतरी खटपट लटपट करूच..." युरा बाबांकडे पाहू लागला, "पाहिलंत ? साव्वाकाकानी ताबडतोब निघून यायला सांगितलंय चला, माझी जुळवाजुळव करायला लागू या."



युरा आपली कागदपत्रं आणायला शाळेत गेला, पण शाळेने कागदपत्र देण्याचं नाकारलं त्या दिवशी संध्याकाळी इरैदा दिमित्रीयेव्ना शाळेच्या असिस्टंट प्रिन्सिपॉल आणि लेव मिखायलोविच आमच्या घरी आले. आईनं बरीसला पाठवून मला बोलावून घेतलं.

त्यानी सांगितलं: इतक्या चांगल्या विद्यार्थ्याला मुकावं लागलं तर शाळेला फार वाईट वाटेल. बोलणं बराच वेळ चाललं होतं. उतावळेपणानं काही तरी निर्णय घेऊ नकोस म्हणून ती दोघेही युराला समजवायचा प्रयत्न करीत होती.

"तू इथं सात वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केलास तर तेव्हासुद्धा तुला व्यवसाय शाळेत प्रवेश मिळेल." इरैदा दिमित्रीयेव्ना म्हणाल्या, "पण माझी तर तुला सूचना आहे, तू इथून दहावी पास हो."

युराचा हेका कायम होता. कोणीही त्याचं मन फिरवू शकलं नाही.

"इथल्या शाळेत राहायला का नको म्हणतोस तू ?" मी विचारलं, "घरी मी आणि झोया हातभार लावतो. तू फक्त अभ्यास करायचास. तुला कोणी काहीच म्हणत नाही."

युरा अगदी निकरावर आल्यासारखा झाला, "तू सुद्धा मला समजू शकत नाहीस का ?"

मी मग पुढे बोललोच नाही.

आमची साऱ्यांची सारी समजावणी म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ठरलं. त्याचे शिक्षक खिन्न होऊन निरोप घेऊन गेले. दुसऱ्या दिवशी युरा शाळेतून कागदपत्र घेऊन आला आणि आम्ही मॉस्कोची दोन तिकिटं काढली.

आम्हाला निरोप द्यायला आई-बाबा बाहेरच्या पडवीत आले. बरीस घरातच होता, मोठमोठ्यानं रडत होता. पण आपण का रडतोय् हे सांगण्याची त्याला लाज वाटत होती म्हणून तो वजावून सांगत होता: फार पोट दुखतय्....

बाबानी युराचा मुका घेतला: "ठीक आहे. जशी तुझी इच्छा. पण लक्षात ठेव, आपल्या नावाला कधी कमीपणा आणू नकोस !" मग ते आईकडे वळून तिला दरडावायाला लागले. "आता पुरे करा ! तुझ्या या दोन दिवसातल्या रडण्यानं समुद्र भरला असता." पण त्यांचे स्वतःचेच डोळे संशयास्पद रीतीनं चमकू लागले होते.

आईनं युराला घट्ट कवटाळलं अन् म्हणाली, "मुला, माझ्या हातातली गोष्ट असती तर मी तुला कधी दूर जाऊ दिलं नसतं."

"आता काय म्हणावं तुला ?" मीं तिला म्हटलं, "तो काय साता समुद्रापलिकडे चाललाय् का ? इथून मॉस्को तीन तासाच्या तर अंतरावर."

आम्ही फाटक ओढून घेतलं.

"वाल्या ऽऽ" आईची हाक आली.

मी मागे वळून तिच्याजवळ गेलो.

"त्याच्या शिक्षकांना सांग, त्याच्याशी अगदी कडक वागा म्हणून. कदाचित ते त्याला घरीसुद्धा पाठवतील परत. युरात फार जीव गुंतलाय माझा."

"ठीक आहे !" तिची नजर टाळीत मी पुटपुटलो.

□ □



## ६ : "चला, निघालो आपण"

स्टेशनची करड्या रंगाची इमारत व लाल टोपी घातलेला असिस्टंट स्टेशन मास्तर नजरेपासून दुर सरकत गेले, लहान लहान होत गेले.

"चला, निघालो आपण !"

युरा बोलला ते मी एकट्यानंच ऐकलं. गाडीत इतर लोक बसले होते त्यापैंकी कोणा एकाच्या तरी कानावर त्याचं बोलणं गेलं असेल की नाही शंकाच होती. त्यांच्यापैंकी एकजण अगदी सडसडीत होता, त्यानं मिशा ठेवल्या होत्या. त्याला एक हात नव्हता. अंगात लष्करी अधिकाऱ्याचा जुना शर्ट होता. पलीकडे एक तरूण स्त्री बसली होती.

त्यानंतर जवळजवळ बारा वर्षांनी सारं जग युराच्या तोंडचे हेच शब्द ऐकणार होतं. "चला, निघालो आपण !"

युरा खिडकीतून बाहेर पाहात होता. त्याला साऱ्याच गोष्टींची नवलाई वाटत होती. माझी बाही ओढून तो सारखा म्हणायचा, "पहा ! वाल्या पाहिलस्?"

आपल्या साऱ्या पंधरा वर्षांच्या आयुष्यात युरा प्रथमच खऱ्याखुऱ्या प्रवासाला निघाला होता. याच्या अगोदर क्लुशिनोपासून झात्स्कपर्यंत आणि झात्स्कपासून क्लुशिनोपर्यंत येवढीच त्याची मजल गेली होती. आगगाडीत असा तो पहिल्यांदाच बसत होता. कितीतरी दिवस त्याला आगगाडीच्या प्रवासाची स्वप्न पडायची. गाडी जुनाट होती त्यामुळे सारखी खडखडत होती. लढाईच्या काळात तिची जागोजाग दशा उडाली होती. गाडीत रुंद लाकडी बाक होते. खिडक्या अतिशय अस्वच्छ होत्या. त्यांच्यात कोळशांचे कण सांचले होते. वर्षानुवर्षांचा कचरा साचला होता यांच्यात.

हिरवीगार झुडपं भराभर मागे पडत होती. मधून मधून, कापणी केलेल्या

शेतातील पिवळसर खुंट दृष्टीस पडत होते. स्टेशनांच्या इमारती, घरं, शहरं, छोटी छोटी गावं नजरेच्या टप्प्यात येऊन दिसेनातशी होत होती. युराला सारं काही नवं होतं, साऱ्याचीच मोठी मजा वाटत होती.

मीही लष्करी गडी होतो हे त्या एक हाताच्या माणसानं माझ्या विटक्या लष्करी शर्टावरून ओळखलं. त्याला माझ्याबद्दल जवळीक वाटली असावी. त्यानं मृदू स्वरात विचारलं, "शिपाईदादा, तुम्ही या मुलाला कुठं घेऊन चाललात? अर्थात सांगायला तुमची हरकत नसली तरच सांगा."

"मॉस्कोला नेतोय, चलाख बनवायला."

"चांगली कामगिरी घेतलीत अंगावर," म्हणत तो माणूस युराच्या बरोबर समोरच्या खिडकीजवळ जाऊन बसला. "मुला, पहिल्यांदाच प्रवासाला निघालास का तू? मी सांगतो तुला या साऱ्या भागाची माहिती. ही गाडी ज्या प्रदेशातून जाते त्या साऱ्याच प्रदेशाची कथा ऐकण्यासारखी आहे. या साऱ्या भागात किती अमाप रक्त सांडलंय, पूर्वीच्या काळी आणि आता आपल्याही काळी. लवकरच बरोदिनो येईल. बरोदिनो म्हणजे रशियाच्या चिरंतन गौरवाची भूमी. कुतुझोवचं नाव ऐकलं आहेस का तू? तुला माहिती हवं, रस्त्याच्या डाव्या बाजूला, गरूडपक्षी असलेलं एक स्मारक दिसलं की समजावं बरोदिनो आलं म्हणून." त्यानं खिशात शोधाशोध केली आणि तंबाखू काढली. ती माझ्यापुढे करीत म्हणाला, "शिपाईदादा, दोनचार झुरके ओढा मित्रा, कोणच्या तुकडीत होतास तू?"

"वाल्या रणगाड्यावर होता," मी काही बोलण्याअगोदरच युरानं सांगून टाकलं. "एका टी–३४ रणगाड्यावर तो गनर होता."

"मग तुझं माझं जमलं. मीही तोफखान्यावरच्या कामाला होतो," त्याच्या मोकळ्या बाहीला सेफ्टी पिन लावलेली होती. तिच्याकडे पाहून तो मान हलवीत म्हणाला, "बोरोदिनोच्या रणभूमीवर मी माझा एक हात ठेवून आलो. कॅप्टन तुशिनची गोष्ट ऐकली आहेस कधी? आम्ही सारे त्याच्यासारखेच होतो..."

आमचा प्रवासी दोस्त चांगलाच संभाषणचतुर निघाला. वाटेत लागणाऱ्या प्रत्येक लहानसहान गावाचं, खेड्याचं नाव त्याला माहीत होतं. त्या प्रत्येकाच्या सुरस कथा त्यानं आम्हाला ऐकवल्या.

"तुम्ही शिक्षक आहात?" युरानं विचारलं.

"नाही. मला माझ्या देशाच्या इतिहासात स्वारस्य आहे. सध्या हिशेबनीस म्हणून काम करतो मी," आपल्या एका हाताचा चातुर्यानं उपयोग करून त्यानं सफाईनं आणखी एक विडी वळली. मग खिडकीतून बाहेर खूण करीत म्हणाला, "पेत्रिश्चिवो त्या तिथं आलं."

युरा उडी मारून उभा राहिला. "झोया या पार्टिझन मुलीचा जिथं त्यांनी शिरच्छेद केला ते गाव?"



"तेच ते."

मॉस्को स्टेशनवर आम्ही त्याचा निरोप घेऊ लागलो तेव्हा त्यानं आपला हात युराच्या माथ्यावरून फिरवला अन् म्हणाला, "मुख्य गोष्ट अशी की कधीही खचून जायचं नाही. ज्या रस्त्यानं तुला राजधानीत आणून सोडलं त्या रस्त्याची आठवण कर. तो तुला नेहमी स्फूर्ती देत राहील, धीर देत जाईल."

"वाल्या, ते कॅप्टन तुशिनोबद्दल काहीतरी सांगत होते. कोण हा कॅप्टन तुशिनो?"

"बहुधा एखादा वीरपुरुष असावा."

आम्ही 'मेट्रोत' पाऊल ठेवलं. खूपच गर्दी होती. पायऱ्यावरून व जिन्यावरून लोकांच्या झुंडीच्या झुंडी खालीवर ये जा करीत होत्या.

"वाल्या हे सारेजण कुठं पळताहेत?"

"इथे वेळेची किंमत फार असते, प्रत्येक मिनीटाला मोल असते. म्हणून ते पळताहेत."

मी युराचा हात घट्ट पकडला होता. माझ्या दुसऱ्या हातात त्याची प्लायवुडची लहानशी पेटी होती; बाबांनी बनवली होती त्याच्यासाठी. त्या पेटीत माझ्या भावाची सारी मालमत्ता होती. युरा आश्चर्याने चकावला होता त्याला प्रत्येक गोष्ट बघायची होती. मेट्रोची भुयारी स्टेशनं संगमरवरी राजवाड्यासारखी होती. भिंतीवर उत्कृष्ट चित्र काढली होती. 'मेट्रो' चे डबे निळ्या रंगाचे होते. सगळीकडे माणसंच माणसं होती. युराला ते सारं बघायचं होतं.

मॉस्कोत मी त्याच्या अगोदर चारपाचदाच काय तो गेलो होतो. राजधानीतले ते सारे नीटनीटके चांगले कपडे घातलेले लोक पाहून मला माझ्या कपड्यांची जाणीव झाली. माझ्या जुन्या, विटक्या लष्करी शर्टात मी त्यांना कसा काय दिसत असेन याची कल्पना करू लागलो. युरानं एक हलका सुती शर्ट आणि हलकी पँट घातली होती. त्याचे केस बारीक कापलेले होते. लोक युराकडे पहात होते; मीही त्यांच्या नजरेनं त्याच्याकडे पाहून घेतलं. माझ्या मनात अनेक दुष्ट शंका उसळल्या. काय करतो आहोत आम्ही इथं? येवढ्या मोठ्या राजधानीत युराला हव असलेलं मिळणार का? मला एकदम असुरक्षित वाटू लागलं. मी एकदम असहाय झालो आणि मुकाट्यानं एक आवढा गिळला. युरानं माझा हात घट्ट पकडून ठेवला.

"जरा समोर बघ."

"रस्ता अडवता आहात तुम्ही."

लोक आम्हाला उद्देशूनच बोलत होते.

शेवटी एकदाचे आम्ही 'मेट्रो'च्या डब्यात चढलो. डब्यात पाय ठेवायला जागा नव्हती. आमच्या कुशीत कोपरं घुसत होती. मी आणि युरा समोरासमोर

उभे राहिलो. माझ्या मनातल्या दुष्ट शंका अन तापदायक विचार बाजूला सारावेत म्हणून मी युराला बर्लिनच्या भुयारी रेल्वेची माहिती सांगायला सुरुवात केली, पुढाच्या अखेरीअखेरीस ती रेल्वे मी पाहिली होती. तिथली भुयारं अरुंद होती, गाडीत वर्णन करण्याजोगं काही नव्हतं; भुयारी स्टेशनं संगमरवरी राजवाड्यासारखी तर मुळीच दिसत नव्हती.

"मला वाटलंच होतं! आपली 'मेट्रो' सर्वात छान आहे याची पक्की खात्री होती माझी." युरा म्हणाला.

सोकोल स्टेशनवर उतरून आम्ही आमच्या काकांच्या घरी गेलो. 'पाशा' काकीनी दार उघडलं अन् ती म्हणाली, "आले तुम्ही अखेरीस. आम्हाला कळेना काय चाललंय् तुमचं. आज तुमचे काका कामावर जाताना सांगून गेले होते. आज तुम्ही आला नसतात तर संध्याकाळी तार करणार होतो आम्ही."

काकीची धांदल उडाली होती. तिनं आम्हाला टेबलापाशी बसवलं. "जरासं खाऊन घ्या आता. तुमचे काका आणि मुली घरी आल्या की मग 'मेजवानी' करू."

काकीचा पाय एका जागी ठरत नव्हता. स्वयंपाकघरातून आतबाहेर आतबाहेर खेपा चालल्या होत्या. तिनं गरमागरम सूप, ब्रेड आणि फराळाचे वेगवेगळे जिन्नस टेबलावर आणून ठेवले.

युराला नवलाई वाटत होती, तो चकित होऊन टेबलाकडे पहात होता. इतक्या प्लेटी, बशा, काटे, चमचे; खाण्याच्या पदार्थांबद्दल तर बोलायलाच नको. युरानं काय किंवा मी काय, कधीच पाहिले नव्हते. संधी सापडताच तो माझ्या कानात कुजबुजला, "फार खाऊ या नको; त्यांच्याही घरात बरीच माणसं आहेत."

कोण जाणे कसं, पण युराचं कुजबुजणं पाशाकाकीला ऐकू गेलं खरं ती युराजवळ आली अन् त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाली, "हे असं वेड्यासारखं पुन्हा बोलायचं नाही कधी; कळलं ना?"

युरा बीटरुटसारखा लाललाल झाला. "काकी, माफ कर! माझं चुकलं!" तो म्हणाला.

मी त्याच्याकडे नजर टाकली. काकी हसली अन् म्हणाली, "असू दे युरा तू मनावर घेऊ नकोस. हलके हलके तू रुळशील आमच्यात. कसं काय आवडलं मॉस्को तुला?"

"मला सगळं आवडलं. एकच आहे, सगळीकडं. फार माणसंच माणसं आहेत."

"हळू हळू त्याचीही तुला सवय होईल."



लवकरच साव्वाकाका घरी आले तोन्या आणि लिदा या आमच्या चुलत बहिणीहि कामावरून परत आल्या. त्या दिवशी संध्याकाळी सारं कुटुंब जेवायला होतं. जेवण अन् सारंच काही झकास जमलं होतं. तो शनिवार होता. दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी तोन्या आणि लिदा युराला मॉस्को दाखवायला घेऊन गेल्या त्यानी त्याला लाल चौक, ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय आणि प्राणी संग्रहालय दाखवलं. युराला गर्दीची, मॉस्कोच्या धावपळीची सवय नव्हती. संध्याकाळी तो अगदी पुरा थकून गेला. रात्री बिछान्यावर पडताना तो पुटपुटला, "मॉस्कोत इतकं पहायला आहे हे माहीत असतं तर मी याच्या अगोदरच इथं आलो असतो."

सोमवारी साव्वाकाका, मी आणि युरा मॉस्कोतल्या साऱ्या व्यावसायिक शाळातून जाऊन आलो. प्रत्येक ठिकाणी एकच उत्तर मिळत होतं

"या वर्षीच्या जागा भरून झाल्या आहेत. शिवाय आम्ही फक्त सातवी पास झालेल्या मुलानाच प्रवेश देतो."

युरा नाउमेद झाला. "बाबांचंच म्हणणं खरं ठरलं. मला परत एक वर्ष पहिल्या शाळेत जावं लागणार."

पाशा काकीही अस्वस्थ झाली. परंतु तिनं त्याला धीर द्यायचा प्रयत्न केला. "काही बिघडलं नाही काही ना काही तरी निघेलच याच्यातून तुला कोणीच शाळेत घेणार नाही यांवर विश्वास बसणार नाही माझा."

संध्याकाळी तोन्यानं चांगली बातमी आणली. "ल्युबेर्त्स्कीत एक व्यावसायिक शाळा आहे. स्थानिक शेतकी–यंत्र–कारखान्याला ती जोडली आहे. त्या शाळेत सहावी पास झालेली मुलं घेतात. उद्या सगळ्यात प्रथम आपण त्या शाळेत जाऊ. उद्या सुटी घेतली आहे मी."

शाळेत आमचं थंड स्वागत झालं. प्रवेशासाठी एकच गर्दी उसळली होती. कुमारवयीन मुलं व्हरांड्यातून हिंडत होती. नव्यानव्या बातम्या आणीत होती.

"इथे म्हणे फक्त अनाथ मुलानाच प्रवेश देतात."

"फक्त मॉस्कोतल्या मुलाना घेणार आहेत ते."

"रिपोर्ट कार्डावर एक जरी 'सी' दिसला की संपलातच तुम्ही. तुमचा अर्ज हातात धरायला कोणी तयार होत नाही."

शेवटची बातमी बरीचशी खरी होती. ज्यांच्या रिपोर्टात, 'सी' होते त्याना त्यांचे अर्ज परत दिले होते.

तोन्या मास्कोत पक्की रूळलेली. तिला परिस्थितीचा ताबडतोब अंदाज आला. "युरा. मान ताठ ठेव. आपण तुला नक्की प्रवेश मिळवून देणार. तुला सगळीकडे 'ए' शेरा आहे. फक्त मास्कोतल्याच मुलाना ते घेणार वगैरे सारं झूट; बंडल आहे ते. खरं समजू नकोस."

झालंही तसंच. प्रवेश मंडळाने युराचं कार्ड पाहिलं आणि त्याला परीक्षेची तयारी करायला सांगितलं. चार विषयांची परीक्षा होणार होती; रशियन व्याकरण, निबंध, साहित्य आणि गणित.

"पण वसतीगृहात जागा मिळण्याची आशा ठेवू नकोस;" चिटणिसानी सावधगिरीची सूचना दिली, "जागा शिल्लक नाही."

ठीक आहे, निदान परीक्षेला बसायला सांगितलं; पुष्कळ झालं. पण मग मी अंदाज घेतला; युराची रहाण्याची व जेवणाची कुठं तरी खाजगी रीत्या सोय करावी लागली तर किती खर्च येईल ? त्यातून दुसरा अंदाज अपरिहार्य ठरत होता. त्यावर्षी एखाद्या व्यावसायिक शाळेत दाखल होण्याचं स्वप्न युराला सोडून द्यावं लागलं असतं. संध्याकाळी पाशाकाकीशी माझं त्या विषयावर बोलणं झालं. मी तिला माझा अंदाज आणि शंका बोलून दाखवली. काकी नुसती नाराजच झाली नाही तर चांगलीच रागावली; मग म्हणाली, " युरा राहील आमच्यापाशी; तो काही प्रश्न नाही. मुख्य प्रश्न आहे परीक्षेच्या तयारीचा."

पहिली परीक्षा तीन दिवसावर होती. घरात अगदी शांतता होती. सारीजणं आवाज न करता वावरत होती. मधून पाशाकाकी युराजवळ जाऊन त्याच्या हातातलं पुस्तक काढून घ्यायची; अन् म्हणायची, "जा जरा, मोकळ्या हवेवर फिरून ये. अर्ध्या तासानं ये आत."

त्या घरात साऱ्यांनी युराकडं किती लक्ष पुरवलं, त्याची किती काळजी घेतली ते मी कधीही विसरणार नाही. शेवटी एकदा परीक्षेचा पहिला दिवस उजाडला.

"छान लिही, युरा !" आम्ही सर्वजण म्हणालो.

तीन मुलांनंतर त्यानी युराला बोलावलं. वर्गाबाहेरच्या व्हरांड्यात मी व तोन्या गंभीर चेहेरे करून वाट पहात थांबलो.

"ते त्याला वाटाण्याच्या अक्षदा देतील. मॉस्कोतल्या या मुलांकडं पहा, युरा मुळीच त्यांच्यासारखा वाटत नाही."

पण तोन्या आशावादी होती: "तो पास होईल. मी ओळखलंय त्याला. अन् तो काही घाबरणारा, बुजणारा मुलगा नाही. मुख्य म्हणजे त्याचे विषय चांगले पक्के आहेत."

युरा बाहेर पडला तेव्हा त्याचे गाल लाल झाले होते. त्याच्याबरोबर कोणी एक परीक्षकही होते "तुझ्या बरोबर कोणी तुझे नातेवाईक आले असतील ना ? दाखव मला," ते म्हणत होते. ते चांगले तालीमबाज वाटत होते. चाळिशीच्या



पुढे सरकले असावेत. आमच्यापाशी आल्यावर ते हसले आणि म्हणाले, "युराचं व्याकरण फार छान आहे. आम्ही त्याला पुस्तकाबाहेरचे कितीतरी प्रश्न विचारले तो काय उत्तर देतो ते पहायचं होतं आम्हाला. फार छान उत्तर दिली आहेत त्यानं. खरं सांगायचं तर त्याची परीक्षा घेताना आम्हाला आनंद वाटला आणि समाधान झालं. आम्ही तुझी पुढच्या परीक्षेसाठी वाट पहातो युरा. छान लिही."

मला वाटतं, त्या दिवशी माझा भाऊ म्हणजे साऱ्या जगातला सर्वात आनंदी माणूस होता. पाशाकाकीनं दार उघडलं तेव्हा परीक्षेच्या निकालाची तिला किती काळजी लागून राहिली होती, कोणालाही समजलं असतं. युरानं तिच्या गळ्यात हात घातले आणि आनंदानं उद्गारला: "मला 'ए' मिळाला ऽऽ !"

"अरे अरे जरा जरा बेतानं ! जीव घुसमटला माझा युरा" काकी म्हणाली; चिन्तेचं ओझं दूर झाल्यानं मनापासून हसली

"पहिल्यांदा मी घाबरलो होतो. पण सारे प्रश्न अगदीच सोपे होते मग माझी भीती पार गेली."

त्या दिवशी माझ्या चुलतबहिणींनी सिनेमाची तिकिटं काढून आणली. युराला पहिला 'ए' मिळाला तो साजरा करायला आम्ही बाहेर पडलो.

लवकरच माझी रजा संपत आली. मी झात्स्कला जायला निघालो. आमच्या काकीनं साऱ्यांसाठी काय काय भेटी दिल्या होत्या ! त्या घेऊन आणि 'मॉस्कोतले आपले नातेवाईक किती चांगले, किती उदार आहेत' हा विचार मनात घोळवीत मी परत निघालो. तशी त्यांची मिळकत बेताचीच होती, घरही साधेसेच होते पण त्यानी आम्हाला शाही इतमामाने वागवले होते. युरा पहिली परीक्षा जशी उत्तम रीतीने पास झाला तशाच त्याच्या बाकीच्याही परीक्षा होतील अशी मला आशा वाटत होती. सगळ्या बाजूनी विचार केला तर युराची काळजी करायला काही कारण दिसत नव्हतं. काका काकी त्याचं चांगलं करतील याबद्दल मला शंका नव्हती.

मी झात्स्कमध्ये पोहोचलो आणि घराच्या रस्त्याने चालू लागलो. घरातले लोक काय करीत असतील याचा विचार करीत होतो. कदाचित मॉस्कोत आमचं काय चाललय् याची काळजी करीत असतील.

आई, बाबा आणि बरीस बागेत होते, काकड्या तोडीत होते. फाटक करताच तिघांनीही मागं वळून पाहिलं.

"काय ? कशी काय आहे मॉस्कोची हालहवाल ?" बाबानी विचारलं.

"सारं काही अगदी उत्तम."

त्यानी मला हजारो बारीक बारीक प्रश्न विचारले. त्या साऱ्यांची मी तपशीलवार उत्तरं दिली. त्यानी जर खोदून खोदून इतके बारीक सारीक प्रश्न

विचारले नसते तर त्या गोष्टींची मला आठवणही झाली नसती, मॉस्कोत आम्हाला कोणकोणत्या ' अग्निदिव्यां'तून जावं लागलं, आम्ही कोणकोणते 'विजय' मिळवले सारं त्यांना सांगितलं. सर्वांत महत्त्वाचा विषय अर्थातच युराची परीक्षा हाच होता.

"तू काय सांगितलंस ? युराला 'ए' शेरा मिळाला ?" बाबांच्या विचारण्यात अभिमान जाणवत होता. त्यांनी बरीसकडे एक करडी नजर टाकली. "म्हणजे मी त्याला काय सांगितलं ते त्याच्या लक्षात आहे तर ! आपल्या नावाला कमीपणा आणणारं काही करू नकोस म्हणून बजावलं होतं मी त्याला."

आईपण अगदी खूष झाली; पण युरा घरातून गेलाय् या वस्तुस्थितीशी तिला जुळवून घेता येत नव्हतं. आमच्या नातेवाईकांनी युराचं प्रेमानं छानदार स्वागत केलं याचा तिला सर्वांत जास्त आनंद झाला होता.

माझं सांगून झाल्यावर बरीस येवढंच म्हणाला, "सारं सोडून, मुद्दाम उठून ल्युबेर्त्स्कीला जायचं तोन्याचं काय नडलं होतं ? कशाला केली तिनं ही नसती उठाठेव ?"

"चूप बैस," बाबांनी त्याला लागलीच अडवलं, "कोणी तुमच्याशी प्रेमानं आपुलकीनं वागलं तर त्याच्याबद्दल असं बोलायचं ?"

बऱ्याच दिवसांनंतर पोस्टमन आमच्या दाराशी थांबला. "आजचा दिवस चांगला जाणार. तुमच्या मुलानं ठरवलंय् तसं पत्र आहे त्याचं."

युरानं लिहिलं होतं; त्याला दुसऱ्याही परीक्षात " ए " शेरा मिळाला होता पण त्याला लेथ ऑपरेटर किंवा फिटर यांच्या गटात जागा दिली नव्हती. युराला ते हवं होतं. पण त्याची सातवी झाली नव्हती म्हणून त्याला त्या गटात पाठवलं नव्हतं. त्याला फाऊंडरच्या गटात पाठवलं होतं." हेही काम मोठं मजेदार आहे. मॉस्कोमधला पुष्किनचा पुतळा ओतणारे ओतारी म्हणजे फाउंडरच होते.

शाळेनं त्याला गणवेश दिला होता. युरानं गणवेशात आपला फोटो काढून घेतला होता. पुढच्या पत्राबरोबर आम्हाला त्याची कॉपी येणार होती. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याला अतिशय उत्तम मार्क पडल्याने शाळेच्या वस्तीगृहात जागा देण्यात आली होती.

एके दिवशी संध्याकाळी लेव मिखायलोविच वेस्पालोव सहज भेटायला म्हणून आले होते. बाबांनी त्यांना युराचं पत्र दाखवलं.

"छान ! कामगारवर्ग वाढत चालला आहे." वेस्पालोव म्हणाले, "तो अभ्यासात नाव कमावणार यात मला कधीच संदेह नव्हता, मला फार आनंद वाटतो. युरी गागरिनला माझ्या सदिच्छा कळवा."



युराच्या नावाचा असा संपूर्ण आदरपूर्वक उल्लेख कोणीतरी करण्याची ही पहिलीच वेळ होती. आमच्या कानाला ते काही वेगळंच लागले.

जेव्हा तुमच्या फार जवळची व्यक्ती घर सोडून जाते, एक दोन दिवसांकरता नव्हे तर काही वर्षांकरता, तेव्हा तिचा विरह अंगवळणी पडायला फार जड जातं. आम्ही युराला निरोप देऊन बसलो पण मग चटकन लक्षात आलं. प्रत्येकाला युराची केवढी सवय झाली होती ! तो गेला अन् कोणाला काही सुचेना, करमेना.

बरीस किती कष्टी झाला होता ते तर उघड उघडच दिसतं होतं. त्या दोघा भावात सारं दोन वर्षांचं तर अंतर होतं. साहजिकच त्या दोघांचं फार मेतकूट जमायचं. वर्गातली मुलं, मित्र, आई, वडील यांच्यापासून लपवून ठेवलेली सारी रहस्यं एकमेकांची एकमेकांना माहीत असायची. शिवाय युरा जवळपास असला की कधी कंटाळा येण्याचा, 'बोअर' होण्याचा प्रश्न नसायचा. युराचं वाचन दांडगं होतं अन त्याला खूप माहीतही होतं. खेळात तो नेता ठरलेला असायचा. बरीसला कधी पिटाई मिळण्याचा धोका निर्माण झाला की त्याचा मोठा भाऊ नेहमी त्याच्या पाठीशी उभा राही.

युरा गेल्यापासून बाबा विलक्षण बदलले होते. ते अधिक विचारमग्न अधिक शांत झाले होते. खरं वाटायचं नाही पण ते हळुवारही झाले होतं. त्यांच्या वागण्यात दुसऱ्याची जाणीव जास्त दिसू लागली होती. अजुनही त्यांच्याशी वाद घालणं निरर्थक ठरलं असतं त्यांना विरोध करून फायदा होणार नव्हता. ते आपला मुद्दा कधीच सोडत नसत. पण हे सारं जमेला धरूनही ते बदलले होते खास.

आईबद्दल सांगायचं तर युराची अनुपस्थिती इतर कोणाहीपेक्षा तिला फार तीव्रतेनं जाणवत होती. सारा दिवस तिच्या मनात युराचे विचार घोळत असत. कधी स्वप्नात युरा दिसला की ती आम्हाला तिचं स्वप्न सांगे. मग विचार करीत राही, स्वप्नात असं दिसणं चांगलं का वाईट ?

युरावाचून मलाही चुकल्या चुकल्यासारखं वाटत होतं.

संध्याकाळी आम्ही सारेजण जमलो की युराचा विषय हटकून निघे. आम्ही त्याच्या लहानपणच्या खोडचा आठवत असू. त्या साऱ्यांकडे आता जणु दूर अंतरावरून पाहताना आमचं आम्हालाच आश्चर्य वाटे. या खोडकरपणाबद्दल त्याला कसं बोलून घ्यावं लागलं होतं, कधी कधी कशा शिक्षाही झाल्या होत्या; आता तो दूर गेला होता. जुन्या संघर्षावर पडदा पडला होता.

आता सारेजण पोस्टमनची अगदी अधीरपणानं वाट पहात. पत्र लिहिण्याच्या

बाबतीत युरा अतिशय नियमित आणि व्यवस्थित होता. आईबाबा त्याचे प्रत्येक पत्र अगदी काळजीपूर्वक वाचीत अन् त्याची अनेक पारायणं करीत; कोणी तरी पहायला हवं होतं ते. पत्रातल्या प्रत्येक प्रश्नावर दोघंजण चर्चा करीत.

व्यावसायिक शाळेतल्या प्रत्येक विद्यार्थ्याला महिन्याला ३० रुबल पगार मिळे. जून्या काळात त्याची किंमत 'पॉकेट मनी' च्या वर नव्हती. पहिला पगार झाल्यावर युरानं त्यातले १५ रुबल घरी पाठवले होते.

आईनं कागदावर सही केली. रक्कम जरा भरघोस दिसावी म्हणून पोस्टमननं तिला एकेक रुबलच्या पंधरा नोटा दिल्या. आईला रडू फुटलं.

"आता तुला रडायला काय झालं?" बाबा पुटपुटायला लागले, "त्यानं तुला पैसे पाठवले म्हणजे त्यांचं ठीक चाललंय् हे उघडच आहे, नाही म्हटलं तरी त्याच्या जेवणाखाण्याची सोय शाळाच करते. मी जातो अन् बाटली घेऊन येतो युराचा पहिला पगार साजरा करू या सारेजण."

"काही नको!" आई काहीशी चिडून म्हणाली, मग तिला हुंदके यायला लागले. ती म्हणाली, "मला वाईट वाटलं ते त्याचं लहानपण संपलं म्हणून!"

युरा वारंवार पत्र लिहायचा त्याची पत्र जपून ठेवली नाहीत म्हणून मला आता वाईट वाटतंय् त्याची जी काही थोडीशी पत्र मिळाली त्यावरून पण मुख्य म्हणजे आठवणीतूनच आम्ही मागच्या दिवसाचं चित्रं पुन्हा जुळवलंय्.

एकदा युरानं लिहिलं होतं, 'फाऊंड्रीमधलं काम मला फार आवडतं.' निकोलाय क्रिपोव या आपल्या शिक्षकाबद्दल त्यानं फार उत्साहाने लिहिलं होतं. क्रिपोव फाऊंड्रीमधले अनुभवी कामगार होते. युराच्या पत्रात त्याच्या मित्राची, वसतीगृहातल्या जीवनाची हकिकत असायची.

"एकेका खोलीत पंधराजणं राहातात. फार दाटी होत असेल तिथं." आई म्हणाली अन तिनं सुस्कारा सोडला.

"मग काय झालं त्यात? कुठे बिघडल? दुसऱ्या लोकांबरोबर राहायला शिकू दे त्याला. युरा शहाणा आहे, तो सर्वांशी जमवून घेईल," बाबा म्हणाले.

लवकरच युराचा, त्याच्या मित्रांबरोबर काढलेला एक फोटो हातात आला. साऱ्या मुलांच्या अंगात 'ग्रेटकोट' होते. त्याना चकचकणारी धातूची बटनं होती. नजरेत ठसठशीत भरावा असा टोपीचा कोन होता. प्रत्येकाच्या पोशाखावर तरुण कामगारवर्गाची निशाणी होती, फुली मारल्यासारखे ठेवलेले दोन हातोडे.

बरीसला युराचा हेवा वाटला, जड निःश्वास टाकून तो म्हणाला. "युरा अगदी एखाद्या अधिकाऱ्यासारखा दिसतो."

"आपणही तिथं जावं असं वाटत नाही का तुला? तू जर शाळेत चांगला अभ्यास केलास तर तुलाही त्याच्यासारखं होता येईल," झोयानं त्याला सुनावलं.



तेव्हापासून बरीसच्या अभ्यासात फार सुधारणा झाली. घरचा अभ्यास तो चुकवेनासा झाला. त्याचं वाचनही वाढलं. आता त्याच्या रिपोर्टात 'सी' आणि 'डी' कमी कमी होऊ लागले. त्याला चांगले मार्क मिळू लागले. युरा त्याच्यापुढे चांगला आदर्श ठरला.

नव्या वर्षाच्या अगोदर युराचं पत्र आलं होतं ते मला आठवतय. युरा कोम्सोमोलमध्ये दाखल झाला होता त्याबद्दल त्यानं फार उत्साहानं लिहिलं होतं. दुसऱ्या एका पत्रात लिहिलं होतं; त्यानं आणि त्याच्या काही मित्रानी एका संध्याकाळच्या शाळेत ७ वीच्या वर्गात नाव घातलं होतं.

मॉस्कोत, १९४९ च्या ऑगस्टमध्ये मी आणि युरा एकमेकांपासून दूर झालो. त्यानंतरच्या त्याच्या उरलेल्या अठरा वर्षांच्या आयुष्यांत माझा आणि त्याचा एका छपराखाली राहाण्याचा योग आला नाही. आम्ही एकमेकाना पत्र पाठवीत होतो, टेलिफोनवर बोलत होतो, सुट्टीच्या दिवसात एकमेकाना भेटत होतो घरात कांही खास प्रसंग असला की सारे एकत्र जमत होतो

आणि म्हणूनच यापुढच्या भागात मी जे काय लिहीन त्यात युराच्या जीवनाची सारी हकिकत येणार नाही. मी स्वतः डोळयानी जे काय पाहिलं किंवा आई, बाबा, बरीस, झोया यांच्याकडून जे काय मिळालं त्यासंबंधीच फक्त मी लिहिणार आहे.

□ □

## ७ : युरा : एक कामगार

आमची तिन्ही कुटुंब आई, बाबा आणि बरीस, झोया दिमित्री आणि त्यांची मुलं, माशा आणि मी–यूरा सुट्टीत प्रथमच घरी येणार होता म्हणून त्याच्या स्वागताच्या तयारीला लागली होती. मी तीन कुटुंबाचा उल्लेख केला तो तितकासा बरोबर नाहो. झोया आणि मी आता मोठे झालो होतो; आमची मुलंबाळं वाढत होती; माझं स्वतःचं वेगळं घर होतं; तरीही आम्ही सारे स्वतःला एकच कुटुंब समजत होतो. केवळ सुट्टीच्याच दिवशी नव्हे तर आठवड्यातल्या इतर दिवशीही आम्ही वारंवार बाबांच्या घरी एकत्र जमत असू.

युरा आल्यावर प्रत्येकानं त्याला कवटाळलं, त्याचा मुका घेतला. मग घरातल्या बायका गोडधोड बनवयाला स्वयंपाकघरात गेल्या. आम्ही पुरुषमंडळी बाहेर पडवीत बसून सिगरेट ओढायला लागलो; काहीतरी, महत्त्वाच्या नाहीत पण आवश्यक अशा गोष्टींवर बोलू लागलो.

"मुला, अगोदर मला तुझे हात दाखव."

युराच्या चेहेऱ्यावर ऐसपैस हसू पसरलं. बाबांच्या तपासणीसाठी त्यानं हात पुढे केले. बाबांनी त्याचे तळवे बोटांनी चाचपून पाहिले; हाताला पडलेले कठीण घट्टे त्याना जाणवले, मग ते समाधानाने म्हणाले, "कुऱ्हाड चालवली की हात असेच होतात. तू काही उनाडक्या करीत नाहीस असं दिसतंय्. चांगला कामगार होशील तू."

घर शान्त, प्रसन्न होतं. रस्त्यापलिकडच्या घरात मंद दिवे तेवत होते. युरानं आपला ग्रेटकोट आणि टोपी काढून पडवीच्या कट्ट्यावर ठेवली. मग त्यानं केसावरून कंगवा फिरवला. त्याचे केस चांगले वाढले होते.

"घरी बसण्यात मोठी गंमत असते," युरा म्हणाला.



बाबांनी त्याच्याकडे बारकाईनं पाहिलं. त्यानी जे काय पाहिलं त्यावर खूष झाले. युराच्या शर्टाला कुठेही, नको असलेली दुमड पडली नव्हती. "बरीस म्हणाला ते खरंय्; तू एखाद्या ऑफिसरसारखा दिसतोस."

"तुला सर्दी होईल, युरा," मी म्हटलं.

"नाही होणार. दररोज सकाळी मी थंड पाण्याची 'शॉवर' घेतो ती कशासाठी ? बाल्या, तू सिगरेट का सोडून देत नाहीस ? सिगरेट ओढल्यानं चांगलं काही होत नाही, तुला तर माहीतच आहे."

माशा कुठे जवळपास नाही ना पहाण्यासाठी मी मान वळवली. मी सिगरेट सोडावी म्हणून माशा आणि आई रात्रंदिवस माझ्या मागे भुणभुण लावायच्या त्यात आता युराची भर पडली असती. एकटे बाबा काय ते माझ्या बाजूचे. ओठाच्या कोपऱ्यात सिगरेट धरलेली नाही असा बाबांचा चेहेरा कल्पनेतही माझ्या नजरेसमोर येत नव्हता. ते स्वतः गावरान तंबाखू पिकवीत अन् त्याच्या सिगरेट वळत. बाबानी बनवलेल्या सिगरेट एकदम कडक असत हे मला कबूल करायलाच हवं.

"मग काय म्हणतोस तर तू ? तुला घरातून गेल्यावर चुकल्याचुकल्या सारखं वाटलं ?"

"अर्थातच ! मला वाटतंय् आता उठावं अन् मासे पकडायला जावं."

"मुला, एक गोष्ट कधीहि विसरू नकोस. घरासारखी जागा नाही दुसरी"

युरा घरातून गेला या वस्तुस्थितीशी जुळवून घेणं बाबाना फार कठीण जात होतं आता मुलाच्या तोंडचे हे उद्‌गार ऐकून त्यांचं मन निवलं.

बायकानी आम्हाला घरात बोलावलं. आम्ही टेबलाभोवती आपापल्या जागा घेतल्या. खूपच गडबड चालली होती आमची. झोयानं युराला त्याच्या शाळेबद्दल माहिती सांगायला सुचवलं. प्रथम त्यानं तिचा प्रश्न झटकून टाकायचा प्रयत्न केला; म्हणाला मला जाऊन कुठे असे फारसे दिवस झाले आहेत ? त्याला साऱ्या गोष्टींची माहितीसुद्धा नव्हती म्हणे. पण थोड्याच वेळात तो स्वतःच त्या विषयात गुंगला. व्यावसायिक शाळेतल्या मुलांचं जीवन किती व्यवस्थित होतं ते त्याच्या सांगण्यावरुन आम्हाला कळलं. शाळेचे वर्ग अगदी स्वच्छ होते; कारखान्यातले कामगार कामाच्या बाबतीत जागरूक होते; विद्यार्थ्यांना दिवसातून चारदा खायला दिले जाई; जवळच क्रीडागृह होते, प्रत्येक विद्यार्थ्याला–तिथे इच्छेअनिच्छेचा प्रश्नच नव्हता–काही ना काही क्रीडा प्रकारात भाग घ्यावाच लागे. ते समजण्याजोगे होते. कामगार म्हटला की तो धडधाकट, सशक्त असलाच पाहिजे.

युरा उत्साहानं, रंगून बोलत होता. आईनं एक निःश्वास टाकला अन् ती म्हणाली, "तुला त्या जीवनाची गोडी लागलीय्. आता तू क्षात्स्कला कधीही

घरतायचा नाहीस. आता तू तिकडचाच झालास."

"आई, माझं शिक्षण संपलं की ते मला कुठं पाठवतील हे मला माहीत नाहीं. त्यानी माझं नाव फिटरच्या गटात घातलं नाही तेव्हा मी किती बेचैन झालो होतो. पण एकदा फाऊंड्री विभागात पाय टाकायचाच अवकाश...व्वा ! आता मी चुकूनही दुसऱ्या व्यवसायाकडे वळणार नाही."

आतापर्यंत बाबांनी ऐकण्याचंच काम केलं होतं, बराचवेळ नुसतच ऐकून घेतलं होतं, एक बोट पुढे उचलून धरीत ते बोलू लागले, " मुला, तुला आणखी सांगून ठेवतो. कोणताही व्यवसाय आपल्याला आवडला की आपलं मन त्याच्यात रमतं. त्या व्यवसायाचे सारे बारकावे समजून घ्यायला हवेत, आपलं अन्तःकरण त्यात ओतून आपण काम केलं पाहिजे. पण जर आपलं मन त्यापासून अलिप्तच राहिलं तर मग दुसरं काही तरी शोधायला हवं."

"पुरे हो आता; पुष्कळ झालं."

"ऐक तू जरा. मला त्याना सांगायचंच आहे. वाल्या काय अन युरा काय माझ्या दृष्टीनं त्यानी ठीक केलं नाही. कोणीही माझी सुतारकी पुढे चालवली नाही. मी माझ्या वडिलाकडूनच सुतारकाम शिकलो. आता उरला बरीस; सुतार व्हायला नको म्हणून तोही एक दिवस असाच पळ काढील. माझ्या मुलांची माझ्याशी झालेली ही वागणूक मला योग्य वाटत नाही. पण एकाच अटीवर मी त्याना क्षमा करून झाली गोष्ट विसरून जाईन. त्यानी उत्तम कामगार होऊन दाखवलं पाहिजे. ज्या माणसाचं अंतःकरण त्याच्या कामात नाही त्याच्या हातून काही व्हायचं नाही. तेव्हा आता तुम्ही काय करता यावर माझी नजर राहील. समजलं ना युरा ?"

"होय."

"ठीक आहे. आता तू कामगार झाला आहेस, स्वतंत्र झाला आहेस ड्रिंक घेण्याइतका मोठा झाला आहेस."

आई अस्वस्थ होऊन बाबांकडे पाहू लागली. मग तिची नजर युराकड वळली तो तिच्याकडे पाहून हलकेच हसला. त्यानं आपला ग्लास उचलून बाबांच्या ग्लासाला लावला: " तुमच्या आरोग्यासाठी ! बाबा, रागावू नका, पण मी काही हे घेणार नाही. मी तुम्हाला मघाशीच सांगितलं, मी क्रीडागृहात जात असतो म्हणून," त्यानं आपला भरलेला ग्लास परत टेबलावर ठेवला.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाबा रागावले नाहीत. उलट ते आईला म्हणाले, 'पाहिलंस ना ? नव्या लोकांबरोबर रहायला गेला म्हणून तुझा मुलगा काही बिघडला नाही."

दुसऱ्या दिवशी सकाळी सारेजण बाहेर पडल्यावर घरात आई व युरा



दोघेच उरले. युरा टेबलापाशी वाचत बसला होता, त्यानं आपली हनवटी तळ-हातावर टेकवली होती. पानं उलटल्याचा हलका, सरसर आवाज येत होता. आई जवळच विणकाम घेऊन बसली होती. ती त्याच्यासाठी हातमोजे विणत होती. त्याला शाळेतून कोणते कपडे मिळतील याचा तिला अंदाज येईना. हिवाळा दाराशी आला होता. रात्री बर्फ पडायला सुरवात झाली होती. शिवाय हातानं विणलेल्या हातमोज्यात अन् पायमोज्यात नेहमीच जास्त उब असते; बाजारातल्या तयार मोज्यात ती तशी नसते. शिवाय ते जास्त टिकतात. तिच्या सुया झरझर चालल्या होत्या.

बाहेर मुलांचा आरडाओरडा चालला होता. नोव्हेंबरची सुट्टी लागणार म्हणून शाळा लवकर सुटली होती. त्याचा त्याना आनंद झाला होता. बरीस जोरजोरानं ओरडत होता अन् कोणाला काहीतरी फर्मावीत होता. ओरडून ओरडून त्याचा आवाज घोगरा झाला होता

" तू जरा विश्रांती का घेत नाहीस ?"

" घेता ना, " युरा वाचतच होता; आणखी अर्धा तास तसाच निघून गेला.

आई डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याला निरखीत होती. तिनं नकळत अस्पष्टसा सुस्कारा टाकला. शाळेतली जेवणाची व्यवस्था किती का चांगली असेना, युराचं वजन कमी झालं होतं. गालाची हाडं उच आल्यासारखी वाटत होती. डोळे खोल गेले होते, त्यांच्या खाली काळी वर्तुळं उमटली होती फाऊंड्रीतलं त्याचं कामच होतं की बराच वेळ त्याला गरम भट्टीपाशी उभं राहावं लागत होतं. असं उष्णतेनं माणूस निःशक्त होतो. का तो फार वाचत होता म्हणून असं झालं ? रात्री झोपताना तो पुस्तक उशीखाली सरकवी, सकाळी उठल्याबरोबर त्यात डोकं खुपसून बसे.

" युरा जा जरा, बाहेर फिरून ये. जरा मोकळी हवा लागेल अंगाला मित्राना भेटून ये तुझ्या. तू गेला नाहीस तर वाईट वाटेल ना त्याना."

मोठ्या नाखुषीनं युरानं डोकं वर केलं. "ठीक आहे; जाऊन येईन; तू काळजी करू नकोस. मला काही होत नाही. तू स्वतःच तर सारखी वाचत असतेस.'

" माझ्याबद्दल थोडंच बोलण चाललं आहे आता ? मी लहान होते तेव्हा मी खरोखरच खूप वाचून घेतलं." तिच्या आवाजात खेद होता. आपलं वय निघून गेलं म्हणून की आता तिला तसं वाचायला मिळत नव्हतं म्हणून ? "कित्येकदा रात्री जागून मी तास दोन तास वाचत असे पण आता ते माझ्यानं होत नाही. आता पूर्वीसारखा उत्साह पण राहिला नाही अन् तेवढा तकवाही उरला नाही. आता लवकरच डोळे दुखायला लागतात."

युरा बाहेरच्या पडवीत गेला आणि लागलीच परत आला. "आता बाहेर

झाण्यापेक्षा रात्री मी सिनेमाला जाईन. तिथे मला माझे सगळे मित्र भेटतील. मी तुला वाचून दाखवू का ? हे पुस्तक फुन्झबद्दल आहे. शाळेतल्या प्रत्येक मुलानं हे पुस्तक वाचलय्. झारच्या शिपायानी फुन्झला तुरुंगात टाकलं होतं. दररोज सकाळी शिपाई त्याच्या सहकाऱ्यांचा शिरच्छेद करण्यासाठी त्याना फुन्झच्या कोठडीवरूनच नेत. खुद्द फुन्झलाही शिरच्छेदाची सजा मिळाली होती. पण तरीही तो तुरुंगात परदेशी भाषा शिकत होता, कधी ना कधी त्या कामाला येतील असं त्याला वाटत होतं. तुरुंगातून सुटका करून घेता येईल आणि या भाषांचा क्रान्तिकार्याला उपयोग होईल असं त्याला वाटत होतं. इथपर्यंत वाचून झालंय् माझं."

त्यानं हलक्या आवाजात वाचायला सुरुवात केली. पण पुढे त्याच्या भावना उसळून आल्या. त्याच्या आवाजात ताण आला. त्या दुर्दैवी, हतभागी क्रान्तिकारकासाठी तो अतिशय कष्टी झाला; त्यांचा छळ करणाऱ्या लोकांबद्दलच्या संतापाने आणि तिरस्काराने त्याचे मन भरून गेले. भावनांवेगाने युराचा आवाज कापू लागला. आईनं विणकाम बाजूला ठेवलं आणि ती ऐकू लागली.

दरवाजा करकरला. उंबरठ्यावर बरीस उभा होता. युरानं त्याला बोटानं खूण करून गप्प राहायला सुचवलं. बरीस दाराजवळच्या बाकावर बसला आणि लक्ष देऊन ऐकू लागला. आईनं हळूच उठून दिवा लावला.

शेवटचं पान वाचून संपल्यावर युरा आईला म्हणाला, "कसे लोक असतात पाहिलंस आई ? मला अगोदर काहीच माहीत नव्हतं. फुन्झ, आर्तेम, बोरोझिलोव कितीतरी क्रान्तिकारक होते."

"असली पुस्तक कुठं मिळाली तुला ?" बरीसनं विचारलं. त्याच्या आवाजात हेवा होता.

"लायब्ररीत, आणखी कुठं मिळणार ? तू आता लायब्ररीत जायला लाग."

आईनं पाहिलं, बरीसनं युराची शाळेची टोपी घातली होती. "म्हणूनच युरा मघाशी बाहेर गेला नाही," ती स्वतःशीच म्हणाली, "सारा दिवस बरीस युराची टोपी घालून हिंडतोय्."

"सारा दिवस तू त्याची टोपी घालून हिंडतो आहेस; त्याला सकाळपासून घरीच बसावं लागलं ना ? काही विचार ?" आई बरीसला रागावली.

"नुसती घालून पहाणार होतो कशी काय बसते मला म्हणून अन् घातल्यावर मग डोक्यावर टोपी आहे हे विसरूनच गेलो."

"त्याला नको रागावूस आई," युरा आईजवळ गेला; तिच्या डोळ्यांत पहात म्हणाला, "नाहीतरी मी बाहेर गेलोच नसतो. हे पुस्तक तुला वाचून दाखवायच माझ्या फार मनात होतं, पण आजपर्यंत तसं कधी जमूनच आलं नाही."

बाबाना संभाषणात भाग घ्यायला लावणं तसं सोपं नव्हतं. आयुष्यात



त्यांच्या वाटचाला सुख असं फारसं आलंच नव्हतं आणि जुन्या दुःखद आठवणी उगाळण्यात काय मतलब होता ? बाबा तसे अबोल, शांत होते; ते क्वचितच हसत.

त्या दिवशी संध्याकाळी घरात सर्वजण जमले होते. सारेच उदासवाणे झाले होते. दुसऱ्या दिवशी युरा परत जायचा होता. एकाएकी बाबांच्या मनात उसळून आलं; आपल्या बालपणाच्या गोष्टी आपल्या मुलांना सांगाव्यात म्हणून.

"मी तुम्हाला बोल लावत नाही मुलानो, पण आमच्या लहानपणाचा विचार केला तर त्या मानानं तुमचं आयुष्य फार सुखाचं म्हणायला हवं. तुम्हाला त्याची तुलनाच करता येणार नाही. मला शिक्षण घ्यायची कधी संधीच मिळाली नाही, माहीत आहे ?"

"पण तुम्ही शाळेत जायला हवं होतं," बरीसनं त्याना अडवलं.

बाबा त्या दिवशी चांगल्या 'मूड'मध्ये होते, ते पुढं सांगायला लागले, "शांत बसून ऐक जरा. मी शाळेत कसा जात होतो माहीत आहे तुला ? साऱ्या उन्हाळ्यात आणि शरदऋतूत मला खूप काम करावं लागे धनगर होतो मी. जरा श्रीमंत घरची मुलं शाळेत जात होती पण मी चाबूक उडविण्यात गुंतून पडलो होतो. एकदा बर्फ पडायला लागला आणि सारा प्रदेश बर्फानं झाकून गेला की हिवाळाभर मेंढ्या मेंढवाड्यात ठाणबंद होऊन पडत. मग मला शाळेत जायला फुरसत मिळे. पण तोपर्यंत माझा कितीतरी अभ्यास बुडलेला असे. तेवढा भरून काढायचा म्हणजे फार श्रम करावे लागत.

"ते असो. तसं माझं डोकं तल्लख होतं. शिक्षकाना माझ्याबद्दल वाईट वाटायचं. ते मला शक्य तितकी सारी मदत करायचे. त्याना क्षय झाला होता. घरात अठराविश्वे दारिद्र्य होतं. त्यांच्या मदतीनं मी वर्गाबरोबर येतो न येतो तोच वसंतऋतू सुरू व्हायचा. माझी शाळा बंद व्हायची. माझी पिशवी आणि मेंढ्या घेऊन मी कुरणात चालू लागे. आमचं कुटुंब मोठं होतं. आम्ही एकूण आठ मुलं : सहा मुलगं आणि दोन मुली. त्यापैकी पाचजणं वाचलो. माझ्या वडलांचं नाव इवान गागारिन. ते मूळचे कोरओमा प्रदेशांतले. पण त्यानी पुष्कळ वर्षं सैन्यात नोकरी केली. नोकरीतून मुक्त झाल्यावर ते झात्स्कला येऊन राहिले त्यांच्या तुकडीची तिथंच बदली झाली होती. इवान गागारिन उत्तम सुतार होते. फार सुरेख फर्निचर बनवीत ! नवीन लाकूड घ्यायला पैसे नव्हते म्हणून त्यानी जमिनीच्या लाकडी फळ्या काढून त्याचं फर्निचर बनवलं ते खरोखरच फार सुबक झालं होतं. त्याला साऱ्या दिशानी गिऱ्हाईक येऊ लागलं. एकजण दुसऱ्याच्या हातातलं फर्निचर हिसकावून घेऊ लागला. खरंतर त्याना त्यात चांगला पैसा कमावता आला असता. पण घासाघीस करून सौदा पटवणं त्यांच्या स्वभावात

नव्हतं. त्यामुळे पदरात फारसं काही पडलं नाही. त्यातून थोडंसं धान्यधुन्यं घेतलं, नवीन जमीन घेतली आणि संसाराचा गाडा सुरू केला. त्यांनी मला एक टोपण नाव दिलं होत : 'गनर' कारण मी दिसायला त्यांच्या वळणावर गेलो होतो ते स्वतः गनर होते. मग त्यानंतर... तो पैसा किती दिवस पुरला असेल वाटतं तुम्हाला ? पुढचं जीवन नुसतं उपासमारीचं होतं. भयानक दारिद्र्य. मग आम्ही झात्स्कहून क्लुशिनोला आलो. तिथं त्यानी एक चंद्रमौळी खोपट विकत घेतलं माझ्या वडलाना वाटलं, खेडेगावात पैशावाचून इतकंसं अडायचं नाही. हाल कमी होतील. झालं नेमकं उलटंच, शेवटी विष खाण्यापुरता एक तांबडा पैसासुद्धा घरात राहिला नाही. बाबाना दारूचं व्यसन लागलं. आम्ही दिसलो की ते आम्हाला घरातून हाकलून लावायचे. मग एके दिवशी ते घर सोडून निघून गेले. मी बोलोगोयला कामाला जातो म्हणून सांगून गेले. त्यानन्तर पुन्हा ते आमच्या नजरेला पडले नाहीत. कुणीतरी आईला सांगितलं की, ते गाडीखाली सापडून मरण पावले. त्यावेळी मी फक्त चार वर्षाचा होतो."

घरात त्यावेळी टाचणी पडली असती तरी ती ऐकू आला असती. अगदी कमालीची शान्तता पसरली होती. युरानं आपलं पुस्तक बाजूला ठेवलं होतं. बाबांचं बालपण किती खडतर गेलं होतं हे मला माहीत होतं पण युरानं आणि बरीसनं ती हकिकत बाबांच्या तोंडून प्रथमच ऐकली. भावनावेगानं दोघांचेही चेहरे लाल झाले होते.

"तुम्ही किती दिवस शाळेत गेलात ?" युरानं विचारलं.

"फक्त दोन वर्ष ! माझं अभ्यासात डोकं चालेना म्हणून शाळा सोडावी लागली असा काही प्रकार नव्हता. कारण एकच, आपण फार फार गरीब होतो. शिवाय तिथं मला एका वेड्यावाकड्या प्रसंगाला तोंड द्यावं लागलं अन् त्यात माझ्यावर अन्याय झाला."

मग बाबानी आम्हाला ती सारीच हकिकत सांगितली. एक दिवस त्यांच्या शाळेत एक इन्स्पेक्टर आले. आपण अगदी कसून शिकवतो, अगदी कसूर करीत नाही हे त्या इन्स्पेक्टरला दाखवून द्यायची शिक्षकाना काळजी लागली होती. गावातल्या सगळ्यात श्रीमंत घरातला एक मुलगा आमच्या वर्गात होता. तो खरोखरच फार हुशार होता. वर्गातला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी होता. शिक्षकानी त्याला फळ्याजवळ बोलावलं अन् गणित सोडवायला सांगितलं. तो भराभर आत्मविश्वासानं लिहू लागला आणि लिहिता लिहिता मध्येच अडला. कुठेतरी चूक झाली होती अन् ती त्याला सापडत नव्हती. एकतर तो घाबरला असावा किंवा फाजील आत्मविश्वासातून त्याची गफलत झाली असावी.

हा सारा प्रकार चालू असताना शिक्षकाचं लक्ष इन्स्पेक्टरच्या चेहऱ्यावर



खिळलं होतं, त्यामुळे फळ्यावर कुठे चुकलंय् ते त्यांच्या ध्यानात आलं नाही. अलेक्सी गागारिन उठला आणि त्यानं ती चूक दाखवून दिली.

"तुला काय काय माहीत आहे पाहू या." इन्स्पेक्टरनं त्या गरीब धनगराच्या मुलाला नीट न्याहाळून घेतलं, "चलाख दिसतोस तू. मुला, इथ फळ्याजवळ ये."

अलेक्सी फळ्याजवळ गेला. त्याच्या पायातल्या बुटांचा–झाडाच्या सालीचे बनवले होते ते–करकर आवाज झाला. दुसरंही उदाहरण त्यानं चुटकीसरशी सोडवून दाखवलं त्याचे शिक्षक आश्चर्यानं अगदी चकीत होऊन गेले. इन्स्पेक्टर अलेक्सीवर अगदी खूष झाले; त्यानी त्याच्या केसावरून मोठ्या आपुलकीनं हात फिरवला

"तू खरोखरच बुद्धिमान आहेस; मित्रा, अभ्यास चालू ठेव पुढे," ते म्हणाले. मग त्यानी कुठल्याशा कवितेतली एक ओळ खणखणीत आवाजात म्हणून दाखवली, 'यशाचा हाच तो उज्ज्वल मार्ग." मग त्यानी अलेक्सीला एक खरीखुरी शिशाची पेन्सिल बक्षीस दिली. त्या काळात पेन्सिल म्हणजे फार मौल्यवान चीज समजली जायची. प्रत्येक मुलाला अलेक्सीचा हेवा वाटला. वर्गातला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी चांगलाच अस्वस्थ झाला.

शिक्षक खूष होते. शाळा संपल्यावर त्यानी अलेक्सीला गाठले. तो अजूनही आनंदात मग्न होता. "शाबास गागारिन, आज तू चांगली बाजू सांभाळलीस."

घरी गेल्यावर अलेक्सीनं सारी घटना आईला सांगितली. परंतु ती एकदम रडायला लागली, "यातून काहीतरी वेडवाकडं होणार. एखादी चांगली गोष्टसुद्धा गरिबाला सुख लागू देत नाही."

आपण काय बोलतोय ते तिला पक्क समजत होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी अलेक्सी आनंदानं शाळेकडे निघाला. गावच्या शिवेवरच, त्या श्रीमंत मुलाच्या दोघा मोठ्या भावानी त्याला गाठलं. सतरा, अठरा वर्षाची मुलं असावीत ती.

"तू कोण आहेस ? लोमोनोसोव ?" × एकानं अलेक्सीला विचारलं अन् तो त्याची वाट अडवून उभा राहिला.

"तुम्ही माझी थट्टा करताहात, तुम्हाला माहीत आहे, माझं नाव गागारिन," अलेक्सीनं घाबरून उत्तर दिलं. आता हे दोघं मिळून आपल्याला ठोकून काढणार पळ काढायलासुद्धा संधी मिळणार नाही, हे त्याच्या लक्षात आलं. इतक्या मोठ्या मुलांच्या तडाख्यातून सुटका करुन घेणं सोपं थोडंच होतं ?

---

× मिखाईल लोमोनोसोव (१७११–१७६५) हा एक गाढा रशियन पंडित व शास्त्रज्ञ होता. त्याने अनेक शोध लावले त्याचा जन्म एका गरीब कोळ्याच्या घरी झाला होता.

"मला वाटतं, तू लोमोनोसोवच आहेस," त्या मुलानं आपलंच म्हणणं चालू ठेवलं. अलेक्सीनं ते चमत्कारिक नाव याच्या अगोदर कधीही ऐकलं नव्हतं. मग त्या मुलानं अलेक्सीला एक ठोसा लगावला. त्या दोघानी अगदी निर्दयपणानं त्याला बडवून काढलं. दर ठोशाबरोर ते त्याला सुनावत होते. "रानात जा अन् गाई वळ, शाळेच्या आसपासही कधी पुन्हा फिरकलास तर बघ."

अलेक्सी साऱ्या जगावर उखडला होता. त्याचा सर्वात जास्त राग त्या इन्स्पेक्टरवर होता. तो नसता तर अलेक्सीला मार बसला नसता. शाळेबद्दल बोलायचं तर अलेक्सीनं पुन्हा त्या बाजूला नजर वर करूनही पाहिलं नाही. त्याची आई पण काही बोलली नाही. त्यानं जर गाई वळायचंच ठरवलं तर तिची काही हरकत नव्हती. शिवाय त्यामुळं घरात थोडाफार पैसाही आला असता.

"तुमची अन् त्या मुलांची परत कधी भेट झाली का?" बाबांचं बोलणं संपल्यावर बरीसनं विचारलं,

"ज्यानी तुम्हाला मारलं त्या मुलांची ?"

"अर्थातच. एकाच गावात रहात होतो ना आम्ही ?"

"तुम्ही त्याला गोळी घालायला हवी होती."

"कुठून घालायची गोळी ? चाबकातून ?"

"नाही ! मला म्हणायचंय्, क्रांती झाली तेव्हा."

"मुला, क्रांती झाली तेव्हा तर ते पळूनच गेले."

"बरीस, मूर्खासारखं काहीतरी विचारू नकोस," युरानं त्याला मध्येच अडवलं, "क्रांती म्हणजे काय समजलास तू ? प्रत्येकाला गोळ्या घालीत सुटायचं? क्रान्ती अशी होत नसते. प्रत्येकाला गोळ्या घालण्यासाठी क्रांती नसते."

"मग कशासाठी असते ?"

युरा विचार करायला लागला, "प्रत्येकाला शाळेत जायला मिळावं म्हणून क्रांती होत असते," मग जरासा थांबून म्हणाला, "मग कोणीही आळशी रहाणार नाही. मी तुला एक पुस्तक देतो वाचायला, लेनिन यांच्यावरचं. ते वाचलंस की तुला सारं काही समजेल." तो उठला अन् बिछान्यापाशी गेला; त्याच्या खालून त्यानं आपली सूटकेस काढली. मग बरीसच्या हातात एक मोठं पुस्तक देत त्याला म्हणाला, "हे घे; वाचून काढ."

युरानं सुटकेस उघडली तेव्हा मला दिसलं आत बहुतेक पुस्तकेच होती. स्टेशनपासून हे सारं ओझं त्यानं कसं आणलं असेल याचा मी विचार करू लागलो.

त्या संध्याकाळची ही सारी हकीकत अन् बाबांची कहाणी तपशीलवार आठवायला कारण घडलं. परदेशात आमचे कोण उच्च घराण्यातले नातेवाईक



असल्याची बातमी जेव्हा आमच्या कानावर आली तेव्हा मला हे सारं स्पष्ट आठवलं. त्याचं असं झालं. युराच्या अंतराळउड्डाणानंतर लागलीच, परदेशी वृत्तपत्रानी कोणा गागारिन मंडळीच्या अनेक मुलाखती छापल्या. क्रांतीनंतर कोणत तरी एक उच्च गागारिन घराण्यातलं कुटुंब म्हणे अमेरिकेत जाऊन स्थायिक झालं होतं. या अमेरिकन गागारिन मंडळींनी युरा आपला दूरचा चुलतभाऊ की कोणी असल्याचं जाहीर केल होतं.

अंतराळ उड्डाणानंतर युरा परत आला, त्यानंतर वृत्तपत्रकारांच्या परिषदेत बोलताना त्यानं सुरूवातीलाच आपले असे कोणी नातेवाईक नसल्याचं जाहीर रीत्या सांगून टाकलं. मला वाटतं त्यावेळी त्याच्या मनात स्वतःच्या लहानपणाच्या काळाचे विचार आले असावेत; आईनं सांगितलेल्या तिमोफेई आजोबांच्या गोष्टी, बाबानी सांगितलेली आमच्या आजोबांची हकिकत, इवान गागारिन यानी कसं उत्तम फर्निचर बनवलं त्याची हकिकत, हे सारं त्याला आठवलं असावं.

नाही, आमच्या कुटुंबात कधीच कोणी सरदार, राजपुत्र कोणीच नव्हतं.

पण ज्यांचा अभिमान वाटावा असेही आमचे नातेवाईक आहेत. आईची मोठी बहिण मारिआ झुकोवा हिच्याबद्दल सांगतो थोडंसं. आता मारिआ मावशी सत्तर वर्षांची आहे; मॉस्कोजवळ मितिश्ची येथे राहाते. व्यावसायिक शाळेत शिकत असताना युरा पुष्कळदा मावशीकडे जायचा.

माशा मावशीला तो काळ चांगला आठवतो. अलिकडेच मी तिला भेटायला गेलो होतो तेव्हा तिनं मला युराबद्दल सांगितलं.

"फार नीटनेटका अन व्यवस्थित असायचा तो. त्याचा पोशाखही स्वच्छ नेटका असायचा. शनिवार हा त्याचा यायचा दिवस ठरलेला. येताना काखेत कागदात गुंडाळलेलं एक बंडल असायचं, "माशा मावशी, जरा माझा शर्ट धुवून देशील ? तुला त्रास होणार नसेल तर ?"

"मुलांच्या हातात पैसे द्यायला खरं तर मला आवडत नाही. मुलं बिघडतात. पण ते दिवस कठीण होते. खाण्यापिण्याच्या वस्तु अगदी दुर्मिळ होत्या. युरा आमच्या घरापासून फार दूर राहात होता, त्याचं मला वाईट वाटायचं. मी त्याला थोडेसे पैसे द्यायची आणि त्यातून बनपाव नाहीतर दुधाची वाटली घे म्हणून सांगायची. पण पुढे मला समजले, त्याने ते पैसे कधीही खर्च केले नाहीत. सुट्टी घेऊन घरी जाताना सर्वांना भेटी विकत घेण्यासाठी त्यानं त्या पैशांचा उपयोग केला.

"तो मला नेहमी मागच्या, जुन्या काळातल्या हकिकती विचारायचा;

तिमोफेई अजोबा, सेर्योझामामा, क्रांन्तीच्या अगोदर आमचे लोक पेत्रोग्रादमध्ये राहात होते त्यांची हकिकत या साऱ्यांबद्दल त्याला फार जिज्ञासा वाटायची.

" आम्ही कामगार कुटुंबातली माणसं, मी तेरा वर्षाची झाले तेव्हापासून कामाला लागले; त्यावेळी पहिल्या जागतिक महायुद्धाला नुकतच तोंड फुटलं होतं. खोसिन आणि मुन्शाक दारुगोळयाच्या कारखान्यात मी डाग देण्याचं काम करी. आम्ही हातबाँब बनवत होतो.

" मी लेनिनना पाहिलं होतं, त्यांच्याशी बोललेही होते हे एकदा मी युराला सांगितलं. युराचा त्याच्यावर विश्वासच बसेना. त्यात विश्वास न बसण्याजोगं काय आहे युरा?" मी त्याला विचारल. पेत्रोग्रादच्या साऱ्या कामगारानी लेनिन पाहिले होतं याची मला खात्री आहे.

" युरा लागलीच माझ्या मागे लागला, "माशा मावशी, ते सारं सांग ना."

" त्यात खरंच विशेष असं काही नव्हतं. त्यावेळी जनरल युदेनिचच्या फौजा पेत्रौग्रादवर चालून येत होत्या. सारे कामगार शहराचं रक्षण करायला खडे झाले. ते आपण होऊन भराभर लाल सैन्यात दाखल झाले कारखान्यतल्या आम्ही मुलींनी एक प्रथमोपचार पथक बनवलं. आम्ही आघाडीवर जायला निघालो तेवढयात आम्हाला स्मोल्नीचं बोलावणं आलं "

" आता चित्रपटात ते स्मोल्नी दाखवतात अगदी तसंच होतं तेव्हा ते. सगळीकडे लोकांची ही गर्दी उसळलेली. कारखान्यातले–, गिरण्यातले कामगार-शिपाई, खलाशी सारे तिथे जमले होते प्रत्येकाच्या हातात रायफल नाहीतर हात-बाँब असायचे. काहीच्या खांद्यावर पिशव्या असायच्या, काहींच्या जवळ चहाच्या केटल्याही होत्या."

" आम्ही दुसऱ्या मजल्यावर गेलो. तिथे लेनिन होते. ते आपल्या टेबलापाशी बसून कागदांवर सह्या करीत होते. आम्हाला दिसत होते, ते अतिशय कामात होते.

" मग कोणीतरी त्याना सांगितलं, प्रथमोपचार पथकातल्या मुली आल्या आहेत म्हणून. ते चटकन उठून आमच्याजवळ आले. आम्ही पांढरे रुमाल बांधले होते त्याच्यावर 'रेड–क्रॉसचो' खूण होती. आमच्याजवळ प्रथमोपचाराचं साहित्य होतं."

" मुलीनो, आघाडीवर जायची भीती नाही वाटत तुम्हाला ?" त्यानी विचारलं,

" खरं सांगायचं तर प्रत्येकीला मनातून भीती ही वाटतच होती. पण लेनिन यांच्यापाशी ते कबूल करायला आमची तयारी नव्हती. म्हणुन आम्ही मोठ्यानं ओरडलो. " आम्हाला नाही भीती वाटत !"



" वा, फारच छान !" ते म्हणाले, " तुम्ही कामगार मुली मोठ्या शूर आहात असं दिसतंय्. झारच्या सेनापतीचा पराभव करायला आपल्या माणसाना तुम्ही मदत केली पाहिजे. लढाई संपली की आम्ही तुम्हा सर्वाना शाळेत पाठवू."

" स्मोल्नीहून निघून आम्ही थेट आघाडीवर गेलो. मी युराला ही सारी अगदी बारीक-सारीक हकिकत सांगितली. काय माझ्या मनात आलं होतं कोणास ठाऊक. युरानं माझ्यावर प्रश्नांचा अगदी भडिमार केला. 'लेनिन कसे दिसत होते ?' 'त्यांच्या चेहेऱ्यावर कोणता भाव होता ?' 'ते कसे बोलत होते ? ' चित्रात दिसतात तसेच होते का ते ?'

" युराला अगदी खडा अन् खडा माहिती हवी होती, इतकसं कमीदेखील सांगून चालणार नव्हतं. पण हे सारं इथंच संपलं नाही. त्यानन्तरच्या शनिवारी दाराबाहेर एकदम खूप गडबड ऐकू यायला लागली म्हणून मी दार उघडलं. काय सांगू तुला, दाराबाहेर बारा-पंधरा मुलं उभी होती. युरा आपल्या सगळ्या मित्राना घेऊन आला होता. 'माशा मावशी, याना लेनिन यांची हकिकत ऐकायची आहे,' त्यानं सांगितलं.

" ठीक आहे. श्रोत्यांची संख्या मोठी होती. मी त्या सर्वाना नीट बसवलं अन् सारं पुन्हा सांगितलं. नदेझ्दा कॉन्स्तन्तिनोव्ना क्रुप्सकाया यांच्याशी माझी कशी भेट झाली होती, आमचं काय काय बोलणं झालं तेही मी त्याना सांगितलं.

" युरा मला कधीही विसरला नाही. अभ्यास संपवून तो मोठा झाला. अंतराळातलं उड्डाण संपवून परत आला तरी तो मला विसरला नाही. मधून मधून नेहमी भेटून जायचा आणि काहीतरी भेट न चुकता आणायचा, कधीही रिकाम्या हातानं आला नाही. " या इतक्या सुंदर सुंदर कापडांचा मला म्हातारीला काय उपयोग ?" म्हणून मी त्याला म्हणायची. त्याचं उत्तर तयार असायचं, " माशा-मावशी, त्या सुंदर नव्या कपड्यात तू तरूण दिसायला लागशील. तू शीवच त्याचे कपडे." कधीकधी तो परदेशातून काहीतरी घरात वापरायची यंत्र घेऊन यायचा त्यांचं काय करावं अन् ती कशी वापरावीत हे समजून घेण्यातच माझे कितीतरी दिवस निघून जायचे."

युरा तीन चार दिवस घरी राहिला. त्याला मोठ्या गाजावाजानं निरोप देण्यात आला. त्याच्या वर्गातली मुलं त्याला स्टेशनवर पोहोचवायला गेली होती. त्या आनंदी, उत्साही मुलांच्या घोळक्यात मध्योमध लेव मिखायलोविच बेस्पालोव हेही होते.

आपल्या माजी शिष्याचा निरोप घेताना बेस्पालोवनी त्याच्याशी हस्तांदोलन

"उगीच खोटं बोलू नकोस. मी नक्की सांगतो, एखाद्या अंधेऱ्या गल्लीबोळात कुणालातरी गाठून तू त्याला लुबाडलंस. तुझे हे स्नायूच पहा कसे चांगले फुगलेत."

आपल्या साऱ्या वीस वर्षांच्या आयुष्यात शाळेचे गणवेष सोडल्यास युराच्या अंगाला धड नीटनेटका असा कपडा आतापावतो लागला नव्हता. स्वतःच्या कमाईतून युरानं चांगला कपडा घेऊन, व्यवस्थित शिवून अंगात घातलाय् ही जाणीव मनाला सुखवत होती. त्याचा स्वतःचा आत्मविश्वास वाढला होता.

माझ्या मनात कुठे तरी कळ उठली; युराचा हेवा वाटला मला. मी जेव्हा वीस वर्षांचा होतो तेव्हा माझ्याजवळ फक्त लष्करी शर्ट व पँट होत्या. पण तेवढ्याने मला आत्मविश्वास मिळवून दिला होता; आमच्या रणगाड्याच्या चिलखती कवचानं त्या आत्मविश्वासात आणखी भर घातली होती.

आपण पैसे कसे मिळवले ते युरानं मला सांगितलं. त्या वसंतऋतूत स्थानिक ऑपेरा–गृहात, प्रादेशिक 'यंग कम्युनिस्ट लीग' समितीच्या चिटणीसाशी त्याची गाठ पडली होती. त्या दिवशी दर्गोमिझ्स्कीच्या 'मर्मेड' चा कार्यक्रम होता.

"गागारिन, मी पाहिलंय् तुला अगोदर. इथं नियमित येतोस तू," बोलता बोलता चिटणिसान युराच्या खांद्यावर हात ठेवला. "पण तू नेहमी गणवेशात का येतोस? जर तू सूट घालून आलास तर ते जास्त ठीक होईल."

युरा बावचळल्यासारखा झाला अन् त्यानं खांदे उडविले. केव्हापासून त्याच्या मनात तीव्र इच्छा होती, सूट घ्यावा म्हणून. पण अजून तो पैसे मिळवू लागला नव्हता.

"आलं लक्षात," चिटणीस म्हणाला. तो चतुर होता आणि त्याला इकडलं तिकडलं बरंच माहीत होतं. दुसऱ्या मध्यंतरात त्यानं युराला गाठलं. "गागारिन तुला जर काही कपडे विकत घ्यायचे असतील तर माझी एक सूचना आहे. बाल-गृहाच्या उन्हाळी छावणीत व्यायाम शिक्षक म्हणून तू काम करावंस. पण अगोदरच सावधगिरीचा इशारा देऊन ठेवतो. ती पोरं अत्यंत व्रात्य अन् दांडगी आहेत. मला वाटतं, तू त्याना काबूत ठेवू शकशील. मग, काय विचार आहे तुझा?"

"जातो मी"

आणि अशा रीतीनं युरा त्या मुलांच्या बरोबर उन्हाळी छावणीत गेला.

"कसं काय जमलं तुला?" मी विचारलं.

युरा पुन्हा हसला. "पहिल्यापासूनच आमचं अगदी चांगलं जमलं. तुला खरं सांगायचं तर मला ती मुलं फार आवडली. निव्वळ सैतान आहेत पोरटी. अशी मुलं असली की एकही क्षण कंटाळवाणा जायला नको. मी त्याना गाणी म्हणायला शिकवलं. दररोज रात्री एक भली मोठी शेकोटी पेटवून, तिच्याभोवती



बसून आम्ही गाणी म्हणत असू. आमच्यात एक आंधळा मुलगा होता. तो अँकॉर्डियन छान वाजवायचा. त्याचं नाव होतं इवान अलेक्सेयेविच. त्याला नुसतं वाजवताना ऐकलं की घशात आवंढा यायचा. आमची बहुतेक गाणी लढाईच्या काळासंबंधी होती; पार्टिझन नाहीतर खलाशी यांच्यावर रचलेली होती. 'वार्याग' सारखी काही अगदी जुनी गाणीही होती. मुलं इतका वेळ गाणी म्हणत राहायची की मला वाटायचं यांच्या छातीचे भाते फुटणार आता. फुटबॉल, व्हॉलीबॉल खेळत होतो आम्ही. मी तिथं व्यायामशिक्षक होतो हे विसरू नकोस. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मी लढाईवर खूप पुस्तकं वाचली होती; त्यामुळे मी त्यांना खूप मनोरंजक गोष्टी सांगू शकलो. शिस्त राखायला त्याचा फार उपयोग झाला." युरानं माझ्याकडे पाहून एक डोळा मिचकावला अन् म्हणाला, "बरी आठवण झाली. कोणा एका कॅप्टन तुशिनबद्दल केव्हातरी आपलं बोलणं झालं होतं, आठवतंय्?"

मी खांदे उडवले अन् म्हणालो, "ऐकलं असेल कुठेतरी ते नाव."

"तू मला पहिल्यांदाच मॉस्कोला घेऊन चालला होतास तेव्हा डब्यात आपल्या शेजारी एक मिशावाला माणूस बसला होता आठवतय्?"

"त्याचं काय आता?"

"त्यानं आपल्याला कॅप्टन तुशिनचं नाव सांगितलं होतं. मी तुझ्यासाठी एक भेट आणली आहेः टॉलस्टॉयचं **वॉर अँड पीस**."

"पण या साऱ्याचा टॉलस्टॉयशी काय संबंध?"

"पुस्तक वाचलं की तुला कळेल."

तंत्रशाळेच्या शेवटच्या वर्षात असताना युराकडून, आठवड्यातून दोनदा नाहीतर तीनदा लांबलचक तपशीलवार पत्र यायची. त्यावेळी त्याच्या कामाचा स्वरूप वेगळं होतं, कामानिमित्त त्याला बरंच हिंडावं लागे. त्याच्या ओघात त्यानं पुष्कळ नवीन शहरे पाहिली. जे जे काय नवं पाहिलं ते ते कोणालाला तरी तपशीलवार सांगणं अगदी अपरिहार्य होतं. खरं तर ही पत्र म्हणजे एक दैनंदिदीच होती.

त्यांचं पथक मॉस्कोला वोहकोव कारखान्यात काम करायला गेलं होतं, त्याच सविस्तर वर्णन युरानं पत्रात लिहिलं होतं ते मला आठवतंय्.

परन्तु लेनिनग्रादहून त्यानं पाठलेली पत्र विलक्षण बोलकी होती. सारं कुटुंब एकत्र जमवून आम्ही त्याची पत्रं मोठ्यानं वाचीत असु. लेनिनग्रदचे रस्ते, पूल, राजवाडे आपण स्वतः आपल्या डोळ्यानी पहातो आहोत असं वाटायचं. त्या पत्रांनी आईला विशेषच आनंद मिळाला. कारण ती त्याच शहरात वाढली होती.

लेनिनग्रादचा प्रशिक्षणाचा काळ संपला अन विद्यार्थी परत सारातोवला

गेले. युरा शाळेच्या पदार्थविज्ञान मंडळाचा सदस्य होता. निकोलायइवानोविच मस्किन नावाचे शिक्षक त्या मंडळाचे प्रमुख होते. फार उत्कृष्ट शिक्षक होते ते. शाळेत परत गेल्यावर युरानं मंडळापुढं एक पेपर वाचला. "कॉन्सस्तंतिन त्सिओल्कोव्स्की आणि आंतरग्रहीय उड्डाणे व प्रतिक्रिया-इंजिने यासंबंधी त्यांचे विचार."

पदार्थविज्ञान हा युराचा अगदी पहिल्यापासून अतिशय आवडीचा विषय पुढे युरानं सांगितलं. त्सिओल्कोवस्कीचं साहित्य मी वाचलं आणि माझा सारा दृष्टीकोन साफ बदलला. एक दिवस मानव अंतराळ पादाक्रान्त करील; जुन्या पंख्याच्या विमानांच्या जागी नवी जेट विमाने आली खरी परन्तु त्याना मागे सारणारी दुसरीही वाहने येतील असं मला वाटायला लागलं.

युरा आता शस्त्रावरची पुस्तकं वाचू लागला. ललित साहित्य अजिबात बाजूला सारलं त्यानं. वर्तमानपत्र किंवा मासिकात प्रसिद्ध होणारा, अग्निबाण उत्पादनावरचा, लष्कराकडून होणाऱ्या अग्निबाण-विकासावरचा प्रत्येक लेख तो न चुकता वाचून काढू लागला. आइनस्टाईनच्या सापेक्षतावादाचाही तो अभ्यास करू लागला. त्याचा सारा फावला वेळ या अभ्यासात जाई. आता तोही फारसा मिळत नसे. त्याला शेवटच्या परीक्षेची तयारी करायची होती, शेवटचा अहवाल लिहायचा होता. त्यासाठी त्याला बरेच नकाशे, आलेख तयार करायचे होते, वाचनाची लांबलचक यादी तयार करायची ही. त्याचा विषय होता कास्टिंग प्रॉडक्शन; ओतकामाचं उत्पादन.

हे मला सारं युराच्या पत्रावरून समजलं. तो खूप मेहनत करीत असला पाहिजे, रात्रीही काम करीत असला पाहिजे हे उघड होतं. इतकं सारं पार पाडायचं म्हणजे अगदी वेळापत्रकानुसार चालायला हवं आणि प्रकृतीही उत्तम हवी.

त्यावेळी युराच्या मनात विचार घोळत असत, आपल्या पिढीला समानव अंतराळउड्डाण पहायला मिळेल का? आपण त्या दिशेनं पाऊलही उचललंय हे त्याला त्यावेळी कळायला काही मार्ग नव्हता.

१९५५ चा उन्हाळा चांगलाच कडक होता. धान्य चांगलं येणार अशी खात्री वाटत होती.

युराची पत्र आली की, साऱ्या घरावर आनंद पसरे. तो साऱ्या परीक्षात उत्तीर्ण झाला होता. चार वर्षाच्या अभ्यासक्रमात त्याला एकूण ३२ 'ए' मिळाले होते; मानसशास्त्रात एकदाच काय तो 'बी' शेरा मिळाला होता. "हा 'बी' जरा फेरबदल म्हणून," त्यानं लिहिलं होतं, "नाहीतर माझं रिपोर्ट कार्ड फार एकसुरी, कंटाळवाणं झालं असतं." शाळा संपवून आता तो ओतकामाच्या उत्पादनात तंत्रज्ञ झाला होता.



"इतके दिवस अभ्यासात डोकं खुपसून बसला होता," बाबांच्या बोलण्यात समाधान होतं. "आता पुरे झाला अभ्यास. आता त्यानं कमवायला लागावं. देशानं त्याला इतकं शिकवलं त्याचं ऋण फेडायला हवं."

"त्याला आता कुठे पाठवतील कोणास ठाऊक," आईला काळजी वाटायला लागली.

"कुठे का पाठवीनात! आपल्या देशातच पाठवतील कुठेतरी. मला वाटतं ते त्याला एखाद्या मोठ्या शहरात पाठवतील," बाबा म्हणत होते. "त्याचं कामच असं आहे की त्यासाठी शहरातच जायला हवं. खेडेगावात आता त्याच्याजोगं काम नाही."

जूनमध्ये युराकडून दुसरं एक पत्र आलं. सारातोवच्या कोम्सोमोल शाखेचं 'झार्या मोलोदेझ्नी' नावाचं वर्तमानपत्र होतं त्यातलं एक कात्रण पत्राला जोडलेलं होतं. एका याक-१८ विमानाच्या कॉकपिट्मध्ये बसलेल्या युराचा त्यात फोटो होता. ते विमान हवाई शिक्षणासाठी होतं. त्याच्या डोक्यावर वैमानिक घालतात तसं शिरस्त्राण होतं, डोळ्यांना गॉगल होते. तो हात हलवीत होता. सोबतच्या मजकुराचं शीर्षक होतं– 'विमानतळावर एक दिवस.' मजकुराचा आशय असा:

"आजच्या कार्यक्रमाची यादी मोठी आहे. काही विद्यार्थी विमान सुरू कसं करावं अन् जमिनीवरून वर उचलावं कसं याचं शिक्षण घेतील. इतर काहीजण विमान उतरवण्याचा सराव करतील. इतर काही विद्यार्थी हवेतल्या उड्डाणाची काही रहस्य समजावून घेतील.

"कोम्सोमोल सदस्य आणि औद्योगिक तंत्रशाळेचा विद्यार्थी युरा गागारिन प्रथमच स्वतंत्रपणे उड्डाण करणार आहे. हा तरूण काहीसा नर्व्हस झाल्यासारखा वाटला, पण त्याच्या हालचाली अगदी अचूक आणि आत्मविश्वासपूर्ण आहेत. उड्डाणाच्या अगोदर त्यानं कॉकपिटची आणि उपकरणांची काळजीपूर्वक पहाणी केली अन् मगच त्यानं 'रनवे'वरून विमान पुढं काढलं.

"गागारिननं उड्डाणासाठी परवानगी मागण्याकरता उजवा हात वर केला.

"परवानगी आहे." शिक्षक के. एम्. पुचिक यानी रेडिओवरून सांगितलं.

"एका मागोमाग एक विमानं आकाशात झेप घेऊ लागली. 'आपली पिल्लं' आकाशात व्यवस्थित उडताना पाहून शिक्षकांच्या तोंडून आपोआप प्रशंसोद्गार बाहेर पडले."

तंत्रशाळेंतल्या शेवटच्या वर्षात असताना युरानं "फ्लाइंग क्लब" मध्ये नाव दाखल केलं होत. हे त्याच्या पत्रावरून आम्हाला माहीत होतं. पण आम्ही त्याला फारसं महत्व दिलं नव्हतं. 'फ्लाइंग क्लब', विमान विद्येवरची पुस्तकं' हवाई उड्डाण यांचा उल्लेख त्याच्या पत्रात अनेकदा असे. पण आम्हाला ते सारे दूरचं, खऱ्याखुऱ्या जीवनापासून फार दूरचं वाटे. शाळेत असताना युरा आणि त्याचे मित्र विमानांचे नमुने करून उडवीत असत; तसाच हाही एक छंद असेल असं आम्हाला वाटत होतं.

पण आता पुढ्यात पडलेलं कात्रण काही वेगळच सांगत होतं. "पुन्हा एकदा त्यानं मला चकवलं," बाबा गुरगुरले, "ही इतकी जिद्द कुठून आली त्याच्या स्वभावात?" त्यानी त्या कात्रणाची काळजीपूर्वक घडी केली आणि आतल्या खिशात व्यवस्थित ठेवली.

"चुकून त्याची सिगरेट वळाल," आईनं शंका बोलून दाखविली.

"तू काय समजतेस मला?" मग जरा गडबडून त्यानी नजर दुसरीकडे वळवली, "माझ्या मित्राना दाखवायचंय् ते कात्रण. युरानं विमान उडवलंय् काही झालं तरी."

□ □



# ९ : विमानोड्डाणापूर्वी

दर सुट्टीत युरा घरी आला की आम्ही मासे पकडायला जात असू. पण या वेळी नशीब आमच्या बाजूला नव्हतं. मासे गळ पकडत नव्हते.

गरम वाळूवर आम्ही पसरलो होतो. ऑगस्ट महिना होता; ऊन कडक होतं. उन्हानं आम्ही पेंगुळलो होतो. डोळ्यावर झापड येत होती. पडल्या पडल्या गळावर नजर ठेवीत होतो. पाणी इतकं नितळ अन् स्वच्छ होतं की, किनाऱ्यावरच्या वाळुंजीच्या फिक्या सावल्याना न जुमानता, गळाचे आकडे, त्याला लावलेले किडे, नदीचा पसरट तळ, तिथल्या शिंपल्या, सारं काही स्वच्छ, अगदी स्पष्ट दिसत होतं.

झात नदीवरून पांढरे ढग हलके हलके सरकत होते. त्यांच्या वजन नसलेल्या सावल्या, कोणताही अडथळा न येता नदीच्या पृष्ठावर लहरत होत्या. सूर्याची किरणं त्यांना विंधून जात होती.

आम्ही घरी सारे सांगून आलो होतो. सारासाठी आणि तळायला खूप मासे घेऊन येतो म्हणून. पण आमची अगदी पार निराशा झाली. एकही मासा गळाला लागला नाही ऊन चांगलच चढलं होतं. आपल्या फजितीबद्दल काही बोलायची कोणाला इच्छा होत नव्हती तेवढा तकवाही नव्हता.

"युरा, एखादी छान गोष्ट सांग," बरीस म्हणाला.

"कशाची गोष्ट?" युरा आळसटला होता.

"विमानाची. तू उडविलेल्या विमानाची."

आमचा 'मधला' भाऊ नीट जागा झाला, उठून बसला आणि गुढग्याना हातानी मिठी घालत म्हणाला, "तुम्ही दोघं जमिनीला चिकटलेले आळशी आहात; तुम्हाला सांगून काय उपयोग?"

"उगीच ऐट दाखवू नकोस," मी म्हणालो, "भाव खायचं काम नाही. आमच्यापैकी तुला एकटयालाच उडता येतंय् तर सांग त्याची माहिती."

त्यानं डोळे मिचकावले कुठून कशी सुरुवात करावी याचा विचार केला, मग म्हणाला, "ठीक आहे. माझी एक गोष्ट सांगतो. पण विमान उडवायची गोष्ट नाही ती. मी पॅरॅशूटनं पहिल्यांदा उडी मारली त्याची हकिकत आहे."

दोन डझन मुलं आणि मुली भल्या पहाटेच बसमधून विमानतळाकडे निघाली होती. सारातोवच्या रस्त्यावर अजून पहाटेचा काळोख होता. त्या साऱ्यांची तंत्रशाळेत नाहीतर 'फ्लाइंग क्लबा'त एकमेकांशी ओळख झाली होती. पहाट फुटता फुटता ती सारीजणं पॅरॅशूटनं प्रथमच उडी मारणार होती. त्या अगोदर त्यांनी दोन दिवस असाच पहाटेच्या काळोखातून प्रवास केला होता पण दोन्ही दिवस ठरलेला कार्यक्रम पुढे ढकलावा लागला, हवा खराब होती.

मुलं शांत बसली होती, विचारात गर्क झाली होती. मुली मात्र कुजबुजत होत्या, गालातल्या गालात हसत होत्या, मुलांना चिडवीत होत्या. त्यातली एक मुलगी विशेष उठून दिसत होती; ती धीट होती; केसांची पोनिटेल; आखूड घट्टसा स्कर्ट; ओठांना लालभडक लिपस्टिक : साहजिकच साऱ्यांचं लक्ष तिच्याकडे जात होतं.

"त्याच्याकडे पहा जरा. घुमा आहे, कोणात मिसळायला नकोय त्याला," युराकडे बोट दाखवीत ती म्हणाली, 'बहुतेक त्यानं शंभर उड्या मारल्या असाव्यात. एखादा 'क्रीडा-पंडित' असावा."

"तसं काही नाही. माझीही आज पहिलीच उडी आहे." युरा हलक्या आवाजात उत्तरला. संभाषण वाढवायची त्याची इच्छा नव्हती

"पहिलीच उडी ? मी खात्रीनं सांगते तू नक्कीच घाबरणार."

"स्वतःला कोणी फार मोठं समजू नकोस ! बरं का माझिका," युरा स्वतःशीच पुटपुटला. तिच्या टोमण्यानं त्याला अपमान वाटला होता.

"कबूल कर !" तिनं आपलंच चालू ठेवलं, "तू घाबरला आहेस, पण तसं दिसू नाही म्हणून प्रयत्न चालला आहे तुझा. खरं की नाही ?"

"होय, मी घाबरलो आहे आणि तसं दिसू नाही म्हणून माझा प्रयत्न चालला आहे," युरानं तिला विरोध केला नाही.

"मला मात्र मुळीच भीती वाटत नाही. अगदी इतकीसुद्धा," ती म्हणाली. आपल्याला गुलाबी नखाचा अगदी लहानसा भाग तिनं मोजून दाखवला.



सर्वात प्रथम त्यांच्या शिक्षकानी उडी मारून दाखवली. त्यांचं नांव दिमित्री मार्तिआनोव. ते अगदी डौलदारपणे, बिनचूक खाली उतरले. मुलं आदरानं त्यांच्या उडीचं निरीक्षण करीत होती. त्यानी आपल्या पॅरॅशूटची चटकन, सफाईदारपणानं घडी घातली पुढच्याच क्षणी त्यानी हुकूम फर्मावला, "गागारिन, सर्वात अगोदर तू !"

स्वप्नात असल्यासारखा युरा विमानाकडे चालत गेला. आपण हवेत तरंगत चाललो आहोत असं त्याला वाटलं. पण मग त्याला बांधलेल्या दोन पॅरॅशूटच्या वजनाने तो भानावर आला एक पॅरॅशूट छातीवर होता, दुसरा पाठीवर होता. "अजूनही मागे पाऊल घेता येईल," त्याच्या मनातला एक भित्रा आवाज कुजबुजला.

"गुड् लक ! उडी चांगली मार." मघाचीच ती फटाकडी म्हणाली.

शिकण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या त्या लहान विमानानं तळावरून वळण घेतलं अन् ते हवेत चढू लागलं. युरा त्याच्या अगोदर विमानात कधी बसला नव्हता. त्याला जर पॅरॅशूटमधून उडी मारायची नसती तर विमानातून खालच्या शहराचं आणि वोल्गाचं दिसणारं सुंदर दृश्य त्यानं टक लावून पाहिलं असतं. पण त्यानं जर उडी मारली नसती तर त्याला विमान उडवायचे शिक्षण घेता आलं नसतं. पायलटनं हात वर केला. उडी मारण्याची वेळ झाली होती.

युरा बाहेर पंखावर चढला. चढताना कशाला तरी घासून गेला. खालून सारी पृथ्वी उसळून वर येत होती तिच्या अंतर्वक्र पृष्ठावर निळे, काळे, हिरवे चौरस आणि चौकोन जडवले होते. युरा पंखाखाली उतरला.

"चल, मार उडी ! तुला जमेल चांगली !" पायलट जोरानं ओरडला, "खाली साऱ्या मुली हातात फुलं घेऊन तुझी वाट पहात आहेत. तयार ?"

"तयार !" युरा यांत्रिकपणानं उत्तरला.

"चल, मार तर !"

त्याच्या बुटाचे तळवे पंखावर घासले त्याच्या चेहऱ्यावर थंडगार वाऱ्याची चपराक बसली. त्याला वाटलं आपण खाली खाली चाललो आहोत अन् पॅरॅशूट तर अजून उघडलं नाही. जीवाच्या आकांतानं त्याची बोटं आणीबाणीच्या वेळी उघडायच्या पॅरॅशूटच्या रिंगचा शोध घेऊ लागली. रिंग काही बोटाला लागेना. दरम्यान खालची पृथ्वी विलक्षण वेगानं वर येत होती.

पण भीतीग्रस्त व्हायची त्याच्यावर वेळ आली नाही. त्याच्या शरीराला एक जोरदार धक्का बसला आणि त्याच्या पाठीवरचं मुख्य पॅरॅशूट उघडलं. त्याचा खाली पडण्याचा वेग कमी झाला. तो हलके हलके तरंगत खाली उतरू लागला.

"पहिल्या उडीच्या मानानं वाईट नाही" त्याचे शिक्षक म्हणाले, "निदान बटाट्याचं पोतं खाली येतंय् असं तर दिसलं नाही." मार्तिआनोवच्या प्रशंसेला फार मोल होतं. तो अगोदर लढाऊ विमानावर पायलट होता; नेहमी म्हणायचा विमान उडवणं हे फक्त धीट आणि शूर लोकांचं काम आहे. येरागबाळाचं नाही.

"मी पुन्हा मारू का उडी ?" युरा चांगलाच उत्तेजित झाला होता.

"शांत हो, अशी घाई करून होत नसतं," मार्तिओनोव म्हणाले; "ती सारी मुलं–मुली रांगेत कशासाठी उभी आहेत ? त्या सार्‍यांना आकाशात उडायची घाई झाली आहे. विशेषत: या देखण्या पोरीला."

ती 'देखणी पोरगी' म्हणजे बसमधली फटाकडीच होती. तिचा दुसरा नंबर होता. परंतु ऐन वेळी तिचा धीर सुटला अन् पायलटनं तिला जमिनीवर आणलं

कोणी तिला हसले, कोणी तिला चिडवलं. पण युरावर आपण मारलेल्या उडीचा अमल होता. त्याला तिच्याबद्दल वाईट वाटलं. तिच्याजवळ जाऊन तो म्हणाला, "वाईट नको वाटू देऊस. मलाही सारखी भीती वाटत होती. तुला माहीत आहे ? मी विमानातून बाहेर पंखावर आलो तेव्हा मला तुझी आठवण झाली. त्यामुळेच मी उडी मारली असावी. पुढच्यावेळी जमेल तुला सुद्धा."

"आभारी आहे पण मी पुनः कधीही इथे येणार नाही."

परंतु ती परत आली. मात्र पूर्वीची उद्धट, गर्विष्ठ 'माझिका' कोणाला दिसली नाही. एकदम ती सार्‍यांना आवडू लागली. मुलांनी पत्ता लावला. एका साध्यासुध्या कष्टकरी कुटुंबातली मुलगी होती ती. आपणही कोणीतरी आहोत हे दाखवण्याच्या वेड्या इच्छेतून तिचा उद्धटपणा निर्माण झाला होता. नंतर जेव्हा ती विमानातून वर गेली तेव्हा व्यवस्थित उडी मारली

पायलटनं युराला सांगितलं होतं की, सार्‍या मुली तुझ्यासाठी फुलं घेऊन उभ्या असतील म्हणून. त्या उभ्या होत्या. अन् त्या फटाकडीनं त्याला फुलांचा गुच्छ दिला होता. पण तो प्रसंग यानंतर मागाहून घडला होता. तो एकटाच स्वतंत्र उड्डाण करून खाली आला तेव्हाचा तो प्रसंग. त्याच प्रसंगाबद्दल सारातोव युवकपत्रानं लिहिलं होतं.

युराच्या गोष्टीवर बरीसनं स्वत:चं डोकं लढवलं, "तू त्या फटाकडीच्या प्रेमात पडला आहेस का ?" त्यानं सरळ सरळ सवाल केला.

"नाही. शिवाय तिचं दुसर्‍या कोणावर तरी प्रेम आहे. जाता जाता सांगतो तुला, तो दुसरा तरूण फार छान आहे." युरा मजेदार हसला, "सुरवातीला माझं काही तिच्याबद्दल फारसं चांगलं मत नव्हतं. पण ती फारच चांगली



मुलगी निघाली. उडी मारायचा प्रसंग आल्याबरोबर किती तरी मुलामुलींनी पळ काढला. उडी मारायला, विमान उडवायला लागणारं धैर्य त्यांच्यापाशी नव्हतं. विशेषत: घरी जे लाडावले होते, कठीण प्रसंग म्हणजे काय हे ज्याना ठाऊक नव्हतं त्यांनी पळ काढला. पण तिनं धीर सोडला नाही अशा व्यक्तींबद्दल मला आदर वाटतो. खरं तर माझ्याऐवजी तिलाच फुलं द्यायला हवी होती. मलाही सुचलं नाही तिला फुलं द्यावीत म्हणून."

आमच्या गप्पाना असा काही रंग चढला होता की, उशीर होतोय्, हवामान बिघडतंय् हे ही आमच्या ध्यानात आलं नाही. कापसासारखे पांढरे ढग केव्हाच पळाले होते आकाशात सावळ्या पर्जन्यमेघांची दाटी झाली होती. आमच्या खालची रेती थंडगार झाली होती. तेवढ्यात पावसाला सुरुवात झाली. बरीस शहारला, वाळूवरून उठला आणि त्यानं कपडे अंगाभोवती घट्ट लपेटून घेतले. आम्हीही त्याचच अनुकरण केलं.

"घरी गेलेलं बरं. नाहीतरी मासे काही मिळतच नाहीत आज." मी म्हणालो.

बरीस आमचं मासेमारीचं साहित्य गोळा करायला गेला. एका क्षणानंतर त्याची मोठी आरोळी कानावर पडली. आम्ही वळून पाहिलं. गळाच्या दोरीनं वेगात एक कमानदार वळण घेतलं. दोरीच्या टोकाला एक चंदेरी तुकडा सरसरत गेला आणि थपकन् बरीसच्या पायाजवळ आपटला.

केवढा मासा होता तो !

मुसळधार पाऊस वगैरे सर्व विसरून आम्ही गळछड्यांकडे धाव घेतली. मोठाच चमत्कार घडून आला होता. सारे गळ जोराजोराने हलत होते. आम्ही वर ओढून घेण्यासाठी वाट पहात होते.

"बरा सापडलास लेका या वेळेला."

"हा व्हेल पाहिलास ?"

"व्हूऽऽऽ !"

उत्साहाच्या भरात काय करावं अन् काय नाही असं होऊन गेलं. गळाना आमिष लावायलासुद्धा उसंत मिळेना. मासे टाकायला आणलेली टोपली अपुरी पडली. मग आम्ही वाळुंजीच्या लांब डहाळीला मासे अडकवून ठेवले.

आम्ही अगदी नखशिखांत, ओलेचिंब झालो होतो. तरीही रक्त तापल्या-सारखं वाटत होतं. त्या क्षणी काय वाटेल ते झालं असतं तरी आम्ही तो किनारा सोडला नसता. पण एक अनपेक्षित संकट आलं. माशांसाठी आणलेलं आमिषच संपून गेलं.

" सद्गृहस्थहो, आता पुरे," मी म्हणालो, " थोडे मासे राहू द्या नदीत पिलावळ वाढवायला."

" काय आश्चर्य आहे पहा ! प्रथम हवामान बिघडलं अन मग भराभर मासे मिळायला लागले. आपण 'स्पोर्टिंग फिशरमन'ला लिहून विचारू या, असं का म्हणून ! कदाचित असंही असेल आपल्यापैकी एकाचं नशीब जोरावर असेल," युरा म्हणाला. त्यानं खोडकरपणानं हळूच माझ्याकडे पाहून डोळे मिचकावले अन हलके हलके तो बरीसच्या दिशेनं सरकला. बरीस उथळ पाण्यात उभा राहून गळाची दोरी खेचत होता. युरा जोरात ओरडला अन् त्यानं बरीसला धक्का दिला. बरीसच्या हातातला गळ खाली पडला; त्याचे हात हवेत वेडेवाकडे नाचले अन् तो धाडकन खालच्या पाण्यात पडला. आपला भाऊ आपला सूड घेईल याची वाट न पहाता युरानं सरळ पाण्यात सूर मारला–अंगावरच्या कपड्यांसकट–आणि समोरच्या तीराकडे पोहोत निघाला.

मला एकदम आठवण झाली : आपण सर्वात वडील आहोत. मी जोरानं ओरडलो, " वेड लागलंय की काय तुम्हाला ? व्हा पाण्याबाहेर ! "

काही मिनिटातच माझे भाऊ तीरावर माझ्यापाशी आले. मी त्यांना चांगलं फैलावर घेतलं : 'ऑगस्ट महिना हा, पाणी किती थंड आहे. ही काय पोहायची वेळ आहे ? आता होऊ देत न्युमोनिया.' मी मासा उचलायला वाकलो अन माझा पाय घसरला. मी सरळ पाण्यात आडवा झालो. काय झालंय कळायच्या अगोदर मी गळ्याएवढ्या पाण्यात उभा होतो.

माझे भाऊ जवळच उभे होते बरीसला हसू आवरेना, तो खो खो करून हसायला लागला. युरा कष्टी चेहरा करून लटकंच सांत्वन करू पहात होता, " च् ! च् ! काय हे ! मला माहीत आहे तुला पोहोण्याचा फारसा उत्साह नसतो. वलेन्तिन, तू कशाला सूर मारलास ?"

मी दोघाना भरपूर 'पुष्पांजली' वाहिली मग कसाबसा ओल्या वाळूवर आलो.

घरी जाऊन पोहोचलो तेव्हा आमचे तिघांचे अवतार अगदी पहाण्यासारखे झाले होते.

" तिघांपैकी एकालाही अक्कल नाही !" आईचं भाष्य.

" जाऊ देत, यावेळी क्षमा करू या त्याना " माशा म्हणाली, 'एकतर आज रविवार आणि दुसरं म्हणजे त्या तिघाना असं एकत्र कधीच जाता येत नाही."

त्या दिवशी संध्याकाळी माशांचं सूप असं काही झालं होतं की बस्स् ! पीते रहना !



पुन्हा एकदा युराचे परत जाण्याचे दिवस जवळ आले. यावेळी तो ओरेन्बर्गच्या 'एअर फोर्स स्कूल' मध्ये जाणार होता. पुन्हा एकदा बाबा नाराज झाले होते.

" आज बारा वर्ष झाली, डेस्कापाशी बसून अभ्यास करतो आहेस ; बसून बसून पँटाना भोक पडायची पाळी आली आजपर्यंत तू कधी पुऱ्या एका दिवसाचं काम केलं नाहीस. अजूनही तू आपल्या देशाचं फुकट खातो आहेस. तुला तुझा व्यवसाय आवडत नाही का ? काम करायचं सोडून तू पळ काढतो आहेस. काय म्हणतो मी ?"

" मला माझा व्यवसाय जरूर आवडतो," युरा उत्तरला, " अगदी फार आवडतो. पण आता विमानातून उतरणार नाही मी तेच माझं जीवनध्येय. त्यात बदल होणार नाही. विमान उडविण्यापासून आता कोणीही, काहीही मला अडवू शकणार नाही."

आम्ही बागेत बसलो होतो ज्या वर्षी आम्ही क्लुशिनो सोडून झात्स्कला राहायला आलो त्याच वर्षी बाबानी सफरचंदाची झाडं लावली होती. आता ती उंच भक्कम झाली होती. त्यांच्या फांद्या फळभारानं लवल्या होत्या. त्या झाडांकडे पहाता पहाता ध्यानात आलं: लढाई संपल्याला दहा वर्ष उलटून गेली होती, तेव्हापासून आमच्या कुटुंबात किती बदल घडून आले होते. झोया आणि मी जेव्हा कैदी म्हणून जर्मनीला चाललो होतो, त्यावेळी आमचं जे वय होतं तेच आता बरीसचं होतं. त्यावेळी माझं जे वय होतं त्यापेक्षा युराचं वय आज जास्त होतं. विलक्षण कुशाग्र बुद्धी असलेला त्यावेळचा खोडकर मुलगा आज तरूण झाला होता. त्याचं शरीर भरदार होतं, पावलापावलात आत्मविश्वास होता, मन कणखर होतं ! त्याची ज्ञानतृष्णा कमी झाली नव्हती आपल्या या जगात काय नवं नवं घडतंय् ते सारं जाणून घ्यायचं होतं त्याला.

पण बाबांचं काय ? त्यांच्या परीनं त्यांचंही बरोबर होतं. त्यानी पन्नाशी गाठली होती; नव्हे, ओलांडली होती. वार्धक्याची चाहूल स्पष्ट ऐकू येत होती. आयुष्याची अत्यंत कठीण व खडतर वाटचाल करताना ज्या विचारानी त्याना मार्गदर्शन केलं होतं ते विचार बदलणं कोणालाही शक्य झालं नसतं.

बाबा युराला फैलावर घेत होते. एकामागून एक सिगरेट फस्त करीत होते. माझा भाऊ मुकाट्यानं त्यांचं बोलणं ऐकून घेत होता. एकही शब्द बोलला नाही तो मध्ये. अखेरीस केवळ एका वाक्यानं त्यानं बाबांची समजूत पटवली, " बाबा, आमच्या ड्राफ्ट बोर्डानं मला फ्लाईंग स्कूलमध्ये पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. मी विमान उडवलंय, पॅरॅशूटन उडी घेतली आहे आणि शारीरिक शिक्षणाच्या

परीक्षाही पास झालो आहे. मी नौदलात किंवा हवाई दलात जायला लायक आहे. असं बोर्डाला वाटलं आणि त्यानी माझी हवाई दलासाठी निवड केली."

बाबा थोडा वेळ मौन झाले. " जर तुझ्या ड्राफ्ट बोर्डानंच ..पण तरीही मला वाटतं, काही दिवस हवाई दलात काढल्यावर तू जमिनीवरचं काम धरावंस अन् मग कसं काय आहे ते पहावंस."

" ओह ! बाबा," युरा उठला अन् बाबांच्या जवळ गेला. त्यांच्या खांद्यावर हात ठेवून तो बोलू लागला, " ग्रिगोरी बाखचिवनजी या पायलटची गोष्ट मी तुम्हाला सांगू का ? तो सोविएत वैमानिक होता. लढाई चालू असताना म्हणजे १९४२ साली, जगात प्रथम त्याने जेट विमानाची चाचणी घेतली. मी सांगतो त्याची हकिकत..."

त्या क्षणी मला स्पष्ट समजलं. जेट् विमानं हे युराचं सर्वात लाडकं स्वप्न होतं. फ्लाईंग क्लबात त्यानं उडवलं होतं ते एक जुनं पुराणं 'याक १८'. त्या दिवशी बागेत आम्ही कितीतरी वेळ गप्पा मारीत बसलो होतो युराची गाडी सुटायला खूप अवकाश होता. बाखचिवनजी, कोझेदुब, दिमित्री मार्तिआनोव आणि "सोविएत संघराज्याचा वीर" सर्गेई सेफोनोव यांच्याबद्दल युरा केवढ्या उत्साहानं सांगत होता. फ्लाईंग क्लबमध्ये ते सारे त्याचे शिक्षक होते. युराच्या बोलण्याचा माझ्यावर आणि बरीसवर फार प्रभाव पडला. बाबांच्यावरही त्याचा परिणाम झाला. युरानं आपल्या जीवनमार्गाची निवड केली आहे, विमानाची निवड केली आहे याबद्दल त्यांच्या मनात तिळमात्र शंका उरली नाही.

□ □



# माझा भाऊ, युरी

## भाग तिसरा

## १ : युरा : एअर फोर्स कॅडेट.

आमच्या युरासारख्या मुलाना केवळ ‘एअर फोर्स स्कूल’ नं घडवला अन् पुढे आणला असं जर म्हटलं तर ते चूक ठरेल. सारातोव फ्लाईंग क्लबनं त्याला केवळ उडी मारायला अन् विमान चालवायला शिकवलं नाही, त्यानी त्याच्या मनात विमानोड्डाणाबद्दल उत्कट आवड निर्माण केली; जीवनातला व्यवसाय निवडण्यास मदत केली आणि आयुष्यात स्वतःचे स्थान निश्चित करण्यात साहाय्य केले. व्यवसाय शाळेत आणि औद्योगिक तंत्रशाळेत युरानं जो काळ घालवला त्यानं त्याला गणवेश वापरायला शिकवलं; आपण एका सामुदायिकाचे सदस्य आहोत इतर सारे आपले सहकारी आहेत ही भावना त्याच्या मनात रूजवली. ही मुलं दैनंदिन जीवनातल्या कठीण समस्याही स्वतंत्रपणे सोडवू शकली. पावलोपावली दुसऱ्या कोणाची तरी मदत घेण्याची गरज त्याना भासली नाही. जी मुलंमुली आपल्या आईवडिलांच्या छत्राखाली फार काळ राहातात, आणखी सारखी त्यांच्या मदतीची अपेक्षा करतात त्यांचं फार नुकसान होतं. गणवेश आणि टोपी व्यवस्थित घालणं, तपासणीसाठी ताबडतोब बिछाना तयार करणं यासारख्या बारीक सारीक गोष्टींना साऱ्या लष्करीकेंद्रात महत्त्व असतं. त्या जपल्या म्हणजे बारीक सारीक गोष्टीसाठी बोलणी खावी लागत नाहीत.

अशा मुलाना प्रवेश परीक्षेत अग्रक्रम दिला जातो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. युराला प्रवेशपरीक्षेला बसावं लागलं नाही. कारण तंत्रशाळेतल्या शेवटच्या परीक्षेत त्याच्या रिपोर्टात सारे ‘ए’ शेरे होते.

अशा रीतीने युरा ऑरेन्बर्ग एअर फोर्स स्कूलमध्ये कॅडेट म्हणून दाखल झाला. तो अतिशय आनंदात होता. लढाऊ जेट विमान चालवण्याची त्याची महत्त्वाकांक्षा आता पूर्ण होऊ शकणार होती. या शाळेत प्रवेश मिळाल्याबद्दल त्याला अभिमान वाटत होता. मिखाईल ग्रोमोव, आन्द्रे युमाशेव आणि अनातोली



सेरोव यांच्यासारखे प्रख्यात पायलट याच शाळेतून बाहेर पडले होते. जगात जेट लढाऊ विमानांची पहिली चाचणी घेणारा कॅप्टन ग्रिगोरी बाखचिवनजी याच शाळेत शिकला. काही वर्षांच्या कालावधीत या शाळेतून बाहेर पडलेल्या १३० विद्यार्थ्यांनी ‘सोविएत संघराज्यांचा वीर’ हा बहुमान पटकावला.

शाळेच्या काही उत्कृष्ट परंपरा होत्या. आपल्या समाजसत्तावादी देशाबद्दल संपूर्ण निष्ठा व शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी गाजवलेल्या बहादुरीबद्दल आदर व अभिमान या गोष्टी तिथल्या विद्यार्थ्यांत आपोआप रूजत. त्या शाळेने अत्युत्कृष्ट पायलट घडवले, त्यांच्या अंगी असामान्य धैर्य होते.

युराला युनिफॉर्ममध्ये पहायला मी अधीर झालो होतो. पण बरेच दिवस-पर्यंत त्याला सुट्टी मिळू शकली नाही. आईबाबाना त्याच्या वाचून चुकल्या-चुकल्यासारखे वाटे. दरम्यान बरीसला लष्करात बोलावणे आले होते. मी सारा दिवस माझ्या कामात गुंतलेला असायचा; संध्याकाळचा आई-बाबांच्या घरी एक चक्कर मारायचा. सारं घर रिकामं, सुनं सुनं वाटायचं. आईबाबाना एकलेपणा जाणवायचा. आपल्या मुलांची तहान ते नातवंडावर भागवून घेत. झोयाच्या आणि माझ्या मुलांत त्यांचा वेळ बरा जायचा.

युरा घरी येवून गेल्याला वर्ष उलटलं होतं. नोव्हेंबरच्या उत्सवाअगोदर पोस्टमननं युराचं एक भेटकार्ड आणून दिलं.

“या शाळेत फारच कडक काम दिसतंय्,” आईनं तक्रार केली, “चार दिवसासाठी पाठवलं असतं तर काय बिघडणार होतं? वर्ष झालं, युरा भेटला नाही”

“लष्कराची कामं अशीच असतात,” बाबा समजावून सांगायला लागले, “महान पीटरच्या काळात शिपाई पंचवीस वर्षं नोकरी करीत अन् त्याना एकही सुट्टी मिळत नसे.”

या ऐतिहासिक पुराव्यानं आईचं समाधान होणार नव्हतं हे उघडच होतं. पण तीन दिवसानी खुद्द युराच आला. मी कामावर गेलो होतो, बाबांनी तिथं फोन करून कळवलं.

घरच्या वाटेवरच तो मला भेटला. बेतशीर उंचीचा, मजबूत बांध्याचा, अंगात ग्रेटकोट घातलेला, त्याच्यावर सार्जंटच्या हुद्याच्या फिता लावलेला, युरा मला सामोरा आला. मला पाहताच त्यानं एक ऐटबाज, सफाईदार सलाम ठोकला आणि आपलं नेहमीचं ऐसपैस हास्य केलं.

युरा ऑरेनबर्ग एअर फोर्स स्कूलमध्ये सार्जंट होता तेव्हाचा त्याचा एक फोटो आमच्याकडे आहे केस बारीक बारीक कापलेले अन् मनमोकळं रूंद हसू. सुट्टीवर तो जेव्हा घरी आला तेव्हा तो हुबेहूब तसाच दिसत होता.

आम्ही कडकडून भेटलो.

"कुठे निघालास?" मी विचारलं.

"जरा शाळेकडे चक्कर मारून येतो जुन्या आठवणी येताहेत. शाळेचे वर्ग पाहून येतो आणि जरा डेस्कापाशी बसून येतो. आमची जुनी टेबलं जाऊन तिथं आता नवे डेस्क आले आहेत. तुला यायचंय् माझ्याबरोबर?"

"नको, तू जाऊन ये. पण फार वेळ लावू नकोस."

युरा बरेच दिवस घरी राहिला. त्याच्यात खूपच फरक झाला होता; आम्हाला साऱ्यानाच जाणवला तो. तो बराच अबोल झाला होता. अनेकदा भोवतालच्या जगाची त्याला जाणीवही राहात नसे. कधी कधी मला वाटू लागे, आपण कोणी परके आहोत. आमच्या युराला काय झालं होतं कोणाला कळेना. पूर्वीचा माझा आनंदी, उत्साही भाऊ दिसेनासा झाला होता

"आज कामावर गेलो होतो, तिथं काय झालं ते सांगतो तुला," मी म्हणे, सांग या अर्थानं तो मान हलवी; पण माझ्या ध्यानात येई, याचं आपल्या सांगण्याकडे मुळीच लक्ष नाही. तो आपल्या लहानपणच्या मित्राना, सवंगड्याना भेटला पण त्याच्या वृत्तीत काही बदल झाला नाही.

आईनं माशाला एकीकडं बोलावून विचारलं, "युराला काय झालंय काही समजत नाही. भारी उदास अन् विचारात गढलेला दिसतो. शाळेत काही गडबड झाली काय कोणास ठाऊक, तुला काय वाटतं, आजारी तर नसेल? घरात त्याला आनंद वाटत नाही सारे जसे परके झालेत. संध्याकाळी सारखी कुणालातरी पत्र लिहीत असतो."

एक दिवस युरा बांधाबांध करायला लागला.

"तू परत जायला तर निघाला नाहीस?" आईला काळजी लागली.

"होय. मला जायला हवं."

"पण अजूनतर अर्धी सुट्टीही संपली नाही"

"तरीपण जायला हवं."

काहीतरी त्याला घरातून बाहेर खेचत होतं. पण ते काहीतरी म्हणजे काय? आई आपल्या मुलांच्या खाजगी चौकशा कधीही करीत नसे कारण तिला माहीत होतं, आम्हाला गरज भासली की आम्ही आपण होऊनच तिच्याकडे जात होतो. यावेळी मात्र ती खरोखरीच इतकी काळजीत पडली की जे तिनं एरवी कधीही केलं नसतं ते केलं ती म्हणाली, "युरा, इथं माझ्याजवळ बैस. मला तुझ्याशी बोलायचंय."

युरा नाखुषीनंच बसला.



"मला सांग, कशाची काळजी लागलीय इतकी तुझ्या जिवाला? काळजीनं काळवंडलेला तुझा चेहरा पाहून माझी झोप उडालीय. सांग, कशाच्या काळजीत आहेस?"

"तू नसत्या कल्पना रंगवते आहेस. काळजीचं काहीही कारण नाही. एक फार छान मुलगी आहे अन् मला ती आवडली आहे इतकंच्"

वाल्या गोर्याचेवाचं नाव आम्ही त्यावेळी प्रथम ऐकलं. युरा तिला प्रथम ओरेन्बर्गला भेटला होता. त्यावर वर्ष उलटलं होतं. तो वारंवार तिच्या घरी जात येत असे. तिचे आईवडील प्रेमळ होते, आतिथ्यशील होते. तिचे वडील इवान स्तेपानोविच क्रास्नाया पोल्याना आरोग्यधामात स्वयंपाकघरात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमुख होते. आई साधी गृहिणी होती. वाल्याला दोन बहिणी आणि तीन भाऊ होते. कुटुंब मोठं होतं, आनंदी होतं. वाल्यानं दशवार्षिक अभ्यासक्रम पुरा केला होता; टेलिफोन-ऑपरेटर म्हणून काम केलं होतं. आता तिनं नर्सिंग स्कूलमध्ये नाव घातलं होतं.

युरानं मोकळेपणानं सांगितलेली माहिती ऐकून आईची भीती दूर झाली; याबरोबरच नवे प्रश्नही समोर उभे राहिले. युरा गंभीरपणानं त्या मुलीचा विचार करीत होता. पण इतक्यातच घर मांडण्याचा विचार करणं योग्य झालं असतं का? अजून त्याचं स्वतःचंच शिक्षण पुरं व्हायचं होतं. पण जर त्यानं लग्न करायचं ठरवलं असलं तर?

"मग लग्नाचा विचार करायला हवा आता," आई चाचपून पहाण्यासाठी म्हणाली.

युरा गडबडला, "अं... मी अजून मागणी घातली नाही तिला. माझा धीरच झाला नाही."

"माझी एकच इच्छा आहे. लग्न करून तू सुखी व्हावंस. तुझ्या घरावर नेहमीच सूर्यप्रकाश खेळत राहील असं नाही; कधी ढग येऊन सावटही पडेल. पण युरा, तू एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावीस. प्रत्येक गोष्टीत सहभागी व्हा. तुम्ही लग्न केलंत की प्रत्येक गोष्टीत दोघानी सहभागी झालं पाहिजे"

युरा अस्वस्थ का होता त्याचं कारण आम्हा सर्वाना कळलं त्यानं घरी राहावं असं सर्वानाच वाटत होतं पण आता कोणी त्याला थांबवून घेतलं नसतं. त्यानं आमचा निरोप घेतला तेव्हा बाबानी त्याला रोखठोक सल्ल्याच्या चार गोष्टी सांगितल्या: "अगोदर तुझा अभ्यास पुरा कर. लग्नाचा विचार करायला मागून पुष्कळ वेळ मिळेल. लग्न केलंत की तुम्हाला मुलंबाळं होतील. त्याला काही फारशी अक्कल लागत नाही. पण कुटुंबाचं पोषण करायला, मुलाबाळाना

नीट वाढवायला खांद्यावरचं डोकं शाबूत हवं. नीट पुढं पहा अगोदर अन् मग उडी घे."

बाबांनी सांगितलेलं कितपत युराच्या कानात शिरलं मला माहीत नाही. त्या दिवशी युरा परत गेला आणि बरोबर वर्षानं परत आला.

आई, झोया आणि माशा लग्नाच्या मेजवानीची तयारी करण्यात गर्क झाल्या होत्या. नवी नवरी त्याना मदत करत होती. युरा आणि मी त्याना मदत करायला पुढे सरसावलो पण त्यानी आम्हाला तिथून पिटाळून लावलं. "बाहेर पाहुणे आले आहेत त्यांच्याकडे पहा जरा," म्हणून आम्हाला सुनावण्यात आलं. आम्ही मुकाटयानं तिथून बाहेर पडलो आणि युराच्या मित्रांना भेटायला निघालो.

युराचा चेहरा आनंदानं फुलला होता, उत्साहानं तळपत होता. त्याला आनंद व्हायला तसंच कारण होतं. त्याच्या आयुष्यातले दोन महत्त्वाचे प्रसंग एकदम घडून आले होते त्याला अधिकाऱ्याचा हुद्दा मिळाला होता आणि एका गोड मुलीशी त्याचं लग्न झालं होतं.

"वाल्या आवडली का तुला?" युरानं विचारलं.

"छान मुलगी आहे. दिसायला गोड आहे. पण तुझी आणि तिची गाठ पडली आहे."

आम्ही थोडेसे चालून गेलो. त्याचा पुन्हा तोच प्रश्नः "माझ्या वलेन्तिना-बद्दल तुझं काय मत आहे?"

"मघाशी सांगितलं ना मला आवडली म्हणून," बोलता बोलता मला हसू आलं : "तुला वेड लागलंय. शंभरदा तोच प्रश्न विचारून झाला."

"मला वेड लागलंय् खरं आहे. हजारदा विचारीन तोच प्रश्न. पैजेवर सांगतो, आज तुला माझा हेवा वाटतोय्. खरं सांग, वाटत नाही?"

मला वाटतं हा मनुष्यस्वभावच आहे माझ्या लग्नाच्या दिवशी त्याला जसा अतिशय आनंद झाला होता तसाच आज मलाही झाला होता.

सगळयानाच वाल्या एकदम खूप आवडली होती. ती मोठी गोड होती, स्वभावानं प्रेमळ होती, दुसऱ्याचा विचार करणारी होती. मेजवानीला खूप पाहुणे आले होते. इतँदा दिमित्रीये. ना प्रोइत्स्काया आणि लेव मिखायलोविच बेस्पालोव हे युराचे शाळेतले शिक्षकही आले होते. ते आल्याने युराला विशेष आनंद झाला.

सारेजण आपापल्या जागी बसले होते. मधल्या टेबलाजवळ नवरा-नवरी मानाच्या खुर्च्यांवर बसली होती. त्याना शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी परंपरेनुसार सर्वांनी हातात भरलेले ग्लास घेतले आणि एक अघटित घडलं. बाबा उठले,



सगळयांचं लक्ष वेधून घेण्यासाठी त्यानी ग्लासवर काटयानं वाजवलं आणि युराकडे वळून ते म्हणाले, "मुला, तुझं लग्न झालं; तू ऑफिसर झालास याचा आनंद होतो. पण एक विचारायचंय्, तुमचं लग्न अधिकृतपणे नोंदवलं आहे ना? एअर फोर्स स्कूलचं रीतसर सर्टिफिकेट तुमच्याकडे आहे ना?"

सगळीकडे आनंदानं उत्साहानं चाललेली गडबड एकदम थंडावली. एखाद्या शाळकरी मुलासारखा युरा शरमेनं लालेलाल झाला. कित्येक वर्षात असा गोंधळलेला युरा मी पाहिला नव्हता. वलेन्तिनानं मान खाली घातली.

"अलेक्सी इवानोविच, हे...." बायकापैकी एकजण हळूच त्याना म्हणायला गेली.

युरानं आतल्या खिशात हात घातला आणि लग्नाचं नोंदणीपत्रक आणि स्कूलचं सर्टिफिकेट त्यांच्या हाती दिले.

तिथे जमलेली प्रत्येक व्यक्ती अगदी अस्वस्थ झाली. मला वाटतं, बाबांनी मुद्दामच तिकडे दुर्लक्ष केलं आणि ते दोन्ही कागद सावकाश, मोठयानं वाचून दाखवले. मग त्यानी हळूहळू वळून प्रत्येक पाहुण्याकडे पाहून घेतले. शेवटी ते नवरा-नवरीकडे वळले.

"आता सारं काही स्पष्ट झालं. मुला, मी तुझं अभिनंदन करतो! मुली, तुझंही अभिनंदन करतो! नेहमी सुखी असा."

प्रथम भानावर आले बेस्पालोव. त्यांनी टाळया वाजवायला सुरुवात केली. मग प्रत्येकजण टाळया वाजवायला लागला कोणी मोठयानं ओरडून आपली पसंती दर्शवली. बाबांच्या वागण्याकडे प्रत्येकानं एक गंमत म्हणून पाहिलं.

ग्लासाना ग्लास भिडल्याचे किणकिण आवाज झाले. गाण्याला, नाचाला सुरुवात झाली सारेजण 'एक गंमत' केव्हाच विसरून गेले. लग्नाची पार्टी जशी रंगावी तशी रंगली लोक आनंदात होते. सगळीकडे गडबड चालली होती. युराला जुन्या दिवसांची याद आली, त्यानं ॲकॉर्डियन वाजवण्याचा प्रयत्न केला, पण पाहुणे त्याला सोडायला तयार नव्हते. शेवटी त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही.

लग्नाच्या प्रत्येक पार्टीत होतं तसंच इथेही झालं. पाहुणेमंडळी नवरा-नवरीला विसरून गेली. टेबलं सरकवून भिंतीना लावली गेली. सारेजण नाचात सामील झाले. गाण्याची लय वाढत गेली. युरा आणि वलेन्तिना तिथून केव्हा निसटले कोणाच्या लक्षातही आलं नाही.

साऱ्या खिडक्या सताड उघडया होत्या; तरीही आत चांगलेच उकडायला लागले. मी सिगरेट ओढायला बाहेरच्या पडवीत गेलो, अंधारात फाटकापाशी मला दोन आकृती दिसल्या. युरा आणि वाल्या तिथं उभी आहेत हे लक्षात येवून मी

घरात जायला वळलो, तेवढ्यात युराची नजर माझ्याकडे गेली त्यानं हाक मारली, " कोण वाल्या तू का ? इकडे ये."

पडवीच्या पायऱ्या उतरून मी चालत फाटकापाशी गेलो. ती दोघं एकमेका-जवळ उभी होती; हात कुंपणावर टेकवलेले होते. युरानं आपलं जाकीट वाल्याच्या खांद्यावर घातलं होतं.

" हे तर सरळसरळ सर्दीलाच निमंत्रण आहे !" मी म्हणालो.

युरा हसला. त्या दिवशी संध्याकाळी सारा वेळ तो हसतच होता. " काही होत नाही सर्दी. छान उबदार, प्रसन्न वाटतंय्. मी कुठंतरी वाचलंय्. वलेन्तिना म्हणजे उत्तम आरोग्यच. तेव्हा तूच बघ आम्हाला कसली आलीय सर्दीची भीती? खरं म्हणशील तर आम्हाला कशाचीच भीती वाटत नाही."

दोघंही मजेनं हसली.

बराच वेळ आम्ही गप्प उभे होतो. कारण कधी कधी अशी वेळ येते की, सारं काही स्वच्छ, स्पष्ट असतं बोलायची गरज पडत नाही. मी चुळबुळ करायला लागलो; आपण अतिक्रमण करतो आहोत असं वाटून मी जायला वळलो. त्याच-क्षणी आकाशातून एक तारा पडला आणि पडता पडता जळून नाहीसा झाला.

" त्या तिकडेच कुठेतरी 'लैका' आहे. अंतराळात जिवंत प्राणी," युरा म्हणाला, " जर का......" त्यानं बोलणं तसंच अर्धवट सोडून दिलं.

युराच्या बोलण्याचं मला आश्चर्य वाटलं नाही. दुसरा 'स्पुत्निक' 'लैका'ला घेऊन अंतराळात गेला होता. त्याच्या आश्चर्याचा भर अजूनही कायम होता. ३ नोव्हेंबरपासून वर्तमानपत्रात पान भरभरून 'लैका'चे फोटो येत होते. उभ्या कानाची 'लैका' साऱ्यांची लाडकी ठरली होती.

परंतु वलेन्तिनाला त्याच्या बोलण्यात दुसरचं काहीतरी जाणवलं असावं, कारण तिनं लागलीच विचारलं, "जर का...काय ? तुला पुढे काय म्हणायचं होतं ?"

युरानं एकदम उत्तर दिलं नाही. थोडा वेळ थांबून तो म्हणाला, " मी विचार करीत होतो, 'लैका'ला अंतराळात कसं काय वाटत असेल ? विचार करायला लागलो तरी मनाला धसका बसतो. साऱ्या बाजूना कुठं काही नाही, केवळ काळा मिट्ट काळोख आणि तारे. जर तिथे माणूस असता तर खंबीर निग्रहाच्या जोरावर त्यानं भीती दडपून टाकली असती. पण कुत्रा कितीही चलाख असला तरी शेवटी तो कुत्राच असतो."

" तू गेला असतास का वर ?"

मी त्याला चिडवीत, मजेत विचारलं. माझी अपेक्षा होती की युरा किंवा इतर कोणीही म्हणेल, " नक्कीच गेलो असतो, का नाही ?" पण त्याच्याऐवजी



काहीसा अस्वस्थ होत तो म्हणाला, " काहीतरी वेडयासारखं बडबडत सुटलोय् आपण त्याच्याऐवजी आता या 'प्रमादपूर्ण पृथ्वीबद्दल बोलू या." तो किंचित रागावलाही होता.

वलेन्तिना गारठली होती ती घरात पळाली. आम्ही पाच मिनिटं तिथंच उभे होतो. युरानं पुढे जो प्रश्न विचारला त्याचं उत्तर देणं मला जड गेलं.

" वाल्या, ओरेन्बर्गला आमच्या लग्नाला घरातलं कोणी का आलं नाही ?"

" प्रथम आमचा यायचा विचार होता. मग बेत बदलला. इथंच समारंभ् करायचं ठरवलं."

" हे काही कारण होऊ शकत नाही."

मी काहीतरी पुटपुटलो; ओरेन्बर्ग फार दूर आहे, फार खर्च आला असता वगैरे. खरं तर ते कोणालाच पटण्याजोगं नव्हतं. मी खरं बोलत नव्हतो आणि यामुळे दोघंही अवघडलो होतो. पण मला बाबांबद्दल वाईट वाटत होतं म्हणून मी ते खोटं खोटं नाटक चालू ठेवलं.

लग्नाचं निमंत्रण आम्हाला दोन नोव्हेंबरला मिळालं होतं. बाबांनी ते वाचलं अन् दाणकन् टेबलावर मूठ आपटली, " पहिला लग्नसमारंभ मुलाच्या घरी ही आमची रीत. रशियात शतकानुशतकं तीच पद्धत चालत आली आहे," ते रागानं धुमसू लागले.

आई काहीतरी समजावयला गेली पण बाबांना काही पटवून देणं अशक्य होतं

" मी या घराचा मालक आणि कोणालाच माझ्याबद्दल काही आदर वाटत नाही," त्यांनी हट्टानं आपलं बोलणं चालूच ठेवलं; " तुम्हाला वाटतंय्, मी मेलोय् ! सगळ्यात मोठ्या मुलानं बाहेर जाऊन लग्न केलं, आता दुसऱ्यानंही तेच केलंय् ! छे ! आम्ही नाही जाणार कोणी कुठं !"

अर्थात मी त्यांचं म्हणणं अमान्य करून ओरेन्बर्गला जाऊ शकलो असतो पण एकतर ओरेन्बर्ग अतिशय दूर होतं आणि दुसरं म्हणजे इतक्या झटपट रजा मिळणंही जड गेलं असतं. म्हटलं तर कबूल, म्हटलं तर नाकबूल असं करून प्रत्यक्षात मी बाबांच्याच भूमिकेला पाठिंबा दिला होता. शेवटी झालं काय, तर आमच्यापैकी कोणीच लग्नाला गेलं नाही. युराला न दुखावता हे सारं कसं सांगावं ते कळेना म्हणून मी गप्प बसलो.

सात वर्षानंतर पुन्हा एकदा हाच विषय निघाला ; पुन्हा एकदा मी काही-तरी लंगडया सबबी सांगायला सुरूवात केली. पण त्यावेळी युरानं मला अडवलं, " ओरेनबर्गला यायला पैसे नव्हते कबूल. पण दुसऱ्या लग्नसमारंभापुरते तर होते ना ? तेव्हा तूच पहा ही काही खरी कारणं नाहीत."

"ठीक आहे," मी मान्य केलं अन् त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालो, "झालं गेलं विसरून जा. आमच्याबद्दल मनात राग धरून ठेवू नकोस. आई-बाबांचाही राग करू नकोस, विशेषत: बाबांचा. त्या दोघाना तुझ्याबद्दल फार प्रेम वाटतं. कधी कधी गोष्टीं व्हाव्या तशा घडत नसतील तर त्याचं कारण हेच आहे. तुझ्यावर फार माया आहे त्यांची."

"मी रागावलो नाही," त्यानं माझ्या छातीत हलकेच एक ठोसा लगावला, हसला अन् म्हणाला, "तुम्ही सारे सनातनी, जीर्ण पुराणमतवादी !"

☐ ☐



## २ : दूर, दूर उत्तरेत.

नवं जोडपं आई-बाबांच्या घरी चारच दिवस राहिलं. वलेन्तिनाचं नर्सिग स्कूल सुरू होणार होतं; युराची नेमणूक दूर उत्तरेच्या एका ठाण्यावर झाली होती, त्याला लवकरच रुजू व्हायचं होतं. खरंतर युराला स्वत:ला निवड करायची संधी देण्यात आली होती; वाटल्यास त्यानं त्याच शाळेत अध्यापनाचं काम करावं, वाटल्यास दक्षिण प्रांतांत नेमणूक घ्यावी. ते दोन्ही सोडून युरानं दूर उत्तरेची निवड केली होती

"का बरं ?" युरानं आपला निर्णय सांगितल्यावर वलेन्तिनानं विचारलं होतं; आम्हीही तोच प्रश्न केला.

पहिल्यादा त्यानं हसण्यावारी नेण्याचा प्रयत्न केला, "अनेक कारणं आहेत त्याला. एरवी हिमअस्वलं, खास ध्रुवप्रदेशातली अस्वलं 'झू' मध्येच पाहून समाधान मानावं लागतं; तिथे त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग येईल. शिवाय समुद्र आहे तिथं."

पण 'खरं सांग' म्हणून आम्ही त्याच्या खनपटीलाच बसलो. शेवटी त्यानं खरं सांगून टाकलं. "मला वाटतं, आयुष्यात आपल्या व्यवसायाला सुरवात करताना माणसानं नेहमी कठीण क्षेत्राची निवड करावी त्या ठाण्यावर कोणते वैमानिक आहेत माहीत आहे ? सारेजण अव्वल दर्जाचे आहेत ! मला त्यांच्यासारखं व्हायचंय," पण हे कारण काही आम्हाला तितकंसं पटलं नाही, हे पाहिल्यावर त्यानं पुढे पुस्ती जोडली, "मी जेव्हा म्हातारा होईन, आपली जुनी हाडं उन्हात शेकत बसावं असं जेव्हा मला वाटेल, तेव्हा मी दक्षिण प्रदेशात बदली मागून घेईन."

खरं सांगतो, त्याच्या उसळत्या तारुण्याचा मला हेवा वाटला. युरा तेव्हा तेवीस वर्षाचा होता. त्याला शांत बसवत नव्हतं. जिथं संकट होतं, धोका होता तिथं उडी घ्यायला तो आसुसला होता. मी माझ्या चाकोरीतल्या आयुष्यावर काहीसा नाराजही झालो. माझं आयुष्य ज्ञातस्कमध्ये पक्क रोवलं गेलं होतं.

'जिथं संकटं चारी बाजूनी आव्हान देत आहेत' तिथं काम करण्याची युराची इच्छा पूर्ण झाली. आर्क्टिक वृत्ताच्याही पलिकडच्या हवाई तळावर त्याची नेमणूक झाली.

सुरवातीच्या त्याच्या एका पत्रात युरानं लिहिलं होतं: ताज्या दमाचे हे तरूण लेफ्टनंट–त्यांचा एक गटच होता–ठाण्यावर गेल्यानंतर त्यांचं फार छान स्वागत झालं होतं. तिथला कमांडर आणि अनुभवी, मुरलेले पायलट यानी त्याना फार प्रेमानं आपल्या पथकात सामावून घेतलं.

नव्या जागी रुळायला नेहेमीच त्रास होतो. परंतु युराबरोबर त्याच्या ओरेनबर्गच्या एअर फोर्स स्कूलमधले दुसरेही विद्यार्थी होते त्यामुळे युरा नव्या ठिकाणी चटकन सरावला. आपल्या एका पत्रात त्यानं त्याबद्दल लिहिलं होतं. लढाईच्या काळात अनेक प्रख्यात वैमानिकानी त्या ठाण्यावर काम केलं होतं. ''सोविएत संघराज्याचा वीर' हा बहुमान दोनदा मिळवणारा बरीस सफोनोव याचाही त्यांच्यात समावेश होता.

''तो फार देखणा अन अतिशय प्रेमळ होता,'' युरानं लिहिलं होतं, त्याच्या उडण्यात आणि लढण्यात सफाईदार डौल होता उत्तर प्रदेशात त्याच्या नावाभोवती एक अद्भुत वलय निर्माण झालंय. त्या नावाभोवती अनेक साहसकथा गुंफल्या गेल्या आहेत. सफोनोवबद्दल बोलताना कोणीही त्याचा भूतकाळात उल्लेख करीत नाही.''

युराचं एक पत्र अत्यंत दु:खित अंत:करणानं लिहिलेलं होतं. मोटर-सायकलच्या अपघातात त्याचा मित्र युरा देर्गुनोव मरण पावला होता. ऑरेनबर्गच्या शाळेत एकत्र शिकत असताना त्यांची मैत्री जुळली होती. देर्गुनोव उत्कृष्ट वैमानिक होता. युराप्रमाणेच त्यालाही, इच्छा असल्यास त्याच शाळेत शिक्षकाचे काम करण्याची संधी देण्यात आली होती. तो तिथंच ओरेनबर्गला राहू शकला असता. परन्तु दोन्ही युरानी दूर उत्तरेत नेमणूक मिळावी म्हणून–कमिशन मिळाल्याच्या पहिल्याच दिवशी अर्ज केले.

देर्गुनोवच्या उत्कृष्ट उड्डाणाबद्दल ठाण्यावरचे कमांडर गौरवानं बोलत. आनंदी वृत्ती, सच्चेपणा आणि मदतीसाठी हात देण्याची सदैव सिद्धता यामुळे तो आपल्या मित्राना प्रिय होता. आणि आता एका अचानक अपघातानं वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी त्याला जगातून ओढून नेलं होतं.

युरा किती हादरला होता ते पत्रातूनही जाणवत होतं.

कित्येक महिन्यानंतर तो सुटीवर घरी परत आला. साऱ्यानी त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार केला. दूरच्या उत्तर प्रदेशासंबंधी अधिक जाणून घ्यायची



सर्वांना इच्छा होती. १९३० नंतर 'चेल्युस्किन'नं त्या प्रदेशात केलेल्या प्रवासाची अद्भुत हकिकत, अकादमीशियन श्मिद्त्, कॅप्टन वरोनिन आणि पपानिनची धाडसी चौकडी, बस् आमचं उत्तर प्रदेशाचं ज्ञान इथंच संपत होतं. लढाईच्या काळात त्यात थोडी भर पडली. मुर्मान्स्कच्या परिसरात नाझींबरोबर झालेल्या रक्तरंजित लढायांच्या बातम्यांची !

''दूरचा उत्तर प्रदेश म्हणजे काय ते समजावून घ्यायचं तर तो प्रदेश स्वत: डोळ्यानी पहायलाच हवा,'' युरा म्हणाला, ''मोठा नवलाईचा प्रदेश. पहावं तिथं शेवाळ आणि पहाड, पहाड आणि शेवाळ. सहा महिने रात्र, सहा महिने दिवस. सुरुवातीला फार जड जातं; तिथं रूळायलाही फार त्रास होतो.''

बर्फ पडायला लागलं की उड्डाणात अडथळा यायचा; युरानं आम्हाला सांगितलं. समुद्रावर थैमान घालणारे झंझावात मोठमोठ्या खडकाना घट्ट वेढून टाकणाऱ्या वर्चच्या मुळ्या यांचंही त्यानं वर्णन केलं. ''मला जेव्हा कमिशन मिळालं तेव्हा आमच्या लोकानी मला सांगितलं होतं : बघ काळजी घे नीट, नाही तर हिमअस्वल तुला खाऊन टाकील. पण मी तर अजून एकही अस्वल पाहिलं नाही. इतरानी मात्र पाहिलीत. नशीब माझं ! दुसरं काय ? मी जर 'झू' मध्ये हिमअस्वल पाहिलं नसतं तर ते कसं असतं तेही मला कळलं नसतं,'' सांगता सांगता युराला स्वत:लाच हसू आलं.

त्याच्या आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या जीवनक्रमातील गोष्टी त्याने सांगितल्या. नेहमीप्रमाणे त्या मन ओढून घेणाऱ्या होत्या.

''ते सारेजण पोलादाचे घडविले आहेत आणि तेच योग्य आहे. उत्तर प्रदेशात लेच्यापेच्या, कच्च्या दिलाच्या माणसाना स्थान नाही.''

१९५९ च्या सुरवातीला त्याची दोन पत्रं आली. दोन्हीत चांगल्या बातम्या होत्या. पहिल्या पत्रात लिहिलं होतं, तो पक्षाचा कॅंडिडेट सदस्य झाला होता. दुसऱ्या पत्रात 'उत्तर ध्रुव' जोडप्याला मुलगी झाल्याची बातमी होती. तिचं नाव ठेवलं होतं येलेना.

आम्ही साऱ्यानी एकत्र बसून अभिनंदनाच्या तारेचा मजकूर व्यवस्थित जुळवला अन् मग तार पाठवून दिली. आईनं ती दुसऱ्या कोणाच्या हातात न देता स्वत:च जाऊन पोस्टात दिली. वाटेत भेटणाऱ्या प्रत्येक ओळखीच्या माणसाला तिनं ती आनंदाची बातमी दिली. आई साऱ्या गावाला ओळखत होती.

बाबांचं भाष्य, ''पुन्हा मुलगीच !''

तो पावेतो मला तीन मुली झाल्या होत्या. झोयालाही पहिली मुलगीच होती. पण आम्हाला माहीत होतं, बाबाना मनातून आनंद झाला होता. लग्न

करून घरदार थाटलेल्या संसारी माणसांबद्दल त्याना नेहमीच आदर वाटायचा. पण घरात जर मुलंबाळं नसली तर त्यांचं मन उतरून जायचं.

'हिमप्रदेशात'तल्या आपल्या नातीला खेळवायला आई अधीर झाली.

अनेक वडीलधाऱ्या माणसाना सवय असते, पावत्या, नोटिसा, बिलं सारं नीट जपून ठेवायची. बाबानाही तीच सवय होती. युरानं पाठवलेल्या मनीऑर्डरच्या पावत्याही अशाच जपून ठेवलेल्या होत्या. दोनशे, अडीचशे, कधीकधी पाचशे रूबल पाठवल्याच्याही पावत्या त्यात आहेत. कागद अडकवण्याच्या एका चिमटयात पिवळसर रंगाच्या त्या साऱ्या पावत्या एकत्र अडकवून ठेवल्या होत्या. त्यांच्यावर युराच्याच अक्षरात दोन पत्ते लिहिलेले आहेत, एक झात्स्कचा आणि दुसरा पाठविणाऱ्याचा.

या पावत्यांकडे पाहिलं तेव्हा मला जाणवलं: इतकी वर्षं उलटली पण युराच्या अक्षरात काहीही फरक झाला नव्हता. पाचवीच्या वर्गात निबंध लिहिताना त्याचं जे हस्ताक्षर होतं तेच अजूनही कायम होतं ; त्यात अधिक खंबीरपणा, आत्मविश्वास उतरला होता इतकंच. त्याची प्रगल्भताही त्यातून जाणवत होती. त्याचं हस्ताक्षर फारसं बदललं नाही पण त्याचं मन कधीच बदललं नाही हे अगदी निश्चित. त्याच्या स्वभावाला कठोरपणा, कडवटपणा यांचा कधीही स्पर्श झालां नाही. आपल्या आईवडिलाना मदत करायला युरा कधीही विसरला नसता; ते त्याच्या स्वभावात बसणारं नव्हतं !

मी ओळीनं काही पावत्या उलटल्या: जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल ... त्यानं एकही महिना चुकवला नव्हता.

□ □



## २ : प्रवासाचं गूढ

१९६० च्या वसंतऋतूत युरानं लिहिलं होतं.—रशियाच्या मध्यभागात त्याची बदली होणार होती. बदलीचं ठिकाण आमच्या घरापासून काही तासांच्या अंतरावर होतं. तो 'टेस्ट पायलट' म्हणून येणार होता.

या बातमीनं सर्वानाच आनंद झाला. हजारो मैल दूर अंतरावर रहाणारा युरा आणि त्याचं कुटुंब आता घराजवळ राहायला येणार या विचारानं सारेच सुखावले. युराला जबाबदारीचं काम मिळालं म्हणून अभिमानही वाटला. दूरवरच्या उत्तरेत घालवलेले दिवस वाया गेले नव्हते तर चांगले कारणी लागले होते. पण टेस्ट पायलटचं काम जोखमीचं असतं, त्यात धोका असतो या विचारानं काळजीही वाटायला लागली. पण अंतराळ वैमानिकांच्या गटात प्रवेश मिळावा म्हणून त्यानं अर्ज केला होता, साऱ्या चाचणी-परीक्षात तो उत्तीर्ण झाला होता, कठीण वैद्यकीय परीक्षेत त्याला उत्कृष्ट मार्क मिळाले होते हे सारं आम्हाला कळायला काहीच मार्ग नव्हता.

ते दिवस मला चांगले आठवतात. वृत्तपत्रातून. आकाशवाणीवरून साऱ्या बातम्या येत होत्या; अहवाल, निवेदने, शोध प्रसृत करण्यात येत होते.

अनेक टप्प्यांचे दोन अग्निबाण प्रक्षेपित करण्यात आले होते. ते चंद्राच्या रोखाने निघाले होते. त्यांच्या बाजूंवर आमच्या देशाची निशाणी, मानचिन्ह होते. तिसऱ्या अग्निबाणाने चंद्राभोवती प्रदक्षिणा घालून त्याच्या आजपर्यंत न पाहिलेल्या भागाची छायाचित्रे घेतली होती.

प्रत्येकाच्या ओठावर त्सिओल्कोव्स्कीचे नाव खेळत होते. दुर्दैवानं त्याच्या नावाला लाभलेली दिगंत कीर्ती पहायला तो हयात नव्हता.

अंतराळयानांची उभारणी, बांधणी व प्रक्षेपण या क्षेत्रात सोविएत वैज्ञानिक करीत असलेल्या प्रगतीकडे सारे जग श्वास रोखून पहात होते.

सोबिएत संघराज्यावर मात करण्यासाठी अमेरिकन वैज्ञानिक व अभियंते बद्धपरिकर झाले होते. अमेरिका अंतराळात मानवाला पाठविणार असल्याचे वृत्तही वृत्तपत्रानी प्रसिद्ध केले होते.

मला वाटतं, त्या काळात प्रत्येक सोविएत नागरिकाच्या मनात एक तीव्र इच्छा होती, अंतराळात पदार्पण करणारा पहिला मानव सोविएत नागरिक असावा. तो मान कोण पटकवणार? वैज्ञानिक, वैमानिक, अभियंता की डॉक्टर? या प्रश्नावर प्रत्येकजण आपापला तर्क लढवीत होता

आमच्यापैकी कोणालाही, युराचे नातलग किंवा त्याला ओळखणारे लोक यापैकी कोणालाही कधी स्वप्नात सुद्धा वाटलं नव्हतं: अनंत, गूढ विश्वाच्या रहस्यसृष्टीत पदार्पण करण्याचे धारिष्टच करणारा पहिला मानव म्हणजे आमचा युरा, युरी अलेक्सेयेविच गागारिन असेल!

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच उठून मी बाहेरच्या पडवीत आलो. आपल्या रात्री अगदी झोप लागली नव्हती. 'विजेचे वादळ' झाले होते, पाऊस नव्हता. मला अगदी गळून गेल्यासारखं झालं होतं. डोकं ठणकत होतं. एकंदरीत साऱ्या जगावर मी रागावलो होतो.

माझ्या आणि बाबांच्या घरामध्ये कुंपण होते; फारसे उंच नव्हते. पलिकडे, सफरचंदाच्या झाडांमध्ये कोणीतरी उघडचा अंगाचा माणूस मला दिसला.

"इतक्या भल्या पहाटे ते ४० पौंडाचे डंबेल्स घेऊन दिमित्री काय करतो आहे?" म्हणून मी आश्चर्य करू लागलो. जवळ जाऊन पाहिलं तर साक्षात युरा! अगदी अनपेक्षित भेट होती.

त्यानं मला पाहिलं नाही. हाताच्या अंतरावर डंबेल्स धरून, हलके हलके गुडघे वाकवून खाली बसण्याचा व उठण्याचा व्यायाम अगदी स्थिर चित्तानं चालला होता. रात्रीच्या भयानक वादळाचा अन् जागरणाचा त्याच्यावर काहीही परिणाम झालेला दिसत नव्हता. शिवाय तो मध्यरात्र उलटल्यावरच घरी आला असला पाहिजे. म्हणजे त्याला अगदीच कमी विश्रांती मिळाली असणार.

"एक दो! एक दो!" मी मोजायला सुरवात केली, "काय सर्कशीत जायची तयारी करतोस काय? हे असे नसते उपद्व्याप करण्यापेक्षा काहो काम केलेलं काय वाईट? मी म्हणतो, लाकडं फोडलेली काय वाईट?"

"ओऽऽहो, वाल्या," युरा उत्तरला. त्यानं मान वळवली नाही की व्यायामाची लय तोडली नाही. आणखी थोडावेळ व्यायाम करून त्यानं डंबेल्स खाली ठेवल्या अन् माझ्याजवळ येऊन हस्तांदोलन केले. त्याच्या हाताची पकड खंबीर



होती, फारच खंबीर होती. इतका व्यायाम केल्यानतरही त्याच्या श्वासोच्छासाची गती अगदी किंचितच वाढली होती.

"थोडी लाकडं फोडायला काही हरकत नाही. जरा तोंडबिड धुवून न्याहरीला इकडेच ये. जरा ठाकठीक दिसत नाहीस, चुरमडल्यासारखा वाटतोस काय भानगड आहे? हँग ओव्हर?"

मी खांदे उडवले. रात्रीच्या वादळाबद्दल कुरकूर करायची माझी मलाच लाज वाटली.

न्याहारीच्या वेळी बाबानी पुढे केलेला व्होडकाचा ग्लास युरानं बाजूला केला. "एक काळ होता की मी व्होडका घेऊ शकलो असतो. पण यापुढे नाही, मला खास परवानगी मिळेपर्यंत मी तिच्या थेंबालाही स्पर्श करू शकत नाही."

"कसलं अळणी आयुष्य असतं तुमचं टेस्ट-पायलटचं" मी म्हणालो.

बोलता बोलता संभाषणाचा ओघ स्वाभाविकच त्याच्या नव्या कामाकडे वळला. "तुला फार उड्डाण करावं लागतं का? उड्डाणं फार लांबची असतात का? फार दमणूक तर होत नाही? आता कोणत्या नव्या विमानांची चाचणी घेत आहात?" आम्ही त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार केला.

त्या सर्वांची उत्तरं देण्याचा त्यानं प्रयत्न केला. मधून मधून त्याच्या ओठावर एक गूढ स्मित तरळून जाई. मधूनच आम्हाला वाटे, बोलताना हा काही तरी राखून बोलतोय; त्याला त्याची जाणीव आहे त्यामुळे तो मधूनच अवघडल्यासारखा होतोय. "होय, मला उड्डाण करावं लागतं सारी साधनसामुग्री अगदी नवी आहे. मला तिचा सराव करून घ्यायचा आहे. खरं तर प्रत्यक्ष उड्डाणांपेक्षा त्यातच माझा वेळ जास्त जातो. मला उड्याही माराव्या लागतात. अभ्यास करावा लागतो, व्यायामही घ्यावा लागतो. मला हे नवं काम खूप आवडतं. इतक्या गोष्टी करायच्या असतात की वाटतं दिवस ४८ तासांचा असता तर बरं झालं असतं."

हा आईचा लाडका शब्दप्रयोग होता. ती नेहेमी म्हणायची माझी सारी कामं आवरायला दिवस ४८ तासांचा असायला हवा होता.

"युरी अलेक्सेयेविच, तू काहीतरी लपवून ठेवतो आहेस," बाबांच्या स्वरात अविश्वास जाणवत होता, "ठीक आहे, तू शिपाईगडी आहेस आणि आम्ही समजू शकतो, पण तू एक मेहेरबानी कर. झातस्कवर तुझं नवं विमान जर उडत उडत येणार असलं तर आम्हाला कळव मग आमचा तुझ्यावर विश्वास बसेल."

युरा खळाळून हसला; काहीतरी दडपण दूर होऊन मोकळा झाल्यासारखा वाटला. "ठीक आहे बाबा; मी उड्डाणावर निघालो की ती बातमी निश्चित नम्हाला मिळेल. त्याबद्दल तुम्ही निःशंक असा."

न्याहारीनंतर आम्ही बाहेर आलो. युरानं दुहेरी मुठीची करवत उचलली आणि मला दरडावलं, "थोडक्यात सारं आवरून टाकतो आणि मग तू तुझ्या शवपेटिकेत जाऊन पडशील; इतका तरूण... इतका देखणा..."

"त्यासाठी आज फार प्रयत्न करावा लागायचा नाही," एक निश्वास टाकीत मी उत्तरलो.

त्यावेळी युरा दोन-तीन दिवस घरी राहिला. त्यानं आणि मी मिळून साऱ्या कुटुंबाला हिवाळाभर पुरेल इतकं लाकूड फोडून ठेवलं. एके दिवशी पहाटेच आम्ही मासे पकडायला गेलो. एकदा आमच्या घराजवळ काही मुलं अगदी रस्त्यातच गोफणगुडा खेळत होती. युरा त्यांच्यात मिसळला. थोड्याच वेळात सारी मुलं त्याच्याकडे, आश्चर्यचकित होऊन आदरानं पाहू लागली. युराची नजर तीक्ष्ण होती, नेम अचूक होता.

त्यानंतर युरा वारंवार घरी येऊन जायचा. त्याचं येणं अगदी अनपेक्षित असायचं. मात्र एकाच वेळी तो जास्त दिवस राहात नसे.

आज इतक्या वर्षानंतर, त्या दिवशी त्याच्या नव्या कामाबद्दल प्रश्न विचारून विचारून त्याला हैराण करून सोडलं तेव्हा युरा कसा गोंधळला होता हे मला आठवतंय्.

तो खरोखरच पेचात पडला होता. खरेपणा हे तर त्याच्या स्वभावाचं सार होतं. त्याला खोटं बोलता येत नसे. पण कर्तव्याच्या जाणीवबुद्धीनं त्याला मोकळेपणानं बोलण्यास प्रतिबंध केला. सरकारी रहस्य त्याला फोडता आलं नसतं. खोटं तर बोलायचं नाही अन् खरं तर सांगायचं नाही अशी दुधारी कसरत करून सांगता येईल तेवढं अर्धसत्य त्यानं सांगितलं होतं. "होय, मला उड्डाण करां लागतं."... "मला उड्याही माराव्या लागतात." "व्यायामही घ्यावा लागतो." "टेस्ट पायलटला हे सारं करावं लागतं;" अशी 'नरो वा कुंजरो वा' थाटाची उत्तरं देऊन त्यानं आपली सुटका करून घेतली होती.

आता आम्हाला कळतंय् १९६० च्या वसंतऋतूत, उन्हाळ्यात आणि शरदऋतूत भावी अंतराळवीराना सर्वंकष, सक्त प्रशिक्षण देण्यात येत होतं. नव्या साधन-साहित्याचा त्याना सराव करून देण्यात येत होता. त्यावेळी शिक्षण घेणाऱ्या अंतराळवीरांचे वैद्यकीय अहवाल ठेवण्यात येत असत. त्या अहवालात युरासंबंधी पुढील नोंद आहे: "त्याच्या ठिकाणी विजिगीषु वृत्ती, सहनशक्ती, चिकाटी व सहकाऱ्यांबद्दल तीव्र आत्मीयता हे गुण दिसून येतात. शिवाय त्याचे स्वतःवर सदैव नियंत्रण असते, त्याला पूर्ण आत्मविश्वास आहे; कुशाग्र बुद्धी आहे; त्याचं शरीर आणि मन निर्मळ आहे."



युरा घरी भेटून गेला आणि लवकरच कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झाला.

ऑक्टोबर क्रान्तीच्या वर्धापन दिनाशी आमच्या कुटुंबाच्या सुखद आठवणी कायमच्या गुंफल्या गेल्या आहेत. त्या वर्षीच्या सात नोव्हेंबरला बरीसचं लग्न झालं. युरा आणि वाल्या आली. येताना भेटीचं गाठोडंच घेऊन आली, शिवाय मद्याच्या बाटल्याही होत्या. मेजवानीच्या वेळी साऱ्यांचं लक्ष युरावर खिळलं होतं. तो म्हणाला, "लोकांच्या नजरेला नजर द्यायला भिऊ नका." हे नव्या जोडप्याला उद्देशून होतं मग बरीसला म्हणाला, "आझाशी वेडावाकडा वागलास तर बघ, माझ्याशी गाठ आहे. चांगला समाचार घेईन"

"आता इतक्यात पुन्हा इथं येणं जमेलसं मला वाटत नाही," युरा आणि वाल्या जायला निघाली तेव्हा युरा म्हणाला, "तुम्हीच या आता आमच्या घरी." नाहीतरी आई-बाबांच्या मनात कितीतरी दिवस युराचं आणि वाल्याचं नवीन घर पाहून यायचा विचार चाललाच होता. आता ते जायच्या तयारीला लागले.

"नव-वर्षच सगळे मिळून साजरं करू या. जंगलात जाऊन एखाद्या फर-वृक्षांच्या राईतच पिकनिक करू. कशी काय वाटते ही योजना? नुसता विचार करा, ते जंगल, ती नीरव शांतता, सगळीकडे पसरलेलं बर्फ आणि खराखुरा जमिनीतून वर आलेला फर वृक्ष! मग काय?"

आम्ही दिवस पक्का केला. कारण आता मला आठवत नाही पण नव-वर्षाच्या दिवशी काही आम्ही त्याच्या घरी गेलो नाही.

१९६१ च्या फेब्रुवारीच्या अखेरीस, कदाचित मार्चच्या सुरवातीला असेल, युराचं आम्हाला पत्र आलं: ठरल्याप्रमाणे आम्ही गेलो नाही म्हणून त्यानं आम्हाला फैलावर घेतलं होतं, माझ्या वाढदिवसाला तरी तुम्ही इथं यायलाच हवं म्हणून आग्रहानं लिहिलं होतं. वाल्याला इस्पितळात जावं लागणार होतं. घरात आई असली तर फार बरं होईल असं सांगून 'यावेळी मी तुमची काही एक सबब ऐकणार नाही' म्हणून सुनावलं होतं.

"आता जायलाच हवं यावेळी," बाबा म्हणाले, "मातोश्री, तुम्ही भेटीची व्यवस्था करायला लागा."

आम्ही आईवडिलाना पोहोचवायला गेलो होतो. कारण पुन्हा एकदा माझ्या कामामुळे मला जाणं अशक्य झालं. वाढदिवसाला अभिनंदनाची तार पाठवायची असं ठरवून टाकलं.

एक आठवडा राहून बाबा परत आले.

"कसा काय गेला वेळ? मजेत?" आम्ही त्याना विचारलं.

"मोठा गमतीदार प्रश्न आहे. युरा मुळी घरात नसतोच. लवकर उठून जातो. अन् खूप उशीरा येतो. वाल्या कशी काय निभावून नेते कोणास ठाऊक."

बाबा अस्वस्थ झाले होते, "कोणत्या प्रकारचं काम आहे त्याचं काही कळत नाही. त्याला काही घरदार आहे असं वाटतच नाही. दोन आनंदाचे दिवस येऊन गेले. ७ तारखेला गाल्याचा जन्म झाला, ९ तारखेला त्याचा वाढदिवस झाला. पण टेबलाभोवती बसून पाच मिनिटं शांतपणे गप्पा करायला सुद्धा त्याला वेळ झाला नाही. इतर अधिकारी त्याचे मित्र आहेत तेही २४ तास कामात गुंतलेले. मग मी काय करू ? अगदी वेळ जाईना म्हणून आलो परत."

नवं बाळ घरात आलं, म्हणून आई वाल्याच्या मदतीला दोन आठवडे थांबली. २७ तारखेला ती परत आली; शाल आणि कोट काढून ठेवीत म्हणाली, "युरा लवकरच कोणत्या तरी दूरच्या सफरीवर जाणार आहे."

"कुठे ?" बाबांनी विचारलं.

"मला खरंच माहीत नाही. त्यानं सांगितलं नाही. मी त्याला विचारलं तर गुळमुळीत उत्तर दिलं. आजवर कोणी गेलं नाही इतका दूर जाणार आहे असं मोघम म्हणाला."

"कुठं जाणार आहे तो ? तू का नाही त्याच्याकडून काढून घेतलंस ?" बाबा संत्रस्त झाले होते. "मी नक्की विचारून घेतलं असतं."

आईला आम्ही पुष्कळ छेडलं पण तिला आणखी नवं काही सांगता आलं नाही.

सारंच काही मोठं गूढ वाटत होतं.

आईनं आम्हाला तिची युराशी झालेली अनेक बोलणी सांगितली, पण त्या बोलण्यांचा त्याच्या 'प्रवासा'शी काही संबंध असेल असा आम्हाला कोणाला चुकूनही अंदाज आला नाही. गाल्याच्या जन्माचा काही दिवस अगोदर त्यांचं असंच बोलणं झालं होतं-

त्या दिवशी आई घरात एकटीच होती. जेवण तयार करून ती वर्तमानपत्रं वाचीत बसली. युरा उशीराच घरी आला. आल्याबरोबर 'शॉवर' घेऊन त्यानं कपडे बदलले; त्याची ती नेहमीची सवय होती. मग जेवायला म्हणून स्वैपाकघरात गेला.

"काय नवीजुनी बातमी ?" आई वाचत होती तिकडे बोट करून त्यानं विचारलं.

"त्यानी लिहिलंय, एका नव्या 'कॉकपिट'ची चाचणी चालली आहे. उद्या मानव त्यामध्ये बसून अंतराळाचा प्रवास करणार आहे."

"अं ? अं ऽ ऽ ऽ ?..." युरा काहीतरी म्हणाला.

"मी विचार करतेय् इतक्या दूरच्या प्रवासाला जाणारा माणूस कसा असेल ? असा कोणी वेडापीर त्याना मिळेल की नाही याची मला शंकाच वाटते.



अन् जर कोणी मिळालाच तर नक्की त्याचं डोकं फिरलंय् असंच म्हणावं लागेल..."

आईचं वाक्य अर्धवट तुटलं. युरानं काटा खाली टाकला, खुर्ची मागे वाकवली आणि तो खो खो हसत सुटला.

"त्याचं डोकं फिरलं असणार असं तुला का वाटतं ?" हसू आवरत त्यानं विचारलं, "एखाद्या मूर्ख, माथेफिरू माणसाला अंतराळात काही करता येईल असं मला वाटत नाही."

"ते तुझं म्हणणंही खरं आहे. पण शांतपणे विचार करणारा कोणताही माणूस अशा वेडयासारख्या विचाराला मुळीच थारा देणार नाही, सरळ धुडकावून लावील. तो जिवंत परत येईलच अशी तरी कोणी खात्री दिली आहे ? त्यानी अंतराळात दोन कुत्री पाठवली अन् ती जळून गेली."

युरानं काटाचमचा नीट लावून ठेवला अन् तो गंभीरपणानं बोलू लागला. "हे बघ आई, कोणत्याही नव्या धाडसात धोका हा असतोच. अनेक वैमानिकांनी प्राणांची आहुती दिली तेव्हा विमानं आभाळात व्यवस्थित उडायला लागली. आपल्याला विमानांची जरुरी आहे हे तर तुला कबूल आहे ? तसंच आपल्याला अंतराळाचंही संशोधन करायला हवं, विज्ञान आणि अर्थशास्त्र दोन्हीसाठी. माझी खात्री आहे, आपली अंतराळयानं विश्वासार्ह आहेत म्हणून. अंतराळ संशोधनावर आपला देश प्रचंड खर्च करीत आहे. तेव्हा तू म्हणतेस तसं एखाद्या मूर्खाच्या हाती अंतराळयान सोपवणं शक्य होणार नाही. तसं करणं म्हणजे पैशाची माती करणं होईल."

"मुला, ते मला कळतंय्. पण तरीही तो नुसता विचार केला तरी भीतीनं थरकाप होतो."

योगायोगानं झालेल्या या संभाषणातही युरानं ताकास तूर लागू दिला नाही. शिवाय प्रथम जाण्यासाठी आपली निवड होते आहे की नाही हेही त्याला तेव्हा माहीत नव्हतं. आईला पोहोचवायला तो स्टेशनवर गेला होता तेव्हा त्यानं हसत हसत किंचितशी सूचना दिली होती, त्याच्या पुढच्या प्रवासात तो खूप दूर- आजपर्यंत कोणीही गेलं नाही इतका दूर– जाणार होता.

जगाच्या इतिहासात मानवाने प्रथमच अंतराळात उड्डाण करायला काही थोड्या आठवड्यांचाच अवधी होता.

□ □

# ४ : अविस्मरणीय दिवस

१२ एप्रिल १९६१, बुधवार होता तो. कामाच्या इतर दिवसांसारखीच त्याचीही सुरूवात झाली. झात्स्कमधली युराची कुटुंबीय मडळी नित्याच्या सरावानुसार कामाला लागली. जर त्यादिवशी आमच्या युरान 'वस्तोक' अतराळयानात बसून पृथ्वीप्रदक्षिणा घातल्या नसत्या तर तो दिवस आम्ही केव्हाच विसरून गेलो असतो. आता बारा वर्षं, पुरं एक तप उलटल्यावरही एप्रिलमधल्या त्या दिवसाच्या घटनांची आठवण अगदी ताजी, टवटवीत आहे.

त्या दिवशी सकाळी मी पाचला उठलो असेन, कारण मला कामावर लवकर जायचं होतं. आजवर पडीक असलेल्या नापेर जमिनीत पेरणी करायची होती; त्यासाठी आमच्या गॅरेजमध्ये अनेक ट्रक सुसज्ज करण्यात येत होत्या. त्यातली एक ट्रक चालवण्याचं काम माझ्याकडे आलं होतं. तेवढ्यात माशा अचानक आजारी पडली.

मी चांगला कडक चहा तयार केला; आंघोळ करून कपडे चढवले आणि न्याहारी केली. साऱ्याच गोष्टी बिघडत चालल्या आहेत म्हणून मी व्यग्र होतो.

नापेर जमिनींची पेरणी करण्यासाठी खूप लांबचा प्रवास करावा लागणार होता. कित्येक दिवस मी त्या प्रवासाची स्वप्नं पहात होतो. पण आता माशा आजारी पडली, तिला एकटीला सोडून मला कसं जाता येणार होतं ? एकदा चाक धरून ड्रायव्हर रस्त्याला लागला की त्याचं मन शान्त हवं, प्रसन्न हवं. जर तो काळजीत गुरफटला असला, उदास असला तर ते अपघाताला निमंत्रणच ठरतं.



न्याहारी घेऊन मी बाहेर पडलो आणि सरळ बाबांच्या अगावर धडकलो. नेहमीप्रमाणेच बाबानी रजईचं जाकोट चढवलं होतं, वरून लष्करी पट्टा बांधला होता, त्यांची कुऱ्हाड आणि कामावेळचे कातडी हातमोजे त्यांच्या पट्ट्यात खोचलेले होते. फरची टोपी कपाळावर बरीच खाली ओढून घेतलेली होती.

"इतक्या लवकर उठलास ?"

"बरीच कामं आहेत. आणि तुम्ही ?"

"मी क्लुशिनोला चाललोय."

झात्स्कमधल्या सुतारांचं एक पथक क्लुशिनोला नवं सामुदायिक केंद्र बांधत होतं. बाबा त्या पथकाचे प्रमुख होते.

"रस्ता फार खराब झालाय. फार वेळ लागेल तुम्हाला."

"मी जाईन, तू काळजी करू नकोस."

आम्ही सिगरेट ओढली आणि एकमेकाना सदिच्छा व्यक्त करून आपापल्या मार्गाला लागलो. अगदी सकाळपासून घेरून राहिलेलं औदासिन्य कमी झालं नव्हतं, साचलेली मरगळ दूर होत नव्हती. मी चालत होतो, वाऱ्यात बर्फाचे कण होते ते गालाना चावत होते. रस्त्यावर बर्फाचा काचेसारखा पातळ पापुद्रा होता. पायाखाली आला की तडकून फुटल्याचा आवाज येई. धुकं नाही, वाऱ्याला जोर नाही म्हणजे चांगला सूर्यप्रकाश येणार असा माझ्या मनात विचार चालला होता.

गरम चहामुळे म्हणा की जलद चालल्यामुळे म्हणा, माझ्या अंगात उष्णता खेळू लागली. जरा तरतरी आणि उत्साह वाटू लागला. तीनचार दिवसानी मला जावं लागणार होतं, कदाचित तोपर्यन्त माशाची प्रकृती ठीकही होऊन जाईल. अजून तीनचार दिवसानी ती आजारीच असेल हा विचार मला पटला नाही. शिवाय आईबाबा शेजारीच होते; कमीजास्त लागलं की मदतीला नेहमीच येत होते.

त्या दिवशी कामाच्या जागेवर सर्वात प्रथम मीच हजर झालो. मी माझ्या ट्रकजवळ गेलो. पहाटेच्या धूसर प्रकाशात तो अधिकच मोठा अवाढव्य वाटत होता. मी त्याच्या हुडवर ठोकल्यासारखे केले अन् म्हणालो, "जरा थांब, थोड्याच दिवसात तुला ठाकठीक करून टाकतो." मी मोटरची तपासणी करीत होतो. वेळ कसा गेला ते कळलंही नाही. शेवटी चांगला तापलो तेव्हा मान वर करून पाहिलं. निळ्या निरभ्र आकाशात सूर्य चांगलाच वर चढला होता.

घरी जाउन माशाला पाहून येण्याचा मी विचार केला. थोडसं खाऊनही यावं अशा विचारात निघालो, तो यार्डच्या दाराशीच कचानोव भेटला. कचानोव हा आमचा प्रमुख, आम्ही एकमेकाना अभिवादन केलं.

"वलेन्तिन, तुझ्या बायकोला बरं नाही म्हणून ऐकलं." तो म्हणाला "तू

काही काळजी करू नकोस. बघतो, जमलं तर तुझ्या जागी दुसऱ्या कोणाला पाठवतो.

"आता असं इतक्या आयत्या वेळी कोण मिळणार ? हरकत नाही, मी जाईन." आम्ही सिगरेट ओढली आणि पुन्हा एकदा हस्तांदोलन केले.

मी माशाला सांगितलं, तिला आणि मुलाना एकटं सोडून जायची मला काळजी वाटत होती.

"पण मला वाटतं तू जावंस आज तापही कमी आहे, जरा बरं वाटतंय." ती म्हणाली.

मी हलके हलके गॅरेजकडे परत गेलो. ट्रकचं सारं काम झालं. मग मी माझ्या सहकाऱ्यांना मदत केली; दुसरं कामच नव्हतं.

मंद वारा सुटला होता. अगोदर झाडाचं पानदेखील हलत नव्हतं. जाणाऱ्या येणाऱ्याच्या पायानं किंवा वाहनानं ज्या ठिकाणी बर्फ फुटून खळगे झाले होते तिथला तेलाचा अन वंगणाचा अंश सूर्यप्रकाशात इंद्रधनुष्याचे रंग लेवून चमकत होता. अशा या क्षणी शेतात केवढी मजा आली असती. स्वच्छ निळं आभाळ, ताजी हवा, बर्फ वितळून जमीन उघडी होताना पसरणार गंध !

"बाबाऽऽ!" कुठूनतरी लहान मुलाची आरोळी ऐकू आली. मी वळून पाहिलं माझीच सर्वांत धाकटी मुलगी, आठ वर्षांची वाल्या माझ्याकडे धावत येत होती; धावता धावता ओरडत होती, हात हलवत होती मी थांबलो.

"काय झालं ?"

"लवकर चला बाबा ! आई रडतेय् !"

"काय ?" आताच तर तिनं मला सांगितलं होतं, आता आपल्याला बरं वाटतंय् म्हणून मी जाणार म्हणून ती इतकी अस्वस्थ झाली ?

"ती रेडिओ ऐकतेय् आणि रडतेय्."

थेट घरापर्यंत मी धावतच गेलो. आत गेलो तर माशा रेडिओला कान लावून बसलेली. तिच्या गालावरून अश्रू ओघळत होते.

"काय झालं ?" माझी खात्री आहे, मी जोरात ओरडलोच असणार.

"युरा..." ती बोलायला लागली अन् पुन्हा तिला हुंदका फुटला; "ऐका...आपला युरा.. युरा उंतराळात गेलाय्."

"काय बोलते आहेस तू ?" मी रेडिओचा आवाज वाढवला. निवेदकाचा आवाज आम्ही ताबडतोब ओळखला. लेवितानच होता. त्याच्या आवाजातला प्रत्येक चढउतार आमच्या ओळखीचा होता. त्याच्या आवाजात अभिमान आणि अत्यानंद झंकारत होता. तो जे काय सांगत होता त्यापैकी चारपाच शब्दच माझ्या जाणीवेला भिडत होते. "पायलट...युरी अलेक्सेयेविच गागारिन."



माझे पाय लटलटायला लागले. जवळच्या खुर्चीत मी साफ कोसळलो. "आपलाच युरा दिसतोय खरा," मी कुजबुजलो

'तास'चं निवेदन आम्ही काळजीपूर्वक ऐकलं.

"मला वाटतं आपला युराच आहे तो. आईला अन् झोयाला कळलंय का ?"

"हो मी इथूनच ओरडून आईला रेडिओ लावायला सांगितलं. तिनं बातमी ऐकली अन् ताबडतोब बेशुद्ध पडली. झोयाने अन मी तिला शुद्धीवर आणलं. बरं झालं झोया अगदी ऐन वेळी हॉस्पिटलमधून परत आली म्हणून."

"चल, जाऊ या तिकडे"

त्यानी रेडियो खूपच चढवला होता. जवळच आई आणि झोया एकमेकीना अगदी खेटून बसल्या होत्या. दोघीही रडत होत्या. त्याना पाहून माशाही रडायला लागली. माझ्या घशात दाटून येऊ लागलं.

"वाल्या, कुठं गेला तो आणि हे काय करून बसला ?" आई सारखी केविलवाणं विचारायला लागली. एखाद्या लहान खोडकर मुलाबद्दल बोलाव तसं बोलू लागली, "काय करून बसला हे ?"

"आई, शांत हो. असं गडबडून चालायचं नाही," झोया म्हणाली ; पण ती स्वतःच इतकी गडबडली होती की आपल्या हातानं तिनं जेव्हा पाण्याचा ग्लास तोंडाला लावला तेव्हा सारं पाणी सांडून गेलं

"म्हणजे याच प्रवासाबद्दल बोलत होता तो तेव्हा. आणि मूर्खासारखी मी त्यालाच वेडपट, डोकं ठिकाणावर नसलेला म्हणून त्याची संभावना केली."

"आई, आता कृपा करून तू शांत रहा पाहू."

"अरे देवा !" आई ओरडली, "व्हेलेन्तिनाचं काय झालं असेल ! मुलं आणि ती एकटीच असतील."

"मी खात्रीनं सांगतो, कोणीतरी असेल तिच्याजवळ."

"असेल नाहीतर नसेल. मी ही निघाले तिच्याकडे."

गाडी सुटायला वीस मिनिटं होती. स्टेशन तीन मैलावर होतं. आईला थांबायला सांगून मी गॅरेजकडे धावलो.

तिथं सारी कामं जागच्या जागी थांबली होती. ड्रायव्हर, इंजिनिअर मुख्य अधिकारी सारेजण रेडियोभोवती दाटीवाटीनं बसले होते. लेवितानच्या शब्दाशिवाय दुसरं काही ऐकण्याची त्यांची तयारी नव्हती, त्याना दुसर काही ऐकू येतच नव्हतं.

"मला गाडी पाहिजे आहे तांतडीचं काम आहे," मी माझ्या प्रमुखाच्या कानात ओरडलो. त्यानं माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पाहिलं. माझी खात्री आहे, त्यानं मला ओळखलं सुद्धा नाही. तो सरळ पुन्हा रेडिओकडे वळला.

मी गॅरेजकडे धावलो, धाडकन दरवाजा उघडला. हाती आली ती ट्रक घेऊन सुसाट वेगानं बाहेर पडलो अगदी वाऱ्याच्या वेगानं घर गाठलं. तोपर्यंत आई पायीच स्टेशनच्या रस्त्याला लागली होती.

मी तिला अर्ध्या वाटेतच गाठलं. ती पळत होती. डोक्यावरची शाल घसरून खांद्यावर आली होती.

स्टेशन आलं. मी तिकीट काढायला धावलो. तिकिटाची खिडकी बंद होती. तिच्यावर ठकठक केलं मॉस्कोची गाडी सुटायच्या बेतात होती. आईनं तिकीट हिसकावून घेतलं अन् गाडीकडे धावली; गाडी हलली होती.

तिकिटं विकणारी बाई आमच्या मागोमाग धावत येत होती, "थांबा ! तुमचे हे पैसे राहिलेत !"

राहिले तर राहिले ! गाडी वेग घ्यायला लागली होती. तेवढ्यात एका बाईनं आईला ओळखलं ती त्या तिकिटं विकणाऱ्या बाईकडे धावत गेली अन् तिच्याशी काहीतरी बोलली. ती बाई मग तीरासारखी ऑफिसात घुसली.

आम्ही पहात राहिलो. गाडीचा वेग मंदावला अन् ती थांबली. कंडक्टरन आईला वर चढायला मदत केली. गाडीतही रेडिओ मोठ्यानं लागला होता. आईनं रेडिओवरचं निवेदन ऐकलं आणि पुन्हा तिला रडू कोसळलं; ती हमसा-हमशी रडायला लागली प्रवाशांमध्ये एकजण ज्ञात्स्कचाच होता. त्यानं आईला ओळखलं.

"ॲना गागारिना, अंतराळवीराची आई आहे ती," तो म्हणाला. झालं, बातमी साऱ्या गाडीत वाऱ्यासारखी पसरली. तिथं एक डॉक्टर होता, त्यानं आईला झोपेचा आराम वाटावा म्हणून गोळ्या दिल्या पण त्यांचा काही उपयोग झाला नाही. गाडी मॉझाइस्कला पोहोचली तेव्हा प्रत्येकान ऐकलं, युरा सुरक्षित परत आला होता. आई पुन्हा बेहोष होण्याच्या बेताला आली.

मॉस्कोच्या बायलोरशियन स्टेशनवर आई उतरली. आजूबाजूच्या लोकांनी तिला टॅक्सी पाहून दिली. थोड्याच वेळात ती युराच्या घरी जाऊन पोहोचली. वलेन्तिनाला वार्ताहरांनी गराडा घातला होता. अंतराळवीराची आई अशी अचानक भेटल्यानं त्याना आणखीनच आनंद झाला.

आईला गाडीत बसवून मी गॅरेजमध्ये परत गेलो. माझे मित्र आणि सहकारी अजूनही रेडिओभोवती बसलेले होते. मी माझ्या प्रमुखाकडे गेलो आणि म्हणालो, "आज माझ्याच्यानं काम होत नाही काही समजतच नाही मला."

"आज कोणालाच काम करावसं वाटत नाही," तो म्हणाला, "तू जा घरी, वलेन्तिन."



आमच्या दोन्ही घरात कोणीच नव्हतं. मी त्याना शोधायला बाहेर पडणार होतो, तेवढ्यात व्लादिमीर सिरोतिनिन आला. जिल्ह्याच्या वर्तमानपत्राचा तो वार्ताहर होता.

"हे बघ, मला तुझ्या भावाचे एकदोन फोटो हवे आहेत. देतोस काय ?" त्यानं विचारलं.

मी आमच्या घरातलं आल्बम काढलं, फोटो भरून ठेवलेली एकदोन पाकिटं काढली. ते सारं त्याच्यापुढे टेबलावर ठेवून मी म्हणालो "यातून घे तुला काय हवं ते." त्याच्याशी बोलून मी बाहेर पळालो.

एका मुलानं मला सांगितलं, मावा आणि मुली शेजारच्या घरी टी. व्ही. वरचा कार्यक्रम पहायला गेल्या म्हणून. त्या घरात लोकानी एकच दाटी केली होती. मी त्या खोलीत पाऊल ठेवलं आणि तेवढ्यात दूरचित्रवाणीच्या पडद्यावर युराचं छायाचित्र झळकलं.

आता कसलीच शंका उरली नव्हती. हा माझाच भाऊ, ज्याला मी तो आठवड्याचा असल्यापासून ओळखत होतो. आमच्या युरानं अंतराळयानात बसून पृथ्वीप्रदक्षिणा घातल्या होत्या. माझ्या मनात हजारो आठवणी उसळून आल्या. युद्धकाळात बाहेर आसरा खोदून बांधलेलं खोपटं; उकडलेल्या बटाट्याचं भांड समोर ठेवून आम्ही बटाटे खात आहोत. गिरणीला आग लागली आहे; कमांडरच्या कचेरीत बाबाना फटके बसताहेत; बाबा अपमानित झाले आहेत. जर्मनीमध्ये वेठबिगार करण्यासाठी आम्हाला न्यावं म्हणून आम्हाला एखाद्या गुराच्या कळपासारखं अंगणात कोंडून घातलं आहे. जर्मन आम्हाला हाकलून नेताहेत आणि युरा जिवाच्या आकांतानं ओरडतो आहे, "ते तुला मारून टाकतील, वाल्या ! त्यांच्यापासून पळून जा, वाल्या, त्यांच्यापासून पळून जा !" व्यावसायिक शाळेच्या व्हरांड्यात परीक्षक मला व तोन्याला सांगताहेत, "तुम्ही आमच्याकडे फार छान, अगदी बुद्धिमान मुलगा घेऊन आला आहात."

मला माझं मन आवरेना; सरळ रडू फुटलं. रडणारा मी एकटाच नव्हतो. दूरचित्रवाणीचा कार्यक्रम पहाणारी त्या खोलीतली प्रत्येक व्यक्ती रडत होती. नाही म्हटलं तरी ते सारेजण युराला चांगले ओळखत होते. प्रथम एक शाळकरी मुलगा म्हणून; मग तिमोफेई आजोबांच्या लाल शर्टाचा टाय बांधलेला यंग पायोनियर म्हणून; मग काळ्या गणवेषातला व्यावसायिक शाळेचा विद्यार्थी म्हणून, वैमानिक म्हणून तो त्यांच्या परिचयाचा होता. आणि आता तो त्यांच्या समोर अंतराळवीर म्हणून उभा होता.

जिल्हा पक्ष समितीचा एक ड्रायव्हर खोलीत आला.

"वलेन्तिन अलेक्सयेविच, कॉम्रेड फेदोरेन्को तुम्हाला भेटू इच्छितात," तो मला उद्देशून बोलू लागला, "गाडी बाहेर उभी आहे."

निकोलाय ग्रिगोर्येविच फेदोरेन्को जिल्हा पक्ष समितीचा सरचिटणीस होता मी तिथे जाऊन पोहोचलो, तेव्हा झोया आणि बरीस तिथेच बसलेले होते. बरीसनं माझ्याकडे धाव घेतली अन् मोठ्या उत्सुकतेनं विचारलं, "बाल्या ! युराबद्दल काय म्हणशील तू ?"

निकोलाय ग्रिगोर्येविचनं आमच्याबरोबर हस्तांदोलन केलं अन् मग म्हणाला, "तुमच्या प्रत्येकासाठी इथं खाजगी ऑफिसची अन् फोनची व्यवस्था केली आहे. तुम्ही तिथं बसून राहायचं आणि प्रश्नांची उत्तरं द्यायची. त्या प्रश्नांची उत्तर फक्त तुम्हीच देऊ शकाल."

आम्ही आपापल्या जागी जाऊन बसलो, फोन एक मिनिटसुद्धा रिकामा राहात नव्हता. मॉस्को, लेनिनग्राद, किन्ह व्लादिवोस्तोक आणि इतर असंख्य शहरे ज्यांची आम्ही कधी नावसुद्धा ऐकली नव्हती यातून भराभर फोनवर प्रश्न विचारले जात होते. काही फोन तर परदेशातून केले होते प्रत्येकाला युराबद्दल आणि आई-बाबांबद्दल माहिती हवी होती. कित्येकजण केवळ अभिनंदनासाठी आणि सदिच्छा व्यक्त करण्यासाठी फोन करीत होते. या साऱ्या वर्षावाला तोंड देण्यासाठी, झातस्कला फोन लावणाऱ्या व्यक्तींना टेलिफोन ऑपरेटर सूचना देत होत्या, "आपण फक्त तीन मिनिटंच बोलू शकता."

असेच काही तास उलटले आम्ही पार थकून गेलो. फेदोरेन्को आत आला आणि त्यानं आम्हाला विश्रांती घेण्याची सूचना केली. त्यानंतर आलेल्या फोनची व्यवस्था तिथल्या कर्मचाऱ्यानी पाहिली

दुपारी ४ वाजता तार ऑफिसमधून आम्हाला ८० तारांचा एक गठ्ठा पाठवण्यात आला त्या तारा सोविएत संघराज्याच्या साऱ्या भागातून आणि परदेशातूनही पाठवण्यात आल्या होत्या. बहुतेक तारात आलटून पालटून तोच तो मजकूर असायचा: "असामान्य यश... आश्चर्यकारक.. आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो.." तार ऑफिसमधल्या मुलीनं आम्हाला सांगितलं, ऑफिसचा स्टाफ लहान आहे, आमच्यासाठी येणाऱ्या तारांचा ऑफिसमध्ये नुसता पाऊस पडतो, तेव्हा दर दीड तासानं त्यांच्याकडून तारांचा गठ्ठा पाठवला जाईल.

आईबाबांच्या घरी वार्ताहरांची अखंड रीघ लागली होती. कोणी मोटारीतून तर कोणी आगगाडीनं, तर कोणी हेलिकॉप्टरमधून येत होते. जिल्ह्या पक्ष समितीच्या कचेरीला मधमाशांच्या पोळयांचं स्वरूप आलं होतं. लोक येत होते, जात होते, बोलणी संपत नव्हती.

आम्ही फोन खाली ठेवून जरा दूर होतो न होतो तोच वार्ताहरांनी आमच्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. त्यांच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरं देता देता नाकी



दम आले. फोटोवर सह्या करून बोटं दमेनाशी झाली. फ्लॅशबल्ब सारखे दिपवून जात होते.

शेवटी मी जेव्हा घरी परतलो तेव्हा खुर्चीवर मोकळा आल्बम आणि रिकामी पाकिटं दिसली. औषधाला एकसुद्धा छायाचित्र राहिलं नव्हतं. सारी छायाचित्रं ब्लादिमीर सिरोतिनिननी नेली नव्हती हे उघडच होतं.

आम्ही झातस्कमध्ये इकडेतिकडे धावपळ करीत होतो; जे काय अभूतपूर्व अद्भुत घडलं होतं ते पचनी पाडण्याचा प्रयत्न करीत होतो. तेव्हा बाबा धीमे-धीमे क्लुशिनोच्या दिशेनं पावलं टाकीत चालले होते.

क्लुशिनो चांगलं चौदा मैलावर होतं. शिवाय त्यांचा पाय अधू होता. वसंतऋतुमुळं रस्त्यावर चिखल झाला होता. वाटेत नदी आलांडावी लागत होती. पाणी अगदी थंडगार असतं या दिवसात.

बाबा सावकाश पण नेटानं चालत होते. दमणूक होऊ नये याची काळजी घेत होते. त्यानी अखोवो मागे टाकलं, फोमिश्चिनामधली शेवटची झोपडी ओलांडून जरा पुढे गेले तेवढ्यात त्यांच्या एका ओळखीच्या माणसानं त्याना हटकलं, "अलेक्सी, अशा या चिखलात कुठं निघालास ?"

"क्लुशिनोला, दुसरीकडं कुठं जाणार मी ?" बाबा उत्तरले, "सरकारी शेतासाठी आम्ही सामुदायिक केंद्र उभारतो आहोत. मे दिनाच्या आत त्याचं काम संपवायचं आहे आम्हाला."

'तुला तुझ्या जुन्या गावचा विसर पडत नाही असं दिसतंय.'

"कसा विसर पडेल ?" जुन्या ओळखीच्या माणसाबरोबर गप्पा मारायला मिळताहेत म्हणून बाबाना आनंद झाला. ते थांबले. दोघेही एकाच वयाचे होते. लहानपणापासून एकमेकाना ओळखत होते.

"काय अलेक्सी ? काही नवलविशेष ? काही खबरबात आसपासची ?"

"काही नाही. विशेष असं काही नाही."

"तुला पाहिलं तेव्हा मला वाटलं. माझी बायको शेजारणीकडून आली आणि सांगायला लागली, त्यानी म्हणे अंतराळात माणूस पाठवला आहे. रेडियोवर बातमी आली असं ती म्हणाली. इतकंच नाही तर तिनं असही सांगितलं की त्या माणसाचं नाव तुझ्या मुलाच्या नावासारखंच वाटलं म्हणून."

"हट् ! काहीही सांगतात ते !" बाबांनी त्याच्या बोलण्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. त्यातलं काही बोलणं त्याना ऐकूही आलं नाही. बाबाना कमी ऐकायला यायचं.

"मी असंच म्हटलं, काय वाटेल ते बोलत सुटतात. तू दिसलास मग मी विचार केला, खुद्द तुलाच विचारून खात्री करून घ्यावी. तुला तर नक्कीच माहिती असणार."

"तंबाखूबद्दल आभारी आहे. फार छान होता तुझा तंबाखू बरं, चलतो मी आता" बाबा काही पावलंच पुढे गेले असतील, त्यांच्या मित्रानं त्याना पुन्हा हाळी दिली.

"मग तू काय म्हणतोस ? त्यानी कोणाला अंतराळात पाठवलंच नाही ?"

बाबानी त्रासिकपणानं खांदे उडविले.

झात्वोरोवोला त्याना नदी ओलांडणं भाग होतं. नावाडी जागेवर अगदी तयार होता. "अलेक्सी, तुझी वाट पहाता पहाता मी थेट हाडांपर्यंत काकडून गेलोय," तो म्हणाला आणि त्यानं बाबांच्याकडं एक सूचक दृष्टी टाकली. "सूर्य उगवला असला तरी इथं नदीवर केवढा गारठा आहे."

"घाबरू नकोस, तुझी सारी थंडी आता पळून जाईल," बाबानी व्होडकाची एक लहानशी बाटली आतल्या खिशात ठेवली होती, ती काढली. नावाडी ब्रेड आणि कायतं घेऊन आला. बैठकीच्या खालून त्यानं दोन टिनचे ग्लास काढले आणि ते भरले.

"अलेक्सी, हा ग्लास तुझ्या मुलासाठी ! एका दमात रिकामा कर. त्याचं उड्डाण सुखात होवो"

"काय बडबडतो आहेस तू ?" बाबानी जोरात विचारलं.

नावाडी गोंधळला. "का ? मला वाटलं, आज तू अगदी आनन्दात असणार. तू यायच्या एक मिनिटच अगोदर मी काही लोकाना पलिकडे सोडून आलो. पाहिलंस ? वल्ही अजूनसुद्धा ओली आहेत. ते सांगत होते मेजर युरी अलेक्सेयेविच गागारिन अन्तराळात उड्डाण करीत आहेत."

"अन्तराळात ! तुला काय कळतय् ? कोणीतरी सैतान असणार तो; डोकं ताळ्यावर नसलेला."

"पण अलेक्सी, तो तुझा मुलगाच आहे"

"कोणता मुलगा ? तू कशाबद्दल, कोणाबद्दल बोलतो आहेस ? तू म्हणालास तो मेजर आहे, म्हणालास ना ? माझा मुलगा अजून सीनियर लेफ्टनन्ट आहे. मेजर व्हायच्या गोष्टी अजून फार दूर आहेत शिवाय आता नुकताच मी त्याच्याकडे जाऊन राहून आलो. मला तसं कुठे काही दिसलं नाही. काही का असेना, त्या मेजरचं नाव गागारिन आहे, आनन्दाची गोष्ट आहे. हा ग्लास त्याच्या आरोग्यासाठी."

नदी ओलांडली आणि बाबा त्यांच्या रस्त्याला लागले. टेकडीवर क्लुशिनो दिसायला लागलं. सुतारांची तुकडी ज्या झोपडीत रहात होती तिथे त्यांनी पाऊल



ठेवल मात्र, गावच्या सोविएतचा अध्यक्ष वासिली बिर्युकोव पळत पळत आला अन् आत घुसला. त्याचा दम उडाला होता. काय होतंय् कळण्याअगोदरच त्यानं बाबाना कडकडून 'अस्वल-मिठी' मारली.

"सोड सोड मला. मी काही मुलगी नाही इतकं लाडात यायला !" बाबा रागावले

"ही सातवी खेप; सकाळपासून सारखा तुझ्या घरावर चकरा मारतोय् मी" बिर्युकोव उत्साहानं बोलत होता. "कुठं गेला होतास तू ? फेदोरेन्कोचे फोनवर फोन येताहेत. तू कुठे आहेस म्हणून शोधायला सांगितलं त्यानं मला. वार्ताहरानी गच्च भरलेलं एक हेलिकॉप्टर इथं उतरलं. त्याच्या आवाजानं साऱ्या गाई घाबरून उधळल्या. चल, चल लवकर !"

"कुठे ?"

बिर्युकोवनं डोळे वटारले, "अलेक्सी इवानोविच, साठीच्या अगोदरच तुझी बुद्धी नाठी व्हायला लागली काय ? का तू उगीच वेड घेऊन पेडगावला जातो आहेस ? तुझा मुलगा अंतराळात उड्डाण करून आला आहे. तुला शोधून जर फेदोरेन्कोकडे घेऊन गेलो नाही तर तो माझी मान मुरगाळून टाकील. त्यानंच सांगितलंय् मला. अन् तू विचारतोस, कुठे म्हणून. आपल्याला जिल्हा केंद्रावर जायचं आहे."

आता आश्चर्यानं थक्क होण्याची बाबांची पाळी होती. "माझा मुलगा ? काही चूकभूल होत नाही तुझी खात्री आहे ना ?"

"आता पहा एकदा याच्याकडे !" बिर्युकोव टेकीला आला होता.

'माझा मुलगा ? म्हणजे तुला म्हणायचंय् युरा ? म्हणजे युरा..."

सारे सुतार बाबांभोवती जमा होऊ लागले. कोणीतरी पळत जाऊन व्होड-काची बाटली आणला, बूच उडवून ग्लास भरून बाबांच्या हाती दिला

"माफ करा," बाबा म्हणाले, "व्होडका न घेताच भरपूर चढलीय मला." एकदम ते सर्वासमोर झुकून म्हणाले, "तुमच्या आपुलकीबद्दल मी फार फार आभारी आहे," बोलता बोलता त्याचा गळा दाटून आला.

"अलेक्सी इवानोविच, चल आता."

"जरा स्वस्थचित्त हो,"

"मी म्हणतो, तुम्ही बाकीचे लोक जरा बाहेर का जात नाही ?"

बाबा घोड्यावर बसून झात्वोरोवोला गेले. मग तिथून ट्रॅक्टरवर बसून अस्कोवोला गेले. तिथं जिल्हा-केंद्राची जीप त्यांच्यासाठी तयारच होती.

झात्स्कला घराबाहेर मोटारींची रांगच्या रांग लागली होती; लोकांची

गर्दी झाली होती. जेव्हा शेजाऱ्यानी बाबाना पाहिलं तेव्हा सारेजण जोरात ओरडले, "हुरेऽऽ अलेक्सी इवानोविच, हुरेऽऽ, हुरेऽऽ! अंतराळ वीराचे वडील हुरेऽऽऽ!"

गर्दीतून वाट काढीत फेदोरेन्को बाबाना वार्ताहरांकडे घेऊन गेला. बाबा उंबरठ्यावरच खिळल्यासारखे झाले. फ्लॅशबल्बनी त्यांचे डोळे दिपत होते. ते गोंधळल्यासारखे, असहाय झाले. वर्ताहरांच्या प्रश्नाना उत्तरं देण्याचा त्यानी प्रयत्न केला. त्याना इतक्या गर्दीची कधी सवय नव्हती. इतक्या साऱ्या लोकांचं लक्ष आपल्यावर खिळलंय् या विचारानं ते अस्वस्थ झाले. सारखं म्हणायला लागले, "आभारी आहे; आभारी आहे. माझी मुलं उत्तम कामगार व्हावीत म्हणून मी नेहमीच प्रयत्न केला."

फेदोरेन्कोनं बाबांच्या खांद्यावर हात ठेवला, "अलेक्सी इवानोविच, काळजी करू नकोस. युराच उड्डाण चागलं झालं. तो सुरक्षित परत आला." त्यानं बाबाना एका बाजूला घेतलं आणि वर्ताहराना काहीतरी सांगितलं. ते थोडा वेळ बाहेर गेले.

बाबानी अंगातलं रजईचं जाकीट काढलं; शर्टही बदलून दुसरा निळा सॅटीन शर्ट घातला. "तुझी आई कुठे आहे?" त्यानी मला विचारलं.

"सकाळी तिला मॉस्कोच्या गाडीत बसवून आलो." मी उत्तरलो

"या साऱ्यांशी बोलायला माझ्याऐवजी तीच हवी होती इथं," बाबा काहीशा खेदानं म्हणाले.

तोपर्यंत रात्रीचे ११ वाजत आले होते. एक निरोप्या सोविएत सरकारची तार घेऊन आला; अंतराळवीराच्या कुटुंबियानी मॉस्कोला निघण्याच्या तयारीत असावं.

मध्यरात्री मोटारी आल्या. जे कॉम्रेड आमच्याबरोबर येणार होते त्यानी वार्ताहराना जाण्यासंबंधी सुचवलं पण रात्री दोनपर्यंत ते तिथून हलले नाहीत.

एव्हाना आम्ही सारेजण पार थकून गेलो होतो. बोलून बोलून आवाज बसले होते, घोगरे चिरचिरे झाले होते. शेवटी जेवायला बसलो, सकाळपासून कोणी काही खाल्लं नव्हतं, पण घास घशाखाली उतरेना.

"मी पैजेवर सांगतो, युरा आता मेजवानी झोडीत असेल. या घरात सारा दिवस केवढा कल्लोळ माजला होता, याची त्याला कल्पनाही नसेल," बरीस म्हणाला.

आम्हीं आमचे सर्वात चांगले कपडे घातले आणि मोटारीत बसलो. पहाटेचे पाच वाजले होते. आमच्या गाईडनं आम्हाला सांगितलं, मॉस्कोत सारा दिवसभर लोक, अंतराळउड्डाणातला पहिला विक्रम साजरा करीत होते. लोक गटागटानं



लाल चोकाकडे जात होते. त्यांच्या हातात फलक होते." आम्ही पाहिले! "आपण ताऱ्यांपाशी जाऊन पोहोचलो आहोत." "गागारिनला अभिवादन आणि सदिच्छा."

सकाळी नऊ वाजता आम्ही मॉस्कोला पोहोचलो. आम्हाला हॉटेलमध्ये नेण्यात आलं. आई, वाल्या आणि मुली अगोदरच तिथे आल्या होत्या.

नुकोवो विमानतळावर युराची गाठ पडायला फक्त चोवीस तासांचाच अवधी होता.

☐ ☐

## ५ : झात्स्ककडून आपल्या मुलाचा गौरव

कित्येक महिने उलटले. आमच्या युरानं खरोखरच अन्तराळात उड्डाण करून पृथ्वीला प्रदक्षिणा घातल्या होत्या ही घटना आता आमच्या अंगवळणी पडली होती. नुकोवो विमानतळावर पहिल्या भेटीच्या प्रसंगी उत्तेजित झालेल्या वृत्ती आता शान्त झाल्या होत्या. पूर्वीसारखा प्रत्येकजण आपापल्या कामाला लागला होता. बाबा सुतारकामात, मी ट्रक चालविण्यात आणि बायका घरकामात पुन्हा मग्न झाल्या होत्या.

युरा आपल्या मूळ गावाला भेट देण्यासाठी केव्हा येणार इकडे साऱ्यांचे लक्ष लागले होते. त्या दिवसात युरा अनेक महत्त्वाच्या कामात गुंतला होता.

वर्तमानपत्रातून पुढील बातम्या झळकत होत्या : गागारिनची चेकोस्लोवाकियाला भेट," "युरी गागारिन यांचे बल्गेरियात आगमन .." "ओरेनबर्ग फ्लाईंग स्कूलला गागारिनची भेट," "मेजर गागारिन यांची कालुगाला भेट." याच शहरात कॉन्स्तंतिन त्सिओल्कोवस्की यांचा जन्म झाला. त्सिओल्कोवस्की हे अंतराळशास्त्राचे जनक; तेव्हा कालुगाला अंतराळ-संशोधनाचा पाळणा म्हणणे योग्य ठरेल."

दरम्यान छोटंसं झात्स्क आपली पाळी येण्याची वाट पहात होतं. आपल्या मुलाच्या भेटीकडं डोळे लावून बसलं होतं. आमच्या बाबांच्या घरासमोरच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला नवं घर उभारलं जात होतं.

युरालाही घरी यायची ओढ लागली होती हे आम्हाला माहीत होतं. शेवटी एक दिवस त्याचा आईला फोन आला : दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजता तो येणार होता.



टेलिफोन ऑपरेटर्सनी त्या दोघांचं फोनवरचं सारं बोलणं ऐकून घेतलं. ते बोलणं काही त्यानी गुप्त ठेवलं नाही. तासाभरात बातमी गावभर झाली. सगळीकडे युराच्या भेटीचाच विषय चर्चिला जाऊ लागला. युराच्या बालपणीचे मित्र आता अर्थातच चांगले तगडे तरूण झाले होते. मॉस्को–मिन्स्क हमरस्त्यावर त्याच्या गाडीला गाठायचं आणि तिथून त्याला खांद्यावर उचलून आणायचं असं त्यानी ठरवलं. दीडशे वर्षापूर्वी आमच्या पूर्वजानी असंच केलं होतं. फील्ड मार्शल मिखाईल कुतुझोवनं फ्रेंचांचा पराभव केला तेव्हा आमच्या पूर्वजानी त्याला झात्स्कमध्ये असंच खांद्यावर उचलून मिरवीत आणलं होतं. स्थानिक रेडियो केंद्रानं जाहीर केलं, आमच्या अंतराळवीराच्या सन्मानार्थ दुपारी चार वाजता गावच्या मैदानात जाहीर सभा होईल

साऱ्या गावात उत्साहाचं वारं संचारले. एखाद्या महोत्सवाच्या तयारीत असल्यासारखं ते दिसू लागलं. दुपारी एक वाजल्यापासून मैदानात गर्दी होऊ लागली. अचानक फेदोरेन्को आणि जिल्ह्याचे इतर अनेक अधिकारी बाबांच्या घरी येऊन दाखल झाले. जिल्हा कार्यकारी समितीच्या अध्यक्षानी सोविएत शासनाची ऑर्डर वाचून दाखवली. रस्त्यापलिकडचं नव घर सोविएत शासनानं अंतराळवीराच्या आईवडिलाना भेट दिलं होतं. फेदोरेन्कोनं त्याना नव्या घरात चलण्याचं निमंत्रण दिलं.

तेवढ्यात मुलाचा एक घोळका आरडाओरड करीत तिथे घुसला, "तो येतोय् आलाच "

बाहेर अनेक मोटारी येऊन थांबल्या.

"त्याच्या स्वागताला आपण बाहेरसुद्धा गेलो नाही; आणि सभा तर चार वाजता बोलावली आहे !" फेदोरेन्को खेदानं म्हणाला.

युरा आला, त्यानं आई बाबांचे मुके घेतले; सरचिटणिसाला मिठी घातली, "काही बिघडलं नाही, निकोलाय ग्रिगोर्येविच," तो म्हणाला, "माझ्या फोननं सारा घोटाळा केला. दोष माझाच आहे, सभा ठरवली आहे ती त्याप्रमाणे वेळेवर व्यवस्थित होईलच. ठरल्या वेळेअगोदर येण्यात काहीतरी हेतु होता, हे मला सांगायचंय्."

"मला आणि तुझ्या आईला त्यानी घर बांधून दिलंय्, चल पाहु या,' बाबा मध्येच म्हणाले

"चला तुम्ही आणि आईनं इथं कमीत कमी दोनशे वर्षं रहायलाच पाहिजे. कमी करून चालायचं नाही. सुखात, आनंदात राहाल तुम्ही."

दोन प्रशस्त, आरामशीर खोल्या; स्वयंपाकघर, बाथरूम; ऐसपैस व्हरांडा घरामागे सफरचंदाची बाग.

आमच्या आई-बाबांचं मन भरून आलं. मी युराला बोलताना ऐकलं,, त्याचाही आवाज दाटला होता. "चला बाबा, मन आवरा. जुने शिपाईगडी तुम्ही. स्वतःला सावरा. चला, बाहेर सारेजण आपली वाट पहात खोळंबले आहेत"

खरोखरच लोक बाहेर खोळंबले होते. अंगणाबाहेर लोकांचा घोळका उभा होता. युराचे सारे मित्र तिथे जमा झाले होते. यंग पायोनियर पथक ड्रम वाजवीत आणि ब्यूगुल फुंकीत आलं होते. अग्रभागी त्यांचं निशाण वाऱ्यावर लहरत होते त्यांच्या मागे मुली आपले ठेवणीतले पोशाख घालून आल्या होत्या. त्यांच्या हातात फुलांचे भरघोस गुच्छ होते

"आपली सभा इथच भरविली तरी ठीक होईल," फेदोरेन्को म्हणाला.

युराच्या प्रत्येक मित्राला त्याला स्वतंत्रपणे भेटायचे होते. मुलींना युराबरोबर फोटो काढून घ्यायचा होता; त्याची स्वाक्षरी हवी होती. यंग पायोनियरनी त्याला शाळेच्या सभेसाठी येण्याचं निमंत्रण दिलं.

"कोणत्या शाळेत शिकता तुम्ही?" युरानं विचारलं.

"तुमच्याच जुन्या शाळेत."

"मग मी नक्की येईन तिथे."

गर्दी पांगली. आईनं युराला आणि त्याच्याबरोबर मॉस्कोहून आलेल्या पाहुण्याना जेवायला आत बोलावलं. ते टेबलाभोवती बसतात न बसतात तोच बरीस आत आला.

"युरा तुला भेटायला बाहेर एक आजीबाईंच शिष्टमंडळ आलं आहे," त्याने सांगितलं.

फाटकापाशी बऱ्याच आजीबाई उभ्या होत्या १०–१२ जणी असतील. बाहेर ऊन होतं तरीही प्रत्येकीच्या अंगावर शाल होती. काहीजणी हातातल्या काठीवर रेलून उभ्या होत्या. सर्वांनी घराचं निरीक्षण चालवलं होत. युरनं त्याना ओळखलं.

"या तर आपल्या गल्लीतल्याच आहेत साऱ्याजणी. ही मान्या मावशी. ती तिथे मारिया पेत्रोव्ना. मला बाहेर जाऊन त्यांच्याशी बोलून यायला हवं. नाहीतर त्याचं मन दुखावेल," तो लागलीच उठून बाहेर गेला.

"हॅलो, कसं काय?" युरा उत्साहानं बोलू लागला, "बाहेर का उभ्या? आत या ना."

"असू देत बाहेर, आम्हाला काही वाटत नाही त्यात."

"म्हाताऱ्या लोकाना उन गोड लागतं."

"म्हटलं, जरा तुला भेटून, पाहून जावं."



मारिया पेत्रोव्नाला बाकीच्या जणी डिवचून डिवचून पुढे व्हायला सुचवीत होत्या शेवटी मारिया जरा पुढे आली.

"खरं सांग युरा. तुला तो दिसला का तिथं?"

"तो कोण?"

"परमेश्वर. आपला देव रे त्यानं तुला इतकं जवळ कसं येऊ दिलं?"

युरा मनसोक्त हसला, "नाही. तुमची निराशा होईल म्हणून मला वाईट वाटतंय् पण मला कोणी दिसलं नाही. तसंच सांगायचं तर तिथे भेटायला कोणी आहे असं मला वाटत नाही."

साऱ्याजणी डोक्याला डोकी लावून काहीतरी कुजबुजू लागल्या.

"युरा, तू डोक्यावरची टोपी का काढत नाहीस?" मान्या मावशीन विचारलं.

"माफ करा हं," युरा गडबडला. या साऱ्या बायकांशी आपण इतका वेळ टोपी घालूनच बोलत होता, हे रीतरिवाजाला न शोभणारं झालं हा विचार मनात येऊन तो गडबडला. एका झटक्यात डोक्यावरची टोपी काढून त्यानं भिरकावली. मारिया पेत्रोव्ना लगेच पुढे झाली आणि तिनं युराच्या केसांचा झुबका हातात धरून जोरानं खेचला.

"आऽऽऽ! दुखतंय ना!" युरा खोटाच विवळला. डोळ्यात पाणी भरून आलं. "युरा, रागावू नकोस. कोणीतरी सांगत होतं. ते म्हणाले, देवानं तुला शिक्षा केली आणि तुझे सारे केस काढून घेतले. आता म्हणे तू कुत्र्याच्या केसांचा टोप घालून हिंडत असतोस. पण तुझ्या डोक्यावर हे तुझेच खरेखरे केस दिसतात."

जरा अगोदर आम्ही सारे बाहेरच्या पडवीत येऊन उभे राहिलो होतो. हा किस्सा ऐकून सारेजण खो खो हसत सुटले, अगदी पोट दुखेपर्यन्त हसत सुटले.

"कोण काय वाटेल त्या गप्पा पिकवतं. पण तू त्यांच्यावर विश्वास तर ठेवीत नाहीस ना?" युरानं विचारलं, "कोण या कंड्या पिकवतं त्याचं नाव सांग मला," युरान गमतीनं त्या कोणाला तरी दम भरला.

पण एव्हाना मारिआ पेत्रोव्ना सावरली होती. "या अफवा कोण पिकवतं कधी कोणाला कळतं का? कोणी सांगाव, आम्हीही पिकवल्या असतील. आम्ही गप्पा मारायला कोंडाळं करून बसतो मग त्या गप्पांत काय काय शिजतं अन काय काय तयार होतं, आमचं आम्हालाही ठाऊक नसतं. असो. मग आम्ही ऐकलं ते खरं नाही तर?"

"बिलकूल झूट."

"युरा, तू काही काळजी करू नकोस. पुन्हा जर असल्या काही गप्पा कानावर आल्या तर मी तिथल्या तिथं त्यांचा बंदोबस्त करीन. मी त्याना सांगेन,

"बावानो, मी स्वतः जाऊन त्याला प्रत्यक्ष भेटून आलेय्, शेजारीच आहे तो माझा; मी स्वतः माझ्या या डोळ्यानी पाहून खात्री करून आलेय्, युरा लहानपणी होता तस्साच आहे. त्याच्या डोक्यावरचा एक केसदेखील गायब झालेला नाही."

या साऱ्याच बोलण्यानं युराची चांगलीच करमणूक झाली. "मारिया पेत्रोव्ना, एक सांगू का तुला?" युरा खोडकरपणानं म्हणाला, त्याच्या डोळ्यात मिस्किलता भरली होती, "आम्ही वारंवार अंतराळात जायला लागलो ना, की तुलासुद्धा घेऊन जाऊ. मग काय विचार आहे तुझा?"

"मी तरूण असते तर तुला नक्की हो म्हटलं असतं. तुझ्याबरोबर मी कुठेही आले असते, युरा," ती म्हणाली.

गावच्या मैदानातली सभा अगदी बरोबर चारच्या ठोक्याला सुरू झाली. युरा व्यासपीठावर चढला. दहा मिनिटं त्याला लोकानी एक शब्दही बोलू दिला नाही. लोक टाळ्या वाजवीत होते, फलक हलवीत होते, निशाण फडकवीत होते; मोठमोठ्यानं घोषणा देत होते

"पहिला अंतराळवीर दीर्घायू होवो!"

"सोविएत विज्ञानाचा जय असो!"

"युरी गागारिनकी जय!"

"युरा, सोळा आणे काम केलेस! झातस्कचं नाव अंतराळ विज्ञानाच्या नकाशावर लावलंस."

कोणीतरी एकदोघं ओरडले, "गागारिन, और आगे बढो"

"युरा, तुझ्या जुन्या मित्राना विसरू नकोस."

लोकाना शान्त करण्यासाठी युरा सारखा हात वर करीत होता, पण व्यर्थ. अखेरीस युरानं आपल्या एका हातानं आपल्या जुन्या शिक्षकाना, लेव मिखाय-लोविच बेस्पालोव याना विळखा घातला आणि तो त्याना काहीतरी म्हणाला. एका क्षणात सारेजण अगदी शांत झाले.

"मी काही फार मोठी कामगिरी बजावली आहे असं मला दिसत नाही," युरा बोलू लागला, "माझ्या ऐवजी तुमच्यापैकी प्रत्येक जण ते करू शकला असता. मी फक्त आमच्या महान जनतेची इच्छा पूर्ण केली. आपल्या लोकानीच मला लहानाचं मोठं केलं आणि या उड्डाणासाठी मला शिकवून तयार केलं. माझे लोक, माझे गाववाले, सारी सोविएत जनता या साऱ्या साऱ्यांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. मला माझ्या शिक्षकांचे खास आभार मानले पाहिजेत. हे लेव मिखायलोविच बेस्पालोव माझे पदार्थविज्ञानाचे शिक्षक. आम्हा शाळकरी मुलांना



या अद्भुत शास्त्राची, विमानविद्येची आवड त्यानीच प्रथम लावली. त्यानीच आम्हाला त्सिओलकोव्स्कीची प्रथम ओळख करून दिली. कोणी सांगावं, माझ्या शालेय आयुष्यात जर मला असे शिक्षक भेटले नसते तर आज मी अंतराळवीर झालोही नसतो" येवढं बोलून युरानं पुन्हा बेस्पालोवना विळखा घातला.

प्रेक्षकांमध्ये बेस्पालोव यांचे बरेच शिष्य होते. वस्तुतः बेस्पालोवना ओळखत नाही असा माणूस झातस्कमध्ये औषधालासुद्धा सापडणं कठीण होतं. युराच्या बोलण्यानंतर टाळ्यांचा केवढा कडकडाट झाला असावा याची सहज कल्पना येईल.

उड्डाण करताना आपल्याला काय काय अनुभव आले, काय काय वाटलं, अंतराळयानाच्या आत कसं वाटलं ते त्यानं सर्वांना सांगितलं. चेस्कोस्लोवाकिया आणि बल्गेरिया या देशात त्याचं फार मोठं स्वागत करण्यात आलं होतं. त्याचंही वर्णन त्यानं आम्हाला ऐकवलं. मग प्रेक्षकानी काही प्रश्न विचारले त्याची त्यानं उत्तरं दिली. सभेच्या शेवटी शेजाऱ्यापाजाऱ्यांशी जिव्हाळ्याच्या गप्पागोष्टी झाल्या, त्यात कित्येक तास निघून गेले.

सभेहून परतताना युरानं आपला एक हात आईच्या अन् एक हात बाबांच्या हातात अडकवला होता. आईबाबांच्या हातात फुलाचे भरघोस गुच्छ होते. फुलं घेऊन चालताना बाबा कमालीचे अवघडले होते. माझ्या हातात फुलांपेक्षा कुऱ्हाडच शोभून दिसली असती, असं कदाचित त्याना वाटत असावं.

त्यांना पोहोचवायला लोकांचा एक भलामोठा घोळका घरापर्यंत आला होता.

"उद्या सकाळी कोणाला पत्ता लागायच्या आत उठून मासे पकडायला जाऊ, कसा वाटतो हा बेत?" युरानं हलक्या आवाजात विचारलं.

"उत्तम! सारा सरंजाम तयार आहे," मी उत्तरलो.

दुसऱ्या दिवशी पहाटेच उठून आम्ही नदीवर मासे पकडायला गेलो. यायला बराच उशीर झाला. त्यानंतर तिसऱ्या दिवशीही युरा भल्या पहाटेच उठला.

"जरा झोपायचं होतंस आरामशीर आणखी थोडा वेळ," आई लटकंच रागावली.

"अशा या सुंदर सकाळी आळसानं लोळत रहायचं म्हणजे फारच लाजेची गोष्ट. मी नक्की सांगतो, बाबा केव्हाच उठून कामाला लागलेले असणार."

"आता त्यांचं वय होत आलंय्. म्हाताऱ्या माणसांना फार झोप लागत नाही. ते मघाच उठून कोंबड्याना दाणे टाकायला गेले आहेत."

युरा लोटा भरून ताजं दूध प्याला. "अन्तराळवीराचं हे महत्त्वाचं अन्न असतं. आई, आज मला शाळेत मुलांसमोर बोलायचंय्. काय बोलावं समजत नाही त्यामुळं जरा गडबडलोय्."

“ त्यात गडबडायला काय झालं ? काहीही सांग त्यांना.”

“ तसं नाही जमायचं मला. मी खरच नर्व्हस झालो आहे. आपण असे बावचळून जाऊ असं कधी वाटलं नव्हतं मला.”

तेवढ्यात लेव मिखायलोविच यांचा फोन आला. शाळेचं सभागृह अपुरं पडत होतं. कारण इतर शाळांतल्या मुलांनाही अंतराळवीराला पहायचं होतं, तेव्हा आता सभा सांस्कृतिक सदनात ठेवली होती.

“ पाहिलंस आई, किती मुलं जमणार आहेत तिथं ? सारीजणं फाडून खातील मला,” त्यानं अगदी काळजीपूर्वक शर्टला आणि पँटला इस्त्री केली. सारा जामानिमा झाल्यावर त्यानं आरशात पाहिलं आणि आपली पदकं नीट सरळ ओळीत आहेत की नाही याची खात्री करुन घेतली.

“ निघालो मी.”

तो बाहेर पडायला आणि मी आत घुसायला एकच गाठ पडली.

“ वाल्या, सभा सांस्कृतिक सदनात होणार आहे. पण मला अगोदर शाळेत जाऊन यायचंय. माझ्या जुन्या वर्गात जुन्या बाकावर बसून यायचंय ”

“ मी यायलं हवं बरोबर ?”

तो काहीसा लाजल्यासारखा झाला अन् हसला, “ तू सरळ सभेच्या ठिकाणी य. ही माझी एक लहर, मला माझ्या बाकावर अगदी एकटं बसून यायचं आहे.”

तो शाळेच्या रस्त्याला लागला. शाळेत इतक्या लवकर कोणीही आलेलं नसणार याची त्याला खात्री होती पण त्याचा अंदाज साफ चुकला. शाळेत मुलांचा हा गोंगाट चालला होता. पांढरे शर्ट घातलेले आणि लाल टाय बांधलेले यंग पायोनियर त्याला पहाताच आनंदानं आश्चर्यचकित झाले. त्यांची धांदल उडाली. सारेजण त्याच्या भोवती जमा झाले आणि त्याला शिक्षकांच्या खोलीत घेऊन गेले सारे शिक्षक आलेलेच होते.

“ मला वाटलंच होतं.” लेव मिखायलोविच म्हणाले, “ तुला काही घरी बसवायचं नाही मुकाटयानं आणि तू अगोदर इथं येशील म्हणून. इतरांचाही हाच अंदाज होता,” ते युराला पदार्थ विज्ञानाच्या वर्गात घेऊन गेले, “ या गेल्या काही वर्षात आम्ही बरीच नवीन उपकरणं आणि इतर साहित्य आणलं आहे. मुलानी स्वतःदेखील खूप गोष्टी बनवल्या आहेत. हे ओळखलंस का काय आहे ते ?” त्यानी विमानाचं एक मॉडेल दाखवलं. त्याला लहानसं गॅसॉलिनचं इंजिन होतं. कित्येक वर्षापूर्वी त्यांच्या मार्गदर्शनाखाली ‘ ६ वी अ ’च्या विद्यार्थ्यांनी विमानांचे जे अनेक नमुने तयार केले होते त्यातलाच हा नमुना होता

“ कशाचंही काय, शेवटी वर्तुळ पूर्ण होतं.” युरा म्हणाला. हातात विमानाचा नमुना घेऊन युरा कितीतरी वेळ उभा होता. काय त्याच्या मनात विचार चालले होते कोणास ठाऊक



लेव मिखायलोविच म्हणाले, त्यानंतर युरा पुन्हा काही बोलला नाही. तिथून उठून तो आपल्या जुन्या वर्गात गेला. तिथं चिटपाखरू नव्हतं. युरा आपल्या बाकावर एकटाच बसून राहिला.

“ यंग पयोनियर”ची सभा सांस्कृतिक सदनात भरली युराला सन्मानित यंग पायोनियर म्हणून निवडण्यात आले. एका मुलानं त्याच्या गळ्याभोवती लाल टाय बांधला. त्यानंतर मुलं आणि मुली सभादालनाकडे धावली. शिक्षकांच्या करड्या शब्दांचा किंवा शिस्त राखण्याबद्दल केलेल्या आवाहनांचा काही उपयोग झाला नाही. पुढच्या रांगेत स्टेजच्या जवळ बसायला जागा मिळावी म्हणू प्रत्येकजण धडपडत होता.

विस्फारलेले असंख्य डोळे आपल्याकडे रोखून पहात आहेत या जाणीवेनं मला वाटतं युरा गळाठल्यासारखा झाला.

“ मी यांच्याशी काय बोलू ? उगीच विद्वत्तापूर्ण बोलणं त्याना आवडायचं नाही.”

“ काही काळजी करू नकोस.” लेव मिखायलोविच त्याला धीर देत म्हणाले, “ एका मिनिटात तुला आपोआप समजेल–मुलांचं असंच असतं. तेच तुला काय बोलावं हे सुचवतील. हजारो प्रश्न विचारणार आहेत ते तुला.”

आणि नेमकं तसंच झालं. त्यानी विचारलेल्या प्रश्नांचा एक ग्रंथच तयार झाला असता. त्या सभेचा लघुलिपीतला वृत्तांत माझ्याजवळ आहे. पण माझ्या आठवणीत आहे ते सांगायची माझी इच्छा आहे.

प्रथम एक दहा वर्षांचा मुलगा उठला. उत्साहानं आणि भावनावेगानं त्याचा आवाज कापत होता. “ युरी अलेक्सेयेविच, तुम्ही अंतराळात उडत होतात तेव्हा तुम्हाला तिथं भीती वाटली का ?”

श्रोते रागाने पुटपुटायला लागले. मुलानं विचारलेला प्रश्न बाकीच्याना पटला नाही, रुचला नाही. अंतराळवीराला कधीही कशाचीही भीती वाटणं शक्य नाही अशीच त्यांची धारणा होती.

“ वा ! काय पण प्रश्न विचारलान् !”

“ बसा खाली ! दुसरं काही तरी शहाण्यासारखं विचारा.”

युरा मंचावरून उतरून स्टेजच्या कडेवर येऊन उभा राहिला. मुलाना शान्त करण्यासाठी त्यानं हात वर केला. जेव्हा त्यानं मुलाच्या प्रश्नाला उत्तर दिलं तेव्हा अनेकजण आश्चर्यचकित झाले.

“ खरं सांगायचं तर थोडासा घाबरलो होतो. ज्यांना कशाचीच भीती वाटत नाही असे कोणी लोक जगात असतील असं मला वाटतं नाही. महत्वाची गोष्ट अशी आहे, तुम्हाला त्या भीतीवर मात करता आली पाहिजे. तर मी काय सांगत

होतो ? मला भीती वाटायला लागली. पण मी स्वतःलाच म्हणालो, " सावकाश ! धीरानं घे. तुला काय शिक्षण मिळालंय् ते आठव. तू साऱ्या साधनसामुग्रीची कसून तपासणी केली आहेस. आपल्या देशाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाच्या अशा एका गोष्टीची तू चाचणी करायचं मान्य केलं आहेस तेव्हा घाबरून चालायचं नाही; तसा तुला अधिकार नाही." तुम्हाला पटनात का माझे हे विचार ?"

" होय," सभागृहाकडून एकमुखानं खणखणीत उत्तर आले.

मग पुढे अनेक प्रश्न विचारण्यात आले.

" प्रत्येकाला शूरवीर कसं बनता येईल ?"

" खरा पुरुषार्थ गाजवायला काय करावं लागतं ?"

" तुमचा आदर्श वीर कोणता ?"

युरा स्थिरचित झाला होता. त्यानं साऱ्या प्रश्नांची तपशीलवार उत्तरं दिली. मधूनच तो विनोदानं काही तरी बोले. प्रत्येक विनोदाला मुलं हसत होती. सभेला अनौपचारिक, मित्रामित्रांच्या गप्पांचं स्वरूप आलं.

" तुम्ही कधी यंग पायोनियर होता का ?"

" होतो तर ! माझ्या लहानपणची ती सर्वोत्कृष्ट वर्षं होती. शाळेत आमची उत्कृष्ट यंग पायोनियर संघटना होती. आम्ही हौशी कलावंताचे कार्यक्रम सादर केले. पायी सहली काढल्या, गवतकापणीच्या वेळी सार्वजनिक शेताला मदत केली. आम्ही विमानांचे आणि ग्लायडरचे नमुने बनवले. च्कालोव आणि इतर शूर वैमानिक यांच्यावरची पुस्तके वाचली आणि त्याच वेळा मी ठरवून टाकलं, आपण वैमानिक व्हायचं. तुमच्यापैकी कोणाला वैमानिक व्हावस वाटतं का ?"

" आम्हाला साऱ्यांना वैमानिक व्हायचय्." कोणीतरी ओरडला.

युरा हसला. त्या दिवशी सभागृहातल्या प्रत्येक मुलाला आणि मुलीला आपण मोठं झाल्यावर वैमानिक व्हाव असं वाटण स्वाभाविक होतं.

" मला एक कल्पना सुचलीय्." लेव मिखायलोविच माझ्या कानात कुजबुजले, " बाल अन्तराळ-वीरांचा क्लब काढून युराला त्यांचा नेता करू. कसं वाटतं ? झात्स्कमध्ये असा क्लब असायलाच हवा. तुला काय वाटतं, तो मान्य करील का ?"

" माझ्यापेक्षा तुम्हालाच जास्त चांगल माहीत असणार. तुमचाच शिष्य होता तो. आताच का नाही विचारून घेत ? इथं इतक्या लोकांसमोर तो नाही कसा म्हणू शकेल ?"

" तसच करतो," बेस्पालोव खट्याळपणाने म्हणाले.

पुढच्या रांगेत एक उंच सडसडीत मुलगी बसली होती. तिनं हात वर केला



अन् विचारलं, " मला विचारायचय् मला...स्त्रियांना अन्तराळयान उडवायला मिळेल का ?"

सभागृहात एकदम शांतता पसरली. मला वाटतं सभागृहातील प्रत्येक मुलगी, प्रत्येक स्त्री युराच्या उत्तराची अत्यंत उत्कंठेनं वाट पहात होती.

तेवढ्यात एक मुलगा ओरडला, " हट् ! मुलींना अंतराळयान कधीच चालवता येणार नाही !"

" पण माझा पक्का विश्वास आहे, अगदी पूर्ण खात्री आहे त्या जरूर चालवतील." युराने सांगितले.

टाळ्यांचा इतक्या जोरानं कडकडाट झाला ! कितीतरी वेळ टाळ्या वाजतच होत्या.

कुणीतरी विचारलं, "तुम्ही पुढे काय करणार?" युरा म्हणाला. " कितीतरी करायचं आहे. प्रत्येकाच्या पुढे काहीतरी स्वप्न असायला हवं. व्लादिमीर इल्यिच लेनिन यानी आपल्याला सांगितलं आहे. स्वप्न पहायला शिका. त्याशिवाय प्रगती कशी होणार ? माझं सर्वात आवडतं स्वप्न आहे; मी चंद्रावर, मंगळावर आणि शुक्रावर जाणार आहे"

घरी येताना मी पाहिलं, युराच्या चित्तवृत्ती अगदी उमलून आल्या होत्या तो सारखा म्हणत होता," काय छान मुलं आहेत रे ती, तू पाहिलीस ती मुलं ?" युराला मुलांचं फार वेड होतं.

कथेच्या ओघात मी जरा पुढची हकिगत सांगून टाकतो. झात्स्कमध्ये लवकरच बाल अंतराळ वीरांचा क्लब स्थापन करण्यात आला. लेव मिखायलोविच बेस्पालोव त्याची सारी व्यवस्था पाहू लागले. क्लबच्या सभेत युराला बाळ अंतराळवीरानी गराडा घातला आहे अशी अनेक छायाचित्र आमच्याजवळ आहेत. ती मुलं आता मोठीं झाली आहेत. शाळा कॉलेजचं शिक्षण संपवून बाहेर पडली आहेत. कोणी सांगावं, त्याच्यापैकी काहीनी युरा ज्या मार्गानं गेला त्याच मार्गानं वाटचाल सुरुही केली असेल.

☐ ☐

## ६ : सांगता

१९६२ च्या शरदऋतूत मी, माशा आणि मुली ऱ्याझान शहरात राहायला आलो.

युरा तिथं मला भेटायला येत असे. त्याला वाटे आपण अगदी अचानक जाऊन चकित करून सोडावं. पण हमरस्त्यावरचे शिपाई, माझे शेजारी, रस्त्यावरची मुलं त्याला ताबडतोब ओळखत आणि मग हव्यानको असलेल्या पाहुण्यांची वर्दळ सुरू होई. युराला त्या साऱ्याचा भारी ताप होई, शीणही येई. पण तो कधीही कुरकूर करीत नसे. युरा होता तसाच सच्चा, प्रामाणिक राहिला. कोणीही जावं अन् त्याच्याशी बोलावं.

प्रथम तो भेटायला आला तेव्हा शरदऋतूच होता. त्यानं साधे नेहेमीचे कपडे घातले होते. डोक्यावरची हॅट इतकी पुढे ओढून घेतली होती की त्याचे डोळे झाकायला आले होते. आम्ही फिरायला बाहेर पडलो. फिरता फिरता ओका नदीच्या किनाऱ्यावर आलो. ऱ्याझान क्रेम्लिनच्या भिंतीकडे आणि मिनारांकडे पहात आम्ही कितीतरी वेळ तिथे उभे होतो. जवळच 'ॲसम्प्शन कॅथिड्रल' उभं होतं. त्याचा उंचच उंच घंटामिनार नाजूक अन् डौलदार दिसत होता. त्या पुराण्या वास्तूवरचे सोनेरी कळस मावळतीच्या उन्हात चमकत होते; आमचे डोळे दिपत होते. तांबूस, पिवळी पाने वाऱ्याबरोबर आमच्या पायापाशी गोळा होत होती.

"तुला सांगू का ?" युरा बोलू लागला," "असं इथं उभं राहून क्रेम्लिनकडे पाहायला लागलं की, मन सळसळायला लागतं. रशियात कितीतरी क्रेम्लिन आहेत. मॉस्को क्रेम्लिन तर आहेच पण नवगोरोद, कझान, अस्त्राखान आणि



रोस्तोव येथेही क्रेम्लिन आहेत. आपल्या शहरांची पाळंमुळं फार खोलवर गेली आहेत."

मी ज्या कारखान्यात काम करीत होतो तिथले काही लोक, आम्ही जिथे उभे होतो तिथेच आमच्या जवळ येऊन उभे राहिले. स्थानिक वृत्तपत्राचा छायाचित्रकार अचानक कुठून तरी उगवला, त्यानं भराभर छायाचित्रं घ्यायला सुरूवात केली. पहाता पहाता गप्पाना रंग चढला. थोड्या वेळानं आम्ही घरी जायला निघालो. भोवती मुलांचा गराडा पडला होता. ती मोठमोठ्यानं काहीतरी ओरडत होती. युरानं त्यांच्याबरोबर आपले फोटो काढून घेतले. मग त्याला ऱ्याझानच्या नावाशी निगडीत असलेल्या रशियन लोककथातील काही पात्राची आठवण झाली; तो त्यांच्याबद्दल उत्साहानं बोलत राहिला. तेवढ्यात त्याला सर्गेई येसेनिनची एक कविता आठवली; येसिनिन याच भागातला होता.

**माझ्या पलिकडून**
**काळे करडे ढग लगबगीनं जात आहेत,**
**काळवंडलेल्या दिवसांची काळी झुलपं**
**कोणीतरी विस्कटली आहेत.**
**रात्रीची चाहूल येत आहे,**
**औदासिन्य घेरते आहे,**
**अस्वस्थ मनावर दडपण वाढत आहे.**

**प्रार्थनामंदिराचे कळस**
**संध्याछायेचे धूसर अवगुंठन ओढून**
**स्तब्ध आहेत.**

"शब्द कसे निवडलेत पहा," तो म्हणाला, "इतके साधे पण इतके प्रभावी ! चाल्या, आपण त्याच्या जन्मगावाला जाऊन येऊ या. कॉन्स्तंतिनोवो तसं इथून काही फार दूर नाही. येसेनिन नेहमी माझ्याजवळ असतो," आपल्या हृदयाकडे बोट दाखवीत तो म्हणाला, "ॲना स्नेगिनाची ओळ नी ओळ तोंडपाठ आहे माझी."

दुसऱ्या दिवशी आम्ही खेडेगावात माझं छोटसं घर होतं तिथे गेलो. युरानं